# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ४६
## सभावृत्तांत

दिनांक – २०.०७.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै-२०२० ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०७/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

३) मा.साधना अंकुश मळेकर

४) मा.अश्विनी संतोष जाधव

५) मा.सारीका शिवाजी सस्ते

६) मा.राहुल गुलाब जाधव

७) मा.वसंत प्रभाकर बोराटे

८) मा.बुर्डे सुवर्णा विकास

९) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

११) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१३) मा.गायकवाड निर्मला मनोज

१४) मा.सागर बाळासाहेब गवळी

१५) मा.बारसे प्रियांका प्रविण

१६) मा.अजित दामोदर गव्हाणे

१७) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१८) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२०) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२१) मा.फुगे भिमाबाई पोपट

२२) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२३) मा.सावळे सिमा रविंद्र

२४) मा.लोंढे नम्रता योगेश

२५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२६) मा.गीता सुशिल मंचरकर

२७) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२९) मा.अनुराधा गणपत गोरखे

३०) मा.मंगला अशोक कदम

३१) मा.अश्विनी भिमा बोबडे

३२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३) मा.संजय बबन नेवाळे

३४) मा.भालेकर प्रविण महादेव

३५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३८) मा.चिखले सचिन तुकाराम

३९) मा.राजू मिसाळ

४०) मा.शैलजा अविनाश मोरे

४१) मा.बाबर शर्मिला राजू

४२) मा.अमित राजेंद्र गावडे

४३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४५) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४६) मा.ढाके नामदेव जनार्दन

४७) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४८) मा.करुणा शेखर चिंचवडे

४९) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५०) मा.अपर्णा निलेश डोके

५१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५४) मा.जयश्री वसंत गावडे

५५) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५६) मा.शाम गणपतराव लांडे

५७) मा.सुजाता सुनिल पालांडे

५८) मा.कदम निकीता अर्जुन

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६२) मा.पाडाळे निता विलास

६३) मा.काळे उषा दिलीप

६४) मा.कोकणे संतोष अंकुश

६५) मा.पवार मनिषा प्रमोद

६६) मा.बारणे अर्चना तानाजी

६७) मा.अभिषेक गोविंद बारणे

६८) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

६९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७०) मा.बारणे माया संतोष

७१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७२) मा.दर्शले रेखा राजेश

७३) मा.कलाटे राहुल तानाजी

७४) मा.कामठे तुषार गजानन

७५) मा.चोंधे आरती सुरेश

७६) मा.कस्पटे संदिप अरुण

७७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७९) मा.सुनिता हेमंत तापकीर

८०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८२) मा.कुटे निर्मला संजय

८३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.आंगोळकर सागर सुनिल

८६) मा.लोखंडे चंदा राजू

८७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९१) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९३) मा.नवनाथ दत्तू जगताप

९४) मा.संतोष बबन कांबळे

९५) मा.सोनवणे शारदा हिरेन

९६) मा. संजय मल्हारराव वाबळे

९७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९८) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे- अतिरिक्त आयुक्त (३) तथा सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे-उपआयुक्त, मा.कुंभोजकर- मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भालकर, मा.सवणे - सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे- सहा.आयुक्त, मा.गायकवाड– उदयान अधिक्षक, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.पुजारी, मा.भोसले, मा.घुबे, मा.सेठीया, मा.काळे, मा.टकले- कार्यकारी अभियंता, मा.आगळे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

----

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, भारत आणि चीन सैन्यात झालेल्या चकमकीत एक अधिकारी आणि २० जवान शहीद तसेच दत्ताकाका साने -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते व रा.कॉ.चे विद्यमान नगरसेवक यांचे निधन, चंद्रकला गोयल- माजी आमदार मा.ना.पियुषजी गोयल, केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्या मातोश्री, यांचे निधन, हरिभाऊ जावळे – जळगाव जिल्हयाचे

विद्यमान भाजपा अध्यक्ष व माजी खासदार यांचे निधन, माधव पाटणकर – मा.उध्दवजी ठाकरे, मुख्यमंत्री महाराष्ट्र यांचे सासरे यांचे निधन, विठोबा लांडे – माजी आमदार श्री.विलास लांडे यांचे वडील यांचे निधन, संजय साळवी – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक यांचे निधन, सरलाताई म्हसे - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका यांचे निधन, निला सत्यनारायण – महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला मुख्य निवडणुक आयुक्त यांचे निधन, सुनिल काळे –पुलवामा येथे अतिरेक्यांच्या चकमकीत सोलापूर येथील सीआरपीएफचा जवान शहीद, नलिनी ढसाळ – जेष्ठ पत्रकार बाळासाहेब ढसाळ यांच्या पत्नी यांचे निधन, बासु चटर्जी – ज्येष्ठ दिग्दर्शक यांचे वृध्दापकाळाने निधन, सुभाष सरीन – जेष्ठ कामगार नेते यांचे निधन, दत्तात्रय पिंगळे – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी यांचे निधन, उमेश भोसले - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी यांचे निधन, मुकूंद केणी – ठाणे महानगरपालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक यांचे निधन, हरिश्चंद्र आमगावकर – मीरा भाईंदरमधील शिवसेना नगरसेवक यांचे निधन, सुशांत सिंग राजपुत- हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिध्द अभिनेते यांचे निधन, दिनु रणदिवे – ज्येष्ठ पत्रकार स्वातंत्र्यसेनानी यांचे निधन, रवि दाते – ज्येष्ठ संगीतकार यांचे निधन, सरोज खान – ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शीका यांचे निधन, विमल सुरेश तापकीर – मा.विनया तापकीर नगरसेविका यांच्या सासुबाई यांचे निधन, लक्ष्मण गायकवाड – माजी नगरसेवक यांचे निधन, महेश लोंढे – माजी नगरसेवक वसंतराव लोंढे यांचे चिरंजीव, सुलोचनाताई बढे – माजी नगरसेविका यांचे निधन, लक्ष्मण गेनुजी कंद-गुरुजी-हभप यांचे निधन, गुरुनाथ मोहिते–यांचे निधन, जावेद बाबा शेख यांचे निधन, कै.सौ.किसनाबाई सावळेराम बुर्डे, च-होली, विठ्ठल अण्णा मारुती म्हेत्रे, चिखली, चंद्रभागा दत्तात्रय भुजबळ यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी. अशी सूचना मी मांडतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर -** जे सन्मा.सदस्य ऑनलाईन उपस्थित आहेत त्यांना कोणाला बोलायचे आहे का.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कोरोनाच्या

महामारीमध्ये ख-या अर्थाने जगाच खुप मोठ नुकसान झालं त्याच बरोबर आख्ख्या भारत देशाच नुकसान झाल आणि त्याच बरोबर पिंपरी चिंचवड शहराच देखील नुकसान झालेलं आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नगरसेवक असतील, कार्यकर्ते असतील हे त्याठिकाणी संपुर्ण समाजामध्ये व्यवस्थितरीत्या काम करत आहेत आणि सर्व घटकाना त्याठिकाणी मदत करण्याचे काम करत आहेत. बाबूजी नायर यांनी श्रध्दांजली सूचना मांडली आहे आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील ज्या ज्या व्यक्तींच निधन झाल त्याबद्दल त्यांनी सर्वांचा नामोल्लेख केला. पिंपरी चिंचवड शहरातील एक कर्तव्यदक्ष नगरसेवक, आमचे सहकारी आणि चिखली गावचे सुपूत्र, या शहराचे माजी विरोधी पक्षनेते आदरनीय दत्ता काका साने यांचे सुध्दा कोरोनाच्या महामारीमध्ये आपल्या प्रभागामध्ये, आपल्या प्रभागातील प्रत्येक घटकाना मदत करत असताना कोरोना विषाणूने बाधित होवून बिर्ला हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना काकांच चार तारखेला निधन झालेल आहे. काकांच्या बाबतीत सांगायच झालतर काकांचा जन्म शेतकरी कुटूंबामध्ये झाला. १३/८/१९७० मध्ये बाबूराव साने आणि शांता बाबूराव साने या उभयंताच्या पोटी काकानी जन्म घेतला. प्रगतशील शेतकरी म्हणून आणि चिखली गावामधील विवीध समाजामध्ये, विवीध क्षेत्रामध्ये एक अग्रगण्य भूमीका असलेला परिवार या परिवारातील काका व काकांचे मोठे दोन भाऊ आज त्यांची आई आहे पत्नी आहे दोन मुल आहेत परंतु या समाजसेवेचे वृत हाती घेतल्यानंतर ख-या अर्थाने १९९७ पासून काकानी या सामाविष्ठ गावांच अध्यक्षपद भूषवलं. जी कृती समिती स्थापन झाली त्याच काकानी अध्यक्षपद घेतलं आणि व्यवस्थितरीत्या त्यांनी ती जबाबदारी पार पाडली. २००२ च्या निवडणूकीमध्ये अवघ्या २६ मतानी काकांचा पराभव झाला. परंतु मला आठवतय ज्या दिवशी पराभवाचा निकाल काकांच्या हाती आला त्या दिवसापासून काकानी समाजसेवा चालू केली आणि ही समाजसेवा चालू केल्यानंतर कायम समाजाप्रती असलेला आदर, समाजाप्रती असलेली भावना ही कायम काकानी सत्यात उतरवत त्याठिकाणी चांगल काम केलं. चिखली गावासाठी देखील चांगल काम केलं. २००७ च्या निवडणूकीमध्ये काका भरघोस मतानी निवडून आले. त्यांनी विवीध पदावर काम करत असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून काका अ प्रभागाचे अध्यक्ष देखील झाले. त्याच बरोबर २०१२ च्या निवडणूकीचा मी साक्षीदार आहे, २०१२ च्या निवडणूकीमध्ये मी जरी मनसे मधुन असलो आणि काका जरी राष्ट्रवादीमधुन असलेतरी काकानी मला खुप मदत त्याठिकाणी केली. एक मार्गदर्शक

कसा असावा आणि आपला सहकारी कसा असावा तर काका सारखा असावा. गेल्या जनरल बॉडीमध्ये काका ज्यावेळी एका मुद्दयावर बोलत होते त्यावेळी देखील काकानी सांगीतल की राहूल जाधव तुम्ही विसरु नका २०१२ ला मीच होतो. ख-या अर्थाने तो त्यांचा शब्द बरोबर होता की काकानी मला खरोखरच २०१२ ला एक नवीन कार्यकर्ता म्हणून मदतही केली. त्याच माध्यमातून काकानी पिंपरी चिंचवड शहराच्या कामामध्ये नाव लौकीकामध्ये भर टाकण्याच काम काकानी केल आहे वेळप्रसंगी त्यांनी परिवाराचा विचार नाही केला. परंतु काकानी कायम एक आदराची भूमीका ठेवून या शहराच काम केलेलं आहे. २०१७ च्या निवडणूकीत देखील काका भरघोस मतानी निवडून आले. योगायोगाने मी महापौर झालो व काका विरोधी पक्षनेते झाले. याठिकाणी चेष्टेवारीका होईना परंतु कायम टिका व्हायची की तुमच्या गावचा महापौर असल्यामुळे तुम्ही विरोध करत नाहीत. पण प्रत्येकवेळी काकानी मला सांभाळून घेतलं. आज या कोरोनाच्या महामारीमध्ये समाजाची सेवा करत असताना काका आपल्या सर्वांना सोडून गेलेले आहेत. मी परिवाराच दु:खाच सांत्वन करत असताना त्याठिकाणी आदरनीय पवार साहेब आले, अन्य राष्ट्रवादीचे नेते त्याठिकाणी आले, विवीध पक्षाचे नेते त्याठिकाणी आले. पिंपरी चिंचवड ऐरीयातील ज्या संस्था आहेत त्या संस्थानी, नागरीकांनी देखील हाळहाळ व्यक्त केली. ती हाळहाळ व्यक्त करत असताना शास्तीकराचा प्रश्न असेल त्याच बरोबर अनधिकृत बांधकामाचा विषय असेल हे आपण विसरु शकत नाहीत अशा पध्दतीच कामकाज काकानी त्याठिकाणी केलेलं आहे. ख-या अर्थाने सांगायच झालतर आमच्या चिखली गावचा मोठा आधार हा काकांच्या रुपाने गेलेला आहे आणि त्यामुळे भविष्यकाळामध्ये चिखली गावाला या पिंपरी चिंचवड शहराला काकांची उणिव ही कायम भासणार आहे. मी आपल्या नगरसेवक, नगरसेवीका, सर्व अधिकारी, पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने त्याच बरोबर माझ्या टाळगाव चिखलीच्या ग्रामस्थांच्या वतीने त्याच बरोबर भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवडच्या वतीने, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष आदरनीय महेशदादा लांडगे यांच्या वतीने, आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या वतीने, पुणे जिल्हा बैलगाडा संघटनेच्या वतीने कारण बैलगाडा क्षेत्राला देखील काकांच खुप मोठ योगदान आहे, चिखलीगावाला बैलगाडा घाट देखील काकाच्या माध्यमातून बांधण्यात आला होता त्यामुळ पुणे जिल्हा बैलगाडा संघटनेच्या वतीने काकाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो, भविष्यकाळामध्ये काकांच्या परिवारा सोबत आम्ही सर्वचजण कायम आहोत एवढ

सांगून काकाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द थांबवितो, ओमशांती.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर आजच्या सभेमध्ये अनेक मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करताना सगळयात आमच लक्ष वेधल गेल ते आमच्या दत्ताकाकांच्या नावाकडे. दत्ताकाकांनी मागील तीन टर्म हे सभागृह त्यांनी भूषवलं, जी काही पक्षाची भूमीका असेल ती प्रखरपणे सभागृहात मांडण्याची ताकद ठेवणारा एक चांगला नेता या संपुर्ण शहराने हारवलेला आहे. काकांच दुसर रुप बघीतलतर मागच्या तीन वर्षामध्ये त्यातले काही वर्षे दत्ताकाकानी नुसतच नगरसेवक नसुन माजी विरोधीपक्षनेता म्हणून त्यांनी पद भुषवलं. परंतु सभागृहात बोलत असताना शहराचे हिताचे असेल, पक्षाची भुमीका असेल, नागरीकांचे प्रश्न असतील जे काही त्यांना बोलायच आहे ते अत्यंत मुद्देसुद, प्रखरपणे कुणाचाही विचार न करता परंतु या शहराच चांगल झाल पाहीज माझ्या हातून चांगल घडल पाहीजे, मी जे समाजसेवेच व्रत घेतलेलं आहे त्या व्रताची ख-या अर्थाने पुर्तता झाली पाहीजे याच दृष्टिकोनातून त्यांनी कायम पावल उचलली. म्हणजे एखादा विषय सभागृहात येणार असेल तर विरोधीपक्ष म्हणून कोण बघेल तर निश्चितपणे सगळया सभागृहाच्या पुढे दत्ताकाकांच नाव हे समोर आल्या शिवाय राहत नव्हतं. म्हणजे ख-या अर्थाने म्हणाव लागेल की सभागृहातला वाघ होता. सातत्याने मुद्दे मांडायचे, विषय मांडायचे आणि एक एक कागद घेवून ते सभागृहात दाखवायचे आगदी आम्ही सगळेजण उठून बघायचो आणि पुढच्या तासाच काय घडणार अशा पध्दतीने काम करणारा एक चांगला नेता या शहरानी गमावलेला आहे. काकांच्या जाण्यानी निश्चितपणे या शहराची एक मोठी हानी होणार आहे. दत्ताकाकांना माझ्या कुटूंबीयाच्या वतीने, भारतीय जनता पार्टीच्या वतीने याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज आपण कोरोनाच्या महामारीच्या संकटामध्ये लढताना मला वाटत आपल्या सगळया पीसीएमसीची सगळयात मोठी हानी झाली आहे ते म्हणजे आपले दत्ताकाका गेले. सर्वांना एकत्रीत घेवून जाणारा नगरसेवक नाहीतर एक आपला कार्यकर्ता आपल्यामधुन काळाने हिरावून घेतला आहे. माणुस निघून जातो परंतु आठवणी राहतात. त्या आठवणी

दत्ताकाकांच्या आपल्या सगळया सहकार्यांबरोबर राहणारच आहेत. सर्वांना एकत्रीत घेवून जाणारे अनेक विषयाला वाचा फोडणारे असे आपले दत्ता काका आपल्यामधुन गेले आहेत. लोक म्हणतात की जग बदलत नाही परंतु मला वाटते आपल्या मधुन एखादा माणुस हिरावून घेतला जातो, काळाच्या पडदयाच्या आड जातो त्यावेळेला आपल्या सर्वांची खुप मोठी हानी झालेली असते. आज चिखली गावावरच शोककळा नाहीतर पुर्ण पीसीएमसी शहरावर शोककळा पसरलेली आहे. दत्ताकाकांची मला एक आठवण येते आम्ही जयपुरला सगळेजण एकत्र गेलो होतो पहील्यांदा वाटत होत की दत्ताकाकांचा दरारा एवढा मोठा आहे की प्रत्येकजण घाबरत होते. पण दत्ताकाकांचा एकत्र मिसळण्याचा स्वभाव जास्त प्रकर्षाने जाणवला. आम्ही एकत्रीत सर्वजण ५२ जण होतो. त्यावेळेला दत्ताकाका एकत्र मिसळून गेले होते की त्यावेळेला समजल की दत्ताकाका काय आहेत. हा माणुस आज काळाच्या पडदयाआड गेला आहे. दत्ताकाकाला आम्ही केव्हाही, कोणीही विसरु शकत नाही. तुमच्यासाठी दोन वाक्य, शुन्यातून निष्पन्न होवूनी, किर्ती सुगंध वृक्ष फुलोनी, लोभ, माया, प्रिती देऊनी सत्तेत शेवटी मागे राहूनी अमर झाला तुम्ही दत्ताकाका. दत्ताकाका तुम्हांला पालांडे कुटूंबीयांकडून तसेच माझ्या प्रभाग क्रमांक २० मधुन संपुर्ण माझे जेवढे मंडळ आहेत त्या मंडळाकडून श्रध्दांजली वाहते. पुन्हा तुमच्यासारखा कार्यकर्ता न होने. पुन्हा एकदा श्रध्दांजली वाहते, धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कोरोनाच्या महामारीत सगळा देश होरपळून निघाला आहे. त्याच्यात आपल्या भारताला सुध्दा झळ पोहचलेली आहे. महाराष्ट्रात सगळयात जास्त झळ पोहचली असेलतर मुंबई, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये. पण ख-या अर्थाने महापौरताई तुम्ही फार कष्ट केले आणि पिंपरी चिंचवडला कोरोनामध्ये खरे सक्सेस महापौर म्हणुन तुम्ही आघाडीवर आहात. आमचे सहकारी दत्ताकाका यांचे दु:खद निधन झालेलं आहे. माझा काकांचा परिचय फार पुर्वीचा नव्हता पण मी सदस्य झाल्यापासून ताईनी सांगीतल्याप्रमाणे जयपुरला आम्ही एकत्रीत गेलो होतो. आम्हांला काकांबद्दल फार वेगळ वाटायच आम्ही सगळे एकत्रीत होतो ते सगळयांना समजावून सांगायचे. त्या सात दिवसाच्या काळात आम्ही दत्ताकाका आणि सुजाताताईकडून फार शिकलो. त्यांची बातमी ऐकल्यानंतर मला पण शॉक बसला की दत्ताकाका आमच्यात नाहीत म्हणून.

त्यांच्या गेल्यामुळे एक पोकळी निर्माण झालेली आहे. ती पोकळी भरुन न येणारी आहे. मी भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर आणि आमचे शहर अध्यक्ष मा.महेशदादा लांडगे, खासदार मा.अमर साबळे आणि माझ्या थोरात कुटूंबीयाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

**मा.स्विनल म्हेत्रे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. दत्ताकाका गेल्यामुळे पिंपरी चिंचवड शहराच फार मोठ नुकसान झाल आहे. त्यांच्या जाण्यामुळे फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे तसेच या शहरतील मृत्यूमुखी पडलेल्यांना मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीने, माझ्या प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि थांबते.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सर्व ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कोरोनाच्या महामारीमुळे आपल्या सर्वांचे लाडके नगरसेवक दत्ताकाका साने आपल्यामधुन निघून गेलेले आहेत त्यामुळे खुप दु:ख होत आहे. कोरोनाच्या या महामारीमध्ये आपल्या पिंपरी चिंचवडचे महापौर माई ढोरे, मा.आयुक्त साहेब, मा.अति.आयुक्त साहेब यांनी पिंपरी चिंचवड मधल्या सर्व नागरीकांसाठी मनापासून काम केलेलं आहे. तसेच आमचे मार्गदर्शक दत्ताकाका साने हे आपल्या सर्वांमधुन निघुन गेलेल आहेत. माझ्या कांबळे कुटूंबीयातर्फे व नवी सांगवी, पिंपळेगुरव तर्फे तसेच मा. विधानसभेचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या तर्फे मी काकाना मनापासून श्रध्दांजली वाहतो. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी मा.महापौरांचे आभार मानतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपण गेल्या सहा महीन्यापासून कोरोनाशी झुंज देत आहोत. या झुंजीमध्ये आपल्या शहरातील एक मोहरा आपण गमावलेला आहे. मा.कै.दत्ताकाका साने यांचे कोरोनामुळे दु:खद निधन झालेल आहे. आताच सुजाताताई तसेच माऊली थोरात यांनी सांगीतल की आम्ही राजस्थान दौ-यामध्ये ज्यावेळेला एकत्रीत होतो त्यावेळेला दत्ताकाकांचा स्वभाव आम्हांला कळाला. ज्या पध्दतीने दत्ताकाका सभागृहात आक्रमक होते तसेच बाहेर खुप को-ऑपरेटीव्ह होते. दत्ताकाकांचे बरेचसे फोटो माझ्या कॅमेरामध्ये मी त्यावेळेला काढलेले होते आणि ज्यावेळेला राजस्थानवरुन आलो त्यानंतरच आपण या

कोरोनाशी झुंज दयायला लागलो. हे सर्व फोटो मला दत्ता काकाना दयायचे होते. आज मला खंत वाटते की हा सगळा ठेवा मला त्यांना दयायचा होता तो मी आता त्यांना देऊ शकत नाही. दत्ताकाका बरोबरच आपण आपल्या देशातील बरेचसे दिग्गज लोक या कोरोना महामारीमुळे गमावलेले आहेत. मी या सर्वांना गावडे परिवारांच्या वतीने, माझ्या प्रभाग क्रमांक १८ च्या वतीने याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**मा.झामाबाई बारणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपल्या देशामध्ये कोरोनाच्या महामारीनी अनेक लाकांचे जीव गमावलेले आहेत. आपल्या पिंपरी चिंचवडचे नगरसेवक, कार्यकर्त्यांनी सुध्दा जीवाची परवा न करता चांगल्या प्रकारे काम केलेल आहे. त्याच पध्दतीने दत्ताकाका साने यांनी सुध्दा आपल्या वॉर्डामध्ये चांगल्या पध्दतीने काम केलेलं आहे आणि त्यांच्या वरती ही वेळ आली आपल्या मधुन निघून जाण्याची. दत्ताकाकाच अनेक नगरसेवकांनी आता कौतूक केलेलं आहे. चांगल समाजकार्य करणारा नगरसेवक असा नगरसेवक आज आपल्या पिंपरी चिंचवड मधुन काळाच्या पडदयाआड गेलेला आहे. मी दत्ताकाका बद्दल एवढच सांगते की सभागृहातील मनमिळावू, हासरा चेहरा आपल्यातून निघून गेला. महापालिकेचे आपल्या शहरातील विवीध प्रश्न असतील ते सडेतोडपणे त्या विषयावरती चर्चा करत असायचे. कोणाला राग येवू की काही मग कुठल्या पक्षाचा कोण असा विचार न करता शहरातील चांगल्या कामासाठी ते धडाडीने आपले प्रश्न मांडायचे. त्यांच्या चिखलीगावामध्ये ते चांगल काम करत असताना, शहरामध्ये चांगल काम करत असताना त्यांच्यावरती अशी वेळ आलेली आहे. नात्यागोत्यामधुन सुध्दा ते सगळयांना चांगल सांभाळून घेण्याच काम करत होते. आज आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये एक मोठ संकट आलेलं आहे. या महामारीमुळे आज देशाचे कितीतरी लोक गेलेली आहेत. भितीमुळे लोकांना धडकी भरते की आपल्याला काही होतय का म्हणून. मा.महापौर, मा.आयुक्त साहेब आपण व आपले सर्व कर्मचारी चांगल काम करत आहेत. हे काम करत असताना आलेल संकट आपल्याला कशा पध्दतीने घालवायचे, त्याच्यावर काय उपचार करायचा हे बघीतले पाहीजे. आज आमच्या थेरगाव परिसरामध्ये पण या कोरोनाच्या महामारीमुळ बरेच लोक दगावलेली आहेत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला जेवढ काही करता येईल ते आपण आपल्या पध्दतीने करतच राहणार

आहोत परंतु अजून याच्यावरती काही उपचार असतीलतर ते लवकरात लवकर करावे. आपल्या शहरामध्ये खरोखर खुप मोठ संकट आलेलं आहे. सगळेजण म्हणायचे की पिंपरी चिंचवड शहरामध्ये एवढ जास्त नाही पुण्यात आणि मुंबईमध्ये जास्त आहे. परंतु आता आपल पिंपरी चिंचवड शहर या महामारीच्या कचाटयात पुर्ण आडकलेलं आहे. दत्ताकाका साने सारखा चांगला हिरा गमावलेला आहे, अशी वेळ कोणावरच येऊ नये. मी माझ्या बारणे परिवाराच्या वतीने, मा.आमदार लक्ष्मणराव जगताप, भोसरी विधानसभेचे आमदार मा.महेशदादा लांडगे, आपल्या शहरातील दत्ताकाकाचे नातेवाईक यांच्या वतीने मी दत्ताकाका सानेना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि त्यांच्या परिवाराला या संकटातून सावरण्याची शक्ती परमेश्वरांनी देओ एवढीच मी याठिकाणी इच्छा व्यक्त करते आणि थांबते.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. या कोरोनाच्या महामारीमध्ये आपल्या शहराचे माजी विरोधी पक्षनेते व ज्येष्ठ नगरसेवक व धडाडीचा नेता आपल्यातून गेला आहे, त्यांच्या जाण्याने आपल्या शहरावर शोककळा पसरलेली आहे. जनतेसाठी काम करणारा असा तळमळीचा नेता आज आपल्यातून हरपलेला आहे. त्यांच्याकडन शिकण्यासारख खुप काही होतं त्यांचा अक्रमकपण पाहून आम्हांला असं वाटायच की काका हे असेच अक्रमक बाहेरही असतील का. पण तसे नाही, बाहेर वागतानी काकानी जनतेसाठी, जनतेच्या सेवेसाठीच ते खुप तळमळीने काम करत होते. त्यांच्याकडन शिकण्यासारख म्हणजे त्यांचा प्रत्येक विषयावर असणारा अभ्यास, प्रत्येक विषयाची मांडणी आमच्या सारख्याना शिकण्या सारख होतं अशा दत्ताकाका सानेना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो, धन्यवाद.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. दत्ताकाकांची निधनाची बातमी कळाली त्याक्षणी अतीशय मला दु:ख झालं. ते आमचे मामासासरे होते त्यांच्या जाण्यामुळे संपुर्ण चिंचवडे परिवार असतील या सर्वांवर दु:खाचा डोंगर पसरलेला आहे. एक मुलूख मैदान थंडावलेल आहे. कुठलाही पक्ष असो सत्ताधारी असो किंवा विरोधी असो पण चुकीच्या कामाला सातत्याने विरोध करणारे असे दत्ता काका ते गेल्या मुळे केवळ सभागृहाचच नव्हे, केवळ चिखलीचच नव्हेतर पुर्ण शहराच नुकसान झालेल आहे. गोरगरीबांसाठी सतत सातत्याने लढणारे असे दत्ता

काकांच्या जाण्यामुळे फार मोठ नुकसान या वंचितांच झालेल आहे. मी माझ्या शेडगे परिवारांच्या वतीने त्याच बरोबर भारतीय जनता पार्टीच्या तमाम कार्यकर्त्यांच्या वतीने आणि माझ्या प्र.क्र. १८ च्या वतीने मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. २५ तारखेला माझ दत्ताकाका बरोबर बोलंण झाल ज्या दिवशी ते बिर्ला हॉस्पिटलमध्ये ऍडमीट झाले त्या दिवशी. साधारण १०८ मिनीट बोलणं झाल. मी म्हणालो काका आपल्याला कसा काय कोरोना झाला ते म्हणाले चार पाच दिवस मी घरीच होतो त्याच्यानंतर त्रास होऊ लागला म्हणून मी बिर्ला हॉस्पिटलमध्ये ऍडमीट झालो. ते म्हणाले सगळ नॉर्मल आहे. २० तारखेच्या जीबीचा सुध्दा विषय झाला मी म्हणालो काका तुम्हांला २० तारखेच्या जीबीला याव लागेल तर ते म्हणाले येतो काही काळजी करु नको. आज अन्याया विरुध्द आवाज उठवणारी ती व्यक्ती होती. चिखली-टाळगाव जिथ तुकाराम महाराजांचे टाळ पडले त्या टाळगावचे हे पुत्र. दत्ता काका तेथील संत शिरोमणीचा वारसा घेवून तेथील लोकांना मदत करत होते. ते लोक तेथील आहेत का बाहेरचे हेही विचार करत नव्हते. त्यांच सर्व कुटूंब लोकांना मदत करत होतं अशा दत्ताकाकाना काळाने आपल्यातून हिरावून नेलं आहे. “जो आवडे सर्वाना, तो आवडे देवाना” असं म्हणतात पण मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब मी लक्ष वेधू इच्छितो की ज्या बिर्ला हॉस्पिटलमध्ये दत्ताकाकांचा मृत्यू झाला त्या बिर्ला हॉस्पिटलमध्ये मेडीकलच्या सुविधा कुठल्या प्रकारच्या होत्या. आमच्या पिंपरीतला एक व्यक्ती आता परवा कोरोनानी वारली, तो व्यक्ती स्वतः तोंडाला सिलींडर लावत होता तो व्हिडीओ सर्व पिंपरी चिंचवड शहरात व्हायरल झाला. तीथे कुठल्याही सुविधा मिळत नाहीत. त्या व्हिडीओ मध्ये त्यानी सगळ मेन्शन करुन पाठवल होतं. जे औषध आहे त्याच्यानंतर प्लाझमा थेरपी या गोष्टी करण्यात आल्या का नाही आल्या. दत्ताकाकांचा मृत्यू हा बिर्ला हॉस्पिटलमुळे झालेला आहे त्याची पुर्ण चौकशी महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल तर्फे केली पाहीजे व त्यांच एक ऑडीट केल पाहीजे. त्याची शहानिशा करुन घेतली पाहीजे. दत्ताकाका बिर्ला हॉस्पिटलच्या हलगर्जीपणामुळे गेलेले आहेत. दत्ता काका मला छोटया भावा प्रमाणे प्रत्येक ठिकाणी मार्गदर्शन करत होते. दत्ताकाका हे प्रत्येक चुकीच्या कामाला विरोध करत

होते. आज आपल्यातून एक चांगली व्यक्ती देवानी हिरावून घेतली आहे. मी माझ्या पिंपरीगावच्या वतीने काकाना भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्यांना कोरोना होवून गेलेला आहे त्यांना डोनेट करायला सांगा त्याच्यामुळे ब-याचशा लोकांचे जीव वाचतात. मा.महापौर साहेब, तुम्ही स्वतः पुढाकार घेवून हे आवाहन जनतेला कराव जेणेकरुन दत्ता काकासारखी वेळ अजून कोणावर येवू नये. एवढ बोलून मी थांबतो.

**मा.अर्चना बारणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माझ्या प्रभागातील जावेद बाबा शेख आणि काका यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी. आता संदिपभाऊ बोललेना की बिर्लामध्ये ट्रिटमेंट चांगली देत नाहीत म्हणजे चांगल बघत नाहीत. संदीप भाऊला माझा पण पाठींबा आहे. माझ्या भावाच पण कोरोनामुळेच तीथ निधन झालेल आहे. बिर्ला हॉस्पिटलवर काहीतरी कारवाई करावी हीच विनंती आहे आणि माझा भाऊ जावेद बाबा शेख यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.करुणा चिंचवडे -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज कोरोनाच्या महामारीमुळे आपल्या विभागाचे लाडके नगरसेवक दत्ताकाका साने यांच निधन झाल. ते अतीशय मनमिळावू व हासरे होते ते आमचे पाहूणेपण लागत होते. काकांच्या जाण्यामुळे खरोखरच एक पोकळी निर्माण झालेली आहे. काका आम्ही राजस्थानच्या दौ-यावर होतो, क्षणभर असं वाटल की काका आपल्या बरोबर आहेत भिती मनात कुठेतरी होती पण तसं नाही, तीन दिवस आम्ही त्यांच्या बरोबर होतो त्यांचा मनमिळावू स्वभाव आहे, अस वाटत नव्हत की ते विरोधी पक्षनेते होते. आज काकांच्या जाण्यामुळे खरोखरच एक पोकळी निर्माण झालेली आहे. मी माझ्या प्र.क्र. १७ च्या वतीने व चिंचवडे परिवारांच्या वतीने काकाना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते आणि थांबते, धन्यवाद.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर असं कधी वाटल नव्हतं की दत्ता काकाना श्रध्दांजली वाहावी लागेल. ही शहराच्या व सगळयाच्या दृष्टिने खुप दु:खद घटना आहे. त्यांनी आपला वेगळा ठसा या शहरावर उमटविला

आहे. त्यांनी चांगल्या रितीने विरोधी पक्षनेता म्हणून काम केलेलं आहे. त्यांच्या जाण्यामुळे एक खुप मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांच्या कुटूंबीयाना हे दु:ख सहन करण्याची परमेश्वरांनी ताकद देओ अशी ईश्वरचरणी मी प्रार्थना करते आणि मी माझ्या प्रभागाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि थांबते.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज प्रत्येकानी याठिकाणी आपआपल्या भावना व्यक्त केल्या. संपुर्ण जगावरती, आपल्या देशावरती आणि पिंपरी चिंचवड शहरावरती फार मोठ संकट आलेलं आहे. अनेक लोकांच या कोरोनामध्ये दु:खद निधन झालेल आहे. सगळयात मोठी आपल्या शहराची कुठली हानी झालेली असेलतर दत्ताकाका साने सारखा आपल्या सर्वांचा एक सहकारी मित्र आज आपल्यातून निघुन गेलेला आहे. खर म्हणजे या गोष्टीवर आजपण विश्वास बसत नाही. दत्ताकाकांच्या संपर्कात मी होतो पण अनेक लोक त्यांच्या संपर्कात होते. २ जुलैला मी त्यांना फोन केला परंतु त्यांनी फोन न उचलता मला आपण एसएमएस करु अशाप्रकारचा एसएमएस केला आणि त्यानंतर त्यांनी मला सांगीतल की मला खुप त्रास होतो. त्यांच्या निधनाची बातमी जेव्हा कळाली तेव्हा सगळयांनाच धक्का बसला. आजही अनेक लाकांनी आपआपल्या भावना व्यक्त करत असताना महापालिकेत येताना सुध्दा आपण अत्यंत जड अंतकरणानी या सभागृहात आलेलो आहोत. दत्ताकाकांच नेतृत्व हे संघर्षातून तयार झालेल नेतृत्व होतं. मगाशी राहूल जाधवांनी त्यांच्या श्रध्दांजलीपर भाषणात उल्लेख केला की पिंपरी चिंचवड परिसरामध्ये जेव्हा हा ग्रामीण परिसर समाविष्ठ करण्याचा विषय मंजूर झाला त्यावेळेस संघर्ष समिती स्थापन करण्यात आली आणि त्याच अध्यक्षपद दत्ताकाकानी स्विकारलं. संघर्ष समितीची मागणी आणि भूमिका अशी होती की जो ग्रामीण भाग आहे तो पिंपरी चिंचवड शहरामध्ये घेवू नये अशाप्रकारची मागणी त्यांची होती आणि त्याच्यामाग कारण असं होत ते मा.महापौर साहेब, आपल्याही लक्षात असेल की त्यावेळेस ती गाव आपल्या शहरामध्ये घेताना त्यांचा रोड टॅक्स वाढणार होता. तो टॅक्स खुप जास्त होता आणि तो टॅक्स महापालिकेनी, शासनाने माफ करावा अशाप्रकारची मागणी दत्ताकाकांची आणि त्या समितीची होती. त्या संघर्ष समितीच्या माध्यमातून

दत्ताकाकानी नंतर आदरनीय पवार साहेबांकडे अनेक वर्षे पाठपुरावा केला. आमदार विलास लांडे असतील आणि  आदरनीय अजीत दादा पवार साहेबांच्या माध्यमातून नंतर ती गाव महापालिकेत समाविष्ठ झाली आणि त्यावेळेस त्यांनी नगरसेवक म्हणून निवडणूक लढवली परंतु ते पराभूत झाले तरी सुध्दा ते न खचता त्यांनी पाठपुरावा सतत चालू ठेवला आणि मा.अजीतदादांच्या माध्यमातून शासनाकडन त्या संपुर्ण भागातल्या लोकांचा टॅक्स माफ केला. याच संपुर्ण श्रेय दत्ताकाकांना जातं. संघर्ष समितीच्या माध्यमातून दत्ताकाकानी अत्यंत महत्वाची भूमीका त्याठिकाणी बजावली होती. अनेक लोकांचा लाखो रुपयाचा टॅक्स त्यांच्यामुळे त्यावेळी वाचला. नंतरच्या काळचा सगळा प्रवास त्यांचा आपल्या समोर आहे. मी स्वतः दत्ताकाका बरोबर पंधरा वर्षे एकत्रीत काम केल. मी स्थायी समितीचा अध्यक्ष असताना दत्ताकाका सदस्य होते. त्यावेळेस पासून आजपर्यंत दत्ताकाका अतीशय परखड पणे जी भूमीका घेतली ती स्पष्टपणे मांडण्याच काम त्यांनी केल आहे. आज राष्ट्रवादी पक्ष सत्तेत नाही म्हणून ते विरोधीपक्षाची भूमीका बजावत होते. परंतु मागच्या दहा वर्षाच्या काळामध्ये ते सत्ताधारी पक्षात असताना सुध्दा एखादा विषय जर चुकीचा असेलतर त्याला विरोध करण्याची भूमीका दत्ताकाकानी त्यावेळेस घेतलेली आहे. जनतेच्या प्रश्नासाठी दत्ताकाका सातत्याने सभागृहात आवाज उठवायचे. नुसतेच सभागृहातच नव्हेतर रस्त्यावर येवून लोकांसाठी मदत करण्याची आणि लोकांसाठी आवाज उठविण्याचे काम दत्ताकाकांनी केलं. त्यांच्याबद्दल बोलण कितीही म्हणलतरी कमीच आहे इतक चांगल काम दत्ताकाकानी या कालखंडामध्ये केलेलं आहे. आदरनीय पवार साहेबांचे आणि दत्ताकाकांचे अतीशय जवळचे संबंध आले होते. स्वतः पवार साहेब दत्ताकाकांच्या घरी त्यांच सांत्वन करण्यासाठी मागच्या दहा दिवसापुर्वी आले होते. जयंत पाटील साहेब आले होते. इतके चांगले संबंध दत्ताकाकानी पवार साहेबां बरोबर ठेवले होते. त्यांना फार मोठा धक्का या निमीत्तानी बसला. मागच्या महीन्यामध्ये मा.अजीत दादाना भेटण्यासाठी आम्ही दत्ताकाका गेलो होतो त्याही ठिकाणी दादांकड प्रश्न मांडत असताना शहराच्या दृष्टीने कोरोनाच्या दृष्टीकोनातून त्याही दिवशी दत्ताकाकानी प्रश्न मांडले. मागच्या जीबीमध्ये सुध्दा ज्यावेळेला दत्ताकाका याठिकाणी आले त्यावेळेला एक पिशवी त्यांनी हातात आणली होती आणि त्यावेळेस आम्हांला सांगत होते की मला कोरोना वरती या जीबीमध्ये बोलायच आहे. त्यावेळेस चर्चा करत असताना त्यांनी सांगीतल की काही गोष्टी निश्चितपणे आपल्या शहराच्या दृष्टिकोनातून प्रशासनान खुप चांगल्या केल्या

आहेत परंतु काही गोष्टीमध्ये त्रुटी आहे आणि ती त्रुटी मांडण्याच काम मला या जीबीच्या माध्यमातून करायच आहे. अशाप्रकारची भूमीका सातत्याने दत्ताकाकानी घेतली. मगाशी संदीप वाघेरे यांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला आणि आणखी एका महीला नगरसेवीकेनी उल्लेख केला की, आयुक्त साहेब प्रायव्हेट व्हॉस्पिटलमध्ये जी काही ट्रिटमेंट दिली जाते त्याच्याबद्दल लोकांच्या मनामध्ये फार मोठया प्रमाणात शंका आहे. बीर्ला हॉस्पिटलमध्ये मागच्या दिड महीन्यापुर्वी आपल्या नगरसेवीका विनयाताई तापकीर यांच्या सासूबाई ऍडमीट होत्या. त्यांचही त्याठिकाणी दु:खद निधन झालं. अनेक लोकांच बिर्ला हॉस्पिटलमध्ये दु:खद निधन झाल म्हणजे त्याठिकाणी नेमकी ट्रिटमेंटमध्ये काय त्रुटी राहती हे मला माहीत नाही. आपल्याशी दत्ताकाकाच्या निधनानंतर दुस-या दिवशी आपल्या दोघांच बोलणं झाल त्यावेळेस तुम्ही मला सांगीतल की मी शेवटपर्यंत त्यांच्या संपर्कात होतो आणि त्या ट्रिटमेंटवरती तुमच बारकाईन लक्ष होत अशा प्रकारच तुम्ही मला फोनवरती सांगीतल. पण तरी मनात अशी कुठेतरी शंका येते की अचानकपणे इतकी प्रकृती कशी काय खालावली. मला वाटत ही संपुर्ण परिस्थिती होती याच्यावरती आपण चौकशी केली पाहीजे. आपल्या शहरामध्ये अजून अशा काही घटना घडू नयेत यासाठी आपल्याला आयुक्त साहेब चर्चा करायची आहे. ही श्रध्दांजली वाहत असताना माझी एक आपल्याला विनंती आहे की आज शहरामध्ये खुप मोठया प्रमाणात पेशंट वाढतात आपण सुध्दा फेसबुक लाईव्ह वरती सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे की ज्यांना सिम्टन नाहीत त्यांनी घरीच ट्रिटमेंट घ्यावी आणि ज्यांना कमी सिम्टन्स आहे त्यांनी सुध्दा घरीच ट्रिटमेंट घ्यावी अशाप्रकारची सुचना तुम्ही त्याठिकाणी करतात. त्याच्यामुळे ज्यांना जास्तीच सिम्टन्स आहेत त्यांना हॉस्पिटलमध्ये बेडस देता येतील अशाप्रकारची मागणी आणि भूमीका आपल्या सगळयांची आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. परंतु ते करत असताना आयुक्त साहेब, महापौर साहेब, त्याच्यामध्ये काही त्रुटी आहेत. संतोष पाटील अति.आयुक्त याठिकाणी आहेत अनेक डॉक्टर्स खुप चांगल काम करतात परंतु त्यांच्यावरती इतका प्रचंड ताण आहे. मला वाटत या लोकांचा निम्मा वेळ फोन अटेन्ड करण्यातच जात असेल. शहरातून अनेक लोकं यांना फोन करत असतात की माझ्या प्रभागातील ही व्यक्ती आहे. याला प्रॉपर ट्रिटमेंट मिळत नाही किंवा याला व्हेन्टीलेटरची गरज आहे, ऑक्सिजनची गरज आहे अशाप्रकारे आपण सगळेजण रोज यांना फॉलोअप करत असतो. महापालिकेमध्ये जशी फोनची सुविधा उपलब्ध

असते तशी प्रत्येक हॉस्पिटलमध्ये त्याची सुविधा निर्माण करुन देता आली पाहीजे किंवा त्याठिकाणी लोकांची मागणी असेलतर एक डेडीकेटेड स्टाफ त्यासाठी जर आपण अपॉईंट केलातर मला वाटत ब-याचशा प्रमाणात सोईच होवू शकतं. आता भोसरी हॉस्पिटलच काम पण खुप चांगल चालल आहे. भोसरी हॉस्पिटलमध्ये अनेक डॉक्टर्स आणि स्टाफ पॉझिटीव्ह झाला नंतरच्या काळामध्ये. त्याच्यामुळे त्याठिकाणी आज स्टाफची पण अडचण निर्माण झालेली आहे. डॉ.भावसार मॅडम भोसरीमध्ये खुप चांगल काम करतात परंतु ते करत असताना त्यांच्यावरती प्रचंड ताण आहे. आम्ही जेव्हा फोन करतो की अमुक अमुक घरातला एक पेशंट ऍडमीट आहे तो पॉझिटीव्ह आहे त्याच्या घरातील लोकांना तपासून घ्यायच आहे किंवा त्याचा फॉलोअप घ्यायचा त्यासाठी जी यंत्रणा आहे ती पण कमी पडते मला माहिती आहे की स्टाफची अडचण आहे. परंतु आपल्याला कुठेतरी याच्यामध्ये सुरळीतपणा आणण्यासाठी प्रयत्न केला पाहीजे. म्हणजे येथून पुढच्या काळामध्ये अशाप्रकारच्या घटना घडू नयेत आणि मला वाटत तीच ख-या अर्थाने दत्ताकाकांना श्रध्दांजली ठरेल. दत्ताकाकांच जाण म्हणजे कोरोनामध्ये लोकांना मदत करत असताना प्रभागामध्ये खुप मदत दत्ताकाकानी केलेली आहे. ती करत असताना कुठेतरी संपर्कात आल्यामुळे त्यांच्यावरती ही वेळ आली. त्याच्यामुळे आपण या सगळया पार्श्वभूमीवरती व्हेन्टीलेटर कसे जास्तीचे उपलब्ध करता येतील आणि या प्रायव्हेट हॉस्पिटलवरती आपल्याला काय नियंत्रण आणता येतील हे बघावे. आज सुध्दा मी तीन व्हेन्टीलेटरसाठी मागणी केली. म्हणजे माझी एकटयाचीच तीन लोकांसाठी व्हेन्टीलेटरची मागणी असेलतर अशा अनेक लोकांची मागणी त्यांच्याकडे आहे की आम्हांला व्हेन्टीलेटर पाहीजे. कारण व्हेन्टीलेटर मिळत नाहीत म्हणून अनेक लोकांचा मृत्यू होतो. त्याच्यामुळे या गोष्टीकडे आपण गांभीर्याने लक्ष दयाव. आपल्याकडे बजेट भरपूर आहे पाहीजेतर यावर्षी कुठलही काम करु नका पण कोरोनासाठी जी काही आपल्याला आर्थीक मदत देता येईल आपल्या शहरातील नागरीकांच्या दृष्टिकोनातून ती देण्याच काम आपण करावं अशाप्रकारची मी या निमीत्ताने आपल्याकडे मागणी करतो आणि आम्ही जरी विरोधी पक्षात असलोतरी या निमीत्ताने आम्ही विरोधी पक्षाची भुमीका न बजावता या संकटाच्या काळामध्ये आम्ही तुमच्या बरोबर आहोत, कुठलाही चांगला निर्णय तुम्ही या काळात घ्यावा त्यासाठी आमचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष तुमच्या बरोबर आहे. या निमीत्ताने आणखीन अशा घटना घडू नयेत या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न करावेत. दत्ताकाका जाण्यामुळे

आपल्या सगळयांनाच मोठ दु:ख झाल आहे आपल्या सर्वांचे सहकारी, जवळचे मित्र आज आपल्यातून गेलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी अत्यंत चांगली छाप दत्ताकाकानी बजावून दाखवलेली आहे. दत्ताकाकांच्या या दु:खामध्ये मी स्वत: माझ संपुर्ण भोसरी गाव, आमचा गव्हाणे परिवार, सर्व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि राज्या उमुख्यमंत्री मा.अजीतदादा पवार साहेब या सर्वांच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कोरोनामुळे पिंपरी चिंचवड शहराच झालेल्या नुकसानीबाबत सर्व नगरसेवक बोलत आहेत. त्यामध्ये आमचा सहकारी, धडाडीचा कार्यकर्ता, एक राष्ट्रवादीचा कायम आग्रेसर असणारा असा कार्यकर्ता आमचा मित्र दत्ताकाका साने यांच दु:खद निधन झाल आहे. दत्ताकाका ऍडमीट असताना सुध्दा कायम आमच्याशी फोनवर बोलत होते. कधी वाटल नव्हत की एवढा तगडा व्यक्ती आम्हांला असा सोडून जाईल. २००७ पासून आम्ही, सर्वात महत्वाच म्हणजे ज्यावेळेस राष्ट्रवादी कॉंग्रेसपार्टी निर्माण झाली त्यावेळी युवकबॉडी होती, त्या युवक बॉडीतील विजू लांडे त्यावेळेस आमच्या युवकांचे अध्यक्ष होते. त्या बॉडीतील आम्ही सर्व एकत्रीत काम करणारे हे सर्व कार्यकर्ते त्यावेळेस पासून माझा आणि दत्ताकाकांचा संबंध आणि दत्ताकाकांनी चिखलीगावामध्ये काम करत, आज लोकांची सेवा करत ते स्वत:च्या जीवाला मुकलेले आहेत. साहेब, आपल पण बोलन झाल होत की ते वायसीएमला असते तर कदाचित यातून बाहेर पण पडले असते, बिर्लाच्या बाबतीत सर्वांचीच कम्प्लेन्ट आहे. बिर्ला हॉस्पिटलच्या बाबतीत तुम्हांला कोणतीतरी ऍक्शन घेणं गरजेच आहे. कारण काल माझ्या एका मित्राना कोवीड पॉझिटीव्ह आले म्हणून ऍडमीट करण्यासाठी गेलोतर तीथून सांगण्यात आलं की बिर्लाचे सर्व डॉक्टर्स पॉझिटीव्ह आहेत म्हणून. आज बिर्ला सारखी एवढी मोठी ट्रस्ट आहे आज या ट्रस्टमध्ये माझे मित्राची आई त्याच दिवशी दत्ताकाका गेले त्याच दिवशी ती सुध्दा बिचारी माऊली तीथे मुखली गेली. माझ्या प्रभागातील आज आठ ते नऊ लोक दगावलेली आहेत. तशीच शहरामधील भरपूर लोक याच्यामध्ये दगावलेली आहेत. मला पहील वाटायच की झोपडपट्टी, सगळयांच झोपडपट्टीकडे लक्ष होतं. पण मला पण असं वाटायला लागल की कोरोनानी झोपडपट्टी सोडली आणि जे काही उच्चशिक्षीत आहेत म्हणजे जे की स्वत:ला घरामधून डिस्टेन्स ठेवू

शकतात अशा लोकांमध्ये आज कोरोना घुसला आहे. कारण त्यांनी सर्व व्यापारी पकडलेत, सर्व पॉलीटेशन पकडलेत आणि सेलिब्रेटी पण सोडले नाहीत. मी म्हणालो होतो मागे की पिंपरी चिंचवड पॉलेटेक्निकच्या तीथे सेंटर करु नका म्हणून मी अग्रही होतो मी म्हणायचो की प्राधिकरण ग्रीन आहे, ग्रीन आहे. तुम्ही मला सांगीतल होत की हे एका दिवशी कुठल्या स्टेजला जाईल. ज्या ज्यावेळी एक एक पेशंट वाढायला लागले त्यावेळेस मला हे जाणवल. आज वायसीएमच्या सर्व डॉक्टरांच आणि तुमच्या टिमच मी नक्कीच कौतूक करेल. कारण की प्रत्येक डॉक्टर जो तुम्ही फिल्डवर ठेवलेला आहे तो जाणीवपुर्वक लक्ष देतो. कितीही वाजता फोन करा सर्वजण त्याला अटेंन्ड करतात. दत्ताकाकाना आपण मुकलो आहोत, आज आमचा दुसरा सहकारी राष्ट्रवादीचा जावेदभाई शेख हे सुध्दा आज वेगळया डेन्जर झोनमध्ये आहेत, ते आता स्टार हॉस्पिटलला ऍडमीट आहेत. मी आता डॉक्टरांना फोन लावला होतातर डॉक्टरांनी सांगीतल की मी त्यांच्या पुर्ण फॅमीलीला बोलावून घेतलं आहे. जे चाळीस हजाराच इंजेक्शन असतं ते आतापर्यंत दोन इंजेक्शन त्याना दिलेले आहेत. त्याला व्हेन्टीलेटर लावला, ऑक्सिजन लावलातरी ते ८६ वर ऑक्सिजन लेव्हल आहे. माझी विनंती आहे साहेब, जर काही झालतर अजून एक व्यक्ती आमच्यातून जायला नको यासाठी जे काही करता येईल त्यासाठी तुम्ही जाणीवपुर्वक लक्ष घालाव कारण अजूनही वेळ गेलेली नाही. त्याला काहीही करुन सर तुम्हांला जी काही चांगली सुविधा देता आलीतर दयावी, आम्ही आता त्यांच्या घरच्यांना भेटायला जाणार आहेत. कारण हा डिसीजन घरच्यानी घ्यायचा असतो की कुठ ऍडमीट करायच ते. सर तुम्ही सांगीतलतर नक्की त्याच्यामध्ये फरक पडेल आणि जर त्याला अजून काही वेगळी सुविधा देवून वाचवता आलंतर मी तुम्हांला सभागृहाच्या वतीने नंम्र विनंती करतो की ते कराव. मा.महापौर साहेब, यामध्ये तुम्हीही लक्ष घालाव. आपण आपल्या सभागृहाचा एक हि-यास मुकलेलो आहोत. कारण यामुळे आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच नुकसान झालेल आहे दत्ताकाकांच्या रुपानी एक चांगला कार्यकर्ता राष्ट्रवादीचा गेलेला आहे. हे दु:ख कधीच भरुन येणार नाही एवढ आम्हांला दु:ख झालेल आहे. मी दत्ताकाका यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो तसेच माझे मित्र व्यास यांच्या मातोश्री यांनाही मी श्रध्दांजली वाहतो आणि आता जे मी सांगीतल आहे त्यामध्ये आयुक्त साहेब आपण जातीने लक्ष देवून जावेदभाईसाठी जी काही पुढची ट्रिटमेंट करता येईल त्यासाठी नक्की प्रयत्न करावेत अशी मी सभागृहाला आणि तुम्हांला विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर पाहीलतर कोरोनाच्या माध्यमातून हे जागतीक संकट आलेल आहे. या संकटाला तोंड देण्यासाठी आपल्या शहरातील आयुक्त, मा.महापौर, सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, सर्व डॉक्टर्स, पोलीस अतीशय चांगल्या प्रकारे काम करतात परंतु हे काम करत असताना लोकांची काळजी घेत असताना आपणही आपली स्वतःची काळजी घेणं गरजेच आहे. लोकांच्या अडीअडचणी दुर करण्यासाठी काकानी खुप प्रयत्न केले आहेत परंतु काकांनी स्वतःची काळजी घेतली नाही. आपल्या सर्वांची भूमीका एकच आहे की आपण नागरीकांची सेवा केली पाहीजे, कोरोनामुक्त हे शहर झाल पाहीजे यासाठी आपण संबंधितांना मदत केली पाहीजे. आपण सर्वानी काळजी घेतली आणि हे पिंपरी चिंचवड शहर कोरानामुक्त केलतर ख-या अर्थाने दत्ताकाकाना श्रध्दांजली वाहील्यासारख होईल. दत्ताकाकांचा स्वभाव अतीशय मनमिळावू होता, महापालिकेमध्ये त्यांनी विरोधी पक्षनेते म्हणून काम केलं. एखादयाच काम जर झाल नाहीतर दत्ताकाका पुर्णपणे आपले स्पष्ट मत मांडत असत. अशा स्वभावाचा एक चांगल खंबीर नेतृत्व असलेला आपला मित्र दत्ताकाका साने या कोरोनाच्या माध्यमातून त्यांच निधन झालेलं आहे. त्यांच्या कुटूंबियावर, त्यांच्या नातेवाईकांवर जे दु:ख झालेल आहे ते सहन करण्याची परमेश्वरांनी त्यांना ताकद देओ अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि याठिकाणी थांबतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर दत्ताकाकाच्या श्रध्दांजलीसाठी आपण याठिकाणी जमलेलो आहोत, कधी कधी माझ्यातर विश्वास बसत नाही, गेल्या पंचवीस-तीस वर्षापासून दत्ताकाकांच्या राजकीय कारकीर्दीच्या सुरवातीपासूनचे आम्ही खरतर मित्र आहोत. सभागृहामध्ये त्यांच्या बरोबर काम करण्याची माझी ही दुसरी वेळ होती. पहील्यावेळेस मी स्विकृत सदस्य म्हणून होतो. त्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता होती त्याच्या नंतरही होती. कधी कधी नियतीला काय झाल हे खरतर समजत नाही. दत्ताकाकांच काम बघीतलतर एखादया पक्षाचा कार्यकर्ता असला परंतु जनतेसाठी पक्षाचे जोडे बाहेर ठेवून काम करणारा एक धडाडीचा कार्यकर्ता एक नेता होता. अजीतभाऊ तुम्ही उल्लेख केला १९८६-८७ साली ज्यावेळेस समाविष्ठ गाव या महापालिकेत घेण्याचा विषय होता

दत्ताकाका त्यावेळेस कडाडून विरोध करणारे एक नेता होता. त्यावेळेसच्या दिवसापासूनच आता  आपण महापालिकेमध्ये समाविष्ठ गावाच्या विकासाला म्हणजे ते ज्यावेळेस विरोधी पक्षनेता झाले त्यावेळेस मी सत्तारुढ पक्षाचा नेता होतो. असे अनेक माझे आणि त्यांचे कॉमन मित्र होते. म्हणजे आज त्यांन टिका केली की मी त्याला उत्तर देणार. मी एखादी गोष्ट केली की त्याच्यावर त्यांनी उत्तर देणार अशी उत्तरावर उत्तर दयायचो. अनेक जण म्हणायचे की तुमच्या दोघाला काही कामधंदा आहे का नाही. म्हणजे तुम्ही दोघ एकमेकांना बोलता आणि आमच्यामध्ये भांडण लागायचे. म्हणजे अशा पध्दतीची सुध्दा परिस्थिती अजीतभाऊ शंभर टक्के होती. विरोधीपक्षनेता कसा असला पाहीजे, नाना तुम्ही पण आहात, योगेशभाई पण होते. परंतु ऍग्रेसिव्हपणे एखादया विषयाची म्हणजे दत्ताकाका एखादा विषय अभ्यास करण्याएवढा मोठा गठ्ठा आणायचा. लोकांना असं दाखवयचे की खरच या गठ्यामध्ये खुप काही आहे. परंतु एक गोष्ट आहे की विरोधी पक्षनेत्यांनी सत्ताधारी पक्षावर अंकूश जरी ठेवायचा असेलतर मला असं वाटतय की दत्ताकाका सारखा विरोधी पक्षनेता आजच्या काळामध्ये खरतर मागच्या दहा पंधरा वर्षाचा इतिहास बघीतलातर ज्यावेळेस आम्ही विरोधी पक्षामध्ये होतो तर ती परिस्थिती दत्ताकाकांच्या रुपान चांगला विरोधीपक्षनेता या महापालिकेच्या माध्यमातून मिळाला. म्हणजे मागच्या काळात जो अनधिकृत बांधकामाचा विषय होता, शास्तीकराचा विषय होता. त्याकाळात त्यांची सत्ता होती मधल्या काळामध्ये आमची सत्ता आली. शास्तीकराचा विषय ८० ते ९० टक्के सोडवण्याच काम हे मागच्या काळामध्ये केलं. परंतु एखादया विषयाच जर पुर्ण समाधान झाल नाहीतर तो दत्ताकाका साने कसला. त्यांनी सांगीतल की माझ्या या सगळया लोकांना शंभर टक्के शास्तीकरामधुन माफी मिळाली पाहीजे. अशा पध्दतीन लढाई करता करता मागच्या विधानसभेच्या अगोदर एक रान पेटवण्याच काम खरतर दत्ताकाकांच्या रुपानी केलं. मी खाजगीतही काकाना म्हणल अरे, काका मागच्यावेळेस तुमची सत्ता होती, नाही जमल तुम्हांला आता उगीच एखादया विषयाच भांडवल करुन एखादया पार्टीच्या विरोधामध्ये राजकीय विचार बदलले अशा पध्दतीची परिस्थिती नका करु. त्यांनी मला सांगीतल तुम्ही गप्प बसा, मला माझ काम करु दयात. म्हणजे एखादा विषय खाजगीमध्ये जरी सांगीतल तर तो मित्र म्हणून ऐकायचा, त्यांनी मला सांगीतल आपण व्यक्तीगत रित्या एखादया विषयावर खुप चांगले मित्र आहोत परंतु माझ्या पक्षाची भूमीका मला प्रभावीपणे लोकांच्या समोर मांडण हे माझ काम

आहे. अशा पध्दतीच काम ख-या अर्थाने दत्ताकाकाच्या रुपान केल गेलं. अनेक वक्त्यांनी सांगीतल की बिर्ला हॉस्पिटलमध्ये त्यांना ट्रिटमेंट मिळाली का नाही. परंतु ऍडमीट झाल्याच्यानंतर दुस-या दिवशीपासून मी रोज सकाळी फोन करायचो. काका काय चालल आहे, ते म्हणायचे श्वासनाचा त्रास होतो. ज्यावेळेस घटना घडली त्यावेळेस मला कमीशनर साहेबांचा साडेसहा वाजता फोन आला. फोन आला त्याचवेळेस मला वाटल की काहीतरी अघटीत घडलय. मला त्याच्या अगोदर दोन तीन फोन येवून गेले. दत्ता काकांच्या प्रभागामधले काही मतदार माझ्या प्रभागात आहेत, माझ्या प्रभागामधले काही मतदार त्यांच्या प्रभागामध्ये आहेत. आज रस्त्यानी जाताना येताना एखादा फोटो बघीतलातर माझा स्वत:वर विश्वास नाही बसत की हाच एक नेता हाच एक माझा मित्र, एक धडाडीचा कार्यकर्ता आज अपल्यामध्ये नाही अशा पध्दतीची परिस्थिती काकाच्या माध्यमातून निर्माण होते. मी खरतर त्यांच अस्तित्व कधीही पुसु शकणार नाही. मी खरतर या विषयावर एवढच सांगेन की दत्ताकाकाच्या रुपान राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्षाची हानी निश्चित झालेली आहे. शहराचा एक धडाडीचा कार्यकर्ता, या शहराचा विचार करुन पुढच्या दृष्टिने एक व्हिजन ठेवून काम करणारे कार्यकर्ते असतील पण एक नेता म्हणून आपल्या शहराला काय दिशा असली पाहीजे, आपल्या शहराच्या दिशाच्या दृष्टिने आपण काय काय केल पाहीजे एक चांगली दिशा देणारा एक चांगला नेता आपल्या शहराच्या माध्यमातून दत्ताकाकाच्या रुपान आज खरतर आपल्यातून हिरावून नेलेला आहे. या शहराचे महापौर मा.मधुकर अण्णा पवळे होते त्यावेळेस मी खुप लहान कार्यकर्ता होतो, महापौर असताना त्यांच निधन झाल त्यावेळेस स्थापत्यन त्यांचा एक चांगला पुतळा केला. काही ठिकाणी आपण आण्णाची नावही दिली गेली होती. या निमीत्तान सगळया पक्षाच्या नेत्यांनी एकत्रीत बसून एक झुंजार नेता दत्ताकाकाच्या रुपान ख-या अर्थान आपल्यातून हरवलेला आहे याची कुठतरी आपणाला आठवण रहावी म्हणून मग कुणीतरी सांगीतल की त्यांच एखादया ठिकाणी नाव दयाव परंतु आपण सर्वानी बसून एखादया चांगल्या प्रोजेक्टला एखादया धडाडीच्या कार्यकर्त्याच जर नाव दिलतर मला वाटत की आपण नाव देवून त्यांची आठवण नाही खोडू शकत परंतु एक लढवय्या नेता, लढवय्या कार्यकर्त्याची आठवण निश्चित होवू शकेल. मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आपल्या सर्वाच्या वतीन माझ्या एका परममीत्राला या ठिकाणी आदरांजली वाहतो. आता राजूभाऊ मला सांगत होते की जावेदभाईच्या संदर्भामध्येही अशी परिस्थिती आहे, खरतर कोरोनाच संकट हे खुप

भयानक संकट आहे. आपण एखादयाच्या बद्दल ज्यावेळेस तळमळीन सांगायचा प्रयत्न करतो, कोरोना आटोक्यात याव म्हणून आपण प्रयत्न करत असतो. मागच्या तीन महीन्यातील लॉकडावूनचा काळ बघीतलातर एकही दिवस दत्ता साने घरी नाही बसले. आपल्या घरामधल जेवढ जेवढ धान्य असेल तेवढ आपल्या प्रभागामध्ये कोणीही उपाशी राहू नये अशा पध्दतीचा काळजी घेणारा एक कार्यकर्ता होता. माझी कोरोनाची टेस्ट झाली. माझ्या ऑफिसमधले दोन कर्मचारी पॉझिटीव्ह होते, मला साहेबांनी सांगीतल तुमचे मित्र राहूल कलाटे सुध्दा पॉझिटीव्ह आहे. म्हणजे एखादा मित्र आज आपल्या बरोबर आहे उदया तो पॉझिटीव्ह आल्याच्यानंतर कदाचित त्याची भेट होईल की नाही ही परिस्थिती आहे हे लक्षात ठेवा. माझी विनंती आहे आपण समाजाचे सेवक आहोत, समाजाची आपल्या सगळयांना बांधीलकी आहे. आपण आपल्या शहराला कोरोनामुक्त करायच असेलतर आपल्या स्वत:ची काळजी घेत घेत समाजाची काळजी घ्यावी म्हणजे एकही दत्ताकाका साने सारखा उपचारा अभावी कोरोनाने निधन होणार नाही अशा पध्दतीची परिस्थिती निर्माण करण्यासाठी आपण सगळयांनी काम कराव एवढीच मी आपल्या सगळयांना विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.सुवर्णा बुर्डे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. कै.दत्ताकाका साने यांना मी माझ्या प्रभागाच्या वतीने श्रध्दांजली वाहते. तसेच कै.सौ.किसनाबाई सावळेराम बुर्डे, च-होली, विठ्ठल अण्णा मारुती म्हेत्रे, चिखली, चंद्रभागा दत्तात्रय भुजबळ, कै.अभिमान सुरेश तापकीर यांना मी माझ्या प्रभागाच्या वतीने श्रध्दांजली वाहते. तसेच आमदार महेशदादा लांडगे यांच्या वतीने मी श्रध्दांजली वाहते, मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. दत्ताकाका आपल्यातून गेले हा खरतर विश्वासच बसत नाही. आमचा फायटरफ्रेंड जीबी आहे आणि आजची न्यूज झाली नाही असं कधी व्हायचच नाही. तात्पुरती भांडण होती, तात्वीक होती, पक्षासाठी असायचे. खरतर काकाना २६ जूनला मी फोन केला. पहीला फोन उचलला नाही नंतर मॅसेज आला की ताई बोलायच होतं का तर मी म्हणल हो बोलता येईल का. मी म्हणाले काका कसे आहात, बरे आहेत का, काळजी घ्या. ते

म्हणले ताई, मी एकदम छान आहे तुम्ही काही टेन्शन घेवू नका, मी म्हणाले काका काळजी घ्या परत भेटायच आहे. ते म्हणाले हो ताई, नक्की माझा फोन झाल्यानंतर मी आशाताईना फोन केला आणि सांगीतल की दत्ताकाकाना फोन कर काका असे असे ऍडमीट आहेत आणि बघता बघता साहेब, दत्ताकाका आमच्यातून निघून गेले. पार्टीचतर नुकसान झालच पण वैयक्तिक एक चांगला सहकारी पण आमचा गेलेला आहे. चांगला भांडणारा, अभ्यास करणारा, नाही जमलतर स्पष्टपणे तोंडावरती बोलणारा असा एक लढवय्या कार्यकर्ता गेला. फॅमिली उघडयावरती पडली आता त्यानंतर राजू मिसाळही ऍडमीट, विलास मडिगेरी ऍडमीट, राहूल कलाटे ऍडमीट आणि नगरसदस्यांची अशी रांगच लागायला लागली आणि भिती वाटायला लागली. जसजशी नगरसदस्यांची संख्या वाढायला लागली. मला राजूच ऑपरेशन झाल्याच कळालं. राजूला फोन केला फोन रिसिव्ह नाही केला जास्तच भिती वाटायला लागली. हॉस्पिटलला गेलतर त्यांनी सांगीतल की नही, उनको कोई मिल नही सकता मग आणखी जास्त भिती वाटते. केवढा तरुण पोरगा, एवढा तब्यातवाला आणि भेटू शकत नाही म्हणजे काय. दोन तीन दिवस झाले माहिती घेतली, आय्यर यांना फोन केलातर ते म्हणाले की नही, ईटस् ओके, अच्छा हैं, बट बात नही कर पाएगा. राहूल कलाटे ऍडमीट झाल्यावर खरच भिती वाटली की एवढा तरुण, याला काहीच होत नाही एवढा जोरजोराने बोलतो, भांडतो कसकाय होऊ शकत असं. का काळजी घेत नाही हे सगळेजण. एकतर असं आहे साहेब, की सगळेच नगरसदस्य नाही म्हणलतरी समाजकार्य करुनच सगळेजण नगरसेवक होतात. सोशल मिडीयावर एक पोस्ट व्हायरल होत होती की आपला नगरसेवक आपल्या संपर्कात आहे का आणि त्याच दुप्पट प्रेशर नगरसेवकांनी घेतलं. मीही घेतल, मला अस वाटायच की माझ्या वॉर्डात काय घडत मला कळाल पाहीजे. उदया कोणी म्हणल की माझी अडचणीची वेळ होती आणि तुला माहीतच नव्हतं. मी बिमार होतो आणि तुला कळल नाही. किंवा माझ्याकडे दु:ख झाल तुला माहितच नाही. मीही प्रेशर घेतल. परंतु एकंदर २० ते २२ लोक म्हणजे अगदी महेशदादा सुध्दा आहेत आणि खर सांगते पाया खालची वाळूच सरकली आणि असं वाटल की राजकारण, समाजकारण, दत्ताकाका गेल्यानंतर इतक्या प्रकर्षाने जाणवल की त्यांच्या कुटूंबाकडे आता कोणी लक्ष देईना. बाप म्हणून त्या लेकांकडे कोणी लक्ष देणार नाही आणि बाई विधवा झाल्यानंतर म्हणजे ५० वय असताना ज्यावेळेस घरातली स्त्रि, असं वाटत की आम्हांला बायकाना आमच खुप वेगळया अपेक्षा

असतात कुटूंबाकडे. की आम्हांला असं वाटत की आता जे आहेना आयुष्य ते मी माझ्या नव-या बरोबर सुखात काढणार. आता मला जे जे वाटणारनां ते मी करणार, अन् तो जोडीदारच नाही. इथ बसलेल्या माझ्या सगळया भावाना विनंती आहे, माझ्या पोरांना विनंती आहे की अजीबात कुठलही प्रेशर घेऊ नका. तुमच कुटूंब तुमच्यासाठी आणि तुमच्या भरवशावरती आहे. तुम्हांला किती प्रेशर घ्यायच याच्या स्वत:ला मर्यादा ठेवा. काकाचा विषय आपण बघतोच आहोत, त्यांच्या बायोकन तर कधी घराचा उंबरापण ओलंडला नसेल. अन् आज सगळा कुटूंबाचा भारच अंगावरती घ्यायचा आहे. काय अवस्था होत असेल साहेब, भाजीचा भाव माहिती नाही बाहेर गेल्यानंतर. आम्ही सारखे बाहेर जातोत आम्हांला चार हात करायची सवय आहे. पण त्या माऊलीन कोणाकड बघायचं. आज जावेद शेखची आपण परिस्थिती पाहीली, साहेब तुम्हांला हात जोडून विनंती आहे की जावेद शेखसाठी तर तुम्ही जे तुम्हांला मनात असेल ते करा. कारण की या सभागृहामध्ये मी गेले पंधरा वर्षे झाले आहे. वयाच्या ३३ व्या वर्षी नगरसेवक झाले आता ४९ चालू आहे आणि या एजमध्ये एक स्टॅबिलीटी यायला सुरवात होते. आणि आता कुणी जाणं कुणाच्या घरच्यांना परवडणार नाही आणि म्हणून खुप काळजी घ्यायची गरज आहे. भोसरी हॉस्पिटलचे डॉक्टर गोफणे आहेत त्यांच्या बरोबरच्या तीन्ही नर्स, डॉक्टर्स आज पॉझिटीव्ह झाले आहेत. आज सकाळी माई, माझ्या वॉर्डामध्ये तेरा वर्षाची मुलगी अवघ्या पंधरा दिवसात पोरकी झाली. संजय जोशी आणि जया जोशी. जया जोशींच निधन झाल कोरोनानी ६ तारखेला आणि काल संजय जोशींच निधन झालं. १३ वर्षाची ती मुलगी आहे आज त्या मुलीला तीच्या आजोळी नेऊन सोडायला सुध्दा जवळच कोणीही नाही. बारा तेरा दिवसामध्ये आख्ख कुटूंब रस्त्यावर येऊन जातं तीला आधार दयायला कोण आहे. माझ्या बालाजीनगरला काल सलग तीन मयती झाल्या. नंतर इंद्रायणीनगरला झाल्या. सगळी कडे शहरातला आकडा आम्ही पाहतो तर भिती वाटायला लागली आहे, भितीदायक वातावरण झालेल आहे. डॉक्टरावर ताण आहे का तर शंभर टक्के आहे, आज आपल्याकडे डॉक्टरांचा विषय सुध्दा आहे. मला माहित नाही अपण सभा तहकूब करणार का घेणार. जरी आपण काहीही करणार असालतर ते डॉक्टर्स डयुटीवरती आले पाहीजेत, त्यांचा इकडचा हा विषय झाला पाहीजे या मताची मी आहे. काकाच दु:ख आपल्यासाठी खरच खुप मोठ आहे. परंतु आणखी दत्ता काकासारखे अनेक दत्ता कोणीही देशोधडीला लागू नयेत, त्यांनी जीव गमावू नये म्हणून या डॉक्टरांची

फौज आपल्या कामाशी असणं फार गरजेच आहे. त्यासंदर्भात आपण निश्चितपणे पॉझिटीव्ह विचार करावा. परंतु साहेब, मी आपल्याला दोन तीन सुचना केल्या होत्या की त्या पेशंटची परिस्थिती काय, तुम्ही कोविड पेशंटकडे नातेवाईकांना जाऊ देत नाहीत आणि त्याची परिस्थिती बाहेर कळत नाही. तो जीवंत आहे की गेला हेही कळत नाही. आपण मला सांगीतल होत की एक कॉलसेंटर चालू करु तरी खरच साहेब ते जितक्या लवकर चालू करता येईल तीतक्या लवकर वायसीएमला चालू करुन त्याठिकाणी त्या त्या प्रभागाच्या नगरसदस्यांना तरी सांगा. किमान साहेब, आमचा एक फोन जाऊ दया. एखादा पेशंट ज्यावेळेस तुम्हांला कोरोना पॉझिटीव्ह सापडतो, तुम्ही नगरसदस्यांना माहिती दयायला सरकारचे काही बंधन आहेत असं डॉक्टरांच म्हणण आहे. परंतु ज्यावेळेस आपण त्याच्या घरापुढे जातो, बांबू लावतो, पत्रे लावतो त्यावेळेस ऍटोमेटीक कळतनां साहेब. आमचेच कार्यकर्ते जातात किंवा आम्ही जातोत त्याठिकाणी. मग तुम्ही नगरसदस्यांना जर सांगीतल की या या सोसाईटी मधील या या फ्लॅट मधला तो सदस्य आहे किंवा त्याठिकाणचा नागरीक आहे हा त्याठिकाणी कोरोना पॉझिटीव्ह आहे. त्याच जे काही असेल म्हणजे  त्याची स्टेबिलीटी आहे, तो चांगला आहे, त्याला घरी सोडणार आहे, त्याला या या कॉरन्टाईन होमला आपण नेलेलं आहे, या कॉरन्टाईन सेंटरला आपण ठेवलेलं आहे. जर कुणाला काही फोन करावासा वाटलातर फोन चालू आहे त्याचा तीथ नंबर आहे का असं काहीतरी चांगल केल पाहीजे जेणेकरुन लोकांना धीर येईल. परवा रात्री माझ्या येथील बालाजीनगर मधला सुनिल गजभिये नावाचा पेशंट होता, वयवर्षे ४२. माझ्या गाववाला पण आहे आणि २००७ पासून त्याची बायको माझी चांगली कार्यकर्ती आहे. मला परवा रात्री बारा वाजता तीचा फोन आला, नवरा जायच्या आदि. तीन मला सांगीतल याला आयसीयू देता येईल काहो. मी म्हणाले काय परिस्थिती आहे ते मी बघते आणि तुला सांगते. मी फोन केला एकतर डॉक्टरांवर प्रेशर आहे मी त्यांना दोष देतच नाही. पण कुणीतरी असायला पाहीजेना साहेब, की ज्याला मी सांगेन बघ तीथ आयसीयूची कंडीशन काय आहे तीथ एखादा पेशंट शिफ्ट होवू शकतो का. त्यादिवशी तो पेशंट वॉशरुममध्ये गेला आणि पडला. त्याला युरीन आणि लॅट्रीन बरोबर झाली ती कपडयामध्ये झाली. तो तीथेच पडून होता. कोरोना पॉझिटीव्ह असल्यामुळे त्याला निमोनीया झालेला होता. त्यामुळे मुळातच तो सिरीएस होता. त्याठिकाणी त्याला कोणी हात लावायला तयार नाही. त्यानी त्याच्या बायकोला फोन केला की तु इथ ये मी पडलो आहे मला

कुणीच उचलत नाही. विषय असा होता की आपले त्याठिकाणचे जे काही वॉर्डबॉय होते त सगळेजण एकतर कामकरुन दमताताना साहेब, ते पण माणसच आहेत जनावर थोडी आहेत किंवा मशिन नाहीना ते. तर त्यांना सुध्दा त्रास होत होता. बदलीचे जे कामगार येणार होतेना ते ड्रेस करत होते. त्याची बायको खरच चांगली आहे, ती स्लम मध्ये राहते. ती म्हणाली ताई, मी तेथे जाऊन पाहील तर तो वॉर्डबॉय म्हणाला मी कपडे घालतो तुम्ही पुढे चला मी येतो. तीने डॉक्टरांना विनंती केली की मला माझ्या नव-याला उचलू दया. तीन विदाऊट प्रोटेक्शन नव-याला उचललं आणि बेडवरती ठेवलं. तीन मला फोन केला. साहेब, आयसीयू साठी मी कुणाकुणाला फोन करु मी डॉ.वाबळेना कितीवेळा त्रास देणार दिवसभरात. मलाही मर्यादा कळतात आणि त्याठिकाणी त्याला आयसीयू मिळाला नाही. सकाळी पाऊणे सहाला मला फोन आला फोन पाहील्या पाहील्या मला वाटल काही वाईट झाल त्याशिवाय इतक्या सकाळी फोन करणार नाही. ती रडायला लागली मी म्हणाले शांत हो, ती म्हणाली ताई काहीच विषय नाही तुम्ही म्हणालात ते बरोबर आहे मी आयसीयू मध्ये गेले आणि पाहील सगळयांना व्हेन्टीलेटर लागलेले होते, सगळेजण सिरीएस पेशंट होते तुम्ही म्हणलात ते बरोबर आहे. मी कुणाचा जीव घेवू ते सांग मी कुणाला याच्यातून बाहेर काढून तुझ्या नव-याला तीथ ठेऊ. साहेब, इमोशनली सांगीतल हा विषय निराळा पण पेशंटतर गेला. माझ दुर्दैव असं आहे की शेवटपर्यंत एकाही डॉक्टरला माझा कॉन्टॅक्ट होवू शकला नाही. माझा कॉल रिसिव्ह केला गेला नाही की तीथे आयसीयू उपलब्ध होवू शकत होता की नाही. हीच अवस्था अनेक हॉस्पिटलची आहे, प्रायव्हेट हॉस्पिटलची आहे. आदित्य बिर्लाच तर मोठया नेत्यांचा अनुभव आहे. तुम्ही डिलक्स रुम दिली आणि डिलक्स रुम मध्ये ड्रम मधल पाणी घेवून तिथे वॉर्डबॉय येतो आतमध्ये. का त्याठिकाणी गिझर चालू नव्हता. त्याठिकाणी चारवेळा बेल दयायची मग बोलवायचं, मग कधीतरी यायच आले की छिडछिड करत होते, तीथल्या नर्स लोकांनी आंदोलन केलं. पेशंट लोकांनी आंदोलन केलं. विनया तापकीरांचे मिस्टर त्यांना तीथ आंदोलन कराव लागल. मला मान्य आहे की तुमच्यावर पण खुप प्रेशर आहे. परंतु याच्यासाठी तुमच्या हाताखाली जी काही टिम्स तयार करणार असाल ती इतकी पॉवरफुल करा की, साहेब, तीथ जावुन रुग्ण काहीतरी वाईटच होणार आहे त्यापेक्षा त्या दवाखान्याची मान्यता रद्द करा. फरक पडला नाहीतर तो ताब्यात घ्या. जिल्हाधिका-यांना अधिकार आहेत तुम्ही ताब्यात घेवू शकता. आदित्य बिर्ला बद्दल प्रचंड मोठया प्रमाणात तक्रारी आहेत.

रोज लोक व्हिडीओ आम्हांला टाकतात. साडेतीन लाख रुपये बिल आल, पाच लाख बिल आलं, सात लाख रुपये बिल आलं. कोविडच हायेस्ट बिल ७ लाख ४४ हजार रुपये आलं. काय चालू आहे, मोठयाप्रमाणात लुट आहे. आपल्याला त्याच्यावरती काय करता येईल. महापालिका म्हणून याठिकाणी तुमच्यावरती जबाबदारी आहे, तुमच्या बरोबर आता तीन तीन अतिरीक्त आयुक्त आहेत आणखीन तीन आपल्याकडे आलेले आहेत. यांना त्याठिकाणी साहेब, पॉवर्स दया आणि सांगा तीथे कारवाई करा. आणि तुमचा एक ग्रूप करा कुठे कुठे सिरीएस असतील काही इश्यूज असतील त्याठिकाणी तुम्ही काय केल पाहीजे. आपण कोव्हिड सेंटर चालू करतो आपण आऊटरेटने आता दिलेले आहेत, चांगला विषय आहे. त्या ठिकाणी आता मला वाटते जे जे कोणी आलेले आहेत टेंडरींग त्यामध्ये दोन चार नाव मला चांगली माहीती आहेत. कारण की ज्यांच्याकड खरच स्टाफ चांगला आहे ते चांगल होपफुली काम करतील परंतु लोकांच्यामध्ये अवरनेससाठी आपण अजूनही कमी पडलेलो आहोत हे तीतकच खर आहे. अवरनेस जो आहे बाहेर निघायच नाही, मास्क लावलाच पाहीजे, जागेवर जायच नाही, साहेब, लॉकडाउनला लोक कंटाळले का तर, कंटाळले आहेत. कारण की आता घरात पैसे नाहीत, अन्न नाही आणि त्यामुळे लोकांची उपासमार होते. वायसीएमला पेशंट गेला की नगरसदस्यांना कळवल पाहीजे. त्याच्या घरच्यांना तुम्ही लवकर कळवतच नाहीत. नगरसदस्यांना सांगा की या या स्मशानभूमीला त्याला नेणार आहेत. प्रेत देतच नाहीत साहेब आपण हातात. मग किमान कळवा मग आम्ही काय करतो आम्ही घरच्यांना फोन करुन सांगतोत की, ताई एक काम करानां, या या स्मशानभूमीला आपल्याला जाता येणार आहे. इतकेच लोक जायचेत हातात प्रेत देणारच नाहीत. साहेब, आम्हांला पण फोनच करायचा आम्ही जाऊच शकत नाहीत. मग आम्हांला तेवढीतरी सवलत दया. कोव्हिडचे पेशंट सापडल्यानंतर मला वाटत साहेब आता ती लपवाछपवी करायची गरज पण राहीलेली नाही. तुमचा सिव्हीलचा ईंजिनीअर येतो तो म्हणतो ताई, मला अमक्या तमक्या ठिकाणी पत्रे लावायचे आहेत, वासे लावायचे आहेत मी काय करु सांगा बरं. मला बरोबर कळत साहेब की तीथला पेशंट तो पॉझिटीव्ह आहे म्हणून. मग त्याच्या पेक्षा नगरसदस्य आम्ही जबाबदार माणस आहेत. तुमच्या डॉक्टरांना सांगा की आम्हांला सांगा आणि आमच्यासाठी एक कॉलसेंटर चालू करा. जिथ पेशंट सिरीएस आहे किंवा गेलेला आहे त्याच्या संदर्भात किंवा आयसीयू पाहीजे असेल या या ठिकाणी अव्हेलेबल होईल त्याला डॅशबोर्ड आपण कराल किंवा आपल्याकडे अनेक

लोकांनी मागणी केलेली आहे त्याठिकाणी. मा.लक्ष्मणभाऊ जगताप यांनीही मागणी केलेली आहे की डॅशबोर्ड चालू करा म्हणून. आशाताईनी पण मागणी केलेली आहे त्यादिवशी आपण डी.वाय.पाटील बरोबर एमयु केलेल नाही आणि त्याठिकाणी गेल्यानंतर तीस तीस हजार, चाळीस चाळीस हजार बील येते साहेब, घरात पैसेच नाही आता खायच्यासाठी ठेवायचे का जीवासाठी लावायचे. नाही खालल तरी मरतो आहे आणि नाही लावला दवाखान्यात पैसा तरी मरतो आहे अशा द्विधा परिस्थितीमध्ये लोक आहेत. अशा छोटया छोटया सूचना आहेत, मला मान्य आहे आयुक्त साहेब मी तुम्हांला अजीबात एक टक्का सुध्दा दोष देत नाही, फक्त विनंती करु शकते तुम्हांला. परवा दिवशी तुम्ही म्हणालात की नाही, लोक ऑब्जेक्शन घेतात, ऑब्जेक्शन येणारच आहेत साहेब. आपल्याला लोकांचा जीव महत्वाचा आहे. आणि म्हणून मला असं वाटत की तुम्ही एक कॉलसेंटर वेगवेगळया भागात चालू करा. एक कॉलसेंटर महापालिकेच्या मेन बिल्डींगला चालू करा. ज्याच्यामध्ये आयसीयू आहे आणि पेशंट गेला की आहे किंवा कुठल्या भागातला आहे नगरसदस्यांना माहीती दयायची असेलतर त्यांनी कुणाला विचारायच पिंकपॉईंट एक व्यक्ती दया. किंवा प्रभाग अधिकारी असतील त्यांना तरी सांगा. तुम्हांला जे योग्य वाटेल ते करा. परंतु हे कराव लागेल कारण दत्ताकाका गेला त्याच बरोबर अनेक योध्दे आज देशोधडीला लागलेले आहेत. अनेकजण बरे होवून घरी पण आलेले आहेत. परंतु आता जावेदभाई आहेत त्यांच्यासाठी आपल्याला काय चांगल करता येईल ते निश्चितपणे करा. आयुक्त साहेब तुम्ही टिकांवरती जास्त कॉन्सन्स्ट्रेट करु नका. टिका त्याच्यावरतीच होती जो काम करतो आणि मला असं वाटत तुम्ही चांगल काम करता. तुम्ही चांगल काम करतातर तुम्हांला टिका झेलण्यासाठी पुढचे सामील आहेतना आपल्याला. आज आपण लोकांचे जीव वाचवू यात. लोकांच्यासाठी आम्हांला सगळयांना एकत्रीत यायच आहे. मला वाटत या सभागृहात बसलेला प्रत्येक व्यक्ती तुमच्या बरोबर आहे. मी मा.महापौरांना सांगेन की मागच्यावेळेस मी महापौरांना फोन लावला तो लगला नाही रात्री साडेदहा आकरा वाजता. आपण सुध्दा ऑनफिल्ड नका जाऊ, नका जाऊ मा.महापौर साहेब. तुम्हांला जे जमेलना तेवढच फोनवरती करा. या सभागृहात बसलेले अनेक लोक आहेत, आमचे पक्षनेते असतील, उपमहापौर असतील. मा.उपमहापौरांना तर साहेब खासकरुन तंबी दया, इतके फिरतात उपमहापौर की ज्याची काही मर्यादा नाही. आम्हांला कळतं, तरुण आहेना तर तरुणांनी अनेक लोकांची सेवा करण्यासाठी तुमची गरज आहे तुषारजी

त्यामुळ वॉर्डात कमी फिरा, कमी फिरा. सगळया नगरसदस्यांच्या वतीने मी छोटीशी विनंती करते की मा.काका इथ बसणार आणि नाही बोलू दिलतर केवढा तो आवाज, तो आवाजच नाही येणार आता. एक लढवय्या कार्यकर्ता गेला त्यांची जागा कोणच भरुन काढू शकणार नाही. परंतु ज्यांना आपण वाचवू शकतो त्यांच्यासाठी निश्चित आपल्याला काम करायच आहे. मा.महापौर साहेब, मी काका सानेनां माझ्या प्रभागाच्या वतीने, माझ्या कुटूंबियाच्या वतीने, भारतीय जनता पार्टीच्या वतीन, दोन्ही आमदारांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे–** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.महापौर साहेब आपण अत्यंत चांगले काम करीत आहात. परंतु काल दिवसभरामध्ये मी वाबळे साहेबांना किमान २५ फोन केले असतील पण आम्हांला असे वाटते की, आपण एखादया अधिका-याचा किती वेळ घ्यायचा. परंतु समोरची घटना दुर्दैवी घडली तर आम्हांलाही पर्याय रहात नाही.याठिकाणी त्यामुळे प्रत्येक फ्लोअरवाईज प्रत्येक दवाखानावाईज जे काही मुलं/मुली घेणे शक्य आहे. ते घ्यावे. परंतु आमच्या वॉर्डातील पेशंट हा आमच्या जीवाचा माणुस असतो आणि त्यावेळेला जर का माहिती मिळाली नाही तर एखादया माणसाला किती परेशान करायचं याला मर्यादा असल्या तरी आमच्याकडनं मर्यादाच पालन काल झालं नाही याचं दु:ख वाटलं आणि मेसेज टाकला सॉरी ऍण्ड थँक्स परंतु तोपर्यंत त्यांचा जो वेळ घेतला तो योग्य नव्हता. त्यामुळे डॉ.वाबळेंना ऑपश्न म्हणुन प्रत्येक ठिकाणचे पाच डॉक्टर आज भोसरीच्या हॉस्पिटलची काय अवस्था आहे हे तुम्ही बघा त्यांना एक फोन लावा त्या व्यक्तीला किती दम लागतो ते बघा लगेच अनुभवता येईल. मला त्यांना सांगाव लागलं की,साहेब आपलं बोलणं बंद करु कारण तुम्हांला जी धाप लागली आहे ते तुम्हांला सहन होत नाही. आणि हे सगळे कोरोना योध्दा आहेत त्यामुळे आमच्या वॉर्डातील नागरीकांचे प्राण वाचत आहेत हे आम्ही विसरणार नाही आणि विसरुही शकत नाही. त्यामुळे यांच सुध्दा आरोग्य अत्यंत महत्वाचं आहे. आणि दुसरा मुद्या होता डेड बॉडी. जी आपल्याकडे ज्या मयती होतात त्या दुर्दैवाने आपल्याकडे डेड होण्याचं प्रमाण वाढलेलं आहे. काल जो मी प्रसंग पाहिला आणि घरीच थांबाव असं वाटलं पण शक्य झालं नाही म्हणुन मी स्मशानभूमीत गेले त्याठिकाणी माझ्या वॉर्डातील एका पेशंटची बॉडी घेऊन आली ती आतली

बॉडीचं जोपर्यंत दहन होत नाही तोपर्यंत दुसरी बॉडी अंम्बुलन्स मधनं काढत नाहीत तोपर्यंत दुसरी अंम्बुलन्स आली मग तो पर्यंत पुढच्या बॉडीच दहन होण्यासाठी खूप वेळ जातो त्यामुळे या अंम्बुलंन्स मध्ये सुध्दा समन्वय ठेवणेत यावा त्यामुळे नागरीकांचे जे हाल होत असतात ते कमी होतील आणि त्यांच्या कुटूंबातील जो माणुस गेलेला आहे त्यांची खुप मोठी हानी झालेली असते. परंतु या हानी बरोबरच दुस-या व्यक्तींनाही  वेदना होत असतात. काल ज्या तीन बॉडी त्याठिकाणी आल्या होत्या प्रत्येक बॉडीला दहन करण्यासाठी अर्धा ते १  तास पकडला तरी  एवढा वेळ गाडया त्याठिकाणी थांबणं शक्य नाही त्यामुळे त्यावरही विचार करावा. तिसरा मुद्या आहे की, आम्ही कोणत्याही अधिका-याला कोरोनाच्या पेशंटची  लिस्ट मागीतली तर ते देत नाहीत खरंतर याची तुम्ही १०० टक्के सोय केली पाहिजे की,जी अत्यंत गरजेची आहे. आणि १३३ नगरसेवकांच्या वॉर्डात महापालिकेच्या शाळा आहेत त्याठिकाणी  आपण ज्यांना कोरोना झालेला नाही,ज्यांना लक्षणं दिसत नाहीत अशा पेशंटना त्याच शाळेत क्वारंटाईन केल आणि  तिथल्या शिपायामार्फत डब्बा पोहचवण्याची व्यवस्था केली तर  आम्हांला आमच्या वॉर्डातील लोकांना भेटता तरी येईल किंवा त्यांची अवस्था कशी आहे हे बघता येईल. शाळेमध्ये दोन शिपाई ठेवले आणि त्या त्या वॉर्डातील लोक त्याच ठिकाणी क्वारंटाइन केले तर आमच्या प्रभागातील जे नागरीक क्वारंटाइन झालेले आहेत त्याची माहिती घेण्यासाठी आम्हांला डॉ.वाबळेसाहेबांना  किंवा इतर डॉक्टरांना विचारण्याची आवश्यकता पडणार नाही. तेंव्हा आपण या सगळया गोष्टीचा विचार करावा आणि पुन्हा आपल्याकडे दत्ता काका होणे नाही. आपल्या शहरातील एकही नागरीक किंवा नगरसेवक जाता कामा नये अशी आमची प्रामाणिकपणे इच्छा आहे. तुम्ही सुध्दा १००% प्रयत्न करीत आहात परंतु मला काल पहाटे  ५.३० पासून ते दुपारी ४. ३० पर्यंत बॉडी ताब्यात मिळायला वेळ लागला. म्हणजे तुम्ही काम करीत नव्हतो असे म्हणण्याचा मला अजिबात अधिकार  नाही. परंतु यामध्ये मदत करणे गरजेचे आहे. कारण ज्यावेळेस आपल्याच वार्डातील नागरीकांचा प्रश्न येतो त्यावेळेस त्यांचे प्रतिनिधीत्व करणारे आम्ही असतो. तर त्यांच्या मते तुमच्याविषयी जे कोऑर्डीनेशन आहे त्या कोऑर्डीनेशनद्वारे जे धागा पकडतात त्या पध्दतीने आपण काम केलं तर या शहरामध्ये आमच्या नगरसेवकापैकी किंवा वॉर्डातील कोणत्याही माणसाचा जीव महत्वाचा आहे आणि तो याठिकाणी  जाणार नाही यादृष्टीने आपण निश्चितच पावले उचलली पाहिजे.धन्यवाद.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माजी विरोधी पक्षनेते आदरणीय दत्ता काका साने यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. काका बद्दल जेवढं बोलल तेवढ कमी आहे. गेल्या १०/१२ वर्षापासून मी त्यांना खुप जवळून ओळखत आहे. कॉलेजमधनं ज्या ज्यावेळेस आम्ही आंदोलन करायचे त्यावेळेस काकाची पाठीवर थाप असायची की, आपल्या सर्वांच काम खुप चांगल्या प्रकारे चालू आहे. गणपती उत्सव,नवरात्र उत्सव असेल प्रत्येक सुख-दु:खामध्ये आमच्या पाठीशी उभे राहणारे आमचे काका आज आमच्यातून निघुन गेले याची आम्हांला खुप खंत आहे या सभागृहामध्ये गेली ३ ते साडेतीन वर्ष त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असताना एक चांगला मार्गदर्शक, चांगला वक्ता आणि चांगला विरोधी पक्षनेता आमच्यातुन हरवला आहे आणि ही पोकळी कधीही भरुन न येणारी आहे हे आम्हांला जाणवत आहे. आकुर्डी चौकामध्ये त्यांचे होर्डींग लावले आहे आणि त्या होर्डींगकडे पहात असताना १०/१५ दिवसापुर्वी आपल्यात असणारा माणुस आज आमच्यात दिसत नाही.ही जी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही भरुन न निघणारी आहे. आयुक्त साहेब, आपण शहरामध्ये गेल्या ३/४ महिन्यांपासून डॉक्टर,नर्स,वॉर्डबॉय असतील हे सर्वजण कोरोनासारख्या संसर्गा बरोबर झगडत आहात आणि आपण सर्वजण चांगल्या प्रकारे काम करीत आहात. आपण सगळेजण आपल्या जीवाची पर्वा न करता काम करीत आहात. ही खरी अभिमानाची गोष्ट आहे. कोरोना संसर्गापासून बचाव करण्यासाठी आयुक्त साहेबांच्या सूचनांच सर्व लोकांनी व्यवस्थित पालन केलं असत तर नक्कीच आपण आज जो प्रभाव वाढलेला दिसतो आहे तो कुठं तरी थांबलेला दिसला असता. गेल्या आठवडयापासून असं एक चित्र निर्माण झालेलं आहे की, संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये या कोरोना संसर्गाचं प्रमाण वाढलेले दिसत आहे. दररोज ५०० च्या पुढे कोरोनाच्या पेशंटची संख्या वाढत आहे. माझा एक मित्र आहे त्यांनी प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये कोरोनाची टेस्ट केली त्यानंतर त्यांना होम आयसोलेशन होण्यास सांगितलं आणि होम आयसोलेशन झाल्यानंतर त्याला त्रास होऊन तो खुप मोठया प्रमाणात धापा टाकत होता. या शहरातील सगळे हॉस्पिटल मध्ये पाहिले तर एकही बेड उपलब्ध नाही. त्यानंतर मी फोन केला मग तो पेशंट तिकडे शिफ्ट केला. एक भयानक चित्र आपल्या सगळयांच्या डोळयासमोर उभं आहे. आणि त्याच्यावर आपण येणा-या काही दिवसामध्ये १०० टक्के मात केली पाहिजे. वायसीएमएच मध्ये सुध्दा आता डायरेक्ट पेशंट येतात पण त्यांना आयसीयु साठी जागा उपलब्ध

होत नाही. ४/५ पेशंट आज बाहेर उभे आहेत. आपण बाहेर देशाच्या उदा.चीन च्या हॉस्पिटलमध्ये कोरोनाच्या पेशंटसाठी बेड उपलब्ध होत नव्हते. तशीच अवस्था आज आपल्याकडे आहे. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर,मा.सत्तारुढ पक्षनेते या सर्वांना माझी विनंती आहे की, लवकरात लवकर दिवस-रात्र एक करुन या शहरासाठी आयसीयु चे बेड याठिकाणी उपलब्ध करुन देणेत यावे. रुग्णांची संख्या वाढत चाललेली आहे. आपला एक,एक मिनिट महत्वाचा आहे. याठिकाणी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेत याव्यात. आम्ही सर्व सदस्य तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही जो निर्णय घ्याल तो आम्हांला मान्य आहे. मा.आयुक्त साहेब, अजुन किती दिवस तुम्हां-आम्हांला जगावं लागणार आहे हे माहित नाही. आपले सहकारी नगरसेवक जावेदभाई हे सुध्दा आयसीयू मध्ये आहेत मी तर म्हणतो की, प्रत्येक नगरसेवकाची कोरोना टेस्ट करावी ही माझी आपल्याला विनंती आहे. आपण भितीपोटी जात नाही पण आपले फ्युचर प्लॅन काय आहे ते तरी समजेल नां आपले नगरसेवक असतील, सामाजिक कार्यकर्ते असतील त्यांची कोरोना टेस्ट करणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे आपण जे व्यापारी आहेत, त्यांची टेस्ट करीत आहात आणि ज्यांची कोरोना टेस्ट निगेटीव्ह निघेल तोच दुकान उघडेल हा जो आपण निर्णय घेत आहोत. कारण समोरुन येणारी व्यक्ती किंवा माल देणारी व्यक्ती यापैकी कोण पॉझीटीव्ह आहे हे समजत नाही. मा.महापौर साहेब,मी आपला जास्त वेळ न घेता या शहरासाठी लवकरात लवकर आयसोलेशन आणि आयसीयु चे बेड उपलब्ध करुन देणेत यावे ही विनंती आहे. धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर सगळेच जण दुःखद अंतकरणानी याठिकाणी उपस्थित आहेत. काकांच्या जाण्याने सर्वांना निश्चितपणे सर्वांना दुःख आहे. तसेच माझ्या प्रभागातील माझा जवळचा मित्र जावेद शेख याला देखील माझ्या वतीने श्रध्दांजली वाहतो. माई, काही गोष्टी मी आपल्या निदर्शनास आणुन देतो की, पाठीमागे आपल्या ज्या मिटींग झालेल्या आहेत त्या मिटींगमध्ये आयुक्तांना मी वारंवार सूचना करीत आलेलो आहे की, लोकांच्या अडचणी काय आहेत की, लोकांच्या हातामध्ये रिपोर्ट हा पॉझीटीव्ह पडतो आहे. आणि त्यानंतर महापालिकेला कळण्यासाठी ३/४ दिवस लागतो. मग आपण त्यावर काय प्रोव्हीजन करायचं ते करतोय. आता मी तुम्हांला एक उदा.देतोय परवा बिर्ला हॉस्पिटलला एक पेशंट आला त्याच्या हातात पॉझीटीव्ह रिपोर्ट आल्यानंतर

तो चक्कर येऊन पडला त्याला उठवून चेअरवर बसवल्यानंतर त्याला विचारले की, काय झालं तुला तर तो म्हणाला की,माझा रिपोर्ट पॉझीटीव्ह आलेला आहे. त्यानंतर मी त्याला समजुन सांगितलं की, तुझं वय कमी आहे,तु घाबरु नकोस तो म्हणला की,मला सिम्पटनस् काही दिसत नाहीत त्यामुळे मी होम आयसोलेशन होऊ शकतो. त्याला मी समजुन सांगितलं की, तु घरात एकटा रहात असशील तर एकटा रहा औषध घे, पाण्याची वाफ घे, वेळच्या वेळी जेवण वगैरे कर काही टेंन्शन घेऊ नको उद्या परत तु तिथंच जा मी त्याला दररोज दोन वेळा फॉलोप केलो होतो या माणसांच्या बाबतीत मी मा.आयुक्त साहेब, मा.अति.आयुक्त संतोष पाटील साहेब यांना फोन केला होता परंतु त्या माणसाला महापालिकेच्या कोणत्याही अधिका-यांकडुन फोन गेलेला नाही. तो माणुस त्याच्या घरामध्ये दोन दिवसापासून आयसोलेट आहे म्हणुन कळवलं सुध्दा नाही मग आपण हे कसं कंट्रोल मध्ये आणणार आहात, आपण कसं हायरिस्कचे पेशंट कंट्रोल मध्ये आणणार त्याच बरोबर माझ्या घराच्या पाठीमागे साबळे म्हणुन एक पेशंट सापडला तो चाळीमध्ये रहात होता त्याचा दोन दिवसापासून आमच्याकडे रिपोर्टच आलेला नाही. की, आमच्याकडे असा,असा एक पेशंट आहे तो सापडलेला आहे त्याच्या संपर्कातील जे जे हायरिस्कमधील लोक आहेत त्याची माहिती घ्या. असा काही प्रकार घडलेला नाही. जर आपण हायरिस्कमधील लोकांना सुध्दा कॉन्टॅक्ट करणार नसाल तर आपणच मुद्यामहून पेशंट देतोय की काय अशी शंका येत आहे. आयुक्त साहेब, याठिकाणी एकदम ढिसाळ कारभार चालू आहे. डॉ. इंजिनियर या आमच्या इथं आहेत त्यांच काम गाडयांना डिझेल आहे की नाही हे बघण्याचं त्यांच काम नाही. त्याच्यासाठी प्रशासनाची जी इतर माणसं आहेत त्यांना त्यांच्या मदतीसाठी त्यांना द्या. तुम्ही मला सांगितले की, चार लॅबमधुन टेस्टींग होती तेथून तो प्रायव्हेट हॉस्पिटलचा रिपोर्ट प्रायव्हेट हॉस्पिटलला जातो, वायसीएम हॉस्पिटलचा असेल तर तो वायसीएमला जातो. मग तो आपण वेगळा करतो आणि वेगळा केल्यानंतर तो खाली जातो एवढया प्रोसेसला जर दोन दिवसाचा वेळ जातो. आपल्या महापालिकेमध्ये ३२ प्रभाग आहेत आमची सूचना आहे की, ४ लॅब ठेवा त्याच्या हाताखाली ३२ रिप्रेझेंटीव्ह ठेवा आणि त्यांना प्रत्येक प्रभागवाईज पीनकोडनुसार रिपोर्ट वेगळं करण्यास सांगावे. असे रिपोर्ट वेगळे केल्यानंतर उदा. माझ्या हातामध्ये थेरगांवचे रिपोर्ट येतील या रिपोर्टमध्ये मला फक्त काय बघायचे आहे की, जे रुग्ण पॉझीटीव्ह आहेत त्यापैकी काही पेशंट हे होम आयसोलेट होऊ

शकतात. त्यातील काही पेशंट ऑलरेडी हॉस्पिटलमध्ये ऍडमिट आहेत. आणि ते त्यांच्याकडनं  हायरिस्क कॉन्टॅक्टची माहिती घ्यायची आहे. आणि ते ठरवतील त्यांना कुठे बेड उपलब्ध आहेत कुठे नाही म्हणजे एवढी सोपी पध्दत असताना आपण यांना रिप्रेझेंन्टीव्ह का देत नाही. आम्ही नगरसेवक त्या रिप्रेझेंन्टीव्हच्या कॉन्टॅक्ट मध्ये राहू.आज आम्ही त्या डॉ.मॅडमला १० वेळेस फोन करायचा त्यांनी डॉक्टरचं काम करायचं का रिप्रेझेंटीव्हच काम करायचं याबाबतीत मा.आयुक्त साहेब आपणाला याबाबतीत  काय नियोजन करता येईल याची माहिती द्यावी. कारण परिस्थिती बिकट होत चालली आहे आणि अजुन बिकट होत जाणार आहे. लोकांना काहीच कळणार नाही. पॉझीटीव्ह रिपोर्ट आल्यानंतर काय काळजी घ्यायला पाहिजे हे लोकांना अजुन सुध्दा कळत नाही. हे कळण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे. आणि तुम्हांला हे ३२ रिप्रेझेंटेटीव्ह महापालिकेच्या कर्मचा-यांमधुन नेमणुक करता येत नसेल तर आम्ही तुम्हांला ३२ रिप्रेझेंटेटीव्ह  तुम्हांला देतो. आणि आम्ही त्यांच्याकडुन माहिती घेतो. धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  दत्ता काका जाण्याने पिंपरी चिंचवड शहराची जी पोकळी निर्माण झालेली आहे ती खरोखरच भरुन न येणारी आहे. आम्ही त्यांच्याबरोबर ट्रिपला गेलो होतो त्यांच्याबरोबरचा आम्हांला जो अनुभव आला आहे तो सर्वांनी अनुभवला आहे. तसेच मोरेवस्तीचा संपुर्ण भाग हा बाहेरगावातील भाडेकरुचा भाग असल्यामुळे ते ख-या अर्थांनी ते पोरके झालेले आहेत. कारण दत्ता काका हे गाववाले म्हणुन कधीच वावरलेले नाहीत. त्यामुळे मोरे वस्ती, साने चौक याठिकाणचे नागरीक यांचे काकांनी कायम पालकत्व घेतलं त्यामुळे ते त्याठिकाणी नावारुपाला आले. त्याचप्रमाणे जसं आता एकनाथराव पवार यांनी सांगितलं की, कुठल्या तरी एका प्रोजेक्टला त्यांच नांव देणे गरजेचं आहे. किंवा  एखादया हॉस्पिटलला तरी नांव द्यावं. दत्ता काका हे सर्वांना प्रोत्साहन देणारी व्यक्ती होती. त्यांची  नेहमी आपल्या सहकार्यांना मार्गदर्शन करण्याची वृत्ती होती. शहरातील प्रत्येक व्यक्तीला प्रोत्साहन मिळावं अशी एखादी वास्तु त्यांच्या नावाने उभी करावी किंवा एखादं चांगल  मार्गदर्शन केंद्र उभं करावं जिथं युवकांना चांगल  मार्गदर्शन मिळेल. तसेच जावेदभाई हे सुध्दा ऍडमिट आहेत मी त्यांना ८ दिवसापुर्वीच भेटण्यास गेलो होतो त्यांनी सांगितले की, माझी तब्येत बरी आहे दोन दिवसानंतर मला घरी सोडणार आहेत असे सांगितले आणि दोन

दिवसामध्येच त्यांची तब्बेत खालावली आहे. प्रत्येक नगरसेवक हा हायरिस्क कॉन्टॅक्ट मध्ये आहे प्रत्येक जण आपआपल्या वॉर्डामध्ये चांगल्या पध्दतीने काम करीत आहे. काम करीत असताना तो नक्कीच हायरिस्क कॉन्टॅक्ट मध्ये येत असतो. त्यामुळे प्रत्येक नगरसेवकाची कोरोना टेस्ट ही झालीच पाहिजे. त्याची आतापासूनच काळजी घेणं गरजेचं आहे. दत्ता काका यांनी नेहमीच प्रशासन आणि सत्ताधारी यांच्यावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि ते त्यामध्ये यशस्वी ठरलेले आहेत. आज आपलं सभागृह पोरकं झालेलं आहे अस म्हणलं तरी वावगं ठरणार नाही. प्रशासन विभागाची काम करताना धावपळ होत आहे हे आम्ही पहात आहे. त्यामुळे तुमच्यावर कोणीही आरोप केला तरी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. वैदयकीय विभाग आणि त्यांची टिम ही चांगल्या प्रकारे काम करीत आहे. शहरातील हॉस्पिटलमध्ये व्हेंटीलेटर उपलब्ध आहेत परंतु हॉस्पिटल हे पेशंटला ऍडमिट करुन घेत नाहीत काही पेशंट अम्बुलंन्स मध्ये जीव सोडत आहेत अशी परिस्थिती आहे. शहरातील इतर जे हॉस्पिटल आहेत त्याठिकाणी जे व्हेंटीलेटर आहेत ते आपल्या पेशंटला कसे उपलब्ध करुन देता येईल यासाठी आपण प्रयत्न करावेत. व्हेंटीलेटरसाठी प्रत्येक नगरसेवकाला फोन येत आहेत. प्रत्येक नगरसेवकाला ५ व्हेंटीलेटरसाठी फोन आले तर १३३ नगरसेवकांना किती व्हेंटीलेटर लागतील याचा विचार करावा. अशी विनंती करतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपल्या सभागृहातील माजी विरोधी पक्षनेते दत्ता काका यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. एक अष्टपैलु व्यक्तीमत्व काळाच्या आड गेलंलं आहे. दत्ता काका यांच्या बाबतीत अनेक सदस्यांनी त्यांची जी धडाडीची कामगीरी होती ती व्यक्त केलेली आहे. दत्ता काका यांनी या पिंपरी चिंचवड शहरामध्ये एक सामाजिक बांधीलकीतून काम केलेले आहे.राष्ट्रवादीतील एक नेतृत्व हरपलेलं आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये १९९७ साली समाविष्ठ गावांचा जो विचार झाला त्याला विरोध करण्यासाठी त्या लोकांच नेतृत्व करण्याची संधी दत्ता काका यांना आली होती. आणि त्या लोकांना दत्ता काका यांच्यामार्फतच आपली सोडवणूक होईल अशी अशा होती. दत्ता काका यांनी अनेक प्रयत्न करुन त्यांच्या बाजुने जे,जे शक्य होईल त्यांच्या सुविधा, त्यांना मार्गदर्शन करण्याचं काम दत्ता काका यांच्या माध्यमातून झालेलं आहे. दत्ता काका यांच्या बरोबर दोन दिवसापूर्वीच त्यांच्याशी बोलणं झालं

होतं त्यांनी सांगितलं की, माझी तब्बेत सुधारत चालली आहे मी लवकरच बरा होईन. त्यांच्या अशा बोलण्यातून आम्हांलाही धीर आला होता त्यानंतर ही घटना कानावर आली आणि आम्हांला विश्वासच वाटत नव्हता. दत्ता काका यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही भरुन न निघणारी आहे. त्यांच्या कुटूंबावरती काळाने जो घाला घातला आहे त्यातुन सावरण्याची शक्ती त्यांना परमेश्वराने देवो अशी मी माझ्या लोंढे परिवाराच्या वतीने त्याचबरोबर शहरातील सर्व समाजबांधवाच्या वतीने भारतीय जनता पार्टीचे मा.आमदार महेशदादा लांडगे, चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या वतीने मी दत्ता काका यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, शेंडगेताईंनी जी उणिव दाखवून दिलेली आहे. त्याठिकाणी विदयुत दाहिनीमध्ये जे कोविडचे पेशंट घेतले जातात त्याचा दहन होण्यासाठी कालावधी खुप लागतो शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी विदयुत दाहिनी नादुरुस्त असतील किंवा ज्या ठिकाणी त्याची गरज असेल अशा ठिकाणी नवीन विदयुत दाहिनी बसविण्यास आपण संबंधितांना आदेश देणेत यावेत. कारण की,पेशंटच्या नातलगांनी पीपीई कीट घातलेलं असतं आणि ते अंम्बुलंन्स मध्ये बसलेले असतात त्यामुळे त्याला नाहक त्रास होत असतो. कारण की, दोन दिवसापुर्वी माझ्या नातलगाच्या बाबतीत हीच घटना घडलेली होती. भोसरीच्या विदयुत दाहीनीमध्ये एक बॉडी आलेली होती आणि त्या अनुषंगाने एक ते दिड तास ताटकळत बसावे लागले होते. तर या पार्श्वभूमीवर आपण लवकरच तसे आदेश देणेत यावेत. आपल्या शहराची कोरोना पेशंटची परिस्थिती वाढत चालली आहे. त्या अनुषंगाने आजुबाजुच्या राज्यामधील परिस्थितीत जी सुधारणा झालेली आहे त्या परिस्थितीच्या अगेन्स आपण तिथे तज्ञ डॉक्टर,तज्ञ नर्सेस केरळ सारख्या राज्यामध्ये कोरोनाची परिस्थिती अटोक्यात आलेली आहे. अशा ठिकाणच्या डॉक्टरांची मागणी केली तर त्याठिकाणी काही वावगं होणार नाही. आपले सहकारी नगरसेवक जावेदभाई यांचेसाठी वैदयकीय विभागाच्या माध्यमातून जे तज्ञ डॉक्टर आहेत त्यांची माहिती घेणेत यावी आणि त्यांना जी काही मदत लागेल ती या महापालिकेच्या वतीने तातडीने देणेत यावी. आणि श्रध्दांजलीची जी सूचना मांडली आहे त्या सर्वांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.आणि थांबतो जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपण कोरोनाच्या महामारीशी सामना करीत असताना आपले दत्ता काका हे आपल्याला अचानक सोडून गेले. आज याठिकाणी जनरल बॉडी चालू आहे परंतु याठिकाणी दत्ता काका नाहीत हा विश्वासच बसत नाही. परंतु झालेल्या परिस्थितीला सामोरे जाऊन विशेषत: दत्ता काका यांच्या घरच्यांना जे दु:ख झालेलं आहे त्यांना यातुन सावरण्याची परमेश्वराने शक्ती द्यावी आणि दत्ता काका यांना मी माझ्या परिवाराच्या वतीने आणि शिवसेनेच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. मा.आयुक्त साहेब, शहरामध्ये कोरोनाची जी परिस्थिती आहे ती कशी आटोक्यात येईल यासाठी प्रयत्न करावेत आणि सर्वांनी आपण आपली स्वत:ची कशी काळजी घेता येईल यासाठी प्रयत्न करावेत. आयुक्त साहेब, दत्ता काका जाण्याच्या आदल्या दिवशी आपण मला फोन केला होता की, दत्ता काका यांना धाप लागत आहे आणि त्यांना बोलता येत नाही. मी तुम्हांला सांगितलं की, तुम्ही बिर्ला हॉस्पिटलला सांगा त्यांना वाफ देण्यास सांगावे. परंतु काल मी सकाळी ११.०० पासून ते सायं.४.०० पर्यंत वायसीएमच्या डेड हाऊसला होतो त्याठिकाणी एक ३५ वर्षाचा युवक वल्लभनगरचा देखील गेलेला होता. तो तरुण असल्यामुळे त्याच्या घरच्यांना चौकशी केली की, तो तरुण असल्यामुळे कसा काय गेला तर त्यांनी सांगितलं की, ३ दिवस बिर्ला हॉस्पिटलमध्ये ठेवुन घेतलं आणि नंतर सांगितलं की, याला वायसीएमएच ला घेवुन जावा. वायसीएमएच आमच्यापेक्षा चांगल आहे म्हणुन सांगितलं गेलं. आयुक्त साहेब, बिर्ला मध्ये असं का घडतंय ही परवाची परिस्थिती आहे. म्हणजे चांगला पेशंट असताना तो बिर्ला मध्ये गेला त्या पेशंटवर अशी काय वेळ आली की, त्याला परत वायसीएमएच ला आणावं लागलं आणि वायसीएमएच ला विचारलं तर ते म्हणाले की, तो पेशंट हा एकदम शेवटच्या स्टेजला आहे. म्हणजे खाजगी हॉस्पिटलचे डॉक्टर सिरिएस पेशंट असला की, ते वायसीएमएच ला पाठवितात याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. मी स्वत: दिनानाथ हॉस्पिटलमध्ये होतो परंतु मला वाटले नाही की, मी कोविड हॉस्पिटलमध्ये आहे. म्हणजे बेड दिल्यानंतर नर्स येणे,एक,एक तासाने येऊन बीपी चेक करणे म्हणजे इतर वेळा जसे आपण ॲडमिट होतो त्या पध्दतीने डॉक्टरांची पूर्ण टिम येऊन तपासणी करुन जातात. त्याठिकाणचा हाऊसकिपींगवाला हा दिवसातून ३ वेळा येऊन क्लिनींग करुन जात होता. परंतु आपल्या वायसीएमएच मध्ये किंवा दवाखान्यामध्ये असं कोणच येत नाही. एखादा पेशंट डिप्रेशनमध्ये जाईल नां दत्ता काकाचं काय झालं आज

आपल्यातीलच एक सहकारी निघुन गेला आहे. आणि आज आपले डॉ.गोफणे,डॉ.गोरे पॉझीटीव्ह झाले, टाइम्स ऑफ इंडीया मध्ये पीसीएमसीचे डॉक्टर हे उपाशी काम करीत आहेत त्यांना जेवण सुध्दा मिळत नाही अशा बातम्या येत आहेत हे दुर्दैव आहे. मा.आयुक्त साहेब, आजपर्यंत आम्ही तुम्हांला कोरोनाच्या संदर्भात ज्या काही सोयी-सुविधा करणे आवश्यक आहे त्यासाठी आम्ही तुम्हांला साथच दिलेली आहे. मास्कच्या संदर्भात आम्ही तुम्हांला पाठीशी घालणार नाही परंतु डॉक्टरर्स हे उपाशीपोटी काम करीत आहेत हे तुम्हांला फिल होत नाही का? मी तुम्हांला सांगितलं होतं की, कलासागरला डॉक्टर झोपायला जातात त्यांना एसी लावण्यास सांगा त्यावेळेस आपण म्हणले एसी अलाऊड नाहीत. कोरोनाची नवीनच परिस्थिती निर्माण झालेली होती त्यामुळे काय करावे काय नाही हे लक्षात येत नव्हते. त्यानंतर मला वाटतं कलासागरनी चांगल्या सुविधा दिलेल्या आहेत. साहेब,तुम्ही मास्क मध्ये काय केलं हे आम्ही तुम्हांला विचारतोय का? पण आता यांना जेवण देत नाही. आपण एकीकडे म्हणता की, इम्युनिटी वाढवली पाहिजे, म्हणजे कुठंतरी चांगल खाललं पाहिजे, आहार चांगला पाहिजे. आणि जे डॉक्टर कोरोनाच्या स्थितीमध्ये काम करतात. कालच मला कोणीतरी ठेकेदार भेटला तो म्हणला मला पेमेंटच भेटल नाही. नको ते विषय कार्योत्तर मान्यतेसाठी येतात आणि एखादयाचं पेमेंट तुम्ही मार्च पासून थांबवता म्हणजे हे काय चाललंय. एखादा तुमचा डॉक्टर पदाधिका-याच्या गुडफेथ मधला असला की, तो अशी कामं करतो मी सुध्दा त्या डॉक्टरला फोन केला सोडून दे नां, दे ना पैसे मी बालेवाडीला गेलो होतो तो ठेकेदार म्हणाला पैसेच दिले नाही आणि तो काम सोडून गेला तर जबाबदारी कोणाची साहेब, मी तुम्हांला दुसरी बाजु सांगतो की, डॉ.लाठी,डॉ. विनायक, इंजिनियर मॅडम, यांची पाठ थोपटली तरी त्यांचे भविष्यात कसे ऋण फेडणार हे मला माहित नाही. ही लोक खरंच फिल्डवर काम करीत असतात आणि तुमच्यातील काही लोक गटनेत्याच्या केबीनमध्ये जायचं, चेअरमनच्या केबीनमध्ये जायचं अशी काम करीत असतात. हे या महापालिकेचे दुर्दैव आहे. मी तुम्हांला नांव घेऊन पण सांगेन. पण अशा प्रकरणात कुठल्याही प्रकारचं राजकारण करायचं नाही. आयुक्त साहेब, आपण बिर्ला हॉस्पिटलची आजपर्यंतची बिलं तपासली आहेत का? आज आम्ही नगरसेवक कशासाठी व्हायचे आम्ही जर घरी बसले तर नागरीक काय म्हणतील तुम्ही काय करत होते. त्यामुळे लोकांना आम्हांला फेस करावं लागतय तुमच्यातील आणि नागरीक यांच्यातील गॅप आम्हांला भरुन काढावी

लागते. आम्हांला पास काढण्यासाठी किती तरी वेळा अजित पवार साहेबांकडे यावं लागतय. हे काय आमच्या घरचं काम नाही पण आम्ही पण रिस्क घेवुनच काम करतोय. प्रत्येक नगरसेवकांनी पण स्वत:ची जबाबदारी घेवुन काम करायचं आहे. कोरोनाची कितीही काळजी घेतली तरी तो होणारच आहे असे जर आपण धरुन बसलात तर  फिल्डवर कोण येणार आपण अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहात आम्ही आपल्याला कुठेही दोष देत नाही. काही, काही वेळेस साक्षात्कार होतो तुम्ही अचानकपणे चांगले काम करीत नाही. मला वाटतं कुठं तरी काही काम झाल नसेल मला दत्ता काकाचं तुम्हांला उदा.द्यायचं आहे  इथं महापालिकेच्या अधिका-याच्या नावाने केस झाली दत्ता काका शिवजयंतीला भक्ती-शक्तीच्या इथं गेले तिथं त्यांना फोन आला ए, काका याच्यात पडू नको मी तुला सोडणार नाही.  पण तो डगमगला नाही त्यांना एखादी गोष्ट पटली की, ते त्याच्या मागं उभं रहायचे. असा तो मित्र होता. परंतु आज त्यांच्या घरच्यांच्या मागं उभं रहाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. तुषारनी सांगितलं की, काकाचं नांव कुठं तरी चांगल्या ठिकाणी  दिलं पाहिजे.  नांव दिलंच पाहिजे कारण तो विद्यमान नगरसेवक होता. काकांच्या घरच्यांना आपण सर्वांनी धीर देणे गरजेचे आहे. एकाच घरातील ५/६ लोक कोरोनानी गेलेली आहेत. आपण डॉक्टर लोकांना जर का व्यवस्थित सुविधा दिल्या नाहीत आणि या डॉक्टर लोकांनी हात वर केले तर आपण काय करणार? अंम्बुलन्सचे ड्रायव्हर आंदोलन करणार होते त्यांना मी सांगितलं की, ही आंदोलन करण्याची वेळ नाही आता आपल्या सर्वांना मिळून शहर सांभाळायचं आहे आयुक्त साहेब,तुम्ही चांगल्या प्रकारे काम करीत आहात पण काही कामे अशी होत असतील तर डॉक्टर लोक उपाशी असतील आणि यांची रोगप्रतिकार शक्ती कमी झाली तर हे काम कसे करतील. काही,काही डॉक्टर खरच काहीच काम करीत नाहीत आणि काही जण रात्री ११.०० पर्यंत सुध्दा काम करीत असतात. आयुक्त साहेब, वायसीएमएच मधील ज्यांना काही कोरोनाची लक्षण दिसत नाहीत असे पेशंटना तुम्ही भोसरी हॉस्पिटल किंवा इतर ठिकाणी हलविण्यात यावे. आणि त्याठिकाणी फक्त सिरियस पेशंट ठेवले पाहिजेत. हे तुम्हांला सांगण्याची सुध्दा गरज पडू नये. आयुक्त साहेब, तुम्ही त्या डॉक्टरांशी चर्चा करा करुन त्यांच्याशी बोला म्हणजे तुम्हांलाही समजेल. ज्या पेशंटची अवस्था आयसीयू मध्ये ठेवायची आहे त्याला तुम्ही बालेवाडीला ठेवले आहे.  म्हणजे आयसीयुमध्ये शिफ्ट करायची गरज आहे त्याला बालेवाडीला ठेवुन तिथं औषध गोळया देणार मला असं म्हणायचं नाही की, आपली माणसं तिथं काम

करीत असताना साहेब, तुम्ही कुठं तरी माणसं हेरायला चुकताय अस मला वाटतयं चांगल्या माणसांच्या हातात हे गेलं तर ते निश्चित चांगले रिझल्ट देतील. आयुक्त साहेब, मास्कच्या अहवालात तुमची माणसं दोषी आहेत त्यातील काही लोकांना चौकशी समितीला अजुन डाक्युमेंट दिलेले नाहीत. मागणी केलेले डाक्युमेंट अजुन सुध्दा पुरविलेले नाहीत. तरी सुध्दा आम्ही तुम्हांला काही म्हणत नाही. म्हणजे माणुस जेंव्हा परिक्षेला जातो तेंव्हा तो देवाच्या १० वेळा पाया पडतो आणि जातो अशी भिती या शहरामध्ये निर्माण झालेली आहे. नागरीकांच्या मनातील ही भिती काढायची असेल तर या आयसोलेशन सेंटरच्या माध्यमातून कस काढायचं हे तुम्ही ठरवा. मी तुम्हांला दिनानाथ हॉस्पिटलचा अनुभव सांगितला आहे. त्याप्रमाणे आपल्या हॉस्पिटलच्या लोकांना तयार करावं लागेल. आज आपल्याकडे पेशंट हे सिरीयस झाल्यानंतर येतात त्याला आपण कसं वाचवणार आज आपले लोक ऑक्सीजन ८०,९० आल्यानंतर तुमचा ऑक्सीजन सुध्दा काम करीत नाही. ९५ च्या खाली आल्यानंतर माणुस घाबरतो. आमचे मित्र वाघमारे यांच्या आई वायसीएम मध्ये गेली त्यांना व्हेंटीलेटरची आवश्यकता होती वाकडला एका हॉस्पिटलमध्ये फोन केला कुठेही ऑक्सीजन मिळालं नाही. कुठेही व्हेंटीलेटर शिल्लक नाही. वायसीएमएच ला योगायोगान एक पेशंट बाहेर आला आणि तो व्हेंटीलेटर त्यांना दिला त्यानंतर त्या नीट होऊन घरी गेल्या त्यानंतर एक ड्रायव्हर पण नीट होऊन गेला. म्हणजे मला साहेब, तुम्हांला हे सांगायचे आहे की, ज्यांना वायसीएमएच मध्ये ठेवण्याची आवश्यकता आहे त्यांना इथं ठेवा आणि ज्यांना याठिकाणी आवश्यकता नाही त्यांना इतर ठिकाणच्या हॉस्पिटलमध्ये ठेवा. आयुक्त साहेब, तुम्ही तुमच्या खालच्या स्टाफकडनं माहिती घ्या. तुम्ही आतापर्यंत चांगल्या प्रकारे कामकाज केल्यामुळे तुमचे आणि तुमच्या टिमचे कौतुक केलेलं आहे. आता आपण हायलेवलला आलो आहे आता ३ दिवस लॉकडाऊन करुन सुध्दा दररोज ७०० ते ८०० केसेस दररोज आहेत. नागरिकांनी सुध्दा आपण आपली काळजी घेतली पाहिजे म्हणजे आयुक्त साहेब, तुमची जबाबदारी कमी होईल. आणि सिरिएस पेशंटवर चांगल काम करता येईल. परत एकदा आपल्याला विनंती करतो की, व्हेंटीलेटरवर तुम्ही लक्ष द्या परत एकदा दत्ता साने सारखे होणार नाही. याची काळजी घ्यावी.जावेदभाई पण बाधीत आहेत त्यांच्यावर लक्ष द्यावे. आणि मी आणि माझ्या पक्षाच्या वतीने आणि शहराच्या वतीने दत्ता काका यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो धन्यवाद.

**मा.नाना काटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर आजची जी मिटींग आहे ती काकांना श्रध्दांजली वाहणेसाठी आहे. विश्वासच बसत नाही कारण ज्यादिवशी ही घटना घडली त्यावेळेस मला शरद बो-हाडेनी फोन केला की, काका गेले. अक्षरश: पायाखालची वाळु सरकल्यासारखं झालं मी लगेच आयुक्तांना देखील फोन केला आणि घटनेची माहिती घेतली साहेबांनी सांगितले की, हे खरं आहे आणि आपण पण खुप प्रयत्न केले. परंतु काकांना न्युमोनिया इतक्या मोठया प्रमाणात होता की, ते आपल्या हाती येऊ शकले नाहीत. कोरोना विषाणु सर्व जगभर थैमान घालत आहे मागील काही महिन्यापुर्वी हा दूरवर असलेला आजार आपल्या घरापर्यंत पोहचला,सभागृहापर्यंत पर्यंत पोहचला आणि त्यामध्ये आपला सहकारी या विषाणुंच्या विळख्यात सापडला आणि दत्ता काका यांना आपल्यातून हिरावून घेतलं. राष्ट्रवादी कॉंग्रेसची फार मोठी हानी झालेली आहे त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील एक धडाडीचा कार्यकर्ता काका आपल्यातून निघुन गेला.विश्वासच बसतं नाही, काका आता बाहेर गेलेले आहेत आणि ते परत येतील त्यांच्या हातात असलेलं ते दप्तर आणि हसुन खेळुन रहात असलेला एक धडाडीचा कार्यकर्ता आपल्यातून निघुन गेला ही पोकळी भरुन निघणारी नाही. परंतु काका गेल्याने संपुर्ण पिंपरी चिंचवड शहर हादरलेलं आहे. आम्ही सर्व सदस्य आज पिंपरी चिंचवड शहरात काम करीत असताना आज देखील भिती वाटते कारण काकांनी या २/३ महिन्यामध्ये ज्या पध्दतीने लॉकडाऊन चालू झाला त्यामध्ये अनेक लोकांना त्यांनी मदत केली आणि ती मदत करीत असतांनाच कोरोनाच्या विळख्यात काका सापडले. आणि ते आम्हांला सोडून गेले. काकाचा स्वभाव हा आपणा सर्वांना माहिती आहे. आता अनेक नगरसदस्यांनी सूचविले आहे की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये जी काही वास्तु असेल त्या वास्तुला काकाचं नाव देणं गरजेचं आहे आणि नक्कीच दिलं पाहिजे. कारण आताचे विद्यमान नगरसेवक आणि माजी विरोधी पक्षनेते काकाची उणिव ही कायम राहणार आहे. एखादया संस्थेला किंवा वास्तुला जरी नांव दिलं तरी काका पुन्हा येणार नाहीत काकाच्या घरावर जो दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे त्यांच सांत्वन करण्यासाठी आदरणीय लोकनेते पवार साहेब देखील त्यांच्या घरी आले होते. दादांचा मेसेज होता, जयंतराव पाटील साहेब येऊन गेले सर्वांनी त्यांच सांत्वन केलं परंतु सांत्वन करुन काकांची जागा कोणी घेवु शकत नाही अशा या निर्भयाला मी माझ्या कुटूंबाच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पार्टीच्या वतीने आणि या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण

करतो. आता मगाशी सिमाताई सावळेंनी सांगितलं की, या कोरोनाच्या महामारीत काम करीत असताना आता डॉक्टरांची भरती करणं गरजेचं आहे तसेच राहुल कलाटेंनी देखील सांगितलं आहे की, आम्ही जरी विरोधक असलो तरी आमची कसलीही तक्रार असणार नाही कारण पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना आपल्याकडनं सहकार्य होणं गरजेचं आहे. या महामारीसाठी जी काही डॉक्टरांची आवश्यकता असेल जी काही आवश्यक गोष्टी करणे गरजेचं आहे त्यासाठी आमचा कोणाचाही विरोध नाही. या शहरातील प्रत्येक नागरीक कोरोनामुक्त झाला पाहिजे. नाही तर एक वेळ अशी येईल की, आपण पॉझीटीव्ह शोधता,शोधता असं कराव लागल की,  जेवढे निगेटीव्ह आहेत त्यांना क्वारंटाईन करावं लागेल आणि पॉझीटीव्ह ओपन करावं लागेल. अशी वेळ येता कामा नये. आमची सर्वांची आपणाला कळकळीची विनंती आहे की, जे काही करायचं आहे ते या शहरासाठी करावं मी पुन्हा एकदा दत्ता काका यांना या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो जयहिंद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  गेल्या अडीच तासापासून आपले सर्व सन्मा.सदस्य आपल्या सहकार्याबद्दल बोलत होते. आणि कोरोनाच्या या महामारीमुळे संपुर्ण जगामध्ये, देशामध्ये आणि या महाराष्ट्रामध्ये जी काही परिस्थिती आहे त्यामध्ये दत्ता काका यांच्या बद्दल सर्व सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्या बरोबर आपण बघीतलं तर  माजी नगरसेवक लक्ष्मण गायकवाड, माजी नगरसेवक सुलोचनाताई बढे, संजय साळवी तसेच भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांचे वडील असतील तसेच एनजीओ मध्ये काम करणा-या अनेक संस्थाचे पदाधिकारी यामध्ये असतील अशा या सर्वांना मी या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि हे खरं आहे ज्यावेळेला लढाई चालू होते आणि सैनिक सज्ज असतात याप्रमाणे कोरोनाची लढाई आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये चालू झाली आणि जनतेच्या डोळयामध्ये अश्रु,आमचं काय होणार, आम्हांला लागण झाल्यानंतर जेवायला मिळणार का, आम्हांला घराबाहेर पडता येईल का, अनेक समस्या प्रत्येकांनी आमच्याकडे मांडल्या आणि लॉकडाऊनच्या काळामध्ये दत्ता काका यांच्या माध्यमातून आपल्या प्रत्येक सदस्यांनी सांगितलं की, ज्या ज्या वेळेला लोकांचे अश्रु पुसण्याचं काम दत्ता काका यांच्या माध्यमातून  झालं आणि म्हणुन आपल्या स्वत:च्या जीवाची पर्वा न करता,

आपल्या कुटूंबाची पर्वा न करता या दिनदुबळया गरीब लोकांसाठी काम करायचे म्हणुन दत्ता काका साने यांनी त्या लोकांचे अश्रु पुसण्याचं काम त्या लॉकडाऊनच्या काळात केलं. आणि साहजिक आहे, कोरोनाची महामारी वाढत असताना लोकांचे अश्रु पुसण्याचं काम दत्ता काका साने यांच्या माध्यमातून केलं गेलं आणि म्हणुन त्यांना त्यांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावं लागलं आणि त्यांचा बिर्ला हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाला. त्यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांच्या चिखली,तळवडे भागामध्ये गेलो आणि प्रत्येक गावाच्या वेशीवरती दत्ता काकाचे फोटो लावलेले होते. काही लोकांनी सांगितलं आमचा आधार हरपला, काही लोकांनी सांगितलं की, आमचा वाघ गेला, काही लोकांनी सांगितलं आमचा मार्गदर्शक निघुन गेला. अशा अनेक उपमा देवुन दत्ता काका यांच सांत्वन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. माझा त्याठिकाणी विश्वासच बसेना मला वाटलं दत्ता काका यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा आहेत की, काय परंतु ज्यावेळेस खाली वाचलो त्यावेळेस दत्ता काका यांचा हसरा चेहरा बघत होतो आणि त्या दत्ता काका यांनी या सभागृहामध्ये आपल्या नागरीकांची भूमिका मांडत होता ती भूमिका देखील याठिकाणी निरखुन बघीतलेली आहे. वेळप्रसंगी आपल्या पक्षाची भूमिका काहीही असली तरी त्यांनी आपल्या नागरीकांची काय भूमिका आहे ती याठिकाणी मांडलेली आहे. आणि हा कार्यकर्ता आज आमच्यातून हरवलेला आहे. आणि म्हणुन मगाशी आमच्या अनेक सहकार्यांनी आपल्या भूमिका व्यक्त केल्या आमचा मित्र या सभागृहामध्ये जरी कट्टू बोलत असेल, पक्षाची भूमिका मांडत असेल पण सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर खांद्यावरती हात ठेवुन निघणारा हाच दत्ता काका आज आमच्यातून निघुन गेला आहे. अशा अनेक गोष्टी आम्ही त्यांच्यामध्ये पाहिलेल्या आहेत. सरकारच्या काही गोष्टी नागरीकांच्या विरोधात असल्या तरी त्यांनी नागरीकांच्या काय भूमिका आहेत त्या त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनधिकृत बांधकामाचा विषय असेल, शास्ती कराचा विषय असेल असे अनेक विषय त्यांनी मांडलेले आहेत. तसेच त्यांनी सरकार कोणाचे आहे हे न पहाता त्यांनी आपल्या जनतेचे काय म्हणणे आहे हे त्यांनी निर्भीडपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. खरं म्हणजे चिखली,तळवडे ग्रामस्थांचा आधार याठिकाणी निघुन गेलेला आहे. खरं म्हणजे दत्ता काका यांच्या जवळ जाण्याचा कधी संबंध आला नाही परंतु दत्ता काका यांच्या बरोबर ज्या,ज्यावेळेस आम्ही बाहेर चर्चा करण्यास बसलो त्या त्यावेळेस त्यांचे विचार ऐकण्यास बसलो त्यावेळेस त्यांच्या विचारांची

उंची खुप मोठी आहे. आणि अशा या खुप उंचीच्या विचाराचा सहकारी आमच्यातून निघुन गेल्यानंतर साहजिकच या शहराचं, ज्येष्ठांच, नातेवाईकांच,त्या गावक-यांच आणि आमच्या सारख्या कार्यकर्त्यांच याठिकाणी फार मोठं नुकसान झालेलं आहे. खरं म्हणजे दत्ता काका यांच्या आठवणी या शहरामध्ये कायम तेवत रहाव्या यासाठी आमच्या सहकार्यांनी याठिकाणी भूमिका मांडली. प्रत्येक व्यक्तीची आठवण त्याच्या कार्याची उंची ही त्याच्या नावाच्यामध्ये असते आणि त्या भूमिकेमधुन त्यांच्या या शहरातील कुठल्या तरी प्रोजेक्टला नांव द्यावं असा प्रोजेक्ट असावा की, तो कायम दत्ता काका पुन्हा सर्वांच्या लक्षात राहीलं पाहिजे की, दत्ता काकांच्या विचारावरती आपण काम केलं पाहिजे. अशा माध्यमातून आम्ही सुध्दा भूमिका मांडतो. आम्ही सर्वजण बसुन शहरातील अशा कुठल्या प्रोजेक्टला नांव देता येईल आणि कायमस्वरुपी दत्ता काका यांच्या आठवणी आमच्या मध्ये राहतील. कोरोनाच्या माध्यमातून अनेक माजी नगरसेवकांच सुध्दा याठिकाणी निधन झालेलं आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्यावेळी प्रशासन रस्त्यावरती उतरतं प्रशासनाच्या बरोबरीनं जनतेचं सुखात जरी दुःख असलं तरी आपल्या घरचं दुःख बाजुला ठेवुन घराच्या परिवारातील दुःख असेल तरी ते बाजुला ठेवुन लोकांच दुःख माझ्या डोळयामध्ये बघण्याचं काम या नगरसदस्यांनी केलेलं आहे आणि म्हणुन खरंच ही मनाला चटका देणारी घटना आहे. दत्ता काका यांची बातमी आम्हांला ऐकायला आल्याच्या नंतर आमचा विश्वासच बसेना काकाचं निधन या अशा पध्दतीने होईल असं वाटलं नाही कारण काकांच्या बरोबर जेंव्हा आम्ही बोललो तेंव्हा त्यांनी हसुन सांगितलं की, मी बरा होऊन ४ दिवसात बाहेर येणार आहे. परंतु ४ दिवसानंतर बाहेर येणारा आमचा सहकारी त्यानंतर दुर्देवी बातमी आमच्याकडे अशी आली त्यावर आमचा विश्वासच बसेना दत्ता काका यांना भावपूर्ण श्रध्दांजली मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने,सभागृहाच्या वतीने, पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष मा.आमदार महेशदादा लांडगे, मा.लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या वतीने याठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि आयुक्त साहेब, मी आपल्याला २/३ गोष्टी सातत्याने सांगत आलो आहे की, आपल्याकडे जे आयसीयू आहे कारण लोकांची वणवण जी आहे आज बाहेरच्या खाजगी रुग्णालयाच्या माध्यमातून, किंवा वायसीएम रुग्णालयाच्या माध्यमातून असेल आज सर्वजण मिळून लवकरात लवकर हे आयसीयु कसे तातडीने उपलब्ध करुन देता येतील यासाठी प्रयत्न करु यामध्ये अनेक समस्या आहेत अनेक जण यामध्ये पॉझीटीव्ह झालेले आहेत आपली

प्रशासनाची आणि वायसीएमएच ची टीम ही खरोखरंच चांगल काम करीत आहे. हे ज्यावेळेला आम्ही बाहेर जातो त्यावेळेला रुग्णालयाचा काम करण्याचा जो अनुभव आहे तो जनसामान्यांच्या मनामध्ये घर तयार केलेला आहे. परंतु त्याच्याही पुढे जाऊन ऑक्सीजनचे बेड किंवा आयसीयुचे बेड आपल्याला तातडीने कसे करता येतील यासाठी आपण सर्वांनी मिळुन लक्ष देवु या. आणि मला असं वाटतय की,आपण या सर्व गोष्टी जर का केल्या तर ख-या अर्थानं जनसामान्यांच्या लोकांच्या मध्ये जाऊन ज्यांना  कोरोनाची लागण झालेली आहे आणि त्यांचा कोरोनाच्या माध्यमातून मृत्यू झाला त्यांच्या श्रध्दांजलीच्या कार्याला ख-या अर्थानं आपण या गोष्टी नागरीकाना देवु शकलो तर मला असं वाटतयं की, ख-या अर्थानं त्यांना श्रध्दांजली ठरेल. अजुन एक विनंती मी आपल्याला करणार आहे,ज्यावेळेला हे ट्रीपल सी सेंटर असतील किंवा बीसीईसी सेंटर असतील आपल्या अंम्बुलंन्सची व्यवस्था असेल आणि मगाशी आमचे सहकारी अभिषेक बारणे यांनी सांगितले की, ते खरं आहे की,खाजगी व्यक्तीला त्याला पटकन  मिळतं  परंतु त्याला २/३ दिवस संपर्क करण्यामध्ये फिल्ड मधली टिम कमी पडते आणि त्या माध्यमातून तो इकडे-तिकडे फोडाफोडी करुन मग त्याठिकाणी तो स्वत:  डिस्ट्रब होतो आणि  मग पॅनिक होऊन कुठं तरी थेट वायसीएम रुग्णालयात जातो किंवा खाजगी रुग्णालयात जातो अशा घटना खूप मोठया प्रमाणात होत आहेत. चाचण्या वाढलेल्या आहेत,रुग्ण वाढत आहेत, आपल्या सगळयांना माहिती आहे की,आपण एवढया मोठया प्रमाणात चाचण्या घेतो आहे त्यामुळे पॉझिटीव्ह रुग्ण सुध्दा मोठया प्रमाणात आहेत आम्ही सुध्दा नगरसदस्य ब-याच अंशी ज्यांना लक्षणं नसतील अशा रुग्णांना होम आयसोलेशन मध्ये रहाण्याचा सल्ला देतो आहे त्यांना सल्ला देण्याचं,धीर देण्याचं काम सुध्दा आम्ही करतोय परंतु लोकांच्या मनामध्ये अजुनही भिती आहे. मगाशी मी सांगितलं की, मी सुध्दा परवा वायसीएम हॉस्पिटलला गेलो होतो तर त्याठिकाणी बघीतलं तर त्याठिकाणी असलेली डेड बॉडी उचलण्यासाठी सुध्दा टिम आपल्याला उपलब्ध होत नाही. दुस-या बाजुला विदयुत दाहिनीलाच दहन करावं लागतयं परंतु आम्ही सुध्दा एनजीओला विनंती केलेली आहे. काल आम्ही एनजीओच्या बरोबर बैठका सुध्दा घेतलेल्या आहेत कारण डॉक्टरांच्या माध्यमातून किंवा आपल्या मार्फत अशा रुग्णांची विल्हेवाट लावताना सुध्दा अशा रुग्णांपासून  धोका नाही त्यांनी पीपीई किट घालून जर का असे युवक आपल्याकडे आले तर आणि त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी युवकांनी यावं अस आवाहन आम्ही

एनजीओ ला केलेलं आहे. एका अर्थानं त्या अंत्यविधीसाठी लागणारा जो काही वेळ आहे तो वाचावा आणि लोकांच्या रुग्णांची जी मयत झालेली असते त्याच्या बद्दल सहानुभुती निर्माण व्हावी आणि एनजीओच्या माध्यमातून आम्ही सर्वजण याठिकाणी प्रयत्न करतो आहे. एक चांगला मेसेज समाजाला देण्याच्या माध्यमातून आम्ही सुध्दा त्याच दिशेने प्रयत्नशिल आहोत आज आपण याठिकाणी जवळपास २.४५ तास याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केलेली आहे देशामध्ये,राज्यामध्ये आणि देशाच्या सिमेवरती आता चायनाच्या सैनिकाकडुन जे आमचे सैनिक मारले गेले त्यांना बाबु नायर यांनी श्रध्दांजलीचा जो प्रस्ताव दिलेला आहे या सर्वांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि आजची सभा मंगळवार दिनांक ४/८/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करावी अशी मी विनंती करतो.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माई माझी तुम्हांला विनंती आहे की, अशी मध्येच मिटींग घेण्यापेक्षा दि.२०/८/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी. आणि नामदेवराव यांनी म्हणले आहे की, डॉक्टरांचे जे विषय आहेत आयुक्तांना त्यांच्या अधिकारात करता येत असतील तर ते करावेत.नाही तर पुढच्या मिटींगमध्ये एकाच वेळेस विषय घ्या नां आणि वायसीएमच्या संदर्भातील विषय असतील तर आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात करावेत. कोरोनाच्या संदर्भातील जे विषय असतील ते आपण मंजुर करावेत.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, ठिक आहे. दि.२०/८/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी. तसेच आपण मा.आयुक्त यांना कोरोनाच्या संदर्भातील जे काही विषय असतील ते मंजुर करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

**मा.तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, तहकुबी सूचनेला माझे अनुमोदन आहे. आणि मा.आयुक्तांना सांगु इच्छितो की, आता ज्याप्रमाणे डॉक्टरांचा विषय आणलेला आहे त्याचप्रमाणे घंटागाडी कर्मचा-यांचा प्रश्न सुध्दा सोडवण्यात यावा अशी विनंती करतो.

**मा.महापौर** – खरंतर काका सारखी व्यक्ती ही आज आपल्यातून निघुन गेलेली आहे एक जागतीक विषाणु हा तो दिसतही नाही आणि कळतही नाही त्याला वास नाही,त्याला रंग नाही त्याला जाडी नाही,त्याला रुंदी नाही श्वसनातून हा विषाणू जातो आणि तो पूर्ण हृदयात जाऊन भिडत असतो. आणि काकांना सर्वांना

श्रध्दांजली वाहिलेली आहे. काकांचा स्वभाव म्हणलं तर मला आल्यापासून अगदी वेगळ वाटतयं की, तेथून काका मला काही तरी म्हणतील अशा प्रकारचा भास मला होत होता. काकाच्या जाण्याने संपुर्ण शहराची पोकळी निर्माण झालेली आहे. परत काका सारखा काका होणे नाही. मी या सभागृहाच्या आणि शहराच्या वतीने काका साने यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि त्यांना परमेश्वराने त्यांना त्यांच्या पायाची सेवा करण्याची संधी द्यावी आजपर्यंत त्यांना जनतेची सेवा करण्याची संधी दिली आता परमेश्वराने त्यांची सेवा करण्याची संधी देवो आमच्या काकांनी खूप काही सोसलं आहे. कोरोनाच्या विषाणुपासून त्यांना जगता आलं नाही. त्याचप्रमाणे नगरसेवकांना पण एक कोटीचा विमा देणेत यावा अशी सूचना आलेली आहे. तर मी आयुक्तांना विनंती करते की, या सूचनेवर आपण अभ्यास करावा. काकाचं एक वेगळ नेतृत्व होतं. त्याचप्रमाणे जावेदची देखील तब्बेत बरी नाही त्यांना ज्या पध्दतीच्या उपचाराची गरज आहे ज्या डॉक्टरांना कोरोनाच्या उपचारामध्ये जो अनुभव आलेला आहे त्या डॉक्टरांना जावेदला पूर्णपणे सहकार्य करण्यास सांगावे. जेणेकरुन जावेद हा लवकरात लवकर बरा होऊन तो येत्या २०/८/२० रोजीच्या सभेमध्ये उपस्थित राहील. बिर्ला हॉस्पिटलची भयंकर तक्रार आहे. बिर्ला हॉस्पिटल हे मोठं दिसतंय पण त्याची लक्षण खोटी आहेत  त्या बिर्लावर त्वरीत ॲक्शन घेण्यात यावी. त्याठिकाणी कोरोनाचे पेशंट घेण्याचे थांबले गेले पाहिजे. बंद पडले तरी चालेल. यासाठी प्रयत्न करावेत. काकांना श्रध्दांजली वाहत असताना ज्याठिकाणी आमचे काका तिथे गेले तिथे अन्य लोकांना तिथे  तिलांजली मिळू नये म्हणुन बिर्लावर त्वरीत ॲक्शन घेणेत यावी असे आदेश मी आयुक्तांना देते आणि आजची सभा गुरुवार दि.२०/८/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

-------

( उषा उर्फ माई मनोहर ढोरे )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

### मा.महापालिका सभा
### कार्यपत्रिका क्रमांक – ४६
### सभावृत्तांत
### (दि.२०/७/२०२० ची तहकूब सभा)

दिनांक – २०.०८.२०२० वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.७.२०२० ची तहकूब मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक २०.०८.२०२० रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ८) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| ११) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १२) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |

१३)  मा.गायकवाड निर्मला मनोज

१४)  मा.गोफणे अनुराधा  देविदास

१५)  मा.बारसे प्रियांका प्रविण

१६)  मा.अजित दामोदर गव्हाणे

१७)  मा.लांडगे सारिका संतोष

१८)  मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१९)  मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२०)  मा.फुगे भिमाबाई पोपट

२१)  मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२२)  मा.सावळे सिमा रविंद्र

२३)  मा.लोंढे नम्रता योगेश

२४)  मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२५)  मा.गीता सुशिल मंचरकर

२६)  मा.राहुल हनुमंतराव भोसले

२७)  मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२८)  मा.अनुराधा गणपत गोरखे

२९)  मा.केशव हनुमंत घोळवे

३०)  मा.मंगला अशोक कदम

३१)  मा.अश्विनी भिमा बोबडे

३२)  मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३)  मा.संजय बबन नेवाळे

३४)  मा.एकनाथ रावसाहेब पवार

३५)  मा.भालेकर प्रविण महादेव

३६)  मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३७)  मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३८)  मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४०) मा.चिखले सचिन तुकाराम

४१) मा.राजू मिसाळ

४२) मा.बाबर शर्मिला राजू

४३) मा.अमित राजेंद्र गावडे

४४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४८) मा.ढाके नामदेव जनार्दन

४९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५०) मा.करुणा शेखर चिंचवडे

५१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५२) मा.अपर्णा निलेश डोके

५३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५६) मा.जयश्री वसंत गावडे

५७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.शाम गणपतराव लांडे

६०) मा.सुजाता सुनिल पालांडे

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६५) मा.काळे उषा दिलीप

६६) मा.कोकणे संतोष अंकुश

६७) मा.पवार मनिषा प्रमोद

६८) मा.बारणे अर्चना तानाजी

६९) मा.अभिषेक गोविंद बारणे

७०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७१) मा.अॅड.भोसले सचिन सुरेश

७२) मा.बारणे माया संतोष

७३) मा.निलेश हिरामण बारणे

७४) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७५) मा.दर्शले रेखा राजेश

७६) मा.कलाटे राहुल तानाजी

७७) मा.कामठे तुषार गजानन

७८) मा.चोंधे आरती सुरेश

७९) मा.कस्पटे संदिप अरुण

८०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८२) मा.कुटे निर्मला संजय

८३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.आंगोळकर सागर सुनिल

८६) मा.कदम शशिकांत गणपत

८७) मा.लोखंडे चंदा राजू

८८) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८९) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९१) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९३) मा.नवनाथ दत्तू जगताप

९४) मा.संतोष बबन कांबळे

९५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९६) मा.संजय मल्हारराव वाबळे

९७) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१००) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा.संतोष पाटील- मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.प्रविण तुपे -अतिरिक्त आयुक्त (२) तथा सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.चारठणकर-उपआयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

----

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन जवान शहीद, कोरोनामुळे सर्व ज्ञात/अज्ञात रुग्ण जे मृत झाले आहेत त्या सर्वांना तसेच जावेद शेख- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान नगरसेवक यांचे निधन, रंगनाथ फुगे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर यांचे निधन, लालजी टंडन– मध्यप्रदेश राज्याचे राज्यपाल यांचे निधन, शिवाजीराव पाटील निलंगेकर- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन, शारदाताई टोपे – महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री ना.राजेश टोपे यांच्या मातोश्री यांचे निधन, अमरसिंह–समाजवादी पक्षाचे नेते व उत्तर

प्रदेशमधील माजी राज्यसभा सदस्य यांचे निधन, अनघा जोशी – शिवसेनेचे जेष्ठ नेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या पत्नी यांचे निधन, अनिल राठोड – माजी राज्यमंत्री महाराष्ट्र तथा शिवसेना उपनेते यांचे निधन, अमित बाबासाहेब धुमाळ – शिवसेना पिंपरी शहर संघटक यांचे निधन, मुरलीधर शिंगोटे – दैनिक पुण्यनगरीचे संस्थापक–संपादक यांचे निधन, विकास पाटील - पिंपरी चिंचवड शहरातील पर्यावरण तज्ञ व पर्यावरण संवर्धन समितीचे संस्थापक यांचे निधन, सिध्दार्थ जगताप–पिंपरी चिंचवड महापालिकेतील उपलेखापाल यांचे निधन, साईनाथ लाखे – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कार्यालयीन अधिक्षक यांचे निधन, एकनाथ थोरात – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक यांचे निधन, कुमकुम – ज्येष्ठ अभिनेत्री यांचे निधन, निशिकांत कामत – दिग्दर्शक यांचे निधन, दिपक साठे – एअर इंडीया एक्सप्रेसच्या विमान दुर्घटनेत यांचे निधन, राहत इंदौरी –प्रसिध्द शायर, गीतकार यांचे निधन, चेतन चौहान – जेष्ठ कसोटी क्रिकेटपटू यांचे निधन, पंडित जसराज – जेष्ठ गायक संगीत मार्तंड यांचे निधन, बाळासाहेब किसन जगताप, सुलाबाई आनंदा कदम, प्रतिभा विनायक पवार, हेमंत बापुराव ननवरे – भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते, चंद्रकांत गावडे- भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते, संदिप चव्हाण-तळवडे, हभप लालाशेठ गव्हाणे, वनमाळे, सिखंडे, अलेक्स, मोनिका, चौरे, टोपे, स्वामी, लक्ष्मण खजुरकर, लोंढे, देशपांडे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी. अशी सूचना मी मांडतो.

**मा.आंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर -** जे सन्मा.सदस्य ऑनलाईन उपस्थित आहेत त्यांना कोणाला बोलायचे आहे का.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर आताची एकंदरीत परिस्थिती बघीतलीतर अत्यंत भीषण परिस्थिती आहे. या सभागृहात सर्व सन्मा.सदस्य आहेत आपण हे सभागृह साडेतीन वर्षे चालवतो. श्रध्दांजलीची सगळयात जास्त यादी असलेली ही पहीली सभा असेल असं मला वाटत. मागच्या महीन्यामध्ये दुर्दैवानी ही सभा या सभागृहाचे सन्मा.नेते आपल्या सगळयांचे लाडके दत्ता काकाना श्रध्दांजली वाहून आपण तहकूब केली. दुस-या महीन्यामध्ये सुध्दा

आपल्या सभागृहामध्ये आपल्याच बरोबर तीन ते साडेतीन वर्षे आपल्याबरोबर एकत्रीत काम करणारा एक चांगला लढवय्या नगरसेवक जावेद शेख आपल्या सगळयांना सोडून जातो. खरतर ही भीषण परिस्थिती कोरोनाच्या माध्यमातून आपल्या सगळयावर आली आहे. आपण खरतर श्रध्दांजली वाहतो त्याच्या बद्दलच्या चांगल्या वाईट गुणांचा ऊहापोह करत असतो. पण या सभागृहातले दत्ताकाका गेल्याच्यानंतर दुस-याच महीन्यामध्ये आपल्या एका मित्राला श्रध्दांजली वाहण्याची वाईट वेळ आपल्या सगळयांवर याठिकाणी आलेली आहे. जावेदच्या बाबतीत सांगायच झालतर तसा माझा वीस ते पंचवीस वर्षापासूनचा मित्र होता. कर्मधर्म सुयोगान आमच्या दोघांच्या पक्षाचे विचार वेगवेगळे असतील परंतु मैत्रिच्यासाठी जागणारा एक चांगला कार्यकर्ता खरतर जावेद शेखच्या माध्यमातून आज आपल्या सगळया मधुन निघून गेला. म्हणजे सभागृहामध्ये एखादा विषय पटला नाहीतर आक्रमकपणे त्याला विरोध करण असेल आणि एखादा विषय पटल्यानंतर सुध्दा आपल्या पक्षाचे नगरसेवक त्याला विरोध करत असताना आपल मत त्याला ठामपणे मांडणारा एक चांगला नगरसेवक आपल्यामधुन निघून गेला आहे. मी सभागृहाला विनंती करतो की यादी आजची बघीतली, माझ्या प्रभागामध्ये काम करणारा एकनाथ थोरातासारखा माजी नगरसेवक असेल त्याचा भाऊ असेल, या सभागृहाच्या माध्यमातून आज जी जी यादी वाचली गेली ती यादी काही ॲक्सिडेंटनी गेलेली नाही, ती यादी काही एखादया दुर्धर रोगान तो मृत्यू पडला अशातली परिस्थिती नाही. परंतु जगावरच्या संकटाबरोबर खरतर आजची जी परिस्थिती आहे ती आपल्याही शहरामध्ये आहे. आपल्या राज्यामधले, देशामधले अनेक मातब्बर माणस कोरोनासारख्या विषाणूच्या संकटान खरतर मृत्युमुखी पडतात ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. मा.महापौर साहेब, सभागृहाच्या माध्यमातून मी आपल्याला विनंती करेल की या माध्यमातून आपण खरतर प्रामाणिकपणाने काम करतो. मी आज सकाळी मा.आयुक्त साहेबांशी ज्यावेळेस बोललो आणि त्यांची सहज चौकशी केली आणि त्यांचा स्विय सहाय्यक एक ज्यावेळेस पॉझिटीव्ह येतो तेव्हा साहेबांना विचारल की तुमची परिस्थिती काय आहे तर ते म्हणाले मी अजूनही निगेटीव्ह आहे मी टेस्ट केली, कारण की ती परिस्थिती आहे. म्हणजे मा.आयुक्त असतील, मा.महापौर असतील, सभापती स्थायी समितीचे असतील, सर्व सन्मा. गटनेते असतील हे सगळे कोरोनाचा प्रादुर्भावा विषयी जास्तीत जास्त जागृत होवून कमीत कमी लोकांना प्रदुर्भाव व्हावा यासाठी प्रामाणिकपणाने खरतर प्रयत्न

करतात. अजूनही हे संकट टळल गेलेल नाही. पुढचा दोन तीन महीन्याचा काळ आपल्या साठी खरतर करो या मरो अशा पध्दतीचा काळ असणार आहे लक्षात ठेवा. जावेदसारखी पुनरावृत्ती पुढच्या जीबीला होवू नये. दत्ता काकासारखा सहकारी आपल्या सभागृहामधुन सोडून जावू नये. ही जर परिस्थिती आपल्या सगळयांना निर्माण करायची असेलतर लोकांमध्ये जनजागृती करणं असेल, लोकाच्यामध्ये जावुन जे जे लोक पॉझिटीव्ह झालेले आहेत त्यांना मॉरल सपोर्ट देणं असेल. कधी कधी माझी तुम्हांला सगळयांना सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की आपले सहकारी असतील, आपले मित्र असतील, आपले जोडीदार असतील की जे पॉझिटीव्ह आलेले आहेत त्यांना पहील मॉरल सपोर्ट देण्याच काम करा. पॉझिटीव्ह आलं म्हणल की तीथच पेशंट अर्धा खचला जातो. खचलेल्या परिस्थितीतून जर मार्ग काढायचा असेलतर त्याला मॉरल सपोर्ट आपण देवून त्या माणसाला खरतर पुढच्या काळामध्ये जगण्याची आशा निर्माण करण्यासाठी आपण सगळयांनी काम करण्याची गरज आहे. हे संकट खरतर आपल्या शहरापुरत संकट नाही, हे राज्यावरच संकट नाही, हे देशावरच संकट नाहीतर हे जगावरच संकट आहे या संकटावर मात करण्यासाठी आपण सगळयानी या पुढच्या काळामध्ये आहोरात्र काम करण्याची गरज आहे. दुर्दैवान जावेद शेख असतील, दत्ता काका असतील, एकनाथ थोरात असतील किंवा या राज्याचे माजी मुख्यमंत्री निलंगेकर साहेबांच निधन सुध्दा कोरोनाच्या मुळ झालं. एक चांगला क्रिकेटपट्टू चेतन चव्हाण सारखा एक चांगला खेळाडू खरतर कोरोनाच्या माध्यमातून गेला. माझी तुम्हांला विनंती आहे की या पुढच्या काळामध्ये या लढाईमध्ये अशा पध्दतीची श्रध्दांजलीची वेळ आपल्या सगळयावर खुप कमी यावी अशाच पध्दतीची आशा व्यक्त करतो आणि ज्या ज्या सन्मानीयांच निधन झालेल आहे त्या सगळयांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपण दोन महीन्यापुर्वीच दत्ताकाकाना श्रध्दांजली वाहण्यासाठी सभा तहकूब केली आणि आज परत आपल्या या सभागृहातील विदयमान सदस्य जावेदजी शेख यांच देखील कोरोनामुळ निधन झालं. खरतर सभागृहातील एक विदयमान नगरसदस्य

कोरोनाच्या या महामारीत देखील समाजात विवीध प्रकारचे काम करत असताना त्याला लागण झाली आणि आम्ही सर्वजण त्याच्यासाठी हॉस्पिटलला गेलो आयुक्त साहेबांनी देखील रुबीला प्रयत्न केले. परंतु ईश्वर शक्तीपुढे ईलाज नाही. जावेदजींच निधन झाल. तसेच रंगनाथ दादा, या शहरातील नागरीकांना रंगनाथ दादा कसे ॲक्टिव्ह होते हे माहीत आहे, म्हणजे ते महापौर होते, नगरसेवक होते परंतु ते शहरातील प्रत्येक नागरीकांच्या सुखदु:खत ते उभे रहायचे. त्यांचा मुलगा राजूचा ॲक्सिडेंट झाल्यानंतर थोडया दिवस ते वर्ष दोन वर्षे आलीप्त राहीले. नंतर परत त्याच जोमाने ते समाजामध्ये फिरत होते. त्यांचा देखील या कोरोना महामारीमध्ये दुर्दैवी अंत झाला. निलंगेकर साहेब असतील, चेतन चव्हाण असतील कालची यादी शहरातील पाहीली असेलतर काल ४१ नागरीक शहरामधले मृत पावलेले आहेत. या सर्वांना मी माझ्या पक्षातर्फे, वैयक्तिक माझ्या तर्फे, सभागृहातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज याठिकाणी आपल्या सभागृहातील एक कृर्तत्व व्यक्तीमत्व दत्ताभाऊ साने यांच्या निधनानंतर एक महीना ना कुठ होतोतर दुसर एक धडाडीच व्यक्तीमत्व म्हणजे जावेदभाई शेख यांचही या कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती निधन झालं. जावेदभाईच्या बाबतीत बोलायच म्हणलतर मनमिळावू स्वभाव असणार हे व्यक्तीमत्व आज आपल्या या सभागृहातून काळाच्या पडदयाआड गेलेलं आहे. भाईनी पक्षाचा कुठलाही भेदभाव न राखता सर्वांशी हितगूज करुन आपले सर्व विचार याठिकाणी त्यांनी व्यक्त करायचे. त्याचप्रमाणे आपल्या शहराचे माजी महापौर रंगनाथ दादा फुगे यांनाही देवज्ञा झाली. त्यांच्याही जाण्यामुळे या शहराला निश्चित जी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही न भरुन निघणारी आहे. असंख्य लोक या कोरोनाच्या प्रादुर्भावामध्ये बळी पडलेले आहेत. अशा असंख्य लोकांना मी माझ्या वतीने, आपल्या सभागृहाच्या वतीने, पक्षाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. विश्वासच बसणार नाही अशा दुर्घटना आपल्या शहरामध्ये घडत आहेत. पहीले दत्ता काका नंतर जावेदभाई, काल माजी महापौर असे एक-एक, एक-एक हिरे त्या मुकूटातून गळून पडतात. वाटल नव्हतं की कोरोनाला किती सिरीएस घ्यायच की नाही घ्यायच या

मनस्थितीत आम्ही आहोत. कालचा एकंदरीत आकडा पाहीला ४१ लोक मृत पावले. आता भीती वाटायला लागली की ज्याला कोणाला भेटायला जातो तो माणूस पॉझिटीव्ह निघतो. भेटताना प्रत्येक एका माणसाच्या मागे तो दुसरा माणूस आपल्याला पॉझिटीव्ह दिसायला लागलेला आहे. जावेदभाई शेख आम्ही गेल्या तीन टर्म बरोबर काम केलेलं आहे. एक धडाडीचा कार्यकर्ता, शुन्यातून अस्तित्व निर्माण करणारा आणि कायम खर बोलणारा, फ्रिडम फायटर म्हणून स्वतःच्या अस्तित्वासाठी लढाई लढणारा असा चांगल्या मणाचा चांगला कार्यकर्ता आज आपल्या मध्ये नाही. त्याबद्दल मी माझ्या परिवाराच्या वतीने, भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांना या सभागृहात श्रध्दांजली अर्पण करते. मा.रंगनाथ दादा फुगे एक चांगल्या मणाचा उमदा माणुस भेटल्यानंतर कधीही गर्व न बाळगणारा. गेलं की डोक्यावरुन हात मारुन आशिर्वाद देणारा आमच्या वडीलांच्या ठिकाणी असणारे रंगनाथदादा फुगे यांना सुध्दा याठिकाणी मी श्रध्दांजली अर्पण करते थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. जावेदभाई शेख यांची माझी ओळख २००७ ची. जेव्हा हे बिनविरोध निवडून पहील्यांदा महापालिकेत आले, त्यांची बिनविरोध निवड झाली, उमेशभाऊ चांदगूडे आणि आम्ही सगळे आमच्या ऑफिसला बसून त्यांची ती बिनविरोध निवडणूक पार पडली होती तेव्हा पासून जावेदभाई आणि माझे संबंध. अतीशय मनमिळावू आणि जे बोलेल ते करणारा, तसाच वागणारा एक सच्चा मित्र आज अपण सर्वानी गमावला आहे. दुसरे आमचे आदरनीय रंगनाथ दादा फुगे आमचे ते नातेवाइक पण होत. प्रत्येक मयतीला किंवा लग्न कार्याला दादा असायचे. दादांचा आणि आमचा जुना दोन पिढयाचा संबंध. दादांच व्यक्तीमत्व पुर्ण पिंपरी चिंचवड शहराला माहीती आहे. असे आपण हिरे गमावलेले आहेत ताईनी सांगीतल्याप्रमाणे. मा.महापौर साहेब, मागच्या मिटींगला मी एक मागणी केली होती की दत्ता काका सानेंच बिर्ला हॉस्पिटलमध्ये देहान्त झाल त्याच डेथ ऑडीट करा. कारण की दत्ताकाका साने आणि माझ बोलण झाल होतं ते म्हणाले होते मला बीपी, डायबेटीज नॉर्मल आहे. तरी योग्य उपचार न केल्यान दत्ता काका सानेंच निधन झालं. तरी ही चौकशी करावी अशी माझी विनंती आहे सभागृहाला एवढ बोलून थांबतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर अतीशय दु:खद गोष्ट आहे की आपल्यात जावेदभाई नाहीत. मला वाटते २०१२ पासून जेव्हा मी सभागृहात कामकाज करते तेव्हापासून सहकारी म्हणून ते काम करतात त्यांची काम करण्याची पध्दत मला वाटत अतीशय स्ट्रेटफॉरवर्ड माणुस. ताबडतोब काम करणारा, ऑन द टेबल काम करणारा असा तो माणुस. त्यांच्या वॉर्डामध्ये मी राष्ट्रवादीची अध्यक्ष असताना काम करत होते त्यावेळेला मी त्यांची पर्सनॅलीटी पाहीली. ज्या पध्दतीन अजीतदादा काम करतात त्या पध्दतीन काम करणारा असा प्रॉम्प्ट माणूस. जेव्हा अशी माणस आपल्यातुन जातात, दत्ताकाका सारखा एक भाऊ असेल, जावेदभाई सारखा माणूस असेल आपण आक्षेप घेवू नये पण फक्त आपण जे औषधोपचार करतो, आपले डॉक्टर्स आहोरात्र काम करतात त्यांना यश का येत नाही असा एक मोठा प्रश्न आपल्या डोळया समोर किंवा डोक्यामध्ये यायला लागतो. आपण ऍन्टिजेन टेस्ट करतो त्यानंतर ऍन्टिजेन टेस्ट निगेटीव्ह आलीतर आर्टीफिशल टेस्ट आपण करतो. आताच तुषार हिंगे, डेप्युटी यांच्या बरोबर बोलणं होत असताना त्यांनी आता एक असा अनुभव सांगीतला की ऍन्टिजेन टेस्ट झाली आणि माणुस निगेटीव्ह आला आणि त्यांना सांगीतल आपण अर्टिफिशल करु त्यासाठी त्यांना घरी पाठवण्यात आलं. घरी पाठवण्यात आल की त्या माणसाची घरी गेल्या गेल्या डेथ झालेली आहे. मा.महापौरांना, आयुक्तांना माझी नम्रं विनंती आहे की डेप्युटीच आणि आमच तेच म्हणण आहे की जर सिम्टोमॅटीक पेशंट असेल तर आपण त्यांना ताबडतोब सांगतो की तुम्ही आता घरी जा काही सिम्टन जाणवले की तुम्ही या. हे कोरोनाचे सिम्टन काय आहेत हेच आपल्याला कळत नाही. परवा एक डॉक्टरांनी इन्सिडंट सांगीतला त्यांच असं म्हणण होत की जुळे बहीणी असतात किंवा जुळे भाऊ असतात तो कुठला जुळा भाऊ कुठला आहे हे आपल्याला दिसत नाही एवढ त्यांच्यामध्ये साम्य असतं. कोरोनाचा एकदा तुमच्या शरीरामध्ये प्रादुर्भाव झाल्यानंतर त्याचे सिम्टन जे आहेत ते आता कुठले सिम्टन्स राहीलेत तेच कळेना आपल्याला. इथे सिम्टन्स बदलत जातात. जावेदभाई बद्दलच ते सांगत होते जावेदभाईना त्यांनी स्वत:च्या हातानी खाऊ घातल होतं. जो नागरीकांसाठी काम करतो त्याची ही अवस्था या कोरोनानी केली आहे. एखादा पेशंट जास्ती सिम्टोमॅटीक असताना ऍन्टीजेन टेस्ट निगेटिव्ह आलीतर घरी पाठवण्यापेक्षा कृपया त्याला तुम्ही ऍडमीट करुन घ्या. आपण आता क्रायटेरीया

केलेत, वायसीएमला आपण सांगताना सांगतो की जास्ती क्रिटीकल कंडीशन असेल सिम्टोमॅटीक जास्ती असेलतर तुम्ही त्याला वायसीएमला ॲडमीट करा नाहीतर बालेवाडी असेल, म्हाळूंगे असेल, चिखली असेल, घरकुल असेल, आकुर्डी असेल कुठेही आपण त्यांना तीथे ॲडमीट करतो पण कृपया ॲडमीट करताना सुध्दा त्यांचा खरोखर सिम्टोमॅटीक असणारा पेशंट हा किती परसेन्टेजवाईज आहे याची सुध्दा शहानिशा करुन त्या त्या पध्दतीने तुम्हांला कोविड सेंटरमध्ये त्यांना एक स्टेजेस मध्ये आपल्याला ठेवावे लागेल. कारण काही लोकांना खुप सिम्टन्स आहेत काही लोकांना खुप कमी आहेत, पण जास्ती सिम्टन्स आहेत त्याच्यामध्ये सिम्टोमॅटीक पेशंट आल्यानंतर सुध्दा त्याचे सिम्टन्स वाढल्याचे आपण स्वतः बघीतलेले आहे. आता माझ्याच वॉर्डातून आपण म्हणलतर, माझ्या वॉर्डामध्ये काम करताना सुध्दा म्हणजे बरेचसे डॉक्टर सुध्दा आपल्याला म्हणतात की आम्हांला माहीती तरी असतो की तो पेशंट पॉझिटीव्ह आहे. पण हे आपले दत्ता काका व जावेद भाई गेलेत म्हणा किंवा रंगनाथदादा फुगे गेलेत म्हणा किंवा थोरात गेलेत म्हणा आम्हांला माहीत नसत की समोर आलेला माणूस हा पॉझिटीव्ह आहे का निगेटीव्ह आहे. त्यामुळे सगळयात जास्ती हा त्रास आम्हांला सोसावा लागतो. कारण काम करताना फिल्डवर ज्यावेळेला आम्ही काम करतो त्यावेळेला त्या सगळया लोकांची सुखदुःख हे आम्हांला कळत असतात. त्या पध्दतीन मला वाटत थोडस आमच्या ज्या रिक्वेस्ट आहेत त्याला मान्यता देवून त्या पध्दतीन आयुक्त साहेब तुम्हांला काम कराव लागेल. माझ्या वॉर्डात बारा ते पंधरा डेथ झालेल्या आहेत. एका एका दिवसाला चार चार डेथ कोरोनामुळे झालेले आहेत. आणि ते झाले कशामुळे शक्यतो कोरोनामुळे जास्ती पेशंट घाबरतो. पेशंट घाबरतो त्यावर आपण उपचार करत असतो पण तो अटॅकने शक्यतो गेलेला आहे. त्यासाठी आपल्याला काही सुकर गोष्ट करता येईल मला वाटत ती सुध्दा आपल्याला पाहता येईल. कारण माझ्याकडे अलेक्स सारखा एक आमचा २५ वर्षाचा मुलगा अटॅकनी गेला. आकरा साडेआकरा वाजता तो माझ्याशी बोलतोय आणि साडेसात वाजता तो मुलगा जातो त्यासारख दु:ख त्याच्या आईवडीलाना पण नसेल आणि आम्हांला सुध्दा नसेल. त्यामुळे थोडस आपल्याला एक माणुसकीच्या नात्यान त्यांची भीती किती घालवता येईल त्यादृष्टिन समुपदेशन देण्याच काम सुध्दा मला वाटत आपल्याला प्रत्येक पेशंटला कराव लागेल. मी असं म्हणणार नाही की तीथल्या डॉक्टर्सनी, नर्सेसनी, वॉर्डबॉयनी किंवा आयानी हयांनी कराव कारण त्यांना ऑलरेडी काम आहे पण त्यासाठी जर

आपल्याला एखादी टीम नेमता आलीतर आतमध्ये पेशंट नेताना जशी मी बोलते माझ्या पेशंटला फोन करुन की घाबरु नकोस, घाबरुन गेल्यानंतर तू जास्तीच पॅनिक होणार आहे आणि पॅनिक झाला की तु जास्ती आजारी पडणार आहे. तस मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब मला वाटत एखादी समुपदेशन टिम आपल्या हॉस्पिटलमधुन अशी व्हावी. कारण ती झालीतर आपल्या मृत्यूच प्रमाण थोडस कमी होईल. कारण की मृत्यूदर कमी झालातर तो आपल्यासाठी सुध्दा चांगल आहे. सगळा मेडीकल स्टाफ चांगल काम करतो, सगळेच काम चांगल करतात. सगळे चांगल काम करत असताना पब्लिकला सुध्दा काय पाहीजे याचा अभ्यास सुध्दा आपल्याला करावा लागेल. एवढच मी बोलतो आणि थांबते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. ख-या अर्थाने आज मला सभागृहामध्ये येता आल नाही. सात तारखेला मी कोविड पॉझिटीव्ह झाले आणि आज चौदा दिवस पुर्ण होत आहेत. मा.महापौर साहेब, ज्यावेळेला आज आपल्या सभागृहामधले मागच्या महीन्याची दुर्दैवाने अशी सभा गेली की आपल्याला दत्ताकाकाना श्रध्दांजली अर्पण करावी लागली असं वाटल पुन्हा आपल्याला ती वेळ येणार नाही. परंतु नियतीच्या नियमापुढ आपल काही चालत नाही. दत्ताकाकांच्या मागे मागे आपले जावेदभाई गेले. त्याच बरोबर काही माजी नगरसेवक गेले. परंतु हे सगळ होण्यामागचे काय कारण किंवा त्याच्यावर काय केलं पाहीजे. काय उपाययोजना केल्या पाहीजे याच्यावर आता विचार करणे आवश्यक आहे. आज याठिकाणी मी जावेदभाईना माझ्या कुटूंबियाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. एवढच नव्हेतर आमच्या प्रभागातील त्याच बरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर रंगनाथदादा फुगे यांच सुध्दा अल्पशः आजाराने काल निधन झालेल आहे. खरतर रंगनाथदादांच्या बद्दल बोलायच झालतर दादांचा आवाज ऐकला तर त्यांचा एक वेगळा कणखर आवाज, प्रखर बोलणं, चेष्टा करणं आगदी एखादया दु:खात पण एखादयाला हासवणं हे कुणी करावतर आमच्या रंगनाथदादांनीच कराव. असे आपले दादा तेही काल अल्पशः आजारामुळे आपल्याला सोडून गेले. कै.सन्मा.रंगनाथदादा फुगे यांना देखील माझ्या कुटूंबियाच्या वतीने, माझ्या प्रभागाच्या वतीने याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. सन्मा.महापौर साहेब, सभागृहात बोलत असताना खरतर कोविड होणं म्हणजे काय प्रत्येक नगरसेवक बोलताना ऐकतीय की कोविड झाल्यानंतर स्वतः कोविड होणं

म्हणजे काय. याच्यामध्ये जो मॉरल सपोर्ट माणसाला लागतो तो मिळणं खुप आवश्यक आहे. ज्यावेळेला मला कोविड झाला त्यानंतर पालिकेत जाण्यायेण्याचा प्रसंग आला त्यावेळेला ज्या गोष्टी निदर्शनास आल्या त्या तुम्हांला सांगण्याची इच्छा आहे. सन्मा.आयुक्त साहेब, शहराच्यावरती आपण खरच लक्ष दिल पाहीजे. ज्यावेळेला मी काल आपल्या कोविड वॉर्डमध्ये इन्ट्री केली, दुर्दैवाने धक्कादायक बाबी समोर आल्या याची मला जाहीर चर्चा नाही करायची मला याच्यावरती उपाययोजना शोधायच्या आहेत. तक्रार म्हणून न सांगता याच्यावर आपल्याला काय अंमलबजावणी करता येईल, काय चांगला विचार करता येईल यासाठी मी हे बोलती. त्यादिवशी आयुक्त साहेब मी तुम्हांला फोन केला असता परंतु ज्यावेळेला मी वॉर्डमध्ये इन्ट्री केली त्यावेळेला तेथे जे मामा लोक होते, तीथ काम करणारी मामा लोक जी आहेत ते महीलांचा डायफर सुध्दा चेंज करत होते. का मावशी तीथे नव्हत्या. साहेब, त्या महीलाला वेदना होत असतील तीला कळत नसेल परंतु तीच्या बाजूला जी सामान्य महीला असेल तीला ते बघत असताना काय वाटत असेल, सन्मा.आयुक्त साहेब ज्या काळामध्ये मला स्वत:ला कोविड झाल्यामुळे मला कळाल की माझ्या घरातली माणस आहेत त्याना मला बघायच पण बघता येत नव्हतं. अशा काळामध्ये मेन्टली डिस्टर्ब असणारी माणस त्याठिकाणी आपल्याकडे येतात आणि शंभर टक्के आपण अत्यंत चांगल्या प्रकारे काम करतो अस मत असताना ज्यावेळेला मी समोर पाहील ते अत्यंत डेन्जर, भितीदायक, त्रासदायक वेदना देणार होतं. अशावेळेला वाटते की आपल्या इथे आपल्या काही स्पेशल कामासाठी, काही महत्वाच्या कामासाठी आवश्यक असणा-या बाबींसाठी आपण त्याठिकाणी आपल्या मावशा असतील आपल्या नर्सेस असतील यांनी कौन्सलींग करायला गेलच पाहीजे. त्यांच्याशी बोललच पाहीजे. (ऑललाईन बोलत असताना आवाज बंद झाला)

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज जावेदभाई शेख आपल्यातून निघून गेले. त्यांच्या जाण्याने खरच कोरोना आपल्या शहरात काय मात करतो हे दिसून येतं. त्यांना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला मी सांगू इच्छितो की, आपण ॲन्टीफिशीअल टेस्ट करत असताना ती काही काही वेळेस निगेटीव्ह येते. त्यासाठी आपण

आर्टीफिशिअल टेस्ट करतो. आर्टीफिशिअल टेस्ट करताना माझी आपल्याला विनंती आहे की त्याच बरोबर आपण एक्स-रे पण काढावा. कारण की ज्या माणसाला सर्दीने जास्त छाती भरलेली असते ते त्याच्या लक्षातच येत नाही. त्याचा ऑक्सिजन लेव्हल जेव्हा कमी होतो तेव्हा त्याला कळतय की आपली ऑक्सिजन लेव्हल कमी होतो. माझे मित्र श्री.रोहीत गवारे म्हणून आहेत त्यांच्या वडीलांची परवा आम्ही ऍन्टीजेन टेस्ट केली आणि त्याना थोडेसे सिम्टन वाटले की आपण आर्टिफिशीअल पण टेस्ट करावी ती केली पण त्यांची टेस्ट दुसऱ्या दिवशी सात वाजता आमच्या ताब्यात मिळाली. पण ते सकाळी चक्कर येवून पडले आम्ही त्यांना हॉस्पिटलला नेलं पण शेवटी त्यांचा दुर्दैवी अंत झाला. लोकांना कळतच नाही, त्यांना वाटत की नेहमी आपल्याला छातीत जसा खोकला होतो तसा आपल्याला कफ होतो. त्यामुळे लोक जास्त सिरीएस घेत नाहीत. तरी माझी आपल्याला विनंती आहे की आपण जिथ जिथ या टेस्ट घेतात तीथ तीथ एक्स-रे ची पण व्यवस्था केलीतर टेस्ट येण्याच्या आदी त्यात आपल्याला छातीतला कफ दिसत असेलतर आपण त्यांना लगेचच आपल्या हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करुन त्यावर आपल्याला त्वरीत उपचार चालू करता येतील. बरेच पेशंट कफ झाल्यामुळे श्वासोश्वास घेण्यास त्रास होतो आणि त्यामुळे ते घाबरुन हार्ट अटॅकचे प्रमाण जास्त होत आहे. तरी माझी आपल्याला विनंती आहे की या दोन टेस्ट बरोबर एक्स-रे सुध्दा तीथेच केलातर चांगले राहील. त्यामुळे आपली डेथरेट पण कमी होईल. लोकांना कळतच नाही की आपल्याला कफ झाला आहे म्हणून कॉमन खोकला आहे, कॉमन सर्दी आहे म्हणून लोक अंगावर काढतात, घाबरुन गेले आहेत. काही लोक घरातच बसतात ते समोर येत नाहीत. तरी आपण एक्स-रेचा ही उपाय केलातर नक्कीच मृत्यूचा जो रेट आहे तो कमी होईल एवढच बोलतो आणि त्याच बरोबर रंगनाथदादा फुगे तसेच शहरातील जे काही व्यक्ती मृत्यू झालेले आहेत त्या सगळयांना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमच्या जवळचे नातेवाईक दत्ताकाका साने यांना आपण सर्वानीच श्रध्दांजली वाहीलेलीच आहे. दत्ता काका साने व जावेदभाई शेख यांना मी माझ्या प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहते आणि माई थोड कोरोना सोडून दुसऱ्या विषयाकडे लक्ष

वेधु इच्छिते. कालच दहावी बारावीच्या शिष्यवृत्तीचे नागरवस्ती विभागाकडून फॉर्म देण्यात आले होते.....

**मा.महापौर-** या विषयावर उदया बोला, आज श्रध्दांजलीवर बोलून सभा तहकूब करणार आहोत.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, ठिक आहे, पुन्हा एकदा शहरातील जे मृत झालेले आहेत त्यांना मी माझ्या प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहते, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर जागतीक महामारीच्या या कालखंडामध्ये पिंपरी चिंचवड शहराला एवढी मोठी किमंत मोजावी लागेल अशा घटना आपल्या शहरामध्ये घडलेल्या आहेत. दत्ताकाका जातात खरतर फार मोठी किमंत या कालखंडामध्ये पिंपरी चिंचवड शहराला मोजावी लागलेली आहे. न विसरणा-या या घटना असतात. आपण श्रध्दांजली अर्पण करुन आपल्यापुरता तो विषय संपला जातो परंतु कुटूंबाला त्याच्या ज्या यातना आहेत त्या आयुष्यभर भोगाव्या लागतात. कारण जाण्याची त्यांची वय नव्हती. दत्ताकाका मुळ शहराचीतर हानी झालीच परंतु आमच्या पक्षाची देखील हानी झाली आहे. जावेदभाई शेख आणि आम्ही एकाच कालखंडातले असल्यामुळे आमचे काही त्या काळामध्ये वेगवेगळे ग्रूप असायचे परंतु लहान वयामध्ये संधी मिळाल्यानंतर त्यांचे काही मार्ग चुकल्यानंतर परत मुख्य प्रवाहात येवून असा एका अल्पसंख्याक असलेला कार्यकर्ता की जो सतत तीन वेळा निवडून येतो त्यांनी कामाची देखील विश्वासर्हता शहरात सिध्द केलेली होती. दुर्दैव अस की नाना काटे आम्ही सर्वजण बसलेलो होतो विरोधी पक्षनेते कुणाला करायच म्हणून. मा.अजीतदादा बोलले की तुम्ही सर्वजण बसा आणि मला एक नाव दया. जावेद म्हणाला मला पहील व्हायच. दिलदार, दिलदार पणा जो काय असतो तो जावेदभाई शेख यांच्याकडे आहे. मी खुप वर्षा पासून सगळयाच मार्गातून गेलो असल्या कारणाने आम्हांला सर्वांची चांगली माहीती आहे. सरळ माणस होतो आम्ही त्या काळामध्ये त्यामुळे आजही सरळ आहोत. त्यामुळे हे सगळे संस्कार घेवून राजकारणामध्ये पदार्पण केल्यानंतर माणसांची विश्वासर्हता आणि आपल कृत्य हे लोकांना देखील विसरायला लावण्याची क्षमता निर्माण करता येते ते म्हणजे जावेद. नाना काटे आम्ही सगळेजण बसलेलो होतो त्याचवेळी जावेद म्हणाले नानाला करा चला. आणि दादाला सांगीतल

विरोधीपक्षनेता यावर्षी नानाला करा पुढच्या वर्षी मला करा. आमचा पुढच्या वर्षीचा विरोधीपक्षनेता दिवंगत झाला. खरतर सिमाताई आशा घटनेचे आपण साक्षीदार होवूच नये. मी आयुष्यामध्ये एवढी दु:ख एवढी आवाहन स्विकारुन वाटचाल केल्यानंतर मला कधीही टेन्शन आल नाही पण दत्ताकाका आणि हे गेल्यानंतर पहील्यांदा मला चक्कर आली. माई आपण मामा बरोबर काम केल आहे आपल्याला माहीती असेलच आणि सगळयात मी लाडका भाचा. जसा मी लाडका तुमचा चिरंजीव आहे तसा त्यांचा लाडका भाचा होतो. पंधरा दिवस अगोदर मला भेटायला आले आणि माझी तब्येत कशी आहे ती विचारपुस करायला आले असा हा माझा आवडता मामा. त्या पदाची प्रतिष्ठा वाढवत असताना त्या पदाचा अहंकार वाढवणार त्या पदामुळ असं पद भोगणारी ही माणस होती. या शहरामध्ये आमच्या मामाला बघीतल की कुणी म्हणलच नाही या पक्षाचा आहे. प्रत्येकाला वाटायचे तो माझाच माणुस आहे. मी खरतर या सगळया कालखंडातून गेल्यानंतर आपल्या माणसाच्या जाण्यान केवढ मोठ दु:ख असतं हे त्या कुटूंबालाच त्याची माहीती असते. या महापालिकेचा एक पायाच आहे आण्णासाहेब मगरांच्या काळापासून आणि माई आपल्या सर्वाच भाग्य की या सगळयाच लोकांबरोबर आपण काम केलं. त्यावेळेस माई पण मला काम सांगायच्या पण या सगळया परिस्थितीमध्ये या आठवणी एवढया प्रचंड आहेत आणि या प्रचंड आठवणीतन कधीही कदापि बाहेर जाता येणार नाही कारण त्या शाश्वत आणि विश्वस्तांच्या आठवणी आहेत. खरतर मी एक मागणी करेल माझा मामा म्हणून नव्हे, माझे वडील पण राजकारण करुन गेलेत या शहरामध्ये, पण मामाची अशी आठवण रहावी असं काहीतरी त्यांच एक नाव लक्षात राहील असं कुठतरी नाव दयाव आणि मी पक्षनेत्यांकडेही विनंती करतो की आपण माणुसकीच दर्शन घडवाव. जशी आम्ही मागणी केली होती मा.अटलजींच मा.बाळासाहेब ठाकरे यांच तैलचित्र लावाव तस मामांचा अधिकार आहे या महापालिकेचा विकास कसा करायचा आणि जागा कशी ताब्यात घ्यायची त्या काळामध्ये आम्हांला काहीच कळत नव्हतं सिमाताई, त्या काळात एक कमी शिकलेल्या माणसांच काय असतं कामाचा आवाका तो म्हणजे माजी महापौर रंगनाथ फुगे आणि म्हणून मी तुम्हांला विनंती करतो कारण तुम्ही सत्ताधारी आहात आणि कळकळीची विनंती करतो की अशी ही माणस म्हणजे एक एक स्मारक. ही माणस कधीच जात नसतात त्यांच्या कर्तत्वाने एवढ स्वत:ला सिध्द केलेल असत की त्यांच्या आठवणी आपल्याला घ्याव्याच लागतील. सुजातताताई

पालांडेनी कोरोनाच्या संदर्भात आपल्याला सांगीतल. पण आयुक्त साहेब या सगळया कालखंडामध्ये तुम्ही एक चांगल काम करता, सगळेजण काम करतात, आवाहन स्विकारुन काम करतात, जिवावर उध्दार होवून काम करतात आणि हे काम करणं जिकरीच पण आहे धाडसाच पण आहे ते धर्माच पालन करणार देखील आहे. कारण की सिमेवर लढणारे रोज पंचवीस शहीद होतात त्यांच्यामध्ये ही कधीच भावना नसते की मी देशासाठी करतोय. शहरामध्ये असं कुठतरी आता चित्र दिसायला लागलय, प्रत्येकाच्या कामाच्या पध्दती वेगळया असतात मी कधीही कोणत्या अधिका-याला कोरोनाच्या काळात फोन करत नाही पण असं बोलतात की डॉक्टर असेल किंवा एक प्रमुख व्यक्ती असेल असं एकनाथजी आणि आम्ही बोललो की व्हिलपॉवर स्ट्राँग करण्यासाठी एक माणूसकीचा झरा असावा लागतो. आमच्या कुटूंबियाचा देखील आदर्श डॉक्टरांनी घ्यावा, कित्येक वर्षे निस्वार्थीपणे काम करतात तरी ते त्याच भांडवल करत नाहीत. परंतु आता कुठेतरी असं वाटायला लागले की तुम्ही एकदा वैतागले या सगळया परिस्थितीला. असे काही उत्तर भेटतात की मी फोन केला होता माझ्या जवळचा मित्र जाण्याच्या मार्गावर होता रात्री आकरा वाजता फोन केला आणि साहजीक आहे अती कामाच्या ताणामुळ मानसीक संतुलन माणसाच ढळल जात. परंतु तुमच्या बोलण्याचा आधार आजच्या कालखंडामध्ये उपचारापेक्षा मोठा आहे. मी एकदा फोन केला डॉक्टरांनी फोन उचलला नाही नंतर एका डॉक्टरचा फोन आला, मी आयुक्तांना पहील्यांदा रात्री फोन केला आयुक्त कुठेतरी असतील परंतु त्यांना मी धन्यवाद देतो त्यांनी सकाळी आवर्जुन फोन केला आणि मी त्यांना त्या भावना सांगीतल्या. पण त्याचे पडसाद असे झाले चांगले पडसाद झाले नाही. त्या पेशंटच्या घरी जाऊन डॉक्टरांनी विचारले की तुम्ही आयुक्तांना का फोन केला. त्या पेशंटला नंतर औषध दिल नाही साहेब. सत्तेच्या समीकरणामध्ये मी भूलणारा कार्यकर्ता नाही. कुणाचीही सत्ता असलीतरी मी कस वागायच तसच वागतो कारण माझ्या वागण्यामध्ये विचार असतो, अहंकार नसतो स्वाभिमान असतो. कुणालाही सरळ करण्याची किमया आणि ताकद माझ्यामध्ये आहे, मी निर्माण केलेली आहे मोरया गोसावीच्या गावचा असल्यामुळ. तो डॉक्टर म्हणतो तुम्ही आयुक्तांना फोन करता मग कुणाला फोन करायचा. ही कोरोनाची श्रध्दांजली वाहत असताना परत एखादया कार्यकर्त्यास श्रध्दांजली वाहायला लागू नये म्हणून मी हे बोलतो. अन्  मस्ती येत असेल काही डॉक्टरांना तर काही हरकत नाही जगावर संकट आलेलं आहे, लढू आपण सर्वजण लढू. पगार घेवून मस्ती येत

असेल आणि कामाचा त्याना अहंकार असेल, स्वाभिमान असेलतर चालेल पण अहंकार असेलतर नसलेले असे माणस चालतील. तुम्हीच हे करता आम्ही तुमचे अभिनंदन पण करतोना. पण माज आल्यासारखी भावना त्याच्यामध्ये तुमच्यामध्ये आहे. कुणाला माज आला असेलतर त्यांना कोविड सेंटरमध्ये टाका मग त्यांना कळेल काय यातना असतात. हे मी पोटतीडकीने बोलतो असं कधी मी बोलत नाही पण आज नाही बोलल कोरोना गेल्यानंतर बोललो तर तोपर्यंत ५० मरतील. बोलताना जर माज असेलना तुमच्यामध्ये तर हा कोरोना गेल्यानंतर उतरवल्याशिवाय राहणार नाही याची पण सर्वानी दक्षता घ्यावी. आयुक्त साहेब तुम्हांला फोन केला म्हणून ही भाषा आहे यांची. ती जाहीरात येतीना आणि बाप म्हणतो मुलाला “या शहराचे मोठमोठे गूंड मला घाबरतात” मग तो मुलगा म्हणतो “छोटे छोटे डास का नाही घबरत तुम्हांला” तशी आमची अवस्था आहे. हे जरा तुम्ही सावधानतेनी काम करा तुम्ही चांगलच काम करता. पण माज आणि मस्ती आली त्यांची यादी करा आणि त्यांना कोविड सेंटरमध्ये टाका. कारण माणस गळायलेत साहेब रोज. माझ्या जवळचे मामा, मित्र दणादण दणादण गेलेत. तुम्ही फक्त निट बोला काळजी करु नको मी तुझ्या पाठीशी आहे असं बोला. पण भाषा आणि फोन घ्याना एक तासानी करा, परत दोन तासानी फोन करा. एवढी कसली मस्ती आली. मा.महापौर साहेब, मी तर म्हणतो हे तुम्हांला आवाहन आहे काम करण्याची संधी आहे. तुम्ही कोणालाही मधी न घालता स्वतःच संरक्षण घेवून लोकांशी फोनवर चर्चा करा तुम्हांला खर चित्र बाहेर येईल. मी तुमच्या उमेदीच्या आणि आवाहनाच्या कालखंडामध्ये तुमच मनोधैर्य कमी होईल असं काही वक्तव्य करणार नाही. हा सगळा कालखंड तुम्ही निट पार पाडावा. माझ्या मामाला, जावेद शेख असतील, दत्ता काका असतील लाख लाख कोटीच्या भावपुर्ण अदरांजली वाहतो. तुमचा लढावूपणा तुमची काम करण्याची कामसू वृत्ती ही सगळी आमच्यामध्ये आम्ही जतन करु हीच तुम्हांला भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो, धन्यवाद.

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मागच्या महीन्यामध्ये दत्ताकाका साने यांना श्रध्दांजली वाहीली तेव्हा वाटल नव्हत की या महीन्यात सुध्दा आपल्याला परत तीच वेळ येईल. काल माजी महापौर रंगनाथ दादा फुगे आणि माजी नगरसेवक आणि आपले जावेदभाई शेख यांना मी माझ्या अ प्रभागातर्फे सर्वाना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते, धन्यवाद.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर मागची मिटींग झाली त्या मिटींगमध्येच आपण दत्ताकाकाना श्रध्दांजली वाहत असताना त्यावेळेस विषय निघाला आणि त्यावेळेस आयुक्त साहेब आपल्याला सांगीतल होतं की जावेद शेखची देखील तब्येत अतीशय खराब झालेली आहे. आपण आपल्या वायसीएमच्या डॉक्टरांना त्याठिकाणी पाठवून माहीती घ्यावी आणि त्याप्रमाणे आपण लगेच डॉक्टरांना पाठवून हॉस्पिटल मधली सगळी माहीती घेतली आणि मला तुम्ही रात्री फोन करुन सांगीतल की आपले डॉक्टर गेलेले होते त्यांनी माहीती घेतली जी ट्रिटमेंट चाललेली आहे ती व्यवस्थितपणे चालू आहे पण जर तुम्ही म्हणत असालतर आपण त्यांना शिफ्ट करु परंतु पेशंट सेट होणं गरजेच आहे. त्यानंतर मी जावेदभाईच्या फोनवर फोन केला म्हणल कोणीतरी नातेवाईका जवळ फोन असेल आणि फोन केल्यानंतर तो फोन जावेदभाईनी डायरेक्ट उचलला आणि जावेदभाई म्हणाले नाना मी येतोच. मी म्हणालो नक्कीच आम्ही तुझ्या स्वागताला थांबतो परंतु मोबाईल या परिस्थितीमध्ये तू घेवू नकोस. असा हा दिलदार मनाचा सच्चा कार्यकर्ता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आमचा एक सहकारी ज्या पध्दतीन दत्ताकाकाच निधन झाल त्याच पध्दतीन जावेदभाईच देखील निधन झाल आहे. भाऊसाहेबांनी तो किस्सा सांगीतला की ज्यावेळेस विरोधीपक्षाची निवड होती त्यावेळेस आम्ही बसलो होतो. खरच परिस्थिती तशी होती आणि एकदम दिलदारपणे त्यांनी सांगीतल की यावेळेस नानाला दया आणि नंतरचा विरोधीपक्षनेता मीच आहे असा हा मित्र गेल्यामुळे पिंपरी चिंचवड शहराची पोकळी निर्माण झालेली आहे परंतु आपण प्रत्येक वेळेस श्रध्दांजली वाहत असताना म्हणतो की पोकळी निर्माण झाली परंतु ही शहराची पोकळी, ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची पोकळी आणि त्याच्या कुटूंबातील पोकळी कधीही भरुन न निघणारी आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहराचे माजी महापौर आदरनीय रंगनाथ दादा फुगे प्रत्येकाच्या सुखदु:खात अवर्जून उपस्थित राहणारी ही व्यक्ती खरतर कुणाचाही दहावा असू दया, कुणाचही लग्नकार्य असू दया प्रत्येक कार्याला उभ राहणार हे व्यक्तीमत्व आज कोरोनाने त्यांच निधन झाल आणि दुर्दैव असं की त्यांच कोरोनानी निधन झाल्यामुळे त्यांच्या अन्त्यविधीला  कोणत्याही नातेवाईकाला, कोणत्याही कार्यकर्त्याला उपस्थित राहता आल नाही. या शहरातील अनेक नागरीकांचा कोरानानी दुर्दैवी मृत्यू झाला या सर्व लोकांना मी माझ्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या

वतीने, माझ्या कुटूंबाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. भाऊसाहेबांनी सांगीतल की ज्या पध्दतीने आजकाल डॉक्टर पेशंटशी वागतात. मी काल देखील डॉ.वाबळे सरांना फोन केला होता पेशंटला अजीबात दिलासा देत नाहीत. डायरेक्ट सांगतात की तुम्ही बाहेर व्यवस्था करा. परिस्थिती खुप गंभीर आहे. तुम्ही थोडावेळ इथ थांबलातर नक्कीच तुमच्यात कमी जास्त होवू शकतं, तुम्ही प्रायव्हेट हॉस्पिटलला जा. आता तुम्हांला इथे व्हेन्टीलेटर नाही काही नाही. म्हणजे त्या पेशंटला मॉरेल सपोर्ट दयायचा सोडून त्याला भिती निर्माण करतात. कारण की मी काल डॉ. वाबळे सरांना दहा ते पंधरा फोन केले. सरांना म्हणल कोण डॉक्टर आहेत की ते पेशंटला भिती निर्माण करतात. ज्या पध्दतीने भाऊसाहेबांनी सांगीतल अशा लोकांकडून काम होत नसेलतर तुम्ही त्यांना घरी बसवा, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता सर्व सदस्यांनी श्रध्दांजली वाहीली त्यामध्ये प्रामुख्याने आपल्या या सभागृहातील नगरसेवक जावेद शेख, या शहराचे माजी महापौर रंगनाथदादा फुगे आणि मोरेश्वरनी ज्यांना ज्यांना श्रध्दांजली वाहीली त्यांना मी याठिकाणी प्रथमतः श्रध्दांजली अर्पण करतो. या श्रध्दांजलीवरती बोलत असताना मगाशी उल्लेख केला की या शहराचे माजी महापौर रंगनाथदादा फुगे, मला सुध्दा आठवत की आजुबाजूच्या सर्व शहरामध्ये पंचक्रुशीमध्ये असणा-या गावामध्ये ज्या ज्या वेळेला मी जात होतो त्यावेळेला मी बघत होतो लग्नकार्य असेल, शोकसभा असेल किंवा दशक्रियाचा विधी असेल प्रत्येक ठिकाणी रंगनाथदादा फुगे हे बोलणार आणि एक चांगली शैली त्याठिकाणी त्यांच्या बोलण्यातून नेहमीच दिसत होती. मगाशी नाना काटे यांनी सांगीतल की जो व्यक्ती सर्वाच्या सुखदु:खामध्ये अगदी छोटयाशा कार्यकर्त्यापासून अगदी मोठया व्यक्तीपर्यंत प्रत्येकाच्या कुठेही दुजाभाव न करता कुठलाही मान सन्मान न बघता प्रत्येकाच्या सुखदु:खामध्ये सहभागी होणारा माणूस, परमेश्वर सत्तेपुढे कोणाचही काही चालत नाही त्याप्रमाणे कालच त्यांच दु:खद निधन झालेल आहे. नानानी सांगीतल्या प्रमाणे ते सर्वांच्या सुखदु:खात जात होते परंतु त्यांच्या अन्त्यविधीला या कोरोनाच्या महामारीमुळे कोणालाही त्याठिकाणी जाता आल नाही. खर म्हणजे ही एक आमच्या सारख्या नगरसेवकांच्या मनामध्ये, सर्वांच्या मनामध्ये एक खंत त्यांच्या जाण्यामुळे याठिकाणी झालेली आहे मी त्यांना सुध्दा याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. मगाशी भाऊसाहेबांनी सांगीतल की जावेद शेखच्या बद्दल गेल्या

पंचवीस वर्षापासून मी सुध्दा कार्यकर्ता या नात्याने जावेदच्या सोबत टाटा मोटर्समध्ये ते आमचे सहकारी असल्यामुळे ते आमच्या बरोबर नोकरीच्या संदर्भात आजुबाजूच्या त्यांच्या वॉर्डामधील लोकांना नोकरी लावण्याच्या संदर्भात त्यांचा आणि माझा संपर्क आला. अतीशय चांगला कार्यकर्ता सगळयांना सामावून घेणारा आणि गरीबांसाठीची तळमळ असणारा कार्यकर्ता आणि नगरसेवक त्या भागामध्ये सातत्याने तीन वेळा जावेद निवडून येतो याचाच अर्थ असा आहे की सर्वसामान्यांची नाळ, सर्वसामान्यांच्यासाठी काम करणारा एक कार्यकर्ता नगरसेवक या सभागृहामधुन गेलेला आहे. मी त्यांच्या बद्दल दोन चार विषय अवर्जुन याठिकाणी सांगेल कारण या सभागृहामध्ये ज्यावेळेला ते बोलत होते, मला आठवत या सभागृहामध्ये ज्यावेळेला औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये एमआयएमच्या नगरसेवकांने वंदे मातरमला विरोध केला आणि तोच जावेद शेख आमचा कुठलाही सर्व धर्मभाव या नात्याने या सभागृहामध्ये त्या नगरसदस्यांचा जो भारतमातेच्या वंदे मातरमला विरोध करतो त्याचा निषेध या सभागृहामध्ये केला. दुसरा मी याठिकाणी अवर्जून उल्लेख करेल की जावेद शेख यांचा आकुर्डी विभाग आहे आणि आकुर्डी विभागामध्ये संत एकनाथाची पालखी त्याठिकाणी येते, संत तुकाराम महाराजांची पालखी त्याठिकाणी येते आणि त्या पालखीच जय्यत स्वागत जावेद शेख यांच्या संपुर्ण कार्यकर्त्यांच्या माध्यमातून नगरसदस्य या नात्याने सातत्याने ते करीत होते. एवढेच नव्हेतर ज्या दोन दिवशी पालखी आकुर्डी गावामध्ये मुक्कामास असते त्यावेळेला त्या पालखीच्या वारक-याना जेवण देणार, त्यांची सेवा करणार असे अनेक उपक्रम या नगरसदस्यांच्या विशेष करुन जावेद शेखच्या माध्यमातून त्याठिकाणी केल जात होत. आरटीइ म्हणल की जावेद शेख म्हणजे गरीबांच जे आरटीइ पंचवीस टक्के प्रत्येक शाळामध्ये जे रिझर्व्हेशन असतं त्यासंदर्भामध्ये सातत्याने कुठल्याही शहरामध्ये कुठल्याही व्यक्तीच नाव घ्यायच असेलतर जावेद शेख यांच नाव अवर्जून घेत होते. कारण सर्वसामान्यांना, गरीबांना इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये प्रवेश मिळाला पाहीजे या भूमीकेमधुन त्यांनी आरटीईच्या माध्यमातून अनेक कुटूंबाच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळाना मोठया प्रमाणामध्ये फि लागते, डोनेशन लागत तर तो आरटीईच्या मदतीच्या माध्यमातून सर्वसामान्य गरीब कामगार लोकांच्या मुलांना त्या माध्यमातून प्रवेश देण्याच काम देखील जावेद शेख यांच्या माध्यमातून केलं गेल आहे. मला याठिकाणी एक म्हणायच आहे की सर्वधर्म समभाव म्हणजे मी म्हणेल की मग तो

एमआयएमचा विषय असेल किंवा कुठलाही विषय असेल, पालखीचा विषय असेल किंवा सर्वसामान्यांचा विषय असेल अतीशय साध्यापणाने हाताळणारा या सभागृहातील आमचा नेता, आमचा सहकारी जो की सर्वसामान्यांना हवासा वाटणारा आज मी ज्यावेळेस जावेद शेख यांच्या अन्त्यविधीसाठी त्यांच्या घराकडे गेलो त्यावेळेला पोलीस त्याठिकाणी आवर्जून फिरत होते म्हणजे मी आकुर्डीच्या म्हाळसाकांत चौकापासून त्यांच्या घरापर्यंत, ऑफिसपर्यंत गेलो त्यावेळेला बघीतल तर वॉर्डातील रोडला दुतर्फा प्रत्येक गल्ली बोळामध्ये सर्वसामान्य नागरीक त्याठिकाणी पोलीस जरी या कोरोनाच्या महामारीमुळे संसर्ग टाळण्यासाठी हाटवित होते परंतु त्यावेळेला लोकांच्या मनामधली हाळहाळ आणि त्यांच्या मनामध्ये असणारा जावेद शेख बद्दलचा भाव मी अवर्जुन त्याठिकाणी बघीतलेला आहे. खर म्हणजे जावेद शेख असेल, रंगनाथदादा फुगे असतील याठिकाणी त्यांच्या जाण्यान मी मागच्या मिटींगमध्ये सुध्दा एक महीन्यापुर्वी दत्ता काका सानेना श्रध्दांजली वाहीली आणि त्याचवेळेला नानानी म्हणल, माजी उपमहापौर राजू मिसाळ यांनी सुध्दा सांगीतल आपल्या आयुक्तांनी सुध्दा डॉक्टरांशी संपर्क करुन अतीशय तातडीने ज्या ज्या काही सुविधा देता येतील त्या संदर्भामध्ये तातडीन याठिकाणी हॉस्पिटलच्या माध्यमातून बोलनं केलं. आपल्याकडून जावेद शेख यांना त्याठिकाणी चांगली सुविधा देण्याच्या माध्यमातून प्रयत्न केला. परंतु मगाशी सांगीतल्या प्रमाणे ईश्वरी सत्तेपुढे कुणाच काही चालत नाही त्या उक्तीप्रमाणे या कोरोनाच्या महामारीमुळे आमचे सभागृहातील दोन रत्न गेलेले आहेत. त्यांच्या जाण्यान आमच्या सभागृहामध्ये जी काही त्यांच्या विचारांची त्यांच्या व्यक्तीमत्वाची छाप होती ती सदैव आमच्यामध्ये तेवत राहील. त्यांना मी याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. सन्मा.महापौर साहेब, मी अतीशय कळकळीन सांगतो की ज्यावेळेला आपण श्रध्दांजली वाहतो आणि भाऊसाहेब भोईर यांनी सांगीतल मी डॉक्टरांना त्याठिकाणी बोललो आणि त्यांनी सांगीतल्याप्रमाणे मी सुध्दा खाजगी रुग्णालयाच्या अनेक डॉक्टरांना हीच कल्पना दिली की अर्धा आजार तुम्ही ट्रिटमेंट देण्यापेक्षा तो व्यक्ती तो रुग्ण तुमच्या समोर आल्याच्यानंतर त्याला जर आपण धीर दिलातर अर्धा आजार आपल्या धीर देण्यान बरा होतो आणि कोरोना हा आजार आपल्या सगळयांना ज्ञात आहे की त्याच्यामध्ये औषधापेक्षा तुमच बोलणं कस आहे तुम्ही बोलून जर त्याला धिर दिला त्याला आधार दिलातर मला असं वाटत की कोरोनामुळे माणूस ज्यावेळेला पॅनिक होतो त्यावेळेला आधार देण्याच काम

याठिकाणी डॉक्टरांच्या माध्यमातून झाल पाहीजे. ज्यावेळेला हे खाजगी रुग्णालयाच्या डॉक्टरांना संपर्क करुन आम्ही सांगत असताना महानगरपालिकेच्या विभागामधील एखादा डॉक्टर जर काय एखादया नगरसदस्याला अशा पध्दतीची ट्रिटमेंट देत असेल, त्यांच काम आहे की त्यावेळेला त्या पेशंटला मानसीक आधार देणं. ठिक आहे मगाशी त्यांनी सांगीतल्या प्रमाणे वायसीएम रुग्णालयामध्ये आपल्या डॉक्टरांवरती खुप मोठा ताण आहे या सर्व गोष्टी असल्यातरी त्यांनी ज्यावेळेस आपण सेवा देतो डॉक्टरी पेशा हीच ईश्वरसेवा ज्यावेळेला आपण मानतो अशावेळेला आपण रुग्णसेवा म्हणून त्याला सांगतो त्यावेळेला त्याला धीर देण्याच काम आपल्या माध्यमातून झाल पाहीजे. हे करण्याऐवजी जर का एखादया सन्मानीय सदस्यांनी याठिकाणी सांगीतल आणि तुम्ही आयुक्तांना का सांगतात म्हणून त्याला का त्या ठिकाणी उलटपध्दतीने विचारणा केली जात असेलतर हे नेमके कोण अधिकारी आहेत, कोण डॉक्टर आहेत याची चौकशी मा.महापौर साहेब करावी. आयुक्त साहेब, तो कोण अधिकारी एवढ मुजोरपणाने वागतो किंवा ते एवढया पध्दतीने बोलू शकतो आणि या महामारीच्या काळामध्ये बोलू शकतो. म्हणजे त्याच जे काही असं बोलण आहे त्यासंदर्भात मा.महापौर साहेब आणि मा.आयुक्त साहेब आपण तातडीन जो कोण डॉक्टर असेल किंवा अधिकारी असेल त्यांच्यावर कारवाई करा. त्याच्याशी बोलणं करा की अशा महामारीच्यामध्ये पेशंटला आधार देण्याच्या ऐवजी तू वेगळया पध्दतीने टॉर्चींग करण्याच काम करत असेलतर त्याच्यावरती कारवाई करण्याचे याठिकाणी मा.महापौरांनी आदेश दयावेत. यानंतरही जो कोणी अशा पध्दतीने वागत असेलतर सन्मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण सगळया डॉक्टरांना एकत्रीत बोलवा आणि समुपदेशन देण्याच्या ऐवजी त्यांनी जर का अशा पध्दतीच कृत्य करत असेलतर त्यांनी सांगीतल्याप्रमाणे आता महामारी आहे परंतु महामारीच्या काळात सर्वांना ज्ञात आहे की अशी परिस्थिती असताना असं बोलणं योग्य आहे का हा सुध्दा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो. ही महामारी ज्यावेळेला संपुर्ण शहरामध्ये आहे त्यावेळेला पेशंटला आधार देण्याच्या ऐवजी जर का सांगीतल्याच्यानंतर पुन्हा त्यांना झापण्याच काम जर कोण अधिकारी करत असेल तर त्याच्यावरती कारवाई झाली पाहीजे. मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना असे आदेश दयावेत आणि मागच्या मिटींगमध्ये सुध्दा मी सांगीतल होत हा विषय काही राजकारणाचा नाही. रंगनाथ दादा हे माजी महापौर आहेत. आणि दत्ताकाका आपल्या सभागृहातील सन्मा.सदस्य आहेत. जावेद शेख

आपल्या सभागृहाचे सन्मा.सदस्य आहेत. मी म्हणेल की अशा या काळामध्ये आपले सदस्य आपण बोलून जाणार इथे श्रध्दांजली अर्पण करणार परंतु त्यांचा विचार आणि त्यांनी या काळामध्ये जी कामगीरी केली कोरोनाच्या माध्यमातून, सर्वसामान्यांच्यासाठी झटण्याच काम केलेल आहे, आपला जीव धोक्यात टाकून त्यांनी काम केलेलं आहे. अशा या सर्व दत्ता काका असतील, जावेद शेख असतील आणि विशेष करुन आपल्या शहराचे माजी महापौर रंगनाथदादा फुगे यांच एखादया मोठया प्रोजेक्टला आपण नाव दिल किंवा एखाद स्मारक त्यासंदर्भात आपण करु शकतो का अशा संदर्भामध्ये सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक बोलून एक चांगल्या प्रोजेक्टला नाव देण्याच काम सुध्दा आपण याठिकाणी कराव. अशी मी आपल्याला विनंती करतो. याठिकाणी सर्वांना श्रध्दांजली अर्पण करुन ही सभा शुक्रवार दि.२१/८/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा. ॲड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** सभागृहाच्या भावना लक्षात घेता ज्या काही तक्रारी याठिकाणी सभागृहामध्ये ज्यांनी केल्या, भाऊसाहेब असतील, पालांडेताई असतील, आशाताई शेंडगे यांनी सांगीतल्याप्रमाणे असं वाटत नव्हत की अशा गोष्टी याठिकाणी ऐकायला मिळतील. आयुक्त हे शहराचे आयुक्त आहेत. तुमच्या एकटयांना त्यांनी न जुमानता पुर्ण शहराचा त्या त्या व्यक्तीनी अपमान केलेला आहे. अशी ही व्यक्ती एवढी उध्दट असेल, एवढी गर्विष्ठ असेलतर त्यांच्यावर कारवाई ही करावी असा मी आपल्याला आदेश देते. त्याचबरोबर महीला पेशंटची त्याठिकाणी ज्या पध्दतीने वागणूक दिली जाते, सेवा केली जाते तेथे लेडीज वॉर्डमध्ये लेडीजच असल्या पाहीजेत. मग तो आरोग्य कर्मचारी असो किंवा सिस्टर असो त्यांनीच महीलां रुग्णाची सेवा केली पाहीजे असेही आपल्याला आदेश देते. त्याच बरोबर नाना काटे यांनी सांगीतल की मी बरेच फोन केले एवढे फोन करत असताना त्या व्यक्तीला किती त्रास झाला असेल. आम्ही जाणतो की या महामारीमध्ये डॉक्टर आपण सर्व एकच आहोत आपला आत्मा एकच आहे, आपली मन एकच आहेत. तरी पण ज्यावेळेस तुम्ही डिग्री घेता त्यावेळेस तुम्हांला प्रतिज्ञा दिली जाते त्या प्रतिज्ञाच आपण पालन करणं पेशंटच्या दृष्टिने त्या पध्दतीने राहण हे त्याच्याशी आपण बांधिल असू. तरी अशा पध्दतीने जे काही कोणी वागत असेलतर त्याठिकाणी सुध्दा लक्ष दयावे, त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी अशी मी आयुक्तांना विनंती करते. तसेच सर्व नगरसेवकांच्या भावनेचा विचार करुन आयुक्तांना पुन्हा एकदा आदेश देते की या

सर्व गोष्टीचे उत्तर पुढच्या सभेमध्ये आम्हांला समाधानकारक मिळल पाहीजे जेणे करुन परत अशी कोणी तक्रार करु नये याची अपण काळजी घ्यावी.

सर्वांच्या भावना विचारात घेता ही सभा शुक्रवार दि.२१/८/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिपरी ४११०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**
**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४६</u>**
**<u>( दिनांक २०/७/२०२० व २०/८/२०२० रोजीची तहकुब सभा)</u>**
**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक – २१.०८.२०२०</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २०/८/२०२० रोजी दुपारी २.०० वाजताची तहकुब मा. महापालिका सभा शुक्रवार दिनांक २१.०८.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.अश्विनी संतोष जाधव
६) मा.राहुल गुलाब जाधव
७) मा.वसंत प्रभाकर बोराटे
८) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
९) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२७) मा.गीता सुशिल मंचरकर

२८) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२९) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३०) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३१) मा.अनुराधा गणपत गोरखे

३२) मा.मंगला अशोक कदम

३३) मा.अश्विनी भिमा बोबडे

३४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३५) मा.संजय बबन नेवाळे

३६) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३७) मा.भालेकर प्रविण महादेव

३८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४३) मा.प्रमोद कुटे

४४) मा.राजू मिसाळ

४५) मा.शैलजा अविनाश मोरे

४६) मा.बाबर शर्मिला राजू

४७) मा.अमित राजेंद्र गावडे

४८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५१) मा.ढाके नामदेव जनार्दन

५२) मा.करुणा शेखर चिंचवडे

५३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५४) मा.अपर्णा निलेश डोके

५५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५६) मा.जयश्री वसंत गावडे

५७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.सुजाता सुनिल पालांडे

६०) मा.योगेश मंगलसेन बहल

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६५) मा.पाडाळे निता विलास

६६) मा.काळे उषा दिलीप

६७) मा.कोकणे संतोष अंकुश

६८) मा.पवार मनिषा प्रमोद

६९) मा.बारणे अर्चना तानाजी

७०) मा.अभिषेक गोविंद बारणे

७१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७२) मा.ॲड.भोसले सचिन सुरेश

७३) मा.बारणे माया संतोष

७४) मा.निलेश हिरामण बारणे

७५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७६) मा.कलाटे राहुल तानाजी

७७) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७८) मा.ममता विनायक गायकवाड

७९) मा.कामठे तुषार गजानन

८०) मा.चोंधे आरती सुरेश

८१) मा.कस्पटे संदिप अरुण

८२) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८३) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८५) मा.कुटे निर्मला संजय

८६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८८) मा.आंगोळकर सागर सुनिल

८९) मा.कदम शशिकांत गणपत

९०) मा.लोखंडे चंदा राजू

९१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९३) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९४) मा.नवनाथ दत्तू जगताप

९५) मा.संतोष बबन कांबळे

९६) मा.सोनवणे शारदा हिरेन

९७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९८) मा. संजय मल्हारराव वाबळे

९९) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१००) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-महापालिका आयुक्त, मा.संतोष पाटील-मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार - मा.अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे-अतिरिक्त आयुक्त (३), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.चारठाणकर – उपआयुक्त, मा.पवार- उपसंचालक नगररचना, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.इंदलकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे-अति.वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.निलेश बारणे –** मा.महापौर साहेब, एकनाथ थोरात – ज्येष्ठ सन्मा. माजी नगरसेवक यांचे तसेच अधिक थोरात- सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

**मा.संदीप वाघेरे –** मा.महापौर साहेब,अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

अ) महापालिका सभा क्रमांक - ३९ दिनांक २०/१२/२०१९, दि.६/१/२०२० व (दु.२.०० व २.२०), दि.१०/१/२०२० (दु.१.००) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ४० दिनांक २०/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ४१ दिनांक २०/२/२०२० व दि.२६/२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्रमांक – ४२ दि.२०/०३/२०२०, दि. २०/०४/२०२० (दु.१.४५ वा.) व दि.२०/५/२०२० (दु.१.४५.वा.) व दि.१/६/२०२० (दु.१.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

इ) मा.महापालिका सभा क्रमांक -४३ दि.२०/५/२०२० (दु.२.०० वा.) व दि.१/६/२०२० (दु.१.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ई) मा.विशेष महापालिका सभा क्रमांक - ४४ दिनांक १/६/२०२० (दु.२.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.आशा धायगुडे–शेंडगे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब, खरंतर आम्ही कुठेही चर्चा करीत असताना सांगतो की, आपल्याकडे पावसाळा सुरु झालेला आहे आणि या पावसाळयामध्ये कुठेह खोदाई नसली पाहिजे. अशा या भूमिकेतून आम्ही सगळे आपल्या मागे आहोत आणि आम्ही अनेक विषयाचा पाठपुरावा करीत असताना चुकीच्या पध्दतीने या शहरामध्ये खोदाई सुरु आहे. त्यातलाच एक विषय म्हणजे माझ्या वार्डामध्ये मागील २/३ दिवसापासून एका ठेकेदाराने खोदाई सुरु केली. आणि याची माहिती घ्यायला सुरुवात केल्यानंतर अशी कोण खोदाई करतयं आणि माझे अधिकारी मला न सांगता कशी काय खोदाई करतात कोणताही नगरसेवक असला तरी त्याला त्याच्या वॉर्डामध्ये खोदाईचे काम करायचे असेल तर या,या सिस्टीममध्ये हा रस्ता खोदायचा आहे हे त्या नगरसेवकांना

सांगितले पाहिजे. आणि मग माहिती घ्यायला सुरुवात केली तर समजलं की, एल ॲण्ड टी नावाच्या ठेकेदाराला स्मार्ट सिटीचं काम मिळालेलं आहे आणि त्यांनी त्याठिकाणी खोदाई सुरु केली. मग नंतर लक्षात आलं की, मागील ४ दिवसापुर्वी एका ठेकेदाराने फोन पण केला होता मी त्यांना म्हणले की, तुम्ही मला फोन करण्याची गरज नाही संबंधित विभागाचे जे माझे अधिकारी आहेत ते त्या संदर्भातील मला डिटेल्स सांगतील पावसाळा,सण या सर्व गोष्टी ज्याठिकाणी नागरीकांना त्रास होणार नाही या सगळयाचा अंदाज घेऊन खोदाई करु यात एवढं सगळया झाल्यानंतर सुध्दा परवा त्यांनी काम सुरु केलं सुरुवातीला मी माझ्या संबंधित अधिका-यांना विचारणा केली त्यांनीही त्याला सांगितलं की, त्याच ड्राईंग नाही, किती खोदणार आहे, पावसाळा झाल्यानंतर खोदाई करावी असे सगळे बोलणं झाल्यानंतर सुध्दा हा एल ॲण्ड टी हा शहरामध्ये स्मार्ट सिटीचं काम करु इच्छितो हा तुमचा – आमचा किंवा या शहराचा कोण लागतो का? की जो असा बेजबाबदारपणे वागतो. साहेब, आज त्यांनी चक्क माझ्या घरासमोरचं खोदाईचे काम सुरु केले आहे. आणि उद्या गणपतीचा सण आहे पाऊस दिवसभर चालू आहे, रिपरिप चालू आहे, कोरोनासारखी माहामारी या शहरामध्ये आलेली आहे. अशा वेळेला तो माझ्या बिल्डींगच्या खाली खोदकाम करतोय आणि तरी त्याला मला सांगायची गरज वाटत नसेल तर असा बेजबाबदार ठेकेदार असेल तर त्या ठेकेदाराला आपण काम द्यायचं कारण काय? हे तुम्ही या सभागृहात सांगायचं आहे. तो एवढं करुन तो थांबला नाही सकाळी ज्यावेळेस मला समजलं की, आमचीच लाईन करायला सांगितली मग मला वाटले की, गणपती विसर्जनाचा घाट समोर आहे आणि त्यासाठी हे काम असेल आणि म्हणुन मी त्यांना सांगितले की,जे काही असेल ते बघुन घ्या. आणि कळालं की, रस्ता तोपर्यंत ५० टक्के खोदूनही झाला होता. सकाळी १०.३० ची गोष्ट आहे. एवढी तत्परता कशी काय होती त्या कामाची त्याला विचारलं खोदाईसाठी कोणाची परवानगी घेतली तर त्याची ती मग्रुरीची भाषा होती. एल ॲण्ड टी वाला हा काय आपला कोणाचा बाप लागण्याचं कारण नाही तो ठेकेदार आहे आणि मुजोरी करणार असेल तर आमच्या शहरामध्ये यायचं नाही. तो सकाळी इथं आला आणि मला फाईल दाखवतो म्हणाला मी त्याला म्हणले तुम्ही दाखवण्याची गरज नाही माझा अधिकारी माझ्याशी बोलेल तो आल्यानंतर आपण चर्चा करु नंतर मी आयुक्तांना विचारले की, पावसाळयामध्ये तुम्ही परवानगी कशी काय दिलेली आहे. जिथं आख्खं शहर खोदाईला परवानगी नाही. मग समजलं की, आमच्या कमिशनर साहेबांनी परवानगी दिली. तुमचं लेटर आहे फाईलला परंतु तुम्ही अनेक शर्ती ठेवुन

त्यांना खोदाईस परवानगी दिलेली होती. त्यातली एकही गोष्ट त्या संबंधित ठेकेदाराने इम्पलीमेंट केलेली नाही. सकाळी किंबहुना आल्यानंतर यांच्याशी बोलता का? त्यांच्याशी बोलता का? हा सगळा कार्यक्रम माझ्या बिल्डींगच्या समोर झाला हे कितपत योग्य आहे. या शहराचे हे १३३ नगरसेवक आहेत ते आपआपल्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व करतात वॉर्डामध्ये पडलेला कोणताही खड्डा आमची बातमी करतो. पत्रकार बातमी लावतात हा खड्डा पडलेला आहे त्याकडे आशाताईचं लक्ष नसतं, आमच्या नगरसेवकाचं लक्ष नाही. ही त्यांची काही चुकी नाही आमच्या वॉर्डात खड्डा पडत असेल तर त्याची माहिती आम्हांला असणं ही आमची नैतिक जबाबदारी आहे. आणि हे सांगण्याची जबाबदारी तुमच्या अधिका-याची नाही का? मग तो ठेकेदार कोणीही असो एल ऍण्ड टी हे नांव जरी मोठं असलं तरी त्याच्याशी आम्हांला काही घेणं देणं नाही. जर माझ्या वॉर्डामध्ये खोदाई होत असेल त्याठिकाणी कसली लाईन टाकताय, त्याचं डिझाईन काय आहे, कसलं फ्रेमवर्क करतात याची जर मला कल्पना नसेल तर मी माझ्या संबंधित नागरिकांना ज्यांच्या जीवावरती मी नगरसेवक आहे, त्यांच्यामुळे मी त्याठिकाणी नगरसेवक आहे तिथे मी कसं उत्तर देणार ? त्यांनी जर मला विचारलं, ताई तिथं कसली खोदाई चालू आहे मी म्हणायचं का थांबा मी माहिती घेते हे कितपत योग्य आहे. तुमच्या संबंधित अधिका-यांकडून असा बेजबाबदारपणा मला बघायला मिळाला आहे. मी घरातनं खाली कोण आलं म्हणुन खाली आले,आणि त्यांना सांगितलं की, विषय सोडून द्या माझ्या अधिका-याची डयुटी १० ते १०.३० ला चालू होती आपण अधिका-याशी बोलू आणि या मग या विषयावर चर्चा करु म्हणुन मी घरी गेले. पण या ठेकेदाराला माज किती आहे बघा. मला स्वत:ला नगरसेवक असल्याची लाज वाटली जर का या ठेकेदाराकडे नव्हते. तरी या ठेकेदाराने माझ्या वॉर्डातील ४ लोकांना घेवुन सांगतो की, आशाताई यांनी असे,असे काम थांबवले आहे. साहेब, वॉर्डामध्ये अशा प्रकारचे वातावरण गढुळ करण्याचं काम सुध्दा हे सकाळी दिड/दोन तासामध्ये झालेलं आहे मी सकाळी ९.४५ पर्यंत खाली होते. मी भालकर साहेबांना फोन केला. माझं दु:ख एका साइडला आणि एका साईडला तुमचे ठेकेदार यांच्या बरोबर असणारे त्यांचे व्हेंडर्स आणि तिसरे तुमचे अधिकारी जर का मी एखादया जे.ई.,डेप्युटीशी बोलले असेल तर तुमच्या सिनीयर्सचे मला फोन यायला नको का? कमिशनर साहेब, ही पण गोष्ट तुम्हांला समजुन सांगायचे का, या सगळया गोष्टी तुम्हांला समजुन सांगायच्या असतील तर आपले अधिकारी घरी पाठवू आणि तुम्ही आणि आम्ही आपण आपल्यातच खेळ चालू द्या. तुमच्या भालकरांनी

मला एक फोन करायचा सुध्दा त्रास घेतलेला नाही. जर आपण त्या विभागाचे हेड म्हणुन जबाबदार असाल तर भालकरांनी मला फोन करायला नको होता का? परंतु भालकर साहेबांनी ती सुध्दा तसदी घेतलेली नाही. मीच त्यांच्या फोनची वाट बघीतले दुपारचे १२ वाजले होते परंतु आपण एखादयाचे पेपर नसल्यामुळे काम थांबवतोय म्हणजे आमच्या बिल्डींगमध्ये उद्या गणपती येणार आहेत कालपर्यंत तिथं चकचकीत रस्ता होता आणि आज दिड फुटाचा रस्ता खोदून ठेवलेला आहे. मला किमान कल्पना दिली असती तर मी कालच खोदा म्हणलं असत डिझाईन झाली असती, भालकरांनी साधा एक फोनही केलेला नाही. शेवटी मी भालकरांना एक मेसेज टाकला कारण मला एक रायटींग पुरावा हवा होता तुम्हांला सांगण्यासाठी त्यांनी सांगितल की, परमीशन दिली आहे म्हणुन त्यातल्या मी सगळया अटी वाचल्या त्याठिकाणी फोटो सेशन पाहिजे, त्याठिकाणी बॅरीकेटींग पाहिजे हे सगळे मुद्दे आम्ही त्याठिकाणी वाचले परंतु त्याठिकाणी कोणतीही उपाययोजना केलेली नसताना देखील संबंधित अधिका-याला मला कळवावं असं देखील वाटलं नाही. आमच्या वार्डातील नागरीकांची गरज काय आहे, आमच्या नागरीकांची नैतिक जबाबदा-या आम्ही काय,काय पार पाडल्या पाहिजेत. याची पुर्णपणे जाणीव आम्हांला असते आणि ज्यावेळेस तुम्ही आमच्याशी समन्वय साधता त्याचवेळेला आपण ख-या अर्थानी यशस्वीपणे काम करु शकतो. आज काय होते तुमचा एक ठेकेदार, एक अधिकारी आणि तुम्ही, यामध्ये तुम्हांलाच माहित नसते, काय काम चालू आहे. आज १३३ सदस्यांपैकी किती जणांना स्मार्ट सिटीचं काम कुठे चालू आहेत याची माहिती आहे. आपण नागरीकांसाठी स्मार्ट सिटी करतो आहे. आणि याची कल्पना आम्हांला असणे आवश्यक आहे. अधिका-यांनी सांगावे की, आमच्या वार्डामधुन कोणती लाईन कोठून जाणार आहे, त्याच ड्राईंग तयार आहे का? कोणती लाईन कोठुन गेली, हे त्यांना तरी माहिती आहे का? ज्यावेळेस आम्ही माहिती मागवतो त्यावेळेस आम्हांलाच माहिती मिळत नाही. मग तुमचे अधिकारी काय करतात. येत्या दिड /दोन वर्षामध्ये निवडणुका आलेल्या आहेत त्यामुळे नागरीकांसाठी सुध्दा आम्ही वचनबध्द आहोत. आम्ही त्यांच्यासाठी काम करणं लागतो. आयुक्त साहेब, आज सकाळी माझ्या बरोबर जी घटना घडली आहे ती इतरांबरोबर सुध्दा घडली असेलच असं मला वाटतं स्मार्ट सिटीमध्ये तुम्ही कोणत्या वॉर्डामध्ये काय,काय करणार आहात याची आम्हांला कल्पना नाही तर या संदर्भात तुम्ही काय करणार आहात आज सकाळी त्या ठेकेदाराकडे रस्ता खोदाईची कोणतीही परवानगी नव्हती, बॅरीकेटस नव्हत्या, पोलीस परवानगी नव्हती, पोस्टर बॉक्स नव्हता,

त्याला जा म्हणुन सांगितलं तरी तो स्वत:ची मुजोरी दाखविण्याचा प्रयत्न केला आणि तिथं पुन्हा काम चालू ठेवलं याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात हे मला सांगितलं तरच मी खाली बसणार आहे. अन्यथा मी खाली येऊन बसणार आहे.

**मा.महापौर** – आपण खाली बसा

**मा.आशा शेंडगे-धायगुडे** - मा.महापौर साहेब, स्मार्ट सिटी ही नक्की झाली पाहिजे. परंतु ती कोणासाठी आणि कशासाठी करतोय ते सांगितलं पाहिजे नां.

**मा.महापौर** – मी आयुक्त साहेबांना तशा सूचना देते.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, आशाताईंनी जो आता विषय मांडला आहे खरोखरचं स्मार्ट सिटी म्हणजे काय हे मला कळलेलं नाही. खरं तर आम्ही अस्मार्ट सिटीमध्ये असलेले नगरसेवक आहोत. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, ज्यावेळेस आपण स्मार्ट सिटीची मिटींग घेतली असेल त्यावेळेस बाकीच्या कुठल्याही नगरसेवकांना याची कल्पना नसते. खरंतर पदाधिकारी हे जर माझ्या वार्डामध्ये नसेल तर बाकीच्या चार नगरसेवकांनी काय करायचं वॉर्डामध्ये जे खोदकाम होत आहे ते एल ऍण्ड टी कडुन होत आहे. आणि त्याचे कुठलेही कागदपत्र आम्हांला दाखवले जात नाहीत. त्याही पेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे माझ्या इथल्या कुठल्याही अधिका-याला माहिती नसते मग तो कार्यकारी अभियंता असो, उपअभियंता, जे.ई.असो यांनाही काही माहिती नसते. आम्ही बिच्चारे आणि त्याही पेक्षा जास्त बिच्चारे हे अधिकारी आहेत. आज माझ्या इथे माझ्या पिंपरी मध्ये मंडईच्या इथे एक पार्कींग आहे पार्कींगच्या जागेजवळ एक क्रोमाचे शोरुम आहे त्या जागेमध्ये एक महिन्यापुर्वी खोदकाम सुरु केलं आणि मी त्यांना म्हणलं अरे बाबा, तुम्ही इथं करताय काय? तुम्ही स्मार्ट सिटीवाले आहात काय? ते म्हणले आम्ही स्मार्ट सिटी वाले नाही. स्मार्ट सिटी म्हणजे नेमकं काय ? स्मार्ट सिटी म्हणजे माझ्या घरासमोर एखादा बंगला बांधला असेल आणि माझी झोपडी असेल आणि त्या झोपडीमधुन तुम्हांला कुठं तरी रस्ता खोदायचा असेल आणि तुमच्या बंगल्यासाठी काम करायचं असेल ,अहो, पण माझी जी झोपडी आहे ते माझं घर आहे नां माझ्या प्रभाग क्र.२० मध्ये जर स्मार्ट सिटी नसेल तर पण माझ्या ज्या झोपडया आहेत ते माझं घर आहे नां माझ्या नागरीकांनी आम्हांला निवडुन दिले आहे त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं आमच्याकडे नसतात आणि जी आम्हांला गोष्टचं माहित नसते आणि २/४ दिवसानंतर ते खोदकाम १०० फुटापर्यंत येत त्यावेळेला आमचा एखादा नागरीक आम्हाला सांगतो की, अहो, ताई एक माणुस त्या खड्डयामध्ये पडला, आमची एक म्हातारी त्या

खड्डयामध्ये पडली त्यावेळेला आमच्या लक्षात येतं की, कुठं तरी खोदकाम चालू आहे. कमिशनर साहेब, याचं तुम्हांला उत्तर द्यावं लागेल. परंतु स्मार्ट सिटीच्या नावाखाली आमच्या वार्डामध्ये काही काम करीत असाल तर स्मार्ट सिटीच्या मिटींगला सुध्दा आमच्या सारख्या नगरसेवकांना बोलावलं पाहिजे. आणि तुम्ही आम्हांला का बोलवत नाही हे मला अजुनपर्यंत कळलेलं नाही. आणि प्रत्येक वेळेला मला वाटत स्मार्ट सिटीचंच काम ऐकतो आपण, वॉर्डामध्ये कुठलंच काम नाही, पण प्रत्येक काम स्मार्ट सिटी अंतर्गत होत आहे म्हणुन कुठला तरी कागद आणुन दाखवला जातो. आणि त्या कागदांवर कोणाचीही सही वगैरे नसते आणि कागद कोण दाखवतो तो पण त्या ठेकेदाराचा मुलगा त्यावेळेला कोणता नगरसेवक त्या मुलांबरोबर भांडण करायला जाणार आहे. कमिशनर साहेब, आपल्याला विनंती आहे की, आमच्या वॉर्डमध्ये स्मार्ट सिटीच्या अंतर्गत जी,जी कामे होत आहेत ती आम्हांला सांगितली पाहिजे. आपण २२ मार्च पासून कोरोनाच्या महामारी बरोबर लढतो आहे. कोरोनाचं संकट जे जगावरचं संकट असताना मला वाटत पीसीएमसीला येईपर्यंत मला वाटतंय आमच्याकडे थोडीशी संख्या कमी दिसत आहे. पण मार्च ते आता ऑगष्ट महिना चालू आहे या ५ महिन्यामध्ये वॉर्डामधील संपुर्ण काम ठप्प आहेत कोणत्याही अधिका-याला आपण विचारलं की, हे काम का झालं नाही, ते सरळ सांगतात की, ताई कोरोनाची डयुटी आहे. ऑफीसमध्ये कोणी सापडत नाही, आपल्या ऑफीस मध्ये बोलावलं कोणी येत नाही. फिल्डवर कोणाला बोलावलं तर तिथंही कोण येत नाही. आणि हे मी गेल्या ८ वर्षापासून सांगत आहे आणि हे आपल्या निदर्शनास आणण्याची गरजचं नाही आम्हांला, आमच्या संत तुकारामनगर मध्ये वाहतुकीची जी कोंडी आहे.टप-यांची गर्दी आहे, याच्यामध्ये कुठल्या पध्दतीने प्रशासन काम करीत आहे. ज्यावेळेला हे काम केलं जातं त्यावेळेला आम्हांला गेली ५ महिने प्रत्येक नगरसेवकाला एकच कारण सांगितलं जातय की, कोरोनाच्या महामारीसाठी आम्हांला कोविड सेंटर उभा करण्याचं काम लावलं आहे. आता मला या परिसराची पहाणी करायला लावलं आहे, तो एरिया सिल करायला लावला आहे. यामध्ये कोविडचे कर्मचारी, विदयुत,पाणीपुरवठा, स्थापत्य विभाग यांची लोकं आली आता कुठं १५ दिवसापासून मेंन्टनंन्सची काम करायला सुरवात केलेली आहेत. आता मला विदयुत विभागाबद्दल बोलायचं आहे, माझ्या एरियामध्ये ५० पोल असतील तर त्यातील १० ते १५ पोलवरची फक्त लाईट चालू असते. माझ्या प्रभागातील विदयुतचे जे.ई.दळवी, डेप्युटी धुमाळ, हे आहेत धुमाळ यांना कार्यकारी अभियंत्यांचा चार्ज दिला आहे यांना आम्ही प्रत्येक वेळेला ज्या,ज्या

वेळेस बोलतोय त्या,त्यावेळेला त्यांची उत्तरं विचित्र ऐकायला आम्हांला मिळतात. जर का मी एखादया कामाचा ठेका कोणत्या ठेकेदाराला दिला आहे असं विचारलं तर प्रत्येक वेळेला त्यांच्या कपाटाची चावी हरवलेली असते. म्हणजे त्यांच्या उत्तरामध्येच कन्फ्युज आहे. विदयुतचा जो जे.ई.दळवी आहे त्याला मला वाटतं रात्रीची १०० टक्के जास्त झालेली असेल, त्यामुळे तो दिवसभर झोपून असतो, तिसरं कारण असतं हॉस्पिटलमध्ये आहे, चौथं कारण म्हणजे त्याची बायको आजारी, त्याची आई आजारी, तो आजारी, पाचवं कारण असतं मी गाडीवर होतो. त्यामुळे मी तुमचा फोन उचलला नाही ताई, तो नेहमी गाडी चालवतो का? हे मला माहिती नाही. पण तो गेल्या ३ वर्षापासून माझ्या वार्डामध्ये आला आहे तेंव्हापासून विदयुतचं काम व्यवस्थित झालेलं नाही. पण त्याशिवाय त्याची परिसिमा आयुक्त साहेब, ऐकुण घ्या आमचे ४ नगरसेवक त्यातील ३ नगरसेवक एका पक्षाचे आणि १ नगरसेवक एका पक्षाचा पण आमचं राजकारण आमच्याशी, पण आम्ही हे राजकारण आमच्या नागरीकांशी खेळू शकत नाही. प्रभागामधुन आमचं एक टेंडर काढलं गेलं त्या टेंडर मध्ये आम्ही सगळे नियम बघत होतो. आज आपण पुण्यापासून स्मार्ट सिटी बघतोय, त्याच्यामध्ये प्रत्येक वेळेला असं वाटलं की, सुशोभिकरणाचे खांब काही देवळाच्या समोर आपण लावू या, मा.महापौर साहेब, ज्यावेळेस तुम्ही वॉर्डातील एखादया कामाचं उदघाटन करता त्यावेळेस तुम्ही ४ ही नगरसेवकांना सांगितलं पाहिजे. काम केलं आम्ही, आयडिया आमची, टेंडर काढताना आम्ही, आणि काम माझ्याच वॉर्डामध्ये आहे पण दुस-या नगरसेवकाच्या वॉर्डामध्ये होत आहे. आणि उदघाटन सुध्दा त्याच नगरसेवकाच्या हातून करुन घ्यायचं. का, बाकीचे नगरसेवक आम्ही जागेवर नव्हतो,एक फोन करता आला नाही, बरं, विचारलं फोन का केला नाही तर ,ताई चुकलो पुढच्या वेळेला करणार. ते झालं, माझं बोलणं दळवी बरोबर जे झालं त्याचं रेकॉंर्डीग धुमाळनी नोंदवलं आणि धुमाळनी ते रेकॉंर्डीग त्या नगरसेवकाला ऐकवलं आणि ते रेकॉर्डीग त्या नगरसेवकाने वॉर्डामध्ये दाखवून दिलं की, या वॉर्डामध्ये काम करायला ताईंचा अपोझ आहे. तुम्ही या अधिका-याला काय शिक्षा देणार आहात ते मला सांगा. प्रत्येकवेळी नगरसेवक म्हणुन त्यांना बोललं जात पण या अधिका-यावर काय कारवाई करणार आहात. मा.आयुक्त साहेब, हे मी आपल्याला सांगुन दोन महिने झाले, तुपेंच्या कानावर घातलं, अति .आयुक्तांच्या कानावर घातलं, सत्तारुढ पक्षनेत्यांच्या कानावर घातलं तरी सुध्दा आपण त्याच्यावर कारवाई केली नाही की, त्याची बदली सुध्दा केली नाही. नगरसेवक म्हणुन आम्ही त्यांच्याकडुन काही गोष्टी

नव्याने मागितल्या असतील तर त्यांनी आता इथं उभं रहावं आणि म्हणावं की, पलांडे ताईंनी हे मागितलं आहे म्हणुन, कमिशर साहेब, हे अधिकारी कुठल्या पध्दतीचं काम करीत आहेत. आणि का म्हणुन करतात ,त्यांनी कोणाची सुपारी घेतली आहे का? सत्ताधारी पक्षाला बोलण्याचं काम बाकीचे लोक जेंव्हा करतात तेंव्हा सत्ताधारी पक्षाचं वॉर्डचं काम करतात तेंव्हा अधिकारी या पध्दतीने वागतात. मला या विदयुतच्या अधिका-यांची शहानिशा केलेली पाहिजे. दळवी आणि धुमाळ यांनी या पध्दतीने का वागले त्यांना रेकॉर्डींग करायला कोणी सांगितलं, ते रेकॉर्डींग त्यांनी का केलं, आणि ते रेकॉर्डींग त्यांनी दुस-या नगरसेवकाला का दिलं, कोणाच्या सांगण्यावरुन दिलं याची मला माहिती पाहिजे. आज त्याला जेंव्हा विचारलं हे अधिका-याचं काम आहे का? बरं आम्ही त्यांना काही शिव्या दिल्या होत्या का, आम्हांला शिव्या पण देता येत नाहीत. जास्तीत जास्त मुर्ख म्हणुन शकते त्याच्यापुढे मी जाऊच शकत नाही. हे रेकॉर्डींग त्या दुस-या नगरसेवकांना द्यावं अशा अधिका-याला आपण काय शिक्षा देणार आहात हे मला सांगितलचं पाहिजे. आणि तुम्ही कुठल्या पध्दतीने करणार हे मला सांगायलाच पाहिजे. भाऊसाहेब, ही घटना पहिल्यांदा घडलेली आहे असे नाही, दुस-यांदा घडलेली आहे. प्रभागाच्या मिटींगमध्ये धुमाळनी “फालतू” हा शब्द एका नगरसेविकेला वापरला होता त्यावेळेस मी त्यांना सांगितलं की, “फालतू” हा शब्द तुम्ही नगरसेवकांना वापरता कसा? म्हणजे कुठल्या पध्दतीने अधिकारी काम करतात. गेली ४ महिने कोविड,कोविड हेच काम ऐकतो आम्ही. आणि त्याच्यामध्ये ही कामं करायला तुम्हांला वेळ मिळतो. या पध्दतीचं काम करायला त्यांना वेळ मिळतो. आणि हे काम आम्ही बघणार, शक्य नाही. तुम्ही या अधिका-यावर काय कारवाई करणार याचं मला उत्तर पाहिजे. मा.आयुक्त साहेब, प्रभागातील सर्व एरियाची चाळण झाली आहे, कोणताही माणुस नीट चालू शकत नाही. आज झाडांच्या फांदया कापण्यासाठी आम्ही लांडगेना कितीही फोन केले तरी या माणसाला काहीही फरक नाही. आज आपल्याकडे ५ महिन्यापासून बरेचसे लोक बेरोजगार आहेत, पोटापाण्याचा विषय आहे,चो-यामा-याचं प्रमाण वाढलेलं आहे. वल्लभनगरमधील मधील माझ्या मैत्रीणीच्या घरामध्ये चोरी झाली. का, तर तेथे कुठलेच लाईटचे पोल चालू नाहीत. उरले-सुरले जे पोल आहेत ते काही घरांमध्ये गेलेले आहेत त्याच्यामधुन कुठलाही प्रकाश रस्त्यावर पडत नाही. म्हणजे तुम्हांला नेमकं काय करायचं आहे, गार्डन विभाग पूर्णपणे झोपलेला आहे, एकही काम होत नाही. कुठल्याही झाडांची छाटणी होत नाही. यापुर्वी आपण पावसाळयापुर्वी झाडांची छाटणी करीत होतो. त्यांना विचारलं तर ते म्हणतात

की, आम्ही कोविड सेंटर मध्ये काम करतोय, आयुक्त साहेब, आम्हांला समजलं पाहिजे की, कोणत्या अधिका-यांना कोविड सेंटरमध्ये काम लावलेलं आहे. याचं उत्तर तुम्ही आम्हाला द्या. एखादं टेंडर काढताना तुम्ही आम्हांला विचारत सुध्दा नाही. लोकांची गरज आहे म्हणुन तुम्ही टेंडर काढता आहात  मग ही सुध्दा लोकांची गरज आहे लोकांच्या गरजा पुरविणं हे आपलं स्वत:च काम आहे. कमिशनर साहेब, वॉटर,मीटर आणि गटर या तीन मुलभूत गोष्टी जेंव्हा नगरसेवक देत असतो तेंव्हा त्या वॉर्डचं सुशोभिकरण आलं, वॉर्डातील बाकीच्या गोष्टी आल्या यासाठी सुध्दा नगरसेवकाला तोंड द्यावं लागतयं आणि ज्या पध्दतीनं मगाशी आशाताई म्हणाल्या की, आमच्या वॉर्डातील काय प्रॉब्लेम्स आहेत हे त्याठिकाणच्या स्थानिक नगरसेवकांना माहिती असतात. आज पिंपरी चिंचवड शहराचा भार हा संत तुकारामनगर,वल्लभनगर हा घेत आहे. आज रात्रं-दिवस आम्ही अंम्बुलंन्सचे आवाज ऐकतोय. रात्र-दिवस आज आम्ही कोविडचा पेशंट घेतोय. रात्र-दिवस आमच्या संत तुकारामनगर मधील लोक झोपत नसतील तर,दिवसभर आम्हांला फोन आहेत.  संत तुकाराम नगर एवढं झेपत असेल तर वायसीएमएच मध्ये तुम्ही ज्या पध्दतीने काम करताय त्यावेळेस तिथल्या नगरसेवकांना विचारात घेतलं पाहिजे की, नाही हे सांगा. वॉर्डामधील नगरसेविका आहे, एखादी नगरसेविका ओरडत असेल, एखादी पदावर असेल तर त्यामुळे  तिला बोलता येतयं बाकीचे कोणी बोलायला सुध्दा येत नाही तुमच्या जवळ वॉर्डामध्ये ज्यावेळेस तुम्ही एखादी गोष्ट करताय त्यावेळेस तिथल्या नगरसेवकांना तरी विचारात घ्यावे. आज तुमची अंम्बुलंन्स ही माझ्या वॉर्डातील रस्त्यांवरुन जाते. सतत आम्ही अंम्बुलंन्सचे आवाज ऐकतो. वायसीएमएच मधुन कोविडचे दोन पेशंट पळून गेलेले आहेत त्याची माहिती घ्या. त्यादिवशी माझ्या एका पायाच्या जवळ एक कोविडचा पेशंट होता त्यादिवशी मी रात्रभर झोपले नाही. आज आयसीयू मध्ये समजा मी कोविडचा पेशंट आहे तर माझ्या बरोबर येणा-या सिमाताई असतील तर सिमाताई माझ्या  वॉर्डामध्ये कुठे  रहातात त्या कुठल्या तरी फुटपाथवर झोपतात. जर असं असेल तर प्रभाग क्र. २० ला बाकीच्या फॅसिलीटी पासून का डावलताय तिथल्या नगरसेवकांना का सामील करुन घेत नाही. मा.आयुक्त साहेब, तुम्हांला विदयुतच्या अधिका-यावर तुम्ही काय ॲक्शन घेणार याचं तुम्हांला उत्तर द्यावं लागेल. याच्या पुढे माई जायचं नाही.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह माई, आज स्मार्ट सिटीच्या कॉन्ट्रॅक्टरकडनं आशाताईंच्या बरोबर जो काही धमकीचा प्रकार झालेला

आहे. त्याचा मी याठिकाणी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करते. आणि कमिशनर साहेब, वेळ खुप झाला आहे पण त्या ठेकेदारावर तुम्ही काय कारवाई करणार हे तुम्ही सांगितलं पाहिजे. स्मार्ट सिटीच्या अंतर्गत माझ्या वॉर्डात रस्ता खोदला त्यावेळेस माझ्या वॉर्डात डेप्युटी आला नां तेंव्हा मी कानफाटलं एवढा माज कसला आला आहे. आणि कोणाच्या जीवावर चालली आहे एवढी मुजोरी, आयुक्त साहेब, एल ॲण्ड टी ला काम दिलेलं आहे एल ॲण्ड टी नं कोणाला सामील केलेलं असेल तर त्यांनी एल ॲण्ड टी ची डोकेदुखी करायची आमची डोकेदुखी करण्याचं कारण नाही.अजिबात कारण नाही, आणि आम्ही खपवून सुध्दा घेणार नाही. तुम्ही दिवसाढवळया धाड,धाड जेसीबी लावून रस्ता खोदायचा मागच्या वेळेस सुध्दा मी सभागृहातच बोलले होते. तुम्ही रस्ता खोदताय, कोणाला सांगत नाही. घुबे साहेब, बघा बरं तिथं रस्ता खोदताय त्यांनी म्हणायचं ताई बघतो आम्ही पाणीपुरवठयाला, विदयुत विभागाला फोन करायचा सगळयांना फोन करायचे आम्ही फक्त बिनपगारी फुल अधिकारी आहोत ही आमच्या नगरसेवकांची ओळख आहे. स्मार्ट सिटी करताय म्हणुन आम्ही तुम्हांला पाठींबा देत आहोत. आणि या ठेकेदाराचा माजोरीपणा असेल तर त्याला आम्हांला पायबंद घालावा लागेल. आणि हा ठेकेदार आशाताईच्या वॉर्डात जाऊन तमाशा करतो हिंम्मत कशी झाली त्याची आणि आशाताईचा अपमान झाल्यासारखं त्यांनी काहीच बोलला नाही, मग त्यांनी मारायला पाहिजे होतं का? मग त्याला वाटलं असतं का? अपमान झाला म्हणुन, काय करायला पाहिजे होतं. भर पावसाळयात ८ व्या महिन्यात त्यांना रस्ता खोदाईची परवानगी दिलीच कशी आणि का? दिली साहेब, पाणीपुरवठा, विदयुत आणि एमएसईबीला आपण खोदाई करु देत नाही. बरं यांना खोदाईची परवागी दिली असेल तर त्याच्याशी आमचं काही देणं-घेणं नाही आमचं काही पोट त्याच्यावरती आलेलं नाही. ज्यांनी त्यांनी बघायचं तो कसा आहे ते मग यांनाच जर का परवानगी दिलेली असेल तर या सभागृहातील विरोधी पक्षनेते असतील, पक्षनेते असतील, महापौर असाल, तुम्ही असाल आणि पत्रकार बंधु असेल एक ठिकाणी नाही १०० ठिकाणी खोदून बघू ज्याठिकाणी तुम्ही डक पाडण्याचा दाखला दिला आहे नां त्याठिकाणी केबल उघडयावर पडलेल्या आहेत. १०० ठिकाणी सिमा सावळे खोदून दाखवेल आणि खोटं निघालं तर सिमा सावळे राजीनामा देईल. हे तुमच्या कानावर राहू द्या साहेब, आणि तरी तुम्ही आरे,रावी करता, अरे पोट भरताय, भरा नां बाबा, आमची कुठं मनाई आहे तुम्हांला, पण तुम्ही इतके खाली पडू नका ना,की या जगात जे,जे जगविजेते झालेले आहेत नां त्यांनाही विरोध झालेला आहे. त्यामुळे कोणी

भ्रमात राहण्याचं कारण नाही. आज आपल्या कुत्र्यांना आवर घाला नाही तर आम्हांला कंबरेत लाथ घालता येतयं आणि साहेब, तुमच्या त्या भालकरला समजुन सांगा नगरसेवकाच्या वॉर्डात तमाशा चालला आहे त्याठिकाणी तुमचा अधिकारी पोहचायला पाहिजे होतं, आणि तुमचा जो मेन कॉन्ट्रॅक्टर आहे त्याला घेवुन जायला पाहिजे होतं. भालकर कुठे होते, आयुक्त साहेब मी तुम्हांला कॉल केला त्यानंतर तुमचा मेसेज आला की, मी मिटींगमध्ये आहे तुम्हांला  कॉल करतो. साहेब, तुम्ही नाही नां, कोणाला फोन करावा वाटतच नाही. आणि म्हणुन, साहेब तुम्हांला याच्यावरती कठोर कारवाई करावी लागणार आहे. येत्या काही दिवसामध्ये मी तुमच्याकडे १०० मुद्दे मांडणार आहे. आणि विशेष म्हणजे तुम्हांला त्यावर कारवाई करावी लागेल. आताच माझी मैत्रीण सुजाताताई पालांडे यांनी धुमाळ बद्दल जो काही अनुभव सांगितला आहे तो आताचा आहे. अनमेक केबलच्या प्रकरणांमध्ये धुमाळ होते. तुम्ही त्याची बदली केली. महापालिकेची केबल चोरुन विकली होती. आणि सुजाता म्हणते त्यामध्ये तथ्य आहे. त्यांनी तसं वागवलंच असणार कारण तसंच वागतात  ते तसेच आहेत आणि नगरसेवकांना विचारायचं नाही, नगरसेवकांना माहिती द्यायची नाही मग कोणाला माहिती देताय तुम्ही आणि फोन रेकॉर्डमध्ये का?एखादया कार्यकर्त्यांने केलं असत तर आम्ही समजू शकलो असतो, त्याला आम्हांला कुठं तरी अडचणीत टाकायचं असतं आणि मग त्यानं ते रेकॉर्डींग पब्लीश केलं तरी आम्हांला काही वाटलं नसतं. कारण त्याचा कलच वेगळा असतो. अधिका-यांनी काय म्हणुन रेकॉर्डींग करायचं, अधिकारी सुध्दा आम्हांला उलट बोलतात आम्ही नाही रेकॉर्डींग करत आम्ही कोणाला ऐकवत नाही. आणि हा नवीनच पायंडा आहे.  आणि म्हणुन साहेब,आम्हांला आता काय होतयं, आता आम्ही कोविड  आहे, कोविड आहे म्हणुन आम्ही आपले आपआपल्या घरात असतो. आणि आजची बातमी काय, उद्याची बातमी काय, परवाची बातमी काय कधी पर्यंत आम्ही हे झेलायचं आयुक्त साहेब, या महानगरपालिकेमध्ये पीआरओ नेमला होता  आरोप झाले की, त्याची फाईल त्याने वाचायची त्याच्यामध्ये जे काही योग्य कागदपत्रं असतील ते प्रेसनोटला द्यायचे आणि त्याच्यावरती कारवाई करायची असं होतं. आपण पीआरओ बंद केले बांधकाम परवानगी विभागाला कुदळे होते, त्यानंतर पोरेड्डी होते आपण ती पीआरओ ची पध्दत बंद का केली हे मला माहित नाही. रोजच्या तुमच्या त्या बातम्या ऐकुण आम्हांला घाम फुटतो कारण आम्हांला असं वाटायला लागलं की, हो ला हो म्हणुन आपण त्याच्यामध्ये सामील आहे. नाही बोललं तर पुढचं मरण पण दिसतंय मा.आयुक्त साहेब, आशाताई बरोबर सकाळी जो

प्रकार घडलेला आहे त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहात त्याची माहिती देणेत यावी. आणि अशा प्रकारची मुजोर माजोरी करण्याचं काहीच कारण नाही. साधं कारण आहे, ताई मला माहिती नव्हतं आजच्या ऐवजी उद्या खोदाई करतो, सॉरी चुकलं माझं काही विषय नाही. त्यांनी जे वागलं ते योग्य नाही. आम्ही तुमच्यावर विश्वास टाकतो तुम्ही जे काही करताय ते चांगलचं करताय असं आम्हांला वाटतयं पण तुमच्या चांगुलपणाच्या नावाखाली काही धंदे करत असतील तर याठिकाणी कोणी मोकळं नाही. आशाताईच्या आणि सुजाता ताईच्या या दोन्ही प्रकरणांमध्ये तुम्ही काय कारवाई करणार याची माहिती द्यावी. फोन रेकॉर्ड करुन दुस-याला ऐकविणे ही हिंम्मत का केली फोन रेकॉर्ड करण्याची आणि स्मार्ट सिटीचा ७/१२ भालकरला देवुन टाकला आहे का? एक तर तुमचे अधिकारी फोन केला तरी उचलत नाहीत आणि उचलला तर मी मिटींग मध्ये आहे, मिटींग मध्ये आहे म्हणुन सांगायचं आणि मग आम्ही पण मजाक करतो आपण फोन करायचं आणि त्यांच्या केबीनमध्ये गेलं की, अधिका-यांनी केबीनच्या बाहेर जायचं आणि मग ते ओशाळवाणी हसणं, मग ते सॉरी म्हणणं हे कशाला पाहिजे. अधिका-यांना किती वेळ मिटींगमध्ये घेऊन बसताय, सगळी कामं आपण बंद करुन टाकली आहेत का? फक्त मिटींग, मिटींग ठेवली आहे का आम्ही कोविड आहे हे समजु शकतो नां. ज्यांना काम आहे हे आम्ही समजू शकतो नां, पण ज्यांना कोविडचं काम नाही ते सुध्दा त्याच्यामध्ये सामील होत असतात. मग आम्ही काय रिकामटेकडे आहोत का? आयुक्त साहेब, आपण यांना शिस्त लावणं फार गरजेचं आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याकडे एक मागणी आहे की, कोविडच्या संदर्भात आपण अनेक खरेदया केलेल्या आहेत त्या खरेदीच्या संदर्भात आपल्याला काय फरक पडतो प्रेसनोट काढायला, का काढत नाही प्रेसनोट, त्याठिकाणी का पीआरओ नेमला नाही. आणि तो प्रेसनोट काढून का माहिती देत नाही. कुठल्याही पक्षाचा नगरसेवक असो तुम्हांला काय फरक पडतो. तुम्हांला जे काय वाटायचयं ते वाटून घ्या पण आम्ही अशा प्रकारचं काम केलेलं आहे. असं का सांगत नाही आपण करतचं नाही, त्यामुळे रोज एकीकडनं तुमची बातमी दुसरीकडनं आमची बातमी भाजप कोविडच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार करतयं त्यामध्ये आमचा काय संबंध आहे, तुम्ही तर आम्हांला विचारत पण नाही. आता आशाताईच्या आणि सुजाताताईच्या प्रकरणांवरुन सुध्दा आपण पीआरओ नेमला पाहिजे होता. आणि या सगळया प्रकरणामध्ये अधिका-यांनी माहिती वेळेत द्यायला शिकलं पाहिजे. लपवण्याची काहीच गरज नाही. तुम्ही चुक झाली असेल तर तसं सांगा चुक झाली म्हणुन काय फरक

पडतो. चुकलं असेल तर चुकलं आणि नसेल चुकलं तर त्याची शिक्षा प्रशासन म्हणुन प्रशासनावर येत नाही तर सत्ताधारी पक्षावर येत असते. गुपचुप बसलो तरी बातम्या यायच्या काही थांबत नाहीत, बोललं तरी काही थांबत नाही. रोजचं बातम्या आहेत, आता हेडींग वाचलं की, आतमध्ये काय बातमी आहे ते लगेच कळतयं पण हे जास्त दिवस चांगल नसतयं,लॉंगटर्मसाठी अजिबात चांगल नाही. कोविडच्या काळामध्ये तुम्ही कोटेशन मागवुन जी,जी खरेदी केलेली असेल त्याची माहिती द्या. आता एखादी वाईट घटना घडली असेल, वायसीएमएच मध्ये काही धक्कादायक प्रकार घडला असेल, किंवा एखादा पेशंट धक्कादायक गेला असेल मग आपण लोकप्रतिनिधीची मदत घेता पण त्यांना विश्वासात घेणं आपल्याला जमत नाही. काही लोकांना या महापालिकेत येऊन चांगल काम पण करायचं आहे. हे आम्ही १३३ नगरसेवक निवडुन येतो नां त्यावेळेस आम्हांला काय त्रास होतो हे आमचं आम्हाला माहिती आहे. आणि एवढं झाल्यानंतर आम्ही या सभागृहात पोहचतो. इथं आल्यानंतर अनेक नवीन नगरसेवकांचा अपेक्षाभंग झालेला आहे. त्यांना कळतचं नाही आपण निवडुन आलो की नाही का फक्त हात वर करायला आलो की, घोषणा द्यायला आलो. कोण अधिकारी ऐकत नाही, कोण मोजत नाही, झालेलं काम विचारल्यानंतर सांगतो, विसरलो म्हणुन सांगतो. मला जर का काय माहिती काढायची असेल तर मी काढणारचं पण सगळयांनाच तसं होता येत नाही. म्हणुन साहेब,आपण आपली कार्यप्रणाली सुधारली पाहिजे. मा.महापौर साहेब, या ज्या रोजच्या येणा-या बातम्या आहेत त्याच्यामधील सत्ताधारी पक्षाला किती माहिती असते. पेपरवाला पेपर आणुन देतो, आम्ही घाई घाईने वाचायचं आणि बोलायचं घाईघाईत बोलतांना माणसाचं शब्द इकडे-तिकडे होतो नां. यासाठी तुमची प्रेसनोट निघाली पाहिजे. आणि त्याच्या पुढचं तुम्हांला सांगते तुम्हांला कोविडसाठी या,या वस्तु लागणार आहेत आणि त्या खरेदी करायच्या आहेत आणि त्यासाठी इतके कोटेशन मागवले होते त्यामध्ये लोअस्ट हा आलेला आहे म्हणुन यांना वर्कऑर्डर देण्यात येत आहे. आणि त्याची प्रेसनोट तुम्हीच सगळयांना पाठवून द्या. गटनेत्यांना,विरोधी पक्षनेता,सत्ताधारी पक्षनेत्यांना पाठवा आणि प्रेसला पण पाठवा. हे थांबवा नां, लक्षचं नाही तुमचं त्याकडं,आयुक्त साहेब, तुम्ही आम्हांला बजेटचं पुस्तकचं दिलं नाही,६ हजार पानं आहेत, आणि हा जो माझा चष्मा आहे नां याच्या पुढचा चष्मा लावायचा म्हणलं तर भिंगाचाच चष्मा लावावा लागेल. मला कळतचं नाही तुम्ही माझ्या वॉर्डामध्ये काय,काय काम करताय म्हणुन मग आमच्याकडे आता काय परिस्थिती आहे, आशाताईला वाटतयं माझ्या वॉर्डात कोरोना शिरलेला आहे त्यासाठी मला काही तरी

केलं पाहिजे, सुजाताताईला काय वाटतयं मला आता काही तरी केलं पाहिजे, तुषारला वाटतयं मी आता काही उपसूचना दिली पाहिजे.  आमच्या पक्षनेत्यांची आणि आमची रोज जुगलबंदी चालू असते आम्हांला माहितच नाही, आमच्याकडे पैसेच नाहीत म्हणुन बजेटचं  पुस्तकचं आलं  नाही. हे प्रशासनाचं अपयश नाही का? ठिक आहे नां साहेब, फेब्रुवारी मध्ये तुम्ही  स्टँडींगला बजेट दिलं होतं २५ मार्चला पहिला लॉकडाऊन लागु झाला होता. आणि २७ मार्चनंतर लॉकडाउन  लगातार पुर्णपणे  सुरु झाला जो आपला व्हेंडर आहे त्याचं दुकान बंद नव्हतं आमच्या नगरसेवकांचे शिफारस पत्र,लेटरपॅड, दाखले, सगळं छापलं आणि मग हे बजेटचं पुस्तक त्यांनी  का छापलं नाही. आम्ही तुमच्याकडे आलो तर तुमच्याकडे तोंडपाठ असण्याचं काही कारणचं नाही नां तुम्ही काय सुपर कॉम्प्युटर थोडचं आहात  ते तुमच्या मेमरीमध्ये राहणार आहे, तुम्हांला सुध्दा विसर पडू शकतो. छोटया कामासाठी किती बजेट ठेवल आहे आणि मोठया कामासाठी किती बजेट ठेवलं आहे. काहीच माहिती नाही. आणि त्याच्यावर आपल्याकडनं काहीच होत नाही. ऑगष्ट महिना संपायला आलेला आहे. संपुर्ण इंडस्ट्री चालू झाली आहे आपण पुस्तक का छापलं नाही. छोटं पुस्तक तरी छापा त्या नगरसेवकाला तरी कळू द्या तुम्ही त्यांच्या वॉर्डासाठी  किती पैसे दिलेले आहेत तुम्ही पुस्तकचं छापलं नाही तर आम्हांला कसं कळणार आम्हांला माहित नाही तर आम्ही ऍटोमॅटीक उपसूचना देणार आणि त्या उपसूचनावरती गेलं की, विरोधी पक्षाला वाटणार की, यांनी माझ्याच वॉर्डातील पैसे काढले की, काय त्यांनाही माहिती नाही की, त्यांच्या वॉर्डात पैसे आहेत की, नाही. मी प्रशासनाला दोष देत नाही पण त्याच्यासाठी पर्टीक्युली माणसं नेमलेली आहेत मग त्या लोकांनी काय काम केलं. आता तुम्हांला सांगते कोळंबेना फोन केला साहेब, मला अशी,अशी उपसूचना द्यायची आहे त्यासाठी कोठुन निधी देता येईल का? ताई, लगेच पाठवा मी तुम्हांला सांगतो निधी कोठुन देता येईल लगेच कोळंबेकडे येऊन गेले आणि आमच्या पक्षनेत्यांनी कोळंबेला फोन केला अहो, हे काय केलं तुम्ही ते म्हणले मला नाही माहिती त्यांना माहितीच नाही आम्ही सगळे एकत्रच बसलोय. म्हणजे तुम्ही आम्हांला समोरासमोर मुर्ख बनवताय, वेडयात काढतायं तुम्ही आम्हांला कशासाठी, का नाही त्यांनी सांगितलं की, पाचच मिनिटांपूर्वी असा,असा अर्ज दिलेला आहे कोणताही निधी या वर्षभरात खर्च होणार नाही. कारण उरलेल्या ५/६ महिन्यामध्ये तर कामच होऊ शकत नाही. सांगु शकले असते नां, नाही सांगितलं  काल डेप्युटी,कार्यकारी अभियंता जाऊन भेटून आला, मग त्यांनी काय केलं एका फोनवर कोळंबे, आशाताई ऑनलाईन आहेत आणि मग त्यांच्यामध्ये तमाशा

चालू हे काय चाललंय साहेब, अहो, इतके मुर्ख नाहीत आम्ही, आम्ही मुर्ख बनतो वेळप्रसंगी तुमच्यावरची वेळ बघुन, मुर्ख नाही, विश्वास टाकतो. आणि विश्वास ठेवत असल तर त्या विश्वासाला सार्थ ठरण्याचं काम तुमचं सुध्दा आहे. तुमचं म्हणजे तुम्ही वैयक्तीक घेऊ नका, तुमच्या अधिका-यांच. तुम्ही काम चांगल करताय पण तुमच्या बरोबरचे जे पिलर आहेत ते तुमच्या पुढे ढासळलेले आहेत तुमच्या पुढे दाखवताना एक चित्र असतं आणि आमच्याकडं वेगळं चित्र असतं, कधी तरी आमच्या चित्रात डोकावुन बघत जा, आम्ही जे सांगतो ते खोटं सांगत नाही, काही गरज नाही आम्हांला तुमच्याकडनं काही नको आहे, तुमच्याकडनं काय फायदा करुन घ्यायचा नाही, तुम्हांला कुठं फसवायचं नाही. काहीच नाही, फक्त एकदा आमचं चित्र डोकावत चला, नगरसेवक जे म्हणतात ते या संस्थेचे विश्वस्त आहेत त्यामुळे ते खोटं बोलत नसतात. आयुक्त साहेब, तेवढी काळजी घ्यावी. मा.महापौर साहेब, सुजाता ताई, आणि आशाताईच्या प्रकरणांमध्ये स्ट्राँगली ॲक्शन झाली पाहिजे. त्याच बरोबर आपण बजेटच्या पुस्तकाच काय करणार आहात ते पण आपण सांगितलं पाहिजे. कोविडच्या कालावधीमध्ये झालेल्या खरेदीवरती आपल्याकडनं प्रेसनोट का जात नाही. याचा सुध्दा आपण खुलासा करणं फार गरजेचं आहे. आणि आपण त्याठिकाणी आपला प्रसिध्दी प्रमुख नेमला पाहिजे. तुमचा प्रसिध्दी प्रमुख म्हटला तर महापालिकेचा पीआरओ नको रे बाबा म्हणतील . नवीन माणुस टेक्नीकल माणुस द्या ज्याला ज्ञान आहे. तुम्ही शिरीष पोरेड्डीला दिलं तरी आम्हांला चांगल वाटेल कारण त्यांनी त्या विषयावरती काम केलल आहे. आणि त्यांना ती सिस्टीम माहिती आहे. आणि तुम्ही ते करावं. आणि मा.महापौर साहेब, या दररोजच्या बदनामीनी तुम्ही आम्ही लक्षात घेतलं पाहिजे आता काही दिवसात दिवाळी येईल त्यामध्ये सगळीकडे ढोल वाजतील आणि मग तुम्ही किती भारी, मी किती नालायक तो कसा, असा म्हणजे हे सगळं चालू होईल. आपल्याला इकडे यायला वेळ कमी भेटणार आहे. अधिका-यांकडनं आपण काम करुन घेतलं पाहिजे. मा.आयुक्त साहेब, सुजाताताई आणि आशाताईच्या संदर्भात आपण काय निर्णय घेणार आहात हे ऐकायला आम्हांला निश्चितपणे आवडेल आणि कारवाई झाली पाहिजे ही मागणी करते.धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, आताच आशाताई आणि सुजाताताईंनी सांगितलं आहे की,एल एण्ड टी च्या संदर्भात खोदकाम करत असताना त्याठिकाण् कोण व्यक्ती होता त्यांनी त्यांच्या बरोबर कशा प्रकारे

दादागिरी करण्याचा प्रयत्न केला. अधिकारी कोण होता, कोण ठेकेदाराचा माणुस होता तसेच सुजाताताईंनी सांगितल्याप्रमाणे डेप्युट इंजिनियर यांनी फोन रेकॉर्डींग केलं आणि दुस-या नगरसेवकांना ऐकवलं विशेष करुन महिला सदस्यांच रेकॉंर्डींग केलं ही अतिशय गांर्भीर्यपुर्वक गोष्ट आहे त्यामुळे आपण मा.आयुक्तांना आदेश देण्यात यावे की, प्रत्यक्षदर्शनी यामध्ये कुठला अधिकारी होता त्याने कुठलं रेकॉर्डींग केलं, त्या रेकॉर्डींगमध्ये काय आहे आणि ते का केलं अशा संदर्भात त्याचा पुर्णपणे तपास करणेत यावा. आणि त्यामध्ये जर तो दोषी असेल तर त्याच्यावर कारवाई करावी. अशा पध्दतीचे आदेश आपण आयुक्तांना द्यावे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, माझ्या बिल्डींगजवळ त्या ठेकेदाराने ५० ते १०० माणसं जमा केली. मी ५ मिनिटामध्ये घरी निघुन गेले आणि काम बंद कर. आयुक्तांशी बोलून करु. त्यानंतर त्यानी एवढा मुजोरपणा करण्याचं कारण नाही. भालकरांनी आम्हांला त्याच उत्तर पण दिलेलं नाही. आयुक्त साहेब, मी त्या कॉन्ट्रॅक्टरच्या कानफाडीत लावू शकले असते. आणि ते केलं असत तर नगरसेवक प्रत्येक वेळेला वाईट होतात.

**मा.महापौर –** मा.आयुक्त साहेब, मी आपणाला आदेश देते की, आशाताईच्या वॉर्डामध्ये आणि पालांडेताईंच्या वॉर्डामध्ये कॉन्ट्रॅक्टरला काम देताना नगरसेवक हा त्या वॉर्डामधील मंत्री आहे आणि त्यालाच त्या वॉर्डातल्या गल्लीबोळात काय अडचणी आहेत हे त्यालाच माहिती असतात असे असताना ज्या ठेकेदारांनी गैरवर्तन, रेकॉर्डींग प्रकार असे प्रकार ज्यांनी केलेले आहेत त्यांच्यावर कारवाई करावी आणि वेळ पडली तर त्याला सस्पेंड देखील करणेत यावे. पिंपरी चिंचवड शहर हे त्या ठेकेदाराच्या बापाने खरेदी केललं नाही त्यामुळे त्याला ही शिक्षा झाली पाहिजे. आणि ही कारवाई येत्या २ दिवसामध्ये करावी. कारण कारवाई उद्या करतो हे ही आम्हांला चालणार नाही. आणि या शहरात अशा घटना पुन्हा घडु नये.

**मा.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १

दिनांक -२१/०८/२०२०

विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.मसाभां/५/कावि/१०३/२०२०, दि.२८/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८९९ दि.२८/२/२०२० अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५३३
दि.०१/०६/२०२० अन्वये.

मनपाच्या परिसरातील रुग्णालये व इतर संलग्न (मनपासह) जैव वैदयकीय संस्थामधून निर्माण होणा-या जैव वैदयकीय कच-याची याबाबतचा कायदा, नियम व मागदर्शक सुचना या गोष्टींच्या योग्य त्या अंमलबजावणी बाबत गांर्भियाने विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता मोशी येथे जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाटीचा Plant स्थलांतरीत करण्यासाठी M/s.Pasco Environmental Sol. Pvt. Ltd., यांनाच करारनामा अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करुन संचालन पुढील १५ वर्षे करावे की नव्याने निविदा काढावी ? याबाबत विचारणा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ, ब, क व ड चे अवलोकन करुन मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील काम मे.पास्को इन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांचे कडून अट क्र.२२ नुसार चालू Terms वर नवीन Plant स्थापन करून पुढील १५ वर्षे संचालन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.निलेश बारणे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या विषयाचे संबंधित अधिकारी कोण आहेत त्यांना याठिकाणी बोलवावे.

**मा.डॉ.साळवे ( अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील रुग्णालये व इतर संलग्न (मनपासह) जैव वैदयकीय संस्थामधून निर्माण होणा-या जैव वैदयकीय कच-याची विल्हेवाट लावण्याचा विषय आहे. त्याच्यासाठी आपण गेल्या १५ वर्षापेक्षा जास्त काळापासून M/s.Pasco Environmental Sol. Pvt. Ltd., ही संस्था काम करते आहे. ह्या

प्रकल्प वायसीएमच्या आवारात चालू होता, अजूनही आहे आणि २०११ पुर्वी तो तेथून इतरत्र शिफ्ट करण्याचा विषय विचाराधीन होता.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, पहिलं टेंडर कुठल्या वर्षी निघालं.

**मा.डॉ.साळवे ( अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी) –** मा.महापौर साहेब, पहिलं टेंडर २००४ साली निघालं होतं. त्यानंतर २०११ ला मा.स्थायी समिती, मा.महापालिका सभेच्या मान्यतेने जागा देण्याचं ठरवलं त्याचप्रमाणे पास्कोच्या नावाने लिजडीड तयार केलं, २०१५ साली त्याच्या सर्व परवानग्या घेऊन पर्यावरणाचा अभिप्राय घ्यावा असे शासनाचे आदेश प्राप्त झालेले आहेत आणि तसा नियम आहे. आणि त्याप्रमाणे तशी प्रक्रीया चालू केली आहे.

**मा.सिमा सावळे** – साळवी साहेब, कामाचं स्वरुप सांगा.

**मा.डॉ. साळवे ( अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी) –** मा.महापौर साहेब, त्यांनी सीपीसीबी, एमपीसीबीच्या २०१६ च्या गाईडलाईन नुसार मनपाच्या परिसरातील रुग्णालये व इतर संलग्न (मनपासह) जैव वैदयकीय संस्थामधून निर्माण होणा-या जैव वैदयकीय कच-याची विल्हेवाटीचा प्लँन्ट तयार करण्यासाठी आपण त्यांना जागा देणार आहोत.

**मा.सिमा सावळे** – तो काय फुकट करतो का आपल्याकड.

**मा.महापौर** – साळवी साहेब माहिती देत आहेत ती घेतल्यानंतर तुम्ही तुमचे प्रश्न विचारायचे असतील त्यासाठी वेळ देते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, ४/५ महिन्यापासून हा विषय आहे. तुम्ही याचा चार्ट तयार का केला नाही. प्रायव्हेट हॉस्पिटलसाठी किती आणि याच्यासाठी किती हे पण सांगा.

**मा.निलेश बारणे-** मा.महापौर साहेब, प्रत्येक एलो बॅग, पांढरी बॅग याचा पर किलोनी काय रेट हे पण सभागृहाला सांगा. वर्षाच बिलींग किती आहे हे पण सांगा.

**मा.डॉ.साळवे ( अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, आर्थीक माहिती माझ्याकडे आता याच्यामध्ये नाही.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त ,सन्मा.सभागृह खरंतर ही तहकुब सभा आहे. साळवी साहेब, तुम्हांला या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ब-यापैकी वेळ मिळालेला आहे. मला आश्चर्य वाटतयं की, तुम्ही असा विषय आणलाचं नाही पाहिजे होता. १०/१५ वर्षापासून आपण त्यांना दिलेलं होतं आणि आता पुढचं अग्रीमेंट करण्यासाठी पक्षनेते या विषयाचं काय करायचं आहे. कारण तुमच्या व्हीप मध्ये हा

विषय मंजुर म्हणलेले आहे. आयुक्त साहेब, तुम्ही असे विषय आणता कशाला दुस-या बाजुला तुम्ही म्हणताय की, हे सगळं प्रशासन करतयं, प्रशासनावर तुमचा अंकुश नाही नां, आयुक्त साहेब, यांना तुम्ही महिन्याला २७ ते २९ लाख रु.देताय आणि तुमच्या हॉस्पिटलच्या रजिस्ट्रेशनचे पैसे किती जमा होतात ७ ते ८ लाख रु. एवढी मोठी तफावत असताना तुम्हांला सभागृहाला माहिती सुध्दा देता येत नाही. ही माहिती आम्ही तुमच्याकडनंच घेतली नां, आयुक्त साहेब, आपण हा विषय मागे घेणेत यावा आणि या विषयाची निविदा प्रक्रिया करावी आमचा या विषयाला मुदतवाढ देण्यास विरोध आहे. साळवी साहेबांना व्यवस्थित माहिती देता येत नसेल तर त्यांच्यावर कारवाई करणेत यावी. साळवी साहेबांना स्थायी समितीमध्ये सुध्दा माहिती देता येत नाही. साळवी साहेब, तुमच्या अंडर आम्हांला कामाला यावं लागेल. ज्यावेळेस आम्ही तुमच्याकडनं माहिती घेतो ती माहिती तुमच्याकडे नाही. एक तर यामध्ये समन्वयाचा अभाव आहे का, कोणाच्या दबावाखाली विषय घेऊन आला आहे का? आयुक्त साहेब, अशा प्रकरणाची चौकशी लावणेत यावी. असं नाही झालं पाहिजे. हा विषय ज्यांनी कोणी ठेवला असेल त्यांना बोलवा.

**मा.महापौर-** साळवी साहेब तुम्हांला याची माहीती दयावी लागेल.

**मा.डॉ.साळवे ( अति. आरोग्य वैदयकीय अधिकारी)** – मा.महापौर साहेब, साधारणपणे १० ते १२ लाख रु. पास्कोला देत असतो.

**मा.सिमा सावळे –** २५ खाटाच हॉस्पिटल असेल तर एवढ, ओपीडी असेल तर एवढ असं सांगा ना या विषयासाठी गेल्या २००९ वर्षापासून मागे लागले आहे मी.

**मा.राहुल कलाटे -** माई, याविषयाची पुर्ण माहिती देण्यास सांगा नाही तर हा विषय फेटाळून लावणेत यावा. आणि साळवी साहेबांनी माहिती दिली नाही तर त्यांच्यावर कारवाई करावी. या विषयाची निविदा प्रक्रीया राबविणेत यावी.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह एमपीसीबीचे हे कागदपत्रं आहेत त्यांनी महापालिकेचं आणि पास्कोच डिपॉझिट जप्त केलेलं आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. पिंपरी चिंचवड विभागाचे एमपीसीबी यांनी महापालिका आणि पास्को या ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. यासंबंधीची मिटींग २/७/२०२० साली झालेली आहे त्याची कुठलीही पुर्तता नाही. एमपीसीबीच्या अटीची आपण कुठलीही पुर्तता केलेली नाही. आणि महत्वाचं म्हणजे या कंपनीची स्थापना २०१५ ची आहे. म्हणजे हे सगळं ठरवून केलेलं

आहे का? मागच्या वेळेस सत्ता कोणाची होती आणि आता कोणाची आहे. याच्याशी आम्हांला काही घेणं-देणं नाही. म्हणजे हे सगळं ठरवून चाललं आहे ६ महिन्यापुर्वी टेंडर यायला पाहिजे होतं. आपण या विषयाचं टेंडर पण काढलं नाही. आणि आता परत १५ वर्षासाठी द्यायला निघाले आहात. का ? असं करताय, प्रत्येक हॉस्पिटल, प्रत्येक क्लिनिक यांच्याकडनं एक प्रकारची फी आकारली जात असते प्रत्येक वेळेस वेगवेगळे चार्जेस आकारले जातात. पर कॉटला काही रुपये त्यांना एक किलो किंवा याचे पैसे लावले जातात. त्याचे कॉट वाढले तर त्याचे पैसे पास्को कंपनी जास्त घेते त्यांच वर्षाचं ट्रॅन्झक्शन किती आहे ते विचारावे. कॅपॅसिटी किती आहे ते विचारा, त्यांनी प्लॅन्ट कुठे लावला आहे तर तो वायसीएमएच मध्ये लावला आहे. वायसीएमएच मध्ये लावलेले प्लॅन्ट कितीचे आहेत ते विचारा त्याची पुर्तता आहे का? पास्कोवर कंम्पलेट करण्याचे आदेश दिलेले आहेत.आणि एमपीसीबीने क्षमता वाढविण्यासाठी आदेश मागच्या वर्षी दिलेले आहेत. तुम्ही क्षमता वाढविलेली आहे का? याच्यासाठी ५ लाख ५० हजार रु.ची गॅरंटी ही जप्त केलेली आहे. अजुन ४ लाख रु.ची गॅरंटी शिवाय ८ लाख रु.ची गॅरंटी नाही दिली तर ते पण जप्त करणार आहेत. मग तुम्ही त्याचा का लाड करताय तो महापालिकेचा जावई आहे का? काय झालं आहे, सगळयांनी वाटून घेतलेलं आहे. वैदयकीय विभाग याचा, टीडीआर याचा, भांडार विभाग याचा, स्थापत्य विभाग याचा नगरसेवकांनी काय याठिकाणी गोटया खेळायच्या का? याला नाही दिलं की, तुम्ही कायदा सांगताय, अहो, टेंडर बनलंच कसं, कंपनी २०१५ सालची आहे आणि तुम्ही टेंडर २०१५ ला काढलं आहे तुम्ही त्याच्यासाठी टेंडर काढलं आहे का? ६ महिन्यापुर्वी त्याची मुदत संपली त्याचवेळेस टेंडर का काढलं नाही. मी महाराष्ट्र शासनावर देखील आरोप करतो, त्यांनी काय केलेलं आहे प्रत्येक जिल्हयाला एकचजण नेमलेला आहे, म्हणजे त्याची मक्तेदारी त्यांनीच कचरा गोळा करायचा, का असं करताय तुम्ही, कुठं तरी हे थांबलं पाहिजे आणि या कामाचं टेंडर काढलं पाहिजे. कोणा बरोबर तरी शटलमेंट करायचं अर्धे काम त्याला, अर्धे काम याला, काय चाललंय काय? या विषयाला आमचा सगळयांचा विरोधच आहे. एनजीपी मध्ये जर कोणी गेले तर पिंपरी चिंचवड महापालिकेवर कारवाई होईल.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या साळवी साहेबांचं काय करणार आहात? ४ महिने झालं विभाग प्रमुख म्हणुन त्यांनी विषय मांडला विषयपत्रामध्ये विषय मंजुर करावा म्हणुन तुमचं पत्र आहे. साळवी साहेब,

आपण उत्तर द्यायला कॅपेबल नाहीत, आपण माहिती देवु शकत नाही, आपण चार्ट तयार केला नाही. अहो, आम्ही नगरसेवक आहोत, तुमच्या पेक्षा आम्ही सगळे आंगठेबहाद्दर आम्ही सुध्दा कागदं घेऊन येतो, विषय वाचुन येतो, सिक्वेन्स लावुन येतो, सिक्वेन्स ठेवतो, तुम्हांला नाही जमलं का? कारण तुम्हांला ती माहिती मुळात सभागृहाला द्यायचीच नाही. २००४ साली पहिल्यांदा ज्यावेळेस टेंडरींग झालं त्याचवेळेस १५ वर्षासाठी देणं चुकीचं होतं. तरी सुध्दा तुम्ही त्यांना १५ वर्षासाठी हा प्रकल्प चालवण्यास मंजुरी दिली. १५ वर्ष चालवायला दिल्यानंतर त्यांनी वायसीएमच्या पाठीमागे हा प्रकल्प चालू केला. तिथे प्रदुषणाची हानी झाली नाही का? महापालिकेने त्याच्यावर काय कारवाई केली. २०१२ साली आपण त्यांना मोशी कचरा डेपो येथे जागा देण्यास मंजुरी दिली. मागची पंचवार्षीक संपली आता या दुस-या पंचवार्षीकमधील ३ वर्ष संपली ८/८ वर्ष लागतात शिफ्टींगसाठी आणि तुमची जी कारणं आहेत ती डोळयाला भिंग लावुन वाचावी लागतात इतकी बारीक अक्षर छापता तुम्ही, तुमचं पहिलच आहे की, बीएमडब्ल्यू प्रकल्प मोशी येथे हलविण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन मोशी येथील जागेसाठी नाहरकत दाखला प्राप्त झाल्याच्या तारखेपासूनचा घटनाक्रम २०११ पासूनचा आणि मग त्याला दाखला प्राप्त झाला म्हणुन त्यालाच द्यायचं का? ज्यांना एमपीसीबीचा दाखला आणण्यासाठी १५ वर्ष लागली तरी त्यांना तुम्ही काम देता. ज्यांनी पर्यावरणाची हानी केली त्यांचा कसला लाड करता तुम्ही. आयुक्त साहेब, या कामासाठी परत टेंडरींग करायला पाहिजे. समजा, हा खुप चांगला आहे, नियमांच पालन करतो, हरकत नाही, रिटेंडर करा, अटी/शर्ती सांगण्याची तुम्हांला गरज नाही, कोणाला कसं बसवायचं असत ते तसे हुशार आहेत, बरोबर टाकतील, सिमा सावळे उंची ५ फुट ४ इंच, वजन ७२ किलो, रंग असा सगळंच टाकणार त्याच्यामध्ये संतोष पाटील फिक्स होणार नाही ना, सुजाता ताई होणार नाही ना, आशाताई होणार करा तसं करा, आमच ते ही म्हणणं नाही, पण टेंडर तर करा,कॉम्पीटीशन तर होऊ द्या, शर्यतीमध्ये कोण पुढे येतो ते तरी बघु मग ठरवु आपण कोण पहिला येतो,कोण दुसरा येतो, हा काय धंदा आहे एकालाच १५ वर्ष द्यायचं, तुम्ही काय, आम्हांला त्यातलं आर्थिक गणित सांगत नाही. म्हणजे याचा अर्थ असा आहे का इथं बसलेल्यांना कोणालाच माहित नाही. आणि जे,जे याठिकाणी बसलेले आहेत त्यांना १०० टक्के माहिती आहे. फक्त बोलून कोण दाखवितो त्याच्यावरती विषय असतो. का त्यांनी माहिती दिली नाही. ४ महिने झालं सभागृह चालू नाही. चार्ट का तयार नाही, मगाशी आम्ही तुम्हांला सगळयासमोर बोललं असेल

त्याचा तुम्हांला राग आला असेल.आता आम्ही काय करायचं ते सांगा आम्हांला या विषयामध्ये आम्ही करायचं ते सांगा, तुमच्या सारख्या हुशार अधिका-यांकडनं ही पध्दत योग्य नाही. परत १५ वर्ष द्यायचं काही कारण नाही. फार,फार तर ३ किंवा ६ महिन्याची मुदतवाढ द्या आणि टेंडर कॉल करा. त्या अटिवरतीच तुम्ही टेंडर कॉल केला पाहीजे. मुदतवाढ देण्यासाठी तुम्हाला आमच्यापर्यत येण्याची गरज नाही. ती मुदतवाढ तुमच्या स्तरावरती द्यायचं आणि टेंडरींग प्रोसिजर राबवायचं आणि मग त्याच्यामध्ये खुप मोठया संस्था इन्व्हायरन्मेंट मध्ये काम करतात एकटा पास्कोच करीत नाही. तुम्ही सगळया लोकांना संधीच देत नाही. मागचे १५ वर्ष खराब गेले आणि पुढचे १५ वर्ष खराब होणार त्याच्या आयुष्यातले तीस वर्षे गेल्यानंतर तो काय धंदा करणार आहे. नवीन लोकांना तुम्ही संधी द्या नां आयुक्त साहेब, आपण एखादयाचं करीअर बरबाद करतो. आणि हॉस्पिटलसारख्या ठिकाणी गेली १५ वर्ष हा प्रकल्प चालू आहे. एमपीसीबीने त्याला दंड मारला त्याचवेळेस आपण त्याच्यावर काही तरी कारवाई करायला पाहिजे होती. आपण आपला दंड चालू करायला पाहीजे होता. पण आपण काहीच केलं नाही. म्हणुन मा.महापौर साहेब, आपण एक तर हा विषय फेटाळून लावावा. या विषयाची गंमत सांगते, २००४ ला टेंडर झालं आणि २०१४ ला एमपीसीबीकडे अर्ज केला. आणि एनव्हायरमेंटकडनं क्लीअरन्स यायला तुम्हांला पण माहिती आहे. तुम्ही पण काय नवीन नाहीत एन्व्हायरमेंट क्लीअरन्स व्हायला फास्ट प्रक्रीया होते. याच्या पुर्वी सुध्दा एन्व्हायरमेंट क्लीअरन्सचे विषय झालेले आहेत. यांनी अर्जच केला नाही. अर्ज कधी केला तो बघीतला पाहिजे आपण अर्जच केला नाही त्यामुळे क्लीअरन्स उशिरा मिळालं आहे. आणि मग आपण का डोळेझाक करतो. तुम्ही याला २/३ महिने मुदतवाढ द्या. नाही तर साहेब,मला दरवाजे वाजवावेच लागतील. कारण एखादयाच करीअर तुम्ही लॉक करु शकत नाही. प्रशासनाच काम आहे की एखादया टेंडरची मुदत संपत असेल तर त्यासाठी ३/६ महिने आगोदरच टेंडर प्रक्रीया राबविली पाहिजे. नगरसेवकाच काम नाही. आम्हांला याच्यामध्ये घेवू नका आम्ही जर तेवढे बुध्दीमान असतो तर आम्ही तुमच्या ठिकाणी बसलो असतो. आणि तुम्हांला इकडं बसवलं असतं हे आमचं काम नाही. हे काम तुमचं आहे. त्या,त्या विभागाने निर्णय घ्यायला पाहिजे. आणि हा निर्णय संबंधित विभाग घेणार नसेल तर त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे हे जर का आम्हाला भोगावं लागत असेल पुढचे पंधरा वर्षे तर तसं चालणार नाही. कमिशनर साहेब, तुम्हांला निर्णय घ्यावा लागेल कारण पत्र तुमचं आहे. तुमचं पत्र नसत तर आजच विषय फेटाळून लावू शकलो असतो. आपण

याला मुदतवाढ का देतो याच एक तरी कारण आम्हाला सांगा. १५ वर्षासाठी हा विषय आलेला आहे. आयुक्त साहेब, तुम्ही आमचं मार्गदर्शन घेऊ नका अशी आमची तुम्हांला विनंती आहे पास्कोनी या पालिकेमध्ये मागची १५ वर्ष धंदा केलेला आहे. डॉ.साळवीनी या विषयाची माहिती द्यायची. नाही तर तुम्ही यांच्यावर काय कारवाई करणार ते सांगा. आताच सांगा, मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,या विषयाच्या संदर्भात आपण चुकीचा निर्णय घेऊ नये. आम्हांला तसं पण प्रकल्प बंद पाडता येतो. नाही येत, अशातला भाग नाही. फक्त त्या लेवलला येऊ नका,आणि त्या लेवलला गेलो तर तुमची आणि आमची लाढाई चालू होणार आहे. हे तुमचं आमचं काम नाही साहेब, टेंडर काढायचं काम प्रशासनाचं असतं प्रशासनाने डोळेझाक केलेली आहे. त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार हे तुम्ही आम्हांला सांगायचं आणि आज यांनी या सभागृहामध्ये माहिती दिलेली नाही. त्या पास्कोला एमपीसीबीचा दाखला मिळाला म्हणुन पुढची १५ वर्ष काम द्यायचं हे नैसर्गीक न्यायाला धरुन होत नाही. आणि म्हणुन महापौर साहेब, या विषयाला मी कडाडून विरोध करते. धन्यवाद.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह कमिशनर साहेब,तुम्ही आमच्या कोर्टात बॉल टाकता परंतु तुम्ही हा विषयचं चुकीचा आणलेला आहे. अशी आपल्याला मुदतवाढ देताच येत नाही. फक्त तुम्ही एन्व्हायरमेंट सर्टीफिकेट आणलं पण हे जागा बदलण्यासाठी सर्टीफिकेट आहे. तुम्ही जागा बदलू शकता याचा अर्थ त्याच संस्थेला काम द्यावं असा त्याचा अर्थ होत नाही. आणि साळवी साहेबांनी मला स्वत:ला सांगितलं होतं की, ताई ४५ हजार रु.भरल्याशिवाय मी तुम्हांला रजिस्ट्रेशनच देवु शकत नाही. माझे फक्त ४ ते ५ कॉटस् आहेत. साळवी साहेब, या गोष्टी तुम्हांला माहिती नाही याचे आश्चर्य वाटतयं मला आयुक्त साहेब, आम्ही साळवी साहेबांकडे किती तरी वेळा गेलो आहे की, पास्को हा सर्व प्रायव्हेट प्रॅक्टीशनरला अतिशय काटयावर पकडतो. खुप अवास्तव चार्जेस लावतो. ते चार्जेस कमी करावेत यासाठी किती तरी वेळा आपल्या संघटनेची प्रस्तावना झालेली आहे. आपण त्याच्यावर काहीही केलेलं नाही. आणि तुम्ही म्हणताय की, माझ्याकडे माहिती नाही याचं मला आश्चर्य वाटतयं तुम्हीच सगळयांना माहिती देताय आणि आज तुमच्याकडे माहिती कशी काय नाही. कॉट बेसिसवर चार्जेस आकारले जातात वर्षाला आमच्याकडनं फी आकारली जाते परंतु मोठया हॉस्पिटलला प्रॉब्लेम येत नाही. ज्यांचे १० ते १५ कॉटस् आहेत त्यांना यामध्ये खुप अडचणी येतात त्यांना आपण बंधन लावल पाहिजे की

याच्यावर तुम्ही घेतलंच नाही पाहिजे. आता सिमाताईंनी सांगितलं की, पास्कोला १५ वर्ष आपल्याला देता येत नाही. परंतु आपण ती पण अडचण बघीतली पाहिजे की, एखादा जर वर्षभरासाठी मशिन लावत असेल तर तो वर्षभरासाठी लावेल का? ही पण अडचण त्याठिकाणी बघीतली पाहिजे. तो वर्षभरासाठी तरी तो काम करेल का, किंवा त्याला ५ वर्षासाठी तरी द्यावे लागेल का, सहा वर्षासाठी दयावे लागेल हे सगळ कॅलक्यूलेशन आपण केलं पाहिजे होतं. आणि आता जर का मुदतवाढ दिली नाही तर तुम्ही काय म्हणणार जी.बी.ने मान्यता दिली नाही म्हणुन मी पास्कोला काम दिलेलं नाही. मला हेच कळत नाही की, आतापर्यत याचं टेंडर प्रोसेस का झाली नाही. याचं उत्तर मला पाहिजे. हे आपण देवुच शकत नाही हे तुम्हांलाही नियम माहिती आहे. तुम्ही १५ वर्ष मुदतवाढीचा विषय आणलाच कसा आपण मुदतवाढ जास्तीत जास्त १ वर्ष देवु शकतो हे तुम्हांला पण माहिती आहे. मग आपण १५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यासाठी आमच्या कोर्टात बॉल टाकण्याचं कारण काय? वर तुम्ही म्हणणार आम्हांला जी.बी.ने परमिशन दिलेली नाही. हे आमच्या कोर्टात नका टाकू प्रशासनाने आम्हांला सांगावं की या ठरावामध्ये तथ्य आहे का? आणि तथ्य नाही तर आतापर्यंत याचं टेंडर का काढलं गेलेलं नाही. हे पक्षनेते तुम्हीच बघीतलं पाहिजे. मग आम्ही म्हणायचं का प्रशासनावर वचक नाही, आता कोविडचा काळ चालू आहे तरी सुध्दा असे चुकीचे प्रस्ताव तुम्ही सभागृहासमोर आणता आणि आम्ही म्हणलं याचं टेंडर काढावे मग तुम्ही म्हणणार पास्को मटेरीयल उचलणार नाही मग आम्ही काय करणार मटेरियल उचललं नाही तर मग प्रशासन आणि तुम्ही काय करताय हा सर्वात मोठा प्रश्न आहे. वायसीएमएच मध्ये ब-याचपैकी टेंडर प्रोसेस झाली मग ही का झाली नाही. तुम्हांला काय वाटलं आम्ही १५ वर्ष मुदतवाढ देऊ म्हणुन झाली नाही का? तुम्ही टेंडर प्रोसेस करायला पाहीजे होती आयुक्त साहेब, तुम्ही तुमच्या परीने क्लीअर रहायला पाहिजे होतं. तुम्ही चुकीच्या पध्दतीने चाललेल्या कामाला त्याचठिकाणी आळा घातला पाहिजे होता. तुम्ही म्हणताय की, हायफ्लो ऑक्सीजन थेरोपीची मशिन आता सगळेच चालले आहेत १ लाख,३लाख रु.ला मी काल पेपरला बातमी वाचली.मी काल फोन केला आपल्याला गरज आहे का ? तर १०० टक्के गरज आहे. आज पिंपरी चिंचवडला बिर्ला आणि लोकमान्य हॉस्पिटलला मी फोन केला त्यांना म्हणलं की, इन्सुमिटर घेण्याच्या ऐवजी तुम्ही हायफ्लो मशिन घ्या तर तिथे फक्त एकच मशिन उपलब्ध होती. दुसरी मशिन मेन्टनेसला होती अशा वेळेस काय करायचं आयुक्त साहेब, तुम्हांला ही माहिती आहे की, आताच्या काळात हे गरजेचं आहे. मग तुम्ही हे असे विषय का

अटकवले आहेत. सिमाताई आताच म्हणाल्या की, तुम्ही पेपरला स्टेटमेंट लगेच का देत नाही. हा विषय गरजेचा आहे हे तुम्हांला चांगलं माहिती आहे, नसेल तर मग तुम्ही आणता का? आम्हांलाही विषय ऐकल्यानंतर अतिशय दु:ख वाटतयं नक्की भ्रष्टाचार होतो की नाही. मग परत आम्ही म्हणायचं का तुम्ही विरोधक बोलतात मग आम्ही परत म्हणायचं का सत्ताधा-यांचा वचक नाही. मग सत्ताधा-यांनी स्टेटमेंट का काढलं नाही की, आम्हांला या,या मशिनची गरज आहे. १ लाख रु.च्या ऐवजी ३ लाखाला गेलेली नाही. हे तुम्ही लगेच का म्हणलं नाही. याचा अर्थ इथे कोणाचंही कोणाला देणं-घेणं नाही कोणी रिंग करायच्या मागे लागलय, कोणी पैसे कमवायच्या मागं लागलयं पण याठिकाणी लोकांची धिंडवडे का काढताय आज वायसीएमएच मध्ये इन्सुमिटर कमी आहेत हायफ्लोच्या मशिन जर जास्त उपलब्ध असतील तर पुढच्या स्टेजला तो पेशंट जात नाही. आता कोविडचे पेशंट ६०० ते ७०० पर्यंत येत होते म्हणुन मी आपले अभिनंदन करण्यासाठी फोन करणार होते परंतु ज्या दिवशी फोन करणार होते त्याच दिवशी १ हजार पेशंट आले. म्हणजे पेशंटची संख्या कमी जास्त होत आहे आपल्याकडे मृत्युदर कमी आहे. त्यादिवशी ४१ मृत्यू झाले, आम्ही तुम्हांला विचारत नाही मृत्यु का होत आहेत याच्याकडे लक्ष दिलं पाहिजे. डायबेटीस हा कॉमन प्रॉब्लेम आहे. मी काही पेशंटला विचारलं त्यांना टॅमीफ्ल्यु, रेमडेसिव्हर इंजेक्शन सुध्दा दिली जात नाही मग कसा पेशंट बरा होणार आणि मग मॉडरेटचा पेशंट तो हायरिस्कवर जाणार मग ज्यावेळेस मॉडरेट पेशंट असतात मग ज्यावेळेस माईल्ड पेशंट असतात त्याचवेळेस आपल्या वायसीएमएच मध्ये टॅमीफ्ल्यु टॅबलेट का दिली जात नाही. रेमडेसिव्हर इंजेक्शन ज्यावेळेस मॉडरेट होतो त्यावेळेस आयसीयु मध्ये गेल्यानंतर त्याला रेमडेसिव्हर इंजेक्शन आणि टॅमीफ्ल्यु सुरु केलं जातं. ही पध्दत चुकीची आहे. या पेशंट कडे आपण बघीतलं पाहिजे. ज्या मशिन उपलब्ध आहेत त्या तुम्ही घ्या. पण लगेच तुम्ही आम्हांला सांगा यामध्ये कोणताही भ्रष्टाचार नाही यामध्ये हे चार कोटेशन आहेत या मशिन गरजेच्या आहेत आणि त्या घेणे आवश्यक आहे ते तुम्ही सांगीतले पाहीजे. परंतु यामध्ये जेंव्हा आम्हांला बाहेरुन काही ऐकायला मिळतं तेंव्हा आम्हांला खरंच दु:ख होतं. अशा पध्दतीने झालं नाही पाहिजे. याठिकाणी तुम्हीच आळा घातला पाहिजे, आम्ही तुमच्याकडे विश्वासाने बघतोय. सत्ताधा-यांचा काहीही वचक राहिलेला नाही, ते काही बोलतही नाहीत. ते काही खुलासाही करीत नाहीत, जिथ मलई आहे तीथ सत्ताधारी आहेत.......

**मा.महापौर –** वैशाली आपण डॉक्टर आहेस, विषयावरच चर्चा करावी.

**मा.वैशाली घोडेकर** – मा.महापौर साहेब, विषयावरच बोलते, सभागृहात असे चुकीचे विषय येत असतील तर तिथे आपण आळा घालावा आणि त्वरीत स्टेटमेंट देण्यात यावं. कोविडच्या काळात लोकांच्या जिवान-मरणाचा प्रश्न ज्यावेळेस निर्माण होतो त्यावेळेस आपण तिथं लक्ष घातलं पाहिजे. स्वच्छतेचा प्रश्न ज्याठिकाणी निर्माण होतो तिथं आपण १०० टक्के लक्ष घातलं पाहिजे. जर अशा बातम्या येत असतील तर त्यामध्ये सत्ताधा-याचं एकही स्टेटमेंट आलेलं नाही. असं असेल तर आयुक्त साहेब,आपण यामध्ये लक्ष घालावं आणि दुस-या मशिन घ्या पण लोकांना वेठीस धरु नका. पुर्ण पिंपरी चिंचवडच्या आरोग्याच्या बाबतीत, स्वच्छतेच्या बाबतीत लोकांना वेठीस धरु नका  ही विनंती सत्ताधारी आणि प्रशासनाला करते.धन्यवाद.

**मा.महापौर** – आरोग्याच्या बाबतीत महापालिकेचा ७ वा नंबर आलेला आहे.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह  आताच सन्मा.सदस्या वैशालीताई म्हणाल्या की,सत्ताधा-यांचा प्रशासनावर वचक राहिलेला नाही. या पास्कोचा विषय २००४ सालचा आहे त्यावेळेस या महापालिकेत बीजेपीची सत्ता नव्हती.आता बीजेपी मध्ये असलेले बरेचसे नगरसेवक हे त्यावेळेस राष्ट्रवादीमध्ये होते.  म्हणजे असं नाही की, एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत कधी इकडं तर कधी तिकडं आता दुसरी गोष्ट डॉ. पवन साळवेचा विषय जी.बी.मध्ये मुख्य आरोग्य वैदयकीय अधिकारी म्हणुन करायचा विषय आलेला होता.त्यावेळेस सर्व सभागृहाने त्यांना विरोध केला आणि मी त्यावेळेस सांगितलं गेलं की, यांची कोर्टात केस चालू आहे तुम्ही यांना ॲडिशनल चार्ज देवु शकता असं मी त्यावेळेस त्यांना सांगितलं होतं ही माझी चुक झाली त्यावेळेस मी त्यांना मदत केली. त्यांचा माझा तसा काहीच संबंध नाही. वैदयकीयचा मला आजपर्यंत कधी संबंध आला नव्हता पवन साळवे हे कोण व्यक्ती ते मी ओळखत नव्हतो. पण माझे एक सिनीअर ॲडव्होकेट आहेत त्यांनी सांगीतल की आपले पक्षकार आहेत त्यांना मदत करा म्हणून मी केलं. त्यांचा माझा काही संबंध नाही. आणि मी या महापालिकेत पैसे कमवण्यासाठी आलेलो नाही एक विश्वस्त म्हणुन आलेलो आहे मला याठिकाणी ५ वर्ष चांगल काम करायचं आहे. आणि आता ज्या बाकीच्या गोष्टी याठिकाणी सांगितल्या आहेत ज्यांचे उद्योग आहेत, ज्यांचे नाहीत ते ब-यापैकी सगळयांना माहिती आहे. मा.आयुक्त साहेब, छत्रपती

शिवाजी महाराजांच्या काळामध्ये ४०० वर्षापुर्वी असं होतं की, वेतनदारी पध्दत होती. म्हणजे कुठलेही सरदार,सैनिक,सेनापती यांना वेतन दिलं जायचं आणि ते लोक जबाबदारीने काम करायचे आणि मुघलांच्या काळात वेतनदारी पध्दत नसुन वतनदारी पध्दत होती. आज असं झालं आहे की, अजित पवार साहेब, त्यांच एक वतन वेगळं म्हणजे तुम्ही राजे आणि तुमच्या खालचे हे सगळे सरदार प्रविण तुपे, विदयुत विभाग त्यांची वतनदारी, जरांडे सुरक्षा विभाग त्यांची वतनदारी, चितळे साहेब भांडार विभाग त्यांची वतनदारी आयुक्त साहेब, हे कुठं तरी थांबवा गेली तीन वर्ष आम्ही तुम्हांला सांगत आहे. आम्ही याठिकाणी आमच्या घरचे विषय घेऊन येत नाही तर संपुर्ण शहराचे विषय घेत येत आहोत. तुमचं जर कमांड नसेल तर आणि मी मागे पण बोललो आहे की राजा होईल व्यापारी आणि पिंपरी चिंचवडची प्रजा भिकारी होईल. आयुक्त साहेब, वायसीएमएची आणि इतर हॉस्पिटलमध्ये काय परिस्थिती आहे यासंदर्भात मी आपल्याला १ आणि १० तारखेला अशी दोन पत्रं दिलेली आहेत. मग नंतर पत्र दिलं की, कोरोना हा आजार आपल्या शहरामध्ये येईल बाकीच्या पुढच्या गोष्टी होतील. तुम्ही क्वारंटाईन आणि आयसोलेशन वॉर्ड तयार करावे त्यानंतर तुम्हांला अजुन एक पत्र दिलं की, तुम्ही जेंव्हा जिजामाता हॉस्पिटल, भोसरी हॉस्पिटल याठिकाणी व्हीजीट दिली त्यावेळेस तुम्हांला डॉ.वाबळेनी सांगितलं की, वायसीएमएच ला नको तीथे पी.जी.चे डॉक्टर आहेत, अमुक आहे, अभ्यासक्रम आहे आणि बाकीचे जे पेशंट येतील त्यांना आपण भोसरी हॉस्पिटल, जिजामाता हॉस्पिटल करु आयुक्त साहेब, या कोरोना आजारामुळे आमचे दोन सहकारी सदस्य आणि या महापालिकेचे कर्मचारी/ अधिकारी गेलेले आहेत याला जबाबदार आपणचं आहोत नां. वायसीएमएच हॉस्पिटल हे तुम्ही पुर्णपणे कोरोना सेंटर करा यासाठी मी तुम्हांला पत्र दिलं,सांगितलं परंतु तुम्ही ऐकलं नाही नंतर मला विभागीय आयुक्तांना पत्र देवुन सांगावं लागले की, तुम्ही व्हीजीट करा त्यांनी व्हीजीट केल्यानंतर तुम्हांला आदेश दिले की, वायसीएमएच कोरोना सेंटर करावे म्हणुन मग तुम्ही तो निर्णय घेतला. माझा काही या डॉक्टरांशी संबंध नाही, मी काय एमबीबीएस वगैरे नाही पण माझ्या ओळखीचे चार लोक आहेत ते आम्हांला सांगतात असं,असं झालं तर असं,असं होईल. आणि चांगल्या माणसाचं ऐकुण आम्ही तुम्हांला सांगतो. आता वायसीएमएच ला जी परिस्थिती आली आता हा पास्कोचा विषय १५ वर्षापुर्वी कोणाच्या काळात कसा झाला, कसा नाही एमपीसीबीने यांना नोटीस दिलेली आहे की, महापालिकेने त्यांच्यावर कारवाई करावी. क्लिअरकट आदेश दिलेले आहेत. साळवी साहेबांनी या सभागृहात विषय आणलेला आहे पण

त्यांना त्या विषयाची माहिती सुध्दा देता येत नाही, आणि त्यांना आकडेवारी सुध्दा देता येत नाही. या शहरात १५ वर्षापुर्वी जास्तीत जास्त ५०० हॉस्पिटल असतील. पण आजच्या स्थितीमध्ये ४ ते ५ हजार पर्यंत असतील. प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे प्रत्येकांनी हॉस्पिटल टाकलेले आहेत. तीथल जे बायोवेस्ट जमा होतय ते तीथे जातय बाकीच्या गोष्टी होतात तो त्याला ती चार्जेस लावतो काय करतो हे बघीतले पाहिजे पवन साळवेंना त्यातलं काहीच माहिती नाही. आणि तुम्ही एक चांगल काम केलेलं आहे की, आपल्याला जे पीजेचे डॉक्टर भरायचे होते त्याच्यामध्ये मुख्य वैदयकीय अधिकारी म्हणुन पवन साळवेची नियुक्ती केलेली नाही. तुम्ही संतोष पाटलांची आरोग्य हेड म्हणुन नियुक्ती केलेली आहे. म्हणजे तुम्हांला यांच्या कार्यक्षमतेवर पुर्ण विश्वास होता का? हे कॅपेबल नाहीत म्हणुन यांना घेतलं नाही पाहिजे, संतोष पाटील यांनाच घेतलं पाहिजे. मग असं असताना असे जर विषय येत असतील तर अशा अधिका-यांवर तुम्ही कारवाई केली पाहिजे. याच्यामध्ये काय होतं माहिती आहे का? तुमची वेळ निघुन जाते आणि पक्ष याठिकाणी बदनाम होतो. आणि याठिकाणी प्रत्येकाने तुम्हांला सांगितलं आहे की, येत्या दिड वर्षामध्ये निवडणुका येत आहेत आणि इथं आम्ही आमच्या घरचे प्रश्न घेऊन येत नाही तर लोकांचे प्रश्न घेऊन येत असतो. तुमच्या सारखे अधिकारी किंवा बाकीच्या अधिका-यांच सोप आहे अभ्यास केला, परिक्षा दिली आणि चांगल्या मार्कांने पास झालं की सिलेक्शन होतयं पण आम्हांला लाख सव्वा लाख लोकांमधुन निवडुन यायचं म्हणजे आम्हांला काय,काय करावं लागतयं हे आमचं आम्हांला माहिती आहे. ठिक आहे, आमचं वय वगैरे झाल्यामुळे आम्ही तुमच्या सारखे अधिकारी होऊ शकत नाही. पण तुम्ही तुमच्या अधिकारी पदाचा राजीनामा देवुन आमच्या सारखं निवडणुकीला उभं रहा बरं, म्हणजे समजेल. आता डांगे मॅडम याठिकाणी असत्या तर त्यांनी इतंभूत माहिती दिली असती. साळवी साहेबांना कोणाचा तरी सपोर्ट लागतो. प्रत्येक मिटींगला डांगे मॅडम सोबत असतात, त्यांची पोस्ट काय आहे. त्या गाडी वगैरे वापरतात तुमचं लक्ष आहे का त्याच्यावरती. प्रत्येक हॉस्पिटल बरोबर सेटलमेंट करायच्या, बाकीच्या गोष्टी वगैरे करायच्या खाली काय, काय चालतयं ते आम्हांला पण माहिती आहे. आम्ही काय तुम्हांला सगळया बारीक-सारीक गोष्टी सांगायच्या का? तुमची यंत्रणा सक्षम पाहिजे. मा.महापौर साहेब, हा विषय तहकुब वगैरे करु नका, डायरेक्ट फेटाळण्यात यावा किंवा यावर मतदान घ्यावे. मा.महापौर साहेब, तुम्ही आयुक्तांना असे आदेश द्या की, पवन साळवेवर क्लिअरकट कारवाई झाली तरी चालेल. त्यांना असे आदेश द्या की, त्यांच्यामध्ये

सुधारणा करावी आणि त्यांनी सुधारणा केली नाही तर येत्या दिड वर्षामध्ये निवडणुका आहेत त्यामध्ये भारतीय जनता पार्टीला फायदा होईल नाही तर परिस्थिती अवघड होईल. नागरीकांचा फायदा करा,त्यांच्या माध्यमातून पक्षाचाही फायदा होईल. एवढं बोलून थांबतो जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या पास्कोच्या संदर्भामध्ये प्रपत्र अ याठिकाणी लावलेलं आहे. आयुक्त साहेबांनी जो विषय मांडलेला आहे त्यामध्ये डॉ.पवन साळवेंनी त्यांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु या सभागृहाला जी काही माहिती पाहिजे होती ती माहिती या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये साळवे साहेबांनी याठिकाणी आणायला पाहिजे होती. ज्यावेळेस विषयपत्रिकेवर विषय येतो त्यावेळेस त्या विषयाची माहिती सर्व सन्मा.सदस्यांना असते मग आपण तर अधिकारी आहात,आपणच विषय आणलेला आहे १५ वर्षापासून कधी त्यांनी एमपीसीबीची मान्यता घेतली, जनरल बॉडीने त्यांना कधी मान्यता दिली हे सगळं प्रपत्र अ मध्ये त्याची माहिती दिलेली आहे. आपण या सभागृहाला सविस्तर माहिती सांगू शकत नाही. यासंदर्भात आपण खाजगी रुग्णालयांकडुन किती पैसे घेणार, त्यात आपण कुठल्या प्रकारचे पैसे घेणार खाजगी रुग्णालये यांच्याकडुन पर Kg कसा रेट असणार यासंदर्भात सविस्तर माहिती घेणेत यावी यासाठी हा विषय तहकुब ठेवणेत यावा अशी मी विनंती करतो. डॉ.पवन साळवे आपण पुढच्या जनरल बॉडीला विषय आल्यानंतर या विषयाच्या संदर्भातील याची संपुर्ण माहिती घेऊन यावे. तोपर्यंत विषय तहकुब करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ तहकुब ठेवणेत यावा अशी मी सूचना मांडते.

**मा. वैशाली घोडेकर** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन आहे.

**मा. महापौर** – विषय क्रमांक १ तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक- ५५४ विषय क्रमांक -१
दिनांक- २१/०८/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.मसाभां/५/कावि/१०३/२०२०, दि.२८/०२/२०२०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८९९ दि.२८/२/२०२० अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५३३ दि.०१/०६/२०२० अन्वये.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकुल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -२
दिनांक २८/८/२०२० खाते-मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२०
५) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५४१ दि.१/०६/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४

दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देण्यात यावी.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ तहकुब ठेवणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.वैशाली घोडेकर** – मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** विषय क्रमांक २ तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा सदर ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक- ५५५ विषय क्रमांक- २
दिनांक- २१/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ**– १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२०
५) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५४१ दि.१/०६/२०२०

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ३

दिनांक २१/०८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.आयुक्त यांचे पत्र प्रशा/१/कावि/३७८/२०२०

दि.१८/०३/२०२०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३८ दि.१२/६/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील पदव्युत्तर संस्थे करीता नामनिर्देशनाव्दारे रिक्त पदांवर नियुक्ती मिळण्याकामी अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखीक मुलाखतीकरीता उपस्थित राहिलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची छानणी व मौखिक मुलाखती घेवून शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव इत्यादी बाबी विचारात घेवून निवड समितीने उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, प्रकाशने, अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार (Maharashtra University of Helth Science) MUHS यांचेकडील मार्गदर्शक गुण मुल्यांकन तक्ता (Evaluation Sheet) प्रमाणे उमेदवारांना मुलाखत पॅनलमार्फत गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र 'अ' प्रमाणे पात्र उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी सादर केली आहे. त्याप्रमाणे नेमणूका करण्यास व निवड यादीवरील उमेदवार मुदतीमध्ये रुजू न झाल्यास प्रतिक्षा यादीवरील पुढील उमेदवारांना नियुक्ती देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.विकास डोळस** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये पदव्युत्तर संस्था स्थापन झालेली असून केंद्र शासनाकडून ९ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्रक.६०१/नवि-२२ दिनांक ०४ मार्च २०१४ अन्वये विविध संवर्गातील ११८ पदांना मान्यता दिलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभा ठराव क्र. २६८, दिनांक-०९/०५/२०१३ अन्वये अध्यापक व अध्यापकेतर अशा एकूण ११८ पदांना व त्याअनुषंगिक वेतनश्रेणीस मान्यता दिलेली

आहे. सदर पदांच्या मुलाखती होऊन त्या त्या पदांवर उमेदवारांची निवड करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात पदव्युत्तर संस्थेंतर्गत स्त्रीरोग व प्रसुती, भूलशास्त्र, औषधवैद्यक शास्त्र, बालरोग, अस्थिरोग, शल्यचिकित्सा, मानसोपचार, कान-नाक-घसा व विकृतीशास्त्र विभाग अशा एकूण नऊ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यामुळे वायसीएम रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांचा दर्जा उंचावला असून नागरीकांना चांगले उपचार मिळू लागले आहेत.

वायसीएम रुग्णालयामध्ये पदव्युत्तर संस्था स्थापन झालेपासून जे अध्यापक कार्यरत आहेत व ज्यांनी सदर पदभरतीमध्ये अर्ज केले होते, त्यातील सुमारे २० अध्यापकांची निवड सदर पदभरतीमध्ये झालेली नाही. सदर अध्यापकांची तीन वर्षासाठी मानधनावर नियुक्ती केली असून सुमारे अडीच वर्षे ते नियमितपणे कार्यरत आहेत. सदर अनुभवी व कौशल्यप्राप्त अध्यापकांनी वायसीएम रुग्णालयात कोरोना महामारीच्या परिस्थितीत आपापली सेवा उपलब्ध करुन दिली आहे व देत आहेत. त्यामुळे कोरोना कालावधीत वायसीएम रुग्णालयावरील बराचसा ताण कमी झाला आहे.

महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडील शासन निर्णय क्र. एलईसी-१४०८/प्र.क्र. १९६/वैसेवा-३, दि. २२ जानेवारी २००९ अन्वये तात्पुरत्या नियुक्तीने सेवेत लागलेल्या आणि सदर शासन निर्णय निर्गमित होतेवेळी तात्पुरत्या नियुक्तीनेच सेवेत कार्यरत असलेल्या अध्यापकांच्या तात्पुरत्या सेवा नियमित करण्यास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एलईसी-१४१४/प्र.क्र.२५/वैसेवा-३, दि.२२ ऑक्टोबर २०१६ अन्वये शासकीय महाविद्यालयातील तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या तात्पुरत्या सेवा दि.२४.१०.२०१६ पासून विशेष बाब म्हणून नियमित करण्यास शासनाची मंजुरी प्राप्त आहे.

मा.सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संवैशिवसं/वैद्यकीय अधिकारी/सेवा नियमित/का.अ-ब./३४८३/२०२०,दि. ९.६.२०२० अन्वये संस्थेत/रुग्णालयात संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या पदांवर तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा नियमित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

वायसीएम रुग्णालयातील रुग्णसंख्येबाबत मागील काही वर्षांची आकडेवारी पाहिली, तर रुग्णांची संख्या वाढतच चालली असल्याचे दिसून येईल. वायसीएम रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या, वाढीव अध्यापकांची निकड व कोरोना महामारीची परिस्थिती लक्षात घेऊन वर नमूद शासन निर्णय/पत्राच्या आधारे निवड न झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील २० अध्यापकांसाठी वाढीव पदे निर्माण करुन सध्या कार्यरत पदावर पिंपरी चिंचवड महापालिका सेवेत शासन उमेदमान्यतेवर कायमस्वरुपी सामावून घेण्यास मान्यता देणेत यावी. तसेच महाराष्ट्र शासनाकडील, शासन निर्णय क्रमांक पीसीसी/३०९६/१८०१ सीआर-२६१/नवि-२२, दिनांक ११/०९/९७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हददवाढ होवून नवीन १८ महसूली गावांचा महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळात व लोकसंख्येत वाढ झाल्याने स्वच्छता विषयक सुविधा पुरविणे महापालिकेचे अत्यावश्यक व तातडीचे कर्तव्य असून क्षेत्रीय कार्यालयाकडील कर्मचारी अपूरा पडत असल्याने प्रभाग अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात तत्कालीन आयुक्त यांचे सूचनेनुसार घंटागाडी ठेकेदार यांना सन १९९७ पासून स्वच्छतेचा ठेका देण्यात आलेला आहे असे एकूण ३७२ घंटागाडी ठेकेदार हे सन १९९७ पासून ठेकेदारी पध्दतीने कामकाज करीत आहे. सदरचे ठेकेदार हे महापालिकेचे आस्थापनेवरील कर्मचारी नाहीत.

घंटागाडी ठेकेदार महापालिकेचे कर्मचारी म्हणून नेमणूकीच्या तारखेपासून महानगरपालिकेच्या इतर कर्मचा-यांप्रमाणे देय असलेले वेतन आणि इतर भत्ते अदा करावेत, या मुख्य मागणीच्या संदर्भात घंटागाडी ठेकेदार वतीने “महापालिका आणि परिवहन कामगार आघाडी” या संघटनेच्या वतीने पुणे येथील मे.औद्योगिक न्यायालयात कम्प्लेंट यु.एल.पी.१३९/९९ दाखल केली होती. या कम्प्लेंट संदर्भात मे.कामगार न्यायालयाने “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याबाबत मनाई हूकूम दि.२०/०५/९९ रोजी दिला होता. याच प्रकरणा संदर्भात मे.कामगार न्यायालयाने दिनांक १९/०४/२००० च्या आदेशान्वये तक्रारदारांची कम्प्लेंट यु.एल.पी.१३९/९९ ची विनंतीची मागणी रदद केलेली आहे. या प्रकरणी मे.न्यायालयाने अशा आशयाचा निर्णय दिला आहे की, यामध्ये असलेले ठेकेदार हे महापालिकेचे नोकर नाहीत ज्यामुळे त्यांच्यामध्ये मालक व नोकर हे नाते सिध्द होत नाही. हे न्यायालयाने मान्य केले आहे. तथापि सदर आदेशा विरुध्द श्री.सुभाष सरीन, जनरल सेक्रेटरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन आघाडी यांनी त्याच मे.औद्योगिक

न्यायालयात रिव्हीजन अर्ज क्र.५/२००० दाखल केला असून दिनांक २०/०५/१९९९ चे आदेशाचा पुर्न:विचार व्हावा म्हणून मे.औद्योगिक न्यायालयात विनंती केली होती. त्यावर मे.न्यायालयाने अर्ज मान्य करुन मनाई आदेश करताना "जाब देणार मनपाने ठेकेदार यांच्या सेवेबाबत मूळ तक्रार अर्ज निकाली होईपर्यंत "जैसे थे" परिस्थिती ठेवण्यात यावी व घंटागाडी ठेकेदारांच्या सेवा समाप्त करावयाच्या असतील तर याबाबत कायदेशीर पध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या सेवा समाप्त करता येतील." असे आदेश दिले आहेत.

सद्यस्थितीत घंटागाडी ठेकेदार मनपा विरुध्द मे.औद्योगिक न्यायालय येथे ULP ०५/२००० दाखल आहे. तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई येथे Writ Petition No.4931/2003 दाखल आहे. तसेच सुप्रीम कोर्टात SLP No.12804/15 दाखल आहे. सदर दाव्यांचा निकाल आज अखेर प्रलंबित आहे.

त्यानुसार घंटागाडी ठेकेदारांनी प्रत्यक्षात साफसफाईच्या केलेल्या कामाची वस्तुस्थिती लक्षात घेता घंटागाडी ठेकेदारांची त्यांना महापालिका सेवेत सफाई कर्मचारी या वर्ग ४ च्या संवर्गात नियमित आस्थापनेवर घेण्याबाबतच्या मागणीबाबत कृपया शासनाने मार्गदर्शन करावे. याकामी मा.सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडे पत्र क्रमांक प्रशासन/३/कावि/५५५/२०००, दि. ११/०८/२००० व त्यानंतर वेळोवेळी दिनांक २३/१०/२०००, दि. १२/१२/२०००, दि. २९/१२/२०००, दि. २०/०५/२००३, दि. ०६/०६/२००३, दि. २९/१२/२००३, दि. २३/०७/२००४, दि. २९/०४/२००५, दि. ०३/०९/२००५ अन्वये प्रस्ताव सादर करुन विनंती करण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भात शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा देखील वेळोवेळी शासनास सादर करण्यात आलेला आहे.

मे.औद्योगिक न्यायालयाने यु.एल.पी.०५/२००० मध्ये दिलेल्या मनाई आदेशा विरुध्द महानगरपालिकेने सदरचा विषय मे.औद्योगिक न्यायालयाच्या कार्यकक्षेत येत नाही. या मुद्याबाबत पुन्हा औद्यागिक न्यायालयात हरकत दाखल केली होती. तथापि मे.औद्योगिक न्यायालयाने सदरची हरकत नामंजूर केली आहे. सदर निर्णयाच्या विरोधात महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र.४९३१/०३ दाखल केली आहे. सदरची याचिका अद्यापपर्यंत प्रलंबित आहे.

घंटागाडी ठेकेदार यांना महानगरपालिकेमध्ये सेवेत घेणेपूर्वी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

- महापालिकेने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेली याचिका क्र.४९३१/२००३ मागे घेणे आवश्यक आहे. त्यास मान्यता देणेत यावी.
- घंटागाडी ठेकेदार यांनी महापालिके विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल केलेली Special Leave to Appeal 12804/2015 मागे घेणे आवश्यक आहे.
- मे. औद्योगिक न्यायालय पुणे यांचेकडे घंटागाडी ठेकेदारांनी मनपा विरुध्द दाखल केलेली याचिका तात्काळ निकाली काढणेबाबत विनंती करावी व त्या निकालाप्रमाणे कार्यवाही करावी.

वरील नमूद ०३ मुददयांबाबत कार्यवाही पूर्ण झालेनंतर मनपा प्रशासनाने या कर्मचा-यांना यथोचित कार्यवाही पूर्ण करुन नियमित वेतनश्रेणीत व मनपाचे स्थायी आस्थापनेवर नियुक्ती देणेची कार्यवाही करावी.

महानगरपालिका आस्थापनेवर सफाई संवर्गात २५९३ पदे मंजर असून ८०० पदे रिक्त आहेत. अशा घंटागाडी ठेकेदार/कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत सामावून घ्यावयाचे झालेस खालील प्रमाणे मुददे विचारात घ्यावे लागतील.

- त्यांच्या शैक्षणिक अर्हतेची माहिती घेवून कार्यवाही करावी.
- मनपाचे सेवा नियमानुसार सफाई संवर्गातील पदांसाठी चौथी पास अशी शैक्षणिक अर्हता आहे. सदरची अर्हता सध्या कार्यरत असलेल्या घंटागाडी ठेकेदार यांचेकडे आहे किंवा कसे? याची तपासणी करुन नियुक्तीची कार्यवाही करावी.
- सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर सफाई संवर्गातील ८०० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांवर नियुक्त्या कराव्यात.
- या कर्मचा-यांना नियुक्त्या द्यावयाचे झालेस बिंदू नामावली तपासून नियुक्तीची कार्यवाही करावी.
- आज अखेर घंटागाडी ठेकेदार यांचे निधन झालेल्या त्यांचे वारसांना महानगरपालिका सेवेत लाड-पागे धोरण लागू करणेबाबत कार्यवाही करावी.
- सध्या कार्यरत असलेले घंटागाडी ठेकेदार हे वयाधिक झाले असतील तर त्यांचे बाबतीत हे कर्मचारी महानगरपालिका सेवेत घंटागाडी

ठेकेदार म्हणून सन १९९७ मध्ये दाखल झालेल्या दिवशी वयाची अर्हता धारण करीत असल्यास त्याचा सेवेत समावेश करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाने योग्य ते नियमाधीन सोपस्कर पूर्ण करुन घंटागाडी ठेकेदारांना मनपा सेवेत स्थायी आस्थापनेवर सामावून घेणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिचंवड महानगरपालिकेच्या वतीने पूर, भूकंप, वादळ, आपदकालीन स्थिती व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरीकांना तातडीने मदत करणेकामी आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थापन करणेत आलेला आहे. आपत्कालिन परिस्थितीमध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कामकाजाकरीता आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर श्री ओमप्रकाश बहिवाल मानधन तत्वावर सहा सहा महिने कालावधीकरीता सन २००९ पासून काम करीत आहेत. सदर कामकाजाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व १५ वर्षाचा अनुभव ते धारण करीत आहेत, तरी त्यांचे सेवेची उपयुक्तता विचारात घेता श्री ओमप्रकाश बहिवाल यांची महापालिकेच्या अस्थायी अस्थापनेवर दरमहा र.रू ६०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये साठ हजार फक्त) मानधन याप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात तीन वर्ष कालावधी करीता विशेष बाब म्हणून सध्याचे कामकाजाची मुदत संपल्यानंतर एक दिवसाचा सेवा कालावधी खंडीत करून माहे जानेवारी २०२१ पासून नेमणूक करण्यास व त्याबाबतच्या खर्चास मान्यता देणेत यावी.

तसेच महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३०९६/१८०१सीआर-२६१/नवि-२२,दिनांक ११/९/१९९७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन नवीन १८ महसुली गावांचा महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळात व लोकसंख्येत वाढ झाल्याने आरोग्यविषयक सुविधा पुरविणे महापालिकेचे अत्यावश्यक व तातडीचे कर्तव्य असून सध्या जगभरासह देशात तसेच राज्यात सर्वत्र कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत आहे. यासाठी कोरोनाबाधितांवर उपचार करण्याच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे कोविड रुग्णालय म्हणून घोषित करणेत आले आहे. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांना योग्य उपचार मिळण्याच्या हेतूने सर्व वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स, पॅरामेडिकल कर्मचारी, सुरक्षा निरीक्षक, रूग्णवाहिकेचे वाहनचालक व वर्ग ४ चे इतर कर्मचारी यांची सेवा अधिग्रहीत करण्यात आली आहे. सध्या

उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी पुरेशा प्रमाणात कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा वाढता व्याप विचारात घेता प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गत केलेल्या परिपत्रक/आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात विविध पदे मानधनावर सहा महिने कालावधीकरीता भरण्यात येतात. सदरची प्रक्रिया सन २००७ चे कालावधीपासून राबविण्यात येत आहे. काही कर्मचारी यांनी महानगरपालिकेत कायमस्वरुपी सामावून घेणे व सेवा खंडित करु नये करिता मा. न्यायालयात दावा दाखल केला असून सदर दाव्यावर मा. न्यायालयाचे जैसे थे असा आदेश आहे. त्यामुळे सदर कर्मचारी वर्षेनुवर्षे महानगरपालिकेत सेवा देत आहेत. सध्याची कोरोना विषाणू साथरोगाचा प्रसार पाहता व वायसीएम रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता सदर कर्मचा-यांची वायसीएम रुग्णालयास आवश्यकता आहे. त्यामुळे मा. न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांपैकी, जे कर्मचारी वर्षेनुवर्षे कर्तव्यावर गैरहजर राहून रुग्णसेवा देत नाहीत, तसेच कोरोनाच्या साथरोग कालावधीत रुग्णसेवा न देता गैरहजर राहिले आहेत, असे कर्मचारी सोडून ज्या कर्मचा-यांनी सलग सेवा दिलेली आहे, आणि प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (RCH), राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) कार्यक्रमाअंतर्गत कर्मचारी, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत कर्मचारी (NTEP) अशा कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – या विषयाची सविस्तर माहिती मा.आयुक्त साहेब देतील.

**मा.आयुक्त** – मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचं एक मानबिंदु म्हणजे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय ३ वर्षापुर्वी मी ज्यावेळेला येथे रुजू झालो होतो त्यावेळेला यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाची स्थिती आपण जाणत असाल की,त्यावेळेला डॉक्टरांची येथे मोठया प्रमाणात कमतरता होती. आणि सुरुवातीचे ३ ते ६ महिने माझा अनुभव राहीला की, दररोज कुठल्या ना कुठल्या तरी नगरसेवकाचा, नागरीकांचा किंवा संस्थेचा फोन येत असे की, वायसीएमएच मध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत, वायसीएमएच मध्ये चांगली सेवा मिळत नाही. चांगल्या प्रकारे सर्जरी होत नाहीत प्रायव्हेटला हॉस्पिटलला रेफरशिट

दिल्या जातात केवळ प्रसुती विभाग थोडया फार प्रमाणात कार्यरत होता. मेडिसिनची सगळयात जास्त ओपीडी होती, सगळयात जास्त इन पेशंट होते. काही प्रमाणामध्ये कॅथलॅब आपल्या प्रायव्हेट पार्टनर सोबत सुरु होतं. मात्र इतर बाबींमध्ये आपल्याकडे एवढं मोठं चांगल्या दर्जाचं रुग्णालय बांधुनही म्हणावी तशी सेवा नागरीकांना मिळत नव्हती. याच वेळेला या महानगरपालिकेच्या सभागृहानं एक विषय मंजुर केलेला होता की, यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवीची संस्था पी.जी.इन्सिटीटयुट स्थापन करावी त्याकरीता पद मंजुर करण्यात आलेली होती. तसा शासन निर्णय ऑलरेडी नमुद केलेला होता. मात्र पाठपुरावा करण्याची आवश्यकता होती. आणि सदर बाबीला आपण साधारण ३ वर्षापुर्वी सुरुवात केली. आपल्याकडे त्यावेळेला अशी अडचण होती की,त्यावेळेला आपल्या इथे संस्था मंजुर नसल्याने आपल्याला नियमित पदावर भरती करणं शक्य नव्हतं. म्हणुन हा प्रस्ताव आपण सभागृहापुढे आणलेला होता. स्थायी समितीची मंजुरी घेवुन आपण ३ वर्षाच्या करारानाम्यानं प्रथमत: १० शाखा विचारात घेतल्या होत्या यासाठी प्रोफेसर, असोसिएट प्रोफेसर, आणि असिस्टंट प्रोफेसर भरण्याची कार्यवाही सुरु केली. त्यावेळेला संस्था Establish नव्हती त्यामुळे आपल्याला अनेक वेळेला नागरीकांची समस्या सोडवण्यासाठी अनेक डॉक्टरांना वेगवेगळया ठिकाणाहून विशेष आमंत्रित करुन आपल्याला येथे घेवुन यावे लागत होते.साधारणत: ही प्रक्रीया करायला दिड वर्षाचा काळ लागला होता. या दिड वर्षामध्ये आपण अनेक टप्प्यामध्ये चांगले दर्जेदार पदविधारक, चांगले क्वालीफाईड डॉक्टर्स याठिकाणी नियुक्त केले. सुरुवातीला आपण ते कंत्राटी तत्वावर नियुक्त केले मग पहिल्या वर्षी आपल्याकडे पर्याप्त संख्येनं एमसीआयच्या सुचनेनुसार आपली पुर्तता झाल्यानंतर राज्य शासनाची मान्यता घेऊन आपण एमसीआय कडे ॲप्लीकेशन केलं पहिल्या वर्षामध्ये आपल्याला P.G. इन्स्टिटयुटच्या सात कोर्सेसना मान्यता मिळाली. आणि त्यासाठी २४ पदं मंजुर झाली. २४ पदांचा अर्थ ३ वर्षासाठी एक/एक प्रेसिडेंट आपल्याकडे एम.डी.करण्यासाठी उपलब्ध होईल. यानंतर अजुन दुस-या वर्षी आपण पदं भरती करु अजुन ३ शाखांसाठी ॲप्लीकेशन केलं त्यापैकी रेडीओलॉजी हे वगळता मेडिसिन आणि सर्जरीला देखील आपल्याला पदं मंजुर झाली आणि आता आपण या ९ शाखांसाठी एम.डी.देणारी पदव्युत्तर पदवी संस्था म्हणुन मान्यताप्राप्त संस्था झालेलो आहोत. एकदा का आपण परमनंन्ट संस्था झाल्यानंतर मी सुरुवातीला

आपल्याकडनं तात्पुरती मान्यता घेवुन कॉन्ट्रॅक्ट वरती जे डॉक्टर नियुक्त केले होते आता आपण परमनंन्ट उपलब्ध होण्याकरिता आपण जाहीरात प्रक्रीया आरंभ केली होती. जी पदं मंजुर होती ती दि. ४ मार्च २०१४ च्या शासन निर्णयाने ही पदं मंजुर आहेत. याच्यामध्ये गट अ-१०४, गट – ब ची ६ आणि गट क ची ०८ अशा पदांची आपल्याला मंजुरी आहे. या पदांमध्ये ७ अभ्यासक्रम सुरु करण्याची मान्यता ७ मार्च २०१९ रोजी आपल्याला मिळालेली होती. त्यानंतर जनरल सर्जन आणि जनरल मेडीसिनसाठी आपण अर्ज सादर केलेला होता. यानंतर यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटलमधील P.G. इन्स्टिटयुटची जी पदे रिक्त मंजुर होती ती नियमीतपणे भरण्यासाठी आणि या व्यतिरिक्त इतर महानगरपालिकेच्या पदस्थापनेवरती काही मेडीकल ऑफीसरची पदं भरण्यासाठी आपण ७१ विविध पदनामांसाठी १४५ रिक्त पदांची आपण जाहीरात प्रसिध्द केलेली होती. १३/९/२०१९ रोजी ही प्रक्रीया आपण (Maharashtra University of Helth Science) MUHS चे नियमावली, एमसीआयची नियमावली, क्वालीफिकेशन रिक्वायरमेंट,अनुभव आणि इतर बाबींच्यासाठी आपण Panel Establish केलं. निवड समिती स्थापित केली, रितसर अर्ज मागविण्यात आले अर्जाची छाननी करण्यासाठी बी.जे.मेडीकल शासकीय महाविद्यालय आहे येथील एक्सपर्टना आपण डाक्युमेंट, व्हेरीफिकेशन आणि इतर गोष्टींसाठी आपण Director Dmer यांच्या मदतीने आपण अधिकारी डेब्यूट करुन घेतले. त्यानंतर प्रत्येक पदाच्या मुलाखतीसाठी जे एक्सपर्ट मुलाखातकार म्हणुन Director Medical Education यांच्याकडनं Panel बोलवून घेतलं जे अधिष्ठता पद आहे या पदाच्या निवडीसाठी स्वत: Director Medical Education डॉ.लहाने हे स्वत: उपस्थित राहिले. प्रत्येक पदाच्या मुलाखतीकरीता तंत्रज्ञ संपुर्ण महाराष्ट्रातील विविध वैदयकीय महाविद्यालयाचे प्रोफेसर किंवा त्यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी उपलब्ध होते. आणि आपल्या निवड समितीमध्ये शासन निर्णयानुसार विविध संस्थांचे प्रतिनिधी असा एक रितसर Pannel तयार करुन पार पाडली या मुलाखत प्रक्रीयेमध्ये MUHS च्या निवड प्रक्रीयेच्या साधारणता तत्वांचा अवलंब करुन आपण अत्यंत योग्य पध्दतीने मुलाखत प्रक्रीया पार पाडून आपण ही निवड करण्यात आलेली आहे. यासाठी अधिष्ठता आणि इतर पदांसाठीचे प्रोफेसरर्स,असोसिएट प्रोफेसर, आणि असिस्टंट प्रोफेसर ही पदे भरण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहासमोर विधी समिती मार्फत सादर करण्यात आलेला आहे. ही पदं भरतांना काही पदं आपल्याला अजुनही अनुशेषामध्ये उपलब्ध झालेली नाहीत. ही भरती प्रक्रीया

करताना देखील आपल्याला करावी लागणार आहे. यापुढील कालावधीमध्ये भरती प्रक्रिया करण्यात येईल. आपल्याकडे पेशंटची संख्या नित्यनियमाने वाढते आहे. आणि आता कोविड कालावधी असेल किंवा कोविड पूर्व पीजीआयचा कालावधी असेल आपण अनेक विविध स्पेशालिटीस्टची ऑपरेशन्स् त्याच्यावर आपण ट्रिटमेंटस् आपण सुरु केलेल्या आहेत.यापुढील कालावधीमध्ये अजुनही आपण काही सुपर स्पेशालिटीज सुरु करण्याचा मनोदय आहे. याकरीता सुपर स्पेशालिटी याच्यामध्ये हृदयरोग असेल, युरोलॉजी असेल, किंवा इतर जे विषय असतील अशा प्रकारचे अनेक विषय आपण यानंतरच्या कालावधीमध्ये घेऊन येणार आहोत. सुपर स्पेशालिटीस्ट दर्जाचं आणि नागरीकांना पिंपरी चिंचवड आणि परिसरातील किफायतशिरपणे आणि चांगल्या रितीनं गुणवत्तापुर्ण सेवा देणारं असं रुग्णालय P.G. Institute चंदीगडच्या धर्तीवरती Best P .G. Institute नावारुपाला यावं या भूमिकेतून आपण P .G. Institute ची स्थापना करुन याची वाटचाल पुढे करीत आहोत. या संस्थेची हॉस्पिटल म्हणुन एका बाजुला ओळख आहेच पण आता ही Acadamic Institiute of Excelence म्हणुन पुढे येणार आहे Acadamic Institiute of Excelence म्हणुन जर पुढे आणायचं असेल तर केवळ रुग्णांची सेवा हा त्याच्यामधला भाग नसुन भविष्यामध्ये देशामध्ये जे प्राप्त होणारे डॉक्टर्स आहेत ते स्पेशालिस्ट डॉक्टर तयार करण्याचं महत्वपुर्ण काम या संस्थेला करावं लागणार आहे. आणि त्यामुळे अत्यंत गुणवत्तापुर्ण असे प्रोफेसर, असोसिएट प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर यांनी जर योग्य पध्दतीनं मार्गदर्शन करुन चांगल्या दर्जाचे वैदयकीय अधिकारी स्पेशालिस्ट असतील असे जर निर्माण झाले तर आख्ख्या देशाची सेवा ते करणार आहेत. म्हणजे एका बाजुला आपण रुग्णांची सेवा करीत असतानांच पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरते आहे की, जी केवळ स्पेशालिस्ट डॉक्टर बनवणारी पहिली महानगरपालिका मध्यम दर्जाची होत आहे. आणि ही गोष्ट या सभागृहासाठी अत्यंत अभिमानाची राहणार आहे. या कालावधीमध्ये आपल्याला निश्चितपणे अनेक अडचणींना सामोरे जावं लागणार आहे. मात्र ही प्रक्रिया करीत असताना सर्वच नगरसदस्यांचे मार्गदर्शन ज्यावेळेला काही चुका झाल्या त्याच्यामध्ये योग्य ते दिशादर्शक देखील प्राप्त झालेले आहेत.भविष्यामध्ये देखील अशाच प्रकारचे मार्गदर्शनाची अपेक्षा करतो. ही संस्था एका बाजुला रुग्णांना चांगली सेवा देईल मात्र दुसऱ्या बाजुलाही चांगले विद्यार्थी डॉक्टर बनवण्याचे कामही करेल. हे एक मॉडेल आहे निती आयोगाने हे मॉडेल एक चांगलं मॉडेल असं गृहीत धरुन

इतर कॉर्पोरेशनला देखील याचा फॉलो करावं अशा सूचना निती आयोगानं दिलेल्या आहेत. आणि याच धर्तीवर आपण अन्य विषय देखील आपल्या सभागृहासमोर आणलेला आहे की, आपण अन्य जे हॉस्पिटल तयार करणार आहोत त्याठिकाणी देखील ही पध्दत अवलंबु शकतो आपण तो विषय ज्यावेळेला येईल त्यावेळेला सविस्तर चर्चा होईल. आपण सगळयांनी हा विषय मंजुर करावा ही विनंती.धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेबांनी विषय चांगला आणलेला आहे. डॉक्टर P.G. I. चे असतील किंवा B.I.G. चे असतील आयुक्त साहेब, इथं २०१२ साली आयुक्त श्रीकर परदेशी होते त्यांची ही कल्पना आहे. महापालिकेला चांगले डॉक्टर उपलब्ध होतील आणि जे शिकाऊ डॉक्टर येतील ते पण वायसीएमएच मध्ये प्रॅक्टीस करतील त्या उद्देशानं त्यांच हे २०१२ ला केलंल मॉडेल २०२० मध्ये आलं आहे. नंतर श्रीकर परदेशी साहेबांची येथून बदली झाली ते गेले. २०१६ च्या पिरीएड मध्ये डॉ.पद्माकर पंडीत ही एक हुशार व्यक्ती आपल्या महापालिकेमध्ये तुमच्या आमच्या आशीर्वादामुळे रुजू झाले. आपल्याला ७ विषय मंजुर झालेले होते आणि प्रत्येक विषयाचे २ लाख रु.भरायचे होते. पद्माकर पंडीतला लेखी कळवून सुध्दा त्यांनी फक्त एका विषयाचे २ लाख रु.भरले आणि तुम्हांला सांगितले की, सगळया विषयाचे मिळुन २ लाख रु. आहेत असे म्हणुन सांगितले आणि हा विषय तुम्हांला देखील माहित आहे. त्याच्यामुळे ही परमिशन दोन वर्ष लांबली. नंतर ती परमिशन घेण्यासाठी आयुक्त साहेब,तुम्ही स्वत: आणि पद्माकर पंडीत परमीशन आणण्यासाठी दिल्लीला गेले. आणि यांचे उपसचिव राजेंद्र वाबळे त्यावेळचे आणि आता आपल्याकडे डीन म्हणुन रुजू झाले. हे इथे आले त्यावेळेला तुमचे-त्यांचे काही बोलणं झालं असेल त्यानंतर ऑक्टोबर २०१८ मध्ये तुम्ही डीन पदांसाठी ऍड दिली ऍड मध्ये राजेंद्र वाबळेंनी सुध्दा इंटरीव्ह दिला त्यांनी त्यांचा तिथला जॉब सोडला आणि त्यांना तुम्ही इथं मानधनावर ४/५ जण आले होते त्यापैकी यांना आपण ऑफर लेटर दिलं की, तुम्ही ७ दिवसात रुजू व्हा. वाबळेंनी नंतर आपल्या ऑफर लेटर नुसार परमनंनटचं किंवा मानधनावरचं पत्र असेल ते एक ते दिड महिन्यांनी स्विकारल मधल्या पिरिएड मध्ये GM नी आपल्याला मान्यता दिलेली नव्हती. जुलै मध्ये वाबळे आपल्याकडे रुजू झाले एक ६ महिन्याच्या पिरीएड मध्ये आपल्याला ७ विषयाला

मान्यता दिली गेली.आणि वाबळे आपल्या इथं डीन पदावरती रुजू झाले. आयुक्त साहेब, मी जे बोलतोय ते खरं आहे की, खोटं आहे ही सत्य परिस्थिती आहे. माझा काय डॉक्टर भरतीला विरोध नाही. आज आपण तिथं प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसरची भरती करतो आहे. आयुक्त साहेब, आपल्याला P.G. Institute जी मान्यता दिलेली आहे त्याचे दर ३ वर्षांनी रिन्युएशन करायचं आज आपण ११८ मुलं भरणार आणि नंतर १४५ नोकर भरती म्हणता असं साधारण आपण २४० डॉक्टर आता P.G. Institute च्या माध्यामातून मानधनावरती भरती करणार आहोत. हे डॉक्टर खरंच तिथं किती काम करतात P.G. Institute चे डॉक्टर स्वामी,डॉ.वाघ जे स्टार हॉस्पिटल चालवतात. देसाई हॉस्पिटल त्यांनी प्रायव्हेट १०० बेडचं हॉस्पिटल घेऊन त्याला कोविडची मान्यता घेऊन इकडचे पेशंट तिकडं असं केल जातयं आणि डॉ.वाबळेच्याच नजरेखालनं हे चाललयं आणि तुम्ही ज्या डॉक्टरांच सिलेक्शन केलं आहे त्या सिलेक्शन कमिटीमध्ये डॉ.लहाने यांचे नांव घेतलं आहे. त्या सिलेक्शन कमिटीमध्ये संतोष पाटील पण आहे. ऍक्च्युली मुख्य आरोग्य वैदयकीय अधिकारी म्हणुन त्या सिलेक्शन कमिटीमध्ये साळवी साहेब नव्हते. त्या सिलेक्शन कमिटीने ३५ मार्क ओव्हरलला ठेवले, ६५ मार्क ज्याला जसं वाटलं तसे ठेवले आणि त्या पध्दतीने या डॉक्टरांच सिलेक्शन झालं. मला वाटलं, मला ३५ मार्क दिले, त्याला वाटलं ३० च मार्क द्यायचे आणि बाकीच्या ६५ मार्कामध्ये आम्ही बघु. असंच काही तरी सिलेक्शन झालेलं आहे. आता ज्याचं पीजीआय मध्ये सिलेक्शन झालं नाही.उदा.डॉ.सोनी जे आता आपल्या वायसीएमएचमध्ये आयसीयुचे इनचार्ज आहेत. आयुक्त साहेब, निवडणुक झाली त्यावेळेस वायसीएमएच मध्ये ३ आयसीयु चालू होते. हे पीजीआय आलं आणि सगळं या डॉ.सोनीच्या हातात गेलं. या ३ आयसीयु पैकी २ च चालू आहेत आणि १ आयसीयू बंद आहे. आणि आम्हांला कायम सांगितलं जातयं की, आमच्याकडे मनुष्यबळ नाही आज आपल्या महापालिकेच्या आस्थापनेवर साधारणपणे १५० डॉक्टर आहेत. आणि आता पीजीआयचे मानधनावर जे डॉक्टर घेतले आहेत ते जवळपास ३०० डॉक्टर आहेत. म्हणजे एकुण ४५० ते ५०० डॉक्टर आपल्या पिंपरी चिंचवड मध्ये काम करीत आहेत. मला साहेब, तुम्हांला एक विचारायचं आहे की,आपल्या शेजारी डी.वाय.पाटील कॉलेज याठिकाणी तर ५०० ते ६०० डॉक्टरांचा स्टाफ आहे त्याठिकाणचे डीन सुध्दा मानधनावरती आहेत. आणि मग आपण या लोकांना परमनंन्ट का करायचं त्यावेळेस आपण या लोकांना ऑफर दिली असेल तुम्ही

आमच्याकडे रहा आम्ही तुम्हांला परमनंन्ट करतो. आता आपल्याकडे जे मागच्या वर्षीचे विद्यार्थी आहेत ते ३४ आहेत. हे सुध्दा आपल्याकडे पीजीआय च्या माध्यमातून आले. ते सुध्दा आपल्याला सेवा देत आहेत. आणि सगळयात महत्वाचं म्हणजे डॉ.वाबळे यांना आपण ज्या डीन पदावर बसविलेली आहे. यांची शैक्षणिक पात्रता काय आहे एम.डी.मेडीसिन आहे का? न्युरोलॉजिस्ट आहे का काय? तो ऍकोनॉमीचा डॉक्टर आहे. म्हणजे शवगृहातील चिरफाड करणारा डॉक्टर आहे. याला वाटलं एखादया पेशंटला एखादं इंजेक्शन द्यायचं आहे, गोळी द्यायची आहे तर तो देवु शकत नाही. अशा माणसाला तुम्ही त्याठिकाणी डीन म्हणुन नियुक्त केला आहे. आणि ती व्यक्ती वायसीएमएच मध्ये कमी आणि संतोष पाटील यांच्या ऑफीसमध्ये रेग्युलर हा काय प्रकार आहे.आयुक्त साहेब, माझा डॉक्टर भरतीला विरोध नाही.पण ते मानधनावरती घ्या. आयुक्त साहेब, हे शहर आमचं आहे आणि याठिकाणच्या नागरीकांना आम्हांला उत्तरं द्यायची आहेत. आता परवाचा प्रकार माझा होता. आयुक्त साहेब,त्यादिवशी तुम्ही तिथं गेला होता त्याठिकाणी डॉक्टर लोकांची माझी कम्पलेट होती का? त्यांच्या अडचणी होत्या. आम्हांला पगार वाढवून द्या, बाकीच्या गोष्टी द्या. मी त्यादिवशी दुपारी १ वाजल्यापासून सांगतोय की, ही माझी काकु कोरोना पेशंट आहे त्यांना व्यवस्थित ऍडमिट करा, ३ वाजता मी त्यांना प्लाझमा देतोय, ५ ते ५.३० ला प्लाझमा चढवत असेल. सगळया गोष्टी करुन सुध्दा तो माणुस काय सांगतोय की, १.०० वा. त्या पेशंटला आयसीयु मध्ये घ्या. २ तासात बेड मिळेल, २ तासात बेड होईल हेच सांगत होते. थोडया वेळात मिळेल,आता मिळेल असे रात्री ८ ते ८.३० पर्यंत हेच रडगाणं चाललं होतं. रात्री १० ते १०.३० च्या दरम्यान त्या काकू गेल्या. मी रात्री ११.०० वा. तिथं गेलो. त्याठिकाणचे डॉ.कुरेशी ते तिथं मागच्या मजल्यावर होते मी तिथं डायरेक्ट गेलो मी त्याला म्हणले पेशंट ते म्हणले ठिक आहे १० मिनिटामध्ये आयसीयु मध्ये त्यांना व्हेंटीलेटरवरती घेतो आहे. मी म्हणले कुठं आहे पेशंट तर पलीकडे आहे. तिथं जायला पण अवघड आहे. पेशंट इकडचे तिकडं जात नाहीत आणि तिकडचे इकडे येत नाहीत. पाकिस्तानची जशी बॉर्डर आहे तसं चाललय मी इकडनं तु तिकडनं तिथं बघीतलं पेशंट पूर्ण निश्चित पडलेला होता. मी तोंडाला हात लावून बघीतला कोविडचा पेशंटचा होता मी हॅण्डग्लोज घातला होता मी त्याला पण विचारलं काय, तो म्हणला, नाही आता पेशंट ओके आहे,आता उठेल पेशंट, मी त्याला म्हणलं अरे नीट बघ, आणि मग त्याने नाकाच्या तिथं हात लावुन बघीतला

आणि म्हणला आऊट झाले. मी त्याला म्हणलं मी दुपारी १.०० वाजल्यापासून तुमच्या मागं लागलो आहे तुमच्या आणि मग तिकडून पाटील आला मग त्याने म्हणले तुम्ही आत मध्ये कसे आले, मला म्हणलं तु कोण, मी पण त्याला म्हणलं तु कोण, तो म्हणला मला अरे,अशी भाषा वापरायची नाही. मी म्हणले, अरे तु मला विचारतोय तु कोण,मी तुला विचारतोय तु कोण, मी म्हणलं तुझं नांव नाही का मला सांगणार, मी विश्वस्त आहे आणि त्यांची तुमच्याकडं काय मागणी आहे. आमदार, खासदार, नगरसेवक यांनी याठिकाणी कोणी हस्तक्षेप केला नाही पाहिजे. अहो, हे वायसीएम हॉस्पिटल आहे. या लोकांना परमनंन्ट घेतली ना,आई शपथ सांगतो हे आम्हांला कोणाला विचारायचे नाहीत. त्यांचाच मनमानी कारभार चालेल. आता डॉ.वाघ, डॉ.स्वामी, देसाई हॉस्पिटल घेतले आहेत यांचे प्रायव्हेट मध्ये सगळी प्रॅक्टीस चालू आहे. इथले सगळे पेशंट तिकडे डायर्व्हट करायचे. महापालिकेने यांना इथं त्यांना पगार द्यायचा परत यांनी खाजगी हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टीस करायची, इकडचे पेशंट तिकडे घेऊन जायचे.म्हणजे इथं काय पोकलनं लावून उकरायचा धंदा आहे का, लोकांच्या टॅक्सच्या माध्यमातून पैसे जमा करुन घ्यायचे आणि यांची थडगी भरायची. आता अजित पवार साहेबांच स्टेटमेंट वाचल की, आमच्याकडे व्हेंटीलेटर भरपूर आहेत. जिजामाता हॉस्पिटलमध्ये क्रेडाईच्या माध्यमातून आम्ही व्हेंटीलेटर दिले आहेत ते सुध्दा चालू नाहीत. भोसरी हॉस्पिटलमध्येही नाही. ऑक्सीजनची व्यवस्था तिथे नाही. मागच्या महिन्यात ऑक्सीजन नसल्यामुळे ९ पेशंट मेले सहाव्या मजल्यावरती आणि त्यांची भांडण आपआपसात ये मला दे,मला दे त्यात ऑक्सीजन लेवल कमी झाली.आणि सगळयात महत्वाचं म्हणजे जेवढे आयसीयु मध्ये पेशंट मेले आहेत त्याच्यापेक्षा जनरल वॉर्डमधील जास्त पेशंट मेले आहेत. मग तुमचे पीजीआय चे डॉक्टर करतात काय? कॅन्टीनमध्ये बसुन फक्त पेपर बघतात.कोणाचं टेम्परेचर चेक केलं, कोणाचा बी.पी.चेक केला सगळं पेपरवरती असतं हे डॉक्टर कोरोनाच्या पेशंटजवळ सुध्दा जात नाहीत. परंतु महापालिकेच्या आस्थापनेवर जे डॉक्टर काम करतात ते कोरोनाच्या पेशंटजवळ जाऊन तपासत असतात आणि मग हे लोक काय करतात, महापालिकेचे पैसे खाण्यासाठी आलेले आहेत का? आणि इथं बाकीचे नगरसेवक बदनाम होत असतात. नगरसेवक कुठल्याही पक्षाचा असेल तो त्याठिकाणी पार्टनर सुध्दा असेल असं मी स्पष्ट बोलतो. किंवा कोणाचे लागेबांधे पण असतील, याठिकाणी १/२ माणसांमुळे सगळे बदनाम होत आहेत. यामध्ये मी असलो तरी

माझ्यावर कारवाई करा किंवा बाकीचे नगरसेवक याच्यामध्ये सामील असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई करा, मा.महापौर साहेब, आपण या सगळया विषयाची चौकशीचे आदेश देण्यात यावे. या शहरातील २७ लाख लोकसंख्या आहे त्यांना आरोग्याची सेवा मिळाली पाहिजे. मी या महापालिकेचा विश्वस्त म्हणुन गेली ३ वर्षापासून बघतोय ही महापालिका कशी चालते. मी माझा बिझनेस करुन जसं मी माझं घर पुढं आणलं नां तसंच या महापालिकेच्या पैशाची बचत होऊन ती पुढे गेली पाहिजे. आणि याठिकाणी कामं चांगली झाली पाहिजेत यासाठी मी इथं आलो आहे. मी माझं घर भागवण्यासाठी आलो नाही. आयुक्त साहेब, मी तुम्हांला पत्र देवुन सांगितलं होतं की, डेअरी फार्ममध्ये कोविड सेंटर करा, त्यावेळेस आपले कार्यकारी अभियंता म्हणले की, अहो तिथे साप वगैरे आहेत. अहो, घरामध्ये साप आहेत, जंगलात,झाडाझुडपात साप असतातच नां आज तुम्ही अण्णासाहेब मगर स्टेडियममध्ये करताय तिथं काय साप नाहीत का? तसंच ऍटो क्लस्टरच्या ठिकाणी बाकीच्या गोष्टी तिथं आहेतच नां, आहे त्याला जर आपण सुविधा पुरवल्या असत्या तर जिजामाता हॉस्पिटल, भोसरी नवीन हॉस्पिटल, वायसीएमएच याठिकाणी सुविधा पुरविलेल्या नाहीत. पण आपले अधिकारी हे तुमची दिशाभूल करुन नवीन टेंडर काढायला लावणार आणि बील तुमच्या नावाने फाडायला लावणार आणि याचा त्रास तुम्हांला आणि आमच्या सारख्या लोकांना होत आहे. हे कुठं तरी थांबलं पाहिजे. मा.महापौर साहेब, माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, पीजीआय च्या डॉक्टरांना परमनंट करु नका, आणि या डीनचा विषय जो आहे तो प्रत्येक हॉस्पिटलला २ ते ३ वर्ष काम केलेलं पाहिजे. त्यांनी न्युरोचं ऑपरेशन, गायनीकचे ऑपरेशन बाकीच्या गोष्टी त्यांनी ऑपरेट केलेल्या पाहिजेत. त्याच्यानंतर डीनची मान्यता भेटते. आम्ही या डॉक्टरांना घ्या म्हणतो पण ते कधी आता आपण हे हॉस्पिटल कोविड केलं आहे. बाकीचे हॉस्पिटल इतर आजाराच्या उपचारासाठी रन होतील. ठेवा ना सगळे विषय बाजुला, आजच का, का, याच्यामध्ये कोणाची आर्थीक देवाण-घेवाण आहे. कोणाचे लागेबांधे आहेत का, आता भांडार विभागाचे चितळे साहेब, यांची वेगवेगळी खरेदी वगैरे चालू आहे. त्यांच प्रमोशन ठाणे महापालिकेत होत आहे. इथं सगळं रामभरोसे चालू आहे. जे होईल ते होईल, मा.महापौर साहेब, हे शासनाकडनं आलेले अधिकारी आज ना उद्या हे येथून निघुन जाणार आहेत. आणि यांनी सगळी महापालिका वाटून घेतली आहे. आणि तुम्ही आम्ही भांडत बसलोय. मडक्याला आपण मांजराप्रमाणे भांडण करतोय

बोक्याप्रमाणे आणि हे टिंब, टिंब म्हणुन फायदा करुन घेणार आणि निघुन जाणार आणि आपण इथं बघत बसणार हे कुठं तरी थांबल पाहिजे. एवढं बोलून थांबतो जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब, प्रथम मी आपले मनापासून अभिनंदन करु इच्छितो की, श्रीकर परदेशी साहेबांच्या वेळेला महापालिकेने एक स्वप्न पाहिलं होतं त्यावेळेला साहेबांनाही सर्वांनी साथ दिलेली होती. आणि विषयाला मंजुरी दिलेली होती. आणि त्याला यश आणण्याचं काम आणि त्यामध्ये ज्या काही बाधा होत्या त्या बाधा ओलांडून आपण प्रयत्न केले आणि प्रयत्नाची पराकाष्ठा केली. आज हा चांगला दिवस आहे. कोविडमध्ये आम्ही सर्वजण पाहतोय आता कोण डॉक्टर काम करतोय, कोण करत नाही, कोण अधिकारी काम करतोय,कोण अधिकारी काम करीत नाही. भिन्न-भिन्न परिस्थिती आहे. परंतु हार्डीकर साहेब,आपण स्वत: रात्री १२.००, १.०० वाजेपर्यंत काम करताय, आणि रात्री कोणीही फोन केला तर फोनही उचलता किंवा काही वेळा मेसेज टाकता की, मी नंतर कॉल करीन. तुमचं कौतुक कराव तेवढं कमी आहे. तुमचं काम खुप चांगल आहे. उलट तुम्हांला अधिका-यांची जी साथ मिळायला पाहिजे होती ती मिळाली नाही. तरी सुध्दा तुम्ही कुठेही कमी पडलेले नाहीत. यासाठी मी तुमचं विशेष अभिनंदन करतो. आणि आज सुध्दा आपल्याला काही निर्णय घ्यावे लागतात आणि त्या निर्णयाबद्दल काही लोक टिका पण करतात. परंतु निर्णय हे तुम्हांला घ्यावेच लागणार आहेत. कारण निर्णय घेतले नाही तर ते ही आपल्याला बोलणार आहेत. अमुक ऑक्सीजन मिळाला नाही, अमुक सिलेंडर मिळाला नाही, बेड मिळाला नाही म्हणुन इतकी माणसं मेली म्हणुन या सभागृहात ऐकायला मिळत आहे. तेंव्हा आयुक्त म्हणुन निर्णय घेणे हे गरजेचं आहे. काळाची गरज पाहता तुम्हांला निर्णय घेणं गरजेच आहे. मा.आयुक्त साहेब, मला खेदाने इथ नमुद करावंस वाटतय की, तुम्ही इतरांना न्याय दिलेला आहे. आणि न्याय देताना आपण डॉक्टरांची भरती असेल किंवा मग आता राहीलेली ही मंडळी होती त्यामध्ये वायसीएममधले आज आपल्याकड लॅब असिस्टंट आहेत, स्टाफ नर्स आहेत, वॉर्डबॉय आहेत, जे १२/१५ वर्ष काम करतात आणि आताच तुषार हिंगे यांनी उपसूचनेच्या माध्यमातून त्या सर्वांना कायम करावं अशा पध्दतीने सूचना केलेली आहे. मला अशी अपेक्षा होती की, या डॉक्टरां सोबतच तो ही विषय आपण ठेवला की, काय परंतु त्यासोबतच यांना पण आपण

न्याय देणं गरजेचं आहे. कारण आपल्याकडे जे काही स्टाफ नर्स आहेत त्यांना सुट्टया मिळत नाहीत, बाकीच्या ॲडव्हेंटेज मिळत नाही, त्यांना परमनंन्ट लोकांसारखे जे फायदे आहेत ते मिळत नाहीत. परंतु ते तीनही शिफ्ट मध्ये प्रामाणिकपणे वर्षानुवर्ष काम करतात. परंतु त्या लोकांना आजही न्याय मिळालेला नाही. आणि त्यांना सुट्टी पण मिळत नाही. काही लोकांनी कोर्टाकडनं स्टे घेतलेला आहे.माझी प्रशासनाला विनंती आहे की, आयुक्त साहेब तुम्ही इतराचं जसं भलं करीत आहात त्या बरोबरच या लोकांचाही विचार केला पाहिजे, त्यांना परमनंन्ट केलं पाहिजे, त्यांना सुध्दा मानवतेचा दृष्टिकोन समोर ठेवून त्यांना न्याय दिला पाहिजे आणि आपण हे करावं अशी माझी तुम्हांला आणि भारतीय जनता पार्टीच्या पदाधिका-यांना सुध्दा विनंती आहे की, आपण सर्वांनी यासाठी प्रयत्न करावा. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला खेदानं नमुद करावं असं म्हणलं होतं तेंव्हा मला अस म्हणायचं आहे की, वायसीएमएच चे जे १३ डॉक्टर होते त्यापैकी फक्त ५ डॉक्टर तुम्ही यामध्ये सामावून घेतलेले आहेत. तुम्ही सांगीतल्याप्रमाणे सप्टेंबर मध्ये तुम्ही जाहीरात काढली आणि त्याच वेळेला प्रशासनाला असं का वाटलं की प्रशासनाला हायकोर्टात कॅव्हेट दाखल करावं लागलं. का? तर महापालिकेतील डॉक्टर लोकांना कोर्टात जावं लागेल हे तुम्हांला आधीच माहिती होते का? यामध्ये नेमकी काय खेळी झालेली आहे. मा.आयुक्त साहेब, यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे का? किंवा यामध्ये काही वशिलेबाजी झाली आहे. कारण श्रीकर परदेशी साहेब असताना त्यांच्या काळामध्ये ज्या डॉक्टरांच्या प्रयत्नामुळे, ज्या डॉक्टरांच्या मेहनतीपाई आपल्याला त्यावेळेस जी परमिशन मिळाली होती त्यामध्ये प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर आणि डीन अशा पध्दतीची पदं भरत असताना जे आपल्याकडे सिनियर डॉक्टर आहेत जे वायसीएमएच मध्ये काम करतात आज त्यांची २५/३० वर्ष सर्व्हीस झालेली आहे. त्या १३ डॉक्टरांपैकी फक्त ५ डॉक्टरांना घेतलं गेलेलं आहे आणि ८ डॉक्टरांना आपण त्याठिकाणी नाकारलेलं आहे. आता ज्या डॉक्टरांच्या मुळे आपल्याला वायसीएमएच मध्ये जे सुरुवातीला आपण २०१३ आणि २०१७ मध्ये Essehtiality Certificate जे आपल्याला मिळाल आहे ते Essehtiality Certificate या डॉक्टरांमुळेच मिळालेलं आहे. म्हणजे परदेशी साहेबांच्या वेळेला जे सर्टीफिकेट आपल्याला लागत होतं आणि ज्यांच्यामुळे महापालिकेमध्ये हे कोर्स सुरु झाले होते आणि त्यांच्याच प्रयत्नामुळे MCI नी त्यांना परमीशन दिलेली आहे. Because the those Doctors we have taken a permission from

MCI अशी परिस्थती असताना सुध्दा या सिनीअरमोस्ट ८ डॉक्टरांना का डावललं गेलं कोणाच्या सांगण्यावरुन डावललं गेलं, ज्यांच्याकडे क्वालिफिकेशन आहे, ज्यांच्याकडे सिनियारीटी आहे,ज्यांनी या महापालिकेची सेवा केलेली आहे अशा परिस्थितीमध्ये यांना आपण यांना कोणत्या कारणास्तव डावललं आहे.दुसरी गोष्ट अशी आहे की, मगाशी आता संदीप वाघेरेनी जाहीरपणे सांगितल्याप्रमाणे आपण त्याठिकाणी एमओएच आणि ॲडिशनल एमओएच ला पण इन्टरव्हिवमध्ये घेतलेलं नाही. पण नॉन टेक्नीकल मंडळी तिथं इंटरीव्ह मध्ये बसवली त्यामध्ये आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त आणि डॉक्टरांपैकी कोणालाच बसवलं नाही. याचं कारण काय? याचं स्पष्टीकरण पण दिलं पाहिजे. दुसरी गोष्ट याठिकाणी रोस्टर हे पाळलेलं नाही. आपल्याकडे मागासवर्गीय असलेले डॉक्टर पण आहे ज्यांची सेवा २८ वर्ष,३० वर्ष सेवा झालेली आहे. त्यांना सुध्दा तुम्ही नाकारलेलं आहे. तुम्हांला उदाहरणच द्यायचं झालं तर मी आपल्याला सांगु इच्छितो की, आपल्याकडे डॉ.नितीन मोकाशी यांनी एम.डी. मायक्रो बायोलॉजी आहे त्यांनी १८ वर्ष काम केललं आहे. त्याचप्रमाणे डॉ.दिनेश गाडेकर हे एमबीबीएस, एम.डी.मायक्रो बॉयलॉजी आहेत, वायसीएमएच मध्ये ५/६ वर्षाचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे डॉ.प्रतिभा शामकुंवर हे एम.डी.आहेत त्यांच्या ३ पब्लीकेशन आणि १८ वर्षाची सर्व्हीस झालेली आहे. मग या लोकांना तुम्ही कोणत्या बेसवर टाळलं आहे यांचा ओरल इंटरीव्ह घेतलेला आहे फक्त ज्या लोकांनी २५/२५ वर्ष सर्व्हीस महापालिकेमध्ये केलेली आहे. ज्या लोकांच्या सर्टीफिकेशनवर, पब्लिकेशनवर तुम्हांला नाशिकची जी परवानगी लागते ती परवानगी मिळालेली आहे. Just because of this doctors only, MCI has given the permission. आता डॉ.सोनी हे एजबार आहे पण तुम्ही त्यांना इतकं सिस्टमेटीक पेपरमध्ये बसवले आहे की, Joining झालेल्या तारखेपासून त्यांचे वय धरले जाईल म्हणजे जेंव्हा तुम्ही भरती करताय ते न धरता तुम्ही असं सिस्टमॅटीक पध्दतीनं केलं म्हणजे डोळयासमोर व्यक्ती ठेवुन, डोळयासमोर डॉक्टर ठेवून. आपल्या महापालिकेच्या आस्थापनेतील डॉक्टरांवर अन्याय करुन, चुकीच्या पध्दतीने मग मी असे म्हणेन की,त्यावेळच्या पदाधिका-यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. डॉक्टरांकडनं पैसे जमा केलेले आहेत आणि त्यांनीच प्रशासनाला सांगितलं आहे की, काय पण करा पण ही लोकं बसवा.मला एक साधं उत्तर पाहिजे की, मी कोणत्याही डॉक्टरांच्या विरोधात नाही, डॉक्टर लोक परमनंन्ट व्हायला पाहिजेत हे मान्य आहे. मला याचं उत्तर पाहिजे की, जे १३ डॉक्टर आहेत त्यापैकी ५ च

डॉक्टर घेतलेले आहेत आपले ८ डॉक्टर जे क्वालिफाईड आहेत,जे पोष्ट ग्रॅज्युएट आहेत कोणाचे ३,५,८,१० पब्लिकेशन आहेत. म्हणजे तुमचे जे क्रायटेरीया आहे त्या क्रायटेरीयामध्ये ते बसतात फक्त ते तुमच्या मनामध्ये बसलेले नाहीत तुमच्या पदाधिका-यांच्या खिशामधे त्यांना पैसे टाकता आले नाहीत. म्हणुन त्यांना नाकारता का? त्यांना नाकारायचं कारण काय? त्यांच्या पेक्षा कमी शिक्षण असलेल्यांना आपण घेतलेलं आहे. ज्यांच कमी पब्लिकेशन आहे त्यांना घेतलेलं आहे. एजबार असलेल्या माणसांला घेतलेलं आहे. आणि तुम्ही जाहीरात काढल्या,काढल्या तुम्हांला कॅव्हेट दाखल करण्याची पाळी का आली. Beacause it proves your Intension It proves your malafide Intention you have done with malafide intention it prove your Intension आणि आता तुम्ही तसं करुन दाखवलं आहे. तुम्ही याच रिजन दया मा.महापौर साहेब. आज आपण दुसरीकडे काही डॉक्टरांना न्याय देतोय त्या डॉक्टरर्स लोकांनी आपल्या वायसीएमएच मध्ये आपल्या वायसीएमएच ची काय परिस्थिती होती. महापौर साहेब, आपण स्थायी समितीचे चेअरमन होता अनेक सिनियरमोस्ट मंडळी आहेत एकतर त्यांचे चार-चार, पाच-पाच टर्म झालेल्या आहेत, माझी स्वतःची सहावी टर्म आहे. मग वायसीएम कोणत्या परिस्थितीमध्ये होत त्या परिस्थितीमध्ये पंधरा-पंधरा, वीस-वीस वर्षे काम करणारे हे सिनीअरमोस्ट डॉक्टर या ०८ लोकांना बाजुला ठेवण्याचं कारण काय? कारण या पदासाठी जो रेट फुटला होता तो हे देऊ शकले नाहीत. आणि दुसरी गोष्टी अशी आहे की आता काही डॉक्टर २ वर्षानी,काही ३ वर्षांनी रिटायर होणार आहेत. मा.आयुक्त साहेब, यांचा ऍडव्हेंटेज असा आहे की, यांना ६४ वर्षापर्यंत काम करता येतं. आता ५८ वर्षामध्ये रिटायर होणार आहेत म्हणजे ६ वर्षाचा ऍडव्हेटेज त्यांचा गेला, पगारामध्ये तफावत आहे. हे साठ-पासष्ठ घेत असतीलतर ते लाख रुपये पगार घेणार आहेत. म्हणजे आज नवीन आलेली पोरं नवीन आलेली डॉक्टर यांना तीस-तीस, चाळीस-चाळीस, पन्नास-पन्नास हजार रुपये पगार जास्त आणि आमचे जुने डॉक्टर ज्यांनी महापालिकेमध्ये या रुग्णांची सेवा केली, या शहराची सेवा केली आज रिटायरमेंटला त्यांना तुम्ही हे पद देणार का? आता आयुक्त साहेब म्हणले, आपल्याला अजुन डॉक्टरांची गरज आहे. अजुन जाहीरात द्यावी लागणार आहे. तुम्ही आता आपल्याकडे जे उपलब्ध डॉक्टर आहेत त्यांची सेवा का तुम्ही भरुन घेत नाहीत. या डॉक्टरांच्या रजिस्ट्रेशनमुळे आपल्या महापालिकेला त्यावेळेला परदेशी साहेब असताना आपल्याला परवानगी मिळालेली आहे. मला

संतोष पाटील साहेबांनी उत्तर द्यावं की, डॉक्टर वाबळे हे माझे काही शत्रु नाहीत, परंतु तुम्ही किती चांगल्या पध्दतीने त्यांचे सिलेक्शन केलेलं आहे याचं उत्तम उदाहरण तुम्हांला देवु शकतो. डॉ.वाबळे हे एम.एस. अँनॉटॉमी आहेत. He the person from Non /Clinical post Nither He is having the Working & Teaching Experience मा.महापौर साहेब, खुप महत्वाचं आहे. आज एवढी मोठी संस्था आहे आपण या संस्थेवर आपण कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत आणि एवढे डॉक्टर्स आपण भरतोय यांचा जो प्रमुख आहे,जो यांचा मुखीया आहे त्यांना शिकवता येत नाही, त्यांना पेशंट बघता येत नाही,त्यांना क्लिनीकल माहित नाही. त्यांच काम आहे फक्त एम.एस.अँनॉटॉमी याचा अर्थ म्हणजे मुडदे फाडायचे, कापायचे आणि दाखवायचे हे काय,हे काय हे, हे काय आपले मागचे महाशय पंडीत यांचे हे मित्र आणि त्या पंडीतनी जाता,जाता हे काम केलं आणि आपल्या गळयात टाकून दिलं. आणि आपल्या साहेबांवर कोणाचा प्रेशर होता हे मला माहित नाही. भाऊसाहेब भोईर आणि सिमाताई तुम्ही पण ऐका मला तुम्हांला हे सांगायचं आहे की, Mr.Wabale was working with MCI Office in Delhi. He dosent have the Experience of the teaching not handling the patients non clinical work the how & why he was selected as the dean दुसरी गोष्ट आहे की, यांच्याच बरोबरीने तिथं डॉ.प्रदीप गायकवाड हे डीनच्या परिक्षेला उपस्थित होते. Dr.Pradeep Gaikwad who have the Qulification he has more than 100 Publication. As a Senior most Dr. Working in a Medical College a Gynaecology which is the clinical post he has teaching experience also. एवढा १०० पब्लिकेशन असलेला माणुस,एवढा सुशिक्षित माणुस त्याला गायनॉकलॉजी मध्ये Clinic चा Experince आहे.जो All ready तिथं प्रोफेसर म्हणुन काम करतोय,यांना क्लिनीकलचा अनुभव आहे, त्याला नाकारण्याचं कारण काय? पाटील साहेब, तुम्ही त्या इंटरीव्हला उपस्थित होता. याचं उत्तर तुम्ही दिलं पाहिजे. या डॉ.प्रदिप गायकवाडला त्यांच्याकडे १०० पब्लिकेशन आहेत जो सिनीअर मोस्ट डॉक्टर आहे त्यांना कामाचा अनुभव आहे, जो मेडीकल कॉलेजमध्ये काम करतोय, गायनॉकलॉजीमध्ये तो एमडी आहे आणि त्यांना क्लिनीकल पोस्टचा आणि टिचिंगचा अनुभव आहे. आता या सर्व बाबी असताना तुम्ही या डॉक्टराला तिथं Fail केलं आहे तिथं त्यांना घेतलेलं नाही. दुसरं डॉ.गिरीष बारटक्के हे एम.डी.आर्थो. Again a Clinical Subject. Who is working in Sasoon Hospital यांनी लोकांना मदत केलेली आहे. मा.आयुक्त साहेब, मला असं विचारायचं आहे की, डॉ.वाबळे जे आहेत ते एम.एस. अँनॉटॉमी आहेत He is from Non /Clinical post Mr.Wabale was working in MCI Office, Delhi. He doesnot have the experience of teaching non handling the patients not a clinical work. The how he was

selected? यांच्यापेक्षा जास्त क्वालिफाईड लोक त्या इंटरीव्हला होती. दुसरा प्रश्न असा आहे की, तुमच्या सोबत तुम्ही एमओएचला किंवा ॲडीशनल एमओएचला इंटरीव्हमध्ये डॉक्टरांना का घेतलं नाही. तुम्ही फक्त जो सिनियर असेल त्याला फक्त बोलवलं आणि ओरल इंटरव्हयूव घेतला. ओरल इंटरीव्ह घेत असताना तुमच्याकडे त्यावेळेला डॉ.प्रदीप गायकवाड होते. Who has the Qulification, he has more than 100 Publication. As a Senior most Doctor Working in a Medical College as a गायनॉकलॉजी Subject which is the clinical post he has teaching experience also म्हणजे इतका अनुभवी, हुशार त्याच्याकडे १०० पब्लिकेशन आहेत हे सगळं बाजुला ठेवलं तुम्ही आणि एक नॉन क्लिनीकल माणसाला, नॉन टेक्नीकल माणसाला जो दिल्लीमध्ये बसलेला होता पंडीतांचा मित्र होता किंवा पंडीतांचा शुटर होता त्या डॉक्टरांना तुम्हांला त्या पंडीत मुळ घ्यावं लागलं अशी परिस्थिती दिसते आहे. दुसरी गोष्ट डॉ. गिरीष बारटक्के हे एम.डी.आर्थो.आहेत Again he is from the clinical post. He has the यांचा वर्कलोड वगैरे बघुन या सगळया गोष्टीचा विचार करता आपण या पीजीआयची निर्मिती केली आणि अशा प्रकारचे आपण हे डॉक्टर घेण्याचं ठरवलं. मग आपल्या महापालिकेमध्ये जे आठरा वर्षापासून, वीस वर्षापासून, पंचवीस वर्षापासून ज्यांच्याकडे ३ पब्लिकेशन आहेत, ७ पब्लिकेशन आहेत, ५ पब्लिकेशन आहेत तुमच्या सिलेक्शनच्या क्रायटेरियामध्ये बसतात त्या ८ डॉक्टरांना वगळुन दुस-या बाजुला प्रशासनाने कॅव्हेट दाखल करुन ठेवली. का तर ते हायकोर्टात जातील म्हणुन प्रशासनाला अशी का भिती होती आणि एवढे अनुभवी डॉक्टर आपल्याकडे असताना ज्यांनी या महापालिकेमध्ये आपलं आयुष्य घालवलं आपण त्या डॉक्टरांना का नाकारल. कोणत्या बेसवर नाकारल, त्यांना नाकारण्याच कारण काय. २००५ चा जी.आर.आहे त्याचे गाईडलाईन पण आहेत त्या गाईडलाईन प्रमाणे त्यांना प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे होतं. त्यांच Willingnes घ्यायला पाहिजे होतं. आणि जे कोणी तयार होतील कारण त्यांना Teaching Experence आहे.२०१३ पासुन डॉक्टर परदेशी साहेब २०१३ पासून होते तेंव्हापासून ते Teaching करतात. आणि त्यांच्या मुळे आपल्याला नाशिकची परमिशन मिळालेली आहे. आणि मग असं असताना आपल्या डॉक्टरांवर अन्याय का? यामध्ये दोन गोष्टी आहेत एकतर तुम्ही सत्ताधारीच्या दबावामध्ये काम केलं किंवा मग सत्ताधा-यानी खिशे भरलेले आहेत, त्यामुळे यांच्यावर अन्याय केलेला आहे. यांच्याकड पब्लिकेशन आहे,सिनीअरमोस्ट आहेत, टिचींग अनुभव आहे आणि

आपल्या महापालिकेचे डॉक्टर आहेत. मग यांना डावलन्याच कारण काय. १३ पैकी तुम्ही ५ घेतले ८ डावलले आहेत. आयुक्त साहेबांनी सांगितलेलं आहे की, आपल्याला अजुन डॉक्टरांची आवश्यकता आहे. मग आपल्याकडे जे डॉक्टर आहेत त्यातील काही डॉक्टर २ वर्षानी किंवा काही डॉक्टर ३ वर्षांनी रिटायर होणार आहेत. त्यांना जर आपण पीजी डॉक्टर म्हणुन घेतलं असतं तर त्यांना वयाच्या ६४ वर्षापर्यंत काम करता आलं असतं या लोकांनी या महापालिकेमध्ये एवढी सेवा केलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, अजुनही वेळ गेलेली नाही, आपण त्या डॉक्टरांचा विचार करावा त्या डॉक्टरांना मर्ज करुन घ्यावं कारण तुम्हांला अजून डॉक्टरांची आवश्यकता आहे असं तुम्ही म्हणलेल आहे. मी तर असं म्हणतो मा.महापौर साहेब, आपल्याला डॉक्टरांची गरज आहे आपण आयुक्त साहेबांना सांगा की, या ८ डॉक्टरांच सुध्दा आपण विषयपत्र ठेवावे आणि या डॉक्टरांना पण न्याय द्यावा आणि त्यांनाही न्याय द्यावा. आपल्याला डॉक्टरांची गरज आहेना. पीजीआयचे डॉक्टर हे ऍडिशनल होतील. नवीन घेण्यापेक्षा म्हणजे आपल्याकडे ज्युनिअर आहेत त्यांचे पगार यांच्यापेक्षा जास्त असणार त्यांची सर्व्हीस यांच्यापेक्षा जास्त असणार, यांची सर्व्हीस यांच्यापेक्षा जास्त असणार,आणि मग हे Unjustice कशाला तर तुम्ही Unjustice करु नका तुम्हांला ज्यांना कोणाला घ्यायच ते घ्या, सत्ताधा-यांनी ठरवलं असेल विषय मंजुर करायचा तुम्ही सत्ताधारी असल्यामुळे तुम्ही विषय मंजुर करणार पण विषय मंजुर करीत असताना या गोष्टी तुम्ही बघा की,आपण आपल्या डॉक्टरांवर अन्याय करीत नाही ना, याचा सुध्दा विचार करावा आणि आपल्याला डीन घेताना डीन कोणत्या क्वॉलीफिकेशनचा पाहीजे ज्याला क्लिनीकल माहीती आहे, ज्याला टिचींग माहिती आहे, जो पेशंट बघु शकतो, आपल्याला मागचे डॉक्टर माहिती आहेत. मागचे सुपरीटेडंट तुम्हांला माहिती आहेत, मी आपल्याला सांगु इच्छितो की, आपल्याकडे डॉ.विनायक पाटील, त्याच कौतुक कराव तेवढ कमी आहे. ते रात्री १२ वाजता,१ वाजता सुध्दा पेशंट अटेंड करतो. अनिकेत लाठी सुध्दा चांगले डॉक्टर आहेत, नवीन आहे ते पण चांगले आहेत. त्यांच कौतुक केलं पाहिजे. बाकीच्या डॉक्टरांची नांव मला जाहीर करु वाटत नाही. या सर्व मंडळीचं मी तुम्हांला शुटींग दाखवू शकतो. हे सर्व डॉक्टर डीन साहेबांच्या केबीन मध्ये बसुन फक्त पेपर वाचतात, चहा पितात,बिस्कीट खायचं हजेरी लावतात आणि जातात. तुम्हांला बघायचं असेल तर तुम्हांला व्हीडीओ शुटींग दाखवतो. आणि हा त्यांचा रोजचा कार्यक्रम आहे त्या

५/७ डॉक्टरांची नांव पण माझ्याकडे आहेत. आयुक्त साहेब, तुम्ही एवढं चांगल इन्फ्रास्ट्रक्चर उभं केलं आहे, लोकांची सेवा व्हायला पाहीजे आणि कोणावर अन्याय नाही व्हायला पाहीजे, तुम्ही एवढी चांगली काम केली आहेत तुम्ही हे शेवटच चांगल काम पण करुन दया. डीन सुध्दा आम्हांला चांगला उपलब्ध करुन द्या. तो सर्व काही सांभाळू शकेल. जे क्वालिफाईड नाहीत त्यांना आपण का अपॉईट करता हे मला कळत नाही. जे सिनियरमोस्ट डॉक्टर आहेत ते बसु शकतात त्यांना तुम्ही नाकारलं आणि यांना तुम्ही घेतायत हे मला हे कळत नाही. मा.महापौर साहेब,आपण याचा पण विचार करावा धन्यवाद.

**मा.विकास डोळस –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह आता संदीपभाऊंनी वायसीएमएच बद्दल जो विषय सांगितला आहे.त्याबद्यलच मला बोलायचं आहे.माझ्या प्रभागातील एक नागरीक माझ्याकडे आला होता त्यांनी त्याची घटना मला सांगितली त्यानंतर ती घटना मी आयुक्त साहेबांना पण सांगितली. आता सध्याची परिस्थिती पहाता मला आरोग्य विभाग आणि डॉक्टरावरती बोलायचं नाही. आणि टिका पण करायची नाही. पण जे वास्तव चित्र आहे ते तर सभागृहासमोर आलं पाहिजे.कोण काम करतोय आणि कोण करीत नाही. तर माझ्याकडे जे दांपत्य आलं होत ते दोघेही पॉझीटीव्ह होते.आणि आपल्या वायसीएमएच मध्ये ॲडमीट झाले त्यानंतर ते दोघेही निगेटीव्ह आले. दोन दिवसांनी ते घरी गेले. त्याच्यानंतर त्या महिलेला त्रास व्हायला लागला.त्या महिलेचं ३८ वर्ष होतं.परत ती वायसीएमएचला आणि पण तिला ॲडमिट करुन घेतलं नाही.नंतर त्यांनी बरेच हॉस्पिटल फिरले. नंतर मग ते नायडू रुग्णालयात गेले तेथे त्यांचा ईसीजी केला त्याचा रिपोर्टमध्ये असे आढळले की,तिला हार्टचा प्रॉब्लेम आहे. पण त्यांनी त्या बाईला सांगितले की, तुम्ही पहिलं ज्याठिकाणी ॲडमिट होता त्याच ठिकाणी ॲडमिट व्हा कारण इथं पण जागा शिल्लक नाही.आणि मग आम्ही स्पेशली प्रयत्न करुन वायसीएमएच ला ॲडमिट केलं. तिचा नवरा हा बाहेर असायचा आणि ती आत मध्ये असायची ४.०० वाजल्यापासून तिचा आणि त्या नव-याबरोबर कॉल व्हायचे आणि तिच्या फोनची रेकॉर्डीग आता पण यायची इथे आमचे कुत्र्यासारखे हाल होतात. ती महिला वारलेली आहे. माझी बहिण वारलेली आहे. तिचा नवरा जेंव्हा माझ्याकडे आला तेंव्हा त्यांनी तिचं रेकॉर्डीग मला ऐकवलं आहे.ती तिच्या नव-याला सांगत होती की,इथं एक म्हातारी दोन तास झालं बेडवरुन खाली पडलेली आहे. ती आजी कोरोना पॉझीटीव्ह आहे

दोन तास झालं कोणच त्या आजीकडं गेलं नाही. शेवटी त्या बाईनेच तिला उचलून बेडवर ठेवलं. ४.०० वाजल्यापासून त्या महिलेला त्रास होत होता. आणि तिचा नवरा सांगायचा माझ्या पत्नीला त्रास होत आहे. प्लीज कोणी तरी तिथं जा. त्यानंतर ५ ते ५.३० नंतर त्या महिलेचा फोन तिच्या नव-याला यायचे बंद झाले. त्यानंतर याला वाटायला लागले की,नक्कीच हिला आतमध्ये काही तरी व्हायला लागलं आहे. शेवटी तो माणुस वॉचमनच्या हातापाया पडून आत मध्ये गेला आणि त्याने त्याच्या मिसेसला चेक केलं तर ती लेडीज गेलेली होती. बाहेर येऊन त्यांनी त्यांच्या नातेवाईकांना सांगितलं की, मिसेस गेलेली आहे. आणि तो वाट बघत होता की,आतुन मला केंव्हा फोन येईल रात्री १२.४५ ला यांनी जाऊन सांगितल की, हिला चेक करा आणि त्यानंतर १२.४५ वा.त्यांचा फोन आला की, तुमची मिसेस गेलेली आहे.म्हणजे ५ ते ५.३० वा.घडलेली घटना तुम्हांला रात्री १२.४५ पर्यंत आरोग्य विभागाला कळतच नाही की, ती महिला जीवंत आहे की नाही. त्यानंतर मी स्वत: वायसीएमएच मध्ये गेलो होतो. मी वाबळे सरांना भेटलो त्यावेळी वाबळे सर म्हणले की, आपल्याला अर्ध्या/अर्ध्या तासाला पेशंट चेक करावे लागतात. खरंच आपले डॉक्टर कोविडच्या पेशंटकडे जातात का? कोविडच्या पेशंटला आपले डॉक्टर हे अस्पृश्य असल्यासारखी ट्रिटमेंट देतात. खरोखरच कोविडमध्ये जे काम करतात ते त्याठिकाणी असलेले सिस्टर, वॉर्डबॉय हे काम करीत असतात. कंत्राटी पध्दतीवर जे कामगार नेमलेले आहेत ते काम करतात. ज्या महिलेला हार्टचा प्रॉब्लेम होता तिच्याकडे आपल्या डॉक्टरांनी लक्ष दिलं असतं तर आज ती महिला जीवंत राहीली असती. तिच्याकडे दुर्लक्ष झालं म्हणुन ती महिला गेली आहे. सायं.५.३० वा.घटना घडते आणि रात्री १२.४५ वा.सांगतात की, तुमची लेडीज गेलेली आहे. जेंव्हा हा फोन करतो की, माझी पत्नी गेलेली आहे जाऊन बघा. ही फार गंभीर बाब आहे. काम करणारी डॉक्टर मंडळी खुप कमी आहेत त्यामध्ये विनायक पाटील, डॉ. अनिकेत लाठी,असतील असे २/४ चं नांव आहेत. नाही तर डॉक्टर हे त्यांच्याकडे असलेला जो डेस्क असतो त्याच्यावर ते पेपर वगैरे लिहितात. मग मी डॉ.वाबळे सरांबरोबर गेलो तिथं एक सिस्टर होत्या त्यांना डॉ.वाबळेनी त्यांना विचारलं डॉक्टरांचा राऊंड कधी झाला त्या म्हणाल्या डॉक्टरांचा सकाळपासून राऊंडच झाला नाही. मग डॉ.वाबळे म्हणाले राऊंड झाला असेल असं कसं नाही? मग त्या म्हणल्या की, आज झाला नाही. म्हणजे मी तिथं १.३० वा.गेलो होतो तोपर्यंत तिथं डॉक्टरांचा राऊंडचा झाला नव्हता.

याठिकाणी एवढंच सांगायचं आहे की, आपण पेशंटकडं लक्ष दिलं पाहिजे. आणि माई आपल्यावर डॉ.वैशालीताई, योगेश बहल यांनी आरोप केलेला आहे ते यासाठी केलेला आहे की, आपले प्रशासन हे वेगळयाच पध्दतीने काम करीत आहे. आशाताईच्या घराजवळ ठेकेदारांची माणसं येतात आणि गोंधळ घालतात. काल मी भाऊसाहेबांच भाषण ऐकत होतो. अधिकारी एकदम मुजोर पध्दतीने वागतात. आणि पालांडेताईंचा फोन रेकॉर्डींग करुन व्हायरल केलेला होता. म्हणजे या सभागृहात काय चाललंय खरोखरच ही या अधिका-यांची वतनदारी,जहागिरदारी आहे. आज नगरसेवकांकडे कामं नागरिकांचीच  असतात ज्यावेळेस आमच्याकडे तक्रारी येतात त्याचवेळेस आम्ही अधिका-यांना विचारतो. वायसीएमएच मधुन वारंवार तक्रारी येतात म्हणुन आम्हांला माहिती पडतयं. आज संदीपभाऊवरती गुन्हा दाखल झालेला होता. एखादया डॉक्टरांच्या चुकीमुळं जर एखादया व्यक्तीचा जीव जात असेल तर त्यांच्यावर गुन्हा का दाखल करायचा नाही. ज्या महिलेचा मृत्यु झाला त्या महिलेचा पती माझ्याकडे ८ दिवसांनी आला होता तो मला म्हणाला माझी पत्नी गेल्यामुळे माझं कुटूंब उध्दवस्त झालेलं आहे. पण ही घटना पुन्हा होऊ नये.मला खाजगी दवाखान्याचा खर्च परवडत नव्हता म्हणुन मी वायसीएमएच मध्ये ॲडमिट केलं होतं. पण अशी परिस्थिती इतर कुटूंबावर येऊ नये यासाठी मी तुमच्याकडे आलो आहे. आयुक्त साहेब, ही परिस्थिती नियंत्रणात आली पाहिजे. आयुक्त साहेब, याठिकाणी कोणतीही गंभीर घटना घडली तर त्याचं उत्तर हे तुम्हांलाच द्यावं लागतयं. या खालच्या अधिका-यांवर नियंत्रण आणाल अशी अपेक्षा बाळगतो धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह खरोखरचं जेंव्हा हा विषय आमच्या समोर आला त्यावेळेस दोन दिवस हे घोळतचं होतं की, आपण ५ जणांना घेतलं आणि ८ जणांना घेतलेलं नाही. या ८ जणांना नं घेण्याचं कारण मला कळलेलं नाही. कमिटी कुठल्या पध्दतीने काम करणार कोणाला घेणार, कोणाला नाही आम्ही त्या विभागाचे नगरसेवक असुन सुध्दा आम्हांला वायसीएमएचमधील ब-याचशा गोष्टी आम्हांला माहिती नसतात. ८ डॉक्टरांना तुम्ही घेत नाही कारण ते फेल झालेले आहेत पण जेंव्हा त्यांना आपण आपल्या आस्थापनेवर घेतलं होते त्यावेळेस ते कॅपेबल नव्हते का? म्हणजे पीजीआय साठी आपण त्यांना घेत नाही. आता जी उपसूचना दिलेली आहे की, बाकीचे जे इंटरीव्ह मध्ये फेल झालेले आहेत त्यांना घेण्यात यावे.  आणि ते पण कायमस्वरुपी

सामील करुन घ्यावे. पहिली गोष्ट आपल्याला या पध्दतीनं काम करता येईल का? दुसरी गोष्ट जर तुम्हांला या ८ फेल झालेल्यांना घ्यायचं असेल तर पहिल्यांदा तुम्ही इंटरीव्ह घेतलाच का? म्हणजे प्रशासनाने काम करायचं आणि सत्ताधा-यांनी भोगायचं. कारण मी अनुभव घेतलेले आहे.म्हणजे प्रशासनाने सत्ताधा-यांची सुपारी घेतलेली आहे का? हा माझा पहिला प्रश्न आहे. डॉ.वाबळे विषयी संदीप वाघेरेंनी जे काही बोलले ते अत्यंत खराब आहे. मी आयुक्तांनी या कोविडच्या कालावधीमध्ये जे काम केलेले आहे ते चांगल्या प्रकारे केलेले असल्यामुळे मी त्यांचे खुप मनापासून अभिनंदन करते. परंतु तुमच्या खालच्या अधिका-यांवर तुमचा वचक आहे का? ही खरी मुळाची गोष्ट आहे. म्हणजे माझ्या घरातील कुटूंब प्रमुख मी चांगलं काम करतो परंतु त्यांची पोरं कामातून गेले आहेत बाकी घराचीही परिस्थितीची वाताहत झालेली आहे अशी तुमची परिस्थिती झालेली आहे. आज मला एक प्रश्न विचारायचा आहे. माझ्या सहकार्याने एक विषय घेतला आहे की, या डॉक्टरांना आपण मानधनावर का घेतलं नाही. खरोखरचं आयुक्त साहेब, तुम्ही यांना मानधनावर का घेतलं नाही. ज्यावेळेला २/३ वर्षापासून वायसीएमएच मध्ये सोशल वर्कर असेल, किंवा मानधनावरच्या ज्या नर्सेस आहेत त्या इतक्या चांगल्या पध्दतीने काम करतात की, आज पीजीआय मधील जे डॉक्टर्स आहेत त्यामध्ये डॉ.लाठी,डॉ.पाटील,डॉ.सोनी अशी काही मोजकी नांव सोडली तर बाकीचा एकही डॉक्टर त्या फिल्डवर जात नाही. फिल्डवर जाणारा हा डॉक्टर त्याच पध्दतीने नर्सेसचं काम आहे. भाऊसाहेब, मानधनावर ज्या नर्सेस काम करतात त्यांच्या कामासंबंधीचा शासनाचा एक जी.आर.आहे त्याच्यामध्ये एक वाक्य आहे त्या नर्सेसमध्ये जर का काही झालं तर त्यावेळेला त्या तासामध्ये कामावर जाता आलं नाही तर आपल्या नर्सेसनी जाऊन काम करायचं. म्हणजे आपण याठिकाणी मानधनावर असलेले कर्मचारी आणि परमनंन्ट असलेले कर्मचारी यामध्ये आपण भेदभाव करीत आहोत. माझा तिसरा प्रश्न आहे की, मी अनपढ आहे, अगदी अंगठेबहाद्दर आहे मी,मला खरंच काही कळत नाही. रुबी हॉल केअर सेंटर हे आपण कोविडसाठी घेतलं आणि तिथं आपल्याला कोविड सेंटर करायचं होतं. त्याचवेळी आपण डॉ.डी.वाय.पाटील यांच्या बरोबर एक करार केला आणि डी.वाय.पाटील आपण ताब्यात घेतलं. आपण हा करार दोन महिन्यासाठी केला होता आणि मागच्या ३० तारखेला तो करार संपला आहे. सर्वसामान्य रुग्ण हे कुठे जातात हे तर मला कळतचं नाही. आणि मला वाटतं पीसीएमसीची ओपीडी धरुन

बाकीची २८ हॉस्पिटल्स आहेत.एवढी हॉस्पिटल्स कशासाठी केली आहेत. आज आपण रुबी हॉल केअरला दरमहा ५२ लाख रु.देत आहात. त्या रुबी हॉल केअरमधील स्टाफ आपण घेतला आहे. चला,तुम्ही असं म्हणाल की, कोविडच्या कालावधीमध्ये आपल्याला कोणाच्या पोटावर पाय मारायचा नाही. तुम्ही यांना डयुटीस वायसीएमएच मध्ये लावल्या आहेत का? नाही, त्यांच्या फिल्डवर काम करायला इकडे वायसीएमएच मध्ये काम करतात का? नाही. रुबी केअरमध्ये रु.२३५/- मध्ये काम करतात बाकीचे आपले जे लोक काम करतात पोटतिडकीने म्हणजे तुम्ही त्यांना कुठल्या पध्दतीनं दिलं. रुबी हॉल केअरचं सिटी स्कॅन आहे का? एमआरआय आहे, कुठला पेशंट येतो आणि किती येतो. साहेब, मला जर साडी घ्यायची झाली तर मला माझ्या नव-यांकडुनच पैसे घ्यावे लागतात. मला माझ्या नव-याने दिलेली गाडी घेऊन जावं लागतयं,मला माझ्या घरातल्या ड्रायव्हरलाच घेवुन जावं लागतयं. पण आज सिटी स्कॅन केल्यानंतर याला लागणारा जनरेटर हा पीसीएमसीने बसवुन दिला याच कारण काय? रुबी केअरचं ऑक्सीजन प्लॅन्ट, वायसीएमएच चा जे.ई. भंडारी आहे.पण माझ्या वॉर्डातला जे.ई. बाकीचे काम करतो तो आणि डेप्युटी हा वायसीएमएच मध्ये फक्त ५ ते ६ दिवस होता. कारण काय? ऑक्सीजन प्लॅन्ट करायचा आहे तो ऑक्सीजन प्लॅन्टचा नवीन बेस हा कॉर्पोरेशनचा उल्लेख आहे. आपलं कोविड सेंटर हे नॉर्मल पब्लीकसाठी, झोपडपट्टीतील नागरीकांसाठी आहे. पण सिटी स्कॅन म्हणलं ना तर पहिल्यांदा पैसे भरायचे आणि मग त्या पेशंटच सिटी स्कॅन होतं, एमआरआय होतं. हा कुठला न्याय आहे. कालचाच विषय स्टॅंडींगमध्ये आला आयसीयु १ आणि आयसीयु २ म्हणजे आपले हे ३ बेडचे प्रायव्हेटायझेशन करा. मी डॉ.वाबळेंशी बोलले डॉ.वाबळेंनी मला विचारलं गेलं की तुम्ही हे राऊंड करु शकता का? डॉ.वाबळे म्हणाले की, मी राऊंड करु शकत नाही कारण मॅन पॉवर नाही. माझा मुलभूत प्रश्न आहे तो सर्वसामान्य नागरीक कोणी विचारत नाही. सर्वसामान्य जनता म्हणुन मी तुम्हांला प्रश्न विचारते. आयसीयु १,२,३ असो किंवा कॉर्पोरेशनचा एखादा कुठलाही विभाग असो, हे जेंव्हा तुम्ही ३ महिन्यासाठी कोविडला द्यायचं म्हणताय,त्यांना मॅन पॉवरसाठी द्यायचं म्हणताय बाकीच्या सगळया फॅसिलीटी आपण देणार आहोत. अगदी औषधांच्या गोळी सुध्दा, त्या पीजी च्या डॉक्टरपेक्षा वर्कर भरा,स्टाफ भरा, आया, वॉर्डबॉईज भरा, तुम्ही डॉक्टर जर घेणार असाल तर इथं पैसे देण्याचं कारण काय? लाईट बील आपलं,मेंन्टनंन्स आपलं,बेड

आपले,ऑक्सीजन आपलं सगळ आपलं असताना तुम्ही ७५०० रु.देण्याचं कसं ठरवलं हे आम्हांला पण कळलं नाही. एवढं सगळ करीत असताना जेंव्हा आम्ही नगरसेवक म्हणुन काम करतो त्यावेळेस मला वाटत संदीप वाघेरेंच्या विषयी विषय घडला सर, डॉक्टरांना माहिती असतय की, पेशंट आल्यानंतर तो पॉझीटीव्ह आहे की, निगेटीव्ह आहे. जेंव्हा एखादया गोष्टीला जेंव्हा फाटे फुटतात हे मी सुध्दा अनुभवले आहे. आम्हांला सुध्दा तुम्हांला फोन करावा असे कधी वाटत नाही. आणि केला तरी एकही त्याठिकाणचा डॉक्टर व्यवस्थित बोलला जात नाही. माझ्या साध्या पेशंटची अवस्था काय आहे असे विचारले नंतर त्याठिकाणचा एकही डॉक्टर विचारायला येत नाही. तुम्ही जो निर्णय घेतला आहे त्याचे मला हसु येतं आणि किवही वाटते. भारतीय जनता पार्टीला बदनाम करण्यासाठी प्रशासनाने नक्कीच सुपारी घेतलेली आहे. तुम्ही सगळया डॉक्टरर्सना एकत्र केलं, त्यांना बॉडीगार्ड देण्याचा विषय केला. जर त्यांना बॉडीगार्ड देणार असाल तर नगरसेवकांना सुध्दा बाऊंसर द्यायला पाहिजे. मला वाटते तुमचं ज्या पध्दतीने कामकाज चालू आहे ते थांबवलं पाहिजे.आमचे दोन्ही आमदार,पक्षनेते आणि आम्ही जेंव्हा काम करतो तेंव्हा तुम्ही जे काम करता त्याचे भोग आम्हांला भोगावे लागणार आहेत. त्यामुळे माई हा विषय तहकुब करणेत यावा अशी मी विनंती करते आणि थांबते.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह आपण सर्वजण या कोरोनाच्या माध्यमातून बोलत आहोत आपल्या यंत्रणेच्या बाबतीत बोलायचं म्हणलं तर सगळीकडे चर्चा होते की, आपल्या पिंपरी चिंचवडचे हॉस्पिटल खुप चांगले आहेत. त्या माध्यमातून काहीचे इलाज होत असतात काही लोकांना त्याचा चांगला अनुभव येतो आणि काही लोकांना त्याचा वाईट अनुभव सुध्दा येतो. परंतु मला याठिकाणी असं सांगायच आहे की, आपली यंत्रणा कितपत चांगली आहे आणि कितपत खराब आहे तसं पाहिलं तर वरुन आपली यंत्रणा चांगली आहे आतुन आपली यंत्रणा अजिबात चांगली नाही. कारण ज्यावेळेस आम्ही कोविडच्या पेशंटच्या बाबतीत कॉल करतो आणि तो आपल्याकडे पाठवला गेला आणि त्याला भोसरी कोविड सेंटरमध्ये पाठवला गेला तर त्याला चिठ्ठी दिली जाते की, तु या कोविड सेंटरला जा, त्या कोविड सेंटरला जा किंवा वायसीएमएच ला जा तो पेशंट आपली स्वतःची गाडी घेवुन जातो आपली

अंम्बुलन्स उपलब्ध होत नाही. आणि तो स्वत:ची गाडी घेऊन भोसरीच्या हॉस्पिटलला गेल्यानंतर त्याला सांगितल जातं की, तुम्ही दुस-या सेंटरला जा, तो मोशीच्या क्वारंटाईन सेंटरला गेल्यानंतर त्याला सांगितलं जातं की, इथं ऑक्सीजनची सोय नाही तु दुसरीकडे जा, किंवा वायसीएमएच ला जा. आयुक्त साहेब, इतकी वाईट परिस्थिती आहे की, प्रत्येक पेशंटची हेळसांड होते. फक्त आपलं नावाला दिखाऊपणा आहे. तुमच्या त्या भावसार मॅडम ज्या आहेत त्या अजिबात काम करीत नाहीत. आम्ही जर काही लोकांना फोन केले तर ते घेत नाहीत. आम्हांला मान्य आहे की, आता सध्या कोविडची परिस्थिती खुप वाईट आहे. याच्यामुळे त्रास होत आहे हे आम्ही पण समजुन घेतो. तुम्हांला त्रास होऊ नये म्हणुन आम्ही आमच्या स्वत:च्या  अंम्बुलंन्स वापरतो, औषध फवारणीच्या गाडया आम्ही फुकट मारतो. आम्ही त्यांच्यावर उपकार करीत नाही पण आम्ही त्यांच्यासाठी काम करतो. पण ज्यावेळेस आमचा  एखाद्या वेळेस फोन  गेला आणि फोन उचलला गेला नाही तर आम्हाला किती मनस्ताप होतो. माझ्याकडे रेकॉर्डींग आहे ज्यावेळेस मी त्या भावसार मॅडमला फोन केला त्यावेळेस त्यांची उत्तर देण्याची कशी आरेरावी आहे ते बघा तुम्ही. ज्यावेळेस  आम्ही टेस्टींगचे पॉईंट लावतो त्यावेळेस आम्हांला सकाळी सांगितलं जातं की, आज गाडी येणार नाही. आमच्या समोर १०० ते २०० लोक उभे राहिलेले असतात त्यांना त्रास होतो. मला तर सगळयात जास्त वाईट अनुभव आलेला आहे. आयुक्त साहेब, या सगळया यंत्रणेवर तुमचा काहीच वचक राहीलेला नाही. पेशंट पॉझीटीव्ह आला तर ते आम्हांला सांगाव लागतयं कंन्टेमेंट झोन मध्ये त्याची नोंदच होत नाही. ऑनलाईन पध्दतीने जे कोविड सेंटर केले  आहे त्याचा काही उपयोग होत नाही. तिथे कोणाचीही नोंद होत नाही. आयुक्त साहेब,ज्यावेळेस आम्ही एखादया पेशंटची अवस्था पाहतो त्यावेळेस आम्हाला वाईट वाटतयं आणि आम्ही ज्यावेळेस खालच्या डॉक्टरांना फोन करतो त्यावेळेस त्यांनी उचलला नाही तर डॉक्टर वाबळेंना फोन करतो किंवा डॉक्टर लाठी यांना लावतो. डॉ.साळवी सुध्दा हे आमचा फोन घेत नाहीत  ही परिस्थिती आहे यांची आयुक्त् साहेब, तुम्ही सुध्दा अशा वेळेस फोन उचलत नाहीत. तुम्ही आमचे फोन उचलले नाही तर आम्ही आमच्या पध्दतीने आमचे प्रॉब्लेम सोडवू. प्रशासनाने कुठल्याही गोष्टीमध्ये टाळाटाळ केली नाही पाहिजे. आयुक्त साहेब फोन उचलत नाहीत, डॉ.साळवी, डॉ.भावसार मॅडम फोन उचलत नाहीत याबाबतीत मा.महापौर साहेब,आपण यांना आदेश देण्यात

यावे. यांनी फोन उचलले नाही तर सगळया नागरीकांना आम्हांला तोंड द्यावे लागत आहे. यांना द्यावं लागत नाही यांच्याकडे कोण येत नाही. आमच्याकडे लोक येतात,आमच्या दारामध्ये लोक बसतात त्याचा आम्हांला त्रास होतो. त्यांचा त्रास आम्ही सहन करायला तयार आहे पण मा.महापौर साहेब,तुम्ही आयुक्तांना आदेश द्यावा की, शहरामध्ये खुप वाईट अवस्था आहे. दिसतयं तसं नाही एवढंच बोलून थांबतो जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.वैशाली घोडेकर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह मगाशी योगेशभाईंनी कौतुक केलं की, कमिशनर साहेबांनी अतिशय चांगली पध्दत हाताळलेली आहे परंतु कुठं तरी खालच्या लोकांमुळे आपली नामुष्की होत आहे. हे मात्र आपल्याला मान्य करावं लागेल. या ठिकाणी आपण जो प्रस्ताव आणलेला आहे की, या लोकांना आपण परमनंन्ट केलं पाहिजे. याला आपल्या सदस्यांनी उपसूचना पण दिलेली आहे की, ज्या आस्थापनेवर २० लोक काम करीत होती ती ही यामध्ये सामावुन घेतली पाहिजेत अशी उपसूचना असली पाहिजे. कमिशनर साहेबांना एकच सांगायचं आहे की, ज्यावेळेस एखादं हॉस्पिटल चालतं ते फक्त डॉक्टरांमुळे चालत नाही तर त्याठिकाणी असणारे नर्सेस,वॉर्डबॉय,साफसफाई कामगार या सगळयांचाही तेवढाच वाटा असतो. आणि मग असा दुजाभाव करण्याचं काहीच कारण नाही. त्यांनी लगेच दुसरी उपसूचना का दिली नाही. जे कोर्टात गेलेले आहेत,ज्यांनी ३/३ टर्म सहा,सहा महिने काम केलेले आहे.जे सफाई कामगार म्हणुन काम करतात आपल्याला मॅन पॉवर पाहिजेच मग त्यांना का सामील करुन घेतलेलं नाही. आमचा या विषयाला विरोध नाही. दोन दिवसापूर्वी कम्पलेट आलेल्या आहेत. ती सगळी यादी आम्ही मागवलेली नाही. जे जवळचे आहेत तेवढीच यादी मागवलेली आहे त्यांची तुम्हांला नांवे देते. परवा मी साळवी साहेबांना फोन करत होते परंतु ते फोन उचलत नाहीत. मेसेज आला मिटींग मध्ये आहे. आता जे कोविडमध्ये काम करतात त्या सर्वांची यादी घेतली गेलेली नाही. आणि आता पक्षनेत्यांनी जी उपसूचना दिलेली आहे त्याच्यामध्ये ही यादी आहे का? नाही, ना मी उपसूचना पाहिली आहे. जी लोकं आस्थापनेवर आहेत,जी लोकं या कोविडच्या संकटाच्या काळात काम करतात, जी कंत्राटी कामगार म्हणुन काम करतात त्यांची यादी आली पाहिजे. मी तुम्हांला खरचं सांगते की, काही डॉक्टर कोविडच्या पेशंटजवळ जात नाहीत. काही डॉक्टर पेशंटजवळ जाऊन तपासणी करीत असतात. एका डॉक्टरांसाठी सगळयांना बदनाम करु नये. एवढंच माझं

म्हणणं आहे जो कोणी डॉक्टर पेशंटजवळ जाऊन तपासत नसेल तर त्याचे नांव घेऊन त्याच्यावर कारवाई करणेत यावी. ख-या अर्थाने वायसीएमएच मध्ये जी ट्रिटमेंट दिली जाते नां काही जण कागदावर लिहीतात पण ख-या अर्थान सिस्टर,वॉर्डबॉय,साफसफाई करणारा कर्मचारी असेल तो तिथे पेशंटजवळ जाऊन त्याला पाणी देतो,गोळया देतो आणि या लोकांचा आपण विचार करीत नाही. या लोकांची उपसूचना याठिकाणी दिलेली नाही.माझं एवढंच म्हणणं आहे की, याठिकाणी नाण्यांच्या दोन बाजु आहेत आपण दोघांनाही सांभाळून घेतलं पाहिजे. जर आपण डॉक्टरांना घेत आहात तर त्याच बरोबर नर्सेस,वॉर्डबॉय,सफाई कामगार यांनाही सामावून घेतलं पाहिजे.असा दुजाभाव आपण करु नये आणि प्रत्येकाचं नांव आलं पाहिजे. कोणालाही याठिकाणी विसरु नये. एवढंच याठिकाणी माझ म्हणणं आहे. आणि कमिशनर साहेब आपण म्हणताय की, वायसीएमएच मध्ये रुबी केअर सेंटरच्या बाबतीत सांगितलं आहे हे नाकापेक्षा मोती जड होत असेल तर ते बंद केलेलं बरं तेच पैसे आपण दुसरीकडे वापरुन त्याठिकाणी कोविड सेंटर उभं करु. आता पेशंट नाहीत मागे २३५ लोकांना आरामशिर पगार मिळतोय,आणि त्यांच्या खात्यामध्ये पैसेही येत आहेत. तेच पैसे तुमच्याकडे घ्या आणि फक्त जागा वापरा तुम्ही या संकटाच्या काळी साळवी साहेब लोकांना डोस देतात की, जर तुम्ही असं नाही केलं तर तुमचं हॉस्पिटल ताब्यात घेईन. रुबी केअर काय आपला जावई आहे का? तुम्ही खाजगी हॉस्पिटलनां सांगताय की, तुम्ही असं नाही केलं तर तुमचं हॉस्पिटल ताब्यात घेईन. रुबी केअर सेंटर तुम्ही ताब्यात घ्या त्यांना एकही रुपया देवु नका. पेमेंट आपण करतोय, स्टाफ आपण देतोय, मग आपण कोविडच्या काळात आपण वर्षभर ताब्यात का घेऊ शकत नाही. त्यांच्या बरोबर केलेला करार रद्द करुन आपल्या ताब्यात घ्या.खरेदीचे अधिकार तुम्हांला आहेत तर यांच्या बरोबर जो करार केलेला आहे तो रद्य करणेत यावा त्यांना एकही रुपया देऊ नका. आमचा तुम्हांला पुर्ण पाठींबा आहे. हे २३५ लोक आहेत ते दुसरीकडे वापरा. आपण यामध्ये एक टॅलेंटेड डॉक्टरांची टिम तयार केली पाहिजे. यामध्ये खाजगी मध्ये होणारा उपचार आणि महापालिकेच्या दवाखान्यामध्ये होणारा उपचार याकडे त्यांनी लक्ष दिलं पाहिजे. वायसीएमएचच्या बाबतीत मी तुमचं अभिनंदन करते की, तुम्ही त्याठिकाणी पीजी चे कोर्सेस सुरु केलेले आहेत. यामुळे या शहरामध्ये डॉक्टरांची टिमही चांगल्या प्रकारे तयार होईल. आणि ते चांगल्या पध्दतीनं हे कॉलेज पण चालवलं गेलं पाहिजे. आणि यासाठी एक

चांगल्या प्रकारचा डीन देणेत यावा. ज्याला प्रॅक्टीशचं नॉलेज असेल, ज्यांना आस्थापनेच्या संदर्भात ज्या काही अडचणी येतात त्या त्यांना समजल्या पाहिजेत. असा डीन त्याठिकाणी आपण दिला पाहिजे. आयुक्त साहेब, मी आपल्याला सांगते की, एक प्रायव्हेट डॉक्टरांची टिम तयार करणेत यावी. आपण खाजगी डॉक्टरांना सांगताय की, हॉस्पिटलमध्ये कॅमेरे बसवावे पण आपण वायसीएमएच मध्ये कॅमेरे का बसवित नाही. आताच सन्मा.सदस्यांनी सांगितलं आहे की, तिथं डॉक्टरांचा राऊंड झाला नाही. त्याचठिकाणी कॅमेरा असता तर ख-याचं खोटं झाल असतं. आपण खाजगी डॉक्टरांना सांगितलं आहे की, आपण कोविडची ट्रिटमेंट करीत असताना त्याठिकाणी कॅमे-याची सोय असली पाहिजे. तर महापालिकेच्या वायसीएमएच मध्ये कॅमे-यांच्या देखरेखीखाली उपचार का करीत नाही. म्हणजे सकाळी ९.०० वा.डॉक्टरांचा राऊंड झाला का, त्यांनी काय केलं, हे समजले असते नां. का,फक्त कंत्राटी कामगारांनीच ठेका घेतलेला आहे का कोविडच्या पेशंटजवळ जायचा. डॉक्टराचं काम नाही का पेशंटला आत मध्ये जाऊन चेक करायचं पेशंटच ऑक्सीजन चेक करणे, त्याला इंजेक्शन दिलेलं आहे की हे बघण्याचं त्यांच काम नाही का, आणि हे आपण कॅमे-यामध्ये चेक केलं पाहिजे. आम्ही तुम्हांला कॅमेरे का बसवले नाहीत असं म्हणणार नाही. तुम्हीही थोडस यामध्ये लक्ष द्यावं आयुक्त साहेब,याठिकाणी पेशंटची संख्या खरोखरचं कमी झाली पाहिजे. यासाठी तुम्ही जे,जे काही कराल त्यासाठी आम्ही तुमच्या मागे आहोत. तुमच्या कामाची पध्दत खुप चांगली आहे, तुम्ही आखुन दिलेली नियमावली खुप चांगली आहे परंतु या नियमावलीची अंमलबजावणी आपली खालची लोकं करीत नाहीत. त्या लोकांकडे लक्ष द्या एवढंच मी सांगते धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह मा.महापौर साहेब, आपलं मनापासून अभिनंदन आणि आभार व्यक्त करते की,आपण मला बोलायला संधी दिली. मगाशीच माझी इच्छा होती की, मी कोविडवर थोडसं बोललं पाहिजे. दुर्देवानं म्हणा किंवा सुदैवानं म्हणा कोविडचा अनुभव घ्यायला हवा होता का नको होता परंतु तो मला मिळाला. आणि तो अनुभव घेतल्यानंतर त्याच्या मागच्या वेदना, दुःख, आणि शारीरीक त्रास ज्यांना होतो तो खरोखरचं अत्यंत दुर्देवी आहे. परंतु मानसिक त्रास मला निश्चितपणे कोविड आहे असं नुसतं म्हणलं तरी सुरु होतो. याचा एक अनुभव मी घेतलेला

आहे आणि तो दुर्देवी होता. ज्यावेळेला मला कळालं की, मी कोविड पॉझिटीव्ह आहे. सन्मा.महापौर साहेब,आणि आयुक्त साहेब आपण सिरीएसली ऐका कारण मी पॉझीटीव्ह झाल्यानंतर ५/६ दिवस घरामध्ये काढले आपल्या डॉक्टरांच्या टचमध्ये असल्यामुळे माझी पुढील प्रक्रिया सुरु झाली. माझी मेंन्टलिटी चांगली असल्यामुळे आधी घरातच क्वारंटाईन व्हायचं ठरवलं आपल्या घरातील खिडक्या, दारं, आपले पडदे,आपलं दिवाण सगळं आपलं आणि आपल्या माणसांचे आवाज आपल्या कानावर येणार आहेत. एक मानसिक समाधान म्हणुन मी ३/४ दिवस घरातचं राहिले. आणि जसं मला ऍडमिट करायची वेळ आल्यानंतर मी स्वतःला खुप स्ट्रॉंग आहे, मस्तपैकी भांडतो असं आहे,तसं आहे असे म्हणतो पण काहीच असं रहात नाही. मी इतकी डिस्ट्रब झाले की, मला घरातनं बाहेर नेणार माझ्याकडे कोविडचे डॉक्टर कोणी येणार नाही,नर्स येणार नाही,वॉर्डबॉय येणार नाही, आया येणार नाही. मी औषध आयाच्या हातानी खाणार आहे की, सिस्टरच्या हातांनी खाणार आहे याचं मला तारतंत्र सापडणार का या भितीने मी इतकी डिस्ट्रब झाले की, मी घरातच तांडव सुरु केलं आणि म्हणाले की, मला काही झाले तरी मला ऍडमिट व्हायचे नाही मला घरातच उपचार करायचे आहेत ही माझी वस्तुस्थिती होती. हे सांगण्याचं कारण म्हणजे मला वेदना झाल्या,मला त्रास झाला हे जर माझ्यासारख्या नगरसेविकेला होत असेल तर जी स्वतःच्या वॉर्डाचं नेतृत्व करते त्यावेळेला माझ्या वॉर्डातल्या सामान्य नागरीकांच काय? हे निश्चितपणे मला आठवल्याशिवाय रहात नाही. आणि म्हणुन कमिशनर साहेब,मी तुम्हांला कालही सांगितलं आहे की, दुर्देवी घटना या शहरामध्ये चालू आहेत. तुम्हांला कोणी कितीही चांगले कमिशनर आहेत असे म्हणु द्या पण राजा चांगला तर प्रजा चांगली असायला पाहिजे होती. आणि मग मला असं वाटत की, तुमच्यावर आक्षेप घेतला पाहिजे. काल ज्यावेळेस मी वायसीएमएच मध्ये गेले एका वेळी मला वाबळे साहेब भेटल्यामुळे मी एका व्हीआयपी ट्रिटमेंट बरोबर एका ओपीडीमध्ये गेले आणि माझं ब्लड घेतलं गेलं आणि मी वायसीएमएच मधनं बाहेर पडले,त्यादिवशी मलाही काही फारसं दिसलं नाही मी पण मस्तपैकी बघुन आले सगळं बघीतल्यानंतर छान वाटलं सुदैवानं माझं चांगल होतं की, माझ्या शहरातील लोकाचं चांगल असेल म्हणुन दुस-या दिवशी वाबळे साहेब बीझी असल्यामुळे मला स्वतःला जायची संधी आली किंवा मला पिकअप करणार होते त्यांच्या काय लक्षात आलं नाही. त्या नर्सवर ऍक्शन होण्याचं जे चित्र होतं ते अत्यंत वाईट

आणि दुर्दैवी होतं की, मनाला प्रचंड वेदना झाल्या. साहेब,हे सगळं वायसीएमएच ला गेल्यानंतर दिसतं आणि मग तुम्ही म्हणता तिथं ५ च डॉक्टर का घेतले, ७२ डॉक्टर घेतले, ४०० डॉक्टर घेतले मग सगळयांनी काय बिब डोळयात घातलीत का जर मला वेदना झाल्या तर मला दु:ख झालेलं समजतं मग ते तर डॉक्टर्स आहेत. आता विकासनी सांगितलं की, या परिस्थितीला डॉक्टरांविषयी काही बोललं नाही पाहिजे. निश्चित बोललं नाही पाहिजे. भाऊसाहेबांच कालचं एक वाक्य अत्यंत महत्वाचं होतं की, जे देशाच्या सिमेवरती सैनिक आपली सेवा करतं,आपलं संरक्षण करतो ते जर म्हणले आम्ही मरणार आहे म्हणुन आम्ही इथं थांबायचं का अशी अवस्था या डॉक्टरांची आहे. आयुक्त साहेब, त्याठिकाणचा वॉर्डबॉय त्या पेशंटला चेक करतो, त्यांना औषध देतो. तो तिथं झाडू मारतो, तिथलं टॉयलेट धुतो त्याच्या हाताला लागलेलं काय,काय असेल आणि हे फोटो माझ्याकडे आहेत आणि हे मी माझ्या मोबाईलनी काढलेले फोटो आहेत. आणि दुसरे असे की, मी महिला वॉर्डला गेले होते तिथं एक महिला पेशंट खाली पडली होती. तिचं डायपर चेंज करणारा एक वॉर्डबॉय होता बिचा-याची भावना खुप चांगली असेल त्याच्याबद्दल मला काहीही म्हणण्याचं कारण नाही. परंतु त्या वेदना नाहीत का, आपलं वायसीएमएच काय करतं त्याठिकाणी आपण लाखो रुपये खर्च करतोय आम्ही पैसे खर्च करीत असलो तरी ते नागरीकांसाठी खर्च करतो याचा रास्त अभिमान असला तरी आणि तो रास्त अभिमान लोकांच्या कामी येतो की नाही हे पाहिलं पाहिजे. कमिशनर खुप चांगले काम करतात पण आयुक्त साहेब, तुम्हांला फोन केल्याशिवाय आम्हांला पर्याय नाही. आपल्या खालच्या अधिका-यांकडुन काम का होत नाहीत. हे अशा चिल्लर,चिल्लर गोष्टीला फोन करायचा असेल तर गरज नाही ना साहेब. मा.महापौर साहेब, तुम्ही वायसीएमएच ला जात नाही,तुमचे सगळे अधिकारी जात नाहीत, सगळया नर्सेच्या केबीनच्या बाहेर दो-या लावलेल्या आहेत.

याचा अर्थ कोविड व्हावं असे नाही तिने सगळया प्रिक्वॉशन्स घ्याव्यात, जे काही मेडीकल सामग्री असेल त्याचा तिने वापर करावा. परंतु त्यांनी पेशंटला ट्रिटमेंटच करावं ते तुमच्या ऑक्सीजनचा टप्पा असतो की नाही, पाणी टाकतो त्याच्यामध्ये त्या मुलाने आपले पीपीई कीट घातले आणि त्या मुलाने पीपीई कीटच्या पट्टीचा जो उजेड ती त्याच्या डोळयासमोर आली नाही सचिन असा,असा करुन नळ शोधतोय आणि त्याला देतांना तो अधांतरीच पाणी देतोय. ही आपल्या वायसीएमएच सारख्या ठिकाणची अवस्था आहे त्यावर आपण काय ॲक्शन घेणार

आहात आज ख-या अर्थानं ऍक्शनचाच दिवस आहे असे वाटायला लागलं आहे. मला वाटलं होतं की, राजा चांगला असेल तर प्रजा चांगली असेल परंतु तसं होताना याठिकाणी दिसत नाही. आम्ही सगळेजण आपल्याला आमच्या व्यथा सांगतोय. किती डॉक्टर घेतले कोणाला परमनंन्ट केलं याच्यावर आम्ही कोणच बोलत नाही. कारण शहराला डॉक्टरांची गरज आहे, मी फोन केल्यानंतर माझ्या पेशंटची त्याठिकाणी काळजी घेतली पाहिजे. अशी आमची साधी आणि प्रामाणिकपणे अपेक्षा आहे. आपल्याकडे ३ आयसीयु होते १५,१५ बेडचे होते तिथं १८/१८ बेडचे केले आणि खाली एक आयसीयु होतं ते १५ बेडचं होतं तिथं २० बेडचं केलं आपलं खालचं आयसीयु चालू आहे का परवा माझी मैत्रीण संगीता हिला ऍडमिट करताना रुबी केअरला बळजबरीनं ऍडमिट करावं लागलं. जर आपण रुबी केअरला महिन्याला ५२ लाख रुपये देतो. साहेब, तुमच्याच वायसीएमएच मध्ये, तुमच्याच रुबी केअर सेंटरला १५ आयसीयु बेड पैकी ११ च बेड आता भरलेले आहेत. असं का होत. का तुमचं त्याच्यावर कंट्रोल नाही. मा.महापौर साहेब,आपण एकीकडे जम्बो हॉस्पिटल म्हणतोय इकडं कुठंतरी आयसीयु आणायचं परंतु जे वायसीएमएच चे बेड २०१७-१८ पर्यंत चालू होते त्यावेळेस स्टाफ कमी होता त्यानंतर आपण मानधनावरती लोक घेतले त्यानंतर त्यांना आपण परमनंन्ट केले त्यांचा तुम्ही इंटरव्हयू घेतला यामध्ये तुम्ही काय केलं हे तुमचं तुम्हांला माहिती आहे. आपले पुढचे आयसीयु चालू का नाहीत, आपल्याकडे कोविड आज आलेला आहे का, मार्च मध्ये आपल्याकडे पहिला पेशंट सापडला मार्च, एप्रिल, मे, जुन, जुलै,ऑगष्ट असलं कसलं व्हीआयपी ऑक्सीजन सिलेंडर आपल्याला आणायचे आहेत कोठुन आणायचे आहेत ते सांगा ना मला तुम्हाला आजपर्यंत ५ महिन्यामध्ये आपल्याकडचे १५ आयसीयु चालू करता आले नाही. आयुक् साहेब,आम्ही फक्त गप्प बसतो का तर आपले वायसीएमएच आहे,नागरीकांना याची गरज आहे. तिथं जावं लागतय, थांबाव लागतयं याचा अर्थ असा नाही की,तुमचं काहीही खपवून घेतलं जाईल. पेपरमध्ये बातम्या येतात की, जेवणामध्ये केस सापडला अशा बातम्या येतात ते अन्न सुध्दा पोट भरण्यासाठी खायचं आहे. परंतु ज्या डॉक्टरांमुळे माझा आजार बरा होईल सांगा साहेब, तुमचा कोणता डॉक्टर पेशंटशी बोलायला जातात. मगाशी अनेकानी डॉ.विनायक पाटील असेल, किंवा जे जुने डॉक्टर्स आहेत ते कामच करतात आमच्या गावातल्या,आमच्या शहरातल्या नागरीकांना सेवा दिली म्हणुन आज आम्ही त्यांच नांव घेतो. यातील आमचं

कोणीही नातेवाईक नाही. परंतु आम्हांला त्यांच्याविषयी पुन्हा,पुन्हा बोलावसं वाटतयं भोसरी सेंटरचे तीन डॉक्टर ऍडमिट होते जाऊन विचारा तुमच्या पीजीच्या आयसीयुच्या सगळया डॉक्टरांना यातला एक तरी डॉक्टर यांना जाऊन भेटलेला आहे का, मला सांगा मी आजारी पडले तर कमिशनर साहेब मला नक्की फोन करणार आहेत आशाताई बरे आहात का, साधी फॉरमॅलीटी आहे. आणि त्यात तुम्ही डॉक्टर असाल तर मला डॉक्टर म्हणुन नक्की बघायला येणार परंतु त्या पीजीचा एकही डॉक्टर या भोसरीच्या तीनही डॉक्टरांना बघायला गेला नाही. इथं काय भारत-पाकिस्तान बॉर्डर आहे का, इथं एकाची तरी लायकी आहे का काम करण्याची आणि इथं सांगतात की, राजकीय लोकांनी हस्तक्षेप करायचा नाही. तुम्ही डॉक्टर आहात ना तुमच्या नियंत्रणाखाली आयसीयु बेड बंद पडतात मग आम्ही हस्तक्षेप करायचा नाही तर काय करायचं आम्हांला काय हौस नाही परंतु तुमचं आयसीयु बंद पडतं, तिथं माणसं मरतात, त्याठिकाणी काम न करता काम केलं असं दाखवलं जातं हे सगळं कसं काय होतं. तुम्हांला राजकीय हस्तक्षेप नको असेल तर त्याठिकाणी तुम्ही १०० टक्के काम केलं पाहिजे. परवा आपल्या वायसीएमएच मध्ये एकाच दिवशी ४५ रुग्ण मेल्याची बातमी आलेली होती. ही डेथ एका दिवसाची नाहीच मागची पेंडन्सी आपण भरुन काढतो एवढं आपण बीझी आहोत का, आपल्याकडे रोजची रोज डेथ सुध्दा नोंदवली जात नाही. आणि एकदम ४५ आकडा पाहिला तर मलाच खुप शॉक बसला आणि आजच इतके कसे काय लोक मेले आणि म्हणुन स्वत:च प्रुफ केले तर मीच कोविड त्यामुळे मलाही असे वाटायला लागल की, अशी जर माणसं मरायला लागली तर या शहराच कसं होणार नंतर असं कळलं की,त्या दिवशी डेथच नव्हत्या मागच्या ४/८ दिवसाच्या २,४,८,१० अशा डेथची संख्या होती. आयुक्त साहेब, तुम्ही याच्यावरती काय ऍक्शन घेणार आहात. बस्स येथून पुढे गोडी,गोडी काय होणार नाही, आमच्या नागरीकांसाठी आम्ही याठिकाणी निवडुन आलेलो आहोत. या गोष्टीचा तुम्हांला निश्चितपण विचार करावा लागेल. साहेब, तुम्ही म्हणताय की, टेस्टींगमुळे या शहरामध्ये दिवसेंदिवस पेशंटची संख्या वाढत आहे. माझ्या वॉर्डातले कोल्हे काका आहेत त्यांची ६ तारखेला टेस्ट केली आणि १० तारखेला मला समजलं की, काका पॉझीटीव्ह आलेले आहेत. आणि काकाच्या सगळया फॅमीलीनी टेस्ट केली पाहिजे. जर मी पॉझीटीव्ह आहे आणि माझ्या कुटूंबामध्ये ४ दिवस राहीले आणि ५ व्या दिवशी त्या पेशंटला कळतचं नाही मला एकाकडुन कळालं

की, काका पॉझीटीव्ह आलेले आहेत म्हणुन मी काकांना फोन केला तर ते म्हणले की, मला अजुन समजलं नाही. म्हणुन मी चौकशी केली तर ते म्हणले मी आलेच ताई तर त्यांच्या घरातील १३ माणसांच कुटूंब आहे त्यातील ११ जण पॉझीटीव्ह आले. याला जबाबदार कोण ही पालिकेची यंत्रणा फुकट येते का हो, टेस्ट करायचं, लोकांना क्वारंटाईन करायचं, त्यांना जेवण द्यायचं त्यांच आंथरुण,पांघरुन हे सगळं आपण बघतोय नां, बघायला हरकत नाही पण या तुमच्या चुका होतात त्याच काय करायचं ६ दिवस तो पेशंट तसाच त्या कुटूंबामध्ये फिरत राहील्यानंतर बाकीचे १० जण पॉझीटीव्ह झालेले आहेत. या कोविडमध्ये आम्ही दिवसभर काहीच काम केलं नाही म्हणलं तर मागच्या महिन्यामध्ये टोकन काढणं,पेशंट टेस्टींगला पाठवणं आणि ते पॉझीटीव्ह, निगेटीव्ह आलं का ते पहाणं हेच काम होतं. आयुक्त साहेब, पेशंटची संख्या का वाढते आहे. एखादया पेशंटची टेस्ट केल्यानंतर त्याचा रिपोर्ट २४ तासाच्या आत जातो की नाही हे बघा नां साहेब, आणि का जात नाही हे विचारा प्रत्येकाचं एकच उत्तर असतं की,मॅडम खुप कंटाळलो आहे,खुप थकलो आहे हे अगदी मान्य आहे. पण साहेब,आपण जो वसा घेतला आहे तो पूर्ण करावा लागेल. त्यानंतर दुसरा एक महत्वाचा भाग आहे प्लाझमा डोनेट करणं माझ्या वॉर्डातल्या ज्या ज्या पेशंटला प्लाझमा लागतो त्यांचे मला फोन येतात की, आशाताई मला प्लाझमा पाहिजे आणि मग आमची सर्कस सुरु होते. कोण पॉझीटीव्ह होता आणि तो बरा होऊन गेला आहे. साहेब,आपल्याकडे रोजचे हजार पेशंट असतात त्यापैकी ७०० ते ८०० लोकांची प्रकृती चांगली आहे.म्हणजे कोणाला शुगर नाही,बीपी नसेल हार्ट वगैरे चांगले असतील वगैरे,वगैरे तुमचे मेडीकल कॉन्टॅक्ट असतील ते किमान ५०० ते ६०० लोकं तरी नक्की असतील तर त्या ५०० लोकांना ३० दिवसानंतर रोजचे ५०० प्लाझमा पकडले तर आपल्याला खरे किती प्लाझमा डोनेट करणारे होतील.आणि त्यांच्याकडनं प्लाझमा डोनेट करणं हे कम्लशन का नाही करीत एखादा तुम्हाला विरोध करेल पण त्याला सुध्दा आपण कौन्सलींग केल तर तो सुध्दा डोनेट करण्यास तयार होईल. आणि त्यालाही असे वाटेल की, माझ्यामुळे एखादयाचा जीव वाचेल याचं त्याला समाधान होईल. परंतु आपल्याकडन कोणताही कॉल जात नाही. माझ्या वॉर्डातील एकालाही फोन आलेला नाही की,ताई प्लाझमा देणार का ,मग ही काय पेशंटची जबाबदारी आहे का, आपण या शहरातील पेशंटला सर्व सोयी मोफत देत असतो हे आपलं कर्तव्य आहे पण त्याचेही कर्तव्य आहे की, त्यांनी आपल्या शहरातील या नागरीकांसाठी

प्लाझमा डोनेट करणं गरजेचं आहे. पुढचा मुद्या आहे की, दुसरा विषय आहे की, ऑक्सीजन लेवल चेक करणं, बीपी घेणं या सगळया गोष्टी डॉक्टर्सना कम्पलशन करावे आणि तुमच्याकडे जे पीपीई कीट आहे ते तुम्ही वापरा. पेशंटवर तुमचे मेडिसिन नक्कीच काम करणार आहे पण त्या मेडीशन बरोबरच त्या डॉक्टरांनी त्या पेशंटला चार शब्द जिव्हाळयाचे,आपुलकीचे,त्यांना आत्मीयतेने बोलून तुम्ही टेन्शन घेऊ नका तुम्ही ब-या होणार त्या बोलण्यातून जी एनर्जी पेशंटला मिळते ती फार अफलातून असणार आहे. आताची कंडीशन अशी आहे की, आयसीयु मध्ये जे पेशंट असतात नां त्यांना त्याठिकाणच्या नर्सेस सांगतात की, ये त्या आशाताई आहेत ना त्या मरणार आहेत त्यांचा बेड रिकामा कर असे मोठयाने ओरडून सांगतात. आयसीयु मध्ये दुसरा पेशंट घ्या. म्हणजे मी मरणार नसले तरी मी मरणार आणि शेजारच्या पेशंटचा बीपी वाढून परवा सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी एका पेशंटचा फोन आला आणि त्याला म्हणले की, काय झालं, का सकाळी,सकाळी फोन केलास असं विचारल्यानंतर तो म्हणाला की, माझ्या शेजारचे दोन पेशंट आता गेले. मी त्याला म्हणले ठिक आहे नां, जाऊ दे त्यात काय एवढं तो म्हणाला नाही ताई ते दोघं गेल्यामुळे मला भिती वाटतीय मी पण जाईन की काय? साहेब, हे जे सगळं वातावरण आहे नां ते थोडसं टॉकींगनी,थोडसं गप्पा मारुन त्यामध्ये तुमच्या पध्दतीने त्यांना सांगा आणि या पुढच्या काळामध्ये कसे मेन्टेन करता येईल ते बघा. आणि शेवटचा एक प्रश्न आहे या उपसूचनेचा उपयोग होणार आहे का, साहेब, २० लोक तुम्ही घ्यायचे म्हणताय ते कसे निवडले,का निवडले,२० च का निवडले आणि आमचे जुने डॉक्टरांना का घेतले नाही हे पण सांगा. आणि इंटरीव्हचा खेळ वगैरे सगळं बंद करा ना, तुम्ही तसं सांगा नां आम्हाला सिमा सावळेंना घ्यायचं आहे. आयुक्त साहेब, तुम्ही मानधनावर घेतलेल्या माणसांना परमनंन्ट करुच शकत नाही. आणि यांना घेतलं तर महापालिकेमध्ये असे बरेच कर्मचारी असे आहेत की,आपण त्यांना मानधनावर घेतलेले आहे.हे सगळे जण क्लेम करतील. आणि हे चुकीचे आहे. आणि ज्या अधिका-यांनी असे विषय आणले असतील तर त्यांनी ते बंद करावे. मगाशी सांगितले की, प्रशासनाने आमची बदनामी करण्याची सुपारी घेतलेली आहे. कोणत्याही अधिका-याने आमच्या पक्षनेत्याकडे यायचे आणि उपसूचना द्यायची हा काय गोरखधंदा आहे हे सांगा नां साहेब आणि मानधनावर घेतलेल्या लोकांना कायम करता येते का याचा

खुलासा करावा. आयुक्त साहेब, तुम्ही आमच्या या प्रश्नांची उत्तरे दिली नाही तर पुढील सभेचे कामकाज आम्ही चालू देणार नाही. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह प्रथमतः आयुक्त साहेब, तुमचं मनापासून अभिनंदन करतो. आपल्याला पीजीची मान्यता मिळाली आणि श्रीकर परदेशी साहेबांच्या काळामध्ये हा विषय पुढे आला आणि आपल्या महापालिकेचे रुग्णालये आहेत मगाशी तुम्ही पण बोलताना उल्लेख केला की, आपल्यासाठी निश्चितपणे अभिमानाची गोष्ट आहे की, आपले वायसीएमएच आणि महापालिकेचे अनेक रुग्णालये आपण निर्माण केली आणि त्याचा फायदा इथल्या सर्वसामान्य लोकांना होत आहे. आणि मागच्या काळामध्ये जेंव्हा भोसरी हॉस्पिटल तयार झालं आणि ते चालू व्हावं अशी आमची आणि नागरीकांची अपेक्षा होती. म्हणुन आम्ही आपल्याला वारंवार मागणी करीत होतो की, लवकरात लवकर भोसरी हॉस्पिटल सुरु व्हावं. आणि त्यावेळेस असं वाटलं की, याचे खाजगीकरण होणार आहे त्या गोष्टीला आम्ही सगळयांनी विरोध केला. आणि त्याचा खुलासा करताना आपण या सभागृहात सांगितलं की, याठिकाणी आपल्याला ख-या अर्थानं डॉक्टर्स मिळत नाहीत. त्यामुळे आपल्याला हॉस्पिटल चालू करणं शक्य नाही. आपण मोठया प्रमाणात खर्च करुन ही हॉस्पिटल उभे केले. आज अचानक संकट आपल्यावरती आलं त्यामुळे या सगळया हॉस्पिटलचा आपल्याला उपयोग करता आला विशेषता भोसरी हॉस्पिटल हे कोरोना हॉस्पिटल म्हणुन घोषित केलं. ते निर्माण करण्याआधी कदाचित लिहिलं असेल की, भविष्यात कोरोना येणार आहे. आणि त्याचा भोसरी हॉस्पिटलचा उपयोग होणार आहे. सुरुवातीला या भोसरी हॉस्पिटलला कोरोना हॉस्पिटल म्हणुन घोषित करण्यास नागरीकांचा विरोध होता परंतु आम्ही त्यांना सांगितलं की, तसं काही नाही यामध्ये आपल्या सगळयांनाच सामोरे जावं लागणार आहे त्यामुळे आपण याला विरोध केला नाही पाहिजे. आणि टप्याटप्याने लोकांच्याही लक्षात आलं आणि आपल्याला शासनाच्या नियमाप्रमाणे अनेक ठिकाणी हे कोरोना हॉस्पिटल तयार करावे लागतील आणि त्या दृष्टीकोनातून शासनाचे आणि महापालिकेचेही प्रयत्न चालू आहेत. परंतु आयुक्त साहेब, एक गोष्ट या निमित्ताने सांगु इच्छितो की, आपण प्रयत्न करतोय परंतु सगळीच परिस्थिती चांगली आहे असे नाही. अनेक लोकांनी या सभागृहात बोलतांना काहींना चांगले अनुभव आलेले आहेत काहींना वाईट अनुभव सुध्दा आलेले आहेत. डॉ.विनायक पाटील,डॉ.लाठी,डॉ.भावसार मॅडम असतील हे चांगल्या

प्रकारे काम करतात मला त्यांचा चांगला अनुभव आलेला आहे त्यांना फोन केला तर ते त्या पेशंटची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाते. आमच्याकडचे बरेच डॉक्टर हे बाधीत झालेले आहेत त्यामध्ये डॉ.गोफणे,डॉ.ढगे हे होते. या लोकांनी त्याठिकाणी चांगल्या प्रकारे सेवा दिलेली आहे. आशाताईंनी त्यांचा जो अनुभव सांगितला तोच अनुभव ज्या कुटूंबातील पेशंट असतो त्या कुटूंबाची फार वाईट अवस्था असते. कारण हा आजार फार वेगळया पध्दतीचा आहे. कारण पेशंटच्या संपर्कात नातेवाईक नसतात आणि पेशंट तिकडनं सांगत असतो की, माझ्याकडे कोणी पहात नाही, माझ्याकडे डॉ.येत नाही,नर्स येत नाही, मला प्रॉपर ट्रिटमेंट दिली जात नाही. अशा प्रकारचं पेशंट सांगत असतो आणि मग त्या पेशंटचे नातेवाईक नगरसेवक किंवा ओळखीच्या लोकांना फोन करीत असतात आणि सांगत असतात की, माझ्याकडे दुर्लक्ष होत आहे. आणि मग संदीप वाघेरेना जो अनुभव आला आहे म्हणजे तो अनुभव आपल्यापैकी सगळयांनाच आलेला आहे. माझ्या चुलत्याला ॲडमिट करण्यासाठी बिर्ला हॉस्पिटलच्या बाहेर मला दोन तास बाहेर उभं रहावं लागलं म्हणजे इतकी अडचण आहे आणि या अडचणीमध्ये संदीप वाघेरेनीं दुपारपासून ते रात्रीपर्यंतच्या ज्या घटना सांगितल्या त्या घटनेमध्ये नेमकं काय घडलं त्यादिवशी सुरुवातीला आम्हांला ही वाटलं होतं की, संदीप वाघेरेनी असं करायला नको होतं. पण संदीप वाघेरे असे का वागले तर त्यांची जी घटना आहे ती आपण ऐकली तर निश्चितपणे त्यांच्या जागी दुसरा कोणीही असला तरी कदाचित त्यांच्यापेक्षा जास्त राग व्यक्त केला असता किंवा त्यांच्या पेक्षा कमी राग व्यक्त केला असता प्रत्येकाच्या स्वभावानुसार ही घटना घडली असती. भाऊसाहेबांनी त्यांना वेगळया पध्दतीने ट्रिट केलं असतं परंतु आयुक्त साहेब, एक गोष्ट नक्की चांगली आहे, काही डॉक्टर खुप चांगले काम करतात काही लोक कामचुकारपणा करतात ब-याच वेळेला असं होते की, चांगल काम करणा-याला सुध्दा त्रास होतो. आपल्याकडे मनुष्यबळ कमी आहे. आहे त्या मनुष्यबळामध्ये आपल्याला काम करायचे आहे. परंतु हे करीत असताना जे चुकीचे काम करतात यामध्ये पवन साळवे असतील यांचे आणि माझे जुने संबंध आहेत परंतु साळवे साहेब हे कुठे तरी कमी पडतात या निमित्ताने खरं म्हणजे त्यांच्याकडे फार मोठी जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी पार पाडताना त्यांच्याकडनं यासंदर्भामध्ये त्यांच्याकडन कुठं तरी कमतरता जाणवते आहे. त्याठिकाणी संतोष पाटलांची नेमणुक केली त्यावेळेस काही जणांना वाटलं की, ही चुकीची नेमणुक केलेली आहे

परंतु ज्या,ज्यावेळेस माझे त्यांना फोन गेले त्या त्यावेळेस त्यांनी फोन करुन संबंधित डॉक्टरांना सांगितले की, या,या पेशंटला ॲडमिट करुन घ्या तर त्याला ताबडतोब संतोष पाटलांकडनं ॲक्शन झालेली आहे. तर काही लोक चांगल काम करतात आणि काही लोक व्यवस्थित काम करीत नाही त्यादृष्टीकोनातून आयुक्त साहेब,तुम्हांला त्याच्यामध्ये आणि तुम्ही मागेही बोलला होता की, लस कधी येणार आहे माहित नाही पण कोरोना बरोबर आपल्याला बरेच दिवस रहावे लागणार आहे. आणि यामध्ये आपल्याला अधिक लक्ष देण्याची गरज आहे. परंतु आपण यामध्ये आपण कमी पडतो आहे. जेंव्हा नागरीक फोन करतात तेंव्हा तुम्हांलाही त्याची जाणीव असेल की, ज्या पेशंटला आयसीयु मिळत नाही तेंव्हा त्या पेशंटच्या नातेवाईकांची जी अवस्था असते तो मानसिकदृष्टया इतका खचलेला असतो आणि त्यानंतर त्याच्यावर जो आर्थीक ताण येतो तो त्रासदायक असतो. त्यावेळेला आपल्या लोकांना ज्यावेळेस फोन करतो बाहेरच्या हॉस्पिटल मध्ये ज्यावेळेला बील जास्त येतं त्यावेळेस ताबडतोब महापालिकेची यंत्रणा मदतही करते म्हणजे मला तसा अनुभवही आलेला आहे. परंतु आपल्याला यामध्ये अजुन चांगले काम करावे लागणार आहे. अनेक पेशंटची ट्रिटमेंट चालू असते, नातेवाईकांना माहित नसतं पेशंटची नेमक स्टेटस काय आहे. त्यांनी मला जसा अनुभव सांगितला आहे तसा अनुभव मलाही आलेला आहे. काल एका पेशंटसाठी डी.वाय.पाटील हॉस्पिटलला फोन केला ते म्हणले पेशंटची स्थिती एकदम उत्तम आहे. त्यानंतर सकाळी त्यांच्या मुलाला फोन आला की, तुमचे वडील खुप सिरीयस आहेत. म्हणजे हे नेमकं काय चाललय प्रत्येक हॉस्पिटलमध्ये कशा प्रकारे ट्रिटमेंट होते माहित नाही. काही ठिकाणी प्लाझमा दिला जातो काही ठिकाणी दिला जात नाही आता आम्ही काय यामधले तज्ञ नाही पण माझ्या चुलत्याला जेंव्हा ॲडमिट केलं तेंव्हा त्यांना प्लाझमा थेरपी द्यायची होती तर त्या ज्युपीटर हॉस्पिटल मध्ये एकही पेशंटला प्लाझमा दिला गेला नव्हता. मी विनायक पाटलांशी बोललो त्यांनी त्या डॉक्टरांशी बोलले आणि त्यांनी सजेश केलं की त्यांना प्लाझमा द्या. परंतु प्लाझमा देण्यासाठी राज्य शासनाकडुन असे काही निर्देश नाहीत. अशा प्रकारची भूमिका ज्युपीटर हॉस्पिटलनी घेतली. आणि मग मला विनायक पाटीलनी सांगितलं की, मंगलाताईकडं शासनाचा तसा जी.आर.आहे. मग मी मंगलाताईंना फोन केला त्यांच्याकडनं जी.आर.मागवला आणि मग त्यांना दाखवल्यानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी त्यांना प्लाझमा दिला. ही

परिस्थिती  आपल्याला सगळया ठिकाणी आपण त्यांना फोन करु शकतो, आपल्याला तशी संधी मिळते. परंतु या शहरात असे अनेक नागरीक राहतात की, त्यांना त्यांची कोणाची ओळख नसते, त्यांचा कोणाशी तरी संबंध आहे अशा लोकांवरती फार मोठं संकट येत असते त्यामुळे आताची जी काही परिस्थिती आहे.यामध्ये आपल्याला अधिक चांगल काम कराव लागणार आहे. आणि त्या दृष्टीकोनातून तुम्ही सक्षम अधिकारी ज्यांना खरोखरच काम करण्याची इच्छा आहे त्यांना तुम्ही नेमणुक करा त्यांच्याकडनं तुम्ही काम करुन घ्या. आणि या निमित्ताने एक त्रुटी आहे योगेश बहल यांनी त्यांच्या भाषणात सांगितलं आहे की, आपल्याकडील काही डॉक्टर पात्र आहेत ते अनेक वर्षापासून काम करतात त्यांची एज्युकेशन क्वालिफिकेशन चांगलं असताना सुध्दा त्यांना आपण संधी देत नाही. दुस-यांना आपण घेत आहात. १०० पैकी ३५ मार्क तुम्ही ओव्हरलला दिलेले आहेत श्रीकर परदेशी साहेबांनी अशी भूमिका घेतली होती की, येथून पुढच्या काळामध्ये ओव्हरलचे मार्क राहणार नाहीत. त्याच्या मागचं कारण हे होतं की, ओव्हरलचे मार्क असले की, तिथे वशिलेबाजी होते. आणि त्यांना असं वाटत होतं की, कुठलीही नौकरी देताना १०० टक्के मेरिट पाहिजे. अशा प्रकारे त्यांनी भूमिका घेतल्यानंतर माझ्या माहितीप्रमाणे एकही  परिक्षा ओरल झालेली नाही. परंतु आपण याठिकाणी ३५ मार्काची ओरल घेतली त्यामुळे यामध्ये निश्चितपणे शंका घेण्यास वाव निर्माण झालेला आहे. आणि संदीप वाघेरेनीं सांगितल्याप्रमाणे अजित गव्हाणेंनी ६५ मार्कापैकी फक्त ३० च मार्क मिळवलेले आहेत आणि नाना काटेंनी ५० मार्क मिळवलेले आहेत आणि ओरलला मला ३५ मार्क दिले आणि यांना १० च मार्क दिले तर अशा घटना यापुर्वी झालेल्या आहेत. आणि याच्यामध्ये अशाच प्रकारे घडले असेल, आणि यावर भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी सुध्दा टिका केलेली आहे. आपण अशा चुकीच्या पध्दतीने काम करताय आणि याचा परिणाम म्हणुन नामदेवराव तुम्हांला या गोष्टीचा खुलासा येत्या निवडणुकांमध्ये द्यावा लागणार आहे. जे चांगल काम आहे त्याचा तुम्हांला निश्चितपणे फायदा होणार आहे. परंतु जे चुकीचे काम आहे त्यासंदर्भात तुम्हांला जनतेला उत्तर द्यावं लागणार आहे. त्यामुळे तुम्ही साडेतीन वर्ष गप्प होते काही लोक पक्षाच्या बंधनामुळे त्यांना काही वाटत असेल पण संदीपभाऊ आणि तुषार कामठे हे दोन नगरसेवक तुमच्या पक्षाचे असताना सुध्दा चुकीच्या कामाला त्यांनी १०० टक्के विरोध केला आहे. त्याबद्दल त्या दोघांचेही मनापासून अभिनंदन करतो. माई मागच्या काळात

आपल्या पक्षात सुध्दा असे लोक होते परंतु चुकीचं काय असेल तर विरोधातही बोलायचे त्याप्रमाणे संदीप वाघेरेनी भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे येथून पुढे तुम्हांला चांगल काम करावं लागणार आहे आणि आता कोरोनाचा काळ असल्यामुळे आमच्या सगळयांची आणि या पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांची मोठया प्रमाणात अपेक्षा आहे आणि ज्या काही त्रुटी आहेत त्या लवकरात लवकर दूर कराव्यात. अशा प्रकारची अपेक्षा करतो आणि थांबतो.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा. सभागृह मा.महापौर साहेब, आज पहिल्यांदा या सभागृहानेच नाही तर संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या तोंडामध्ये आयुक्तांच नांव आहे. प्रत्येकाला या व्यक्तीबद्दल अभिमान वाटतो. खरोखरच ही हुशार व्यक्ती आहे आणि मला वैयक्तीक असं वाटतयं की, मी कुठं तरी यांच्याकडनं काम करुन घेण्यामध्ये कमी पडतोय. आणि त्यांच्या बरोबरचा जो स्टाफ आहे तो ही कुठं तरी कमी पडतोय,पण सत्ताधारी कुठं कमी पडले असं मला जाणवतंय सत्ताधा-यांनी आज कोविडच्या काळामध्ये रोडवरती पहात होतो गेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये पक्षाचे काही लोक रोडवरती काम करीत होते. कोणच जीवाची पर्वा करीत नव्हते. मा.महापौर आपण सुध्दा प्रत्येक वॉर्डामध्ये व्हीजीट करीत होत्या. मला हे मुद्याम सांगाव वाटतयं आणि आज तुम्हांला उदाहरण देईन की, उल्हासनगर आणि ठाणे महापालिकेमध्ये तिथं कोणीही गेलं तर त्याला पहिल्यांदा क्वारंन्टाईन करतात. नंतर त्यांच्यावर उपचार केले जातात. त्या व्यक्तीला कोरोना नसला तरी त्याला ७ दिवस क्वारंटाईन करतात. हा आपल्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये मोठा फरक आहे. विशेषत: हार्डीकर साहेबांनी यामध्ये खुप चांगल्या प्रकारे नियोजन केलेलं आहे.माझ्या नातेवाईकांना अनुभव आलेला आहे की, खरोखरच पहिल्यांदाच कोविड टेस्ट केली जाते. आणि नंतर ट्रिटमेंट केल जातयं ही अभिनंदनाची गोष्ट आहे. आणि यामध्ये तपशिल कुठं मागे पुढे राहीलेला नाही. आज चिंचवड विधानसभेचे आमदार सन्मा.लक्ष्मणभाऊंनी आम्हांला वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. आमदार महेशदादांनी सुध्दा आम्हांला वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत की, प्रत्येक नगरसेवकांने ग्राऊंड लेवलवर जाऊन प्रत्येक नागरीकांची चौकशी करायची. फक् कोविडच्या पेशंटची चौकशी करायची आणि त्याला पाहिजे ती मदत पुरवायची. अशा प्रकारे त्यांनी आम्हांला सूचना दिल्या आणि आम्ही त्याप्रमाणे काम केलेलं आहे. आणि यामध्ये कोणीही तिळमात्र

शंका घेण्याचं कारण नाही. त्यानंतर कोविडच्या पेशंटला त्याला मानसिक त्रास असतोच आणि तो त्याच्या व्याधीने ग्रासलेला असतो. परंतु त्यांना त्याच्या शेजारी पाजा-यांचा जास्त त्रास असतो. यासाठी त्याठिकाणच्या शेजारी-पाजारी यांना मानसउपचार तज्ञांना त्यांच्याकडे पाठवुन त्यांच्यावर इलाज केला पाहिजे. शेजा-यांचा इतका त्रास असतो की,तो व्याधीने कमी आणि शेजा-यांचा जास्त त्रास होतो.तसेच आता सर्वांनीच डॉ.साळवी यांच्या बाबतीत बोलले आहे. मागच्या वेळेस मीच या सभागृहामध्ये बोललो होतो त्यावेळेस ताईंनी विरोध केला होता आणि म्हणले होते की, कोर्टामध्ये विषय असताना त्यावर बोलू नका परंतु त्यावर मी बोललो होतो. परंतु आता असं वाटतयं की,त्यावेळेस मी खरंच चुकलो आहे. डॉ.साळवी हे ब-याच वेळा फोन केला तरी ते रिसीव्ह करीत नाहीत. माझ्यासारख्याने जरी त्यांना फोन केला तर ते काय म्हणतात बाळासाहेब सिंम्पल आहे तुम्ही या, या डॉक्टरांना भेटा,त्यांच्या टेबलवरती जावा, त्यानंतर तिकडच्या टेबलवर जावा अशी त्यांची काम करण्याची पध्दत आहे. आज मला या सभागृहात सांगावसं वाटतय की, आम्ही खरंच कुठं तरी चुकलोय, डॉ.साळवी हे खरोखरचं अकार्यक्षम असे अधिकारी आहेत. त्यांना खरंच बाजुला ठेवावं. आता अजितभाऊनी आणि नितीन आप्पा काळजे यांनी सांगितले आहे की, काही डॉक्टरांच्या बाबतीत अनुभव निश्चित आहे. परंतु माझा अनुभव सांगतो की, माझ्या वॉर्डामध्ये ब-यापैकी सुरुवातीला कोविड पेशंटची संख्या वाढत चालली होती. ज्यावेळेस मी वाबळे सरांना फोन केला त्यावेळेस मला पॉझीटीव्ह उत्तर मिळालं आणि माझ्या वॉर्डामध्ये जेवढे कोविड पेशंट होते त्यांच्यासाठी जे उपचार करावयाचे होते ते अगदी चांगल्या प्रकारे भेटलेले आहेत. माझ्या वॉर्डातलेच नव्हे तर आजुबाजुच्या वॉर्डातील जे ओळखीचे पेशंट होते त्यांनाही ट्रिटमेंट चांगल्या प्रकारे दिली गेलेली आहे. वायसीएमएच हे मोठं समुद्र आहे आणि त्याठिकाणी हजार रुग्ण असतील आणि बाकीचे हॉस्पिटलमध्ये १० रुग्ण असतील तर यामध्ये १० रुग्णांना चांगल्या प्रकारे ट्रिटमेंट मिळणार आहे. वायसीएमएच मध्ये एवढा मोठा व्याप असल्यामुळे तिथं १९-२० होतंय त्याच्यावरती कंट्रोलींग केलं पाहिजे. परंतु वायसीएमएचचं नांव मला ठाणे आणि उल्हासनगर महापालिकेच्या मधुन माझ्या वॉर्डातुन चांगला प्रतिसाद मिळाला. आता याच्यावरती माझ्याजवळ जे आहे ते तुम्हांला सांगितलं आहे. आणि डॉ.वाबळेनी जो मला प्रतिसाद दिलेला आहे तो खरोखर चांगला आहे.आता कोविडच्या काळामध्ये वायसीएमएचच्या अंम्बुलंन्स असतील,खाजगी अंम्बुलंन्स

असतील त्या ब-यापैकी मिळत नव्हत्या. माई आपल्याकडे जर एखादा ६० वर्ष किंवा ८० वर्षाचा वयोवृध्द गेला तर त्याचे डेथ सर्टीफीकेट किंवा डेथ झाली म्हणुन सांगण्यासाठी त्याला अंम्बुलंन्स मध्ये किंवा प्रायव्हेट गाडी मध्ये घेऊन त्याला वायसीएमएच ला यावं लागतयं नंतर त्याचा स्मशान दाखला मिळतो. पुर्वी नगरसेवकांच्या शिफारशीनुसार स्मशान दाखला मिळत होता. ठिक आहे टेक्नीकल अडचणी असतील परंतु प्रभागातील डॉक्टर अजिबात हात लावत नाहीत हा पेशंट गेला आहे की नाही. ते सांगतात की,आमची जबाबदारी नाही. काही लोकांना स्मशानामध्ये खर्च करण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत. त्या लोकांनी त्या पेशंटला अंम्बुलन्स मध्ये आणायचं, ३/४ तास वेटींगला थांबायचं आणि परत त्याची ती बॉडी घेऊन जागेवरती यायचं याच्यावर पर्याय काय आहे तर प्रभागामध्ये महापालिकेचे  जे हॉस्पिटल आहेत त्याठिकाणच्या डॉक्टरांना आपण तसे आदेश देण्यात यावे.त्यांनी तसे सर्टीफिकेट देण्यात यावे. आणि त्यांना सक्तीचे आदेश देण्यात यावे. आज माझ्या वॉर्डातील प्रत्येक पेशंटला इकडे घेऊन येत आहेत. नंतर तेथुन पास घेऊन जात असतो. यामध्ये त्या नागरीकांची जी हेळसांड होते त्यावर आपण उपाययोजना करावी. पीजी बद्दल सर्वांनी अभिनंदन केलं.परंतु त्या विषयाला थोडीशी कलाटणी दिली त्यामध्ये जी उपसूचना दिलेली आहे यामध्ये जी घंटागाडी कर्मचारी असतील, वॉर्डबॉय असतील, किंवा सिस्टर असतील यांच्यासाठी जी उपसूचना दिलेली आहे ती खरोखरच चांगली उपसूचना आहे. आणि या उपसूचनेसह विषय मंजुर करणेत यावा. आता आमच्या एका सहका-याने सांगितलं होतं की, डॉ.प्रविण गायकवाड अशी कोणाची तरी शिफारस का करायची, मलाही शिफारस करता येते. आणि आता जी उपसूचना दिलेली आहे त्यामध्ये कुठे देवाण-घेवाण झालेली नाही. काही लोकांची अशी परिस्थिती आहे की, त्यांना घरामध्ये खायला अन्न नाही. किंवा आरोप लावू नका तुम्ही, सत्ताधा-यांवर काही लोकांनी जो आरोप लावला आहे तो मी खोडून काढतो. उपसूचना तशा विचारपूर्वक दिलेल्या आहेत त्याच्यावरती कोणी बोलायला नको होतं. एवढं बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

**मा.सीमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.आयुक्त साहेब गेल्या अनेक दिवसापासून डॉक्टर लोकांचा हा पेन्डीग असलेला विषय. आरोप झाल्यानंतर आम्ही सगळयांनी तुम्हांला सुध्दा प्रेशर केलं, आम्ही तुम्हांला सांगीतल की विषय

तुम्ही का करत नाहीत, विषय विधीकडे खुप दिवस पेन्डीग होता आणि मग विधीने जाता जाता तो विषय मंजूर केला आणि जीबीकडे आला. मी तर अगदी तुम्हांला सांगीतल होतं की हे जे ओझ आहे की जे वारंवार आरोप होत होते की त्यात काहीतरी व्यवहार झाला, भ्रष्टाचार झाला म्हणून डॉक्टरांच्या नियुक्त्या थांबवल्यात याला सगळयांना आम्ही कंटाळलो होतो. तुम्हांला आम्ही सांगीतल होत की पाहीजेतर तुम्ही तुमच्या अधिकारात का होईना पण ते करा, कारण आम्ही कंटाळलोत. या सगळयांची पार्श्वभूमी एकच होती की आम्हांला प्रशासनाने केलेली कामाची दिरंगाई त्याला आम्हांला भोगाव लागल आणि एक दोन नाहीतर तब्बल चार महीने विषय सलग वृत्तपत्रामधुन गाजला. आता एकतर आरोप झालाच तर आता करण्यात काय मजा आहे. कारण आम्ही नको तेवढी बदनामी सहन केली, आजही आरोप आहेत. केलतरी आरोप आहे, नाही केलतरी आरोप आहेत मग नाही केलेल काय वाईट आहे. एकतर तो विषय झाल्या झाल्या तुम्हांला माहीती होतं तुम्ही तो तुमच्या अधिकारात घेवून कार्योत्तर मान्यतेला यायला पाहीजे होतं ते तुम्ही केल नाही. साहेब, तुम्ही चांगले आहात पण यंत्रणा जी आपण लवून देतोना त्या यंत्रणेचे दरवाजा आपण बंद कराव आणि दरवाजे बंद न केल्यामुळे त्या आरोपाना आम्हांला सगळयांना सामोर जाव लागलं. हा चांगला आहे का, तो वाईट आहे का, पीजीचे डॉक्टर कसे चांगले आहेत, आमचे कसे वाईट आहेत, आमचे लोक नालायक कसे आहेत, महानगरपालिकेचे अधिकारी कामच कसे करत नाहीत. डॉक्टर किती युसलेस आहेत हे सगळे कमेन्टस आम्ही ऐकलेत. आमच्यासाठी महापालिकेचा जो आमच्या अस्थापनेवरचा कर्मचारी आहे तो माझ्या कुटूंबातला आहे आणि जो बाहेरुन आला तो माझ्यासाठी पाहूणा आहे. माझी संस्कृती सांगते की पाहूण्याचा अपमान करायचा नाही आणि म्हणून मी केला नाही. याचा अर्थ हा आहे का की पाहुण्याने जावाई होवून घरात रहायच, याचा अर्थ हा नाही होत. संदिप वाघरे असेल, योगेश भाई असतील, सुजाता पालांडे असतील, आशाताई असतील. साहेब, इतक अभ्यासपुर्ण भाषण या सभागृहात पहील कधी झालेल नाही, इतक सुंदर बोलले. डॉ.वाबळेना तुम्ही डीन केल काय आणि नाही केल काय आमच्यासाठी काही फरकच नाहीना. आम्हांला काय फरक पडतो परंतु त्यांची शैक्षणिक अर्हता जर त्या लेव्हलची नसेलतर मग मात्र आम्हांला फरक पडतो. आता आमचे येथे डॉ.साळवे उभे होते, साळवेना सांगता आल नाही साहेब. डॉ.वाबळे पाठीमागे बसलेले आहेत त्यांना बोलवा. ४५ ज्या डेथ झाल्या त्या एका दिवसाच्या आहेत का ते

त्यांनी तारीख सांगू देत, नावासहीत त्यांनी सांगाव, सेम डेटच्या आहेत का ते. माझ्याकडचा पेशंट आहे, माझ्या गावातला आहे आणि आळंदी रोडला राहायला आहे सतीष मारोपकर नाव आहे, तो आयसीयूला ऍडमीट आहे आणि तो मला तीथून फोन करतो मला म्हणतो ताई तुझ्या पाया पडतो काहीबी कर मले इथून हालव. आरे, मी कुठ हालवू तुला सतीष का असा करतोस. नई बाबा माझ्या तीथ चार चार मयती पडलेल्या आहेत सकाळी सहा वाजल्या पासून दुपारी एक वाजेपर्यंत मयत हालवली नव्हती. साहेब, मी तुम्हांला फोन केला कारण की माझा फोन तुमच्या कुठल्याही डॉक्टरांनी उचलला नाही आणि म्हणून मला तुम्हांला फोन करावा लागला. साहेब, चार-चार, पाच-पाच तास जर का त्याठिकाणाहून मयत हालवत नसतीलतर काय केल पाहीजे. जर पाच-पाच तास मयत हालवणार नसालतर आयसीयू मध्ये असलेल्या पेशंटची मानसीक अवस्था काय होत असेल विचार करा. आणि म्हणून त्याच्यावर ख-या अर्थाने काम करायची गरज आहे. डॉ.दादेवारच नाव घेतल, विनायक पाटीलच नाव घेतल ज्या ज्या डॉक्टरांच नाव घेतलना साहेब, खोट नाही सांगत त्या दिवशीच सकाळी डॉ.दादेवाराना फोन केला आणि डॉ.लाठीला फोन केला आणि मी विचारल की माझा पेशंट कसा आहे मला त्याचा फोन येतो तो सांगतोय की मला ऑक्सिजन पुरत नाही, जावुन बघा. डॉ.दादेवार जागेवर गेले, साहेब त्या डॉक्टरांनी मला व्हिडीओ कॉल केला आणि त्यांनी सांगीतल की ताई तुमचा पेशंट जास्त सिरीअस आहे म्हणून त्याला ऑक्सिजन पुरत नाही असं त्याच म्हणण आहे पण तुम्ही काही बोलू नका नुसत बघा. तीथ तीन चार माझ्या ओळखीचे पेशंट आहेत त्या सगळयांना मी विचारल तुम्हांला कोण येत बघायला ते म्हणाले डॉ.दादेवार येतात. बाकीचे कुठे असतात, बाकीचे कुठे असतात. विनायक पाटील जाणार, दादेवार जाणार जे काय आमचे आहेत ते जाणार. डॉ.गोफणेची अवस्था तुम्हांला माहीती आहे किती सिरीअस झाली होती. या सगळया पार्श्वभूमीवरती आम्हांला विचारता तुम्ही, जस तुम्ही आयुक्त आहात तुम्हांला तुमची टिम प्यारी आहेना साहेब तसे आम्हांला आमचे अधिकारी प्यारे आहेत. साहेब, तुम्हांला मी वारंवार सांगते जसा कोवीड सुरु झाला आपल्या इथे त्या दिवसापासून आम्ही तुम्हांला सांगतो की बाकीच्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांना आपण सुट्टी दिलेली नाही आणि डॉ.पवन साळवेनी काय कारवाई केली. साहेब, दरवेळेला हां मी सांगतो, हां मी सांगतो साहेब, तीन ते चार महीने निघुन गेलेतहो. नाहीतर नाही सुट्टी दिली. भोसरीचे तीन्ही डॉक्टर आयसीयूला ऍडमीट आहेत साहेब आणि डॉ.गोफणेतर

सिरीअस झालेत. बाहेरच्याना एक न्याय आणि आपल्या हॉस्पिटलला एक न्याय असं का झाल आपल्याकडन. साहेब, दाबात ठेवाना कुणीही असू देत आणि तुम्ही नेहमी म्हणता की मला काय कुठेही नौकरी करायचीच आहे. इथेही करायची आणि अजून कुठेही जावून करायची आहे. मग आपण कुणाला घाबरतो. आणि म्हणून साहेब याठिकाणी जर का आपण वेळेत दक्षता घेतली असतीतर आज डॉ.गोफणे मरणाच्या दारातून परत आलेला आहे, आजही डॉ.गोफणेना तुम्ही बोलायला लागलातर इतकी धाप लागलेली असते बोलताना की आपल्याला वाटत त्यांच्याशी बोलू नये. अनेक अधिकारी डेप्यूटी ईंजिनीअर आहेत, एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर्स असतील, माझा क्लार्क असेल अनेक लोक ऍडमीट आहेत. वायसीएमचे तर लाखे एक्सपायर झालेत. त्यांच काहीच योगदान नाही का. कोरोना डयुटया केल्या नाहीत त्यांनी. मग जे टेम्परररी आहेत त्याना जर तुम्ही काम करायला सांगत असालतर उदयाजर काही झालतर त्यांना होणार. सगळयाचीच जबाबदारी आहे साहेब, सगळयांनीच जबाबदारीन वागल पाहीजेना. आम्ही म्हणल का तुम्ही या डॉक्टरांना प्रमोशन देवू नका, यांना परमनन्ट करु नका, खास करुन मी तुम्हांला कधी बोलले का. एकतर तुम्ही त्यांची मुलाखत घेतल्यानंतर त्यांची रिटन टेस्ट असेल, ओव्हरल असेल आता अजीत गव्हाणेनी सांगीतल की श्रीकर परदेशी यांनी तर सांगीतल ओव्हरल घ्यायचीच नाही. आता आपल्याकडे नवीन रेटींग सिस्टीम आली. रेटींग सिस्टीम फक्त अधिका-यांच्या भरतीपुरती मर्यादीत नाही ठेवली. आपण ही टेंडर सिस्टीमला रेटींग सिस्टीम आणली. विकास कामाला सुध्दा रेटींग सिस्टीम आणली आणि त्या रेटींग सिस्टीममध्ये काय ठरत आम्हांला कळतच नाही. आम्हीतर अनपड यांना काय कळतं. जितक दुर्दैवी डॉक्टरांवरती आरोप करणं आहे तीतकच दुर्दैवी आहे की डॉक्टरांनी हे म्हणणं की राजकीय आमदार, खासदार, नगरसेवकांचा हास्तक्षेप नको. मग तुम्हांला काय मालकी हवी का वायसीएमची. तर, तसं होवू देणार नाही. सन्मा.महापौर साहेब, आपण खुर्चीवर बसलात आपल्याला माहीती आपली फिरती खुर्ची आहे, फिरता रंगमच आहे. जो काही निर्णय घ्यायचा असेल या शहराच्या हिताच्या दृष्टिन तो पुढच्या पन्नास वर्षाच्या दृष्टिन आपण निर्णय घेतला पाहीजे. जर का राज्यशासनामध्ये डीन दोन वर्षानी बदलत असेलतर आपला डीन सुध्दा दर दोन वर्षानी, तीन वर्षानी बदललाच पाहीजे मग त्याच्यावरती कुठलीही कसूर राहता कामा नये. जे राज्यशासनाला नियम असतील ते आपल्याला पण नियम झाले पाहीजेत आणि नसतीलतर तसे आमच्याकडून ठराव पास करुन

घ्या, मग तर काही चालणार नाही साहेब. आमचेतर डॉ.साळवी आणि डॉ.रॉय यांच्या भांडणामध्ये आज आम्ही नको ते दुखण अंगावर घेवून बसलोत. डॉ.रॉयनी काय केल काय नाही केल त्यात मी पडत नाही एखादयाच शंभर टक्के सत्य पण असेल परंतु एखादया माणसाचे चांगले गुण सुध्दा नाकारता येत नाहीत. तुम्हांला वारंवार सांगीतल होत जे उरलेले हॉस्पिटल आहेत त्याची जबाबदारी डॉ.रॉयला दया. काहीना काही तरी चांगल करेल. तुम्ही काय केल कोवीड सेंटरची जबाबदारी दिली. आणि साहेब इतक पण नाही केल पाहीजेना. एखादयाची कुवत आहे लायकी आहे, त्यांनी डिग्री घेतलेली आहे, त्यांनी सेवा दिलेली आहे. साहेब, ज्या गोष्टीसाठी त्यांच्या अकौंटवर पैसे ट्रान्सफर झालेत त्याच्यामध्ये शंभर टक्के रॉयला शिक्षा करा. पण त्यांच्या डयुटी पासून त्यांना वंचित ठेवू नका. त्यांच्या कर्तव्यापासून त्यांना मुक्त करु नका. रॉय मध्ये आणि साळवीमध्ये जी काही भांडण झालीत त्याला जबाबदार हे दोघे जेवढे आहेतना तेवढेच जबाबदार आमच्यासारखे सुध्दा आहेत आणि तुमच्या सारखे लोक सुध्दा जबाबदार आहेत. सगळयांनी त्यांचा गैरफायदा घेतला. त्या दोघाना कळालच नाही की काय खेळ चालला आपल्या संग ते, आणि आता त्यांना कळतय त्यामुळ काय घडलय म्हणून. पण मा.महापौर आमचे आणि तुमचे डोळे उघडे आहेत. ही आपली माणस आहेत यांनी तीस-तीस, पस्तीस-पस्तीस वर्षे आपल्याला सेवा दिलेली आहे आणि पुढे देणार आहेत हे आपल्या शहराचे रहीवासी आहेत, यांच्या बद्दल सुध्दा आपण चांगला विचार केला पाहीजे. पीजी बद्दल करु नका अस अजीबात मी म्हणणार नाही. माझ्या डॉक्टरांनी सुध्दा घोड मारलेल नाही कुणाच. त्यांना सुध्दा चांगली पोस्टींग मिळाली पाहीजे, त्यांना सुध्दा चांगल काम मिळाल पाहीजे. आणि म्हणून मा.महापौर साहेब, याच्यामध्ये आपण निर्णय घेत असताना डॉक्टरांना परमनन्ट केल पाहीजे का, नाही मला माहीती नाही, तुम्ही जर परमनन्ट करणार असालतर, पीजीला प्रोफेसर म्हणून त्यांना घेणार असालतर आपल्या काहीतरी नियम अटी असतीलना की त्यांनी प्रायव्हेट प्रॅक्टीस केली नाही पाहीजे, त्यांच हॉस्पिटल नसल पाहीजे पण जे काही आहेत त्यांची सगळयांचीच प्रायव्हेट हॉस्पिटल्स आहेत. मग आपण कशी कट सिस्टीम लावणार. मग आम्हांला कळतच नाही काय झाल ते पहील. मग आम्ही तरी किती बोलायच, किती बोलायच कंटाळतो आणि सोडून देतो. मग त्याच्यासाठी आपली काय सिस्टीम. जे कोणी आपण घेतलेले आहेत त्यांची जर का तीकडे प्रॅक्टीस चालत असेलतर ती प्रॅक्टीस कायमच चालणार. कारण की त्यांचे रिलेशन.

बरं ते अनुभवी आहेत मग त्याच्यासाठी काही आपल्याकडे अटि, शर्ती ठेवणार आहेत का. कारण काय ठेवायच्या असतीलतर आपण सुरवातीलाच ठेवायला पाहीजे होत्या. आता तुम्ही इन्टरव्हीव घेतला तुम्ही त्यांना पास केल, त्यांना त्यांची ग्रेड पण कळाली आहे. आता तुम्ही काही जरी म्हणलात तरी ते अंगावर येतील, मग काय करणार आहेत तुम्ही सांगा. कारण काय असं जर असेलतर आपण विचार केला पाहीजे आणि ते जर तेथे जावुन डयुटी बजावत नसतील, जे कोण असतील तीथ डॉक्टरांना हा चांगला तो नालायक तो असा हा तसा हे आम्हांला करण्यात इन्ट्रेस्ट पण नाही आणि आम्हांला गरज पण नाही. परंतु हेतर खर आहे साहेब एका माणसासाठी किमान वीस ते पंचवीस वेळा फोन लावावा लागतो. आणि एका डॉक्टराला पाच-पाच, दहा-दहा वेळा फोन केल्यानंतर मग कधीतरी कुणालातरी जाग येते तो फोन करतो. आता मला तर असं वाटायला लागल की वादात एखादया कॉन्ट्रॅक्टरनी चुकीच काम केल आयुक्तांना फोन करा. दवाखान्यात काही झाल आयुक्ताना फोन करा. आता आयुक्तांना जर फोन करायचा असेलतर मग ती यंत्रणा कशाला पाहीजे. यंत्रणा घरी बसून टाका साहेब. आणि साहेब तुम्ही कारवाई करानां. कारवाईचा बडगा तुम्ही उगारला पाहीजे. तुम्ही हे जे लाड करायला लागलातना साहेब, या लाडातन काय होईल साहेब ते तुमच्याशी तात्पुरते लाड करतात हो. त्याना तुम्ही अशी पनीशमेंट केली पाहीजे साहेब की भीती बसली पाहीजे त्याची. मा.महापौर साहेब जे काही आपण करणार आहोत या नोकरभरतीच्या बाबतीत, डॉक्टरांच्या बाबतीत तर याचे सर्वस्वी अधिकार जीबीकडे ठेवा. तक्रार आलीतर शंभर टक्के कारवाई करायचा अधिकार आपला असला पाहीजे. कारण काय एकदा जर का आपण ही मक्तेदारी दिलीना तर वायसीएम आपल्या हातातून गेल म्हणून समजायच. नाही आपण वायसीएमला काही करु शकणार. आणि म्हणून याच्यावरती खुप विचारपुर्वक निर्णय घेणं गरजेच आहे. इन्टरव्हीव झालेले आहेत तुमची पुढची प्रोसेस तुम्ही करणारच आहेत. परंतु आपण ती प्रोसेस करताना आपण लक्षात घेतल पाहीजे की ही महानगरपालिकेची मालमत्ता आहे आणि या मालमत्तेमध्ये आणि ज्या ज्या डॉक्टरांना वाटत की नगरसेवक, आमदार, खासदार यांचा त्याठिकाणी इन्टरफेअर नको, म्हणजे मग माझा पेशंट ऍडमीट करुन घ्या असाही मी फोन करायला नको तर प्लीज सॉरी मी त्यांच्या विषयाला का पाठींबा दयावा, मी का दयावा पाठींबा. माझा हस्तक्षेपच नकोना मग राहूदे, मग नाहीतर नाही माझ काही म्हणणच नाही, आम्हांलातर कळत नाहीना तुमच्या प्रॅक्टीसमधल

काही, आम्ही थांबतो आमच काहीच म्हणण नाही. परंतु तुम्हांला हे कळल पाहीजे की जे नगरसेवक या सभागृहात बोलतात, जे आमदार या शहरात काम करतात, जे खासदार दिडशे कोटी जनतेमधुन साडेपाचशे खासदार निवडून जातात त्यांना तुम्ही बोलायला नाही म्हणता. तुम्ही संविधान नाकारता, तुम्ही लोकशाही नाकारता हा अधिकार अजूनतरी संविधानाने कुणाला दिलेला नाही. ते एकमेकांवरती बर्डन रहाव म्हणून तर ही यंत्रणा आहे. आणि म्हणून मा.महापौर साहेब, विषय पाहीजेतर तहकूब ठेवा जेवढया डॉक्टरांची नियुक्ती करायची असेल त्या सगळयांना बोलून घ्या. सगळयाकडन प्रतिज्ञापत्र घ्या. त्यांना विचारा तुम्हांला जर आमचा कुणाचा हस्तक्षेप नको असेलतर आम्हांला विचार करावा लागेल. आम्हांला विचार करावा लागेल कारण की आम्ही जे लोक इथे लोकप्रतिनिधीत्व करतो आमदार असु देत, खासदार असु देत, नगरसेवक असु देत आम्ही जनतेचे प्रतिनिधी म्हणुन प्रतिनिधीत्व करतो. संदिप वाघेरेनी तीथ काय मारामारी केली म्हणे, काय काय केल जे काय झाल असेल त्यांनी जो घटनाक्रम सांगीतला आणि जो मी ऐकला त्याच दिवशी माझ्या वॉर्डातील सुध्दा २७ वर्षे वयाचा मुलगा पहील्या दिवशी संध्याकाळी साडेपाच सहाला मी ॲडमीट केला, खर सांगते आयुक्त साहेब २७ वर्षाचा अनिल गायकवाड नावाचा मुलगा आपल्या डॉक्टरांनी सांगीतल याला काहीच झालेल नाही. पाच साडेपाचला मी ॲडमीट केला आणि पहाटे साडेतीनला तो गेला. आणि साहेब नंतर काय केल, एक्स-रे दाखवला म्हणले पुर्ण एक्स-रे पांढरा आहे याचा. मी म्हणले आणल्या आणल्या तुम्ही एक्स-रे केला नाही का तर ते म्हणाले ताई नॉट कोवीड पेशंट प्लिज, तुम्ही बाहेर जा तुम्ही बाहेर जा. आरे तुम्ही याला ॲडमीट करुन घेतलतना माझ्या जवळचा कार्यकर्ता आहे, तो एकूलता एक लेक आहे, बाप रिक्षा चालवतो, स्लम मध्ये राहणारा पोरगा आहे मग साहेब, सकाळी पहाटे साडेतीन वाजता फोन आला की तुमचा तो पेशंट गेला म्हणून. आठ महीन्याच बाळ आहे काहीच नाही करु शकल. माझ्या वॉर्डात एकाच आठवडयात सलग १४ मयती झाल्या साहेब. १४ मयती झाल्या, १४ पैकी १४ मयती करोनानी झाल्या होत्या. वारंवार सांगतोत सगळयांना, एक यादी दयाना, आम्हांला सांगाना. कुणाला करोना झालेला आहे तुमच्याकडे टेस्ट आली असेलतर आम्हांला कळवाना. आम्ही काही करत नाही दिंडोरा पिटवणार आहेत का. लोकप्रतिधी आहोत, आम्ही जाणार तेवढयाच फॅमिलीला आम्ही सांगणार तु घराच्या बाहेर पडायच नाही, नाहीतर क्वारन्टाईन सेंटरला नेहून सोडेन. काहीतरी प्रिकॉशन घेतल असतना साहेब. नाही आपण ती

यादी देत, आजही आपण देत नाहीत. मला सांगाव लागल साहेब, अमका अमका एक मुस्लिम माझा कार्यकर्ता आहे त्याचे वडील एक्सपायर झाले आणि कोविडने गेले. त्याच्या घरचे तेरा ते चौदा लोक आहेत, सगळे तीन भाऊ एकत्र राहतात, त्यांच्या बायका आहेत छोटी छोटी मुलं आहेत आता यांना काय करायच. तो दिवस आणि आजचा दिवस काही केलेलं नाही. खर सांगते डॉक्टरांना फोन केल्यानंतर त्यांचा थकलेला आवाज ऐकलाना तर बोलायची इच्छा होत नाही. पर्याय नसतो साहेब म्हणून बोलतो. परवाच्या दिवशी संध्याकाळी चिखलीच्या क्वॉरंटाईन सेंटरला ४०-४५ लोक उभे आहेत. तुम्ही ज्या ज्या क्लस्टरमधुन त्यांना उचलल असेल आणि तुम्ही तीकड नेलं. पहील आपण कन्फर्म करत नाहीत की जागा आहे का नाही, केल पाहीजेना. तुम्ही तीथ नेल भर पाऊस चालू आणि मोबाईलचे फोन चालू. आम्हांला इथ आणल इथ रहायची सोय नाही, जागाच नाही इथ. काय केल तुम्ही, हा टिकेचा विषय आहे यात दुरुस्ती आली. आपण एवढे मोठमोठे सेंटर करतो तो तुमचा पुढचा विषय आहे. मोठे सेंटर उभे करत असताना अशाप्रकारची जर का त्याठिकाणी वागणूक मिळत असेलतर काही लोक येत नाहीत आपल्याकड. म्हणून लोकांचा घरी राहण्याचा कल जास्ती वाढत चाललेला आहे. मग घर छोट असलतरी घरातच राहतात त्यामुळे घरातले ऍटोमॅटीकली चार-चार, पाच-पाच, सहा-सहा लोक पॉझिटीव्ह होतात. आपल्यावरच बर्डन वाढत चाललेल आहे. यंत्रणा कमी पडत चाललेली आहे, याला जबाबदार कोण. आपण योग्य वेळेत इतक्या सगळया सुविधा आणल्या, म्हणजे ते खरेदीचे विषय मी म्हणल सगळेजण ओरडतात या तुमच्या खरेदीच्या विषयी. हे जर तुम्ही केल असेलतर किमान आमच्या नागरीकांच्या कामाला येणार. आमची माफक अपेक्षा आहे वेळेत येवू दया. बाकीचा आमचा काही म्हणण्याचा विषय नाही. त्याच बरोबर मा.महापौर साहेब, आता जी आपली उपसूचना झालेली आहे त्यामध्ये आपण पॅरामेडीकल म्हणजे जे नर्स असतील, वॉर्डबॉय असतील जे कोण आपण घ्यायच म्हणतो ती कॉन्ट्रॅक्ट बेस वरती आहेत किंवा सहा महीन्यानी त्यांना आपण गॅप दयायला पाहीजे होती, ती दिली गेली का नाही गेली ते बघीतल पाहीजे. कारण तो विषय करायचा का तर मला मनापासून वाटतय केला पाहीजे. पण तो जर केलातर अनेक दार तुम्हांला उघडावे लागतील. कारण की न्याय सगळयांना सारखा असला पाहीजे आणि तुम्ही न्यायदेवतेच्या खुर्चीवर बसलेला आहात. त्यामुळ तुमच्याकडन न्यायाची अपेक्षा लोक ठेवतीलच. तरी त्याचा विचार करा. शक्यतो आज आपल्याला हा विषय करायचा असेलतर

साहेब परत एकदा सांगते या सगळया डॉक्टराना एकदा बोलवा आणि जो काही त्यांचा क्रायटेरीया आहे तो विचारा की त्यांच्या प्रायव्हेट प्रॅक्टीसच ते काय करतील. कारण की साहेब तुम्हांला मी सांगते की ते प्रायव्हेट प्रॅक्टीस करत राहीलेतर याच्यावरती दर जीबीला आरोप होतच राहणार. की बाबा तीथ ऑपरेशन होत होतं आणि कमी पैशात होणार होतं तरी मुद्दामहुन डॉक्टरनी स्वतःच्या क्लिनीकला नेल आणि त्याला आपण थांबवू शकणार नाहीत. डॉक्टरांची गरज आहे त्या गरजेनुसार काम कराव एवढ तुम्हांला मनापासून सांगते. जे काही बोलले होतं ते टिका म्हणून नाही साहेबतर भेदभाव पण खुप व्हायला लागला. डॉ.रॉयच्या संदर्भात चांगला निर्णय घ्या. डॉक्टर आहेत, डॉक्टरांना डॉक्टरांच काम दया. हातात खराटा दिलाय साहेब तुम्ही त्यांच्या. इतकी पदावन्नती चांगली नाही साहेब. सत्ता कुणाची पण असु दयात इतक वाईट नाही वागायच. सगळ इथेच फेडाव लागतं. कर्म आहे ते कुठल्यान कुठल्या रुपात येतच आपल्याकड. इतक वाईट नका वागू. त्यांनी चुक केलेली आहे त्या चुकीची त्याला शिक्षा दया, त्यांचा पगार कमी करा काय दंड मारायचातर दंड मारा, जे काय होत असेल ते सगळ करा. पण त्यांच्या पदाला न्याय देणार काम दया. साळवीना जी काही माहीती सांगता येत नाही किंवा ते जे काही फोन उचलत नाहीत, म्हणजे आमचे बाळासाहेब मगाशी म्हणले. त्यांची बोलायची स्टाईलच ती आहे. बोलायची स्टाईलच ती आहे. याला काही कठीण नाही, त्याला काही कठीण नाही हे असं करता येईल, ते तसं करता येईल. टेक्निकल भाषेमध्ये बोलायला सांगा, डॉक्टर आहेत. पिंपरी चिंचवड सारख श्रीमंत महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी एवढया मोठया पदावर काम करतात. टेक्निकली भाषेत बोलल पाहीजे. आमचा प्रॉब्लेम असा आहे की जे कोण आमचे अधिकारी असतील, आमचे डॉक्टर असतील हे टेक्निकल कमी बोलतात आणि म्हणून यांना काही कळत नाही असा जो भ्रम झालेला आहे त्या भ्रमाचा भोपळा आम्हांला सुध्दा फोडायचा आहे. परत एकदा सांगते साहेब, बाहेरचा का आतला हा विषय नाही पण माझ्या डॉक्टरांना जर का चांगली वागणूक मिळत नसेलतर त्यांच्यासाठी लढायच काम माझ आहे. सगळया डॉक्टरांना एक सांगते की आपण स्टेटमेंट करताना, आम्हीतर राजकीय नेते आहोत साहेब. अजून आम्हांला फ्रिडम आहे, किमान डॉक्टर आहेत, सेवेमध्ये आहात, गव्हर्मेंट अन्डरटेकींग सेवेमध्ये आहात. तुम्ही स्टेटमेंट करत असताना तेच आमदार तुमच्यासाठी आम्हांला दम देतात. तेच खासदार तुमच्यासाठी आम्हांला दम देतात. की चांगली सेवा चाललेली

आहे तुम्ही कशाला खोडा घालता म्हणून. ते आमदार काम करतात आमच्या बरोबरचे नगरसेवक एकमेकांचे प्रचंड आमचे वाद असतात. डॉक्टरांचा विषय झालाच पाहीजे म्हणून. आम्ही तीच माणस आहोत, आम्ही माणुसकी सोडून वागत नाहीत आणि वागणार पण नाहीत. साहेब, डॉक्टरांना शंभर टक्के सांगून ठेवा की आता नाही फोन केलाना तर तासाभराने फोन कराना तुम्ही. डॉ.वाबळे साहेबांच्या बाबतीत जे काय शैक्षणिक अर्हतेवरती आक्षेप आलेले आहेत मला वाटते एकदा ते तपासून बघा. मला माहीतच नाही की ते यात बसतात की नाही बसत. निश्चितपणे आम्ही तुमच्या त्या नॉलेजचा आदर पण करतो. परंतु आयुक्त साहेब आम्ही ज्या सांगीतलेल्या गोष्टी आहेत त्याचा आपण निश्चितपणे विचार करावा, एवढच याठिकाणी सांगते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. भरपूर चर्चा या विषयावर झालेली आहे आणि अजूनही काही सर्व नेते मंडळी बोलणार आहेत. हा विषय पास होईल का ना होईल हे सगळ आता तुमच्यावर अवलंबून आहे. या विषयाला उपसूचना दिलेली आहे. पहीली घंटागाडी कर्मचा-यांची आहे. आज आपण पाहतो या लोकांना गेली वीस ते पंचवीस वर्षे कुठेतरी आशा आहे की नक्कीच आज ना उदया आम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी होऊ. पाच हजार मानधन असेल नंतर दहा हजार झाले त्यानंतर पंधरा हजार झाले. हाळू हाळू पैशाची किंवा कशाची अपेक्षा न धरता या लोकांनी पुर्ण आपल्या तन-मन-धनांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी सेवा केलेली आहे. जर हा विषय झालातर या नक्कीच सगळया सुचना मान्य केल्या जातील पण जर झाला नाहीतर कमीत कमी पुढची जी सुचना आहे, पुढचा जो विषय आहे त्या विषया अंतर्गत हा विषय घालून आपण पास करावा अशी मी तुम्हांला नंम्र विनंती करतो. आपण पाहतो कोरोनासारख्या आजाराने अक्षरशः शहरामध्ये थैमान घातलेल आहे. लोक खुप भीतीच्या वातावरणामध्ये काम करत आहेत. यामध्ये आपल्या डॉक्टरांच्या खांदयाला खांदा देवून स्टाफ असेल, वॉर्डबॉय असतील, नर्स असतील, ॲम्बूलन्स सेवेकरी असतील हे सगळे प्रामाणिकपणे काम करत आहेत. तरी यांना आपल्या वायसीएम रुग्णालयामध्ये सामावून घ्याव अशी मी तुम्हांला विनंती करतो. आपण कोरोनावर लक्ष देतो परंतु इतर जे साथीचे आजार आहेत, जे रुग्ण आहेत की विवीध आजाराने ग्रासलेले आहेत त्या सुध्दा रुग्णांनवर व्यवस्थीत लक्ष दिल गेलं

पाहीजे. बाळासाहेब ओव्हाळानी चांगला विषय घेतला त्या विषयाला अनुसरुन नक्कीच सांगू इच्छितो की याच सभागृहाने गेल्या दोन वर्षापुर्वी एक ठराव मान्य केला. मृत्युपत्राबाबतचे नगरसेवकांचे अधिकार काढून वैदयकीय अधिका-यांना दिले आहेत. नक्कीच काही ना काही गोष्टी त्याच्यामध्ये आढळल्या त्याच्यामुळ हा विषय आपल्याकडून वैदयकीय डॉक्टरांकडे दिला गेला. परंतु ही गोष्ट नक्कीच नाकारता येणार नाही की आपल्या शहरात इतरही आजाराने मयत झाली तरी सर्वसामान्य डॉक्टर तीथ यायला वेळ लावतात, उशिर करतात. उशिर झालातरी डेट सर्टिफीकेट करण्यासाठी पैशाची पण मागणी खुप मोठया प्रमाणात असते. माझी आयुक्त साहेबांना नंम्र विनंती आहे की एकच फि आकारली गेली पाहीजे. अन्यतः ते अधिकार परत नगरसेवकांकडे दयावेत अशी मी आपणास मागणी करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मी सभागृहाचा मुळीच वेळ घेणार नाही, सभागृहातील सर्व मान्यवरांच्या ज्या भावना आहेत त्याच भावना माझ्या आहेत. परंतु याठिकाणी मी अनुभवातून एक सूचना देवू इच्छितो की जुन्या काही म्हणी आहेत की संकटकाळामध्येच ख-या माणसाची ओळख पटते. तस ही आपल्यावर जी आपत्ती आलेली आहे यातून एक निश्चित झाल की एवढया मोठया आपत्तीकालीन संकटामध्ये कोण आपल, कोण परक त्याच्याही पलीकड जावून या घटनेमध्ये आवाहनात्मक कामगीरी स्विकारुन माणसामध्ये महानगरपालिकेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी दिवसरात्र काम करणारे कोण आणि नाटक करणारे कोण हे सुध्दा चित्र तुमच्या समोर आहे आणि ही एक परमेश्वरांनी दिलेली संधी समजू यात आपण. कारण की माई, आपण १९९२ सालापासून ऐकतोय वायसीएमचा हा सगळा कारभार दिवंगत डॉ.नागकुमार आणि डॉ.अय्यर यांच्यामध्ये गेले वीस-पंचवीस वर्षे, डॉ.साळवे आणि डॉ.रॉय मध्ये गेला हा कालखंड आणि आता ऍडीशनल म्हणून काय कमी पडतात ते हे. मला वाटत की भुमीपुजन करताना काहीतरी अपुर्ण राहील असेल. काय झाल त्या वायसीएमला काही म्हणजे माणसाची किमंत नाही, नगरसेवकांची किमंत नाही, खरेदी किती, कोणत मशिन किती दिवस वापरायचं, कधी टाकायचं. मी तर कधीच जात नाही. याचा अर्थ माझ्याकडे काम येत नाही असे नाही पण वैताग आला ते ऐकूण. आयुक्त साहेब आत्मचिंतन करा यावर आणि जेवढे मी भाषण केलेतना ते बघा आणि

त्यातल्या वेदना काढा, आशय जरी नसलातरी तो आशय अतीशय महत्वपुर्ण आहे आणि वेदना देणा-या असा आहे. आशाताई बोलल्या म्हणतातना मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही. मग तुमच असं मत आहे का की सगळया नगरसेवकांना एकदा कोरोना होवू दयात मग बघतो आम्ही. जे गेले आहेत त्यांच्या घरी काय वेदना आहेत, यातना आहेत हे तुम्ही जरा पहा, आत्मचिंतन करा. इतक वाईट वाटत की आपण सभागृहात बोलतो, बोलतो नवीन नगरसेवकांना इतका आनंद होतो की वेदना व्यक्त केल्या आता न्याय मिळेल हे मी पंचवीस वर्षे पाहतो कोण म्हणलच नाही मला न्याय मिळालाय म्हणून. किमान ही परमेश्वरांनी दिलेली संधी आहे या संधीच सोनं करा. एखादा भूकंप होतो किल्लारी सारखा, पवार साहेब जातात आणि क्रांती करुन दाखवतात. ती एक संधी मिळते, ती काही ठरवून नाही येत अमुक अमुक दिवशी आपण भूकंप करु. माई, तुम्हांला पिढयानपिढया लोक लक्षात ठेवतील. आपल्या जन्मापासून हे पहील्यांदा संकट आलं, प्लेगच्या संकटात आपण नव्हतो. पानशेत धरण फुटल ते एक संकट होतं. स्कायलॅब पडणार होतं त्यावेळेस आम्ही भाकरी वगैरे लवकर खावून घेतल्या कार्यक्रम लवकर होणार आहे म्हणून. कोरोना हा एक माणुसकीच मानवतेच दर्शन घडवणारा महाकाय रोग असताना त्याच्यावर प्रतिकार शक्ती कशी आपल्यामध्ये निर्माण करायची त्याच काम तुम्हांला करायच आहे. त्यामुळे आयुक्त साहेब मी सगळयांच्या भावनेशी सहमत आहे मी जास्त वेळ आपला घेणार नाही व ते उचित होणार नाही. मा.महापौर तुम्हांला विनंती करतो की इथे आलेले सन्मा.सदस्य आहेत यांच्या मनामध्ये काहीतरी वेदना आहेत, मी तर काल वेदना व्यक्त केल्या तुम्हांला काय बोलायच ते बोला. ढाके साहेब तुम्ही पण घाई करायला नको होती. संदीपची प्रतिक्रीया ऐकल्यानंतर, आम्ही आमच्यासाठी काहीच करत नाहीतना. माणुस मेल्यानंतर दिड तास खोट सांगतो म्हणजे काय. साहेब, मी स्वतःच्या कुटूंबामध्ये सुध्दा आणि माझ्या मित्राच्या कुटूंबामध्ये आता आमचे काका गेले आज त्या माणसाच्या घरची मानसीकता तुम्ही माणुसकी म्हणुन कधीतरी जाऊन चेक करा. मी कधीतरी अनाथाश्रम मध्ये एकटाच जातो आणि त्या मुलांना बघतो. जेवढयावेळ बघत असतो तेवढया वेळ डोळयावर आश्रू असतात. मी उंटावुन शेळया हाकत नाहीतर सहाशे मुल झोपडपट्टीतील मी शिकवतो, विनामुल्य. आज बोलतो कधीच बोललो नाही, वेदना असतात त्या. तुमच्या संवेदना बोथट झाल्यात. यांना काहीच नाही, कोण मेलंय, कोण पडलय काही नाही. अशिष शर्मा आयुक्त होते त्यावेळेला मी वायसीएममध्ये गेलो होतो.

संदिप वाघेरेनी जे केल ते इतक्या टोकाच नाही केल, पण मी केलं. त्यावेळेस महापौर योगेश बहल होते. महापौर कसे असावे, व्यक्ती कसा असावा आणि मी विरोधात होतो. त्यांना त्यावेळेस संधी मिळाली होती. ते म्हणाले मी गॅरंटी लिहून देतो की भाऊसाहेब भोईर असं कधी विनाकारण बोलणार नाहीत. तुमचीच चुक असेल. ते सगळे एकत्र होते कारण आपण कधी कोण टार्गेट करतो हे बघतो मुळ विषय राहतो बाजूलाच. आयुक्त साहेब, माझ असं म्हणण आहे की आत्मचिंतन कराव. सर्वजण बोललेतना त्यांच प्रोसिडींग वाचा, सगळ वाचा. मी पुर्वीपासुन सांगतो कायमच मी विरोधात असतो त्याच्यामुळ माझ शक्यतो कुणी मनावर नका घेत जावु. तुम्ही एक सगळया गटनेत्यांची जीबीच्या अगोदर मिटींग ठेवानां. हा डॉक्टरांचा विषय झालाना मी उदया तेच म्हणतो तुम्ही हे टेम्परारी आज आहेत उदया नसतीलही. मस्ती घालवण्यासाठी आपला अंकुश पाहीजे. आपण विश्वस्त म्हणून आपल सामाजीक प्रतिबींब आहे. आयुक्त साहेब तुम्हांलाही आनंद वाटला पाहीजे की एकही नगरसेवक तुमच्या विरोधात आज बोललेला नाही. जे खर आहे ते खरच आहेनां. प्रश्न असा आहे की चांगल काम केलतर चांगलच म्हणतात. माझी एक नंम्र विनंती आहे या सगळया गोष्टी थांबवा. वायसीएमची एकदा शांतता करा मात्र ही माझी नंम्र विनंती आहे. पूर्वी पीएमपीएमएलचा विषय होता आणि आता वायसीएम आणि नंतर शिक्षणमंडळ. मनसोक्त भाषण करायच असेलतर हे तीन विषय आहेत आणि अशी आमची थट्टा झाली या सभागृहात आता आमची थट्टा करु नका. पक्षनेते साहेब असे विषय आणलेतर तुम्ही चर्चा कराना भले तुम्ही बहुमताने विषय मंजूर करा पण मत तरी ऐका आमचं. भाषण करण्यापेक्षा तुम्ही अगोदर बसा आणि काय करायच ते एकदा ठरवा. इथ मनोरंजन यांच होत, आपल नाही आपल्या वेदना फक्त अशाच राहतात म्हणून याचा प्रामुख्यान, गांभीर्यांन विचार करावा ही विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माझी सभागृहाला विनंती आहे की मी पाचच मिनीट बोलणार आहे. मला मधला ब्रेक घ्यावा लागला. ब्रेक एवढयासाठी घ्यावा लागला की ज्यावेळेस या विषयाची चर्चा सुरु झाली, मला आठवतय म्हणजे ज्यावेळेस आठ-दहा महीन्यापुर्वी अशाच पध्दतीचा हा एक विषय आला होता. आशाताई माझ्या पार्टीच्या माझ्या भगीनी आहेत त्यांनी प्रचंड विरोध केला होता आणि त्याक्षणी काही बातम्या आल्या. मी खरतर माझ्या व्यक्तीगत

कामासाठी पुणे स्टेशनला जावून आलो. मी पक्षनेत्यांना विचारल की हा विषय कधी पर्यंत चालणार आहे. योगेश बहलांच भाषण मी ऑनलाईन बघत बघत गेलो. संदिप वाघेरेच बघीतल असे सगळयांचे भाषण ऐकत ऐकत ऐकत आलो. या विषयाच्या संदर्भामध्ये खरतर मी बोलण गरजेच होतं. एखादया विषयावर मत मलाही मांडायच होतं. पीजी इन्स्टिटयूटच्या संदर्भामध्ये सगळयांनी मनसोक्त भाषण केली. खरतर आपल्याला एखादया विषयाच किती महत्व असायला पाहीजे. खरतर तुम्ही सगळे वर्षानुवर्ष राजकारण करताय. आपल्याला माहीती आहे की इथे डी.वाय.पाटीलांची मेडीकल कॉलेज आहे. आपल्यालाही माहीती आहे की डी.वाय.पाटील असेल, एमआयडीसी आहे यांचे कॉलेजस इथे आहेत, भारतीय विदयापिठ आहे. यांना पीजी इन्स्टिटयूट मिळवण्यासाठी शिक्षणसम्राट म्हणून काय कराव लागतय खरतर हे मी सांगायची गरज नाही. आपण खरतर भाग्यशाली आहोत. एवढयासाठी भाग्यशाली आहोत की आपण एका महानगरपालिकेच्या दवाखान्याच रुपांतर पीजी इन्स्टिटयूटमध्ये केल खरतर आपल्याला शासन, केंद्रशासन असेल यांनी पीजी इन्स्टिटयूटची परवानगी दिली हे खरतर आपल्या शहराच भूषण आहे. मी म्हणत नाही कुठले डॉक्टर तीथ घेतले पाहीजेत कुठल्या डॉक्टरांनी काय केल पाहीजे हा माझा विषय नाही. म्हणजे आज जे वायसीएममध्ये काम करणा-या त्या सगळया डॉक्टरांना पीजीच प्रोफेसर केल पाहीजे की नाही ते इलीजीबल असतीलतर शंभर टक्के केल पाहीजे. पण कधी कधी एक लक्षात ठेवा आपण आठवा आपला इतीहास. आम्हीतर त्यावेळेस सत्तेमध्ये नव्हतो या महापालिकेत. आमच या राज्यामध्ये सरकारही नव्हतना. श्रीकर परदेशींच्या डोक्यामध्ये एक गोष्ट निश्चित आली या शहरामधल्या वायसीएमच्या हॉस्पिटल मध्ये पीजी इन्स्टिटयूट असली पाहीजे. त्यामुळे पंडीतांचा विषयतर आमच्याही काळातला नव्हता. म्हणजे पंडीताच्या वेळेस महापालिकेत तुम्ही सत्तेत होतात. राज्यातही तुम्ही सत्तेत होता. श्रीकर परदेशी सारखा एखादा अधिकारी या शहरांच्या लोकांच आरोग्य चांगल असाव म्हणून जर एखादा निर्णय घेतोय आणि तो निर्णय मला वाटते की हार्डीकर साहेब कमीशनर जर नसतेतर, मी मनापासून सांगतो ते जर या महापालिकेत आयुक्त नसतेतर पीजी इन्स्टिटयूटचा आपला विषय झाला नसता. कुणी काहीही म्हणू दयात. म्हणजे ज्या विषयावर आपण एखाद भाषण करतो आता, प्रत्येकानी सांगीतल खरतर मी त्यावेळेसचही सांगतो म्हणजे माझ बोलण होण्या अगोदरचही सांगतो पीजी इन्स्टिटयूटच्या भरतीमध्ये कसल्याही पध्दतीचा भ्रष्टाचार असेलतर,

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्यालाही विनंती करतो लोकांच्या मनामध्ये कुठलीही भरती म्हणली की, प्रमोशन म्हणल की आर्थीक देवाण-घेवाण येते अस वाटते. ज्या ज्या सन्माननीयांनी याठिकाणी भाषण केल की पीजी इन्स्टिटयूटच्या संदर्भामध्ये एकाही डॉक्टरकडून एकही पैसा कुणीजर घेतला असेलतर त्याला ताबडतोब बेडया टाकल्या पाहीजेत त्याची चौकशी केली पाहीजे. मा.योगेश बहल आज इथे नाहीत मी त्यांचही भाषण ऐकत होतो. खरतर होतय ते सत्य आहे, वायसीएम हॉस्पिटल हे कुरण असं म्हणल जात कुरण. एवढयासाठी कुरण की तुम्ही सांगीतल अय्यरच आणि त्यांचे भांडण, यांच भांडण त्यांच भांडण असं व्हायच. म्हणजे ही परिस्थिती आहे लक्षात ठेवा. म्हणजे ही खरेदी विक्री प्रक्रीया ज्याच्याकडून चालते, सन्मा.योगेशभाई इथ नाहीत खरतर ते असायला पाहीजे होते. मला माहीती आहे की अशाच पध्दतीच भ्रष्टाचाराच प्रकरण ज्यावेळेस आता पाच ते सहा महीन्यापुर्वी ज्यावेळेस या महानगरपालिकेमध्ये व्हेन्टीलेटर दिले जात होते ते निकृष्ठ दर्जाचे होते आणि हेच वायसीएमचे अधिकारी त्याला विरोध करत होते म्हणून ते करप्शन झालेत का, वाईट आहेत का लक्षात ठेवा. सिमाताईनी त्यांच खुप परखडपणे मत व्यक्त केलं. ज्यावेळेस त्यांनी सांगीतल की रॉयवर अन्याय झाला. मला वाटते की मागच्या मिटींगला मी  नव्हतो. तुम्ही तुषारच कौतूक केलं. मला असं वाटतय की जे चुकीच्या पध्दतीने करतात त्यांना आपण कधी कधी प्रोटॅक्शन देतो. आता परिस्थिती का झाली. पीजी इन्स्टिटयूटचे डॉक्टर म्हणजे पाहूणे झाले. माझी सगळया सन्मा.सदस्यांना विनंती आहे, भाऊसाहेब तुम्हांला पण माझी विनंती आहे कारण तुम्ही या सभागृहात आठ्ठावीस वर्षे काढलेत, माझी तुम्हांला विनंती आहे आपण वायसीएममध्ये कधीतरी चक्कर मारली पाहीजे, बघीतल पाहीजे. आपण ज्या पध्दतीने म्हणतो आपले डॉक्टर अरे, आपलेतर ते पण आहेतना. अशाच पध्दतीची ज्यावेळेस पहीली कोरोनाची महासभा झाली, या सभेचा मागचा कार्यवृत्तांत जर बघीतलातर देवदूत म्हणत होतोना आपण. ते रुग्णांचा जीव वाचवण्याचे काम करतात त्यांना देवदूत म्हणत होतो आज ते राक्षस कसे झाले हो. या सभागृहामध्ये अनेक नगरसदस्य असे आहेत ते कोरोना पॉझिटीव्ह झालेत, दुर्दैवाने दोघांचा मृत्यु झाला. पण अनेक आपले सन्मा.सदस्य पॉझिटीव्ह झाल्यानंतर वायसीएमच्याच डॉक्टरकडून आपली ट्रिटमेंट फॉलो करत होतेना. सुर्दैवाने ती मला घ्यायची नाही गरज पडली. परंतु सर्व सन्मा.विचारत डॉक्टर आज कुठली गोळी घेवू, कुठला कुठला प्रोटोकॉल मी करु त्यामुळ ते डॉक्टर चांगले होते.

कधी कधी आपण म्हणतो की एखादा निगेटीव्हचा सुर काढायला आपण सुरवात केली, भाऊसाहेब मला प्रामाणिकपणाने एक गोष्ट सांगायची कधी कधी पंडीतच्या बद्दलही काही अनुदगार काढले गेले. परंतु दुर्दैवाने मला असं वाटते की पंडीत सारखा एखादा चांगला माणुस म्हणजे वाबळे साहेबांची शैक्षणिक अर्हता काय आहे की नाही त्यांना डॉ.लहाने साहेबांनी कस सिलेक्ट केलं या सिलेक्शन प्रक्रीयेमध्ये मी नाही. खरतर हा विषय, ही प्रक्रीया राबवण्याच्या अगोदर व्हायला पाहीजे होत असं माझ प्रामाणिक मत आहे. म्हणजे मी कधी कधी प्रवाहाच्या विरोधामध्ये लढणारा कार्यकर्ता आहे. जे चुकीच आहे ते चुकीच आहे जे बरोबर आहे ते बरोबर आहे. आज वायसीएममध्ये गेल्या मार्च पासून आजची परिस्थितीजर आपण बघीतलीतर दहा हजार रुग्णांनी तीथ ॲडमीशन घेतलेलं आहे. आणि आजची परिस्थिती आपण जेव्हा कोव्हीड केल होत, बालेवाडीला केलं, इंदिरा कॉलेजला केलं, पिंपरी चिंचवड कॉलेजला केलं, घुरकुलला केल याठिकाणी कुठले पेशंट आहेत ज्याना सिम्टन काहीच नाहीत. असे असिम्टन पेशंट की ज्यांना लक्षण काहीच नाहीत पण पॉझिटीव्ह आहेत. वायसीएममध्ये कुठले पेशंट आहेत हो, जे क्रिटीकल पेशंट आहेत, ज्यांना व्हेन्टीलेटरची गरज आहे, ज्यांना ऑक्सिजनची गरज आहे आणि आपण ज्यावेळेस सन्मा.सदस्य म्हणतो की माझा पेशंट आहे, माझा नातेवाईक आहे त्याला मला लगेच व्हेन्टीलेटर मिळाला पाहीजे, त्याला आयसीयू मिळाला पाहीजे. भाऊसाहेब आजची परिस्थितीजर या महापालिकेच्या वायसीएमची बघीतलीतर आपले शंभर आयसीयू असतील, शंभरच्या शंभर आज बुक आहेत. जेवढे बेड आयसीयूचे आहेत तीथ शंभर शंभर पेशंटच वेटींग आहे आज. मी असं म्हणणार नाही की दुर्दैव आपल आहे, एवढी मोठी मानसीकता एवढी मोठी भयानक परिस्थिती या राज्यावर येईल, आपल्या महापालिकेवर येईल वाटल नाही नाहीतर अजून चार आयसीयूचे, चार ऑक्सिजन बेडचे आपण मोठे वॉर्ड केले असते. म्हणजे शंभर पेशंटच ज्यावेळेस वेटींग असतं आणि आपण सन्माननीय म्हणतो की माझा पेशंट लगेच आयसीयूमध्ये घेतला नाहीसतर बघ नाहीतर तुला ठोकून काढीन ही परिस्थिती येते त्यावेळेस तो डॉक्टर काय विचार करतो, ही परिस्थिती जेव्हा येते एखादया पेशंटच आयसीयूच कनेक्शन काढायच आणि सन्माननीयांच करायच. कालचा तुमचा ज्यावेळेस विषय होता मी त्यावेळेस माहीती घेतली लक्षात ठेवा. आपल्या पक्षनेत्यांनी सांगीतल चुकीच्या पध्दतीने जो डॉक्टर वागतो त्याला शिक्षा मिळाली पाहीजे की नाहीतर शंभर टक्के मिळाली पाहीजे. मग

तो कोण होता डॉक्टर, वायसीएमचातर नव्हताना. आज ज्या पध्दतीनं तुम्हांला कदाचित माहीती आहे की एखादी गोष्ट प्रसिध्दीच्यासाठी बोलतो लक्षात ठेवा. पण मागच्या पंधरा वीस दिवसापुर्वीची घटना आपल्या सगळयांना माहीती आहे म्हणजे संदिप वाघेरेचा उल्लेख केला संदिप चुकीचा आहे की बरोबर आहे ते नाही. पण जे डॉक्टर आज वर्षानुवर्ष तीथे काम करतात ते डॉक्टर तीथे आहेतचना. आज वायसीएम मधल्या जवळपास पावणेदोनशे डॉक्टर पैकी महापालिकेमध्ये आपले पंधरा-वीस वर्षे काम करणारे फक्त सतरा डॉक्टर आहेत. आणि उरलेले जे डॉक्टर आहेत १६०-१५० काय आहेत म्हणजे आकडा मला माहीती नाही तुम्ही घ्या. माझी तुम्हांला विनंती आहे की ते डॉक्टर आपल्या जीवाच रान लोकांच आयुष्य वाचवण्यासाठी त्याठिकाणी करतात. डॉ.गोफणेना कोरोना झाला आपण सगळयांनी सहानुभूतीन म्हणल पाहीजे की ते त्यातून बरे झाले पाहीजे त्यांना आशक्तपणा आला तो दुर झाला पाहीजे. भाऊसाहेब, दहा-पंधरा डॉक्टर आता तीथले पॉझिटीव्ह आहेत लक्षा ठेवा. आयुक्त साहेब माझा आरोप आहे मी तुम्हांलाही फोनवर बोललो होतो जे डॉक्टर त्याठिकाणी कोरोनाच्या लोकांची सेवा करतात ते पॉझिटीव्ह होतात भाऊसाहेब, ते परमनन्ट नाही म्हणून त्यांचा इन्शुरन्स सुध्दा नाही हो. त्यांना एखादया हॉस्पिटलमध्ये जर जाव लागलतर त्यांनी मला ज्यावेळेस बैठक झाली दोन आमदार होते, नामदेवराव होते, मा.महापौर होते त्या डॉक्टर लोकांनी सांगीतल साहेब, आमचा एक बेड शिल्लक ठेवा. जर आमच्या पैकी कोणी पॉझिटीव्ह आलतर आम्हांला तीथ बेड नाही. त्यांना इन्शुरन्स सुध्दा नाही. दुस-या हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट सुध्दा घेवू शकत नाहीत. ही जर परिस्थिती जे योध्दे आपण म्हणल होत, यांनाच आपण योध्दे म्हणल होतना. म्हणजे योध्दयांच्या संदर्भामधली जर ही परिस्थिती आहे लक्षात ठेवा. त्या डॉक्टरांना परमनन्ट करायच का नाही करायच हा मुद्दा सभागृहच घेईल. परंतु माझी या निमीत्तान मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की जे डॉक्टर स्वतःच हॉस्पिटल बघतात त्यांना घेवूच नका. त्यांना सांगा तुझ हॉस्पिटल चालव. परंतु जे डॉक्टर स्वतःचे हॉस्पिटल सोडून, स्वतःची प्रॅक्टीस सोडून देवून म्हणजे लाख किंवा दिड लाख पगार असेल, एखादया प्रायव्हेटमध्ये जावा किती घेतो पैसे बघा म्हणजे अशी जर परिस्थिती आहे तर माझी तुम्हांला विनंती आहे की एखादयाने आपल्याला चांगली सेवा दिली तर चांगल म्हणायला शिका. वाईट दिलीतर शंभर टक्के वाईट म्हणा. परंतु त्यांच्या बद्दलच अनुदगार या सभागृहाच्या मधुन काढणं आणि त्यांना आपण मागच्या दोन

महीन्यापुर्वी योध्दे म्हणतो, त्यांना आपल्या लोकांचे जीवरक्षक म्हणतो ते जर आज अशा पध्दतीने वागतात तर मा.महापौर साहेब मला विनंती करायची आहे की आपण निर्णय या शहराच्या भल्यासाठी करा. उदया कदाचित मी असं म्हणणार नाही म्हणजे अशा पध्दतीची अवहेलना, अशा पध्दतीचा अपमान जे डॉक्टर खरतर स्वत:चा जीव धोक्यामध्ये घालून करतात त्यांना जर उदया वाटल की या महापालिकेमध्ये आमच्या कामाची कदरच नसेल, कधी कधी लक्षात ठेवा एखादे दोन डॉक्टर इकड येत असेल म्हणजे भाऊसाहेब भोईर कोण आहेत हे माहीती नाही त्या डॉक्टरांना. कारण की ते या राजकारणात कधी पडत नाहीत. आपण कुठल्या राजकारणामध्ये पडतो जो डॉक्टर सन्मा.पदाधिका-यांच्याकड जातोय, जो डॉक्टर महापौरांकड जातोय, जो नाना काटेंकडे जातोय अशा डॉक्टरांची आपण बाजू घेतो परंतु जे अविरतपणे आपल्या आयुष्याच त्याठिकाणी आज काय होईल, उदया काय होईल याचा खरतर भरवसा नाही अशा डॉक्टरांनाही कधीतरी आपण बघीतल पाहीजे. म्हणजे कुणीतरी सन्माननीयांनी सांगीतल की पॅरामेडीकलचा स्टाफ असेल, तीथले ॲम्ब्युलन्सवाले असतील ते ॲम्ब्युलन्सचे बीचारे कर्मचारी कोवीडचा पेशंट घेवून त्याठिकाणी लोकांना घेवून जातात. खरतर आपली भुमीका काय असली पाहीजे ज्यांनी ज्यांनी कोवीडच्यामध्ये आपल्या जीवाच रान केलं तुम्ही म्हणल दाखवणारा कोण आहे, दिसणारा कोण आहे म्हणजे वायसीएममधला जो आपला १५० जणांचा स्टाफ आहे म्हणजे जुना असेल, नवीन असेल म्हणजे कधी कधी माझ्या पार्टीत अशीच परिस्थिती होते म्हणजे जुने काय करतात आणि नवीन काय करतात भेदभाव लक्षात ठेवा. कधी कधी अशा योध्दाच्या काळामध्ये आपण भेदभाव विसरला गेला पाहीजे. जे काम करतात त्यांची अटेंडन्स बघा, त्यांच शेडयुल बघा म्हणजे आपल्याला अभिमान एका गोष्टीचा वाटला पाहीजे की आपल्याच हॉस्पिटलमध्ये वायसीएमच्या माध्यमातून आपला मृत्यूदर बघीतलातर राज्यामध्ये सगळयात कमी आहे भाऊसाहेब, सगळयात कमी. त्या दिवशी सांगीतले ४१ पेशंट गेले म्हणजे कर्म-धर्म सहयोगान ऑक्सिजनची कमतरता होती ही त्यांची जबाबदारी नव्हती लक्षात ठेवा म्हणजे आपली जबाबदारी होती त्यांना ऑक्सिजनचे सिलेंडर वेळेमध्ये पुरवले असतेतर. आज अनेक पेशंट असे आहेत त्याठिकाणी त्यांना जर आयसीयू मिळाला, ऑक्सिजन बेड मिळाला तर अनेक पेशंटचा जीव सुध्दा वाचवू शकतो ही परिस्थिती आहे लक्षात ठेवा. म्हणजे आपल्याला लोकांना फॅसिलीटी निर्माण करुन दयायच्या आहेत. ते काम करायला तयार आहेत लक्षात

ठेवा. आणि अभिमानान एका गोष्टीच वाटतय की पिंपरी चिंचवड महापालिकेचा यशवंतराव चव्हाण आपली जी पीजी इन्स्टिटयूट व्हॅक्सीनच्या मध्ये भाऊसाहेब आपल्या महापालिकेच नाव तुम्ही जर वेबसाईडजर चेक केलीतर ऑक्सफर्ड विदयापिठाची सिरमची तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच नाव एक नंबरला आहे लक्षात ठेवा. ज्यावेळेस आपण एखादयावर आरोप करतो माझी मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे म्हणजे हा विषय करायचा का नाही करायचा या विषयाच काय करायच, भाऊसाहेब माझी तुम्हांला विनंती आहे, नाना तुम्हांला पण, राहूल कलाटे इथे आहेत, नामदेवराव इथे आहेत. आपण वस्तुस्थिती कधीतरी बघा. आज खरच त्या डॉक्टरांची जर शहराला खरच गरज नसेलतर मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की त्याही बीचा-यांना आत्मसन्मान आहे. प्रत्येकाचा आत्मसन्मान दुखावला जातो. आपण एखादयाला ज्यावेळेस रोज आरोपीच्या पिंज-यामध्ये उभा केला जातो माझी मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की त्यांनाही आत्मसन्मान आहे. त्यांना ज्या पध्दतीन तुम्ही आपण योध्दे म्हणतो आणि आज त्यांना आपण अशा पध्दतीचे लांच्छंनास्पद बोलतो. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे, अध्यक्ष तो जो डॉक्टर तुम्हांला भेटला मी ज्यावेळेस माहीती घेतली तो तालेराचा डॉक्टर होता. त्याच नाव मला माहीती आहे पण मी आज तुम्हांला नाही सांगणार लक्षात ठेवा. पण एक गोष्ट लक्षात ठेवा की तीथल्या सगळया भरती प्रक्रीयेची सीबीआय असेल, सीआयडी असेल ती चौकशी झाली पाहीजे. एकदाच दुधका दुध, पानी का पानी करा साहेब. आणि खरच आपल्याला गरज नसेल......

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** नेते तुम्ही बोला.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सगळया पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी वायसीएममध्ये पाच तास दयावेत, तीथली परिस्थिती बघावी, तीथल वातावरण बघाव. खरच हे काम करतात का काय करतात, खर कुणाच काय म्हणण आहे हे बघाव आणि मा.महापालिकेच्या सभागृहासमोर हा विषय आणावा आणि त्यावेळीच या विषयाच्या संदर्भामध्ये निर्णय करावा एवढीच आपल्याला विनंती करतो, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर हा विषय फक्त यशवंतराव चव्हाण स्मृती हॉस्पिटलची पीजी इन्स्टिटयूट केलेली आहे. कुठेतरी श्रीकर परदेशी साहेबांनी तो प्रयत्न केला आणि आपल्या इथ हार्डीकर साहेबांनी त्याला मुर्तरुप दिलं. खरतर विषय हा आहे पण हा असताना सर्वानी आपआपली मत मांडली. कुणी कोवीडमध्ये काय झालं. पुढ काय झाल हे सगळ मांडत असताना आयुक्त साहेब एकच गोष्ट आपल्याला लक्षात घ्यायची एवढी सगळी चर्चा झाल्यानंतर. प्रत्येक सदस्यांनी आपआपल सांगीतल की साहेब, हे झाल पाहीजे, हे नाही झाल पाहीजे. ताईनी सांगीतल की जे डॉक्टर तुमच्याकडे इन्टरव्हयूवला आले होते त्या डॉक्टरांचे कांहीचे बाहेर हॉस्पिटल्स आहेत त्याचा कुठेही उल्लेख तुमच्या याच्यात नाही. त्यानंतर त्यात वयाची अट नाही. त्यानंतर त्यात जे १७ जूने डॉक्टर्स होते तर साहेब, ते पाच डॉक्टर ठेवण्यापेक्षा तुम्ही कुठतरी त्यांनाही सामावुन घ्या. म्हणजे प्रत्येक जणांनी काहीना काहीतरी आपल्याला जे जे वाटल ते प्रत्येकांनी याठिकाणी मांडल आहे पण साहेब, याला कुठतरी शंका यायला कारण असं आहे की तुम्ही परत कॅव्हेट दाखल केलं. म्हणजे कुठेतरी आपण चुकत नाहीतना. मग आपण कॅव्हेट का दाखल केलं. म्हणजे आज जो या सभागृहात ऊहापोह झाला तो का झाला. आम्ही याच पुर्ण क्रेडीट तुम्हांला देतो. तुमच्यामुळ पीजी इन्स्टिटयूट आमच्या शहराला लाभतय. खुप कमी गव्हर्मेंट पीजी इन्स्टिटयूट आहे. ९५० फक्त गव्हर्मेंट सिटस आहेत आणि तशा पाहीला गेलतर २३ हजार महाराष्ट्रातले म्हणजे कुठेतरी आपण महाराष्ट्रातल्या बोटावर मोजण्याएवढया संस्थेमध्ये आपला समावेश होईल. म्हणजे जसं एकनाथरावानी सांगीतल मोठमोठया संस्था पीजी इन्स्टिटयूटसाठी प्रयत्न करतात. पण साहेब आरोप का झाले. म्हणजे कुठेतरी हे डॉकेट वाचलतर याच्यात त्याची सत्यता दिसते. म्हणजे तुम्ही याच्यात काय म्हणल आहे उमेदवारांची कागदपत्राची छाननी व मौखिक मुलाखती घेवून शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव इ.बाबी विचारात घेवून निवड समितीने उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, प्रकाशने, अनुभव, विषयातील ज्ञान म्हणजे साहेब हे एवढ विहीत आहे म्हणजे कुठेतरी याच्यात तुम्ही म्हणल असतना आपण सीईटीच्या एक्झाम पाहतो, आपण जेईच्या एक्झाम पाहतो तर त्या लेव्हलला तुम्ही एक एक्झाम घेतली असतीतर कुणाला आरोप-प्रत्यारोप करण्याची संधी पण मिळाली नसती. कारण की हे सभागृह आहे एकनाथराव आपण पण

कुठतरी समजुन घेतल पाहीजे. म्हणजे आज सभागृहात असं वाटत होत की एकनाथराव एकटेच सत्तेत आणि सगळे विरोधात. का असं झाल, म्हणजे कुठेतरी ज्यांनी त्यांनी आपली बाजू मांडली एकनाथराव कुणी याला विरोध केला नाही, कुणी करा म्हणल नाही, कुणी करु नका म्हणल नाही. याच्यातन जो निर्णय घ्यायचा तो साहेब, आपण घ्यायचा आहे. शहराला पीजी इन्स्टिटयूटची गरज आहे का तर आहे. या शहरात सगळयांनी योगदान दिल का तर दिलय. पण ते देत असताना आपण जुने आणि नवे यांचा समन्वय घालण्याच काम साहेब तुमच आहे. जस सांगीतल चार पाच वर्षापासून साळवे आणि रॉय हा वाद होताचना आणि आता डॉ. वाबळे झालेत. यांच्यावर सगळयांचा आक्षेप आहे त्यांचे शैक्षणिक पात्रता नाही ती तुम्ही सिध्द करानां. मला त्यांचा अनुभव चांगला आहे. योगेशजीना वाईट आहे. प्रत्येकाला प्रत्येक माणसाचा अनुभव वेगळा येवू शकतो. तोही माणुस आहे शंभर टक्के कुणालाही न्याय देवू शकत नाही. एकाचा फोन उचललातर एकाचा नाही उचलला. आता कालची घटना सांगवीच कोणतरी ॲडमीट होतं, नाही फोन उचलला. मी लावला माझ्या बरोबरच्या आठ दहा जणांनी लावला कुणाचाच नाही उचलला. आम्ही संतोष पाटील यांना सांगीतला संतोष पाटील साहेबांनी त्यांना सांगीतल आणि मग आम्ही त्या ढोरेंच नाव त्यांना फॉरवर्ड केलं. म्हणजे प्रत्येक गोष्टींची तक्रार करत बसतो, साहेब आता झालय काय व्यक्त व्हायला नगरसेवकाना पण मॅसेज नाही आणि प्रत्येकजण इथ स्वत:ची काम घेवून येत नाही. त्यांना पण आपआपल्या भागात, आपआपल्या ऐरीयात, आपआपल्या मतदारांना उत्तर दयायच आहे. ते देत असताना त्यालाही वाटल पाहीजे की माझ्या भागासाठी पोटतीडकीने तुमच्या समोर मांडतो. ठिक आहे त्याचा मार्ग चुकत असेल, मार्ग चुकत असेलतर नामदेवरावांच पण काम होतं पक्षनेता म्हणुन. ज्या दिवशी तुम्ही डॉकेट फायनल करता, एवढा मोठा विषय आहे. जसं आता एकनाथरावानी सांगीतल कधी तुम्ही त्यांची मिटींग घेतली कधी तुम्हांला विश्वासात घेतलं. साहेब, तुम्ही चांगल करता आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तुमची पुर्ण टीम आम्ही प्रत्येक याच कौतूकच करतो, इतक कोवीडमध्ये तुम्ही पळाले आज महाराष्ट्रात आपल नाव निघत आता सांगीतल सिरमच्या इन्स्टिटयूटच्या वेबसाईडवर पहील्यांदा तीसरी टेस्ट आपल्या वायसीएमला होती म्हणजे कुठेतरी हा पण लौकीकाचाच भाग आहे आणि आज नाही म्हणजे एक मागच्या दहा-पंधरा वर्षापुर्वी जेव्हा माणसाला ससुणला न्यायचे तर तो म्हणतो मला ससुणला नका नेऊ, मला वायसीएमला न्या. तुम्ही मावळ,

अंबेगाव, खेड या भागात गेलेतर त्यांचा प्रेफरन्स कोण असतो ते म्हणतात आम्हांला वायसीएमला जायच. आपली लोक निरधास्त आहेत म्हणजे आज पहील्यांदा असं झाल दोन तीन महीन्यापुर्वी प्रायव्हेटला जाणारा मला शिंदेचा फोन आला मला पवनाला दया मी म्हणालो पवनाला नको तुम्ही वायसीएमला जा मी तीथ देतो. मी तीथ गेलो, डॉ.वाबळेना घेतलं, विनायकला घेतल आम्ही वॉर्डमध्ये गेलो आम्ही त्या दोन्ही आजीना समजून सांगीतल की तुम्ही जावु नका तुम्ही इथेच रहा. नंतर तीन दिवसात त्यांना डिस्चार्ज दिला. म्हणजे सिस्टीमबद्दल कोणीही वाईट बोलल नाही एकनाथराव तुम्ही का मनाला लावून घेतल हेच कळल नाही. प्रत्येकानी आपआपल मत व्यक्त केल की मला असं वाटत. याच्यातन साहेबांनी काय घ्यायच ते साहेब घेतीलना. आता संदिपचा विषय, तुम्ही पण घाई केली ना. म्हणजे तो त्याठिकाणी का गेला, कशासाठी गेला. मला डॉक्टरांचा फोन आला की तुम्ही संदिपला सांगा इथ व्हायरल लोढ जास्त आहे तुम्ही सारख सारख येवू नका. मी त्याला फोन केला. मी म्हणल तु कशाला जिजामाता आणि वायसीएमला जातो. तो कुणासाठी जातो होतय काय तो वॉर्ड मधला माणुस तो मुलगा चार वेळा फोन केला की आपल्याला रहावत नाही आपण विसरुन जातो. आपण त्याठिकाणी बाऊन्सर ठेवले बांऊन्सर ठेवायलाच नाही पाहीजे. तुम्ही सरळ दोन पोलीस तीथे आणा. बाऊन्सर आणलेतर मारामारी होणार आहे. आज प्रायव्हेट सिक्युरीटी घेतात पोलीसांचे दोन हवालदार घेतात काय करतात त्याचे पण सीटीला पैसे भरतात प्रायव्हेट लोक आणि दोन पोलीस घेतात त्या धरतीवर आपण वायसीएमला एक चौकी तीथ लागलीतरी मानसीकता असते कोण कोणाला भांडायला जात नाही. त्यावेळेचा तो तेवढयापुरता राग असतो. पाच मिनीटानी तो त्याच्या घरी जातो आपण आपल्या घरी जातो. पण त्याठिकाणी तो आलेला राग ती वस्तुस्थिती पाहील्यानंतर मग तो शांत होतो. आम्ही गेलोतर बाऊन्सरनी आडवलतर साहजीकच आहे. बाऊन्सरला आपण उलटा प्रश्न विचारणार का आडवतो. हे पोलीसांनी आम्हांला आडवलतर आम्ही आयडी दाखवू, बाबा, मला आयडी आहे मी नगरसेवक आहे. तुम्हांला आज विषय करायचा किंवा नाही करायचा तर नका करु. समजा आता डॉ.वाबळेचा प्रश्न आहे. यांच्यामते त्यांची शैक्षणिक अर्हता नाही तुम्ही चेक करानां. तुम्ही त्याची शहानिशा करा. कधी कधी शिक्षण कमी आणि अनुभव मोठा असतो. तुम्ही कन्व्हेनिअन्स केलतर आम्ही कन्व्हेनिअन्स होवूना, का नाही कन्व्हेनिअन्स होणार. पण साहेब ही जी प्रक्रीया राबवत असताना कुठतरी

आपल्याकडन घाईगडबड झाली, घाईगडबही म्हणता येणार नाही ही बैठक पण तहकूब झाली होती. म्हणजे नामदेवराव तुम्ही जेव्हा अजेन्डा बनवताना याच्या अगोदर डॉ.साळवे सरांनी याच एक्सप्लेशन दिलना माझ असं मत आहे साळवे साहेबांना एक्सप्लेशन न देता पक्षनेत्यांना दयायला लावा. अजेन्डा फायनल केलाना की तुम्ही नगरसचिवाना बोलवतात, सगळयांना बोलवतात तुम्ही एकत्र बसता मग तुम्ही अजेंडा फायनल करता. मग तुम्हांला याची माहीती पाहीजेना आपण ज्यावेळेस सभागृहात येतो एखादा विषय असेलतर आपण त्या त्या अधिका-यांना फोन करतो. त्यांचे डॉक्युमेंट विचारतो काय आहे काय नाही. आपल्याला त्याच काही कळल नाहीतर त्याचा अभ्यास करतो आणि मग आपण याठिकाणी उभे रहातो. मग तुम्हीतर अधिकारी आहात, तुमची रिस्पॉन्सिबीलीटी आहे दिलेल्या प्रश्नाला उत्तर दयायची. हा तुमचा कायदाच आहेना की लोकप्रतिनीधीने विचारलेल्या प्रश्नाला तुम्हांला उत्तर दयायच आहे आम्ही काही आमच्यासाठी विचारत नाहीत. आमच्या वॉर्डात जे आहेत त्यांच प्रतिनीधीत्व आम्ही करतो. पण हे करत असताना जर एखादा प्रश्न विचारलातर राग यायच तुम्हांला काहीच कारण नाही, बिलकूल कारण नाही. म्हणजे कुठेतरी एकनाथराव तुम्ही अर्धवट ऐकूण यायच आणि एकतर्फी बाजू घ्यायची. इथ आम्हांला कुणाचीही बाजू घ्यायची नाही. तुम्ही सर्वजण कोव्हीडमध्ये चांगल काम करता याच्याबद्दल कुणाचही दुमत नाही. आज शेंडगेताईना नाही तस म्हणत आपण चार तास सभागृहात बसलोतर दोन तास त्याच बोलल्या. सुरवात त्यांनी खोदाई वरुन केली, मलाही बोलायच होतं. मी येताना काळेवाडीला खोदाई चालू होती. १५ ऑक्टोबर पर्यंत त्याला बॅन आहे मग आता का खोदता. तसा तुमचा जीआरच आहेना १५ मे ते १५ ऑक्टोबर पर्यंत कुठ खोदाईच करायची नाही. मग तुम्ही ही खोदाई का करतात. कशी काय परवानगी दिली. म्हणजे साहेब हे का होतय तुमच्यामुळ सगळ झाकुण चालल. असं नाही व्हायला पाहीजे तुम्ही ज्याची त्याची जबाबदारी निश्चित करा म्हणजे उदया काही झालना तर त्याला धरता येईल, की ही तुझी जबाबदारी आहे तु का याला परवानगी दिली. म्हणजे एका बाजूला आपण कायदयाच उल्लंघनतर करतोच आहेत. १५ मे ते १५ ऑक्टोबर कुठच खोदायच नाही. वर्षानूवर्षाची ही पध्दत आहे बघा. प्रत्येक ठिकाणी तेच आहे. शिक्षणमंडळात जा तेच ठेकेदार, वायसीएमला जा तेच ठेकेदार, तरी तुम्ही ब-याच ठिकाणी सक्सेस झालेला आहात अजीत पवार साहेबांची इच्छा नसलीतरी तुम्ही सक्सेस झालात. म्हणजे हे कुठतरी बदलल पाहीजे. तीस तीस

वर्षाची ही काही मक्तेदारी नाही यांची. तुम्ही आम्ही इथ येतो किती मानधन घेतो आपण. कराना कॉम्पेटेशन तुम्ही दोन पैसे महापालिकेचे वाचतील. इथ आलेल्या प्रत्येक नगरसेवकांना कुठना कुठतरी उत्तर दयायच आहे आणि ही देण्याची वेळ आली म्हणूनतर आता सगळे बोलायला लागलेत. प्रत्येकानी आरोप केलेत मगा संदिप म्हणला टिंब टिंब, अरे, काय टिंब टिंब. नाव घेवून सांग. ही एवढी मोठी प्रक्रीया आहे याच्यामध्ये प्रत्येकाची शंका आहे की आर्थीक देवानघेवान झाली ठिक आहे झालीतर तु प्रुफ दे. प्रुफ देवून बोल. आरोप करणं आमच काम आहे. आज सभागृहात आम्हीच नाहीतर आज सगळेच विरोधीपक्षनेते झालेत. आता काय झाल इलेक्शन जवळ आलय नेमकी आता नामदेवरावांची अडचण आहे. हा चेष्टेचा विषय बाजुला ठेवू साहेब हा विषय सिरीअस आहे. कोरोनामध्ये तुम्ही सगळे चांगल काम करता. एकनाथराव पॉझिटीव्ह अँगलने या सगळया गोष्टी घेतल्यातर त्यातली काही बरेचसी आहे भांडारची खरेदी असेल, नितीन काळजे यांनी पण सांगीतल की अधिकारी फोन उचलत नाहीत. ती छिडछिड येणं साहजीकच आहे पण चार पाच वेळा झाल्यानंतर कम्प्लेन्ट करावी या मताचा मी आहे. तुम्ही पीपीई किट घालता कितीवेळा फोन उचलणार तुमचे. तो पीपीई किट घालून असेलतर तुमचा फोनच घेवू शकत नाही पुढचे तीन तास. हा, परत तीन तासान तो फोन रिव्हर्स येणं ही प्रत्येकाची अपेक्षा आहे आणि तो फोन आला पाहीजे. साहेब, जसे प्रॉम्प्ट आहेत तसे सगळेजर राहीलेतर निश्चित या भरती प्रक्रीयेला कोणाचाच विरोध नाही. ही भरती झाली पाहीजे. या भरती प्रक्रीयेत जो सगळयाच्या मनात शक तयार झाला याची शंका निरसन आयुक्त साहेब तुम्ही करा आणि या भरती प्रक्रीयेच्या आडून कुणी दुकानदारी करु नये आणि मला वाटत नाही कोण करतील. एकनाथराव तुम्हीच मनाला का लावून घेतल मगतर अजून शंका येते. हे होत असताना आज तुम्ही सर्वजण जे काम करता म्हणजे श्रीकर परदेशीनी जी सुरवात केली त्याला मुर्तरुप तुम्ही दिलं आणि अशा गोष्टीला साक्षीदार व्हायला आम्हांला मिळतय. पण हे होत असताना कुठेतरी बदनामी न तुम्हांला यावी, नाही सभागृहाला यावी याची आपण सर्वजण काळजी घ्या. हे जे डॉक्टर्स आहेत यांच बॅलेन्स आपल्याकडन करणं आम्हांला अपेक्षीत आहे तुम्ही इथून गेलेना मग वाटत नाही कुणाचच ते ऐकतील. आता आहेत तोपर्यंत थोड ऐकतील. नाहीतर नंतर असं उलट नको व्हायला त्यांची भुमीका आमच्यात आणि आमची भुमीका त्यांच्यात. याच्यामध्ये साहेब तुम्हांला अजून काही अमेन्डमेंट करता आलीतर करा, जेणेकरुन कुणालाच शक येण्याच

राहणार नाही, संशय येण्याच राहणार नाही. उपमहापौर, तुषार हिंगेनी जी उपसूचना दिली, आज जर तुम्ही विषय तहकूब करणार असाल, फेटाळणार असालतर तुम्ही आयुक्तांशी चर्चा करा. परंतु तुम्ही हा विषय करणार नसालतर घंटागाडी, स्टाफनर्स, ॲम्बूलन्स ड्रायव्हर, लॅबटेक्निशियन जे मानधनावर लोक आहेत मिनीमम पाच वर्षे आपल्याकड असणारे या लोकांना ही जी उपसूचना दिली ती पुढच्या कुठल्यातरी विषयाला घ्यावी एवढी मी आपल्याला विनंती करतो आणि थांबतो.

**मा.विठ्ठल उर्फ नाना काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर गेल्या अनेक महीन्यापासून कोवीडच वातावरण आपल्या राज्यात, शहरात चालू आहे. या शहरामध्ये आणि आपल्या वायसीएम हॉस्पिटलमध्ये जे डॉक्टर्स काम करतात, खरतर कोवीडयोध्दा म्हणून आपण त्याना पहील्यांदाच गौरविल आहे. ज्या पध्दतीने सिमाताईनी सुरवातीलाच सांगीतल होत की आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये तस पाहीलतर बरेच पेशंट कमी आहेत. आयुक्त साहेब ते हॅण्डल करतात, हार्डीकर पॅटर्न संपुर्ण राज्यात राबवला पाहीजे. लॉगडावून उठल्यानंतर दिवसेंदिवस आकडा वाढत गेला, प्रशासन आपल्या पध्दतीने काम करत होतं व हे काम करत असताना आकडा वाढतच गेला तरी देखील सर्वजण चांगल काम करतात परंतु संपुर्ण शहरामध्ये, नागरीकांमध्ये भीतीच वातावरण या कोरानाच्या माध्यमातून आहे. आज आपली ही दुपारपासून चालू झालेली महासभा आणि या सभेमध्ये डॉक्टर्स बद्दल बोलणं चालू आहे, चर्चा चालू आहे. प्रत्येक नगरसेवकांना आपआपला अनुभव आलेला आहे तो अनुभव याठिकाणी सांगीतलेला आहे. हा अनुभव सांगत असताना त्यांनी काही वैयक्तीक भांडण म्हणून त्या डॉक्टर बद्दल बोलले नाहीत, ज्याला अनुभव आलेला आहे तो बोललेला आहे. एकनाथरावानी तस पाहीलतर नगरसेवकांवर आरोप केल्यासारख भाषण केलेलं आहे. डॉक्टरांना प्रत्येकजण देवा प्रमाणेच मानतो, प्रत्येकजण आपआपल्या परीने काम करतो. मला जर वाईट अनुभव आलातर नक्कीच याठिकाणी बोलल्या शिवाय राहणार नाही. परंतु आता जी डॉक्टर भरती चालली आहे त्यात नवीन आणि जुन्याची सांगड घालून व्यवस्थितरीत्या ही भरती व्हावी, याच्यामध्ये कुठलही चुकीच काम होवू नये. आम्ही विरोधी पक्षात काम करत असलोतरी चांगल काम होत असेलतर नक्कीच चांगल्या कामाला आमचा सपोर्ट राहील आणि चुकीच काम होत असेलतर नक्कीच त्याला विरोध राहील. आता हे भीतीच वातावरण असताना या डॉक्टरांचा वाद आहे

हा जनतेसमोर येवून अजून त्यांच्या समोर भीतीच वातावरण करायला नकोय. अशा परिस्थितीमध्ये आपण जो निर्णय घ्याल नक्कीच चांगला निर्णय व्हावा अशी अपेक्षा करतो आणि सर्व प्रशासनाला, डॉक्टर्सना धन्यवाद देतो. नगरसेवक जो पोटतीडकीने बोलतो तो अनुभव आलेला आहे, संदिप असेल किंवा बरेचसे नगरसेवक बोललेत मला देखील काही अनुभव आले आहेत परंतु प्रशासनावर लोढ आहे तो आम्ही समजू शकतो, रोज हजार ते बाराशे पेशंट सापडतात. आपली यंत्रणा जरी कमी पडत असलीतरी देखील आपण चांगल्या पध्दतीने काम करतात. परंतु चुकीच काम होता कामा नये आणि हा जो विषय आहे आणि याला ज्या उपसूचना दिलेल्या आहेत या उपसूचना आपल्याला जर दुस-या विषयाला घेता येत असतीलतर त्या घ्याव्यात. हा विषय तहकूब ठेवलातर पुढच्या विषयाला घ्याव्यात, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. गेल्या तीन ते चार तासा पासून सर्व नगरसेवकांनी वायसीएमच्या डॉक्टराच्या प्रती असलेल्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या. सर्वानी आपल्या भाषणामध्ये सन्मा.आयुक्त साहेबांच याठिकाणी कौतूक केलं. आयुक्त साहेबांच्या काळामध्ये या पीजी इन्स्टिटयूटला मान्यता मिळाली. यासंदर्भामध्ये सुध्दा प्रत्येकांच्या बोलण्यामध्ये त्यांच्या बद्दल कौतूक याठिकाणी केलं गेलं. साहजीक आहे प्रत्येकाला प्रत्येक डॉक्टर विषयी जो जो अनुभव आलेला आहे किंवा वायसीएम विषयी त्यांच्या मनामधील भावना याठिकाणी सर्व सदस्यांनी व्यक्त केल्या. ज्यावेळेला आयुक्तांच आपण कौतूक केलं या पीजी इन्स्टिटयूटच्या माध्यमातून डॉक्टर घडवण्याच काम देशामध्ये ही पहीली महानगरपालिका अशी असेल की त्याच्यामध्ये पोस्टग्रॅज्युएशनचे डॉक्टर याठिकाणी निर्माण होणार आहेत, अशा पध्दतीची ही पीजी इन्स्टिटयूटची मान्यता याठिकाणी मिळालेली आहे. ज्यावेळेला या इन्स्टिटयूटला मान्यता मिळाली त्यावेळेला १०४ डॉक्टरांची मंजूरी वेगवेगळया कॅटेगरीवाईज याठिकाणी त्या संस्थेच्या माध्यमातून घेण्यात येते. आयुक्तांच्या माध्यमातून जो जो डॉक्टर त्या त्या पदासाठी त्या शाखेसाठी ईलीजीबल असेल त्या संदर्भामध्ये त्याच्या मुलाखती झाल्या. त्यांची शैक्षणिक अर्हता बघुन त्याठिकाणी त्यांच सिलेक्शन झालं, असे ७४ डॉक्टर याठिकाणी सिलेक्शन झाले. परंतु ज्यावेळेला ७४ डॉक्टर याठिकाणी पीजीच्या साठी प्रोफेसर म्हणून सिलेक्शन झाले त्यावेळेला मात्र प्रत्येक्षात आपल्या या पीजी इन्स्टिटयूटमध्ये ३२ डॉक्टर याठिकाणी कार्यरत आहेत. म्हणजे ज्यावेळेला पीजी ची स्थापना झाली पीजी करत असताना आता आपल दुसर वर्षे आहे की त्या पीजीच्या

माध्यमातून नवीन डॉक्टर याठिकाणी आलेले आहेत. जवळपास ७० हून अधिक डॉक्टर त्याठिकाणी पीजी इन्स्टिटयूटच्या माध्यमातून आपल्या या रुग्णालयाला मिळालेले आहेत. जे की एमबीबीएस करुन आपआपल्या वेगवेगळया कॅटेगरीवाईज, विभागावाईज ते त्याठिकाणी एमडी किंवा एमएस वगैरे त्यांचे जे काही पदव्युत्तर शिक्षण असेल ते शिक्षण याठिकाणी घेत आहेत. वायसीएम हॉस्पिटल बद्दल विशेष करुन मी याठिकाणी अवर्जुन उल्लेख करेल की ज्या ज्या वेळेला वायसीएम हॉस्पिटलमध्ये असलेल्या डॉक्टरांच्या विषयी या कोवीडच्या संदर्भामध्ये जो काही प्रोटोकॉल आहे त्या प्रोटोकॉलच्या संदर्भामध्ये खाजगी हॉस्पिटलने सुध्दा आपण कुठला प्रोटोकॉल वापरतो अशा संदर्भामध्ये पीजीच्या डॉक्टरांना त्या ठिकाणी आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून अनेक खाजगी संस्थानी सुध्दा विचारणा केलेली आहे. मी माझा स्वत:चा अनुभव म्हणून याठिकाणी सांगतो. कारण ज्यावेळेला खाजगी इन्स्टिटयूट, खाजगी दवाखान्यामध्ये या कोवीडच्या माध्यमातून रुग्णांना त्याठिकाणी सेवा दिली जात होती. त्याच बरोबरीन जनसामान्य माणसामध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणार वायसीएम हॉस्पिटलच्या प्रती त्याठिकाणी भावना व्यक्त केल्या जात होत्या आणि टाटा मोटर्समध्ये माझे सहकारी होते की जे त्यांना खाजगी रुग्णालयामध्ये बील रिएम्बर्समेंट मिळत, त्यांना बीलाचा परतावा मिळत असताना सुध्दा त्यांनी सांगीतल की आम्हांला वायसीएम हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करा. मी त्यांना म्हणल आपल्याला काय गरज आहे आपल्याला खाजगी हॉस्पिटलच बील मिळतय परंतु त्या आमच्या सहकार्यांनी टाटा मोटर्समधील कामगारानी सांगीतल वायसीएम हॉस्पिटलमध्ये जी काही ट्रिटमेंट दिली जाते आणि वायसीएम हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांचा हातकंड बसलेला आहे त्यांनी बरेचसे पेशंट त्याठिकाणी हॅण्डल केलेले आहेत आणि म्हणून आम्हांला वायसीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करा अशाप्रकारची विनंती शहरातील अनेक भागातील नागरीकांनी कार्यकर्त्यांकडे माझ्या सारख्या नगरसेवक, पदाधिका-याकडे केली गेली. साहजीक आहे प्रत्येकाच्या बद्दल प्रत्येकाचा अनुभव हा वेगवेगळा असू शकतो. परंतु मगाशी माझ्या एका सहका-यांनी सुध्दा सांगीतल की ठाण्यावरुन आमच्या एका मित्राणी सांगीतल की वायसीएम मध्ये चांगल्या पध्दतीची ट्रिटमेंट दिली जाते. चार दोन डॉक्टरांच्या बद्दल त्यांच्या वागण्यामुळे संपुर्ण हॉस्पिटल किंवा त्याठिकाणी चालू असणारी यंत्रणा ही अतीशय खराब आहे अशाप्रकारची भावना नक्कीच सभागृहामध्ये असणा-या प्रत्येक सदस्यांच्याप्रती नसेल. परंतु सन्मा.महापौर साहेब, या वायसीएम रुग्णालयामध्ये जस एक दोन नगरसदस्यांच्या प्रती त्याठिकाणी, डॉक्टरांच्या प्रती त्याठिकाणी बोलल गेल परंतु त्यांच्या भावना त्याठिकाणी असताना, सन्मा.त्यावेळेला फोन करत असताना सन्माननीयांचा फोन त्याठिकाणी घेतला गेला नसेल, मगाशी सांगीतल्याप्रमाणे त्यांच पीपीईकीट असेल किंवा समोर

रुग्ण असेल, रुग्ण बघायचा का फोन घ्यायचा अशी अवस्था त्याठिकाणी येत असेलतर सन्माननीयांना परत उत्तर त्यांनी त्याठिकाणी दिल पाहीजे किंवा त्यांना त्याठिकाणच्या संदर्भामध्ये विचारणा करण्याचा अधिकार नक्कीच याठिकाणी सन्माननीय सर्व नगरसदस्य असतील, आमदार असतील, खासदार असतील त्याना नक्कीच याठिकाणी आहे, कारण वायसीएम हॉस्पिटल हे पिंपरी चिंचवड शहरासाठी याठिकाणी निर्माण झालेल आहे आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणा-या जनसामान्यांचा जो काही विषय असेल तो घेवूनच तो सन्माननीय किंवा ते आमदार, खासदार त्याठिकाणी आपल्या संदर्भामध्ये डॉक्टरांकडे विचारणा करतात. आपण आपल्या अध्यक्षतेखाली वायसीएम रुग्णालयामध्ये ज्यावेळेला आपली मिटींग झाली त्यावेळेला आपण आयुक्त साहेबांना सांगीतल, माजी पक्षनेत्यांनी सुध्दा सांगीतल की नवीन डॉक्टर आहेत, प्रोफेसर आहेत ते कदाचित सन्माननीयांना ओळखत नसतीलतर आपण वायसीएम हॉस्पिटलमध्ये एक जूना सर्वाना ओळखतो असा डॉक्टर त्याठिकाणी आपल्या सन्मानीयांचा किंवा आमदारांचा त्या संदर्भामध्ये त्या पेशंटच्या संदर्भामधली माहीती त्यांच्या पर्यंत पोहचवण्याच्या संदर्भामध्ये असा जुना डॉक्टर सर्वाना ओळखतो, शंका निरसन तो करु शकतो असा एक जुना अधिकारी त्याठिकाणी नेमावा. आयुक्त साहेबांना सुध्दा सांगीतल आणि येणा-या काळामध्ये आपल्याला जर आपल्या सन्मानीयांना त्यासंदर्भामध्ये नागरीकांचा तेवढा रेटा असतो, त्यांना त्याठिकाणची परिस्थिती माहीती नसते. आयसीयू किती वेटींग मध्ये आहेत, ऑक्सिजनचे बेड किती वेटींगमध्ये आहेत परंतु त्यांना सुध्दा आपल्या भागातील नागरीकांचा त्या पध्दतीने रेटा असतो, सारखा फोन असतो. मध्यंतरीच्या काळामध्ये अनेक नागरीक हे पॅनिक होवून आपल्याला कुठे बेड मिळेल का, आपल्याला व्यवस्था होईल का अशा पध्दतीच भीतीच वातावरण सुध्दा मागच्या काळामध्ये होतं आणि म्हणून कदाचित या मागच्या काळामध्ये अशाप्रकारचे प्रसंग आपल्या सन्मानीयांच्या वरती पर्यायाने त्याठिकाणी आले असतील अस मला वाटत. म्हणून सन्मा.महापौर साहेब, आपण त्या संदर्भामध्ये लवकरात लवकर जुन्या डॉक्टरांच्यापैकी एका डॉक्टरांची त्याठिकाणी नियुक्ती करा की जेणेकरुन तो डॉक्टर आपल्या सगळया सन्माननीयांना त्याठिकाणच्या आपल्या रुग्णाविषयीची संपुर्णपणाची माहीती त्याठिकाणी देईल असं मला याठिकाणी वाटत. मगाशी एकनाथरावानी उल्लेख केला आपल्या वायसीएम हॉस्पिटल नव्हतेतर आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणा-या वायसीएम हॉस्पिटलमध्ये ख-या अर्थाने ज्याला ऑक्सिजनची गरज असते अशा पध्दतीचे पेशंटच जास्त प्रमाणामध्ये त्याठिकाणी त्यांच्यावरती सेवा करत असतो, त्यांची ट्रिटमेंट त्याठिकाणी करत असतो. आणि म्हणून ज्यावेळेला सॅच्यूरेशन असणारे रुग्णांची सेवा करत असतो त्यांच्यावर ट्रिटमेंट करत असतो त्यावेळेला आज आपण बघीतलतर संपुर्ण

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक हॉस्पिटलची जर का वर्गवारी केली आणि जी रुग्णांची संख्या असेल त्याच परसेन्टेज काढलतर त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक रिकव्हरी रेट म्हणजे जो रुग्ण सॅच्युरेशनमध्ये जातो आणि तो रुग्ण बरा होतो अशा पध्दतीच प्रमाण सुध्दा आपल्या वायसीएम हॉस्पिटलच्या माध्यमातून याठिकाणी आहे. मी याठिकाणी अवर्जुन उल्लेख करेल की जो आपला डेथरेट आहे, आपल्याला सन्मानानी सांगायला अभीमान वाटायला पाहीजे की या वायसीएम हॉस्पिटलच्या माध्यमातून जो आपला डेथरेट आहे तो सुध्दा इतर महानगरपालिकेच्या किंवा इतर शासनाच्या कुठल्याही दवाखान्याच्या तुलनेमध्ये आपल्या वायसीएममध्ये असणारा डेथरेट सुध्दा आपल्या महाराष्ट्राच्या नव्हेतर देशाच्या तुलनेमध्ये रुग्णांच्या संख्येमध्ये सर्वात कमी आहे. परंतु आपण रुग्णांना चांगली सेवा देण्याच्या माध्यमामधुन वेगवेगळे आयसीयू तयार करण्याच्या माध्यमातून आपण अनेक उपक्रम याठिकाणी तयार केलेले आहेत. प्रत्येकांनी याठिकाणी आपआपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी अवर्जुन सांगेल खर म्हणजे या वायसीएम हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये भाऊसाहेबांनी सुध्दा सांगीतल, अनेक नगरसदस्यांनी सांगीतल परंतु माझ्या जे निदर्शनास आलेलं आहे की त्याठिकाणी ऑक्सिजन कमी पडतो परंतु ऑक्सिजन दयायच काम कोण करतय तर डॉ.पवन साळवे, त्यांना मॅनपॉवर कोण पुरवतयतर डॉ.रॉय. मला असं म्हणायच आहे त्याठिकाणी डॉ.वाबळे किंवा त्याठिकाणी पीजीच्या माध्यमातून जे डॉक्टर काम करतात मी त्यांना ओळखत नाही त्यांच्याशी मला देणंघेण नाही परंतु ते सेवा याठिकाणी चांगल्या पध्दतीची देतात, त्यांच जर मस्टर बघीतलतर कोणीही आतापर्यंत सुट्टी घेतलेली नाही. अशा पध्दतीचे चांगल काम करणारे जे डॉक्टर आहेत, ते प्रोफेसर आहेत त्यांच्या बद्दलचा याठिकाणचा विषय आहे आणि म्हणून डॉ.वाबळे यांची अवस्था याठिकाणी शोले मधल्या ठाकूरसारखी करुन ठेवलेली आहे. दुस-या बाजूला डॉ.रॉय साहेब आहेत आणि एका बाजुला डॉ.पवन साळवे त्यांना कुठल्याही प्रकारचा अधिकार त्याठिकाणी नाही. त्यांना जर का ऑक्सिजनच टॅंक लागत असेलतर त्या ऑक्सिजन टॅंकसाठी यांनी पुरवठा दयावा लागतो या प्रक्रीयेमध्ये त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा अधिकार नसताना सुध्दा त्यांच्या संपुर्ण टिमच्या माध्यमातून चांगल काम याठिकाणी वायसीएम हॉस्पिटलच्या माध्यमातून केलं जातं. वायसीएम हॉस्पिटलच्या संदर्भामध्ये चांगली भूमीका आणि चांगल नाव आपल्या संपुर्ण पीजी इन्स्टिटयूटच्या माध्यमातून संपुर्ण महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया महानगरपालिकामध्ये एक चांगली वायसीएम हॉस्पिटल याठिकाणी काम करत अशाप्रकारची भावना याठिकाणी आहे. कुणाच्यामध्ये तेथील डॉक्टरांच्या बद्दल शंका-कुशंका त्यांच्या कार्यपध्दतीवरती प्रत्येकाची भूमीका ही वेगवेगळी असणार आहे परंतु एक चांगल काम आपल्या या वायसीएमच्या माध्यमातून याठिकाणी केल जातय. मा.महापौर

साहेब मी याठिकाणी विनंती करणार आहे की आपण जे काही जुने आणि नवीन डॉक्टरांच्या संदर्भामध्ये अनेक आमच्या सन्मा.सदस्यांच्याकडून याठिकाणी उल्लेख झाला आणि मला माहीत नाही ज्यावेळेला आयुक्त साहेब आपण ही नियुक्ती केली गेली, नियुक्तीच्या माध्यमातून त्यांची जी काही शैक्षणिक अर्हता असेल त्यामध्ये जर का आमच्या जुन्या डॉक्टरांचा समावेश करता येत असेलतर तो सुध्दा आपण अवर्जुन करावा. मगाशी उल्लेख केला मी पण सांगीतल की याठिकाणी फक्त ३२ डॉक्टर कार्यरत आहेत बाकीचे डॉक्टर सिलेक्ट होवून सुध्दा ते याठिकाणी रुजू झालेले नाहीत. मागच्या कालखंडामध्ये मी ज्यावेळेला आयुक्तांकडे होतो त्यावेळेला त्यांच्या भावना त्यांनी त्याठिकाणी व्यक्त करत असताना त्यांनी सांगीतल की आम्हांला तुम्ही किती दिवस आमचा वापर करुन घेणार आहेत. आम्ही ज्या शहरामध्ये होतो तेथील आमच अस्तित्व सोडून या वायसीएममध्ये आम्ही आलोतर आमचा असाच अधांतरी हा विषय ठेवणार आहेत का जर असाच तुम्ही ठेवणार असालतर आम्हांला ठाणे महापालिकेची ऑफर आहे, आम्हांला त्या महानगरपालिकेची ऑफर आहे अशा वेगवेगळया पध्दतीची ऑफर सुध्दा आयुक्तांच्या समोर त्याठिकाणी डॉक्टर व्यक्त करत होते. आणि म्हणून हा विषय कोणाच्याप्रती काय आहे परंतु आपल्याला पीजीच्या माध्यमातून एक चांगली संस्था याठिकाणी ज्यावेळेला मिळते आणि या पीजीच्या संदर्भामध्ये चांगली ट्रिटमेंट मिळते, चांगले डॉक्टर याठिकाणी काम करतात. जुन्या नव्या डॉक्टरांचा समावेश करता येत असेलतर त्या ठिकाणी करावा असं मी याठिकाणी मा.महापौर आपल्याला विनंती करतो व आयुक्तांनी त्या संदर्भात विचार करावा. मला अस वाटत याठिकाणी पीजीच्या प्रोफेसरांबद्दल चर्चा झालेली आहे आणि पीजीच्या सिलेक्शन प्रक्रीयेमध्ये सुध्दा आयुक्तांनी त्यांच्या पॅनलच्या माध्यमातून त्यांच सिलेक्शन केल गेलेल आहे. मला असं वाटत की या पीजीच्या संदर्भामध्ये सन्मा.सर्व नगरसदस्यांना मी एक विचारतो की जर का आपल्या सगळयांच्या भावना एक चांगली पीजी इन्स्टिटयूट व्हावी अशी असेलतर मला असं वाटत की आपण हा विषय याठिकाणी मंजूर करायला काही हरकत नाही. आपण सगळयांनी आपल्या मनामधल्या भावना याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. सन्मा.विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा सांगीतल की चांगला विषय असेल, डॉक्टरांचा विषय असेलतर करायला काही हरकत नाही. त्याच्या बरोबर असणा-या उपसूचना सुध्दा आपल्या नर्स असतील, वॉर्डबॉय असतील अशा पध्दतीच्या उपसूचना सुध्दा याविषयाला आहेत. मला अस वाटत की जर का सर्वाची या विषयाला अनुमती असेलतर, विषय चांगला आहे प्रत्येकाच्या मनामधील भावना आहेत या विषयावर ही महापालिका सभा बुधवार दि.२६/८/२०२० दु.२०० पर्यंत तहकूब करावी आणि त्याच्या अगोदर सर्व

गटनेत्यांची सर्व सन्माननीयांच्या मनामध्ये शंका असतील त्याविषयी आपण त्याठिकाणी चर्चा करुन घ्यावी.

(सभागृहात गोंधळ)

**मा.केशव घोळवे-** मा.महापौर साहेब, तहकूबीस अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** उपस्थित सर्व सहकारी, पदाधिकारी, सन्मा.नगरसदस्य, अधिकारी, पत्रकार वर्ग कर्मचारी तसेच शहरवासीयांना उदया पासून सुरु होत असणा-या गणेश उत्सव आणि गौरीगणेश आगमना निमीत्त सर्वांना हार्दीक शुभेच्छा देवून, सर्वांच्या भावना विचारात घेता या विषयावर ही सभा बुधवार दि.२६/८/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

----

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

### मा.महापालिका सभा
### कार्यपत्रिका क्रमांक – ४६
### सभावृत्तांत

**(दि.२०/७/२०२०, दि.२०/८/२०२० (दु.१.४५ वा.) व २१/८/२०२० (दु.१.४५ वा.) ची तहकूब सभा)**

दिनांक – २६.०८.२०२०          वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२१/८/२०२० (दु.१.४५ वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २६/०८/२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे — महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे — उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.अश्विनी संतोष जाधव
७) मा.राहुल गुलाब जाधव
८) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
९) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

११) मा.गायकवाड निर्मला मनोज

१२) मा.सागर बाळासाहेब गवळी

१३) मा.गोफणे अनुराधा देविदास

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.लांडगे सारिका संतोष

१६) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१७) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१९) मा.अ‍ॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२०) मा.सावळे सिमा रविंद्र

२१) मा.लांडे विक्रांत विलास

२२) मा.गीता सुशिल मंचरकर

२३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२६) मा.अनुराधा गणपत गोरखे

२७) मा.केशव हनुमंत घोळवे

२८) मा.मंगला अशोक कदम

२९) मा.संजय बबन नेवाळे

३०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३१) मा.भालेकर प्रविण महादेव

३२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३४) मा.घोलप कमल अनिल

३५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३७) मा.राजू मिसाळ

३८) मा.बाबर शर्मिला राजू

३९) मा.अमित राजेंद्र गावडे

४०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४१) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४३) मा.ढाके नामदेव जनार्दन

४४) मा.करुणा शेखर चिंचवडे

४५) मा.अपर्णा निलेश डोके

४६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४९) मा.कोमल दिपक मेवानी

५०) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५१) मा.सुलक्षणा राजू धर

५२) मा.सुजाता सुनिल पालांडे

५३) मा.योगेश मंगलसेन बहल

५४) मा.कदम निकीता अर्जुन

५५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५७) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

५८) मा.काळे उषा दिलीप

५९) मा.कोकणे संतोष अंकुश

६०) मा.बारणे अर्चना तानाजी

६१) मा.अभिषेक गोविंद बारणे

६२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६३) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६४) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६५) मा.बारणे माया संतोष

६६) मा.निलेश हिरामण बारणे

६७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६८) मा.दर्शले रेखा राजेश

६९) मा.कलाटे राहुल तानाजी

७०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७१) मा.ममता विनायक गायकवाड

७२) मा.कामठे तुषार गजानन

७३) मा.चोंधे आरती सुरेश

७४) मा.कस्पटे संदिप अरुण

७५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७७) मा.सुनिता हेमंत तापकीर

७८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८०) मा.कुटे निर्मला संजय

८१) मा.आंगोळकर सागर सुनिल

८२) मा.मुंढे उषा अंकुश

८३) मा.कदम शशिकांत गणपत

८४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८९) मा.नवनाथ दत्तू जगताप

९०) मा.संतोष बबन कांबळे

९१) मा.सोनवणे शारदा हिरेन

९२) मा.संजय मल्हारराव वाबळे

९३) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९६) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.संतोष पवार- मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे- अतिरिक्त आयुक्त (३) तथा सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे-उपायुक्त, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.अलमलेकर, मा.इंदलकर, मा.लोणकर-सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे-अधिष्ठता वायसीएमएच, मा.घोडे, मा.घुले-कार्यकारी अभियंता, मा.आगळे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ३.

**मा.शत्रुघ्न उर्फ बापू काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर ज्या विषयासाठी आपल्या सर्वांची चर्चा झाली आहे, आयुक्त साहेबांच्या उपस्थितीमध्ये सर्व गटनेत्यांना सर्वांना माहीती आहे. खरतर शहरामध्ये आपण पाहीलतर या कोवीड-१९ मुळे म्हणजे आज कुठेही शासकीय किंवा आपल्या महानगरपालिकेच्या किंवा खाजगी मध्ये कुठेही जागा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीमध्ये येथे अत्यंत महत्वाचा विषय नं.३ जो आपल्या समोर आहे तर हा विषय अन्य कुणाच्या काही

अडचणी असतीलतर या विषयावर चर्चा न करता हा विषय मंजूर करावा. याच्यामध्ये नंतर काही व्हॅक्सीन आली, याच्यामध्ये कोण असा वागला तसा वागला, कोण दोषी आहे हा नंतरचा भाग आहे आज तो सभागृहाचा आपला भाग नाही. आज जनतेची काळजी आपल्या सर्वांना आहे. सत्ताधारी बरोबर विरोधकांनाही काळजी आहे. आपण सर्वजण त्याच्यातून जातो आहे. आपल्यातले काही जवळचे आज पॉझिटीव्ह येतात त्यासाठी आपण धावपळ करतो. त्याच्यात आपल्या सर्व डॉक्टरांची टिम एकदम चांगल्या पध्दतीने काम करते. काही जणाचा द्वेष असेल, आपली जी काही भांडण असतील तो नंतरचा भाग आहे. हा विषय मंजूर करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर-** उपसूचनेसह विषय क्रमाक ३ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक -५५६ विषय क्रमांक - ३

दिनांक-२६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.आयुक्त यांचे पत्र प्रशा/१/कावि/३७८/२०२०
दि.१८/०३/२०२०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३८ दि.१२/६/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील पदव्युत्तर संस्थे करीता नामनिर्देशनाव्दारे रिक्त पदांवर नियुक्ती मिळण्याकामी अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखीक मुलाखतीकरीता उपस्थित राहिलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी व मौखिक मुलाखती घेवून शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव इत्यादी बाबी विचारात घेवून निवड समितीने उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, प्रकाशने, अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार (Maharashtra University of Helth Science) MUHS यांचेकडील मार्गदर्शक गुण मुल्यांकन तक्ता (Evaluation Sheet) प्रमाणे उमेदवारांना मुलाखत पॅनलमार्फत गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र 'अ' प्रमाणे पात्र उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी सादर केली आहे. त्याप्रमाणे नेमणूका करण्यास व निवड यादीवरील उमेदवार मुदतीमध्ये रुजू न झाल्यास प्रतिक्षा यादीवरील पुढील उमेदवारांना नियुक्ती देण्यास

मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये पदव्युत्तर संस्था स्थापन झालेली असून केंद्र शासनाकडून ९ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्रक.६०१/नवि-२२ दिनांक ०४ मार्च २०१४ अन्वये विविध संवर्गातील ११८ पदांना मान्यता दिलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभा ठराव क्र. २६८, दिनांक-०९/०५/२०१३ अन्वये अध्यापक व अध्यापकेतर अशा एकूण ११८ पदांना व त्याअनुषंगिक वेतनश्रेणीस मान्यता दिलेली आहे. सदर पदांच्या मुलाखती होऊन त्या त्या पदांवर उमेदवारांची निवड करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात पदव्युत्तर संस्थेंतर्गत स्त्रीरोग व प्रसुती, भूलशास्त्र, औषधवैद्यक शास्त्र, बालरोग, अस्थिरोग, शल्यचिकित्सा, मानसोपचार, कान-नाक-घसा व विकृतीशास्त्र विभाग अशा एकूण नऊ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यामुळे वायसीएम रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांचा दर्जा उंचावला असून नागरीकांना चांगले उपचार मिळू लागले आहेत.

वायसीएम रुग्णालयामध्ये पदव्युत्तर संस्था स्थापन झालेपासून जे अध्यापक कार्यरत आहेत व ज्यांनी सदर पदभरतीमध्ये अर्ज केले होते, त्यातील सुमारे २० अध्यापकांची निवड सदर पदभरतीमध्ये झालेली नाही. सदर अध्यापकांची तीन वर्षासाठी मानधनावर नियुक्ती केली असून सुमारे अडीच वर्षे ते नियमितपणे कार्यरत आहेत. सदर अनुभवी व कौशल्यप्राप्त अध्यापकांनी वायसीएम रुग्णालयात कोरोना महामारीच्या परिस्थितीत आपापली सेवा उपलब्ध करुन दिली आहे व देत आहेत. त्यामुळे कोरोना कालावधीत वायसीएम रुग्णालयावरील बराचसा ताण कमी झाला आहे.

महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडील शासन निर्णय क्र. एलईसी-१४०८/प्र.क्र. १९६/वैसेवा-३, दि. २२ जानेवारी २००९ अन्वये तात्पुरत्या नियुक्तीने सेवेत लागलेल्या आणि सदर शासन निर्णय निर्गमित होतेवेळी तात्पुरत्या नियुक्तीनेच सेवेत कार्यरत असलेल्या अध्यापकांच्या तात्पुरत्या सेवा नियमित करण्यास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एलईसी-१४१४/प्र.क्र.२५/वैसेवा-३, दि.२२ ऑक्टोबर २०१६ अन्वये शासकीय महाविद्यालयातील तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या

तात्पुरत्या सेवा दि.२४.१०.२०१६ पासून विशेष बाब म्हणून नियमित करण्यास शासनाची मंजुरी प्राप्त आहे.

मा.सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संवैशिवसं/वैद्यकीय अधिकारी/सेवा नियमित/का.अ-ब./३४८३/२०२०,दि. ९.६.२०२० अन्वये संस्थेत/रुग्णालयात संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या पदांवर तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा नियमित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

वायसीएम रुग्णालयातील रुग्णसंख्येबाबत मागील काही वर्षांची आकडेवारी पाहिली, तर रुग्णांची संख्या वाढतच चालली असल्याचे दिसून येईल. वायसीएम रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या, वाढीव अध्यापकांची निकड व कोरोना महामारीची परिस्थिती लक्षात घेऊन वर नमूद शासन निर्णय/पत्राच्या आधारे निवड न झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील २० अध्यापकांसाठी वाढीव पदे निर्माण करुन सध्या कार्यरत पदावर पिंपरी चिंचवड महापालिका सेवेत शासन उमेदमान्यतेवर कायमस्वरुपी सामावून घेण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील, शासन निर्णय क्रमांक पीसीसी/३०९६/१८०१ सीआर-२६१/नवि-२२, दिनांक ११/०९/९७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हददवाढ होवून नवीन १८ महसूली गावांचा महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळात व लोकसंख्येत वाढ झाल्याने स्वच्छता विषयक सुविधा पुरविणे महापालिकेचे अत्यावश्यक व तातडीचे कर्तव्य असून क्षेत्रीय कार्यालयाकडील कर्मचारी अपूरा पडत असल्याने प्रभाग अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात तत्कालीन आयुक्त यांचे सूचनेनुसार घंटागाडी ठेकेदार यांना सन १९९७ पासून स्वच्छतेचा ठेका देण्यात आलेला आहे असे एकूण ३७२ घंटागाडी ठेकेदार हे सन १९९७ पासून ठेकेदारी पध्दतीने कामकाज करीत आहे. सदरचे ठेकेदार हे महापालिकेचे आस्थापनेवरील कर्मचारी नाहीत.

घंटागाडी ठेकेदार महापालिकेचे कर्मचारी म्हणून नेमणूकीच्या तारखेपासून महानगरपालिकेच्या इतर कर्मचा-यांप्रमाणे देय असलेले वेतन आणि इतर भत्ते अदा करावेत, या मुख्य मागणीच्या संदर्भात घंटागाडी ठेकेदार वतीने “महापालिका आणि परिवहन कामगार आघाडी” या संघटनेच्या वतीने पुणे येथील मे.औद्योगिक न्यायालयात कम्प्लेंट यु.एल.पी.१३९/९९ दाखल केली होती. या कम्प्लेंट संदर्भात मे.कामगार न्यायालयाने “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याबाबत मनाई हूकूम

दि.२०/०५/९९ रोजी दिला होता. याच प्रकरणा संदर्भात मे.कामगार न्यायालयाने दिनांक १९/०४/२००० च्या आदेशान्वये तक्रारदारांची कम्प्लेंट यु.एल.पी.१३९/९९ ची विनंतीची मागणी रदद केलेली आहे. या प्रकरणी मे.न्यायालयाने अशा आशयाचा निर्णय दिला आहे की, यामध्ये असलेले ठेकेदार हे महापालिकेचे नोकर नाहीत ज्यामुळे त्यांच्यामध्ये मालक व नोकर हे नाते सिध्द होत नाही. हे न्यायालयाने मान्य केले आहे. तथापि सदर आदेशा विरुध्द श्री.सुभाष सरीन, जनरल सेक्रेटरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन आघाडी यांनी त्याच मे.औद्योगिक न्यायालयात रिव्हीजन अर्ज क्र.५/२००० दाखल केला असून दिनांक २०/०५/१९९९ चे आदेशाचा पुर्न:विचार व्हावा म्हणून मे.औद्योगिक न्यायालयात विनंती केली होती. त्यावर मे.न्यायालयाने अर्ज मान्य करुन मनाई आदेश करताना “जाब देणार मनपाने ठेकेदार यांच्या सेवेबाबत मूळ तक्रार अर्ज निकाली होईपर्यंत “जैसे थे” परिस्थिती ठेवण्यात यावी व घंटागाडी ठेकेदारांच्या सेवा समाप्त करावयाच्या असतील तर याबाबत कायदेशीर पध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या सेवा समाप्त करता येतील.” असे आदेश दिले आहेत.

सद्यस्थितीत घंटागाडी ठेकेदार मनपा विरुध्द मे.औद्योगिक न्यायालय येथे ULP ०५/२००० दाखल आहे. तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई येथे Writ Petition No.4931/2003 दाखल आहे. तसेच सुप्रीम कोर्टात SLP No.12804/15 दाखल आहे. सदर दाव्यांचा निकाल आज अखेर प्रलंबित आहे.

त्यानुसार घंटागाडी ठेकेदारांनी प्रत्यक्षात साफसफाईच्या केलेल्या कामाची वस्तुस्थिती लक्षात घेता घंटागाडी ठेकेदारांची त्यांना महापालिका सेवेत सफाई कर्मचारी या वर्ग ४ च्या संवर्गात नियमित आस्थापनेवर घेण्याबाबतच्या मागणीबाबत कृपया शासनाने मार्गदर्शन करावे. याकामी मा.सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडे पत्र क्रमांक प्रशासन/३/कावि/५५५/२०००, दि. ११/०८/२००० व त्यानंतर वेळोवेळी दिनांक २३/१०/२०००, दि. १२/१२/२०००, दि. २९/१२/२०००, दि. २०/०५/२००३, दि. ०६/०६/२००३, दि. २९/१२/२००३, दि. २३/०७/२००४, दि. २९/०४/२००५, दि. ०३/०९/२००५ अन्वये प्रस्ताव सादर करुन विनंती करण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भात शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा देखील वेळोवेळी शासनास सादर करण्यात आलेला आहे.

मे.औद्योगिक न्यायालयाने यु.एल.पी.०५/२००० मध्ये दिलेल्या मनाई आदेशा विरुध्द महानगरपालिकेने सदरचा विषय मे.औद्योगिक न्यायालयाच्या कार्यकक्षेत

येत नाही. या मुद्याबाबत पुन्हा औद्यागिक न्यायालयात हरकत दाखल केली होती. तथापि मे.औद्योगिक न्यायालयाने सदरची हरकत नामंजूर केली आहे. सदर निर्णयाच्या विरोधात महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र.४९३१/०३ दाखल केली आहे. सदरची याचिका अद्यापपर्यंत प्रलंबित आहे.

घंटागाडी ठेकेदार यांना महानगरपालिकेमध्ये सेवेत घेणेपूर्वी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

- महापालिकेने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेली याचिका क्र.४९३१/२००३ मागे घेणे आवश्यक आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.
- घंटागाडी ठेकेदार यांनी महापालिके विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल केलेली Special Leave to Appeal 12804/2015 मागे घेणे आवश्यक आहे.
- मे. औद्योगिक न्यायालय पुणे यांचेकडे घंटागाडी ठेकेदारांनी मनपा विरुध्द दाखल केलेली याचिका तात्काळ निकाली काढणेबाबत विनंती करावी व त्या निकालाप्रमाणे कार्यवाही करावी.

  वरील नमूद ०३ मुददयांबाबत कार्यवाही पूर्ण झालेनंतर मनपा प्रशासनाने या कर्मचा-यांना यथोचित कार्यवाही पूर्ण करुन नियमित वेतनश्रेणीत व मनपाचे स्थायी आस्थापनेवर नियुक्ती देणेची कार्यवाही करावी.

  महानगरपालिका आस्थापनेवर सफाई संवर्गात २५९३ पदे मंजर असून ८०० पदे रिक्त आहेत. अशा घंटागाडी ठेकेदार/कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत सामावून घ्यावयाचे झालेस खालील प्रमाणे मुददे विचारात घ्यावे लागतील.
- त्यांच्या शैक्षणिक अर्हतेची माहिती घेवून कार्यवाही करावी.
- मनपाचे सेवा नियमानुसार सफाई संवर्गातील पदांसाठी चौथी पास अशी शैक्षणिक अर्हता आहे. सदरची अर्हता सध्या कार्यरत असलेल्या घंटागाडी ठेकेदार यांचेकडे आहे किंवा कसे? याची तपासणी करुन नियुक्तीची कार्यवाही करावी.
- सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर सफाई संवर्गातील ८०० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांवर नियुक्त्या कराव्यात.

- या कर्मचा-यांना नियुक्त्या द्यावयाचे झालेस बिंदू नामावली तपासून नियुक्तीची कार्यवाही करावी.
- आज अखेर घंटागाडी ठेकेदार यांचे निधन झालेल्या त्यांचे वारसांना महानगरपालिका सेवेत लाड-पागे धोरण लागू करणेबाबत कार्यवाही करावी.
- सध्या कार्यरत असलेले घंटागाडी ठेकेदार हे वयाधिक झाले असतील तर त्यांचे बाबतीत हे कर्मचारी महानगरपालिका सेवेत घंटागाडी ठेकेदार म्हणून सन १९९७ मध्ये दाखल झालेल्या दिवशी वयाची अर्हता धारण करीत असल्यास त्याचा सेवेत समावेश करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाने योग्य ते नियमाधीन सोपस्कर पूर्ण करुन घंटागाडी ठेकेदारांना मनपा सेवेत स्थायी आस्थापनेवर सामावून घेणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिचंवड महानगरपालिकेच्या वतीने पूर, भूकंप, वादळ, आपदकालीन स्थिती व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरीकांना तातडीने मदत करणेकामी आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थापन करणेत आलेला आहे. आपत्कालिन परिस्थितीमध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कामकाजाकरीता आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर श्री ओमप्रकाश बहिवाल मानधन तत्वावर सहा सहा महिने कालावधीकरीता सन २००९ पासून काम करीत आहेत. सदर कामकाजाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व १५ वर्षाचा अनुभव ते धारण करीत आहेत, तरी त्यांचे सेवेची उपयुक्तता विचारात घेता श्री ओमप्रकाश बहिवाल यांची महापालिकेच्या अस्थायी अस्थापनेवर दरमहा र.रू ६०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये साठ हजार फक्त) मानधन याप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात तीन वर्ष कालावधी करीता विशेष बाब म्हणून सध्याचे कामकाजाची मुदत संपल्यानंतर एक दिवसाचा सेवा कालावधी खंडीत करून माहे जानेवारी २०२१ पासून नेमणूक करण्यास व त्याबाबतच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३०९६/१८०१सीआर-२६१/नवि-२२,दिनांक ११/९/१९९७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन नवीन १८ महसुली गावांचा महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या एकूण क्षेत्रफळात व लोकसंख्येत वाढ झाल्याने आरोग्यविषयक सुविधा पुरविणे महापालिकेचे

अत्यावश्यक व तातडीचे कर्तव्य असून सध्या जगभरासह देशात तसेच राज्यात सर्वत्र कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत आहे. यासाठी कोरोनाबाधितांवर उपचार करण्याच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे कोविड रुग्णालय म्हणून घोषित करणेत आले आहे. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांना योग्य उपचार मिळण्याच्या हेतूने सर्व वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स, पॅरामेडिकल कर्मचारी, सुरक्षा निरीक्षक, रूग्णवाहिकेचे वाहनचालक व वर्ग ४ चे इतर कर्मचारी यांची सेवा अधिग्रहीत करण्यात आली आहे. सध्या उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी पुरेशा प्रमाणात कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा वाढता व्याप विचारात घेता प्रशासन विभागाने वेळेवेळी निर्गत केलेल्या परिपत्रक/आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात विविध पदे मानधनावर सहा महिने कालावधीकरीता भरण्यात येतात. सदरची प्रक्रिया सन २००७ चे कालावधीपासून राबविण्यात येत आहे. काही कर्मचारी यांनी महानगरपालिकेत कायमस्वरुपी सामावून घेणे व सेवा खंडित करु नये करिता मा. न्यायालयात दावा दाखल केला असून सदर दाव्यावर मा. न्यायालयाचे जैसे थे असा आदेश आहे. त्यामुळे सदर कर्मचारी वर्षेनुवर्षे महानगरपालिकेत सेवा देत आहेत. सध्याची कोरोना विषाणू साथरोगाचा प्रसार पाहता व वायसीएम रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता सदर कर्मचा-यांची वायसीएम रुग्णालयास आवश्यकता आहे. त्यामुळे मा. न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांपैकी, जे कर्मचारी वर्षेनुवर्षे कर्तव्यावर गैरहजर राहून रुग्णसेवा देत नाहीत, तसेच कोरोनाच्या साथरोग कालावधीत रुग्णसेवा न देता गैरहजर राहिले आहेत, असे कर्मचारी सोडून ज्या कर्मचा-यांनी सलग सेवा दिलेली आहे, आणि प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (RCH), राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) कार्यक्रमाअंतर्गत कर्मचारी, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत कर्मचारी (NTEP) अशा कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(सभागृहात गोंधळ)

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ४

दिनांक-२६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/१०५५/२०२० दि.१२/६/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' या अभिनामाची १६ पदे र.रु. पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत शासन मंजूर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमास दि.१८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदाची पदोन्नतीची अर्हता “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या पदावरील किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिका-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.” याप्रमाणे आहे. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरणेकामी दिनांक २९/०५/२०२० रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. मागासप्रवर्गाचे पदोन्नतीचे आरक्षणा संदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र.बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९डिसेंबर २०१७ व दिनांक ११ ऑक्टोंबर, २०१८ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झालेले आहे. त्यानुसार “तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत निर्देश आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त असणा-या पदांमध्ये खुल्या प्रवर्गातील आरक्षण विचारात घेता डॉ. लोखंडे ऋतूजा समीर यांना खुला(इ.मा.व.), डॉ. बांगर वैशाली महादेव यांना खुला(भ.ज.(ड)), डॉ. दादेवार अभयचंद्र अनंतराम यांना खुला(अनु.जमाती) व डॉ. सांगळे तृप्ती मंगेश यांना खुला(भ.ज.(ब)) प्रवर्गामध्ये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी

पदावर पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देणेस, पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. तथापि मा. विधी समिती दिनांक १४/०६/२०२० रोजी विसर्जित होणार असल्याने व नव्याने विधी समिती गठीत होण्यास काही कालावधी लागणार आहे. तथापि मनपास तातडीने ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील अधिका-यांची आवश्यकता असल्याने प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५-अ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा विषय थेट मा. महापालिका सभेपुढे सादर करणे आवश्यक आहे.

सबब डॉ. लोखंडे ऋतूजा समीर यांना खुला (इ.मा.व.), डॉ. बांगर वैशाली महादेव यांना खुला (भ.ज. (ड)), डॉ. दादेवार अभयचंद्र अनंतराम यांना खुला(अनु.जमाती) व डॉ. सांगळे तृप्ती मंगेश यांना खुला(भ.ज.(ब)) प्रवर्गामध्ये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागांवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणे.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सहा.सुरक्षा अधिकारी ०५, सुरक्षा निरीक्षक ३४ व सुरक्षा सुपरवायझर १७, रखवालदर ३७४ या अभिनामाची पदे मंजूर आहेत. सदर पदांचा महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधामध्ये समावेश असून सदर पदे रिक्त आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमास दिनांक १८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली असून या पदांच्या पदोन्नतीकामी अहर्ता शासनाने निश्चित केलेल्या आहेत.

मनपाचा सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवा पुरविणारा विभाग असल्याने व विविध पदांवर कामकाज करणा-या कर्मचा-यांची पदे हि रिक्त असल्याने कामकाज करताना अनेक ठिकाणी गैरसोय होत आहे, तसेच अन्य कर्मचारी जसे की सुरक्षा सुपरवायझर यांचेसह सहायक सुरक्षा अधिकारी यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. सदर विभागाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता रखवालदर व

सुरक्षा सुपरवायझर पदावर कार्यरत कर्मचारी हे पदोन्नती मिळणेस पात्र आहेत, अशा सुरक्षा विभागातील कर्मचारी यांना सेवाजेष्ठता व पात्रतेच्या निकषांनुसार निवड समीती सत्वर गठीत करून सेवाजेष्ठता कर्मचा-यांना उपरोक्त मंजूर व रिक्त पदांवर तातडीने पदोन्नतीने नेमणुका करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्युत विभागात सह शहर अभियंता (वि/यां) या अभिनामाचे एक पद कार्यरत आहे. सह शहर अभियंता (वि/यां) हे पद रिक्त झालेनंतर कार्यकारी अभियंता (वि) या पदावरील सेवाजेष्ठता, गुणवत्ता व तांत्रिक अर्हता धारण करणा-या अधिका-यामधुन पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.

श्री. संजय यशवंत खाबडे हे सन २००४ पासून आज अखेर १६ वर्षे कार्यकारी अभियंता (वि) या पदावर कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता (वि) पदावर ते सेवाजेष्ठ आहेत. सह शहर अभियंता (वि/यां) या पदाची तांत्रिक अर्हता ते धारण करीत आहेत. सबब सह शहर अभियंता (वि/यां) हे पद रिक्त झालेनंतर सदर पदावर श्री. संजय यशंवत खाबडे यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा. अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ५५७ विषय क्रमांक - ४

दिनांक-२६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.प्रशा/१/कावि/१०५५/२०२० दि.१२/६/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' या अभिनामाची १६ पदे र.रु. पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत शासन मंजूर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमास दि.१८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदाची पदोन्नतीची अर्हता “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या पदावरील किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या

अधिका-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.” याप्रमाणे आहे. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरणेकामी दिनांक २९/०५/२०२० रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. मागासप्रवर्गाचे पदोन्नतीचे आरक्षणा संदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र.बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९डिसेंबर २०१७ व दिनांक ११ ऑक्टोंबर, २०१८ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झालेले आहे. त्यानुसार “तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत निर्देश आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त असणा-या पदांमध्ये खुल्या प्रवर्गातील आरक्षण विचारात घेता डॉ. लोखंडे ऋतूजा समीर यांना खुला(इ.मा.व.), डॉ. बांगर वैशाली महादेव यांना खुला(भ.ज.(ड)), डॉ. दादेवार अभयचंद्र अनंतराम यांना खुला(अनु.जमाती) व डॉ. सांगळे तृप्ती मंगेश यांना खुला(भ.ज.(ब)) प्रवर्गामध्ये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देणेस, पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. तथापि मा. विधी समिती दिनांक १४/०६/२०२० रोजी विसर्जित होणार असल्याने व नव्याने विधी समिती गठीत होण्यास काही कालावधी लागणार आहे. तथापि मनपास तातडीने ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील अधिका-यांची आवश्यकता असल्याने प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५-अ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा विषय थेट मा. महापालिका सभेपुढे सादर करणे आवश्यक आहे.

सबब डॉ. लोखंडे ऋतूजा समीर यांना खुला (इ.मा.व.), डॉ. बांगर वैशाली महादेव यांना खुला (भ.ज. (ड)), डॉ. दादेवार अभयचंद्र अनंतराम यांना खुला(अनु.जमाती) व डॉ. सांगळे तृप्ती मंगेश यांना खुला(भ.ज.(ब)) प्रवर्गामध्ये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागांवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पे लेवल S-२३-६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सहा.सुरक्षा अधिकारी ०५, सुरक्षा निरीक्षक ३४ व

सुरक्षा सुपरवायझर १७, रखवालदर ३७४ या अभिनामाची पदे मंजूर आहेत. सदर पदांचा महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधामध्ये समावेश असून सदर पदे रिक्त आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमास दिनांक १८/०२/२०२० रोजी शासन मान्यता मिळालेली असून या पदांच्या पदोन्नतीकामी अहर्ता शासनाने निश्चित केलेल्या आहेत.

मनपाचा सुरक्षा विभाग हा अत्यावश्यक सेवा पुरविणारा विभाग असल्याने व विविध पदांवर कामकाज करणा-या कर्मचा-यांची पदे हि रिक्त असल्याने कामकाज करताना अनेक ठिकाणी गैरसोय होत आहे, तसेच अन्य कर्मचारी जसे की सुरक्षा सुपरवायझर यांचेसह सहायक सुरक्षा अधिकारी यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. सदर विभागाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता रखवालदर व सुरक्षा सुपरवायझर पदावर कार्यरत कर्मचारी हे पदोन्नती मिळणेस पात्र आहेत, अशा सुरक्षा विभागातील कर्मचारी यांना सेवाजेष्ठता व पात्रतेच्या निकषांनुसार निवड समीती सत्वर गठीत करून सेवाजेष्ठता कर्मचा-यांना उपरोक्त मंजूर व रिक्त पदांवर तातडीने  पदोन्नतीने नेमणुका करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्युत विभागात सह शहर अभियंता (वि/यां) या अभिनामाचे एक पद कार्यरत आहे. सह शहर अभियंता (वि/यां) हे पद रिक्त झालेनंतर कार्यकारी अभियंता (वि) या पदावरील सेवाजेष्ठता, गुणवत्ता व तांत्रिक अर्हता धारण करणा-या अधिका-यामधुन पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.

श्री. संजय यशवंत खाबडे हे सन २००४ पासून आजअखेर १६ वर्षे कार्यकारी अभियंता (वि) या पदावर कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता (वि) पदावर ते सेवाजेष्ठ आहेत. सह शहर अभियंता (वि/यां) या पदाची तांत्रिक अर्हता ते धारण करीत आहेत. सबब सह शहर अभियंता (वि/यां) हे पद रिक्त झालेनंतर सदर पदावर श्री. संजय यशंवत खाबडे यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(सभागृहात गोंधळ)

**मा.केशव घोळवे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ५

दिनांक-२६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.इक्षेका/वि/कावि/२१२/२०२० दि.०९/०७/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोवीड-१९ रुग्णासाठी आपत्कालीन व्यवस्थेअंतर्गत तातडीने उभारणेत येणा-या कोविड केअर सेंटर महाळुंगे इंगळे येथील म्हाडा इमारतीमध्ये तात्पुरती व्यवस्था करणेचे नियोजन आहे. याकामी दि.२३-०६-२०२० रोजी संयुक्त पाहणीच्या अनुषंगाने मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त २ यांनी मा.प्रभारी अतिरिक्त आयुक्त ३ तथा सह शहर अभियंता (वि/यां) यांना सदर इमारतीमध्ये विभागाकडील चालु कामांतुन विद्युत विषयक कामे करणेच्या तोंडी सुचना दिल्या आहेत. सदर महाळुंगे इंगळे येथील म्हाडा इमारती या महापालिका क्षेत्राबाहेरील तसेच महापालिकेच्या मालकीच्या नाहीत. परंतु तातडीची बाब म्हणुन कोवीड-१९ रुग्णासाठी आपत्कालीन व्यवस्थेअंतर्गत सदर ४ इमारतीमधील १८८ सदनिकामध्ये ( ७५२ खोल्या) खालीलप्रमाणे विद्युत विषयक कामे करणे आवश्यक असल्याने प्रभाग क्र.३५ मध्ये स.नं.१ मधील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उर्वरीत अनुषंगीक कामे करणे ( टप्पा क्र.२) (विद्युत विषयक कामे करणे) या निविदा कामातुन करणेस मा.आयुक्त यांचेकडील मंजुर प्रस्तावानुसार दि.२६/०६/२०२० रोजी मान्यता दिली आहे. सदर चालु काम मे.रिअल इलेक्ट्रीकल्स, पिंपरी यांना ( निविदा क्र.08/01 --- 19/20, नि.र.रु.४,०३,९०,२३८/--, नि.दर ६ % कमी ) देणेत आलेले आहे. सदर इमारती नविन असुन याठिकाणी ट्युब, पंखे व दिवे बसविणेची आवश्यकता आहे. यापैकी निविदा शेड्युलमध्ये नसलेल्या बाबी अतिरिक्त बाब म्हणुन मंजुर करणेत येणार आहेत.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर | खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 48 " Ceiling Fan, DSR No.2-12-2 2018/19 | 752 | 1796 | 1350592 |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | 18 Watt LED Tube DSR No.2-1-22, 2018/19 | 752 | 570 | 428640 |
| 3 | 0.5 Watt LED Bulb DSR No.2-10-7 2018/19 | 376 | 68 | 25568 |
| 4 | Instant Water Heater 3 KW, DSR No.3-1-8 2018/19 | 141 | 3617 | 509997 |
| | | | Total Rs. | 2314797 |
| | | | 12% GST | 277775.64 |
| | | | Total Exp.Rs. | 2592572.64 |

सदर कामाच्या अनुषंगाने शासनाच्या दरसुची २०१८-१९ मधुन आवश्यक बाबींच्या समावेशाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रु.२५,९२,५७३/-- इतका खर्च होणार आहे. सदर काम अंत्यत तातडीने करणेबाबत वरिष्ठ पातळीवरुन सुचना मिळाल्याने व सदर काम निविदा काढुन करणेसाठी लागणा-या विलंबाचा विचार करता महापालिकेकडील चालु कामातुन करणेस या प्रस्तावान्वये मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

तसेच सदर इमारतीचा महानगरपालिकेमार्फत कोविड केअर सेंटर म्हणुन वापर होणार असलेने वापरापोटी येणारे वीजबील अदा करणेस मान्यता घेणे आवश्यक आहे. याशिवाय सदर काम करताना याठिकाणी बसविणेत आलेल्या जनित्रसंच, लिफ्ट यांचा उभारणी पश्चात विनावापर असल्याने व देखभाल दुरुस्तीची कामे न केल्यामुळे अखंडीतपणे चालु राहणेसाठी आवश्यक दुरुस्ती करणे भाग पडणार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यासाठी तातडीची आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे मनपाच्या विद्युत विभागाकडील चालु कामातुन करणेचे नियोजन आहे, त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चासही मान्यता मिळणे अपेक्षित आहे. तसेच जनित्रसंचाच्या चालनाकामी आवश्यक डिझेल पुरवठ्यासाठी होणारा खर्च विद्युत विभागाकडील चालु जनित्रसंच इंधन बीलाच्या तरतुदीमधुन प्रतिपुर्ती करणेस मान्यता मिळणे आवश्यक आहे. सदरकामी मा.आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता मिळणे आवश्यक आहे.

तरी, सदर कामाची अंत्यातीक तातडी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या महानगपालिका हद्दीबाहेरील महाळुंगे इंगळे कोविड केअर सेंटर येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये अंदाजे र.रु. २५,९२,५७३/-- ची विद्युत विषयक कामे प्रभाग क्र.३५

मध्ये स.नं.१ मधील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उर्वरीत अनुषंगीक कामे करणे (टप्पा क्र.२) (विद्युत विषयक कामे करणे) या कामातुन करणेस, तसेच सदर ठिकाणच्या वीजवापरापोटी येणारे वीजबील महानगरपालिकेकडुन अदा करणेस, जनित्रसंच, लिफ्ट यांची आवश्यक दुरुस्तीची कामे मनपाच्या विद्युत विभागाकडील चालु कामातुन करणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास व जनित्रसंचाच्या चालनाकामी आवश्यक डिझेल पुरवठ्यासाठी होणारा खर्च विद्युत विभागाकडील चालु जनित्रसंच इंधन बीलाच्या तरतुदीमधुन प्रतिपुर्ती करणेस कार्योत्तर मान्यता देणे.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मनपाच्या प्रभाग क्र. ३२ मधील श्रीकृष्ण मंदिर ते बँक ऑफ महाराष्ट्र ते सांगवी फाटा पर्यत व परिसरातील रस्ते अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे (निविदा क्र.७८/४/२०१८-२०१९) या कामातून प्रभाग क्रमांक ३२ मधील माकन चौक ते बँक ऑफ महाराष्ट्र पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, सेवा वाहिन्या बदलणे, फुटपाथ विकसित करणे इ. कामांचा अंतर्भाव करण्यात आलेले आहे. सदर रस्त्यास जोडून असणारा व सांगवी दापोडीला जोडणारा माकन चौक ते वसंतदादा पाटील पुतळ्या पर्यंतचा विकास आराखड्यातील १८ मी. रुंद रस्ता उपरोक्त कामांतर्गत विकसित करण्यात यावा. याकरिता सदर कामाची मूळ प्रशासकीय मान्यता र.रु.१०,००,००,०००/-(अक्षरी र.रु.दहा कोटी फक्त) वाढवून २०,००,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस कोटी फक्त) इतकी करण्यास मान्यता देण्यात यावी. त्या अनुषंगाने सदर कामास सुधारित तांत्रिक मान्यता देणेस व तसेच निविदा स्वीकृत दरात भाववाढीसह सदरचे काम करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र.32 सांगवी येथील रस्ते आधुनिक पद्धतीने विकसीत करणे कामे चालू आहेत. सदर कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणे आवश्यक आहे. तथापी सदर कामासाठी सन 2020-21 चे अंदाजपत्रकात तरतूद अपुरी असल्यामुळे सदर कामाच्या निविदा प्रसिद्ध करता येत नाही. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणे साठी खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात

येत आहे, त्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे इतर कामातुन वाढ/घट करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्र. क्र. | लेखाशीर्ष | अंदाजपत्रक २०२०-२१ | | उपलब्ध तरतूद | सन २०२०-२१ करीता तरतूद वर्गीकरण करावयाची | | सुधारित तरतूद २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक | अ. क्र | | वाढ | घट | |
| १ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल नॅशनल स्कुल (शुभ श्री बिल्डींग) ते स्पायसर पुला पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६५ | २ | १०००० | ३१५०००० | ० | ३१६०००० |
| २ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल वसंत दादा पुतळा परीसर ते माकन चौका पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ३ | १०००० | ३०००००० | ० | ३०१०००० |
| ३ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल श्रीकृष्ण मंदिर ते बँक ऑफ महाराष्ट्र ते सांगवी फाटा पर्यंत व | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ३ | १०००० | २९००००० | ० | २९१०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | | | | | | | | |
| ४ | प्रभाग क्रमांक ३१ मधिल त्रिमुर्ती कॉर्नर ते रामकृष्ण मंगल कार्यालय(भक्ती हॉस्पिटल) पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ५ | १०००० | १७०००००० | ० | १७१०००० |
| ५ | प्रभाग क्रमांक ३१ नर्मदा गार्डन कॉर्नर ते माकन चौका पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ६ | १०००० | १८५०००० | ० | १८६०००० |
| ६ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युतविषयक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६७ | ५ | १५०००००० | ० | १०००००० | १४०००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुलाचे सुशोभिकरण करणेकामी रंगीत दिवे प्रणाली (Facad Lighting) विषयक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६७ | ६ | २७४००००० | ० | ५०००००० | २२४००००० |
| ८ | भक्ति-शक्ती चौक येथील उद्यानामध्ये प्रकाश व्यवस्था सुशोभिकरण करणेविषयक अनुषांगिक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ७ | १०००००० | ० | १०००००० | ९०००००० |
| ९ | भक्ति-शक्ती चौक येथील उद्यानामध्ये ध्वनी आणि प्रकाश संकल्पना विकसित करणेकामी कामे करणे | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ८ | २०००००००० | ० | २०००००० | १८०००००० |
| १० | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुल व उद्यानामध्ये सुशोभिकरण करणे विषयक आवश्यक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ९ | ३०००००००० | ० | २६००००० | २७४००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुल व उद्यानामध्ये प्रकाश व्यवस्था करणे व ध्वनी आणि प्रकाश संकल्पना विकसित करणेकामी करणेकरिता च्या कामासाठी सल्लागार नेमणुक करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | १० | ५०००००० | ० | १०००००० | ४०००००० |
| | **एकूण** | | | | | १०७४५००००० | १२६०००००० | १२६०००००० | १०७४५००००० |

तसेच सन २०१९-२० च्या सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अंदाजपत्रकात कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **पा.क्र.** | **अनु.क्र.** | **मुळ प्रशासकीय मान्यता** | **आवश्यक प्रशासकीय मान्यता** | **वाढीव प्रशासकीय मान्यता रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२० चिंचवडेनगर मध्ये बिजलीनगर अंडरपास करणे. | १३ | १ | १५००००००० | २००००००० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र.१६ वाल्हेकरवाडी येथे प्राधिकरण कडून आलेल्या जागेवर सल्लागार नेमणे व शाळा इमारत बांधणे. | ६० | २० | २००००००० | ३००००००० | १००००००० |
| ३ | प्रभाग क्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकरवाडी पर्यंतचा | ३० | २४ | २००००००० | ३००००००० | १००००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे. | | | | | |
| एकूण | | | | | | |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१९-२० च्या सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच क क्षेत्रिय कार्यालयाकडील खालील विकास कामाचा सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यावी. मा. महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि. २/११/२०१९ अन्वये प्रभाग क्र. २ मध्ये विविध स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या कामाचा सन २०१९-२० चे सुधारीत २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश करणे व खालीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखा शिर्षक | सन २०२०-२१ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२०-२१ साठी एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मध्ये विविध स्थापत्य अनुषंगिक कामे करणे | नविन काम | | विशेष योजना | - | २७००००० | - | २७००००० |
| २ | प्रभाग क्र.२ चिखली मधील भैरवनाथ मंदिर ते विसावा चौक ते आंळदी पर्यंत ३० मी. रस्ता विकसित करणे | ३२ | | ६६ | २००००००० | - | २७००००० | १७३००००० |
| | एकुण | | | | २००००००० | २७००००० | २७००००० | २०००००००० |

तसेच पिंपरी (HDH आरक्षण क्र.७७) येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेच्या प्रकल्पात मुलभूत सुविधा (Infrastructure)

पुरविणेकामी सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी. केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत पिंपरी (HDH आरक्षण क्र.७७) येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेचे प्रकल्प राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर आहेत.

प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम पुर्ण करुन लाभार्थ्यांना हस्तांतरण करणेपुर्वी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याकामी प्रकल्पातील मुलभूत सुविधा विषयक कामे (उदा. सिमाभिंत, रस्ते, पावसाळी गटर व रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणीपुरवठा, मेन गेट, सेक्युरिटी केबिन, क्लब हॉऊस, व्यापारी गाळे, बाग-बगीचा इ.) करणे आवश्यक आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे गृहित धरुन अं. खर्च र.रु.८०,०८,०००/- काढलेली होती. परंतू, सद्यस्थिती विषयांकित कामाचे इमारतींचे काम प्रगतिपथावर असल्याने मुलभूत सुविधा विषयक कामे करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून बांधकामाचे दर सन २०१९-२०२० च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार घेणेत आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये मुलभुत सुविधा विषयक कामे करणेसाठी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.२,९१,१७,५३७/- (अक्षरी र.रु. दोन कोटी एक्क्याण्णव हजार सतरा हजार पाचशे सदतीस फक्त) इतका येत आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,००,००,०००/- असल्यामुळे निविदा प्रसिध्द करणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

सबब, विषयांकित काम पुर्ण करणेकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेच्या प्रकल्पात मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेचे प्रकल्प राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर आहेत.

प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम पुर्ण करुन लाभार्थ्यांना हस्तांतरण करणेपुर्वी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याकामी प्रकल्पातील मुलभूत सुविधा विषयक कामे (उदा. सिमाभिंत, रस्ते, पावसाळी गटर व रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणीपुरवठा, मेन गेट, सेक्युरिटी केबिन, क्लब हॉऊस, व्यापारी गाळे, बाग-बगीचा इ.) करणे आवश्यक आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे गृहित धरुन अं. खर्च र.रु.४,९४,७४,०००/- काढलेली होती. परंतू, सद्यस्थितीत विषयांकित प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर असल्याने मुलभूत सुविधा विषयक कामे करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून बांधकामाचे दर सन २०१९-२०२० च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार घेणेत आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये मुलभुत सुविधा विषयक कामे करणेसाठी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.५,८९,५७,०००/- (अक्षरी र.रु. पाच कोटी एकोणनव्वद हजार सत्तावन्न हजार फक्त) इतका येत आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.५,००,००,०००/- असल्यामुळे निविदा प्रसिध्द करणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब, विषयांकित काम पुर्ण करणेकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मौजे किवळे

येथील स.नं. ३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र.४/११२ (जकात नाका) अनव्ये एकुण १.६१ हे.आर. (१.६१) हे.आर. (१६१००.०० चौ.मी.) जागा आरक्षित आहे. या आरक्षित जागेपैकी ११९४०.०० चौ.मी.ही जागा देहुरोड कॉन्टोमेंन्ट हद्दीत येत असुन केवळ ४१६०.०० चौ.मी. क्षेत्र मनपा हद्दीत आहे. सध्या महाराष्ट्रात जकात वसुली बंद झाल्याने सदरहु आरक्षणाची भागश: जागा ताब्यात घेणे योग्य होणार नाही. तरी मौजे किवळे येथील स.नं.३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकात नाका) रद्द करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख- रक्षक चौक येथील बी.आर.टी.एस. रस्त्यालगत मिलिटरी हद्दीत भारताचा राष्ट्रध्वज उभारणेबाबत कर्नल लेफटनंट HQ३३० इनफन्ट्री ब्रीगेड यांनी त्यांचेकडील पत्र क्र. २३०९ दि. ०७/०३/२०१९ अन्वये मागणी केलेली आहे. सदर ठिकाणी ध्वज उभारलेस शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. तसेच चौकाची शोभा वाढणार आहे. तरी सदर औंध मिलिटरी कॅम्प येथे ध्वज उभारणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड शहर ही औद्योगिक नगरी आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये कामगार वर्ग वास्तव्यास आहे. कोरोना (कोविड १९) विषाणूंचा प्रादुर्भाव वाढीमुळे शहरामध्ये लहानांपासुन मोठ्यापर्यंत सर्वच उद्योग व्यवसाय शासनाच्या निर्देशानुसार माहे मार्च २०२० पासून लॉकडाऊनच्या कालावधीत पुर्णत: बंद ठेवणेत आलेले होते. कोरोनाच्या अनुषंगाने शहरातील नागरिकांसाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच उद्योगधंदे बंद असल्याने त्याचा लघुउद्योजकांना तसेच शहरातील कामगार, व्यापारी, छोटे/मोठे व्यावसायिक, उद्योजक यांना त्याचा मोठा आर्थिक फटका बसलेला आहे. त्यामुळे या नुकसानीतून बाहेर येण्यासाठी त्यांना बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे या वर्गाला महापालिकेचा मिळकतकर भरणे अतिशय जिकीराचे होत आहे. यातही शहरातील नागरिकांना महापालिकेकडुन दिलासा देणे आवश्यक आहे. सबब हि बाब विचारात घेऊन कोरोनाच्या प्रार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील सर्व कामगार, व्यापारी, छोटे/मोठे व्यावसायिक, लघुउद्योग यांच्या निवासी व बिगरनिवासी (कमर्शियल), औद्योगिक अशा सर्वच मिळकतींवर आकारणेत येणारा सहा महिन्याचा मिळकत कर माफ करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ५५८ विषय क्रमांक - ५

दिनांक-२६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.इक्षेका/वि/कावि/२१२/२०२० दि.०९/०७/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोवीड-१९ रुग्णासाठी आपत्कालीन व्यवस्थेअंतर्गत तातडीने उभारणेत येणा-या कोविड केअर सेंटर महाळुंगे इंगळे येथील म्हाडा इमारतीमध्ये तात्पुरती व्यवस्था करणेचे नियोजन आहे. याकामी दि.२३-०६-२०२० रोजी संयुक्त पाहणीच्या अनुषंगाने मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त २ यांनी मा.प्रभारी अतिरिक्त आयुक्त ३ तथा सह शहर अभियंता (वि/यां) यांना सदर इमारतीमध्ये विभागाकडील चालु कामांतुन विद्युत विषयक कामे करणेच्या तोंडी सुचना दिल्या आहेत. सदर महाळुंगे इंगळे येथील म्हाडा इमारती या महापालिका क्षेत्राबाहेरील तसेच महापालिकेच्या मालकीच्या नाहीत. परंतु तातडीची बाब म्हणुन कोवीड-१९ रुग्णासाठी आपत्कालीन व्यवस्थेअंतर्गत सदर ४ इमारतीमधील १८८ सदनिकामध्ये (७५२ खोल्या) खालीलप्रमाणे विद्युत विषयक कामे करणे आवश्यक असल्याने प्रभाग क्र.३५ मध्ये स.नं.१ मधील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उर्वरीत अनुषंगीक कामे करणे (टप्पा क्र.२) (विद्युत विषयक कामे करणे) या निविदा कामातुन करणेस मा.आयुक्त यांचेकडील मंजुर प्रस्तावानुसार दि.२६/०६/२०२० रोजी मान्यता दिली आहे. सदर चालु काम मे.रिअल इलेक्ट्रीकल्स, पिंपरी यांना (निविदा क्र.08/01 --- 19/20, नि.र.रु.४,०३,९०,२३८/--, नि.दर ६ % कमी) देणेत आलेले आहे. सदर इमारती नविन असुन याठिकाणी ट्युब, पंखे व दिवे बसविणेची आवश्यकता आहे. यापैकी निविदा शेड्युलमध्ये नसलेल्या बाबी अतिरिक्त बाब म्हणुन मंजुर करणेत येणार आहेत.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर | खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 48 " Ceiling Fan, DSR No.2-12-2 2018/19 | 752 | 1796 | 1350592 |
| 2 | 18 Watt LED Tube DSR No.2-1-22, 2018/19 | 752 | 570 | 428640 |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | 0.5 Watt LED Bulb DSR No.2-10-7 2018/19 | 376 | 68 | 25568 |
| 4 | Instant Water Heater 3 KW, DSR No.3-1-8 2018/19 | 141 | 3617 | 509997 |
| | | | Total Rs. | 2314797 |
| | | | 12% GST | 277775.64 |
| | | | Total Exp.Rs. | 2592572.64 |

सदर कामाच्या अनुषंगाने शासनाच्या दरसुची २०१८-१९ मधुन आवश्यक बाबींच्या समावेशाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रु.२५,९२,५७३/-- इतका खर्च होणार आहे. सदर काम अंत्यत तातडीने करणेबाबत वरिष्ठ पातळीवरुन सुचना मिळाल्याने व सदर काम निविदा काढुन करणेसाठी लागणा-या विलंबाचा विचार करता महापालिकेकडील चालु कामातुन करणेस या प्रस्तावान्वये मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. तसेच सदर इमारतीचा महानगरपालिकेमार्फत कोविड केअर सेंटर म्हणुन वापर होणार असलेने वापरापोटी येणारे वीजबील अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. याशिवाय सदर काम करताना याठिकाणी बसविणेत आलेल्या जनित्रसंच, लिफ्ट यांचा उभारणी पश्चात विनावापर असल्याने व देखभाल दुरुस्तीची कामे न केल्यामुळे अखंडीतपणे चालु राहणेसाठी आवश्यक दुरुस्ती करणे भाग पडणार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यासाठी तातडीची आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे मनपाच्या विद्युत विभागाकडील चालु कामातुन करणेचे नियोजन आहे, त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चासही मान्यता देणेत येत आहे. तसेच जनित्रसंचाच्या चालनाकामी आवश्यक डिझेल पुरवठ्यासाठी होणारा खर्च विद्युत विभागाकडील चालु जनित्रसंच इंधन बीलाच्या तरतुदीमधुन प्रतिपुर्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरकामी मा.आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

तरी, सदर कामाची अंत्यातीक तातडी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या महानगपालिका हद्दीबाहेरील महाळुंगे इंगळे कोविड केअर सेंटर येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये अंदाजे र.रु. २५,९२,५७३/- ची विद्युत विषयक कामे प्रभाग क्र.३५ मध्ये स.नं.१ मधील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उर्वरीत अनुषंगीक कामे करणे (टप्पा क्र.२) (विद्युत विषयक कामे करणे) या कामातुन करणेस, तसेच सदर ठिकाणच्या वीजवापरापोटी येणारे वीजबील महानगरपालिकेकडुन अदा करणेस,

जनित्रसंच, लिफ्ट यांची आवश्यक दुरुस्तीची कामे मनपाच्या विद्युत विभागाकडील चालु कामातुन करणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास व जनित्रसंचाच्या चालनाकामी आवश्यक डिझेल पुरवठ्यासाठी होणारा खर्च विद्युत विभागाकडील चालु जनित्रसंच इंधन बीलाच्या तरतुदीमधुन प्रतिपुर्ती करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाच्या प्रभाग क्र. ३२ मधील श्रीकृष्ण मंदिर ते बँक ऑफ महाराष्ट्र ते सांगवी फाटा पर्यत व परिसरातील रस्ते अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे (निविदा क्र.७८/४/२०१८-२०१९) या कामातून प्रभाग क्रमांक ३२ मधील माकन चौक ते बँक ऑफ महाराष्ट्र पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे, सेवा वाहिन्या बदलणे, फुटपाथ विकसित करणे इ. कामांचा अंतर्भाव करण्यात आलेले आहे. सदर रस्त्यास जोडून असणारा व सांगवी दापोडीला जोडणारा माकन चौक ते वसंतदादा पाटील पुतळ्या पर्यंतचा विकास आराखड्यातील १८ मी. रुंद रस्ता उपरोक्त कामांतर्गत विकसित करण्यात यावा. याकरिता सदर कामाची मूळ प्रशासकीय मान्यता र.रु.१०,००,००,०००/-(अक्षरी र.रु.दहा कोटी फक्त) वाढवून २०,००,००,०००/-(अक्षरी र.रु.वीस कोटी फक्त) इतकी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदर कामास सुधारित तांत्रिक मान्यता देणेस व तसेच निविदा स्वीकृत दरात भाववाढीसह सदरचे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र.32 सांगवी येथील रस्ते आधुनिक पद्धतीने विकसीत करणे कामे चालू आहेत. सदर कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणे आवश्यक आहे. तथापी सदर कामासाठी सन 2020-21 चे अंदाजपत्रकात तरतूद अपुरी असल्यामुळे सदर कामाच्या निविदा प्रसिद्ध करता येत नाही. तरी सदर कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणे साठी खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे, त्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे इतर कामातुन वाढ/घट करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्र. क्र. | लेखाशीर्ष | अंदाजपत्रक २०२०-२१ | | उपलब्ध तरतूद | सन २०२०-२१ करीता तरतूद वर्गीकरण करावयाची | | सुधारित तरतूद २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक | अ. क्र | | वाढ | घट | |
| १ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल नॅशनल स्कुल (शुभ श्री बिल्डींग) ते स्पायसर पुला पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६५ | २ | १०००० | ३१५०००० | ० | ३१६०००० |
| २ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल वसंत दादा पुतळा परीसर ते माकन चौका पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ३ | १०००० | ३०००००० | ० | ३०१०००० |
| ३ | प्रभाग क्रमांक ३२ मधिल श्रीकृष्ण मंदिर ते बॅंक ऑफ महाराष्ट्र ते सांगवी फाटा पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ३ | १०००० | २९००००० | ० | २९१०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे.(सन २०१९-२०) | | | | | | | | |
| ४ | प्रभाग क्रमांक ३१ मधिल त्रिमुर्ती कॉर्नर ते रामकृष्ण मंगल कार्यालय(भक्ती हॉस्पिटल) पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ५ | १०००० | १७०००००० | ० | १७१०००० |
| ५ | प्रभाग क्रमांक ३१ नर्मदा गार्डन कॉर्नर ते माकन चौका पर्यंत व परीसरातील रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे.(सन २०१९-२०) | ३२ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे ह प्रभाग | ४६६ | ६ | १०००० | १८५०००० | ० | १८६०००० |
| ६ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युतविषयक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६७ | ५ | १५०००००० | ० | १०००००० | १४०००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुलाचे सुशोभिकरण करणेकामी रंगीत दिवे प्रणाली (Facad Lighting) विषयक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६७ | ६ | २७४००००० | ० | ५०००००० | २२४००००० |
| ८ | भक्ति-शक्ती चौक येथील उद्यानामध्ये प्रकाश व्यवस्था सुशोभिकरण करणेविषयक अनुषांगिक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ७ | १०००००००० | ० | १०००००० | ९०००००० |
| ९ | भक्ति-शक्ती चौक येथील उद्यानामध्ये ध्वनी आणि प्रकाश संकल्पना विकसित करणेकामी कामे करणे | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ८ | २००००००० | ० | २०००००० | १८०००००० |
| १० | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुल व उद्यानामध्ये सुशोभिकरण करणे विषयक आवश्यक कामे करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | ९ | ३००००००० | ० | २६००००० | २७४००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुल व उद्यानामध्ये प्रकाश व्यवस्था करणे व ध्वनी आणि प्रकाश संकल्पना विकसित करणेकामी करणेकरिता च्या कामासाठी सल्लागार नेमणुक करणे. | मुंबई पुणे रस्ता | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे मुंबई पुणे रस्ता | ४६८ | १० | ५०००००० | ० | १०००००० | ४०००००० |
| | **एकूण** | | | | | १०७४५०००० | १२६००००० | १२६००००० | १०७४५०००० |

तसेच सन २०१९-२० च्या सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अंदाजपत्रकात कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खालील नमूद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| **अनु.क्र.** | **कामाचे नाव** | **पा.क्र.** | **अनु.क्र.** | **मुळ प्रशासकीय मान्यता** | **आवश्यक प्रशासकीय मान्यता** | **वाढीव प्रशासकीय मान्यता रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२० चिंचवडेनगर मध्ये बिजलीनगर अंडरपास करणे. | १३ | १ | १५००००००० | २००००००००० | ५००००००० |
| २ | प्रभाग क्र.१६ वाल्हेकरवाडी येथे प्राधिकरण कडून आलेल्या जागेवर सल्लागार नेमणे व शाळा इमारत बांधणे. | ६० | २० | २००००००००० | ३००००००००० | १००००००००० |
| ३ | प्रभाग क्र.१७ बिर्ला | ३० | २४ | २००००००००० | ३००००००००० | १००००००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हॉस्पिटल पासून वाल्हेकरवाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे. | | | | | |
| एकूण | | | | | | |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१९-२० च्या सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांना वाढीव प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच क क्षेत्रिय कार्यालयाकडील खालील विकास कामाचा सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. मा. महापालिका सभा ठराव क्र. ४८० दि. २/११/२०१९ अन्वये प्रभाग क्र. २ मध्ये विविध स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या कामाचा सन २०१९-२० चे सुधारीत २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश करणे व खालीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखा शिर्षक | सन २०२०-२१ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२०-२१ साठी एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मध्ये विविध स्थापत्य अनुषंगिक कामे करणे | नविन काम | | विशेष योजना | - | २७०००००० | - | २७०००००० |
| २ | प्रभाग क्र.२ चिखली मधील भैरवनाथ मंदिर ते विसावा चौक ते आंळदी पर्यंत ३० मी. रस्ता विकसित करणे | ३२ | | ६६ | २०००००००० | - | २७०००००० | १७३०००००० |
| | एकुण | | | | २०००००००० | २७०००००० | २७०००००० | २०००००००० |

तसेच पिंपरी (HDH आरक्षण क्र.७७) येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेच्या प्रकल्पात मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.. केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पिंपरी (HDH आरक्षण क्र.७७) येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेचे प्रकल्प राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर आहेत.

प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम पुर्ण करुन लाभार्थ्यांना हस्तांतरण करणेपुर्वी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याकामी प्रकल्पातील मुलभूत सुविधा विषयक कामे (उदा. सिमाभिंत, रस्ते, पावसाळी गटर व रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणीपुरवठा, मेन गेट, सेक्युरिटी केबिन, क्लब हॉऊस, व्यापारी गाळे, बाग-बगीचा इ.) करणे आवश्यक आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे गृहित धरुन अं. खर्च र.रु.८०,०८,०००/- काढलेली होती. परंतू, सद्यस्थिती विषयांकित कामाचे इमारतींचे काम प्रगतिपथावर असल्याने मुलभूत सुविधा विषयक कामे करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून बांधकामाचे दर सन २०१९-२०२० च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार घेणेत आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये मुलभुत सुविधा विषयक कामे करणेसाठी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.२,९१,१७,५३७/- (अक्षरी र.रु. दोन कोटी एक्क्याण्णव हजार सतरा हजार पाचशे सदतीस फक्त) इतका येत आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,००,००,०००/- असल्यामुळे निविदा प्रसिध्द करणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब, विषयांकित काम पुर्ण करणेकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.३,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेच्या प्रकल्पात मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेचे प्रकल्प राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर आहेत.

प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम पुर्ण करुन लाभार्थ्यांना हस्तांतरण करणेपुर्वी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याकामी प्रकल्पातील मुलभूत सुविधा विषयक कामे (उदा. सिमाभिंत, रस्ते, पावसाळी गटर व रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणीपुरवठा, मेन गेट, सेक्युरिटी केबिन, क्लब हॉऊस, व्यापारी गाळे, बाग-बगीचा इ.) करणे आवश्यक आहे.

विषयांकित कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर ठराव करतेवेळी विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम ही सन २०१६-१७ च्या DSR प्रमाणे गृहित धरुन अं. खर्च र.रु.४,९४,७४,०००/- काढलेली होती. परंतू, सद्यस्थितीत विषयांकित प्रकल्पातील इमारतींचे काम प्रगतिपथावर असल्याने मुलभूत सुविधा विषयक कामे करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून बांधकामाचे दर सन २०१९-२०२० च्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरीय दरसूची (State Schedule Rate), MJP DSR-२०१९-२० व पिं.चिं.म.न.पा. मंजूर दर पृथ्थकरणानुसार घेणेत आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये मुलभुत सुविधा विषयक कामे करणेसाठी अंदाजपत्रकीय खर्च र.रु.५,८९,५७,०००/- (अक्षरी र.रु. पाच कोटी एकोणनव्वद हजार सत्तावन्न हजार फक्त) इतका येत आहे.

परंतू, सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.५,००,००,०००/- असल्यामुळे निविदा प्रसिध्द करणे शक्य नसल्याने सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सबब, विषयांकित काम पुर्ण करणेकरिता येणा-या अंदाजपत्रकीय र.रु.६,००,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे किवळे

येथील स.नं. ३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र.४/११२ (जकात नाका) अनव्ये एकुण १.६१ हे.आर. (१.६१) हे.आर. (१६१००.०० चौ.मी.) जागा आरक्षित आहे. या आरक्षित जागेपैकी ११९४०.०० चौ.मी.ही जागा देहुरोड कॉन्टोमेंन्ट हद्दीत येत असुन केवळ ४१६०.०० चौ.मी. क्षेत्र मनपा हद्दीत आहे. सध्या महाराष्ट्रात जकात वसुली बंद झाल्याने सदरहु आरक्षणाची भागश: जागा ताब्यात घेणे योग्य होणार नाही. तरी मौजे किवळे येथील स.नं.३६ पैकी या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. ४/११२ (जकात नाका) रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २६  पिंपळे निलख- रक्षक चौक येथील बी.आर.टी.एस. रस्त्यालगत मिलिटरी हद्दीत भारताचा राष्ट्रध्वज उभारणेबाबत कर्नल लेफटनंट HQ३३० इनफन्ट्री ब्रीगेड यांनी त्यांचेकडील पत्र क्र. २३०९ दि. ०७/०३/२०१९ अन्वये मागणी केलेली आहे. सदर ठिकाणी ध्वज उभारलेस शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. तसेच चौकाची शोभा वाढणार आहे. तरी सदर औंध मिलिटरी कॅम्प येथे ध्वज उभारणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहर ही औद्योगिक नगरी आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये कामगार वर्ग वास्तव्यास आहे. कोरोना (कोविड १९) विषाणूंचा प्रादुर्भाव वाढीमुळे शहरामध्ये लहानांपासुन मोठ्यापर्यंत सर्वच उद्योग व्यवसाय शासनाच्या निर्देशानुसार माहे मार्च २०२० पासून लॉकडाऊनच्या कालावधीत पुर्णत: बंद ठेवणेत आलेले होते. कोरोनाच्या अनुषंगाने शहरातील नागरिकांसाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच उद्योगधंदे बंद असल्याने त्याचा लघुउद्योजकांना तसेच शहरातील कामगार, व्यापारी, छोटे/मोठे व्यावसायिक, उद्योजक यांना त्याचा मोठा आर्थिक फटका बसलेला आहे. त्यामुळे या नुकसानीतून बाहेर येण्यासाठी त्यांना बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे या वर्गाला महापालिकेचा मिळकतकर भरणे अतिशय जिकीराचे होत आहे. यातही शहरातील नागरिकांना महापालिकेकडुन दिलासा देणे आवश्यक आहे. सबब हि बाब विचारात घेऊन कोरोनाच्या प्रार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील सर्व कामगार, व्यापारी, छोटे/मोठे व्यावसायिक, लघुउद्योग यांच्या निवासी व बिगरनिवासी (कमर्शियल), औद्योगिक अशा सर्वच मिळकतींवर आकारणेत येणारा सहा महिन्याचा मिळकत कर माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५५९ विषय क्रमांक - ६

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
काक/१/कावि/३७५/२०२० दि. ०९/०७/२०२०

महाराष्ट्र राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आयुक्त महापालिका स्तरावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसंदर्भात युध्द पातळीवर निर्णय घेण्यात येत आहेत. कोरोनावर नियंत्रण मिळविण्यासाठी व त्याचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहेत. ही जबाबदारी पार पाडत असताना अधिकारी व कर्मचारी यांचा प्रत्यक्ष कोरोनाग्रस्थ रुग्णाशी संपर्क येत आहे. त्यातून उध्दभवणा-या समस्यांवर मात करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. यासाठी भारत सरकार, दिल्ली यांचेकडील पत्र क्र.F.No.Z%18016/1/2020 PMGKP-NMH II Dated 03 rd April 2020 अन्वये कळविलेनुसार केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वास्थ मिशन अंतर्गत “Pradhan Mantri Garib Kalyan Package Insurance Scheme For Health Workers Fighting COVID-19” या योजने अंतर्गत अधिकारी/कर्मचा-याना सुरक्षा कवच पुरविले आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा संसर्ग होऊन दिवंगत झाल्यास त्यांच्या वारसांना अर्थसहाय्य व मनपाच्या सेवेत सामावून घेण्याची योजना आदेश क्र.काक/२/कावि/२४५/२०२० दिनांक ०९/०४/२०२० अन्वये लागू करणेत आली

आहे. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.०४/व्यय-९ दिनांक २९ मे २०२० अन्वये ज्या अधिकारी/कर्मचारी यांना Pradhan Mantri Garib Kalyan Package Insurance Scheme For Health Workers Fighting COVID-19" या योजनेअंतर्गत सुरक्षा कवच लागू केलेले कर्मचारी वगळून उर्वरीत अधिकारी /कर्मचारी यांना सुरक्षा कवच लागू करणेत आले आहे. त्याअनुषंगाने प्रचलित सुरक्षा कवच योजनेत बदल करुन सदर योजना पुढीलप्रमाणे लागू करणेत
येत आहे -

१. <u>योजनेचे नाव</u> - कोरोना विषाणू (कोव्हीड - १९) प्रतिबंध व उपचार सुरक्षा कवच योजना.
२. <u>योजना कोणास लागू होईल</u> - कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपातील सर्व अधिकारी/कर्मचारी व मनपाकरीता सेवा देणारे कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले/ रोजंदारी /तदर्थ/मानसेवी/ मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांना लागू राहील.

३. <u>योजनेचे स्वरूप</u> –

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका रुग्णालये/दवाखाने/आरोग्य विभाग /वैद्यकीय विभागाकडील प्रत्यक्ष कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी व कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपातील अधिकारी / कर्मचारी, मनपाकरीता सेवा देणारे कंत्राटी/बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले/रोजंदारी/तदर्थ /मानसेवी/मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांचे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निधन झाल्यास त्यांचे वारसांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वास्थ मिशन अंतर्गत "Pradhan Mantri Garib Kalyan Package Insurance Scheme For Health Workers Fighting COVID-19" या योजनेअंतर्गत व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.०४/व्यय-९ दिनांक २९ मे २०२० मधील सर्व अटी व शर्तीसह र.रु. ५० लाख अर्थसहाय्य अनुदेय राहील.

ब) कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपातील अधिकारी/कर्मचारी व कंत्राटी/बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ /मानसेवी /मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांचे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निधन झाल्यास सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २१/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती व मनपाकडून र.रु. २५ लाख अर्थसहाय्य देय राहील.

क) कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपातील अधिकारी/कर्मचारी व कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले /रोजंदारी/तदर्थ/मानसेवी/मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांचे वारस यांनी अनुकंपा नियुक्तीचा विकल्प न स्विकारल्यास त्यांना महापालिकेतर्फे अतिरिक्त र.रु.२५ लाख देय राहील. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील दिनांक २१/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वर्ग क व ड संवर्गातील कर्मचा-यांसाठी अनुकंपा नियुक्तीचा लाभ देय राहील.

ख) वर्ग अ व ब मधील अधिकारी व कंत्राटी कामगार यांना मा. महापालिका सभा व महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीनंतर विशेष बाब म्हणून अनुकंपा नियुक्तीचा लाभ देय राहील.

- <u>लाभार्थी</u> :- कोरोना विषाणू प्रतीबंधात्मक उपाययोजनेकामी महापालिकेतर्फे नियुक्त करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी व मनपास सेवा देणारे कर्मचारी / कंत्राटी / बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले/ रोजंदारी / तदर्थ/ मानसेवी/ मानधनावरील नियुक्त केलेले कामगार
- <u>वारस</u> :- कायदेशीर पात्र वारस तसेच अविवाहित कामगारांचे बाबतीत त्यांचेवर अवलंबून असणारे आई / वडील, अविवाहित भाऊ / बहिण इत्यादी.
- <u>निर्णय घेण्याचे अधिकार</u> :- सदर योजनेची अंबलबजावणी व निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
- <u>योजनेची मुदत</u> :- सदर योजनेची मुदत केंद्र व राज्य सरकारने लागू केलेल्या दिनांकापर्यंत राहील.

- <u>अटी व शर्ती</u> -

कोरोना विषाणू (कोव्हीड – १९) प्रतिबंध व उपचार सुरक्षा कवच योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे -

१. केद्रं व राज्यशासनाकडील अनुदानाकरीता पात्र असलेले अधिकारीकर्मचारी यांना केंद्र व राज्यशासनाने लागू केलेल्या योजनेतील/ .सर्व अटी व शर्ती लागू राहतील

२. संबधित अधिकारी / कर्मचारी हा मयत होण्यापूर्वी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये कोरोना प्रतिबंधक उपाय योजनेची अंमलबजावणी करीत असताना संपर्कात आल्याने त्यास कोरोनाचा संसर्ग झाला असल्याचे सिध्द होवून त्यामध्ये त्याचा मृत्यू झाल्यास सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

३. संबंधीत अधिकारी / कर्मचा-यास शासकीय रुग्णालयात / राष्ट्रीय विषाणू संस्थेमध्ये तपासणी अंती कोरोनाची बाधा झाल्याचा अहवाल प्राप्त झालेनंतर व त्यामध्ये त्याचा मृत्यू झाल्यास सदर योजनेच्या लाभास पात्र राहील.
४. सदर अधिकारी/कर्मचारी कर्तव्यार्थ नियुक्त असताना मयत झाल्याबाबत संबंधीत विभागप्रमुखांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील.
५. मनपाकडील योजनेचा कालावधी, निकष व रक्कम यामध्ये बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
६. उपरोक्त सुरक्षा कवच योजनेसाठी लागणारा निधी लाभार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात महापालिकेच्या लेखा विभागाने उपलब्ध करुन द्यावा.

त्यामुळे कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत असलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी तसेच मनपासाठी सेवा देणारे/कंत्राटी कामगार यांना लागू करणेत आलेल्या सुरक्षा कवच योजनेस विधी समितीमार्फत मनपाचे सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू सद्यस्थितीत मा. विधी समिती अस्तित्वात नसल्याने प्रकरणी मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** सर्वांनी खाली बसून घ्यावे.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आम्ही एवढच सांगतोत की आमचा या विषयाला विरोध नाही. परंतु काही डॉक्टर राहीलेले आहेत, काही जण कोविडच्या काळात काम करतात त्यांच कस करणार आहेत एवढ एक्सप्लेशन आम्हांला मिळाल पाहीजे. आमचे जे अज्ञानी नगरसेवक आहेत, जे नवीन नगरसेवक आहेत त्यांचे खुप गैरसमज झाले आहेत. आयुक्त साहेब, डॉ.वाबळेंचा विषय पण आपण क्लिअर केला पाहीजे. आमच्या डोक्यामध्ये संभ्रम आहे की मग हे करतात काय, एवढी वर्षे ते काय काम करतात. एवढतरी एक्सप्लेशन आम्हांला प्रशासनाकडून मिळाल पाहीजे. उरलेली जी सतरा-आठरा डॉक्टर लोक आहेत त्यांच आपण काय करणार आहात. त्यांनाही सामावून घेतल पाहीजे. आमचा कोणत्याही डॉक्टरांना विरोध नाही. सगळया डॉक्टरांनी एकत्र

मिळून काम केल पाहीजे, आम्हांला त्या वादात जायच नाही. परंतु माझ एवढ म्हणण आहे की उरलेल्या डॉक्टरांच आपण काय करणार आहेत. जो पॅरामेडीकल स्टाफ आहे त्यांचा विषय होणार का. उपसूचना देवून तो विषय होईल का एवढ तरी आम्हांला एक्सप्लेशन पाहीजे. आजच मी ऐकल की २४० दिवस कन्टीन्यू काम केल्यानंतर त्याला कायम सेवेत सामावून घेतल पाहीजे. मग जे आता कोविडमध्ये लागलेले आहेत त्यांना पण सामावून घेतल पाहीजे. एवढया महामारीच्या काळामध्ये त्यांनी आपल्याला साथ दिलेली आहे. डॉक्टरही नाण्याची एक बाजू आहे दुस-या बाजूला पॅरामेडीकल स्टाफ आहे मग दुस-या बाजूचा पण आपण विचार केला पाहीजे, याचही आम्हांला एक्सप्लेशन पाहीजे. महापौरताई तुम्ही मॅरेथॉन खेळू नका आम्हांला पण विषयामध्ये माहीती पाहीजे. आम्हांलाही माहीती कळाली पाहीजे. वायसीएममध्ये जे रुबी हेल्थ केअर आहे त्याचही काय करणार आहेत त्याचीही आम्हांला माहीती पाहीजे. सगळया जणांना फक्त बोलू दिलं पण एक्सप्लेशन नाही केलं. डॉक्टरांच्या विषयाला आमचा विरोध नाही डॉक्टरांचा विषय झालाच पाहीजे, तो तुम्ही केलाच पाहीजे. ते कोरोनायुध्दे आहेत त्या बद्दल आमच काही म्हणणं नाही. परंतु काही डॉक्टरांचा विषय करते वेळेस दुस-यांवर अन्याय होवू नये. एवढ फक्त विश्वस्त म्हणून आमच काम आहे बाकीतर तुमच्या हातात आहे. माझ फक्त एवढ म्हणण आहे की राहीलेल्यांच कस करणार. पॅरामेडीकल स्टाफच कस करणार. २४० दिवस भरलेत त्यांच कसं करणार. आता जे लागलेले आहेत त्यांच कसं करणार. डॉ.वाबळे यांच्या डेसिग्नेशन बद्दलही आम्हांला माहीती दया.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमची उपसूचना स्विकारली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. आपण ज्या पध्दतीने पॅरामेडीकल स्टाफ असेल, घंटागाडी कर्मचारी असतील त्याचप्रमाणे ॲम्ब्युलन्स ड्रायव्हर असतील त्याचप्रमाणे विवीध कर्मचारी वायसीएम रुग्णालयात कोवीड काळात त्यांची ज्या पध्दतीने मदत झाली, नर्सेस असतील किंवा घंटागाडी कर्मचारी असतील त्या सगळया कर्मचा-यांच मी पहील्यांदा आभार मानतो. त्यांनी शहरातील कोरोना कसा रोखता येईल त्यासाठी प्रयत्न केला आहे. त्याच पध्दतीने मी आयुक्त साहेबांचे विशेष आभार मानतो की मागच्या मिटींगमध्ये राहूल कलाटे असतील, सचिन चिखले असतील, योगेशभाई असतील त्याचप्रमाणे डॉ.वैशालीताई घोडेकर असतील यांनी पॅरामेडीकल नर्स असतील किंवा तीथे काम करणा-या आया असतील, मावशा

असतील किंवा सिक्यूरीटीचे अधिकारी असतील यांना सगळयांना कायम कराव यासाठी त्यांनी पण आग्रह धरला होता त्यांचे पण मी आभार मानतो. मी सभागृहाला सांगू इच्छितो की याचा मी वेळोवेळी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आपल्याला सांगून मी आयुक्तांकडे पाठपुरावा केला. त्यामुळ आयुक्त साहेबांनी, पवार साहेबांनी, संतोष पाटील साहेबांनी पुर्ण एचओडीची मिटींग लावून त्याच्यावर आपल्याला कसा मार्ग काढता येईल त्यासाठी प्रयत्न केला. त्यानुसार हा विषय जनरल बॉडीसमोर आणावा यासाठी त्यांनी आम्हांला सांगीतल त्यामुळे हा विषय आम्ही जनरल बॉडी समोर आणला. ज्या लोकांनी आपल्याला कोरोना काळात मदत केली आहे आणि पाच वर्षाच्या पुढे जे कर्मचारी आपल्या महापालिकेमध्ये काम करतात त्यांना कायमस्वरुपी कराव यासाठी सर्व सभागृह अग्रही आहे. ते सर्वपक्षीय अग्रही आहे. तरी मी सर्व सभागृहाला सांगू इच्छितो की आपल्या सभागृहाच्या ज्या मागण्या आहेत ते सर्व स्टाफ, सर्व नर्सेस, सर्व कर्मचारी यांनी कोवीड काळात आपल्याला मदत केली आहे त्यांना कायमस्वरुपी कराव असा आपण आता जनरल बॉडीसमोर ठराव केला आहे आणि तो सर्वपक्षानी एकमताने मंजूर केला आहे त्यामुळ मी सर्व सभागृहाचे आभार मानतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर कशाला चुकीच्या पध्दती पाडता तुम्ही. मा.उपमहापौर पण पहील्या विषयाशी सलग्नच आताशी ते बोलले. मग मधल ते चित्र निर्माण करायच होतं ते कशासाठी करायचं होतं. काही कारण होतं का तुम्हांला. ज्यावेळेला तीन नंबरचा विषय चालू होता त्यावेळेला जो आता खुलासा झाला तो तीन नंबरच्या विषयाला का नाही झाला. कमीशनरशी तुम्ही मिटींग घेतली बंद दाराआड कमीशनरांशी काय काय बोलता आम्हांला काय माहिती.

**मा.महापौर -** विषयावर बोला.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, विषयावरच बोलते. मला फापटपसारा करुन फालतू बोलायला आवडत नाही आणि लाईन सोडूनपण मी बोलत नाही. आम्ही पण सभागृह दोन दोन, तीन तीन वर्षे चालवल आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** योगेश बहल साहेब आपण गोंधळ घालू नका, आपण बसून घ्या.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर तुम्ही, पक्षनेते, काही लोक मिटींगला बोलवले आणि तुम्ही जर बंद दाराआड मिटींगा करत असालतर ते आम्हांला समजल पाहीजेना तुमच्या बंद दाराआड काय मिटींगा चालल्यात त्या. तुमच्या ताकदीवर तुम्हांला जे करायच ते करा. आम्ही तुम्हांला हेच सांगत होतो बंद दाराआड झालेल्या चर्चेला महत्व सभागृहामध्ये नसतं. तुम्ही बंद दाराआड कितीतरी व्यवहार ठरवता म्हणजे ते सभागृहाला मान्य असतील असं होत नाही. सर्वश्रेष्ठ सभागृह आहे आणि सभागृहात ज्या गोष्टी चालतात त्याच सभागृहात चालल्या पाहीजेत. जे कमीशनर तुमच्याशी बंद दाराआड बोलतात तोच खुलासा तुम्ही इथे करानां. तुम्ही आम्हांला मिटींगला बोलवल होतं का, नव्हत बोलवलं. आमचा काही विरोध आहे का कामगार लोकांना, नाहीनां. आहो, पण जे तुम्ही ठरवताना ते इथे समोर कळल पाहीजे. आयुक्त साहेब, आजच्या या विषयामध्ये पाच वर्षे कॉर्पोरशनच्या सेवेमध्ये ज्यांची मानधनावर सर्व्हिस झालेली आहे त्या लोकांना तुम्ही परमनन्ट करायच आहे. आता कोवीडमध्ये करतात तो विषय वेगळा आहे. परंतु आता जो उपसूचनेद्वारे विषय दिला त्याच्यामध्ये असं सांगीतल की पाच वर्षे काही लोक कॉन्ट्रॅक्ट मध्ये काम करतात त्यांना सुध्दा परमनन्ट केल पाहीजे. मानधनावर काम करतात त्यांना सुध्दा परमनन्ट केलं पाहीजे. मा.महापौर साहेब, आम्ही तुम्हांला हेच सांगतो की या सगळया लोकांना तुम्ही परमनन्ट करु शकता का. आम्ही एकाही डॉक्टरांच्या विरोधात नाही. डॉ.पंडीत सारखे सिनीअर इथे बसलेले असताना त्यांच्याबद्दल काय सभागृहाने शब्द काढलेले आहेत, सभागृह विसरल वाटत. त्यावेळेला मी एकमेव म्हणणारी अशी होती की पंडीत डॉक्टरांसारख्या सिनीअर ते बी.जे.मेडीकलमध्ये आहेत त्यांना बोलवणार असेलतर त्यांच्या विरोधात कमीत कमी चांगल बोलाव. त्यांना बोलवता आणि वाईट ट्रिटमेंट देता अशी देऊ नका. आम्ही कोणत्याही डॉक्टरांच्या विरोधात नाहीत. आता जे कोविडसाठी काम करतात परंतु तुम्ही बाकीचा विषय त्याला जोडलेला आहे, दुकानदारीसाठी परत तुमच्या ज्या उपसूचना आहेत त्या उपसूचनेच तुम्ही काय करणार आहात, खुलसा तर होवू दयात ना. ऐरवी आपण कितीतरी सुट्टया मारतो. गणपती बसवायच्या दिवशी सभा, गौरीच्या दिवशी सभा. या दिवसामध्ये सुध्दा सभागृहात यायच असेलतर आणि बोलूच दयायच नसेलतर तुमच्या चेंबरमध्ये घ्याना मिटींग. आणि म्हणून आम्ही सांगतो की याच्यामध्ये फार मोठया

प्रमाणात आर्थिक घोटाळा झालेला आहे. आयुक्त साहेब तुम्ही प्रायव्हेट लोकांना कोविड चालवायला दिलेल आहे. तीनशे लोकांच युनिट आहे आज तीथ लोकानी जाओ अगर नाही जाओ त्यासाठी रोजचे १ लाख ६५ हजार रुपये त्यांना दयायचे आहेत. असे दोन ठिकाण तुम्ही केलेले आहेत. अक्षरशः अशी परिस्थिती आहे की लोकांची ऍण्टीजेन टेस्ट करता. आयुक्त साहेब, आम्ही खरच गणराया चरणी प्रार्थना करते की तुमच भविष्य खोट खोट खोट ठरत जाओ. तुम्ही म्हणताना इतका आकडा होईल, तीतका आकडा होईल. आहो, तो आकडा होईल म्हणजे सर्दी, पडस, खोकल ज्या माणसाना आहे कँप लावता. मासुळकर कॉलनीमध्ये एक गोष्ट घडली. दोघ नवरा बायको घराला कुलूप लावून आले तीथे कँप लागला म्हणून टेस्ट करायला गेले त्यांची टेस्ट आली पॉझिटीव्ह. त्यांना डायरेक्ट ऍम्ब्युलन्स मध्ये घातल आणि घरकुलमध्ये नेऊन टाकलं. ही कुठली परिस्थिती. आहो, त्या लोकांची परिस्थिती आहे का त्यांना कार्पोरेशनच्या हॉस्पिटलमध्ये जायच का, घरकुलमध्ये जायच का, का त्यांना बाहेर कुठे हॉस्पिटलमध्ये जायच का हे विचारानां. का आपल्याला तीनशे लोकांचे पैसे दयायचे आहेत म्हणून असं का. आयुक्त साहेब, तुम्हांला स्थायी समितीने अधिकार दिला म्हणून याचा अर्थ असा होत नाही, तुम्हांला सुध्दा प्रत्येक गोष्टीचा खुलासा आणि प्रत्येक गोष्टीचा हिशोब दयावा लागणार आहे. तुम्ही दुसरीकडे जरी गेलात तरी तुम्हांला त्याचा हिशोब दयावा लागेल. याचा अर्थ असा होत नाही की त्या माणसाचे इतके इतके दिवस भरलेच पाहीजेत, आकरा दिवस राहीलेच पाहीजे. आकरा दिवस तीथे राहीलेच पाहीजे, आख्खी फॅमिलीची फॅमिली नेऊन तीथे टाकतात. मी पुराव्यानिशी सांगते. आम्हांला नाव घ्यायची नाहीतर कोविडच्या पेशंटची, नाहीतर नाव सुध्दा सांगीतली असती. एकतर दुस-याच्या वॉर्डामध्ये मला काही करायच नाही त्यादिवशी त्या डॉक्टरांना सांगीतल हा मासुळकर कॉलनीमधला पेशंट आहे तीथले चार नगरसेवक आहेत ते बघतील. एका सोसायटीमध्ये एक पेशंट निघाला की तुम्ही सगळयांना म्हणता चला, सगळयांनी टेस्ट करायची. आहो, ज्याला गरज आहे ज्याला वाटतय तो टेस्ट करेल. का आपल्याला तुमच भविष्य खर करण्यासाठी सगळयांच्या टेस्ट करायच्या. कोरोना आहे म्हणजे नेमक काय करायच. तुमच्या कॉलनीमध्ये एक पेशंट निघाला आणि पाचशे लोकांच्या टेस्ट केल्या आणि पाचशेच्या पाचशे लोक नेलेतर चालतील का, मग आता हे चालू आहे. मा.महापौर साहेब, हे चाललेल कामकाज आम्हांला बिलकूल पसंद नाही. दोन वाजता सभा आहे तुम्ही सभागृहाच्या नियमाप्रमाणे

वागत नाहीत. आम्ही दोन वाजता सभागृहामध्ये होतो. आम्हांला आजही अधिकार आहे की आम्ही दोन वाजता महापौर नाही आलेतर पिठासीन प्राधिका-याची नेमणुक करुन मा.महापौरांच्या खुर्चीवर जाऊन बसू शकतो. मी मगाशीच नगरसचिवाना म्हणले की तुम्ही मा.महापौरांना दहा मिनीटे अगोदर का सांगत नाहीत. एखादया वेळेस नक्की समजू शकतो. रस्त्यात कुणाचातरी ऍक्सिडेंट झाला तुम्ही कुणालातरी मदत करतात हे सगळ मान्य आहे. परंतु हे दरवेळेला सभागृह टोटली चुकीच्या पध्दतीने चाललेल आहे. आणि बोलू दयात नां, नाही त्या विषयावर चार चार तास बोलायला देता आणि ज्या विषयावर बोलायच आहे त्या विषयावर अजीबात बोलू दिलं जात नाही. आणि म्हणून मा.महापौर साहेब मी तुम्हांला सांगते की आताच्या ज्या झालेल्या उपसूचना आहेत. आम्ही कुठल्याही डॉक्टरांच्या, कोराना योध्दयांच्या विरोधात नाही. आम्हांला पण पाहीजेतना ते लोक पण तुम्ही क्लिअर करानां. एवढ अंधारात ठेवून तुम्हांला या गोष्टी कशासाठी करायच्या किंवा पुढ पळा पुढ पळा हे कशासाठी. जे करायचच असेलना ते परफेक्ट खुर्चीवर बसून करा. करा तीथे बसून आणि स्वाभिमानाने सांगा की मी एवढ सगळ केलय म्हणून. पळून काय करणार आहात. पण लोकांना बोलूतर दयानां. आम्ही कितीही ओरडलो आणि काहीजरी केलतरी तुम्ही तुमच्याप्रमाणे विषय करणारच आहात. मग कशाला तुम्ही एवढी पळापळी करताय. आणि सगळे विषय झाल्यानंतर परत तीन नंबरच्या विषयावर आम्ही चर्चा करायची हे कुठल्या तत्वात आहे. दरवेळेला हेच होत मग तुम्हांलाही माहीती आहे की हा विषय चर्चेसाठी आहे. मग चर्चेसाठी जर विषय आहे तर त्यावर तुम्ही बोलू दिलंच पाहीजे. आयुक्त साहेब, चुकीचा विषय सभागृहाने जरी केला आणि त्याच्यावर जर तुम्ही सही केलीचतर गाठ आहे, मी कधीही असं बोलत नाही साहेब. तर तुमची आमची गाठ आहे एवढच सांगते. तुमचे इथे मुदत जरी झालेली असेलतर तुम्ही जिथ असाल तीथून परत आणू ही पण मी तुम्हांला कल्पना देते. आयुक्त साहेब, इथ विषय केलातरी चुकीच्या विषयावर तुम्ही अजीबात सही करु नका. सभागृह काहीही करेल, सभागृह मॅरेथॉन खेळते, काहीही मिटींगा ठरतात, कुठही काही ठरतं, कशातही काही ठरतं. शिक्षणमंडळवाल्यांनी काय केल मग. शिक्षणमंडळवाले पण किती वर्षे झाले ते लोक दोन हजार मानधनावर काम करतात. जी लोक प्रामाणिक आहेत ती दोन-दोन हजारावर काम करतात. जी कोर्टात गेली त्यांना हे करणार आणि जी कोर्टात गेली नाहीत त्यांच कोण करणार. ते सुध्दा सफाई कामगार कोरानामध्ये तुमच्या शाळेवर येतात. म्हणून तुम्हांला तो

विषय सांगीतला की पाच वर्षे झालेले जी लोक असतील त्यांना सगळयांना तुम्हांला परमनन्ट कराव लागेल. आम्ही कामगारांच्याच बाजून आहोत, आम्ही नागरीकांच्याच बाजूने आहोत. आम्हांला सुध्दा तेच करायच आहे. आम्हांला काही दुसर करायच नाही, आम्ही नागरीकांच्या बाजूने आहोत, आम्ही डॉक्टरांच्या बाजूने आहोत, आम्ही कोरोना योध्दयांच्या बाजूने आहोत आम्ही सगळयांच्याच बाजूने आहोत. पण नियम सरसकट लागला पाहीजे. मा.महापौर साहेब, हे चाललेल काम अस बीलकूल सुध्दा बरोबर नाही. विषय मंजूर करायचा आणि पुढे गेल्यानंतर चर्चा करा म्हणायचं. आयुक्त साहेब, याच्यातल जे जे चुकीच आहे ते वगळून तुम्ही ज्या गोष्टी आहेत त्या करा.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सहा नंबरचा विषय खरतर खुप महत्वाचा विषय आहे. म्हणजे प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज इन्शुरन्स यातल सगळयांना माहीती आहे.

(सभागृहत गोंधळ)

**मा.महापौर -** बहल साहेब विषय क्रमांक ६ वा चालू आहे. तुम्ही खाली बसा.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा विषय सुध्दा कोरानाशीच संबंधित आहे. कर्मचा-याशी संबंधित आहे. योगेशभाई हा विषय सुध्दा कोरोनाशीच संबंधित आहे. हा विषय सुध्दा कर्मचा-याशी संबंधित आहे. योगेशभाई खरतर या संदर्भामध्ये मंगलाताईनी चांगल्या सुचना मांडल्या आहेत. ज्यावेळेस एखादा विषय या सभागृहामध्ये येतो, सगळयाच्या भावना कर्मचा-यांच्या बाबतीत चांगल्या आहेत. हा सहा नंबरचा विषय कर्मचा-यांच्या इन्शुरन्सच्या संदर्भातील आहे. हा विषय खुप महत्वाचा विषय आहे. मा.महापौर आपल्या सगळयांना बोलायला देतील. मा.महापौर साहेब, या सभागृहाच लक्ष मी या अत्यंत महत्वाच्या विषयाकड वेधू इच्छितो. ज्यावेळेस महापालिकेच्या सेवेमध्ये अनेक कर्मचारी काम करतात. त्यावेळेस त्या कर्मचा-यांना इन्शुरन्स असेल, धन्वंतरी असेल, ऍक्सिडेंन्टल पॉलीसी असेल या सगळया विषयामध्ये त्याचा मृत झाला, आजारी पडलातर शंभर टक्के त्याला फायदा हातो. जे कंत्राटी कामगार आहेत जे स्वच्छतेच्या संदर्भामध्ये रस्त्यावर जावून आपला जीव मुठीत घेवून कोरोनाच्या काळामध्ये सुध्दा लोकांना आपली सेवा देतात. झोपडपट्टीमध्ये, गावागावामध्ये, घराघरामध्ये जावुन आपल्या

शहरामधल्या लोकांना कोरोनाच्यापासून सुरक्षितता मिळावी अशा पध्दतीचा प्रामाणिक पणाने प्रयत्न करतात अशा कर्मचा-यांना जर कोरोनामुळे बाधा झालीतर त्या कर्मचा-यांना सुध्दा २५ लाख, ५० लाख मा.प्रधानमंत्रीच्या इन्शुरन्स मधुन मिळाले पाहीजे हा विषय आहे. ताईनी सांगीतल, ताई हे खरं आहे आणि माझही त्या संदर्भामधल म्हणणं आहे क्वॉरंटाईन सेंटरमध्ये पण एखादया गोष्टीला, त्या माणसाला जर प्रेशर केलेलं असेलतर माझी या निमीत्तान सर्व अधिका-यांना विनंती आहे की एखादा माणूस जर क्वॉरंटाईन सेंटर पेक्षा त्याच्या घरामध्ये जर क्वॉरंटाईनची त्याची चांगला व्यवस्था असेलतर, त्याला कुठल्याही पध्दतीचे लक्षण जर चालू नसतील अशा पध्दतीचे लोकांना आपल्या घरामध्ये ठेवल पाहीजे कारण विनाकारण आपण महानगरपालिकेचे, शासनाचे पैसे या निमीत्तान उधळपट्टी करण्याच काहीही कारण नाही. ज्यावेळेस एखादा माणुस आपल्या स्वतःच्या घरामध्ये रहातो आणि प्रत्येकाला आपल्या आयुष्याची काळजी आहेनां. तीन रुमच घर असेलतर दोघ नवरा बायको वेगवेगळया रुम मध्ये राहू शकतात. म्हणजे अशा सगळया लोकांना आपण क्वारन्टाईन सेंटरमध्ये जावा अशा पध्दतीच आपण का प्रेशर करतो. मा.सहा.आयुक्तांना या संदर्भात फोन केला त्यांनी सांगीतल की कर्मचारी आपला आजार लपवतात. मला नाही वाटत, माझ्या ऑफिसमध्ये गेले अनेक वर्षे काम करणारा माझा एक सिनीअर कर्मचारी रात्री बारा वाजता कोरोनाच्या आजारान खरतर त्याच दु:खद निधन झालं. ज्यावेळेस आपण अशा कर्मचा-यांचा विचार करतो, खरतर सभागृहाच्या माध्यमातून हा जो विषयपटलावरचा विषय आहे हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. जे दुर्लक्षीत लोक आहेत ज्यांच्याकडे कुणीही बघीतल जात नाही जे की आरोग्यासाठीच काम करतात, हॉस्पिटलसाठी काम करतात, झोपडपट्टीत जावून काम करतात या सगळया कर्मचा-यांना सुध्दा आपण याच्यामध्ये इन्शुरन्सच्या माध्यमातून आणतो. अशा कर्मचा-यांच दुर्दैवान पुढच्या काळामध्ये काही जर बर वाईट झालतर अशा कर्मचा-यांच कुटूंब वा-यावर सोडल जावु नये यासाठी हा विषय आहे. मा.महापौर साहेब, मी आपल्या सगळयांच अभिनंदन करतो. अत्यंत चांगला विषय आहे. सभागृहाच्या माध्यमातून अशा कर्मचा-यांना आपण सुरक्षितता देण्यासाठीचा विषय आहे मी तुमच अभिनंदन करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर

खरं म्हणजे पहील्या विषयावरती आम्हांला सर्वांना बोलायच होतं. तुम्ही मागच्या जनरल बॉडीच्यावेळेस चर्चा घडवून आणली नंतर असं ठरल की गटनेत्यांची बैठक घ्यायची. तशी तुमची गटनेत्यांची बैठक झाली. आता बैठकीत काय ठरल हे काही सभागृहाला माहीत नाही आणि तीथून आल्यानंतर आम्हांला आमच्या पक्षाचे लोक सांगतात की बैठकीत असं ठरलं नव्हतं तुम्ही डायरेक्ट या ठिकाणी विषय मंजूर केला. जर तुमच बैठकीत ठरल होतं हा विषय मंजूर करायचा आणि मंजूर करत असताना समजा आम्ही त्या बैठकीला नव्हतो. सभागृहातील प्रत्येक सदस्याला त्या विषयावरती बोलायच असेलतर त्याला तुम्ही बोलू दिलं पाहीजे. पण तुम्ही विषय मंजूर करता आणि पुढचे चार विषय पण तुम्ही त्या गोंधळात मंजूर केले. मी मागेही तुम्हांला म्हणल तुम्ही असं करु नका चांगला पायंडा पाडा. आमचा विषयाला विरोध असेलतर आमचा विरोध नोंदवा. मतदान असेलतर मतदान घ्या. शेवटी तुमची याठिकाणी मॅजोरेटी आहे तुम्ही विषय मंजूर करणार आहात. अशा पध्दतीन चुकीच सभागृह चालू नका. शेवटी तुमच्या हातात विषय आहे पण आमच म्हणण जर तुम्ही आम्हांला मांडू दिल नाहीतर ते कितपत योग्य आहे. तुम्ही काय म्हणाले तुम्हांला सगळयांना पुढच्या विषयावर बोलू देतो. एकनाथरावानी ज्या विषयावर चर्चा केली तो विषय पण महत्वाचा आहे. आम्हांला पण त्या कंत्राटी कामगारां विषयी निश्चितपणे आपुलकी आहे. त्यांना योग्य तो न्याय मिळाला पाहीजे ही आमचीही भावना आहे. परंतु अशा पध्दतीने चुकीच सभागृह चालू नका. गेल्या तीन ते साडेतीन वर्षे तुम्ही अतीशय चुकीच्या पध्दतीने सभागृह चालवल. बजेटवरती कधीही चर्चा घडली नाही. म्हणजे ज्या चुकीच्या परंपरा तुम्ही या तीन साडेतीन वर्षात चालू केल्या त्या बंद करा मा.महापौर साहेब आणि तुम्ही महापौर झाल्यानंतर आम्ही तुम्हांला विनंती केली होती की माई तुम्ही अनुभवी आहात आणि तुम्ही सभागृहात गेल्या अनेक वर्षे काम करता त्यामुळ योग्य पध्दतीने सभागृह चलाव अशा प्रकारची अपेक्षा आम्ही तुम्हांला व्यक्त केली परंतु तसं घडत नाही तुमच्या काळात अधिक तशा पध्दतीन तुम्ही काम करता तसं करु नका मा.महापौर साहेब. आता हा जो डॉक्टरांचा विषय आहे की आपल्याला २०१३ साली श्रीकर परदेशी साहेबांनी हा विषय पुढे आणला आणि आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये एवढे मोठे हॉस्पिटल्स आपण उभे केले, गेल्या अनेक वर्षे आपण त्यासाठी योगदान दिलं आणि हॉस्पिटल्स उभी राहीली त्या हॉस्पिटलमध्ये आज डॉक्टर्स नाहीत. आपण एवढ मोठ इन्फ्रास्ट्रक्चर उभा केलं. भोसरी हॉस्पिटल असेल,

जिजामाता हॉस्पिटल असेल आपल्या शहरात अनेक मोठे हॉस्पिटल आहेत, भोसरी हॉस्पिटल किती वर्षे झालं एवढा मोठा कोटयावधी रुपयाचा आपण खर्च केला ते चालू करता येत नाही. मध्यंतरी तुम्ही तसा विषय आणला की तो प्रायव्हेटला दयाव आम्ही त्याला विरोध केला की त्याच प्रायव्हेटलायझेशन नका करु परंतु आपल्याकड जर अशाप्रकारच पोस्टग्रॅज्यूएशन महाविदयालय सुरु झालतर निश्चितपणे त्याचा फायदा आपल्या शहराला होणार आहे, आपल्या इथ नागरीकांना होणार आहे हे सगळया सभासदांच याच्यामध्ये एकमत होतं. सगळयांनी याच्या संदर्भात आयुक्तांच आणि तुमच अभिनंदन पण केलं. हा अतीशय चांगला निर्णय झालेला आहे. नुसत वायसीएमच नाहीतर पिंपरी चिंचवड शहरातले जेवढे हॉस्पिटल्स आहेत त्या सगळया ठिकाणी अशा पध्दतीचे पोस्टग्रॅज्यूएशनचे कोर्स जर करता आलेतर त्याठिकाणी आपल्याला अधिकचा मेडीकल स्टाफ मिळणार आहे. आपल्याला सगळयांना माहीती आहे की आज वायसीएम हॉस्पिटलमध्ये आणि इतर हॉस्पिटलमध्ये आपल्याकडे परमनन्ट डॉक्टर्स नाहीत. आपल्याकड पुर्णवेळ काम करणारे डॉक्टर्स नाहीत. त्यांना मदत करणारे लोक त्याठिकाणी नाहीत याच कारण असं की आपल्याकडे काम करताना काही ठरावीक काळापुरत काम करतात नंतर त्यांना दुसरी संधी मिळते. कारण आपल्या सगळयांना माहीती डॉक्टर्सना इतर खाजगी ठिकाणी प्रॅक्टीस केलीतर त्यांना खुप जास्त पैसे मिळतात. मग अशा परिस्थितीत आपल्या इथ कुठलाही डॉक्टर काम करायला तयार होत नाही ही वस्तुस्थिती आहे. मागच्या जनरल बॉडीमध्ये योगेश बहल यांनी विषय मांडला त्यांची भूमिका काय होती, एक सिनीअर नगरसेवक जेव्हा सांगतो की याठिकाणी तुम्ही जे डॉक्टर्स अपॉईट करता त्या प्रक्रीयेमध्ये आम्हांला शंका आहे. त्यांची भूमीका काय होती की तुम्ही जी निवड प्रक्रीया राबवली ती संशयास्पद आहे आणि त्याचा तुम्ही जर प्रॉपर जर खुलासा केला असता आणि त्याठिकाणी जर रितसर समाधान झाल असततर आज ही वेळ आली नसती. आज जे काही ते याठिकाणी पोटतीडकीने भांडतात, बोलतात त्याच कारण तेच आहे. आता गेल्या अनेक वर्षापासून आपण त्यांना पाहतो इतक्या रागात ते कधीच बोलत नाहीत. गटनेत्यांच्या बैठकीत तुमच काय ठरल हे आम्हांला माहीती नाही. पण याठिकाणी हा निर्णय घेत असताना कुठतरी सगळयांना बरोबर घेवून आपण केल पाहीजे. आपण सगळेजण या भूमिकेत आहोत की आपल्या शहरामध्ये मोठया प्रमाणात कोरोना वाढलेला आहे. भविष्यात पण आपल्याला अनेक अडचणी येणार आहेत.

त्या संदर्भात आपल्याला हा सगळा मेडीकल स्टाफ असेल आणि त्यांना मदत करणा-या स्टाफला आपल्याला मदत करण्याची गरज आहे त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मागच्या सभेच्यावेळेस अनेक जणांनी सांगीतले काहीना वाईट अनुभव आले काहीना चांगले अनुभव आले. परंतु काम करताना माणसाकडन निश्चितपणे चुका या होत असतात त्यामुळे आयुक्तांनी त्याठिकाणी जो स्टाफ चांगला काम करतो त्याला तुम्ही प्रोत्साहन दयावे आणि जो काम करत नाहीत त्याना शिक्षा दया. लोकांना मोटीव्हेट करा जेणेकरुन आपल्या शहरामध्ये लोकांना आज इतक्या मोठया त्रासाला सामोरे जावे लागते, आता एकनाथ पवार यांनी सांगीतल त्यांच्या ऑफिसमधला माणसाच. सगळयांना सरसकट कोरोना संदर्भातले फोन येतात, मॅसेज येतात आणि आपल्या शहरातला जो सर्वसामान्य नागरीक आहे, जो कामगार आहे त्याला आपण योग्य न्याय दिला पाहीजे. त्याला योग्य सेवा दिली पाहीजे या भूमिकेतून आपण काम केल पाहीजे. जे काही आरोप याठिकाणी झाले आम्हाला त्या खोलात जायच नाही परंतु जर चुकीच्या पध्दतीने तुम्ही प्रक्रीया राबवली असेलतर ती अशा पध्दतीने राबवू नका. श्रीकर परदेशींच्या काळामध्ये त्यांनी केल की शंभर टक्के लेखी परिक्षा घेतल्या पाहीजेत. ओव्हरल ज्या घेतल्या जातात त्याच्यामध्ये संशयाला जागा निर्माण होते. ओव्हरल घेत असताना एखादयाला फेव्हर केल जातं आणि त्यामुळ श्रीकर परदेशी साहेबांनी तो निर्णय घेतला होता आणि आपण सगळे त्या निर्णया बरोबर होतो. मला माहीत नाही याठिकाणी तो निर्णय घेतला का महापालिकेनी घेतला आणि तशा पध्दतीने तुम्ही निवड प्रक्रीया राबवली. आमची भूमिका एवढीच आहे की जे लोक इलीजीबल आहेत, जे लोक पात्र आहेत त्यांना तुम्ही त्याठिकाणी संधी दिली पाहीजे. पात्र नसतीलतर त्यांना तुम्ही संधी देवू नका परंतु जे पात्र आहेत आणि जर त्यांना डावलण्याच काम जर तुम्ही करत असालतर ते चुकीच आहे अशा प्रकारची भूमीका आमची आहे. त्यामुळ तुमची काहीतरी वेगळी भूमिका आहे आणि आमची वेगळी असं मुळीच नाही. हे करत असताना पारदर्शकता ठेवा आणि त्या हिशोबानी पुढे चाला. अजून एक मोठा विषय असा समोर आलेला आहे की आपल्या वायसीएममध्ये जे काही रुबी एलकेअर हॉस्पिटल आहे जे आपण प्रायव्हेट संस्थेला चालवायला दिलं त्याठिकाणी दर महीन्याला मागच्या महीन्यापासून ५६ लाख रु. आपण त्यांना पेमेंट करतो. म्हणजे एवढया मोठया प्रमाणात त्या हॉस्पिटलला आपण ५६ लाख रु. देत असूतर हे कितपत योग्य आहे. हे देणं योग्य आहे हे तुम्ही तपासल का.

शेवटी एकनाथराव चुक झालीतर तुम्हांला भोगावी लागेल. आम्हीतर शेवटी विरोधी पक्षात आहोत आम्ही त्याला विरोध करणार. पण एवढी मोठी रक्कम ५६ लाख दरमहा आपण रुबी एलकेअरला देतो. एवढे पैसे जर आपण त्यांना देत असूतर त्याऐवजी आपल्या स्टाफने जर काम केलतर मला वाटत जास्त योग्य राहील. तुम्ही त्याच्या खोलात गेलात का नाही हे मला माहीत नाही आणि गेला असालतर ते अतीशय चुकीच आहे. मा.महापौर साहेब, योगेश बहल यांच जे म्हणन आहे त्या म्हणण्या संदर्भात आपण या विषयामध्ये लक्ष घाला आणि ज्यांच्यावर अन्याय होत असेल तो अन्याय दुर करा अशाप्रकारची माझी आपल्याकडे अपेक्षा आहे आणि इथून पुढे माई अशा पध्दतीने सभागृह चालवू नका. अशी तुम्हांला आमची नंम्र विनंती आहे आणि असं जर चालविणार असालतर मग आम्ही पण ऑनलाईन सभा अटेंड करतो. तुम्हांला जर परस्पर करायच असेलतर कशाला आम्ही या सभागृहात यायच. गटनेत्यांच्या बैठकीला योगेशजी बहल होते, नाना काटे आजारी असल्यामुळे ते आले नाहीत परंतु तुम्ही जो काही निर्णय आहे तो योग्य तो निर्णय घ्या. जेणेकरुन शहरातल्या नागरीकांवर अन्याय होणार नाही. आपल्या शहरात कोरोना संदर्भात जे डॉक्टर्स काम करतात त्यांना मदत करणारा जो स्टाफ काम करतो त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशाप्रकारची भूमीका घेवून हा निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मला भरपूर बोलायच आहे आणि मला तुमच्या सारख गैर पध्दतीने सभागृह चालवता येत नाही मी पण महापौर होतो. पण जेव्हा पासून आपण सत्तेवर आलेला आहेत तेव्हा पासून आपण विडा उचललेला आहे की तुम्ही सभागृह सभागृहाच्या नियमाप्रमाणे चालवत नाहीत. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की मला पण त्या विषयावर बोलायच होतनां तुम्ही तो विषय ढकलून मंजूर करुन घेतला. मला विषय क्रमांक ७ आहे त्यावर बोलायच आहे कारण आता माजी पक्षनेत्यांनी खुप खुप खुप चांगल चांगल बोलले त्याच्यावर आयुक्तांचा विषय आहे इन्शुरन्सला आमचा विरोध नाही. या विषयाचा तुम्ही पहीला निर्णय घेवून टाका आणि विषय नंबर ७ ला मला बोलू दयात कारण त्या विषयाला अनुसरुन तो विषय आहे ज्याच्यावर तुम्ही कोरम नसताना तुम्ही तो विषय मंजूर केला आहे. त्यामुळ मला सात नंबरच्या विषयावर बोलायच आहे

सविस्तर बोलायच आहे. तेव्हा विषय वाचल्या वाचल्या मला परवानगी दयावी अशी माझी विनंती आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा जो विषय आहे जे कोरोनायोध्दे म्हणून कर्मचारी काम करतात या विषयात नंबर क मध्ये आपण असं म्हणलेल आहे की कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपातील अधिकारी/कर्मचारी व कंत्राटी/बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले/रोजंदारी/तदर्थ/मानसेवी/मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांचे वारस यांनी अनुकंपा नियुक्तीचा विकल्प न स्विकारल्यास त्यांना महापालिकेतर्फे अतिरिक्त र.रु.२५ लाख देय राहील. आपले जे वर्ग तीन आणि चारचे कर्मचारी आहेत त्यांना आपण अनुकंपा देतोच मग त्यांना पैसे मिळणार नाहीत का. म्हणजे जे अनुकंपा घेणार नाहीत त्यांना तुम्ही २५ लाख रुपये देणार. आपलीतर ही पहीलीच पॉलीसी आहे आणि वर्ग तीन आणि चारच्या कर्मचा-यांच्या वारसांना अनुकंपावर घेतोच. याच्यामध्ये सुधारणा करावी लागेल. हा महत्वाचा विषय आहे हा विषय आणताना अभ्यास करुन आणायला पाहीजे होता. विषय चांगला आहे परंतु त्यांना अनुकंपावर पण लागले पाहीजे आणि पैसे पण मिळाले पाहीजे. जेणेकरुन स्वतःचा जीव धोक्यात घालून ते काम करतात. परंतु हे करत असताना या विषयात ही सुधारणा करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. माई, आपण विषय क्रमाक ६ चालू असताना परत वि.क्र.३ वर चर्चा घेता. फरक काय पडला असता, जे परवा झाल ते आयुक्तांनी सगळयांना सांगीतल असतं. काय फरक पडला असता असं रेटून न्यायच कारण काय. विनाकारण ही दादागीरी करायची कशासाठी. मी आजी-माजी दोन्ही पक्षनेत्यांना म्हणलं जे परवा ठरवलना सगळे होते काही गोष्टीवर एकमत झाल नाही व काही गोष्टीवर झालं मग सभागृहाला सांगायला काय हरकत आहे. हे असं चालतना याच्यामुळे शंका यायला जास्त जागा राहील. रेटून का न्यायच. आम्हांलाही बोलायच आहे. योगेशजी बोलल्यानंतर ते बोलतील पुढच्या विषयाला आम्ही पण बोलणार आहेत. हा विषय मंजूर करावा आणि पुढच्या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**मा.महापौर –** विषय क्रमांक ६ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ७

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. प्रशा/७/कावि/४१७/२०२० दि.०९/०७/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत ०८ रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत आहेत. त्यापैकी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे बहुविध शाखांचे व ७५० खाटांच्या क्षमतेचे सर्वात मोठे रुग्णालय कार्यरत असून, त्यामार्फत महापालिका हद्दीतील नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे महापालिका हद्दीचे नजीक असणा-या ग्रामीण भागातील रुग्ण देखील या रुग्णालयामध्ये वैद्यकिय उपचारार्थ मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात.

रुग्णालयांमार्फत नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरवित असताना महापालिकेला वेळोवेळी तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची उणीव भासत असते. महापालिकेमार्फत वेळोवेळी तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करुन देखील पुर्ण क्षमतेने अधिकारी उपलब्ध होत नाहीत. परिणामी महापालिकेमार्फत देण्यात येणा-या वैद्यकिय सेवेवर याचा विपरित परिणाम होत असून, तज्ञ वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय अधिका-यांची कमतरता नेहमीच जाणवत असते. यावर महापालिकेमार्फत मानधन स्वरुपात, मानसेवी तज्ञ वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेणेत येऊन, काही प्रमाणात वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे महापालिकेची क्षमता असुनही पुरेशा तज्ञ वैद्यकिय अधिका-यांचे अभावी रुग्णसेवा पुरविणे शक्य होत नाही.

महापालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणा-या रुग्णालयांमार्फत तज्ञ वैद्यकिय अधिका-यांचे अभावी रुग्णसेवा पुरविली न गेल्याने महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुग्णसेवेचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. यास्तव वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणा-या रुग्णालयांमध्ये वैद्यकिय

अधिकारी तसेच तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची कमतरता भरुन काढणे व महापालिकेची इतर रुग्णालये सक्षम करुन रुग्णसेवा पुरविणेकरीता नजीकच्या कालावधीमध्ये नव्याने सुरु करावयाच्या ०६ रुग्णालयांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करणेबाबतचे प्रयोजन असून याकरीताचा प्रस्ताव महापालिकेच्या वैद्यकिय विभागामार्फत सादर करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | प्रस्तावित डी.एन.बी. कोर्सेस |
|---|---|---|
| १ | भोसरी रुग्णालय | अस्थिरोग/ प्लॅस्टीक सर्जरी /भूलशास्त्र / क्ष-किरण |
| २ | जिजामाता रुग्णालय | स्त्री रोग प्रसूती शास्त्र/ बालरोग/ भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ३ | थेरगाव रुग्णालय | मेडिकल व सर्जिकल ऑन्कोलॉजी / गायनाकालॉजिकल ऑन्कोलॉजी / रेडिओथेरपि / भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ४ | आकुर्डी रुग्णालय | मेडिसीन / शल्यचिकीत्सा / रिस्पेरेटरी डिसीज / भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ५ | नेत्र रुग्णालय | नेत्ररोग |
| ६ | तालेरा रुग्णालय | युरोलॉजी / नेफ्रॉलॉजी / मेडीसीन |

वरील सर्व वैद्यकिय शाखांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करण्यासाठी प्रत्येक वैद्यकिय शाखेसाठी १ सिनियर कन्सल्टंट, १ ज्युनियर कन्सल्टंट, २ सिनियर रेसिडन्ट यांची आवश्यकता असते. वरीलप्रमाणे नमूद केलेले डी.एन.बी. कोर्सेस सुरु केल्यास महापालिकेकरीता मोठ्या प्रमाणात संबंधित शाखांमधील तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होऊन, परिसरातील नागरिकांना सक्षमपणे रुग्णसेवा पुरविणेसाठी त्याचा फायदा होईल. त्याचप्रमाणे विविध वैद्यकिय शाखांकरीताचे उपचार नागरिकांना महापालिकेमधील नजीकच्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध होऊन यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयावरील रुग्णसेवेचा ताण काही प्रमाणात कमी होईल.

महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत नव्याने बांधलेल्या ६ रुग्णालयांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करणेबाबत प्रस्तावित असून त्यास

मा.महापालिका सभेची मान्यता मिळालेनंतर याकरीताच्या आवश्यक पदांची निर्मिती, सेवा प्रवेश नियमांची निश्चिती व इतर आवश्यक बाबींच्या पुर्ततेकरीताचा सविस्तर प्रस्तावास मान्यता देणे.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सत्तारुढ पक्षनेते मी आल्या आल्या आपल्याला अफजलखानची उपमा दिली. अफजलखानसारख आपण वागलात, बोलायच कारण असं की माई आम्ही तुम्हांला जिजाऊ सारख समजतो पण तुम्ही पण असे वागाल हा माझ्यासारखा छोटा कार्यकर्ता स्वप्नात पण विचार करु शकत नाही. म्हणजे माणसानी दबावाखाली किती काम कराव. माजी मंञ्यांचे फोन नगरसेवकाना आणि आज इथ बघा सभागृहामध्ये एका गटाच्या आमदारांची लोक इथ आहेत दुस-या गटाच्या भोसरीतल्या आमदारांचा एकही माणूस सभागृहात नाही. एक चुकून आला असेल त्याला आदिच आदेश मिळाला असेल. मा.महापौर साहेब, मी उच्च न्यायालयामध्ये जाणार आहे, मा. मुख्यमंञ्यांकड, मा.उपमुख्यमंञ्याकड आणि संबंधित विभागाच्या मंञ्याकड सुध्दा जाणार आहे. ज्या पध्दतीने तुम्ही विषय क्र.३ मंजूर केला आहे त्याला मी राज्यशासनाकडन स्थगीती आणण्याचा प्रयत्न करणार आहे आणि हायकोर्टात तर निश्चित जाणार आहे. मा.महापौर साहेब, या विषयावर मागच्यावेळेस जेव्हा गदारोळ झाला त्यावेळेला मला थोडी घाई होती मी विषय मांडला आणि मी लवकर गेलो निघून. आम्ही त्यावेळेला पण हे स्पष्ट केल होतं की डिन काही माझा वैरी नाही, डॉक्टर माझे वैरी नाहीत परंतु जी प्रक्रीया राबवली जात आहे ती चुकीची आहे. आपण आयुक्त साहेबांचे धन्यवाद मांनले तुम्ही सुरु केल, तुम्ही सुरु केल चांगल केल, श्रीकर परदेशी साहेबांनी प्रयत्न केले त्याला परत बाधा आली, पुन्हा प्रयत्न केले आणि पुन्हा आपण ही डॉक्टरांची भरती करायच ठरवलं. त्यादिवशीच्या मिटींगमध्ये मा.महापौर साहेब तुम्ही काय ठरवल, मी येणार नव्हतो राहूलच माझ बोलणं झाल. राहूल म्हणाला फक्त गटनेते जरी बोलवले असतील तरी त्यांचे लोक काही एकटे येत नाहीत दोनचार बॉडीगार्ड बरोबर असतातच. म्हणजे गटनेत्याबरोबर चार, त्याच्याबरोबर चार, त्याच्याबरोबर दोन, याच्या बरोबर दोन, असे सातआठ लोक आहेत एकतर तुम्ही पण या, मी म्हणलो नाही असं मी येणार नाही, मला जर

मा.महापौरांनी आमंत्रण दिलं, सत्तारुढ पक्षनेत्यांनी जर आमंत्रण दिलंतर मी येईन. सत्तारुढ पक्षनेत्यांच मी आभार मानतो की त्यांनी मला फोन केला ते मला म्हणाले तुम्ही पण या. कारण तुम्ही विषय मांडलाय, वाघेरेनां पण बोलवलं. कारण वाघेरेनी पण बरीच जंत्री जमा केली होती मी सुध्दा काही पेपर जमा केले होते आणि आपली तीथ जवळपास दोन तास चर्चा झाली. मा.आयुक्तांच्या समवेत चर्चा झाली आणि त्यावेळेला शेवटी असं ठरल की डॉक्टरांना कोणाचा विरोध नाही परंतु त्याचवेळेला सिमाताईच्या फोनवर एक मॅसेज आला आणि बाकी एका मित्राच्या फोनवर की डॉक्टर लोकांनी काळी फित लावून तीथ या नगरसेवकांचा निषेध केला. किती धाडस डॉक्टर लोकांच. तुम्ही त्या नवीन लोकांना शिकवणारे तुम्ही आम्हांलातर शिकवू शकत नाहीत तुम्ही आम्हांला शिकवण्याचा प्रयत्न सुध्दा करु नका. या लोकांनी महापौर, सत्तारुढ लोकांच्या विरोधात पण फिती लावल्याना, का फक्त आमच्या विरोधात लावल्या. मा.महापौरांच्या विरोधात, विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या विरोधात, पक्षनेत्यांच्या विरोधात, बाकीच्या सगळयांच्या विरोधात आयुक्तांच्या विरोधात पण नां. आयुक्तांची त्यांनी परवानगी घेतली का. का डीन साहेबांची परवानगी घेतली जे डीन अजून परमनन्ट झालेले नाही जो बिगर पेशंट बघताच कोरोना झाला. ज्या डॉ.खिल्लारेना काम होत नाही, आयसीयू बघता येत नाही, त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला त्यांचा राजीनामा आपण मंजूर केला, राजीनामा मंजूर केल्यानंतर ते स्वतःच क्लिनीक चालवतात, त्यांची तक्रार पण आपल्याकडे आली होती त्यांना संबंधित आयुक्तांनी बोलावून घेतल ते एमओएचला म्हणाले मला काम जमत नाही, मला जमणार नाही मी सोडून टाकतो. या डॉक्टरनी स्वतःहून राजीनामा दिला, ज्याच एजबार आहे त्यांना तुम्हांला घ्यायची काय गरज पडली. डॉ.सोनी फक्त विशिष्ठ अधिका-यांच्या केबीनमध्ये जावून खुर्ची गरम करतात, चमचेगिरीच काम करतात त्या डॉक्टर सोनीच एजबार आहे त्यांना घ्यायच नाही असं आयुक्तांसमोर ठरलं. मा.महापौर आपण हो म्हणाले मग तुम्हांला अचानक कुणाचा दबाव आला आता. कोणत्या मंत्र्याचा दबाव आला का कोणत्या आमदारांचा दबाव आला तुम्हांला. तुम्ही तीथे माझ्या समोर म्हणाले आपण या तीन गोष्टी करायच्या. कोणत्या तीन गोष्टी ठरल्या, सर्वांच्या समवेत उपमहापौर पण तीथ होते, सत्तारुढ पक्षनेता तिथ होते, आपण तिथ होता, सिमाताई तिथ होत्या, मी तिथ होतो, आपण स्वतः होता, आयुक्त होते, वाघेरे होते, राहूल कलाटे होते, आशाताई होत्या आपण सर्वजण असताना तिथ असं ठरल की हरकत नाही आपण

या डॉक्टरांना घेवू. आयुक्त त्यावेळेला हेही म्हणाले की मी माहीती घेतो, सिमाताई ते तुम्हांला काय आल ते व्हॉटसऍप वरती मला पाठवा मी त्याची चौकशी करतो. काय केल आयुक्तांनी आयुक्तांनाच माहीती. आम्ही जनरल बॉडीमध्ये कोणीही डॉक्टरांच्या विरोधात बोललो नाही. आम्ही जनरल बॉडीमध्ये हा विषय फेटाळा पण म्हणालो नाहीत. फक्त आपण चर्चा करुन तुम्ही महापौर तुमच्या अधिकारामध्ये तुम्ही विषय तहकूब ठेवला म्हणून या डॉक्टर लोकांनी काळया फिती लावल्या आणि मी माहीती घेतली, या काळया फिती लावण्याच काम डॉक्टर सोनीनं केलं. ते त्यांचे लिडर आहेत. वयवर्षे ६० होवून गेलेलं आहे. रिटायर्ड झालेला माणूस आहे, स्वतः आयसीयूमध्ये कधी जात नाही, कधी पेशंट तपासत नाही. ते फक्त ऍडीशनल कमिशनरच्या इथे बसेल, नाहीतर डीनच्या खुर्चीच्या बाजूला जावून बसेल एवढच काम ते करतात आणि लिडरशिप करतात. आम्ही लिडरशिप करायला खंबीर आहेतनां. आम्ही काही बांगडया नाही भरल्या लीडर शिप आम्हांला करता येतेना. डॉक्टरांनी डॉक्टर सारख वागाव, डॉक्टरांनी डॉक्टरांच काम कराव. आम्ही आयुक्तांना विचारल की आपल्याकडे आता जे डिन आहेत त्या डिन पेक्षा अधिक पब्लिकेशन केलेले लोक, त्या डिनपेक्षा क्लिनीकल अनुभव असलेले लोक, त्या डिनपेक्षा शिकवण्याचा अनुभव असलेले लोक जे विदयार्थ्यांना शिकवू शकतात हे सर्व काही गुणसंपन्न असताना सुध्दा तुम्ही या डिनला का निवडल. आम्ही असा प्रश्न विचारलातर काही चुक झाली का. मा.महापौर, आमची काही चुक झाली का सांगाव. आम्ही काही डिनला शिवी दिली, आम्ही काही डिनला वाईट बोललो. आम्ही म्हणल का डिन भ्रष्टाचारी, डिन असा आहे, डिन तसा आहे आम्ही असं काहीच बोललो नाही. आम्ही असं म्हणलो आयुक्त साहेब तुमच्या या परीक्षेच्या प्रक्रीयेमध्ये जी तुम्ही निवड समिती नेमली होती ती निवड समिती मेकींग अपॉईंटमेंटच जे काही डेसिग्नेशन आहे बीपीएमसीमध्ये ते सेक्शन ५४ प्रमाणे तुम्ही नेमणूक करता. सेक्शन ५४ मध्ये काय आहे आयुक्तांनी असाव समजा आयुक्त गैरहजर असतीलतर, आयुक्तांना काही कामामुळ वेळ नसेलतर आयुक्तांनी नियुक्त केलेले अधिकारी. मग तो अधिकारी नेमला गेला का नाही आयुक्त स्वतः होते. दुसरे अधिकारी चिफ ऑडीटर, तीसरे अधिकारी त्या विषयाशी संबंधित जो कोणी तज्ञ असेल तो आणि चौथा त्या डिपार्टमेंटचा हेड. आता त्या डिपार्टमेंटचे हेड काही तूपे होवू शकत नाहीत, त्या डिपार्टमेंटचा हेड अजीत पवार होवू शकत नाहीत. त्या डिपार्टमेंटचा आज तुम्ही कार्यभार जरी संतोष पाटील यांच्याकडे दिला असेलतरी, ईंजिनीअरचे

हेड ईंजिनीअर, डॉक्टरचा हेड डॉक्टर तस त्या ठिकाणी तुम्ही आपल्या नियमाप्रमाणे, बीपीएमसी ऍक्ट ५४ प्रमाणे तुम्ही त्याठिकाणी डॉ.साळवेला तीथ बसवल पाहीजे होतं. डॉ.साळवेला बोलवल नाही, डॉ.रॉयला बोलवल नाही म्हणून तुम्ही जी काही निवड प्रक्रीया केली ती निवड प्रक्रीया चुकीची आहे हे माझ ठाम म्हणणं आहे आणि याच विषयावर मी कोर्टात जाणार आहे. निवडप्रक्रीया चुकीची केली तुम्ही. जो बीपीएमसी ऍक्ट सेक्शन ५४ म्हणतो त्या ५४ प्रमाणे तुम्ही समितीच स्थापन केली नाही त्याच्यावर माझा आक्षेप आहे आणि त्याच विषयावर मी माझी दाद मागणार आहे. दुसरी गोष्ट आयुक्ता समोर तुम्ही महापौर कबुल केल, तुम्ही स्वतः म्हणले बहल साहेब तुमच म्हणण बरोबर आहे जी लोक आपल वायसीएम सांभाळतील त्यांनी त्यांची घर नको भरायला. त्यांनी त्यांची प्रॅक्टीस नाही करायची. त्या लोकांनी त्यांचे हॉस्पिटल नाही चालवायचे. त्या लोकांनी डेडीकेटली फक्त वायसीएम साठी काम करायच. आता डेडीकेटलीचा अर्थ काय होतो. नगरसचिवाना सांगा आम्हांला सांगायला, हा विषय सुरु झाला, विषय सुरु करण्याच्या आदि बाहेर लोकांना खबर लागली होती तुम्ही लोक आत जावा घाणेरडा खेळ करणार आहेत. घाणेरडया पध्दतीने विषय मंजूर करणार आहेत. त्याचवेळेला नगरसचिवाना सांगीतल की कोरम नाही, कोरम मागीतला होता, कोरम मागीतला असताना नगरसचिवांनी काय सांगीतल महापौरांना विचारा. तुम्हांला नियमानी मागीतलना. कोरम मागीतला तुम्ही दिला का कोरम, नाही म्हणाले महापौरांनी मोजल पाहीजे. म्हणजे महापौर तुम्ही सभाशाखेच्या नियमाप्रमाणे सभागृह चालवत नाहीत. सभाशाखेच्या नियमाप्रमाणे तुम्ही सभागृह चालवल नाही. कोरम नसताना सभागृहामध्ये फक्त २५ लोक होती आता ३० आहेत. मगाशी ज्यावेळेला विषय मंजूर केला त्यावेळेला ऑनलाईन ७ होती आणि सभागृहामध्ये फक्त २५ होती. तुम्ही ३२ लोकांमध्ये गणसंख्या नसताना सुध्दा तुम्ही फक्त सत्तेच्या जोरावर तुम्ही हा विषय रेट्रून मंजूर केला कारण तुम्ही दडपणाखाली गेला. त्यादिवशी तुम्ही स्वतः, पक्षनेते स्वतः आपण सर्वानी चर्चा केली, विरोधी पक्षनेते नाना काटे पण होते सर्व तिथ असताना तिथ कबुल केल होतं की आपण आता ही भरती करु. आयुक्त साहेब म्हणाले दोन वर्षे या लोकांचा प्रोबेशनरी पिरीअड असणार आहे. या दोन वर्षाच्या प्रोबेशनरी पिरीअडमध्ये जर यांनी चांगल काम केल नाहीतर आपण यांच्यावर कारवाई करु शकतो. त्यावेळेला असं पण चर्चेमध्ये झाल की हा परत दोन वर्षानी सभागृहासमोर विषय येईल का तर आयुक्त साहेबांनी खुलासा केला की

पुन्हा तो विषय सभागृहासमोर येणार नाही. मग त्यावेळेस अशीही चर्चा झाली, तेथे मी होतो, सिमाताई होत्या, आशाताई होत्या मग असं ठरल की आपण आयुक्तांना अधिकार प्रदान करायचे की अशा अशा नगरसेवकांच्या निदर्शनास आल की लोक अशी दादागीरी करतात, अशी मस्ती करतात, अशाप्रकारच्या फित्या लावतात. मग आपण आयुक्तांना अधिकार दयायचे असं पण ठरलं. हेही तुम्हाला मान्य आहे की असं ठरलेल आहे. आयुक्त पण त्यावेळेला म्हणाले ठिक आहे सभागृहाने निर्णय घ्यावा. सभागृहाने जर असा निर्णय घेतला की यांनी बाहेरची प्रॅक्टीस करु नये आणि आता असं म्हणल जात की नंतर आयुक्तच असे म्हणाले, असं मी ऐकल बरका साहेब, मी तुमच्यावर आरोप करत नाही. पण असं ऐकल की आयुक्तांनीच नंतर सत्ताधारीना सांगीतल की तुम्ही जर असा निर्णय घेतलातर तुमच्याकड कोणी डॉक्टरच काम करणार नाही. कारण त्यांना त्यांची प्रॅक्टीस करायचीच आहे. आहो, साहेब त्यांना जर त्यांची प्रॅक्टीस करायची आहेतर तुम्हांला सांगतो तुम्ही या वायसीएमवर या गोरगरीबांसाठी स्व.रामकृष्णजी मोरे यांच एक स्वप्न होतं की पिंपरी चिंचवड शहरातल्या गोरगरीबांसाठी ते वायसीएम हॉस्पिटल असाव. अशी मंडळीजर तुम्ही भरलीना तर हे सगळे एकमेकांना रेफर करतील. ईएनटी जा हर्डीकरकडे, वाघेरे म्हणेल जा भोसले कडे, भोसले म्हणतील जा मानेकडे हा धंदा सुरु होईल धंदा. यांच्यावर नियंत्रण कुणाच असणार आहे. तुम्ही डॉ.रॉय बसून टाकले कच-यावर दुस-याना बसून टाकल नुसत कागदोपत्र करायला. आमच्या प्रशासनातला त्यांच्यावर आंकुश कोणाचा, फक्त आयुक्तांचा. आता लाखो रुपयाची, कोटयावधी रुपयाची खरेदी होते. कोण त्याच्यावर टेक्निकली कोण आहे. बाकीचे लोक कोण आहेत. तुम्ही आयुक्त म्हणून काय काय बघणार. आपल्या वायसीएम मध्ये व्हेन्टीलेटर येवून चार महीने पडले होते, चार महीन्यानी यांना व्हेन्टीलेटर उघडून बघता आले नाही. तीथ आलेल्या माणसाला रिंग झाली नाही, त्यांची सेटींग झाली नाही. म्हणून त्यामध्ये काहीतरी प्रॉब्लेम काढला आणि असं सांगीतल की हे टेक्निकलदृष्टया बरोबर नाही. आयुक्त साहेब मी तुमच्याकड हा विषय घेवून नाही आलो. तुमच्याकडे विषय याच्यासाठी घेवून नाही आलो कारण तो माझा लांबून नातेवाईक लागतो. परत माझे काहीतरी हितसंबंध म्हणून मी तुमच्याकडे आलो नाही. कुठल्या अधिका-यांना म्हणलो नाही की तुम्ही हे मंजूर करा, मी नाही म्हणल. माझा सख्खा साडू आहे तो पण वायसीएम मध्ये काम करतो. पण मी तुम्हांला नाही बोललो कधी. मी तुमच्याकड आलो असतोतर तुम्ही मला शंभर

टक्के मदत केली असती. कारण या चांडाळचौकडीनी त्यांना हव्या असलेल्या माणसाला ते देता आल नाही, रिंग करता आली नाही म्हणून त्यांनी तीन महीने त्याला हात लावला नाही. तीन महीन्यानंतर ते उघडल्या गेल आणि त्याला काहीतरी वेगळी कारण दिली आणि आता परत त्याला चार महीने कोणीही हात लावला नाही. नाहीतर आज तुमची जी दुर्दशा झालीना वायसीएममध्ये तेवढे ते सतरा आठरा व्हेन्टीलेटर भरले असतेतर बाकीच्या लोकांचे प्राण नसते गेले. पण सोनी आणि या बाकीच्यामुळ त्यांच्या मनातल्या माणसाला त्यांना देता आल नाही, आता ती फाईल परत मुव्ह होते. आता ती फाईल परत सात आठ महीन्यानंतर मुव्ह होते.  साहेब, वायसीएममध्ये काय काय चालत तुम्ही जरा लक्ष घाला. तुम्ही एकटे काही करु शकत नाहीत. मी तुम्हांला सांगतो यांच्यावर अंकुश ठेवायला तुम्हांला तीथ आमच्या महानगरपालिकेतला सक्षम अधिकारी ठेवावाच लागेल, आख्ख्या वायसीएमवर. जे लोक बाहेर प्रॅक्टीस करतील त्यांना घ्यायच नाही. ज्या लोकांच एजबार झाल त्यांना घ्यायच नाही हे आपल ठरल होतं. मग तुम्ही अशा चुकीच्या पध्दतीने सभागृह का चालवल याच्यावर उत्तर तुम्हीच दयाव. तुम्ही उत्तर देणार नसालतर आम्हांला हायकोर्टात जाव लागेल. तुम्ही कोरम नसताना विषय घाईघाईने मंजूर केला. कोणाला बोलू सुध्दा दिल नाही. ज्या विषयावर आडीच-तीन, चार तास चर्चा झाली तीन दिवस आदी त्या विषयाला तुम्ही अशी बगल दिली, अशी बगल दयायच कारण काय. एकतर तुमच्या पदाधिका-यांनी चाळीस चाळीस लाख रुपये, पन्नास पन्नास लाख रुपये त्या डॉक्टराकडन घेतलेले आहेत. काही मंञ्यांच्या शिफारशीन इथ डॉक्टर आलेले आहेत आणि ते जर घेतले गेले नाहीतर त्यांचा पण प्रॉब्लेम होईल, दात दिसून येतील ज्याचे दात झाकले गेले ते दिसून येतील आणि ते होवू नये म्हणून याच्यावर पांघरुन घालायच काम या पध्दतीन तुम्ही केलेलं आहे. भ्रष्टाचार थोपवायच काम केल. आम्ही काही म्हणल होत का तुम्हांला डॉक्टर भरती करु नका. आता वयामुळे डॉक्टर बाहेर गेले असते फक्त दोन. आता किती डॉक्टर प्रॅक्टीस करतात. मला थोडक्यात माहीती त्याप्रमाणे प्रायव्हेट हॉस्पिटल चालवणारे ज्यांना तुम्ही पीजी मध्ये सिलेक्ट केलल आहे. मा.महापौर साहेब, ज्या डॉक्टरांना तुम्ही आता पीजी इन्स्टिटयूट मध्ये काम करण्याकरिता येणार त्यामध्ये डॉ.स्वामी यांच हॉस्पिटल आहे, डॉ.वाघ सगळयांना माहीती आहे यांच हॉस्पिटल आहे, डॉ.आळंदकर, डॉ.माने आणि डॉ. खिलारे आता हे सर्वजण बाहेर प्रॅक्टीस करतात. या लोकांचे स्वत:चे हॉस्पिटल आहेत. आता ही

लोक डेडीकेटली कसं काम करणार हे मला सांगा. ते आपली ओपीडी बघतील, आपली आयपीडी बघतील, आपले रुग्ण बघतील, टिचिंग बघतील, स्वतःचा दवाखाना पण बघतील हे शक्य आहे का. आयुक्त साहेब शक्य आहे का मला सांगा. वायसीएममध्ये फुलटाईमसाठी असणारे हे डॉक्टर आपला धंदा पण सांभाळणार आणि आम्हाला धंदयाला लावणार, कामाला लावणार. मा.महापौर साहेब म्हणून नको म्हणलो होतो, आपण बाकी डॉक्टरांना म्हणल का घेवू नका म्हणून. तुम्ही खाल्ले पैसे खाल्ले जाऊ दया.  श्रीकर परदेशी साहेब असताना २०१३ मध्ये याची सुरवात झाली. नामंजूर झाल त्यावेळेला जे डॉक्टर दाखवलेना ते काही मानधनावरचे नव्हते दाखवले, त्यावेळेला ते डॉक्टर काही बाहेरुन नव्हते आणले. त्यावेळेला दाखवलेले डॉक्टर हे वायसीएममध्ये काम करणारे १३ डॉक्टर आहेत आणि त्या १३ डॉक्टरांनी केंद्रशासनाचा २००५ चा जो जीआर आहे त्या २००५ च्या जीआर प्रमाणे त्यांना जो क्रायटेरीया आहे सोळा वर्षाचा क्रायटेरीया असेल, दहा वर्षाचा क्रायटेरीया असेल त्याचे दोन पब्लिकेशन असेल, त्याचे चार पब्लिकेशन असेल या सर्वामध्ये ते बसतात आणि त्या लोकांनी अर्ज केले त्यामधले फक्त पाच घेतले गेले. एक बसतच नव्हता आता राहीले सात. आता त्या मिटींगमध्ये असं पण ठरल की हा विषय क्रमांक सात जो आहे तो डीएनबीचा विषय आहे त्या डीएनबीच्या विषयामध्ये आपण अशी उपसूचना दयायची की जे उर्वरीत राहीलेले सात डॉक्टर आहेत जे नियमाने बसू शकतात, २००५ च्या जीआरच्या अनुषंगाने बसू शकतात त्यांना प्राधान्याने घ्याव अशाप्रकारची आजच्या जीबीमध्ये मान्यता दिली. आता तुमच्या मनामध्ये गौडबंगाल असेल, तुमच्या मनामध्ये काळ असेल, तुमच रात्रीच्या रात्री ठरल असेल तर तो विषय तुम्ही तुमच्या मनासारखा करणार. का त्याचा पण ऍडव्हान्स घेवून ठेवला असेल कुणाकडन तरी. त्या पुढच्या पोस्टसाठी पण कदाचित तुमच्या लोकांनी ऍडव्हान्स घेतलेले असतील लोकांकडन. आणि म्हणून डॉ.आंदूरकर सारख्या मॅडम जे २१ वर्षे आज महापालिकेमध्ये भूलतज्ञ म्हणून काम करतात त्यांना तुम्ही सिलेक्ट नाही केल. डॉ.शामकुंवर, डॉ.सुर्यवंशी हे सर्वजण पात्र असताना या सर्वाना दिर्घ अनुभव असताना तुम्ही या लोकांना सांभाळून घेतलेल नाही. कारण प्रशासनाचा असा खुलासा आहे की विशिष्ठ पब्लिकेशनला ठराविक मार्क, पब्लिकेशनला ठराविक मार्क, त्याच्या ग्रॅज्युएशनला ठराविक मार्क आता घोळ झाला कुठतर यांनी जे स्पेशालीस्ट आणले होते, जे तज्ञ आणले होते त्या तज्ञांनी मार्क देण्यामध्ये खरी गडबड केली आहे. याच्यामध्ये

एकजण हायकोर्टात पण गेला आहे. हायकोर्टात गेलेल्यांच नाव पण सांगतो माथेसूळ अम्रीश अविनाश आता हा डॉक्टर प्रतीक्षा यादीमध्ये आहे. तो आता गेला कोर्टामध्ये त्याच म्हणणं असे आहे की मला हायरपोस्टला जास्त मार्क दिली आणि लोअर पोस्टला मला कमी मार्क दिली. मा.महापौर साहेब, दुसरी गमंत अशी आहे की इन्टरव्हिव तीन पदासाठी होत्या असिस्टंट प्राफेसर, ऍसोसिएट प्रोफेसर आणि प्रोफेसर. आता एखादयानी या दोन्ही किंवा तीन्हीला अप्लाय केले. म्हणजे गाढव, घोडा आणि हात्ती या तीघांची परिक्षा एकानीच घ्यायची आणि एकाच परीक्षामध्ये तु गाढव आहेस, तु घोडा आहेस आणि तू हात्ती आहेस संपल काम. आहो, प्रोफेसरची परीक्षाची ओरल आहेतर प्रोफेसरच्या अनुषंगाने प्रश्न असले पाहीजेत. आम्ही त्यांना विचारल की तुम्हांला काय विचारलं. ते म्हणाले आम्हांला नाव विचारल, काय काम करतो ते विचारल व थोडस याच्यामध्ये एखादया विषयाच विचारल आणि ठिक आहे तू जा. एकाला दिले ५० मार्क एकाला दिले ४९ मार्क एकाच माणसाला म्हणजे हायर पोस्टला मला ५० आहेत आणि लोअर पोस्टला ४९ आहेत. कारण का तर त्याचा अनुभव कमी झाला मग तो गेला हायकोर्टामध्ये. मग माझ असं म्हणण आहे की एखादा हेडक्लार्कचा महापलिकेनी इन्टरव्हिव ठेवलेला आहे. एकानी हेडक्लार्कसाठी अप्लाय केला आणि दुस-यांनी सहा.आयुक्तासाठी अप्लाय केला मग त्याची इन्टरव्हिव एकाच वेळेला का. असे कुठ होतं का. मग त्या विषयाच्या अनुषंगाने त्या त्या पोस्टची तशी तशी इन्टरव्हिव व्हायला पाहीजे होती. तशी इन्टरव्हिव झाली नाही. एकच ओरल घेतली आणि एक ओव्हरलमध्ये असिस्टंट प्राफेसरचे मार्क दिले, एकाच इन्टरव्हिवमध्ये ऍसोसिएट प्रोफेसरचे मार्क दिले आणि त्याच इन्टरव्हिवमध्ये प्रोफेसरचे मार्क दिले. म्हणजे एकच माणुस तीन्हीला एकदाच मार्क देतो आणि नेमका तीथ घोळ झाला. मग आता या लोकांना काय घेणं आहे मग काय करायच चला आम्हांल याला घ्यायच, चला आम्हांला याला घ्यायच ठिक आहे काय करायच सांगा तुम्ही आमच्या मार्कामध्ये करा ऍडजेसमेंट. दुसरी गोष्ट जे बी.जे.मेडीकलचे स्टूडंट आहेत, जे ससुण हॉस्पिटलचे स्टूडंट आहेत जे बाकीचे स्टूडंट आहेत तीकडचा समजा मी प्रोफेसर आहे माझ्या हाताखाली जो डॉक्टर शिकलेला आहे, ज्याला मी शिकवलेल आहे त्याला तर मी फेवर करणारचनां. मग आमच्याकडे ज्या लोकांमुळे याची परवानगी मिळाली, ज्या लोकांमुळे सर्टिफीकेट मिळाल, ज्या लोकांमुळे हा गाडा सुरु झाला ते सगळे गाढव, त्यांना आक्कल नाही, त्यांनी वीस वीस पब्लिकेशन केलय त्यांना २१-२१ वर्षाचा वायसीएमचा अनुभव

आहे, १८-१८ वर्षाचा वायसीएमचा अनुभव आहे मग पिडॅट्रीशन चांगलेत, अनॅस्थेशिया चांगले आहेत, अर्थोपेडीक चांगले आहेत जे लोक वायसीएम गेली १५-२० वर्षे सांभळतात त्या डॉक्टरांना अक्कल नाही त्यांना ओव्हरलमध्ये कमी मार्क दिले, त्यांना का कमी मार्क दिले त्यांना ओव्हरलमध्ये यासाठी कमी मार्क दिले कारण आमच्या डॉक्टराकडन जर पैस घेतलेतर भांड फुटेल सगळच कळेल सगळयाना. पण बाहेरच्या माणसाकडन पैसे घेतलेतर काय कळणार आहे यामुळे त्यांना ठेवा बाजूला आणि यांना घ्या आतमध्ये मागच्या दरवाज्यानी. दुस-या बाजूला आपल्याकडे एमडी मायक्रोबायोलॉजीस्ट असताना तीथ एमएससी न घेता आमच्या महापालिकेत जो गेल्या पाच साडेपाच वर्षापासून काम करतो डॉ. दिनेश गाडेकर यांना साडेपाच वर्षाचा अनुभव आहे जे वायसीएम मध्ये कार्यरत आहेत, एमबीबीएस आहेत ते एमडी मायक्रोबायोलॉजी आहेत त्यांना तसच ठेवलय आणि त्यांच्या जागी डॉ. सचिन देऊरकरला घेतल आहे. त्यांनी फक्त एमएससी केलेल आहे आणि पीएचडी केलल आहे त्यांना सिलेक्ट केलंय. मग एमडी नको तुम्हांला. तुम्हांला बाहेरचा माणुस पाहीजे त्यांनी फक्त एमएससी केल आहे. तुमच्याकडे नितीन मोकाशी तो वायसीएममध्ये अकरा वर्षे काम करतो तो एमडी मायक्रोबायोलॉजीमध्ये आहे त्याला पण नाही घेतल. त्यालाही घेतल नाही कारण तो वायसीएमचा आहे पैसे घेता येत नाही, कसे घेणार. डॉ.प्रतीभा शामकुंवर या एमडी पिडॅट्रीशिअन आहेत, तीन पब्लिकेशन आहे, महापालिकेमध्ये २७ वर्षे काम करतात आणि या डॉ.शामकुंवरमुळ, या सुर्यवंशी मॅडम मुळ, आंदूरकर मॅडममुळ या सात आठ डॉक्टरांच्यामुळेच आपल्याला नाशिकवरुन जी परमीशन लागते ती परमीशन श्रीकर परदेशी साहेब असताना ती पहील्यांदा मिळाली ती या डॉक्टरामुळ मिळाली. मग हे सगळेच डॉक्टर नापास झाले का. ज्यांच पब्लिकेशन आहे, त्यांना अनुभव आहे, ते वर्षानुवर्षे गोरगरीबांची मुल सांभाळतात, डिलेव्ह-या करतात, लोकांना ॲडमिशन देतात हे सगळे गाढव आहेत का. प्रशासनाची एका पेपरमध्ये जाहीरात आली. माझ्या हातामध्ये २००५ चा भारतसरकारचा जीआर आहे. त्या जीआरप्रमाणे तुम्हांला त्या लोकांना घेणं अपेक्षीत होतं. पण पेपरमध्ये बातमी आली या लोकांना आम्हांला घेतल नाहीतर आम्ही कोर्टात जाऊ. प्रशासनानी हे इन्टरव्हिव व्हायच्या आदिच ही सगळी गडबड व्हायच्या आदिच पदाधिका-यांनी जावुन आयुक्तांना बोलले असतील की साहेब इथ गडबड होईल आम्हीतर ॲडव्हान्स घेवून ठेवलेले आहेत मग काय केल पाहीजे मग असं असं करायला पाहीजे त्याच्यानंतर म्हणले नाही, कोर्टात

जा, कोर्टात जा. मग त्याच्यामध्ये काय झाल महापालिकेनी कॅव्हेट दाखल केलं. प्रशासनाला कॅव्हेट दाखल करायची काय गरज होती.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** बहल साहेब तुम्ही महापौर होते तेव्हा आम्ही सभागृहात होतो. त्यावेळेसची वेगळी परिस्थिती होती आताची वेगळी परिस्थिती आहे. तुम्ही अनुभवी आहात, हुशार आहात, सभागृह आजपर्यंत गाजवलेले आहेत. मी फक्त एवढच म्हणेन की कुठल्या पक्षाच नाव घेवू नका, प्रोसिडींगमध्ये पक्षाच नाव घेवू नका. काही शब्द प्रोसिडींगमध्ये घेवू नका असा आदेश देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. प्रशासनाला त्याठिकाणी कॅव्हेट दाखल करायची काही गरज होती का. प्रशासनाने कॅव्हेट दाखल करायच कारण काय होतं. कारण प्रशासनाने आदिच निश्चित केलेलं होतं की आपल्याला काही डॉक्टराना याच्यामध्ये वगळायच आहे. मग अस जर ठरवलेल असेल म्हणून कॅव्हेट दाखल केली. नाहीतर प्रशासनाला काय घेणं आहे. आपल्या महानगरपालिकेत पंधरा-पंधरा, वीस-वीस वर्षे जे लोक काम करतात ते अनुभवी आहेत आणि ते तुमच्या क्रायटेरीयामध्ये बसतात, तुमच्या मेरीट मध्ये बसतात अशा लोकाना सामावून घ्यायला पाहीजे होत, सामावून घेतल नाही. तुम्ही कॅव्हेट दाखल केलं. तुम्हांला पहील्या तारखेला तारीख पडली. त्या तारखेला सुध्दा प्रशासन असमर्थ होत तीथ शे त्यांनी दिला नाही. परंतु आपल्या लोकांवर अन्याय करुन अशा पध्दतीने नोकरभरती करण्यावर जिथ बीपीएमसी ऍक्टच तंतोतंत पालन केल गेल नाही. १६ सप्टेंबर २००५ चा जीआर आहे त्या जीआरच पण तीथ पालन केल गेलं नाही. मागच्या दरवाज्यान अशा चुकीच्या पध्दतीने भरती केली. वास्तविक पाहता मी असेल, राहूल असेल, संदिप असेल बाकी अनेकजण या मताची होती की ही सगळी प्रक्रीया रद्द करावी आणि आपण नव्याने पुन्हा यांच्या परीक्षा घ्याव्यात अशी आमच्या सर्वांची मानसीकता होती. परंतु आयुक्त साहेबांनी काय सांगीतल की तुम्हांला असं करायचतर तुम्ही करा, माला काही नाही तुम्हांला चालवायच तर तुम्ही चालवा परंतु तुम्ही अशा पध्दतीने जर वागलाततर त्याविषयी तुम्ही माझ्यावर संशय केल्यासारख आहे. आम्ही म्हणल की साहेब आमचा तुमच्या कोणावरही संशय नाही. आम्ही सगळयांना सांगतो की तुम्ही करप्टेड नाहीत हे आम्ही छातीठोकपणे सगळयांना सांगतो आणि चांगले हुशार अधिकारी आहेत हेही

आम्ही सगळयांना सांगतो. परंतु किती प्रेशरखाली काम कराव हाही प्रश्नचिन्ह आमच्या समोर आहे त्यामुळे त्यादिवशी तुमच्या सगळ ठरलं. तुम्ही आता ऑफिसिएली काही करु शकत नाही पण तुम्हांला म्हणल साहेब तुम्ही उठून उभारा आणि सांगा की असं ठरल तुम्ही नाही सांगू शकत ते. आम्हांला माहीती आहे तुमची मजबूरी आहे. तो तुमचा विषय पण नाही. तुम्ही मा.महापौरांच्या आणि सत्तारुढ पक्षनेत्यांच्या विंनतीला मान देवून तुम्ही त्या मिटींगमध्ये बसलात. पण तुम्हांला आता म्हणल साहेब तुम्ही हे सांगा की पक्षनेते काय बोलले होते, मा.महापौर काय बोलले होते मग तर पितळ उघड पडलनां. तुम्हांला करायचच होततर आता मी बोललोय या विषयामध्ये पुन्हा डॉक्टरांच्या भरतीचा विषय आहे त्या विषयाला अनुसरुनच बोलतो. म्हणून म्हणल की मी सभाशास्त्राच्या नियमाप्रमाणेच बोलणार. नियम सोडून बोलणार नाही. आणि म्हणून म्हणल की तुम्ही ज्या पध्दतीने सभागृह चालवलेल आहे. तुम्हांला कोरमची मागणी केली, तीथ राहूल कलाटेनी मागणी केली तुम्ही ऐकल नाही. सभागृहामध्ये गणसंख्या नसताना तो विषय मंजूर करुन ढकलून दिला. पुढचा विषय वाचायला लावला आणि गदारोळ व्हायला लागला म्हणून परत त्या विषयावर चर्चा करायला वेळ दिला. मा.महापौर हे तुमच्या सारख्या सिनीअर मोस्ट महापौरांना शोभत नाही. म्हणून म्हणल की किती प्रेशर मध्ये काम कराव आणि किती चुकीच काम कराव, किती चुकीच्या पध्दतीने काम कराव. सर्व जनतेचे कामन उघडे आहेत हे सर्व जनतेला कळतं आणि म्हणून म्हणल हे गोरगरीबांसाठी केलेल वायसीएम हॉस्पिटल तुम्ही यांच्या हातामध्ये देवू नका. तीथे महापालिकेचा काहीही अंकूश राहणार नाही. तीथ कोण जबाबदार आहे हे मला सांगाना. जस आपण कॉलेजमध्ये हुल्लडगिरी करतोना हे कॉलेजच होणार आहे दुसरं. तिथ तुमचा कोणाचा अंकुश राहणार नाही. डिनवर कोणाचा अंकुश आहे का तर फक्त आयुक्तांचा अंकुश राहील. बाकी तुमच कोणच ऐकणार नाही. सुप्रिटेंडंट तुमचा आहे का, नाही. कोण तीथ तुमच आहे. एमओएच इथ बसलेत आरोग्यात. तुम्ही हे कॉलेजस करता कॉलेज आणि कोटयावधी रुपयाची उधळपट्टी होणार आहे कॉलेजमध्ये. तीथ कोणाच नियंत्रण नसणार. इन्सटिटयूटच्या नावाखाली त्यादिवशी पक्षनेते मला समजावायचा प्रयत्न करत होते. आता पण तुमच्याकडे १०४ पदासाठी आपण मागणी केली होती. तुम्हांला फक्त ७४ च मिळाले म्हणजे काय ३० ची मान्यता गेली का. ३० ची मन्यता गेली याचा अर्थ. आता देखील तुम्हांला ७+२=९ ची परमीशन मिळाली आहे, जे तुमच्याकडे

सॅक्शन नाही ते सुध्दा डॉक्टर तुम्ही घेतले आता. जे तुम्ही करुन ठेवलना तो बोजा आमच्यावर येणारच आहे. मग अशा पध्दतीने तुम्हांला नंतर घेता आले असतेना. ईएसआय हॉस्पिटल जे आहे, आपल्या शेजारी डी.वाय.पाटील हॉस्पिटलमध्ये जवळ जवळ आठ ते नऊ वर्षापासून पीजी चालू आहे तीथ परमनन्ट स्टाफ नाही. मा.महापौर साहेब, आज जो आपल्या डॉक्टरांना ७५ हजार पगार आहे, सिनिअर मोस्टला ८० हजार पगार आहे या डॉक्टरांना तुम्हांला दिड लाख पगार दयावा लागणार आहे. प्रोफेसरला तुम्हांला १ लाख ८० हजार ते दोन लाख पगार दयावा लागणार आहे. यांच ६४ वर्षापर्यंत रिटायर्डमेंट आहे आणि जी लोक ऑलरेडी रिटायर्ड झाली जी सर्व्हिसमधुन बाहेर पडली त्यांना सुध्दा तुम्ही परमनन्ट करुन बोजा घेताय. तुम्हांला तरुण कोणी डॉक्टर भेटत नाहीत का. तुम्हांला हुशार डॉक्टर भेटत नाहीत का. आहो, आम्ही काय मागणी केली होती, आम्ही हीच मागणी केली होतीना की ज्यांच वय झालेल आहे, वय जास्त आहे, तुम्हांला अजून ३० नंतर दुसरे घ्यायचे आहेतना. जी लोक खाजगी प्रॅक्टीस करतात तो नियम आपण टाकला होता आणि मा.महापौर तुम्ही मला सांगत होतात की नाही बहल साहेब तुमच म्हणण बरोबर आहे. जे लाक बाहेर प्रॅक्टीस करतात त्यांना आपण घ्यायच नाही. हे तुमचच म्हणण आहे, तुम्ही का बदलता. मग जे डॉक्टर लोक प्रॅक्टीस करतात त्यांनी तुम्हांला काही वेगळी आश्वासन दिलीत की काय. का त्यांच्या हॉस्पिटलमध्ये तुमच्या लोकांना सगळ फ्रि असणार आहे का. काय दडलय त्याच्याखाली ते तर कळू दयात आम्हांला. तुम्हांला सांगीतल्याप्रमाणे वासीएममध्ये पण कोण परमनन्ट नाही. त्याचप्रमाणे आपले दोनच विषय होते सोनींचा आणि खिलारेंचाच विषय होता की ते एजबार झालेत त्या दोघाना घेवू नका म्हणून. मा.आयुक्त साहेब मी तुम्हांला सांगू इच्छितो की पीजी इन्स्टिटयूट करिता कायम पदावर भरती करण्यात येणा-या प्राध्यापकामध्ये अनेक अधिकारी हे वय अधिक असून त्यांना कायमस्वरुपी पदावर भरतीसाठी केलेली वयाची अट लागू नाही का. यापुर्वी श्रीकर परदेशी आयुक्त असताना परमनन्ट डॉक्टरांची भरती झाली होती त्यावेळी अनेक डॉक्टर उदा. डॉ.पात्रे, डॉ.वरपे, डॉ.पखाते, डॉ.वानखेडे हे सर्व जवळ जवळ सात ते आठ वर्षे वायसीएममध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने काम करत होते. आयुक्त साहेब हे परदेशी साहेबांच्या टाईमचच आहे, तुम्ही प्रशासनाकडून माहिती घेवू शकता. हे सर्व डॉक्टर सात ते आठ वर्षे काम करत होते तथापि त्यांचा अर्ज या जागेसाठी फेटाळण्यात आला की त्यांचे वय अधिक झाले होते मात्र आज त्यांना संधी देता येणार नाही

तसा राज्यशासनाचा नियम आहे. म्हणजे श्रीकर परदेशीसाठी राज्यशासनाचा नियम आहे. हार्डीकर साहेबांसाठी राज्यशासनाचा नियम नाही का. या सभागृहाला राज्यशासनाचा नियम नाही का. का सत्तारुढ पक्षासाठी हा नियम नाही का. मग वयमर्यादा नसलेल्या माणसाला मा.महापौर साहेब, कोणत्या नियमाखाली तुम्ही भरती करता. ज्यांच एजबार झालेल आहे त्याची तुम्ही स्पेशल परमीशन शासनाकडन घेतली आहे का. शासनाची परमीशन घेतल्याशिवाय तुम्हांला त्यांना एक रुपया पगार पण आदा करता येणार नाही, आणि पगार आदा केला गेलातर त्या संबंधित अधिका-याकडन ते पैसे वसुल केले जातील. ज्यांची वयोमर्यादा झालेली आहे, एजबार झालेल आहे, त्यांना राज्यशासनाची मान्यता घेतलेली नाही अशा लोकांना तुम्हांला एकही रुपया पगार आदा करता येणार नाही, जोपर्यंत तुम्हांला राज्यशासनाची मान्यता मिळत नाही. ओव्हरल परीक्षा मुळे हा प्रसंग भोगावा लागला आहेनां ती चुकीच्या पध्दतीने भरती केली गेली त्यामुळे हे सगळ होतय. त्यामुळ इथ माझ्या अगोदर मंगलाताई पण ओरडून सांगत होत्या कारण काही मंडळी इतकी हुशार आहेत परत याचा बाऊ करायला बसलेत की विरोधी पक्षाचा या डॉक्टरांना विरोध होता आजची कोविडची परिस्थिती बघता हया लोकांना काही समजत नाही म्हणून आम्ही अशा पध्दतीने विषय मंजूर केला. मी पुन्हा स्पष्ट करु इच्छितो की त्यादिवशी सुध्दा आयुक्तांच्या दालनामध्ये जी बैठक झाली त्यादिवशी सुध्दा आणि चार दिवसापुर्वी या विषयावर ज्यावेळेला मी बोललो होतो त्यादिवशीचे सुध्दा माझ प्रोसिडींग तुम्ही बघु शकता मी स्पष्ट म्हणल होत की डॉक्टरांना आमचा विरोध नाही. काही डॉक्टरांना आमचा विरोध आहे जे चुकीच्या पध्दतीने काम करतात. एजबारला आमचा विरोध आहे, बाहेर प्रॅक्टीस करणा-या डॉक्टरांना आमचा विरोध आहे आणि आयुक्तांनी जे दोन वर्षामध्ये चांगले काम करतील त्या लोकांना परमनंन्ट करायच आणि जे चांगले काम करणार नाहीत त्यांना सरळ काढायच आणि दोन वर्षे प्रोबेशनरी पिरीअडमध्ये हे सभागृहाचे अधिकार आम्ही आयुक्तांना देऊ. अस सगळ ठरलेल असताना तुम्ही असं का वागता आणि सभागृहाला विश्वासात न घेता ज्या पध्दतीने आपण कामकाज करता त्या कामकाजाबद्दल किती बोलव ते कमी आहे. या चुकीच्या पध्दतीने आपण काम करत असालतर निश्चितच आम्हांला तुमच्यासारख्यांकडे न येता आम्हांला कोर्टामध्ये जाव लागेल. मगाशी म्हणल्याप्रमाणे ईएसआय अंधेरी येथे मागील नऊ वर्षापासून पीजी इन्स्टिटयूट सुरु आहे परंतु अदयापही तीथ डिनसहीत कोणतेही अधिकारी

कायमस्वरुपी भरती केलेले नाहीत. आता अंधेरी सारख्या हॉस्पिटलमध्ये तीथे डीन पण कायमस्वरुपी नाही, डॉक्टर पण कायमस्वरुपी नाहीत मग आपल्याला एवढी घाई का. आयुक्तांनी अजून एक विषय त्यादिवशी मांडला होता की इतर चांगले हॉस्पिटल आहेत पण इतर चांगल्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टर जात नाहीत. का गव्हर्मेंट हॉस्पिटलमध्ये जात नाहीत तर त्यांची बदली होत रहाते. कधी नाशिक, कधी अमरावती, कधी मुंबई, कधी ठाणे कुठेही जावे लागेल त्यांना. मग त्या भितीपोटी आपल कुटूंब, आपल घर जवळ असाव, सारखी इकडतीकड बदली होवू नये म्हणून वायसीएमसारख्या हॉस्पिटलने अशाप्रकारची भरती पब्लिश केली तर पाचशे ते साडेपाचशे लोकांनी इकडे अर्ज केले. आयुक्त साहेब माझ पण हेच म्हणणं होत की तुम्ही पुन्हा एकदा जाहीरात जर दिली असतीतर आणि आपण इथ कायमस्वरुपी भरती करतो हे जर त्यांना कळल असतंतर अजून लोकांनी इन्ट्रेस्ट दाखवले असते आणि आता सुध्दा जे काही ७४ तुम्ही सिलेक्ट केलेले आहेत त्यांना सुध्दा माझ्या माहीती प्रमाणे ते जिथ काम करत असतील त्यांना तीथून सुटका होण्यासाठी त्या त्या डिपार्टमेंटची परवानगी घ्यायला लागेल. त्यांची परवानगी मिळालीतर त्यांची सॅलरी वगैरे सगळी प्रोटेक्ट होईल. जर रिजाईन केलतर सगळ वेस्ट होणार आहे. आयुक्त साहेब, मला हेच सांगायच आहे की तुम्ही या सर्व गोष्टी सत्तारुढच्या नेत्यांना बसून समजून सांगीतल असततर, ब्रेनवॉश केला असतातर त्यांच्या बुध्दीमध्ये वाढ झाली असती आणि त्यांना कळल पण असत की आपण एवढी घाई करु नये, आपण चुकीच काम करु नये. जे विरोधी लोक बोलतात, बाकीचे लोक बोलतात, सिनीअर लोक बोलतात त्याच्यामध्ये काहीतरी तथ्य आहे. मला नाईलाजास्तव कोर्टात जावच लागणार आहे. मी राज्यशासनाकडे पण जाणार आहे सुदैवाने आता राज्यशासनामध्ये इकडच्या सत्ताधा-यांची तिथ सत्ता नाही. त्यामुळे आता माजी मंत्र्यांचे फोन गेले ते पण मला सांगाव लागेल त्यांना. की माजी मंत्र्यानी फोन करुन सांगीतले, काहीही कर पण हे विषय मंजूर करेपर्यंत तोंड बंद ठेव, काही बोलू नको. मी छोटा आहे त्यामुळे मी मोठमोठया आमदारांचे नाव घेत बसत नाही. परंतु ज्या पध्दतीने तुम्ही या विषयाला कलाटणी दिलेली आहे ती एकदम चुकीची आहे. अजूनही तुम्हांला ३० लोक भरायची आहेत. अजूनही या ७४ पैकी सगळेच जॉईट होतील असंही नाही, पुन्हा जागा राहणार आहेत. मग आमच्या पक्षनेत्यांना काय एवढी भीती आहे, आहो हे राहणार नाही राहणार नाही, तुमच पद काय धोक्यात आहे का काय कळत नाही मला. या ३० जागा भरायच्या आहेत या

७४ मधल्या दहा ते पंधरा येणार नाहीत मग या ४५ पुढे भरायच्याच आहेतना परत. एका बाजूला असं दाखवायच की चतुर्थश्रेणी कामगाराबद्दल आमच्या मध्ये अस्था आहे, नर्सेससाठी आमच्यामध्ये अस्था आहे. बंड साहेब असताना आपल्याकडे डिलेव्हरी बेसीसवर स्टाफ काम करत होता बारा-बारा वर्षे, चौदा-चौदा वर्षे काम करत होते. आम्ही भांडून भांडून तो विषय आणलातर त्यात ती परीक्षा ठेवली. २७ पैकी २७ जण पास झाले होते पण पाच लोकांच एजबार झाल होतं. बंड साहेबांनी ऐकल नाही ते म्हणाले नाही जमणार हे २२ घेतो हे ५ घेणार नाही. त्या पाच बिचा-या आज म्हाता-या झाल्यात. त्यांचे दात पडलेत, केस पांढरे झालेत त्या तुमच्या तीन्ही शिफ्ट मध्ये काम करतात. लिव्ह व्हेकेन्सीवर काम करतात, आज सुध्दा. दहा दहा वर्षे झालेले आहेत ते वॉर्डबॉय काम करतात. मग हे जे डॉक्टर्स आहेत त्यांनी आज या महापलिकेतल्या आपल्या शहरातील गोरगरीबांची फक्त पगारामध्ये सेवा केली, जो काही त्यांना पगार मिळत होता. ५० हजार, ५५ हजार, ६० हजार असेल त्या पगारावर त्यांनी प्रामाणिकपणे काम केलेलं आहे आज त्यांना आपण डावललं. एका बाजूला तुम्ही लाथाळी करता आणि दुस-या बाजूला आम्ही काहीतरी चांगल करतो हे चित्र दाखवायच तयार करता तुम्ही हे किती लोकांना मुर्ख बनवणार आणि का, कशासाठी. या महापालिकेत आता साडेतीन वर्षे झाली, सत्तारुढ पक्षात सुध्दा एक पाच सात लोक जर सोडलीना बाकीच्या नगरसेवकांना अजून सभागृहच कळल नाही. दोन-दोन, आडीच-आडीच, तीन-तीन कोटी रुपये खर्च करुन नगरसेवक झालेले आहेत. त्या बीचा-यांना फक्त हा मध्ये हा, ही व्हिप मिळाला की हो, ती व्हिप मिळाली की हो आणि चारजण ठरवलेले आहेत मानदंडसाठी चार बॉडीबिल्डर उभे राहणार तीथ. काम कशाला चुकीच करता. का चुकीचा निर्णय घेतला. आम्हांला काही बरं वाटत का तीथ महापौरांच्या समोर जावून ओरडायला. आम्हांला बरं वाटत महापौरांचा अपमान करायला आमची ती संस्कृती नाही. आमची ती मुळीच संस्कृती नाही. आज या सभागृहात २९ वर्षे झाले आहोत. मा.महापौर, २९ वर्षात मी कधी वागलो असं, पण मला हे वागायला, मला हे बोलायला तुम्ही तशाप्रकारच कृत्य केलं, तशाप्रकारे तुम्ही वागलात, तशाप्रकारच तुम्ही चुकीच सभागृह चालवल म्हणून मला इथ पोटतीडकीन बोलाव लागतं. अनेक व्यक्ती बघतात तुमची दादागीरी, अनेकजण बघतात तुमची मक्तेदारी मगाशी अजीतने सांगीतल्याप्रमाणे एवढया कोटीच बजेट पाच मिनीटामध्ये मंजूर. सगळ ठरलेल असतं आणि तुमची दुसरी दादागीरी तुमचा पक्षनेता ठरवेल, तुमच सभागृहामध्ये

ठरेल, आम्ही पण राज्य केलं आहे इथ. आम्ही वीस-वीस वर्षे राज्य केलं, वीस वर्षामध्ये आम्ही उबाळेताई असतील, अमृत प-हाड असतील, अंकुशराव लांडगे असतील, गजानन बाबर असतील ही सगळी मंडळी जे तुमचे नेते आहेत या नेत्यांना विचारा, श्रीरंग बारणे यांना विचारा त्यांना सगळयांना उपसूचना दयायला आम्ही अनुमती दयायचो. आहो, फेटाळा किंवा पास करा पण तुमची एवढी दादागीरी की तुमच्याच हातात दयायला पाहीजे. आम्हांला आमचा अधिकार नाही का. सचिन चिखले हा पण एकटा असायचा तेव्हा पण आम्ही त्याला बोलू दयायचो, सचिनची मिसेस होती त्यांनाही आम्ही बोलू दयायचो. आम्ही या सभागृहामध्ये आलो त्यावेळेला भारतीय जनता पार्टीचे फक्त तीन नगरसेवक असायचे. राजू दुर्गे, उमाताई खापरे आणि कुमार जाधव असे तीनच नगरसेवक असायचे. आम्ही त्यांना बोलू दयायचो. त्यांना इथ उभ करा आणि विचारा ते सांगतील आमची कधी लोकशाही काढून घेतली नाही. असा सभागृहाचा अधिकार कधी काढून घेतला नाही. परंतु तुमची ही दादागीरी, तुम्हांला सभागृह चालवता येत नाही. तुम्हांला बोलता येत नाही म्हणून तुम्ही अशा पध्दतीने सभागृह चालवता. आहो, बोलूदयातना सगळयांना.

**मा.महापौर -** बहल साहेब तुम्ही पण माजी महापौर आहात. तुम्ही विषयावर बोलावे, मी तुमचा मान राखलाना. तुम्ही दादगीरी म्हणता असं काही नाही, तुम्ही डॉक्टरांच्या विषयावर बोला.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. डॉक्टरांच्या विषयावरच बोलतो. साडेतीन वर्षे मी बोललो का. मी साडेतीन वर्षामध्ये का बोललो नाही. कसं असंत, काही वेळेला शहाण्यानी पण भिंतीला डोक आपटून काही फायदा आहे का. इथ हुशारी करून काही फायदा आहे का. आम्ही चांगल बोलून पण काही फायदा आहे का. आम्ही कलमावर बोलतो ऐकायची तयारी आहे का. आम्ही बीपीएमसी ॲक्टवर बोलतो तुम्ही ऐकूण घेणार का. तुम्ही ऐकणार नाहीत कारण तुमचा फतवा आहे. तुमचा आदेश आहे म्हणून मी तुम्हांला पोटतीडकीने म्हणतो मी आज का बोललोतर तुम्ही, पक्षनेते तुमचे पदाधिकारी तुम्ही सर्वानी मिळून जे कबुल केल होतं, जे ठरवलं होतं त्याच्या विरोधात तुम्ही वागलात, तुम्ही कोरम नसताना विषय मंजूर केला, तुम्हांला कोरमची मागणी केली असताना तुम्ही कोरम मोजला

नाही. तुम्ही गैर पध्दतीने सभागृह चालवल, सभाशाखेच्या नियमाप्रमाणे तुम्ही सभागृह चालवल नाही म्हणून मी पोटतीडकीने बोलतो, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, आज आल्यानंतरच आम्हांला बोलायच होतं. जे काही विषय ठरले होते याच्यावरती आपण चर्चा करणार होतो. मा.महापौर साहेब, आज आपली एकहाती सत्ता आहे. सगळयांना जे काही विषय मांडायचे आहेत, विचार मांडू दयात निर्णय शेवटी तुम्ही घेणार, आपण पक्ष म्हणून घेता येणार आहे मग आपण ही घाई का करतो. आज नवीन काही सदस्य निवडून आलेले आहेत. मी मागच्यावेळेस नवीनच होते परंतु हे सभागृह चालल्यानंतर काही गोष्टी माझ्या कानावर पडायच्या ते भाषण ऐकल्यानंतर आमच्या ज्ञानात पण भर पडायची. ज्ञानात भर पडण्यासाठी विचारांची देवाण-घेवान करण्यासाठीतर हे पवित्र सभागृह आहे. मगाशी मी सुध्दा ओरडून ओरडून सांगत होते की मा.महापौर साहेब, बोलू दयात. एकतर आम्ही आता कोणत्याच कमिटीवर नाहीत. त्यामुळे मा.महापौर साहेब, आम्हांला तुमच्याशी चर्चा करायची असेल, मा.आयुक्तांशी चर्चा करायची असेलतर हे इतक पवित्र सभागृह तेवढयासाठी आहे. तुमच्या काळात मागच्या पाच वर्षात राष्ट्रवादीची सत्ता होती त्याच्यानंतर आज आपल्या सत्तेमध्ये तुम्ही सुध्दा एक पायंडा पाडा. ज्यांना जे काय बोलायच ते बोलू दयात. दोन तास, तीन तास, वॉर्डावर चर्चा करु दयात जे काही आमच्या मनात जी काही खळबळ चालू असते, जी काही आमची मत आहे, ज्या काही आमच्या अडचणी आहेत, ज्या काही आमच्या समस्या आहेत त्या आम्हांला या सभागृहात मांडू दयात. मा.महापौर साहेब, हे सभागृह तेवढयासाठीच आहे, पाच पाच दिवस सभागृह चालू दयात ज्याला काम असेल तो येणार नाही. सभेपेक्षा मोठ काम असेलतर तो येणार नाही सभेला. परंतु तुम्हीतर नक्की येणार. मा.महापौर साहेब, खरच तुमच्याकडून खुप मोठया अपेक्षा आहेत, तुम्ही मोठया अनुभवी आहात, तुमच्यासारखा अनुभव आज आमच्याकडे निश्चितपणे नाही. मागच्यावेळेस तुम्ही मला सभा सुरु होण्यापूर्वी बोलू दिलतं. त्यामुळे तुम्ही पाहील त्याचा फायदा काय झाला. काय झालातर माझ्या वॉर्डात मला जो त्रास झाला तो या सभागृहापुढे मांडला व सन्मा.आयुक्त साहेबांनी त्यावर ऍक्शन घेतली. हे जर तुम्ही मला त्यादिवशी बोलू दिल नसतंतर माझा विषय मला आयुक्त साहेबांच्या दालनात जावून सांगाव लागला असता आणि काहीच कारण नाही, जर एखादा

अधिकारी, एखादा ठेकेदार चुकीच वागत असेलतर आम्ही आमच्या महापौरांना, आयुक्तांना सांगणार आहोत आणि तेवढ मनाच मोठेपण मा.महापौर साहेब तुम्ही निश्चितपणे ठेवताल कारण शेवटी पक्षांची बंधन आहेत, त्याला काही वर्चस्व आहे का जे काही असेल परंतु सभागृह हे चाललच पाहीजे, आज आपली इतकी मोठी संख्या आहे. आपण केव्हाही, कोणताही विषय कधीही हवा असेल तेव्हा करुन घेवू शकतो. परंतु सन्मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की ज्या पध्दतीने आपण मॅरेथॉन करतो, पळतो आपण पळपुटे निश्चित नाहीत, आपण विषय अत्यंत अभ्यासपुर्ण आणतो का तर विषय अभ्यासपुर्ण आला पाहीजे, सगळयानी त्यावर चर्चा केली पाहीजे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मला सांगताना वाइट वाटत, आयुक्त साहेब मागच्यावेळेस मी या सभागृहात म्हणल, आज मला वाटत की ते आयुक्तांना विचाराव की आम्ही सगळे १३३ जण बोलतोत, भूंकतोत का तुमच्यावरती. मागच्यावेळेला मी सांगीतल की माझ्या वॉर्डामध्ये गणपती बसला त्यादिवशी टेस्ट झाली त्याचा रिपोर्ट आज मिळाला. मागच्यावेळेस मी बोलले तुम्ही काय केलं. आम्ही सगळेजण तुम्हांला खुप चांगले म्हणतो, खुप चांगले म्हणतो याचा अर्थ खुप चांगले म्हणजे कायतर सांगा. मा.महापौर साहेब, माझ्या प्रश्नाची उत्तर आयुक्तांनी दयायचीत. मागच्यावेळेस मी सांगीतल की एक आशा शेंडगेची टेस्ट झालीतर पाचव्या दिवशी रिपोर्ट आला. आशा शेंडगे कुटूंबात फिरती, लोकांच्यात फिरती तीच्यामुळ जे काही कोविडचे पेशंट वाढतात त्याला जबाबदार प्रशासन आहे का आपण. सत्ताधारी म्हणून आपण या शहरात आहोत महापौर साहेब, आणि त्यावेळेला जर यांच्याकडन काम होत नसतीलतर आम्ही सत्ताधा-यांनी काय करायचं. का केलं जात नाही हे. मी मागच्या बोलण्यान तुम्ही काय केल, एखादा पत्रव्यवहार केला, कुणावर ॲक्शन घेतली आणि हे कासारवाडीच फक्त नाहीतर अख्ख्या शहराच सांगते साहेब. मगाशी सभागृहात सांगीतल्याप्रमाणे माझ्या वॉर्डात एक पेशंट आहे ज्याला आपण सहा दिवसापुर्वी ॲडमीट केल आहे आज सातवा दिवस आहे. पेशंट मागे लागला की मला काहीच लक्षण नाहीत. नवरा, बायको आणि मुल तीघही पॉझिटीव्ह आहेत ते म्हणतात आम्हांला घरी सोडा. मी त्यांना म्हणले ॲडमीट व्हा चुकून काही वाढलतर उदयोग व्हायला नको. डॉक्टरांच्या नजरेखाली रहावा काही त्रास झाला नाहीतर आपण तुम्हांला शिफ्ट करु. मी डॉ.साळवे मॅडमशी बोलण्याचा प्रयत्न केला, आंबेडकरांशी बोलण्याचा प्रयत्न केला. एखादयाला जर लक्षण नसतील, तुमच्या ब्लड टेस्ट मध्ये काही आल नसेलतर

सोडून दया आणि आल असेलतर निश्चितपणे ठेवा ती आपली जबाबदारी आहे म्हणून. साहेब तुम्हांला मी पत्र दिलेल होतं मागे. आपल्या सिक्यूरीटीवाले लोक आहेत सगळे या सिक्युटीच्या परमनन्ट लोकांना २०१७ पासून युनिफॉर्म घेतलेल नाहीत. तर तुम्ही खरच आमच्या पक्षाची सुपारी घेतली का हे तरी सांगा आम्हांला. २०१७ पासून आमच्या कर्मचा-यांना कपडे घेतले गेले नाहीत. त्यांना बुट घेतले गेले नाहीत. त्यांना रेनकोट घेतले गेले नाहीत. याच्यामुळे काय वाटत की आम्ही सत्ताधारी खरेदी करु देत नाहीत. त्यांच्यासाठी खरेदी करु नका साहेब, तुम्हांला कोरोना आहे, तुम्हांला तेवढा वेळ नसेल १७-१८-१९-२० काय करतो साहेब आपण. त्यांच्या खात्यावर डीपी सुध्दा करु शकत नाहीत आपण. तुम्हांला पत्र देवून दोन महीने झाले त्या विषयाला. साध त्या पत्राच उत्तर सुध्दा आल नाही आम्हांला. आम्ही काही रिकामेटेकडे आहेत का की पत्र पाठवत असतो. सिक्यूरीटीवाली मॅडम त्यादिवशी समोर उभ्या होत्या मी म्हणाले इथल हुक का निघाल, इथल बटण का निघाल. तर ती म्हणाली आहो ताई ड्रेस लई जूना झाला आहे. मी म्हणाले दरवर्षी युनिफॉर्म घेतला जात नाही का, नाही घेतात की म्हणाली आणि मग बोलता बोलता त्यांनी सांगीतल की म्हणाली ताई २०१७ पासून आम्हांला ड्रेस घेतला नाही. मा.महापौर साहेब, हे जे काही विषय आम्ही बोलतो हे सगळे विषय फक्त या शहराच्या हिताचे आहेत. मा.महापौर साहेब, घरात तीन चपात्या केल्या, कोणती भाजी केली, कोणती साडी घेतली ही चर्चा आपण सभागृहात करत नाहीत. या शहराच्या हितासाठी जे जे आपल्या सगळयांना करता येईल त्यासाठी आपण बोलतो. त्यामुळे विनंती तुम्हांला आम्ही जे काही बोलतो फक्त शहरातल्या विषयावर बोलतो हे निश्चितपणे तुम्हांला सांगू इच्छिते. मा.महापौर साहेब, आज हा विषय क्र. ७ म्हणजे खरतर पीजीआय, पीजीआय, पीजीआय मागच्या चार दोन जीबी आणि वर्तमानपत्रातल्या बातम्या, टिव्हीवरच्या बातम्या जे काही बघीतल त्यामुळ असं वाटायला लागल की आम्ही लोक ती पीजी चालू करतोय म्हणून आम्ही हे १३३ काय मुर्ख आहेत, काही गुन्हा करतो म्हणून काही होतय का आमचे आयुक्त खुप हुशार आहेत म्हणून आम्हांला काहीतरी त्रास सहन करावा लागतो. सन्मा.महापौर साहेब, मी या सभागृहाला सांगू इच्छिते की आपण सगळेजण हे पीजीआय चालू करतो म्हणजे मला कळत नाही की आम्ही सगळे १३३ ला  फार प्रशासन कळत नसतं, तुमचे नियम कळत नाहीत परंतु तुम्ही तर खुप हुशार आहेतनां. तुम्ही आज कमीशनर आहात. सीपीएस म्हणजे कॉलेज ऑफ फिजिशिअन ऑन्ड सर्जनचे

आपल्याकडे दरवर्षी २७ ते ३० विदयार्थी येतात. हे वर्षातून दोनदा येतात. म्हणजे आपण साधारणतः ३० नाही तर २५ पकडलेतरी वर्षातून दोनदा ५० विदयार्थी डॉक्टर्स जे आहेत ते आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेमध्ये येत असतात आणि त्या सगळयांच्या मागे एक प्रोफेसर आणि असिस्टंट प्रोफेसर अवघा पाच हजार रुपयांच मानधन देवून आपण ते प्रोफेसर आहेत त्यांना आपल्या इथे बोलवत असतो. मग आता हे पीजीआय सुरु केल तर हे ३० डॉक्टर्स आपले बंद होणार. बरोबरना आयुक्त साहेब. मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की या मुद्दयावरती आयुक्तांनी प्रश्न चुकीचा असेलतर तसं सांगाव की आशाताई सभागृहामध्ये गप्पा मारु नका तुम्ही कुठूनतरी माहीती घेवून येता आणि आम्हांला सांगता. आम्हांला कळू दयात की आमच चुकीच असेलतर आम्ही आमची चुक या सभागृहामध्ये मान्य करु, जर आमच अज्ञान असेलतर, तर हे पीजीआय चालू झाल्यानंतर आपल सीपीएस बंद होणार म्हणजे आपल्याकडे नऊ कोर्सचे २४ किंवा ३६ शिकावू डॉक्टर वाढणार जरी असलेतरी इथले ३० डॉक्टर्स कमी होणार. ज्यांच्यासाठी अवघ्या पाच हजार मानधनावरती आम्ही डॉक्टर्स घेत होतो. आज आम्ही तीथ आडीच लाख, दिड लाख, दोन लाख जे काही आकडे असतील अशा इतक्या बलाढय पगाराचे डॉक्टर्स या शहरामध्ये आम्ही घेणार आहोत. साहेब, परवाच्या दिवशी एकही नगरसेवक, मला खात्री आहे की त्या डॉक्टरांच्या विरोधात बोलले नव्हते, एकही. सगळे सांगत होते तीथे काय काय अनुभव आलेले आहेत आम्हांला कोरोनाच्या काळामध्ये आणि काय काय चुकीच वाटतय त्यात सुधारणा करावी. परंतु माहीत नाही नामदेवरावांना काय साक्षात्कार झाला की सुरवातीला त्यांनी सांगीतल की आशाताईना मागच्यावेळेस एकदम मला विरोधात बोलल्या होत्या. साहेब, मी विरोध कोणत्या विषयाला केला ज्या विषयामध्ये आपण टेम्परर डॉक्टरांना परमनन्ट करण्याची उपसूचना १ के खाली दाखल केली होती त्या विषयावर माझा विरोध होता का तर हान्ड्रेड परसेन्ट तेव्हाही होता आणि तो विषय दाखल रद्द केला, पक्षाचाही तो विषय त्यांनी रद्द केला. कारण चुकीच चालूं दयायच नव्हत, चुकीच करायच नव्हतं. हे शहर आपली चांगली प्रतिमा, ना गलद होने देंगे, ना गलद करने देंगे. या प्रतिमेतून ओळखतात आणि ती प्रतिमा कायम राहण्यासाठी मी प्रयत्न केला होता. आजही सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.महापौर साहेब, तर हे सीपीएसचे विदयार्थी आहेत ते आपल्याकडे बंद होणार. यात आता सध्या ३६ विदयार्थी आहेत मागच्यावर्षी आपल्याकड २४ विदयार्थी होते. त्यानंतर

आपण एवढ हे सगळ करत असताना एवढा मोठा पगार कशासाठी दयायचा आणि का दयायचा हा सगळयात महत्वाचा मुद्दा आहे. मा.आयुक्त साहेब ज्यावेळेला तुम्ही या सगळया प्रक्रीयेमध्ये होता. आम्हांला फार काही माहीत नाही, पेपरला ॲड आली काय, डॉक्टरांच्या इन्टरव्हिव झाल्या काय हे सगळ झाल्यानंतर आम्हांला हाळूहाळू आमच्या कानापर्यंत काही गोष्टी आल्या. त्याच्यावर मला चर्चाही करायची नाही काही गोष्टी कानावर आल्या. साहेब तुम्ही पाहूणे कलाकार आहेत, सहा.आयुक्त पाहूणे कलाकार जे आमच्याकडे प्रतिनियुक्तीवरती येतातना हे सगळे पाहूणे कलाकार. तुम्हांला आमच्या शहराची इतकी अस्था असेल का हे माहीत नाही, त्याबद्दल पण बोलावच लागणार आहे. खुप वाईट वाटत साहेब, परवाची सभा झाली, परवा आपली मिटींग झाली गटनेत्यांनी आम्हांला बोलावल आपण सगळयांनी एकत्रीत चर्चा केली. त्यातला एकही मुद्दा घेतला नाही मग कशासाठी बोलवायची मिटींग. आताची उपसूचना वाचल्यानंतर इतक वाईट वाटल की मुर्ख होतोत आपण तीन तास वाया घातले. पुन्हा वाटल आपण भुंकायचच काम करणार की काय. आयुक्त साहेब आपण सांगावे की आपण हे सीपीएसचे विदयार्थी आपले कमी झाले आणि आपण डॉक्टर घेणार. काय फायदा होणार आमच्या शहराचा. या डॉक्टराचा पगार दयावा लागणार आहे तेवढा खर्च आमच्या शहराचा वाढणार आहे. हे जे डॉक्टर घेणार आहेत आपल त्यादिवशी ठरल होत की त्यांना खाजगी प्रॅक्टीस करु देणार नाही हे आपले मुद्दे गेले कुठे याच मला शक्य असेलतर सांगा अशी मी विनंती करते. दुसरा विषय आहे की आयुक्त साहेबांनी त्यादिवशी सभेमध्ये सांगायला पाहीजे होत. त्याठिकाणी योगेशभाई सारखे सिनीअर होते, आमचे पक्षनेते होते, सिमाताई होत्या आम्ही सगळे माझ्या पेक्षा खुप सिनीअर माणस होते. हे सगळे विषय आम्ही तुम्हांला सांगीतले आमच्या सात डॉक्टरांच तुम्ही काय करणार. तुम्ही आम्हांला लॉलीपॉप दाखवला साहेब. तुम्हांला गाजर दाखवल साहेब. आमचा अज्ञानीपणा आहे, आमच दुर्दैव आहे की आम्हांला त्यातल फार काही कळत नाही. त्यादिवशी हे सात डॉक्टर म्हणलेना ते सात डॉक्टर डीबीएनमध्ये घेणार म्हणतात ते डीबीएनमध्ये घेवून काही उपयोग आहे का हे सांगा. त्यांच्या पगारात वाढ होणार आहे का, निश्चित होणार नाही. त्यांची वयोमर्यादा वाढणार का, नक्कीच वाढणार नाही. मग आता ते परमनन्ट आहेत कशाला तुम्ही डीएनबीचा लॉलीपॉप दाखवता आणि ते डीएनबी कधी चालू होणार आहे ते पण तुम्ही सांगा. आम्ही त्यादिवशी तुमच्या बरोबर विश्वासाने बोललो. नंतर बोलण्यात आले की तो प्रॅक्टीसचा विषय तुम्हीच सांगीतला

की असं काही करता येईल का नाही आपल्याला माहीत नाही. म्हणजे मग आमच त्या मिटींगमधुन काहीच तथ्य निघणार नाहीतर कशासाठी उल्लू बनवता. तस सांगायच की आशाताई किंवा तुम्ही जे सगळे बडबड करताना तर असं काही डीएनबीमध्ये घेवून वेगळ काही बेनिफीट होणार नाही त्यामुळे आपल्याला असं काही करता येणार नाही वेगळा काही मार्ग असेलतर आपण विचार करु. तुम्ही आम्हांला एकदा सांगा की या सगळयांचा पगार ७५ हजार, १ लाख जो आहे तो तुमच्या दिड-दोन लाखावरती जाणार आहे का आमचे हे डॉक्टर. कालपर्यंत वायसीएम हे ४० डॉक्टरांवर चालायचच. आज पण आमच्या शहराचा आयसीयू सगळयात महत्वाचा आहे. तीन्ही ठिकाणी डॉ.दादेवार, डॉ.विनायक पाटील आणि डॉ.दिनेश गायकवाड हे आयसीयू बघतात, तुमचे ७२ काही पुजायला ठेवलेत का. आता माझ्या बोलण्यातून पण येतय काय तुमचे डॉक्टर आमचे डॉक्टर. हे सगळे शहरातच काम करणारे आहेतना. कष्ट करायचे आमच्या डॉक्टरांनी, काम करायच आमच्या डॉक्टरांनी. मी माहीती घेतली तीन आयसीयू चालू आहेत एक आयसीयू बंदच आहे. तरी ते आपलीच लोक बघतातना. डॉ.दादेवारच बघतात, डॉ.विनायक पाटीलच बघतात मग तुमचे डॉक्टर काय करतात. मग एवढया बलाढय पगारावरमी आपण डॉक्टर घेतले असतीलतर मग त्यांच्याकडे का जबाबदारी आपण दिली नाही. आज तुम्ही त्यांच्याकडे कोणती जबाबदारी दिली, रुबी एलकेअरची दिली. का दिली साहेब, कारण पुन्हा तीथ आपण ५२ लाख रुपये महीन्याला देतो साहेब. तीथला आयसीयू फक्त आता तुमचे डॉक्टर कदाचित बघणार आहेत असं मला ऐकायला मिळाल. आयुक्त साहेब तुमच्याकडन आम्हांला खरच अपेक्षा नाही. जे शहराच्या हिताच्या विरुध्द आहे ते करुच नका. आम्हीतर सगळेजण यावर्षी आहेत, पुढच्या वर्षी नाहीत पण तुम्हीतर निश्चितपणे देशाचा विकास करण्यासाठी शपथ घेवून या सभागृहात येता किंवा तुम्ही आयएएस होण्यासाठी किती कष्ट करुन आला असताल. खुप वाईट वाटल साहेब, ज्यावेळेस मला कळाल की डीएनबी घेवून काही होणार नाही आणि साहेबांनी सुध्दा आपल्याला गाजर दाखवलहो. आम्हांला उल्लू समजता. खुप वाईट वाटल आम्हांला. ज्यावेळेला आम्हांला कळाल की यातन काहीच होणार नाही. मी सभागृहाला सांगू इच्छिते की आज मायक्रोबॉयलॉजी पदाचे पाच डॉक्टर भरले. साहेब तुम्ही सांगा मला आपल्याला मायक्रोबॉयलॉजी स्टुडंटस पीजीला मिळणार आहेत का. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, मायक्रोबॉयलॉजीला आपल्याला स्टुडंटसच मिळणार नाहीत. मग या पाच लोकांचा पगार आपण बोकांडी

का घ्यायचा. आता आपल्याकडे डॉ.तुषार पाटील आणि डॉ.मोकाशी हे दोघे आपली पॅथॉलॉजी लॉब जी आहे ती वीस वर्षापासून सांभाळतात, हे सगळे चालू असताना आज आपण यांना पॉस म्हणजे उदा.घरात मी नांदतेय आणि नव-यानी सवत आणून ठेवायची तस झालेल आहे आपल्या वायसीएमच. आज त्या आंदूरे मॅडम आहे त्या पोटतीडकीने सांगतात की त्यांच्याशी आमचा काही संबंध नाही किंवा आमच रक्ताच नात नाही. किंवा त्या अंदूरे मॅडमला मी कधी फोन केलेला आठवत नाही पण जीव दुखतो मा.महापौर साहेब, जर मी उदया म्हातारी होणार असेलतर आणि माझा मुलगा म्हणाला की आई तु म्हातारी झाली तु घराच्या बाहेर हो मी दुसर कुणालातरी घरात आणलयतर,  नाही जमणार. कस करु शकतो आपण हे आणि मा.आयुक्त साहेब आम्ही सगळे काय करतो याच्यापेक्षा का तुम्हांला वाटल नाही की आपण अट टाकत असताना पहीली आपल्या डॉक्टरांना सामावून घेण्याची अट टाकली पाहीजे. आमचे डॉ.रॉय आणि डॉ. साळवे हे भांडणातच पडलेत. आयुक्त साहेब याच्यामध्ये पहीली अट टाकायला पाहीजे होती की ज्या लोकांनी संस्था उभी केली, गेली तीस वर्षे तुमच्या महापालिकेचा दवाखाना चालवला त्यांच्यासाठी तुम्ही ती अट टाकून घेतली नाही. साहेब, याठिकाणी सगळेजण मिलीभगत तुमच्यासहीत आहेत. तुम्हांला ही अट का कळली नाही. १२ लोकांना सामावून घ्यायच होत हे साहेब तुम्हांला बारा लोक जड होती का ७२ सामावून घेतले आणि त्यातला एकही असा नव्हता की डिस्क्वॉलीफाय करण्याच्या लायकीचा नाही, कुवतीचा नाही मगाशी योगेश बहलनी सांगीतले की २७ वर्षे नोकरी केलेले डॉक्टर आहेत त्यांच्यापेक्षा मी कुवतीची असू शकते कधी. माझ्या आईपेक्षा माझी वैनी भारी असूच शकत नाही. माझ्या सासू पेक्षा मी कधी भारी असूच शकत नाही. आणि तुम्हांला सांगते की आमच्या ३५ मार्कावर संशय आहे का तर निश्चितपणे आहे. मी उदाहरण सांगीतल त्यादिवशी की जर विनायक पाटील इन्टरव्हिवला गेले होते आणि माझेच प्रोफेसर तीथे इन्टरव्हिव घ्यायला होते त्यांनी मला दोन मिनीटातच सिलेक्शन केलं. माझी स्टूंडट माझ्या समोर इन्टरव्हिवला येते ते एका सेकंदातच सिलेक्शन करणार आहेत ते त्याठिकाणी झालं उदाहरणासहीत सांगते तुम्हांला. परभणीच्या मॅडम आल्या होत्या तीकडचा आपण माणुस घेतला त्यांचा ज्यूनिअर आपण त्याठिकाणी घेतला. साहेब तुम्ही परवा मला बोलता बोलता म्हणाले सभागृहात उदा. म्हणून सांगते की साहेब म्हणाले आशाताई तुम्ही शिक्षक आहात, सहा सहा महीने आपण शिक्षक बदलावे लागतील चालणार आहे का. हा पेज संपवाचा, हा लेसन संपवायचा, हे

संपवायच, ते संपवायच. पीजी म्हणजे काय तो डॉक्टर येणार आहे सिमाताईना तपासणार आहे, सिमाताईना पॅरासिटीमॉलची गोळी दिली, याची गोळी दिली, त्याची गोळी दिली, इफेक्ट होत नाही म्हणून तो सांगणार सिनीअर डॉक्टरना मग काय केल पाहीजे. मग सिनीअर सांगणार की नाही, नाही हया दोन गोळया बदला आणि त्याच्या ऐवजी हे ॲण्टीबायोटीक्स दया. मी हे ॲण्टीबायोटीक देणार परत दोन दिवस ते त्यांच करणार हो इम्प्रूमेंट होणार माझ्या अकलेत भर पडली की ज्यावेळेस पेशंटला असं असं काही होणार त्यावेळेस मी असे असे औषध बदलायचे. मग कशासाठी आशा शेंडगे, तीन वर्षे, तीस वर्षे, चाळीस वर्षे किंवा चौंसष्ट वर्षे वय होईपर्यंत शिकवल पाहीजे. कारण त्याठिकाणी दुसरा पेशंट येणार आहे. दुसऱ्या पेशंटला मला तपासायच आहे. मग मला कशासाठी परमनन्ट माणस पाहीजे होती. तुम्ही त्रास देताय साहेब हा सगळा. आमच शहर खुप चांगल चालल आहे. आमच्या १३३ नगरसेवकांचे पाहूणे रावळे सुध्दा बाहेरच्या गावावरुन फोन करतात की ताई मी आमक्या गावचा आहे, तुमच ते तीकडच गाव नाही का तीकडन येतोय मग तेवढ मला तुमच्या तीथ दवाखान्यात पेशंट म्हणून तपासायच होतं हे करता येईलना आणि आम्ही पण अभिंमानाने सांगतो ये दादा आमच्या इथले एक्स, वाय, झेड डॉक्टर खुप चांगले आहेत तू ये इथ आम्ही तुम्हांला व्यवस्था करुन देऊ. साहेब तुमच्याकडे आम्हांला कोणतीच अपेक्षा याठिकाणी अशाप्रकारे नव्हती. डीएनबीच्या विषयात काय तथ्य आहे, किती तथ्य आहे हे सांगाव. साहेब, नकान करु हे सगळ. का वेळ काढतो आणि कुणासाठी कारण त्याठिकाणी हार्डीकर साहेबांनी सांगीतल होतं की तुम्ही या तुम्हांला परमनन्ट करु. तुमचा शब्द खर ठरण्यासाठी तुम्ही परमनन्ट करता का. हा तुमच्या ७२ डॉक्टरांना तीथ घेतो, आणि आता राहलेल्या डॉक्टरांना तुम्ही डीएनबी मध्ये घेतो असं त्यांना पण गाजर दाखवता साहेब. आता फक्त जिजामाता रुग्णालय व भोसरी रुग्णालय तयार आहे फक्त. आकुर्डीच तयार नाही, मासुळकर तयार नाही आमचे ही तीन दवाखाने अजून तयारच नाहीत. तीथ आमची माणस कामाला यायचीत परत तुम्हांला एमसीआयकड जायच त्यांच्याकडून माहीती घ्यायची, त्यांच्याकडून परवानगी घ्यायची मग जावून ते सुरु होणार आहेत मग कशाला साहेब फेकॅलॉजी. कशाला फेकॅलॉजी करता तुम्ही सगळी. जुन्या डॉक्टरासाठी जीआर आहे की त्यांना आपण तीन प्रमोशन दयायचे, पाच प्रमोशन दयायचे त्यांचा विषय स्थायी समितीने मंजूर केला आणि तो विषय आपण पाठवला पवन साळवेकडे, त्याच्यावरती रिप्लाय घेण्यासाठी. आहे त्या

डॉक्टरांच मानसीक संतूलन बिघडवू देवू नका. एक सांगते साहेब, हे वायसीएम जे चालले आहेना साहेब, ते सगळ आमच्या डॉक्टरांच्या नियमानुसार. मी बातम्या वाचायला चालू केल्या. आज काय संदिप वाघेरेनी हे केलं, आज काय सभागृहात हे बोलले, आज काय ते बोलले. आहो, या सभागृहात रॉयला बांगडया घालण्याचा विषय पण झाला होता. या सभागृहात आपण परवा साळवे साहेबांशी काय वागलोत हे तुम्हांला चांगल माहीती आहे. आमचे साळवे साहेब काळी फित लावून आले नाही सभागृहामध्ये. मा.महापौर आपण कधी वायसीएमला गेले नाहीत, कुणाला वाईट बोलला नाहीत. आपलेच गावातले पेशंट असतात, पेशंटला एखादी सुविधा नाही मिळाली की तुमचे माझे टेम्पर हालते आणि आपण एखादया डॉक्टरला रागांच्या भरात बोलून येतो, त्यावेळेला रागाच्या भरात आम्ही त्यांना बोलतो पण आज पर्यंत मला आठवत नाही की वीस ते पंचवीस वर्षात एकातरी डॉक्टरांनी आज पर्यंत काळया फिती लावायची डेअरींग, डेअरींग नाही म्हणणार खरतर मी त्यांना, डेअरींग कुणीही करु शकतं. ती आत्मीयता, तो जिव्हाळा त्यांना माहीती आहे की शेवटी कोणताही विषय आला की आपल्याला सभागृहापुढे जायच. आपल्या वायसीएमला कोणतही मेडीसिन पाहीजे असेलतर सभागृहापुढे जायच, आपल्याला एखाद साहीत्य लागणार असेलतर या सगळयासाठी आपल्याला सभागृहासमोरच जाव लागणार आहे. मग यांना काय एवढा वेगळा विषय आहे. आणखीन एक नवीन प्लॅन ऐकायला मिळतय की परंतु मी काही कन्फर्म बोलणार नाही पण डीएनबीच्या विषयात साहेब तुम्हांला खुलासा दयावा लागेल की नंतर काय होणार या विषयामध्ये, नक्की याच्यात काय होणार आहे. सन्मा.आयुक्त साहेब एवढा मोठा भुर्दंड म्हणजे मगाशी एकानी सांगीतले की ईएसआय हॉस्पिटल, अंधेरी हे २०११ ला चालू केल आज २०२० आहे. नऊ वर्षे झाल मग हे गव्हर्मेंट हॉस्पिटल आहे त्यांना चालतं आमच्याच वायसीएमला लई पैसे आलेलेत. आमच्याच महानगरपालिकेत प्रचंड पैसे आहेत जे आम्ही खर्च करु ईच्छितो. साहेब, खर्च करायला अजीबात आमची ना आजही नाही. जर माझ्या शहरातील नागरीकांनी ख-या अर्थाने सुविधा मिळणार असतीलतर, त्या तेवढया चांगल्याप्रकारच्या दर्जेदार आरोग्यसेवा तुमच्याकडून मिळणार असतीलतर निश्चितपणे करायला काही हरकत नाही. पण त्यातपण हामरी तुमरी कशासाठी पाहीजे. जाऊन बघा त्या दुस-या नंबरच्या मजल्यावरती काल पर्यंत ज्या डॉक्टराना तुटकी केबीन होती, तीथ गेल्यानंतर डॉक्टर म्हणतात आशाताई आल्यात बसाना तर त्या खुर्चीच हॅण्डल तुटलेल

असायचं. बसल्यानंतर मी पडते की काय अशी मनात भिती होती. आज दुस-या मजल्यावर जाऊन बघा आहो, पालिकेच वाटतच नाही. मा.महापौर साहेब, एखादी खाजगी इन्स्टिटयूट असतेना खाजगी इन्स्टिटयूटपेक्षा सुंदर, देखण, एसी वगैरे एकदम चकाचक. आओ, यहाँपर बैठो चायपाणी करो, पत्रपेपर करो मस्तपैकी बिस्किट खा आणि तुम्हांला जमलतर जा. मी नाव घेणार नाही त्या डॉक्टरांच. एक आठ दिवसापुर्वी गेले आणि विचारल काय म्हणता आज वायसीएमला दिसत नाही आज तुमच्या दवाखान्यामध्ये आहात. तर ते म्हणतात की ताई रोज जायची गरज लागत नाही आम्हांला. ते आता असिस्टंट प्रोफेसर म्हणून कामाला लागलेत आणि ते सांगतात की मला रोज जायची गरज वाटत नाही. हे माझ्याशी बोललेल वाक्य आहे, मा.महापौर साहेब हे ऐकीव वाक्य नाही. ते काय म्हणले आमच्याकडे फ्लोरच्या जबाबदा-या असतात आम्ही काय करतोत फोनवर पण होवून जातना की आज तेवढ बघुन घ्या. हे माझ्याशी बोललेल वक्तव्य आहे. दुर्दैवाने रेकॉर्डीग केल नाही साहेब, नाहीतर तुम्हांलाही ऐकवल असतं. मग नक्की काय चाललेल आहे आपण काय करतो हे एकदा ठरवा. हा विषय आपण मंजूर केलेला आहे तुम्ही काय करणार आहात याच एकदा निश्चित करा. पीएसएम यासाठी पण तुम्हांला स्टुडंटस मिळणार आहेत का. ज्यांचे स्टुडंटस मिळणार नाहीत त्यांचे का तुम्ही डॉक्टर भरुन ठेवता आमच्या डोक्यावर ओझ. सेवेला डॉक्टर, सेवेला डॉक्टर दुसऱ्या मजल्यावरुन खाली उतरतोना तो डॉक्टर आज कोवीडमध्ये खाली येत नाही. भोसरीचे डॉक्टर आजारी पडले त्यावेळेस तुमच्या एका डॉक्टरांनी चेक नाही केल आणि ते डॉक्टर रुग्णाला सेवा देणार. डॉक्टरांनी डॉक्टराला सेवा दिली नाही त्या काळामध्ये तर तुम्ही आताच्या काळात काय अपेक्षा करणार पुढच्या काळासाठी त्यांच्याकडन. तरी मा.महापौर साहेब, किमान त्याविषयाला एखादी उपसूचना देवून आपण केल पाहीजे. की मायक्रोबायोलॉजीस्ट ज्याची आपल्याकडे आता मान्यता नाही ते लोक आपण का भरतो. आणि भविष्यात जर मान्यता नाही आलीतर आपण आयुक्तांना पकडायला जाणार आहेत ते कुठे आहेत ते. शेवटी खापर तुमच्या माझ्यावर फुटणार मा.महापौर साहेब. आयुक्त साहेब मगाशी मंगलाताईनी सांगीतल की याच्यात तुम्हांला काय काय बदल करता येतील ते शहराच्या हितासाठी असतीलतर निश्चितपणे करा आणि त्याच पध्दतीने हा विषय करावा मा.महापौर साहेब.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आज ज्या

विषयावरती चर्चा चालू आहे खरतर या विषयावरती मागची सभा तहकूब आहे, याच विषयावर चर्चा झाली. आता परत चार सव्वाचार वाजले आहेत परत याच विषयावरती आपण किती वेळ बोलणार आहोत. मा.महापौर साहेब, परवा मी नगरसचिव साहेबांना भेटलो त्यांना मी विचारल की सभाकामकाजा मध्ये असं काहीतरी लिमीट आहे का म्हणजे एखादयाला बोलण्यावर आपल्याला लिमीट देता येईल. त्यावेळेस त्यांनी मला सांगीतल की ते मा.महापौरांच्या अधिकारात असतं आणि ते एखादया नगरसदस्यांना दहा मिनीटापर्यंत बोलण्यास सांगू शकतात, दहा मिनीटानंतर विषय सोडून बोलतो किंवा बाकी सभागृहाचा तो वेळ घेतो तर मा.महापौर त्यांना थांबवतील. आपल्याला अशी विनंती राहील की आता कोरोनाचा काळ चालू आहे या काळामध्ये सभागृहात जास्तीत जास्त वेळ बसून राहणे आणि त्याच त्याच त्याच विषयाची चर्चा करणे हे योग्य वाटत नाही. मागच्या मिटींगमध्ये या विषयावरती सभा थांबली या विषयाबद्दल सर्व पक्षाच्या गटनेत्यांना काही ज्येष्ठ नगरसेवकांना, आता ज्येष्ठ नगरसेवक दरवेळेस हा विषय येता ज्युनिअर नगरसेवक, सिनिअर नगरसेवक. खर बघायला गेलतर ७५ ते ८० नगरसेवक आता नवीन निवडून आलेले आहेत. त्या ज्येष्ठांचा कालावधी किती आहे साडेतीन वर्षे झाले आम्ही निवडून आलेलो आहोत. आमचा कालावधीच मुळात पाच वर्षाचा असतो. म्हणजे थोडफार तर आता हे प्रोसिडींग, प्रोसिडींगमध्ये उतरणारे सगळे वाक्य, तुम्ही आम्ही बोललेल्या सगळया गोष्टी थोडया कळायला लागल्यातनां. आता जी प्रोसिडींगमध्ये मगाशी पक्षनेत्यांना अफजलखानाची उपमा दिली. काही शब्दाचा उल्लेख झाला हे असे शब्द प्रोसिडींगमध्ये नसावेत अस वैयक्तिक माझ मत आहे. असे शब्द येत असतीलतर हे प्रोसिडींगमधुन काढावेत हे या साडेतीन वर्षामध्ये नगरसेवक झाल्यापासून आता आम्हांला कळलय. तरी प्रोसिडींगमध्ये हे असे शब्द नकोत. या विषयाची जी चर्चा झाली. या डॉक्टर भरतीमधले तीन मुद्दे होते. एजबारच्या विषयाची त्यादिवशी चर्चा झाली. त्याच्यानंतर मा.आयुक्तांच्या अधिकारामध्ये दोन वर्षासाठी एकदा तो कामाला आल्यानंतर दोन वर्षामध्ये त्याची वर्तणुक जर चांगली नसेलतर त्याला परमनन्ट करु नये ही पण चर्चा झाली. तीसरा मुद्दा असा होता की त्यांनी दुसरा दवाखाना चालवायचा नाही, खाजगी प्रॅक्टीस करायची नाही. मा.आयुक्तांकडून असं सांगण्यात आल होत की हे पुर्णपणे तसच आहे की जर तो दुसरीकडे प्रॅक्टीस करत असेलतर त्याला आपल्या इथ राहता येणार नाही. दुसर मा.आयुक्तांनी सांगीतल की त्या पोस्टसाठी एकच व्यक्ती आलेली

आहे त्याच्यामुळे आपल्याला त्या व्यक्तीची गरज आहे त्यासाठी ते थांबवल होतं. त्या दिवशीच्या चर्चेमध्ये थांबला होतात म्हणजे हे फायनल झाले नव्हते. त्या दिवशीच्या चर्चेमध्ये दोन विषय निश्चित झाले होते असं मला कळलं मी त्याठिकाणी होतो. सगळया पक्षाचे गटनेते होते. दुस-या हॉस्पिटलमध्ये तो नसणार आणि डॉक्टर जर गैरवर्तणूक करत असेलतर मा.आयुक्तांच्या अधिकारामध्ये त्याला थांबवता येईल त्याला परमनन्ट केल जाणार नाही. मग हे दोन विषय जर क्लेअर झाले होते आयुक्तांनी त्यांच स्टेटमेंट दिलं होतं तर मला वैयक्तिक वाटत की आमच्या आमच्यात चर्चा करण्यापेक्षा मा.आयुक्तांनीच खुलासा दयावा की हे जे दोन विषय आहेत हे डॉक्टरांना आयुक्तांच्या अधिकारामध्ये शंभर टक्के त्यांना बाजूला ठेवता येईल, जर त्यांची वर्तणूक व्यवस्थित नसेलतर त्यांना परमनन्ट करणार नाहीत, हे मा.आयुक्त साहेबांनी डिक्लेअर कराव. दुसरा असा विषय की ते जर दुसरीकडे प्रॅक्टीस करत असतीलतर त्यांना आम्ही घेणार नाहीत. हे दोन विषय तुम्ही क्लेअर करुन टाका राहीला फक्त एजबारचा तर त्यादिवशी चर्चेमध्ये याच डिसीजन झालेल नव्हतं. बाकीच्या गटनेत्यांना तुम्ही पण तुमच्याकडून रिक्वेष्ट पण केलेली होती की आपल्याला माणूसच भेटत नाही. आपण जाहीरात दिलेली आहे एकच माणूस येतो तो आपण घेतो. तो विषय त्यादिवशी निश्चितपणे विरोधी पक्षानी मान्य केला नव्हता आणि याच्यावरती चर्चा थांबली होती. जर चर्चा करायची असेलतर त्या एका मुद्दयावरच करा. फापट पसारा करायचा, सगळयाच विषयावर चर्चा करायची यानी चाळीस लाख घेतले त्यांनी हे केलं तसच जर करायच म्हणलतर नाव घेवून टाका. एवढच सांगतो आणि लहानतोंडी मोठा घास घेतला असं काही लोकांना वाटल तर ठिक आहे, घेतलातर घेतला आता साडेतीन वर्षे झाले म्हणजे किमान नगरसेवक पदापुरततरी ज्येष्ठ झालो. एवढ बोलतो आणि थांबतो, धन्यंवाद.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आताच आमचे सहकारी मित्र बारणे यांनी सांगीतल नवीन नवीन नवीन हा विषय किती दिवस चालणार आहे. मी पहील्यांदा हे कबुल करतो की आमचे सिनीअर नगरसेवक हे मार्गदर्शक आहेत त्यांचा मी रिस्पेक्ट करतो. परंतु ज्यावेळेस बहल साहेब आतमध्ये आले आणि त्यांनी डायरेक्ट गद्दार, गद्दार, गद्दार हा विषय काढला त्यावेळेस खरोखर एक मिनीटाकरिता अचानक लक्ष गेल्यानंतर वाटल नंतर भितीही

वाटली. म्हणजे सभागृहाच्या ठिकाणी भिती वाटत असेलतर या सभागृहाचा निश्चित अपमान असेल. जर हे सिनीअर मंडळी असे करत असेलतर आम्ही काय करायच, आम्हांला बोलता येत नाही. आम्ही बोलू शकत नाहीत. हा सभागृहाचा अपमान आहे. मा.महापौर साहेब, यांच्यावरती कुठेतरी अंकूश लावला पाहीजे. आता बहल साहेबांनी सांगीतल की डॉ.स्वामी, डॉ.खिलारे, डॉ.वाघ यांची हॉस्पिटल आहेत. ते हॉस्पिटल एवढया दोन वर्षात झालीत का पाठीमागे दहा वर्षापासून आहेत. माझ्या माहीती नुसार यांचे हॉस्पिटल ते प्रॅक्टीस करता केलेत आणि ते दहा-दहा, बारा-बारा वर्षापासून बाहेर प्रॅक्टीस करतात. मग हे जर बाहेर प्रॅक्टीस करत होते तीन साडे तीन वर्षापुर्वी यांची सत्ता होती तर यांचे काही डोळे झाकलेले होते का. माझ्या माहीतीनुसार आज माझा अनुभव आहे ही जी डॉक्टर आहेत यांनी नाव घेतले मीतर नाव घेत नाही. माझा एक मित्र त्याच्या मिसेस तीला ब्रेनटयूमर होता आणि त्यांच ऑपरेशन सोमटणे फाटयाला करायच तर आपल्या इथल्या एका डॉक्टरांनी त्याला सजेस्ट करुन दुस-या हॉस्पिटलमध्ये घेवून जावून तीथ ऑपरेशन केलं. राजीव गांधी योजनेखाली त्याच ऑपरेशन होतं. मग हे होत असताना त्यावेळेस प्रशासन आणि बाकीची मंडळी झोपलेले असतात. डॉ.स्वामी किती वर्षापासून प्रॅक्टीस करतात. डॉ.खिलारे किती वर्षापासून प्रॅक्टीस करतात. एक वर्षात झालेल नाही हे. गेल्या तीन ते साडेतीन वर्षात मी स्वतः त्यांच्याकड ट्रिटमेंट घेतलेली आहे. मग अजून याच्यापेक्षा काय मला स्वत:ला पुरावा पाहीजे. जर मला स्वत:ला पुरावा दयायचा असेलतर मला काहीच गरज नाही कारण मी स्वतः अनुभव घेतलेला आहे मग इतरांचे त्यावेळेस डोळे झाकलेले आहेत का. आम्ही त्यांच्याकडन हेच शिकायच का. आणि हे पक्षाच नाव, पक्षाच नाव काय आपआपसातच प्रत्येकजण एकमेकांवर धावून जायला लागलेला आहेत, काय त्या जनतेला भुरळ पाडतात तुम्ही लोक. काय पैशाच्या विषयावर तुम्ही बाहेरुन येता, गद्दार म्हणून ओरडता, अफजलखान म्हणून ओरडता म्हणजे तुमचा बाहेर काहीतरी व्यवहार फिस्कटला त्यामुळे आत मध्ये येवून तुम्ही अशा पध्दतीने वागता का. बाकीच्याना सर्वाना दाखवता आमचा व्यवहार फिसकटला. आम्हांला काही माहीतीच नाही काय गटनेत्यांची त्यादिवशी मिटींग झाली ते आमच्या समोर येथे विषय येतो त्या विषयावरती आम्ही बोलतो. मग तुम्ही जर व्यवहार करत असालतर तुमचाही कुठतरी लाभांश कमी पडला असेल तुम्हांला शेर कमी मिळला त्यामुळ तुम्ही ओरडायला लागले का. हे आम्हांला बोलायची इच्छा नाही परंतु तुम्ही आज दाखवून देता की आम्हांला हे बोलायची वेळ

आली. माझे सिनीअर कोणीही असलेतरी मी ईज्जत करतो. बुध्दीवंत माझ्यापेक्षा कमी वयानी जरी असलातरी मी रिस्पेक्ट करतो. परंतु ही अशी परिस्थिती आमच्या सारख्यांची असेल, आज नवीन नगरसदस्य मोजकेच आहेत. सर्व सिनीअरच आहेत आम्हांला माहीती पण नाही की कधी गटनेत्यांची मिटींग झाली. गटनेत्यांची मिटींग झालीतर चार पक्षाचे चार गटनेते पाहीजे मग बाकीची क्वान्टेटी काढली तर मला वाटते बरेच सिनीअर होते त्यामध्ये. जर असे असताना या पध्दतीने जर वागणूक होत असेलतर मी स्पष्ट शब्दात निषेध करतो. आपल्या वायसीएमला न्यूरोसर्जन नाही याच्यावरती कोणी चर्चा केली नाही. आज एखादा गरीब जर जात असेल, हॉस्पिटलमध्ये असे बरेचसे पेशंट येतात की त्याला ब्रेन टयूमर आहे, त्याला चक्कर येते, त्याला काहीतरी आजार आहे त्याला बाहेर घेवून जा म्हणतात. याच्यावरती नाही कोणी चर्चा केली. जनतेच्या बद्दल कोणी विचार नाही करत. त्याच्यावरती चर्चा केली पाहीजे. प्रत्येकजण मुंबईच्या अंधेरीच्या हॉस्पिटलचा उल्लेख करतो. परवाच्या भाषणामध्ये मी बोललो की मुंबईवरुन फोन आले की आपल्या येथील हॉस्पिटल आपल वायसीएम हॉस्पिटल खुप चांगल्या प्रकारे ट्रिटमेंट करतय. चांगल्या प्रकारे वागणूक मिळते. माझी स्वत:ची बहीण मी तीकडन इकडे आणले त्यांचे पाच पेशंट होते. ते आपल्याइथे आल्यानंतर निगेटीव्ह आहेत, तीकडे त्यांनी फक्त क्वॉरंटाईन करुन ठेवतात. तीकड सात दिवसापासुन क्वॉरंटाईन केलय त्यांना काहीच कुठल्याही प्रकारचे सिम्टन्स दिसत नाहीत. मग या गोष्टीचा विचार करा. प्रत्येकाची देवाण-घेवाण प्रत्येकजण याच्यामध्ये आडकला का. मा.महापौर साहेब, सभागृहाचा मानअपमान, सभागृहाची वेळ, वेळतर समजा प्रत्येकाला बोलायला आमच्या सारख्यांना बोलायला भेटते, यांच्याकडन शिकायला भेटतय ते खुप महत्वाचे शब्द असतात की त्यांचेकडन आम्हांला वर्गामध्ये बसल्यानंतर शिकायला भेटत जे की अभ्यास करुन शिकता येत नाही. आता या ताईंकडन आम्हांला चांगल शिकायला भेटतय. परंतु काही ज्या गोष्टी आहेत ते त्यांनी जर त्यांचा सन्मान पाळलातर निश्चितच आम्ही त्यांचा सन्मान पाळू. आता हे डॉक्टर आपल्याकड किती वर्षापासून सर्व्हिसला आहेत. आपल्याकडे वीस डॉक्टराना सिलेक्ट केलेलं आहे जे की आठरा असतील, पंधरा असतील, बारा असतील ते आपल्याकड सर्व्हिसला आहेतना ते किती वर्षापासून आहेत. गेली दहा वर्षे, पाच वर्षे, पंधरा वर्षे तरी असतील. मला हे म्हणायच त्यावेळेला असे करत नव्हते का हे. म्हणजे या तीन वर्षात सहा महीन्यात असे करायला लागले का. चार पाच वर्षापुर्वी हे असे करत

होतेतर तुम्ही त्यांना येथे का ठेवले. अशाना तुम्ही साथ देता तर तुम्ही कोण. मला हा प्रश्न उलटा विचारायचा मग तुम्ही कोण. त्यांनी आतापर्यंत हॉस्पिटल चालवल नाही का, वायसीएम चालवल नाही का, मग वायसीएम पाहील कोणी. अस नकोय, या गोष्टी मला वैयक्तिक चुकीच्या वाटतात मा.महापौर साहेब, त्यामुळ मला हे बोलावस वाटल. इथ कुठेतरी दबून राहत ते बाहेर काढल गेलं. प्रत्येकानी प्रत्येकाची मर्यादा ठेवली पाहीजे. प्रत्येकानी एकमेकांवरती आरोप नाही केले पाहीजे, असं मला तुम्हांला सांगायच आहे. एवढ बोलून मी माझे दोन शब्द संपवितो, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. इतकी वादळी चर्चा होत असताना मगाशी आयुक्त साहेब आम्ही या शहरात जे काही आमच नाव असेल ते फटकळपणासाठी आणि खर बोलणारासाठी. ही फॅक्ट आहे की त्यादिवशी मंगलाताई आम्हांला आमच्या पक्षनेत्यांनी निरोप दिला, मी विरोधात बोलले होते, आशाताई विरोधात बोलली होती. योगेशभाई बोलले होते म्हणून गटनेत्यांच्या व्यतिरीक्त आमची तीथे हजेरी होती. आता तीथ काय व्यवहार झाला का नाही कमिशनरांना माहीती, आपल्यालातर काही माहीती नाही. तर तुम्ही सांगायच, मा.महापौरांनी सांगायच आणि पक्षनेत्यांनी सांगायच. तुम्ही आम्हांला तीथ बोलवल का बोलवल, तुम्ही आम्हांला परिस्थिती सांगीतली. तुम्ही जे काही सांगीतले ते आम्ही तीथे ऐकले आमचे फक्त तीनच मुद्दे आम्ही त्याठिकाणी क्लेअर केले होते. १) बाहेरची प्रॅक्टीस चालणार नाही २) एजबार असलेला व्यक्ती आपण घ्यायचा नाही. ३) आयुक्तांना अधिकार दयायचे दोन वर्षानंतर या डॉक्टरांना प्रोबेशन पिरीएड संपल्यानंतर आयुक्तांनी त्याची वर्तणूक बघून त्यांना कायमस्वरुपी सेवेत घेणे, हे तीन च मुद्दे होते. या तीन मुद्दयांच्या व्यतिरीक्त आमच काही म्हणणं पण नव्हतं, ते तेव्हाही नव्हत आणि आजही नाही. तस जर म्हणलतर विषयाला विरोध करायचा का तर शंभर मुद्दे आहेत आणि करु शकतो. परंतु या शहराची परिस्थिती पाहता, गांभीर्य पाहता आम्ही त्याठिकाणी आम्हांला जे कायदयात बसत नाही त्या गोष्टीवर त्या मुद्दयांवर आक्षेप घेणं हा या सभागृहाचा अधिकार आहे त्या अधिकाराची उंची वाढविणारा विषय आहे. पण सत्तेत असल्यामुळे खरपण बोलायच नाहीतर तस होवू शकत नाही कारण बीपीएमसी ऍक्टनुसार ज्याप्रकारची शपथ घेवून या सभागृहात मी आले जे शपथपत्र दिलं होत की मी नागरीकांच्या हिताच्या दृष्टिने जे जे निर्णय असतील त्या निर्णयाला मी बांधिल आहे. त्या टॅक्सपिअरला

मी बांधली आहे आणि तोच टॅक्सपिअर इथेजर नारवला जात असल, नागवला जात असलतर त्या विरुध्द आवाज उठवण्याची जबाबदारी सुध्दा माझीच आहे आणि मी ती शपथ घेतली. आणि म्हणून मी माझ्या शपथेबरोबर पामाणिक आहे. कुणाला काहीही वाटू मला त्याच्याशी घेणंदेणं नाही. परंतु कमीशनर साहेब आपण जे तीन मुद्दे मांडले होते मला असं वाटत की ज्यावेळेस तीस-या क्रमांकाचा विषय आला त्यावेळेस आपण जर विश्लेषण केलं असतंतर ते खुप योग्य झाल असतं. जे तुम्ही आम्हांला सांगीतल, जे बंद दाराआड ठरल ते तुम्ही आम्हांला सांगायला पाहीजे हातं कारण की सर्व पक्षाचे नगरसेवक तीथे होते. आता आम्हांलाच का बोलवल त्यांना का नाही बोलावल याच्या व्यतिरीक्त का लोक होते तर मी कारण सांगीतल. राजकारणामध्ये ज्युनिअर आणि सिनिअर नसतो. राजकारणामध्ये सही लीडरशिप करतो ते वही सिनीअर होतात आणि त्या लिडरशिपचा मी खुप सन्मान करते. माझ्या पेक्षा लहान असलेल्या तुषार कामठेनी चांगल विषय काढले शंभर टक्के शाबासकी दिली. संदिप वाघेरेनी चांगले मुद्दे काढले शंभर टक्के शाबासकी दिली आणि छातीठोकपणे पाठीशी उभी राहीले की तुला लागली मदततर मी आहे. भीत नाही पण अभ्यासपुर्ण विषय असतील, चांगले विषय असतील, आता योगेशजी बहल यांनी विषय मांडले. मे बी आता विरोधीपक्ष म्हणून त्यांना काय मुद्दे मांडायचे होते हा त्यांचा अधिकार आहे. या सभागृहात मा.माई आपण सदस्य होतात, एनसीपी मध्ये होतात, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होतात. मी याठिकाणी राष्ट्रवादीला हजारवेळा चोर म्हणलेल आहे, हजार वेळा. त्यांनी नाहीना असं खंडण केल, ते हुशार होते आजही हुशार आहेत ते. ते बोलले आणि लगेच तुम्ही तुणतुण घेवून नाचायला लागलात. अरे, तुम्ही कशाला बोलताय. थांबाना, थांबा. आणि म्हणून मग ज्युनिअर आणि सिनिअरचा विषय येतो. सभागृह बघीतल्यानंतर आम्हांला सुध्दा कळायला लागल कधी बोलायच आणि कधी थांबायच. आता बोलायच का नाही बोलायच. सिच्यूएशन कशी आहे ते बघून बोलायच. आपल्या अंगावर काही येणार आहे का ते बघून बोलायच. तुम्हांला कोण चांगल वाटल, कोण वाईट वाटल याच्याशी इथे बसणारे १३३ डोके आहेत यामध्ये १३३ नगरसेवकांना प्रत्येकाला आपल मत मांडण्याचा अधिकार राज्यघटनेनी इथे दिलेला आहे. अगदी स्विकृत सदस्य असतील त्यांना सुध्दा तो अधिकार या सभागृहाने दिलेला आहे आणि तो अधिकार दिलेला असताना आपण एकमेकांच्या अधिकारावरती बोलणं हे योग्य नाही हे चांगल्या सभागृहाच लक्षण नाही हे चांगल वाटत नाही. तुम्ही आणि मी

आपणतर तीन टर्म काढलेल्या आहेत या सभागृहात. तुम्ही त्यावेळेसही सत्ताधारी पक्षात होता आजही सत्ताधारी पक्षात आहेत. मगाशी मी म्हणत होते की माई आपली थम्बींग मॅजॉरेटी आहे. आपल्याला परत परत जावून परत यायचच नाही हो. विषय मंजूर करायचा होता आपल ठरलं. मग ठरलतर कशाला एवढी घाई करायची. काय कोणाला बोलायच ते बोलू दयात, बोला बाबानो आणि बोलल्या नंतर सांगा तुम्ही मत मांडल, तुम्ही मत मांडल हा विषय मंजूर उपसूचनेसह. त्यांनी त्यांच मत मांडायच नाही का, मग सभागृह एकदाच येत महीन्यातून आपण एकदाच बोलातो. पुणे महापालिके सारख आपण सभागृहात पाच-पाच वेळा बसत पण नाही. त्याठिकाणी रात्रीच्या बारा-बारा, एक-एक वाजेपर्यंत हे सभागृह चाललेल आहे. मा.मोहिनीताई लांडे महापौर होत्या मला चांगल आठवत रात्री १२.४० मिनीटानी सभागृह संपल होत. विरोधीपक्ष म्हणून आम्ही तीनच सदस्य निवडून यायचो, बोटावर मोजण्याइतके. पण याच्यामध्ये एक एक तास बोलायचो आणि प्रत्येकाला विषयाला आमचा हात वर असायचा मा.महापौर बोलायच म्हणून. एखादयावेळेस म्हणाच्या सिमा ऐकना, घेना संभाळून तेवढ. हे पण दातृत्व पाहीलना आम्ही, नाही पाहील का. माझ्या नवीन बांधवाला, माझ्या नवीन मुलाना एकच सांगायच आहे की तुम्ही नवीन आहेत म्हणून तुम्हांला कोणीच हिणवत नाही. परंतु मागे काय झाल. राजकारण म्हणजे हिस्ट्री आणि इतिहासात काय घडल, त्यावेळेस काय घडल होतं, कशाच्या अनुषंगाने आता विषय चालू आहे हे सगळ बघुण इथे नगरसेवक आपल मत मांडत असतात. आणि म्हणून मा.महापौर साहेब, मगाशी मी तुम्हांला वारंवार विनंती करीत होते. आपल्याला काय करायच ठरल होतनां. मग त्याच्यामध्ये आपण फार घाई करण्याची गरज नव्हती. आयुक्त साहेब त्यादिवशी एकतर पहीली गोष्ट जे तीन मुद्दे आपण मांडले होते त्या तीन मुद्दयांच निरसन झाल नाही. तुम्ही कबुल केलं होत आणि कबुल केल्यानंतर मग आता त्यातला एकही मुद्दा आपण घेतला नाही म्हणून योगेशभाई साहेब चिडले. चिडल्यानंतर त्यांनी शब्दप्रयोग केला की चाळीस चाळीस लाख रुपये भारतीय जनता पक्षाच्या पदाधिका-यांनी घेतले. नाव जाहीर करा म्हणाव, आम्हांला आनंद होईल ऐकायला. नाव घ्यायच आमच काही म्हणणं नाही. घेतलतर ज्याच पाप त्याच्या डोक्यावर ठेऊ. परंतु काय होत की सरसकट आम्ही सगळेच्या सगळेजण त्याच्यामध्ये भरडले जातो आणि हे भरडण आता सहन होत नाही. तुम्ही सांगीतल साहेब तुमच्या शब्दाचा आम्ही मान ठेवतो. मग तुमच्या शब्दाचा मान ठेवायच्या

नादात आमचा अपमान दहावेळा होतो पण आम्ही तो विसरतो. डॉ.रॉयच आणि डॉ. साळवेच भांडण काय तर डीपीएच डयुटीवर असताना डी.वाय.पाटीलला तू केल का मी केलं. आणि मग  तु ईलीजीबल नाही मी ईलीजीबल कसा याच्यावरती आमच भांडण आहे साहेब. मग आमचे मुद्दे काय होते, मंगलाताईना आठवत असतील. आम्ही म्हणल की डॉ.रॉयनी डीपीएच डयुटीवर असताना केल असेलतर मग एका संस्थेत काम करत असताना दुसरीकडे डीपीएच करत असताना तीथल मानधन घेतल मग त्यांना त्याठिकाणी शिक्षा झाली पाहीजे. या विषयावर बोललो साहेब, आम्ही मागच्या पंचवार्षीकला. मग आता इथ सांगतो बाहेर प्रॅक्टीस करणारय आणि आमच्याकडे नौकरी करणारय. पण आता मी बोलू शकणार पण नाही हा दुजाभाव नाही का साहेब, हा अन्याय नाही का. त्याच्यामध्ये म्हणजे अगदी तुम्ही सभागृहात काय करणार आहात याहीपेक्षा महत्वाच आहे कमिशनर म्हणून, आम्ही काय करतो हा विषय सोडून दया, पण कमिशनर म्हणून या महापालिकेच सर्वोच्च पद तुमच्याकडे आहे. ते तुम्ही त्याठिकाणी योग्य तो निर्णय घेतला पाहीजे, या महापालिकेच्या हिताच्या दृष्टिने घेतला पाहीजे. एजबारसाठी जर का राज्यशासनाचा नियम असेल, नौकरीत घेऊच शकत नाही. तर साहेब, काय होईल माहिती का ते जर का कोर्टात गेले आणखीन जे डॉक्टर कार्टात गेलेतर ही आख्खी भरती प्रक्रीयाच बारगळली आणि मग काय साध्य केलं. जो आहे तो आम्हांला बोलवतो. डॉक्टर आम्हांला बोलवतात, पत्रकार आम्हांला बोलवतात, विरोधी पक्षाचे नगरसेवक आम्हांलाच बोलवतात. आम्ही काही ठेका घेतला का. उदया जर ही भरती प्रक्रीया बारगळली तर मग एवढ आकंडतांडव करुन, एवढ इथ बोलून आम्ही काय मिळवलं, आमच्या पदरात काय पडणार आहे. म्हणून साहेब, विचारपुर्वक निर्णय घेणं फार गरजेच आहे. आणि म्हणून माई, अनुभव खुप महत्वाचा असतो. इतक सोप पण नसत आणि अनुभव जर घ्यायचा असेलना तर तुम्हांला खुप काही गमवाव लागत तुमच्यातल. अनुभव नेहमी विकत घ्यावा लागतो तर ती फॅक्ट आहे, खर आहे ते. आपल्याला वाईट वाटणारच परंतु साहेब, यामध्ये आपण कमिशनर म्हणून निर्णय घेताना लाँगटर्मचा निर्णय घ्या. महापालिकेच्या हिताचा निर्णय घ्या. मगाशी मंगलाताईनी सांगीतल तुम्हांला की तुम्ही कुठेही गेलातर आम्ही तुम्हांला या झालेल्या चुकांसाठी आम्ही तुमच्यावरती बोजा ठेवणार. इथ आम्ही सत्तेत आणि मुंबईमध्ये आम्ही विरोधात. त्यामुळे इथे आम्ही सांगीतलतरी तीकडन आमची कळ दाबणारच आहेत. राँग असेलतर थांबणारच आहे आणि राँग नसेलतर बीनाबोभाट

पुढे जाणार. मग अशा वेळेस आमच्या हातात काय राहतं. आणि समजा बाहेरन हा विषय आला अनेक वृतपत्रामध्ये आम्ही वाचल की काहींच मत असं होत की त्यांच जे एज आहे त्याच्यावरती पण बोलायच नाही, असं नाहीना होत साहेब. असं नाही होत, ही माझी प्रायव्हेट होम नाही. तुम्ही साठ वर्षाचा माणुस त्याठिकाणी कामाला ठेवलातरी चालेल. हे गव्हर्मेंट अंडरटेकींग आहे, इथ राज्यशासनाचे नियम लागू होतात, इथे बीपीएमसी ॲक्ट लागू होतो. इथे यांना सगळे नियम लागू होतात आणि ते इतरांना लागू असतील. ते तर आपण लावूनच घेतले पाहीजेलना. आमची किमान आणि माफक अपेक्षा तुमच्याकडन. आतातरी हे करताना कमीशनर साहेब निर्णय योग्य रितीने घ्या जेणेकरुन कुठलाही मुद्दा कोर्टात नेला तरी तो मुद्दा टिकला नाही पाहीजे परंतु तुम्ही जर का एजबार आणि बाहेरची प्रॅक्टीस हे जर अलौ केलतर हे सांगायला कुठल्याही ज्योतीषाची गरज नाही की भरती प्रक्रीया बारगळणार, याला स्टे बसणार त्यामुळे माई आपण जे काही निर्णय घेतो त्यासाठी मा.कमीशनर साहेबांना माझी विनंती आहे की या गोष्टी कम्पलसरी लक्षात घ्या आणि मी परवाच्या दिवशी पण तुम्हांला म्हणल की याच्या आदि उठसुठ डॉक्टर कधी असे फलक घेवून उभे रहात नव्हते. साहेब, त्याच्यावरती काय बंधन आणणार ते सांगा आणि काल काय आले असतील माफी मागीतली असेल, साहेब हे करताना जर डॉक्टरांनी जाहीर फलक घेवून केल असेलतर माफी सुध्दा तशीच झाली पाहीजेनां. मा.महापौरांच्या इथे झालेली असेलतर मा.महापौरांनी पत्रकारांना माहीती देवून टाकायची. की बाबा काल असे असे डॉक्टर आले होते त्यांनी त्यांच्या कृत्याची माफी मागीतलेली आहे. कमीशनर साहेब तुमच्याकड आल्यास तुम्ही सुध्दा प्रेसला माहीती दिली पाहीजे. मागच्या मिटींगमध्ये कमीशनर साहेब मी तुम्हांला सांगीतल होतं हे जे आरोप आहेत याच्यासाठी तुम्हांला पीआरओ नेमावा लागेल, काय केल साहेब आपण त्याच. साहेब, पुढच्या मिटींग पर्यंत पीआरओ नेमला गेला पाहीजे. प्रत्येक डिपार्टमेंटची पत्रकार, कार्यकर्ता कुणीही येवू देत त्यांना ती योग्य माहीती पुरवली गेली पाहीजे. योग्य माहीती गेल्यानंतर जर का काही स्टेटमेंट आलेतर तीथ आपल्या पीआरओच पण स्टेटमेंट आल पाहीजे याची काळजी आपणच घ्यायची आहे. आणि ही जर काळजी आपण नाही घेतलीतर पुढील दिवसामध्ये अनेक गोष्टीना तुम्हांला सगळयांना तोंड दयायच आहे आपल्याला सुध्दा आपल्यातले पेशंन्स वाढवावे लागतील. सत्ताधारी म्हणून जर आपण स्वत:ची पाठ थोपटवत घेत असेलना तर विरोधी पक्षाच्या काही गोष्टी टिका केलेल्या दिसतात

त्या सहन करण्याचीपण आपण ताकद ठेवली पाहीजे. पार्टीवर नाही बोलणार तर कुणावर बोलणार, बोलू दयाना बोलल पार्टीवरतर. काही हरकत नाही उत्तर दयायला आपण आहोतना आपल्याला पण बोलता येतं. मा.महापौर साहेब, आपल्याला एक विनंती आहे जे काही दोन-तीन मुद्दे आहेत ज्याच्यामुळे आपली भरती प्रक्रीया बारगळणार नाही, त्रास होणार नाही अशाप्रकारे जर का आपण निर्णय घेतले आणि त्या निर्णयासहीत जर का आपण सामोरे गेलोतर मला वाटत आपण खुप चांगल्या पध्दतीने डॉक्टर भरती आपली यशस्वी होईल आणि निश्चितपणे आपले पीजी चे कॉलेज चालू व्हायला वेळ लागणार नाही गेल्या अनेक वर्षाच ते स्वप्न आहे. या शहरातल अनेक लोकांनी ते पाहीलेलं आहे. डॉक्टर श्रीकर परदेशी असतील तुम्ही असाल, अशिष शर्मा असतील या सगळयांनी ज्यांची ज्यांची मेहनत आहे, या सभागृहात घेतलेल्या सदस्यांची ती मेहनत आहे ती मेहनत जर का फळाला येवू दयायची असेलतर आपल्याला योग्य निर्णय घ्यावा लागेल. मा.महापौर साहेब, टिका होत राहणार. पहीले बोलू देत जा आणि बाकीचे आम्ही आहेत सगळेजण बॅटींग करायला. तरी तुम्ही काही काळजी करण्याची गरज नाही. परंतु मा.आयुक्त साहेब, दोन तीन मुद्दे सांगीतलेले आहेत त्याला सिरीअसली लक्षात घ्या. डॉक्टर भरती प्रक्रीयेच्या विरोधात काल पण एक रिटपिटीशन ऑनलाईन दाखल झालेलं आहे. तरी असे तीन चार पिटीशन एकत्र आले आणि क्लोज जर झालेतर आणि प्रत्येकांनी एक एक मुद्दा जरी घेतला आणि मी किती जरी सांगीतल मी लई शहाणी आहे तर माझ शहाणपण कोर्टात नाही चालत. मी इथ काय आहे याच्याशी कोर्टाला काही घेणंदेणं नाही. कोर्ट कागद बघत कागद आणि या कागदात काय नियम आहेतना तेवढच कोर्ट वाचत. त्यामुळे मा.महापौर साहेब, मा.कमीशनर साहेब आपल्याला हात जोडून विनंती आहे  की जो निर्णय घ्याल तो महापालिकेच्या हिताचा असलाच पाहीजे त्याचप्रमाणे सत्ताधारी पक्षाची कुठेही बदनामी होणार नाही याची सुध्दा कमीशनर साहेब तुम्ही जबाबदारी घ्यायची. कारण की हे दोन तीन मुद्दे जर का आमच्या अंगलट आलेतर मंगलाताईनी सांगीतल त्या तुम्हांला शोधणारतर, आम्ही पण तुम्हांला शोधणारच आहोत. आम्ही पण नाही गप्प बसणार. झाल तेवढ पुरे झाल एवढच सांगते. परत एकदा मा.महापौर साहेब आपले आभार मानते,धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आयुक्त साहेब मगाशी तुम्ही नव्हते, या विषयाची आता चर्चा थांबली पाहीजे. आयुक्त साहेब मी

अशी मागणी करतो की हा जो गदारोळ चालला आहे त्याचा तुम्ही खुलासा दया. हे तीन्ही विषय म्हणजे १) बाहेरची प्रॅक्टीस २) भरती प्रक्रीया मधला एजबारचा मुद्दा ३) जर त्या व्यक्तीची दोन वर्षात वर्तणूक व्यवस्थित नसेलतर तुमच्या अधिकारात त्याला परमनन्ट करायची ऍथॉरेटी आहे कि नाही. हे तीन विषय तुम्ही क्लेअर करा एवढच बोलून थांबवतो, धन्यवाद.

(सभागृहात गोंधळ)

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक व नगरसेवीका. सविस्तर दोन दिवसापासून ही चर्चा झालेली आहे. आता जे तीन प्रश्न सदस्यांनी सभागृहासमोर मांडलेले आहेत त्याचा मी थोडक्यात खुलासा करतो. पहीला जो विषय होता की एजबारच्या बाबतीमध्ये शासनाचे सेवाप्रवेश नियम स्पष्ट आहेत आणि सेवाप्रवेश नियमामध्ये प्रत्येक पदासाठी अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. अर्हतेमध्ये प्रत्येक पदासाठी वय हे देखील निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे जे वयामध्ये बसत नाहीत त्याना नॉर्मली आपण रिजेक्ट करतो, त्यांना परीक्षेमध्ये पात्रता देत नाही. मात्र जी आपण जाहीरात काढलेली होती ती अनुभवावर आधारीत आणि अन्य ठिकाणी ज्या प्रकारे जाहीराती निघतात त्यावेळेला आपण बृहन्मुंबई कॉर्पोरेशन किंवा अन्य कॉर्पोरेशनने केलेली भरती हे लक्षात घेता अन्य ठिकाणी पदाना मिळणा-या कॅन्डीडेटसची उपलब्धता याचा विचार करता आपण जाहीरातीमध्ये एक क्लॉज टाकलेला होता की एखादया पदावरती पात्र उमेदवाराचे अर्ज प्राप्त न झाल्यास अर्जदार जर वयाच्या अर्हतेत बसत नसेल आणि त्याचा अनुभव आणि पात्रता पुर्णार्थान आवश्यक पदासाठी आवश्यक असेल एक्सेप्ट वय आणि अन्य उमेदवार त्याच्यासाठी अर्ज न करणारे, आज कुठलाही अर्ज प्राप्त नसेल तर समिती ती वयाची अट शिथील करु शकेल ही आपण जाहीरातीमध्ये अट टाकलेली होती आणि त्यामुळे केवळ ज्या पदांवरती अन्य कोणत्याही उमेदवारानी अर्ज केलेला नाही अशाच पदांना जर वयोमर्यादेमध्ये न बसणारे उमेदवारांनी अर्ज केलेला असेलतर त्याला अट शिथील समितीने केलेली होती. यासंबंधामध्ये जी चर्चा झाली होती, गटनेत्यांच्या सभेमध्ये देखील ती चर्चा झालेली होती. त्यामध्ये देखील हे करत असताना अन्य ठिकाणी कोणी केलेलं आहे का. शासनाने याला कुठे मान्यता दिलेली आहे का. याचा शोध घेण्याचे निर्देश देखील त्या चर्चेमध्ये चर्चीले गेलेले होते आणि तोपर्यंत या पडताळणी करण्याच्या सुचना मी विभागाला दिलेल्या आहेत. आम्ही ज्यावेळेला ही जाहीरात काढली होती त्यावेळेला बृहन्मुंबईची

जाहीरात आम्ही बघीतलेलीच होती. पण दरम्यानच्या कालावधीमध्ये वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांच्या अंतर्गत असलेल्या वैदयकीय शासकीय महाविदयालयातील सहयोगी प्राध्यापक गट-अ आणि सहाय्यक प्राध्यापक गट-ब रिक्त पदे भरण्याची १७/१०/२०१७ ची एक जाहीरात आम्ही पाहीलेली आहे. ही महाराष्ट्र शासनाची जाहीरात आहे. त्याच्यामध्ये ४.५ हा जो क्रम आहे तो अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथील करण्याविषयी निवड मंडळाकडून विचार करण्यात येईल. परंतु निवड मंडळाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हा त्या तरतूदीचा विचार केला जाईल अशी अट ही शासनाच्या देखील भरतीमध्ये अशाच प्रकारच्या पदांच्याबाबतीत दिसून आलेली आहे याचा सिमीलल विचार आपल्या निवड समितीने केलेला होता. आणि म्हणून हा प्रस्ताव सदनासमोर ठेवण्यात आलेला होता. दुसरा जो मुद्दा आहे तो म्हणजे प्रायव्हेट प्रॅक्टीस, प्रायव्हेट प्रॉक्टीस ही वैयक्तिक उमेदवाराना अलौड राहणार किंवा कसे. याबाबतीमध्ये आपल्या गटनेत्यांच्या सभेमध्ये देखील चर्चा झालेप्रमाणे १८ ऑगष्ट २०१० चा शासन निर्णय आहे. त्याच्यामध्ये व्यावसायरोध भत्त्या ऐवजी खाजगी वैदयक व्यावसाय करण्यास दिलेली सवलत रद्द करण्याचा निर्णय झालेला आहे. आणि तोच आपण जशाच्या तसा आपल्या या भरतीसाठी अप्लाय करतो आहोत. याचाच अर्थ ज्या सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक किंवा प्राध्यापक यांना नियुक्ती देत आहोत यांना खाजगी प्रॅक्टीस अनुज्ञेय राहणार नाही. तशाच प्रकारचे आदेश आपण देणार आहोत. आणि तीसरा जो मुद्दा आहे तो आपल्याकडे पुर्वी एक वर्षाचा प्रोबेशन होता तो दोन वर्षापर्यंत शासनाच्या नवीन निकषानुसार वाढवण्यात आलेला आहे. या दोन वर्षाच्या कालावधीत कुठलाही उमेदवार त्यांच जर कामकाज आपल्याला समाधानकारक न आढळल्यास आयुक्त त्यांची सेवा एकतर प्रोबेशन वाढवू शकतो, गरजेनुसार त्यांच्यावरती शास्ती करु शकतो तरी सुध्दा त्यांच कामकाज समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा खंडीतही करु शकतो. असं प्रावधान आज आपल्या या प्रवेश नियमांमध्ये आहे. त्यामुळे तसे अधिकार आयुक्तास उपलब्ध आहेत आणि त्या अनुषंगाने जर कुठल्याही उमेदवाराच कामकाज दोन वर्षाच्या प्रोबेशनरी कालावधीमध्ये असमाधानकारक आढळल्यास त्यांच्यावरती उचित शासन करता येवू शकतं. हे तीन्ही अधिकार मी आपल्या समोर मांडत आहे. याबाबतीत इतर अनेक

बाबींवरती आपण चर्चा केलेली होती. डीएनबीच्या विषयाबाबत थोडक्यात खुलासा करतो...

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. साहेब, तुम्ही तीनच विषयावर बोला. लोणकर साहेबांनी परवा जो नियम दाखविला राज्यशासनाचा तोही आम्हांला सांगावा. राज्यशासनाची वयावर काय अट आहे. लोणकर साहेबांनी परवा राज्यशासनाची एक नियमावली वाचून दाखवली ती पण वाचा.

**मा.लोणकर( सहाय्यक आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. परवा गटनेत्यांच्या बैठकीमध्ये जी वयोमर्यादा वाचली होती ती खालील प्रमाणे आहे. अधिष्ठाता व प्राध्यापक या पदांसाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५० वर्षे आहे व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी ५५ वर्षे इतकी राहील. सहयोगी प्राध्यापक या पदासाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी ५० वर्षे इतकी राहील. सहा.प्राध्यापक या पदासाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५ वर्षे इतकी राहील. शासकीय/निमशासकीय सेवेत अस्थापनेवर कार्यरत असलेल्या उमेदवारांना वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही. उच्च गुणवत्ताधारक तसेच प्रदिर्घ अनुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबत वयोमर्यादा शिथील करण्याचा विचार करण्यात येईल. महापालिका सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादेची अट शिथील राहणार नाही. जे कॉन्ट्रॅक्टवर आहेत त्यांच्यासाठी वयोमर्यादेची अट शिथील नाही. जे आता आपल्याकडे १३ डॉक्टरांनी अर्ज केले होते त्यांना आपण संधी दिली होती त्यांच्यासाठी वयोमर्यादेची अट नाही. जे कॉन्ट्रॅक्टवरील बाहेरचे आहेत त्यांच्यासाठी वयोमर्यादेची अट आहे. पुढे त्याच्यामध्ये असे आहे अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथील करण्याविषयी समितीकडून विचार करण्यात येईल परंतु समितीच्या नियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. समजा एखादयाला परमनन्ट केल आणि नंतर एखादा आला तो म्हणाला मी आहेना त्या पोस्टसाठीतर मग तुम्ही काय करणार. तुम्ही शैक्षणिक अर्हता म्हणता, दुसऱ्या बाजुला त्याचा अनुभव म्हणता. उदयाजर मी आलो आणि त्याला लायबल झालोतर मग काय.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक व नगरसेवीका. शासनाच्या देखील जाहीरातीमध्ये हीच अट असते, तीच अट आपण वापरलेली आहे. मी एवढच कथन केलेल आहे की ज्यावेळेला उमेदवार प्राप्त होत नाही त्यावेळेला एखादा उमेदवार जर एजबार असेलतर त्याला फक्त कन्सीडर करण्याचा निर्णय समिती घेवू शकेल.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपण एकदा जाहीरात काढली आपण तीन दिवसासाठी जर परत एकदा जाहीरात काढली असतीतर आणि एखादे चांगले डॉक्टर आले असतेतर चांगले डॉक्टर मिळाले असते. शेवटी डॉक्टरांचा अनुभव वयानुसारच मानला जातो. सिनीअर डॉक्टरांकडेच जातात, ज्युनिअर डॉक्टरांकडे कोणी पहील्यांदा जात नाही. पेशंटच्या संदर्भात डॉक्टरांची सिनॅरिटी बघतो. तुम्हांला असं सुध्दा करता आल असतं की परमनंन्टच्या पोस्ट असल्यामुळे तुम्ही परत तीन-तीन दिवसासाठी जाहीरात काढू शकला असता.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. ऑनलाईन उपस्थित असलेले नगरसेवक व नगरसेवीका. याच कारणासाठी ज्यावेळेला आपण मुळ जाहीरात काढली होती त्यावेळेला एका ठरावीक मुदतीपर्यंत अर्ज स्विकारण्यासाठी आपण वेळ दिलेला होता. यावेळेला दोन महत्वाच्या पोस्टसाठी आपल्याला पर्याप्त संख्येचे उमेदवार मिळाले नव्हते. विशेषत्वाने मेडीसिन आणि रेडीओलॉजी ह्या दोन ज्या पोस्ट आहेत की ज्याच्यामध्ये आपल्याकडे उमेदवार मोठया प्रमाणामध्ये उपलब्ध होत नाहीत हा अनुभव आहे. याच्या व्यतिरीक्त ज्या काही कॅटेगरीच्या पोस्ट होत्या, रिझर्व्ह आरक्षीत पद होती त्या पोस्टसाठी देखील आपल्याला पुरेशा उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले नव्हते. याकरिता आपण त्यावेळेला जाहीरातीला देखील एक्सटेन्शन दिलेलं होतं अर्ज दाखल करण्यासाठी. त्यामुळ ती काळजी निवड समितीने आदिच घेतलेली होती ती जर काही जणांना माहीती मिळालेली नसेलतर आपण परत एकदा जाहीरात काढून एक्स्टेन्शन देखील दिलेलं होतं. मात्र

काही पदांसाठी आपल्याला निश्चितपणे उमदेवार पर्याप्त संख्येन प्राप्त होण्याची अडचण असते म्हणूनच क्लॉज जाहीरातीमध्ये इव्हन शासन किंवा विवीध ठिकाणी कुठलेही मेडीकल कॉलेजस भरती करतात ती सगळी ही प्रोव्हीजन ठेवतात आणि ती निवड समिती त्या त्या वेळेला परिस्थिती बघून निर्णय घेत असते तसा तो निर्णय त्यावेळेला घेवून सभागृहाच्या मान्यतेसाठी हा विषय आलेला आहे, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमच म्हणण असं आहे काहीही झालतर तुम्ही आम्हांला ऍश्युअर केल पाहीजे की कुठल्याही परिस्थितीत आमची मानहानी होणार नाही. पिटीशन सक्सेस होणार नाही. तुम्हांला एक टक्का जरी असं वाटत असेल की हे पिटीशन याच्यावरती सक्सेस होवू शकतं, एजच्या याच्यावरती. तुम्ही काय म्हणालात, समितीला काय अधिकार आहे हे जरी असलतरी कोर्ट हे बघणारच की तुमच्या राज्यशासनाच्या नियमावलीमध्ये काय आहे. मुंबई महापालिकेन काय केलं, कल्याण महापालिकेनी काय केलं हे कोर्ट पाहणार नाही. कोर्ट राज्यशासनाचा नियम काय संगतो हे बघणार. एजबार झालेल्याना नाकारत असेल तसा जीआर असेल, तसा आदेश असेलतर मग आमची मानहानी इथे होणार. कारण इतका सगळा विरोध, सगळयांचे बोलणे ऐकूण आम्ही या विषयाला पाठींबा देतो. तरी तुम्ही आम्हांला ते ऍश्योअर केल पाहीजे. नाहीतर डॉक्टर सोनीचा विषय बाजूला काढून टाका बाकीचे स्मूथपणे चालू दयाना काय फरक पडतो आपल्याला. समजा एका व्यक्तीच्या विषयाने इतकी मानहानी होणार असेलतर तो विषय बाजूला ठेवा. काय फरक पडणार आहे. गेले वीस वर्षे याठिकाणी वायसीएम हॉस्पिटल चालूच आहे. आमचा डॉ.सोनीला विरोध नाही. परंतु त्यांच्यामुळे इतर सगळयांच नुकसान होवू नये ही त्या पाठीमागची प्रामाणिक भावना आहे. साहेब, तुम्हांलाही चांगल माहीती आहे की कोर्ट काय बघणार. तुमच मनापासून अभिनंदन तुम्ही प्रायव्हेट प्रॅक्टीसला याठिकाणी पायबंद घातला. तुम्ही आदि खुलासा केला असतातर आम्ही कमी ऐकल असतं. परंतु प्रायव्हेट प्रॅक्टीसला आपण पायबंद घातला परंतु तुम्हांला सांगते ज्यादिवशी आपण पायबंद घातला असे जाहीर करणार त्यावेळेस यातले निम्मे लोक गळणार. आता त्यातल्या त्यात जे काही विषय असतील ते जर स्मूथली चालवायचे असतीलतर एक विषय बाजूला ठेवा. मुंबई महापालिकेनी काय केलं हे कोर्टामध्ये चालणार नाही. राज्यशासनाचा

नियमच सेवा भरतीचा काय आहे तो चालणार. आणि त्याला तुम्हांला आणि आम्हांला स्टिकप रहाव लागणार आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की आपण या सगळया गोष्टीवरती गांभीर्यपुर्वक आयुक्त साहेब तुम्ही निर्णय घ्यावा. कारण की तुमच्या एका निर्णयानी आमचा सन्मान पण वाढणार आहे आणि आमचा अपमान पण वाढणार आहे. त्यामुळे त्यांचा विषय बाजूला ठेवून करता येत असेलतर बघा. उदया कोर्टासमोर तो विषय आला आणि कोर्टाने खारीज केलातर डॉ.सोनी आहेतच आपल्या बरोबर. नाहीतर आणखीन कोणीतरी येतीलच. दि बेस्ट असल पाहीजे तरच वायसीएम चालेल. मग आतापर्यंत सगळया डॉक्टरांचा अपमान आहे ज्यांनी चांगली सर्व्हिस आम्हांला इतक्या वर्षे दिलेली आहे हा त्यांचा अपमान आहे. त्यातल्या त्यात हे प्रोफेसर आहेत, चांगले पाहीजेत, उच्च दर्जाचे पाहीजेत आम्हांला हे सगळ मान्य आहे कारण का तर ते जर चांगले असतीलतरच विदयार्थी चांगले घडवणार आहेत. परंतु त्याच बरोबर कायदयाची ही जी मेक आहे ती सुध्दा आपण समजून घेणं फार गरजेच आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब, एक विषय जर आपण बाजूला ठेवून जरी साहेब आपण परस्पर  हा विषय केला तरी आमची काही ना नसणार, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर पुन्हा दुस-या दिवशी आपण या विषयावरच चर्चा करतो आणि मला अभिमानान सांगाव वाटतय की आपण खुप अभ्यासू नगरसेवकांची याठिकाणी भाषण ऐकली. सन्मा.माजी विरोधी पक्षनेत्यांचेही म्हणणे ऐकल. पिंपरी चिंचवडकराच्यांसाठी पी.जी. इन्स्टिटयूट, पदव्यूतर संस्था मेडीसिन मध्ये मिळणे खरतर आपल्या शहरवासीयांच नशीब आहे, आपल भाग्य आहे. श्रीकर परदेशीच्यां काळामध्ये ही संस्था यावी मग तत्कालीन आजीतदादा तुमच्या काळामध्ये ही खरतर सन्मा.श्रीकर परदेशीची कल्पना होती आणि आज आपण तीच संकल्पना मा.हर्डीकरांच्या काळामध्ये त्याच पुनर्रजीवन होतय हे खरतर आपल्या सगळयासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सर्व सन्मा.सदस्यांनी गेल्या दोन तीन दिवसापासून म्हणजे वयाच्या संदर्भामधल मा.आयुक्त साहेबांनी याठिकाणी उत्तर दिलं. मला अस वाटतय की जाहीरातीमध्ये तुम्ही जे दिलं तेच तुम्ही केलना का वेगळ काही केलं. तेच तुम्ही कालच्या गटनेत्यांच्या बैठकीमध्ये सांगीतल, सगळया पक्षाच्या नेत्यांनी सांगीतल, आजही तुम्ही तेच सांगीतल, परवाही तुम्ही तेच सांगीतल आणि मला अस वाटत की

ज्यावेळेस प्रशासनानी एखादया गोष्टीची निवड प्रक्रीया वर्षानुवर्ष केली त्याच्यावर कोण चुकल जात मला अस वाटत की ती समिती जबाबदार आहे की नाही. त्यावेळेस तुम्ही चुकीच केल, आज तुम्ही सभागृहाच्या समोर म्हणताय. मी खरतर या विषयाच्या संदर्भामध्ये एवढच सांगेल की सन्मा.योगेशभाई मागच्या सभेमध्ये निघून गेले होते, मी आज त्यांना अवर्जून सांगेल, भाई तुम्ही सांगा कारण तुम्ही ज्या अविर्भावामध्ये याठिकाणी बोलले मलाही त्या विषयावर बोलायच आहे. त्यामुळे तुम्ही ऐकायला असेलतर मला सगळयात जास्त अभिमान वाटला असता योगेशभाईची सुध्दा मानसीकता ऐकूण घेण्याची आहे. दुर्दैवाने ते ज्या पध्दतीने सभागृहामध्ये आले, सन्मा.सभागृह नेते नामदेवराव आहेत माझ्या शेजारी आल्या आल्या त्यांनी सांगीतल की अफजलखानाची औलाद. खरतर आम्हीतर एका बाजूला एक सांगीतल की माई तुम्ही राजमाता जिजाऊंचा आम्ही तुम्हांला आदर्श मानतो. जे राजमाता जिजाऊना अभिप्रेत आहे ते नामदेवराव शिवाजीचे मावळेच होणारना. अफजलखानाची औलाद कुणाला म्हणल जातय खरतर आपण त्याच आत्मपरिक्षण करा. ज्या पध्दतीन माझ्या पक्षावर आरोप केले जातात त्या पक्षाच्या विरोधाकडन खंडन करनं ही माझी नैतीक जबाबदारी आहे. एक गोष्ट लक्षात घ्या ज्यावेळेस आम्ही सांगत होतो की या सभागृहाच कामकाज दादागीरीन चालतय, दहशतीन चालतय, सभागृह निट चालत नाही तर मला असं वाटतय की ज्यावेळेस तुमच्या पक्षाचा नगरसेवक अजीत गव्हाणे बोलत होते त्यावेळेस त्यांना मा.विरोधी पक्षनेते सांगत होते की अजीत तु थांब आपल्याला धार कमी करायची नाही. ज्यावेळेला हा विषय, खरतर व्हेन्टीलेटरचा विषय मला माहीती होता. २० मार्चच्या सर्वसाधारण सभेमध्ये तूषारने काढला. आणि योगेश बहलनी सांगीतल व्हेन्टीलेटरच्या संदर्भामध्ये काय लुक्स होते. ज्यावेळेस एखादया माणसाचा डॉ.सोनी काही माझे नातेवाईक नाहीत, माझे मित्र आहेत, माझे डॉक्टर आहेत मी त्यांच्याकडून ट्रिटमेंट घेतो आणि या सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य डॉ.सोनीची ट्रिटमेंट घेतात. कारण की ते मेडीसीनमध्ये एक्सपर्ट आहेत आणि तो माणूस आपल स्वतःच ५०-६० बेडच हॉस्पिटल सोडून याठिकाणी येतो तो एखादा लाख रुपयेतर रोज कमवत असेलना. अशा पध्दतीचा डॉक्टर आपल्याकड येतो. मला माहीती आहे की तुषार तुही ट्रिटमेंट केली, घोडेकरताई कोव्हीड पॉझिटीव्ह झाल्या होत्या त्या याठिकाणी नाहीत, शिलवंतताई याठिकाणी नाहीत. विनयाताई तापकीर आहेत म्हणजे जे जे पॉझिटीव्ह नगरसेवक झाले त्यांना चांगल्या प्रतीच मार्गदर्शन करणारे

डॉक्टर आहेत. वयात बसले का नाही हा साहेब तुमचा विषय आहे. काय त्या डॉक्टरची चुक आहे, तुषार तु सांगीतल व्हेन्टीलेटरच्या संदर्भामध्ये. आपली अशीतर परिस्थिती नाही की आपल्या महापालिकेमध्ये असलेल्या सिनीअर डॉक्टरांना का घेतल, नाही घेतल. त्यांना घ्याव असंच आमच म्हणण आहेना. आमच्या पक्षनेत्यांनी ती उपसूचनाही केली. पण हा विषय पुन्हा पुन्हा का येतो. ब-याच लोकांची साहेब, या निमीत्ताने दुकानदारी बंद होते. माझी विनंती आहे तुम्हांला की वायसीएममध्ये आपण एखादा पीआरओ नेमला पाहीजे का, तर आम्ही म्हणतो शंभर टक्के. आपल्या महापालिकेचा एक ज्येष्ठ अधिकारी जो आपल्या सेवेमध्ये कायम आहे, आता ब-याच जणांना असे वाटतय की वायसीएम पीजी चे झाले म्हणजे आपला काहीच संबंध नाही. अजीतभाई तशी आमची मानसीकताच नाही. याठिकाणी या महापालिकेच्या सेवेमधला पंचवीस तीस वर्षे एखादा क्लास वनचा अधिकारी त्याठिकाणी अपॉईन्ट कराना आमच कुठ नाही म्हणण आहे. आमची खरतर आजही मागणी आहे की ज्या ज्या लोकांची दुकानदारी खरतर ते अविर्भावात होते आल्या आल्या मला अस वाटल एखादा पेपर फाडून निघून जातात की काय. व्हेन्टीलेटतर आमच नव्हतंना. त्यांनी कबूलही केल की ते माझे शाडू होते, लांबचे शाडू. ज्यावेळेस मागच्या सभेमध्ये पुराव्यानिशी एखादा सन्मा.नगरसेवक त्यासंदर्भामध्ये, खरतर ती समिती असते, एखादा विषय चांगला आहे की नाही म्हणजे ही पाण्याची बाटली चांगली आहे की नाही हे तपासण्याची काहीतरी पाच सहा जणांची समिती असते. त्याच्यात डॉ.सोनीजी होते त्याच्यात काही भुलतज्ञ होते, त्याच्यात काय अजून डॉक्टर होते. त्यांनी रिजेक्ट केलाना का, क्वालीटी चांगली नाही असं त्यांना वाटल. म्हणजे जे वायसीएममध्ये सर्वसामान्य माणस आज उपचार घेतात त्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहीजेत, म्हणजे महापालिका ज्या पध्दतीचे पैसे मोजते त्या पैशा पध्दतीन त्या उपकरणाची तेवढी क्षमता असली पाहीजे. हे जर एखादयाला वाटत असेल की पुढच्या काळामध्ये चांगली लोक आली आपली दुकानदारी बंद झाली. अजीतभाऊ मला खरतर शोकांतीका वाटते आज गॅसच्या संदर्भामध्ये तीच परिस्थिती, ताईने खुप चांगला विषय सांगीतला. आपल्याला सगळयांना माहीती आहे आपण बोलत नाहीत. ज्यांची ज्यांची दुकानदारी वायसीएमच्या माध्यमातून बंद हाते अशा पध्दतीच चित्र होतय. का तुम्हांला नाही वाटल, का राहूलदादा कलाटेना वाटल नाही, नाना काटे त्या दिवशी बैठकीमध्ये होते त्याना का नाही वाटल. म्हणजे ज्यांची दुकानदारी

वायसीएमच्या माध्यमातून बंद होते, साहेब माझी तुम्हांला विनंती आहे मी आज या सभागृहाच्या समोर सांगतो, एका सत्ताधारी पार्टीचा प्रतिनीधी म्हणून तुम्हांला सांगतो आज या संदर्भामध्ये कुणीतरी उल्लेख केला एक माजी मंत्री फोन करतात. माझी मंत्री फोन करायची गरज नाही. आज कुणीतरी एकानी सांगीतल की भोसरीचे नगरसेवक नाही आले, चिंचवडचे नगरसेवक आले आमच्यात काय परिस्थिती आहे. भोसरीचा माझ्या पार्टीचा अध्यक्ष आहे. आमच्या मध्ये कुठल्याही पध्दतीची गटबाजी नाही आणि त्याचही काही कारण नाही. जेव्हा आम्ही या सभागृहामध्ये निर्णय घेतो तेव्हा या संस्थेच्या भल्यासाठीच आम्ही निर्णय करतो. या संस्थेच्या भल्यासाठीच आमचा लढा असतो. त्यामुळ अशा पध्दतीने शंका घेणं, आमच्यामध्ये मतभीन्नता आहे, आमचा एखादा नेता हे करतो, आमच्या नेत्याना मनापासून एकच गोष्ट वाटते की या महापालिकेमध्ये तुम्हांला या शहरामधल्या लोकांनी निवडून दिलं त्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहीजेत, त्यांना दर्जेदार त्या त्या गोष्टींचा फायदा झाला पाहीजे. पीजी इन्स्टिटयूटच्या संदर्भामध्ये मला अभिमानान सांगावस वाटत की पीजी इन्स्टिटयूटच्या काळामध्ये जर आज आपल्याकड शंभर दिडशे डॉक्टर नसती तर आज आपली परिस्थिती काय झाली असती. मा.पालकमंत्री मागच्या आठवडयामध्ये येवून गेले, मा.पालकमंत्री यांच्या समोरही हाच विषय काढला होता. मा.पालकमंत्र्यांनी सुध्दा आपल्याला तेच सांगीतल होतं की डॉक्टर चांगले काम करतात डॉक्टरांना ताकद दया. आज वेगवेगळया पध्दतीचे आरोप याठिकाणी केले जातात. मी मागच्या बैठकीमध्ये सहज म्हणलो होतो पीजी इन्स्टिटयूट जाऊ दया, काढून टाका म्हणल पीजी इन्स्टिटयूट. म्हणजे जे काही ३५-४० डॉक्टर घेतलेले असतील त्यांच्या नावावर खरतर कधी कधी एकतर मी कामगार आहे लक्षात ठेवा मला कधी कधी एवढ कायदयाच ज्ञान कदाचित नसेल. पण एक गोष्ट आहे की जो डॉक्टर जेव्हा डॉक्टरांच्या बरोबर एमसीआय किंवा जे केंद्रशासन ज्या पध्दतीने काही डॉक्टर जे एमबीबीएस झाल्यानंतर पीजी साठी घडवणारे डॉक्टर्स त्यांच्याकड जे पालकत्व असते जर पालकच गेलातर त्या डॉक्टर पोरांच काय. आपण डी.वाय.पाटीलांचा उल्लेख केला, कुणीतरी अंधेरीचा उल्लेख केला. एखादी संस्था आपल्याला पुढच्या काळामध्ये नावारुपाला न्यायची आहे, म्हणजे मगाशी खुप चांगला मुद्दा मांडला न्यूरोसर्जनच्या बाबतीमध्ये साहेबांनी सांगाव किती न्यूरोसर्जन आपल्याकडे इन्टरव्हिवला आली. किती न्यूरोसर्जन आपल्याकडे प्रॅक्टीस करतात. जे डॉ.वाघ आज स्टार हॉस्पिटलचे काम

करतात, स्पर्श मध्ये काम करत होते ते आपल्याकडे मानधनावर दोन ते तीन वर्षे काम करत होते. या सभागृहाला माझी विनंती आहे की एखादया दुस-या सदस्यासाठी आपण एखाद चांगल हॉस्पिटल याठिकाणी जस नावलौकीक केल जातय बाळासाहेबांनी सांगीतल की मुंबईवरुन लोक येतात, वायसीएमची परिस्थिती चांगली आहे. या सभागृहामध्ये आपण दत्ताकाकाना श्रध्दांजली वाहत असताना एक गोष्ट बोललो होतो की वायसीएम मध्ये दत्ताकाका असतेतर कदाचित ते वाचले असते. हे जर एवढ चांगल मत हॉस्पिटल संदर्भात आपल असताना जे डॉक्टर खरतर आपल्या जीवाच रान करुन घेवून आपल्या पेशंटला चांगली सुविधा मिळाली पाहीजे, आपले पेशंट वाचले पाहीजेत यासाठी आहोरात्र प्रयत्न करत असताना निवड प्रक्रीयाचे संदर्भात साहेब तुम्ही करा, कोर्टात होईल म्हणजे समजा तुम्ही घेतल तर तेही कोर्टात जातील नाही घेतलतर ते उपाशीतर मरणार नाहीत. एमडी डॉक्टर आहेत लक्षात ठेवा. ज्यावेळेला एमडीच्या संदर्भामध्ये आपण एखादी गोष्ट करतो आपण आता ही उपसूचना दिली पॅरामेडीकल स्टाफ असेल, वायसीएममध्ये काम करणारा स्टाफ असेल, राज्यशासनानही सांगीतल आहे जे कोव्हीडसाठी काम करतात त्या सगळया डॉक्टरांना परमनन्ट करा ही तर भूमीका राज्यशासनाची आहे. आपण राज्यशासनाचा दाखला ब-याचवेळा देतो. आपण काय राज्यामध्ये नाही का. पालकमंत्री खरतर या राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. ज्यांच्या सल्ल्यानुसार हे राज्यसरकार चालतय. एवढा चांगला विषय असताना खरतर आपण या विषयामध्ये विरोध करण्याच काम करतो. खरतर पीजी इन्स्टिटयूट पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवण्याच काम करण्याची परिस्थिती आहे. ज्यांना ज्यांना असं वाटत आपली दुकानदारी बंद होणार आहे त्यामुळे आपल्याला त्रास होणार आहे. आम्ही सक्षम आहोत. जे चुकीच असेल ते सभागृहात सभागृहा बाहेर सांगायची अमची ताकद आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की मा.आयुक्तांना आदेश दयावेत की महापालिकेच्या इतिहासामधल वायसीएम हॉस्पिटल जे आहे, दहा वर्षापासूनची खरेदी असेल किंवा इथली सगळी नौकरभरती असेल आता जी डॉक्टरांची आपण केली त्यामध्ये जे जे दोषी असतील त्यांना येरवडयाच कारागृह वाट बघतय असे आदेश दयावेत. कुठलीही चौकशी सीबीआयची करु दयात, सीआयडीची करु दयात दहा वर्षापासून होवू दया अजीतभाऊ. कर नाही त्याला डर कशाला. मागच्या दोन महीन्याच्या जनरल बॉडीमध्ये तुषार कामठे, नगरसेवक पुराव्यानिशी या सगळया गोष्टी

दाखवतय त्याच्यावर कारवाई नाही आणि जे डॉक्टर आपल्या जीवाची परवा न करता, कधी कधी ज्याच्याकडे क्षमता असती तो जास्त पळतो आणि जो पळतो तो दिसतोच अशी परिस्थिती आहे. पहील्यांदा निवडून आले ते या राज्याचे मुख्यमंत्री झाले, पहील्यांदा निवडून आले ते महापौर झाले. असं काही नसत लक्षात ठेवा त्या त्या पक्षाची ती ती परिस्थिती असेल प्रत्येकजण या महापालिकेच्या सभागृहात आलेला प्रत्येक नगरसेवक हा हुशार आहे. सभागृहाला माझी या निमीत्ताने विनंती आहे कुणाच्याही दडपणाला, कुणाच्याही भुलथापाला, कुणाच्याही खोटया प्रचाराला बळी न पडता जे या शहरातील लोकांच्यासाठी अत्यंत चांगल आहे, या शहरातील लोकांच्या भविष्यासाठी एक चांगली इन्स्टिटयूट, खरतर त्याच मला दुर्दैवान असं सांगावस वाटत मा.पंतप्रधान साहेब त्याच ऑनलाईन उदघाटन करणार होते, पण दुर्दैवाने वाईट राजकारणामुळ त्याच उदघाटन आपण करु शकलो नाहीत. एक चांगली घटना या शहरामध्ये होत असताना काही माणसाच्या विचाराना खरतर आपण याठिकाणी तीलांजली देवून एक चांगली संस्था याठिकाणी या शहराच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवनारी आहे. खरतर आजचा विषय असा आहे या विषयाच्या संदर्भामध्ये अजीतभाऊ खरतर भोसरी रुग्णालय कशासाठी अपण केल पाहीजे. अस्थीरोग आहे, प्लॅस्टीक सर्जरी आहे, भूलतज्ञ आहे. जिजामाता रुग्णालय एवढ चांगल बांधल, वायसीएमचा ज्यावेळेस उल्लेख केला जातो त्यावेळेस वायसीएमच्या नंतरच आपण भोसरीच रुग्णालय वायसीएम नंतर बांधल, जिजामाता त्याच्यानंतर बांधल. थेरगावच रुग्णालय त्याच्यानंतर आपण बांधल. आजमेराच रुग्णालय आपण नेत्ररुग्णालय करतो. वेगवेगळया पध्दतीच एवढ चांगल सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल या शहरामधल्या गोरगरीबांना देण्याचा आपला प्रयत्न आहे, एवढा चांगला विषय आहे. एवढ चांगल डॉक्टर काम करतात. कधी कधी एक लक्षात ठेवा की रेडीओलॉजीच्या संदर्भामध्ये आपण सगळे जण म्हणतो की एवढे का डॉक्टर आले, एवढे का डॉक्टर आले. चिठ्ठी घेवून एखादा रेडीओलॉजीसाठी तू जा तुझी रेडीओलॉजीची तपासणी करुन आण्ण्यास आपण बाहेर जातो ही तर परिस्थिती आता राहणार नाही. शहरातल्या गरीबांची खरतर चांगल्या पध्दतीने तपासणी व्हावी त्याच्यावर काय निदान करतात यासाठी त्याला बाहेर जाण्याची गरज भासणार नाही. याचतर आपल्याला नीट निदान करता येईल. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे जे आरोप करतील ते करु दयात, म्हणजे मी कधी कधी सर्व सन्मा.गटनेत्यांच मनापासून आभार मानतो. त्यांनी या

विषयाला कुठच विरोध केला नाही. एखादी गोष्ट करत असताना एखादया चांगल्या सुचना शंभर टक्के आहेतना त्या आपण ऍक्सेप्टच करतोतना. दोन-दोन, तीन-तीन तास आपण सर्व सन्माननीयांच सभागृहात म्हणण ऐकूण घेण्याचच काम करत असतो. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की हा खरतर खुप चांगला विषय आहे, या संदर्भामध्ये नामदेवरावाना विनंती करतो की योगेशभाईनी जाता जाता सांगीतल की आम्ही दिलेली उपसूचना सुध्दा हरताळ फासणार का. जे सात डॉक्टर आहेत नामदेवराव त्याला अनुमोदन देतील. जे सात डॉक्टर आहेत डीएनबीचे वैदयकीय अधिकारी ते महापालिकेच्या सेवेत आहेत त्या सगळयांना त्या संस्थेमध्ये घ्याव त्यांना किती पगार दयावा हा आमचा मुद्दा नाही त्याना आहे त्या डॉक्टर पेक्षा दुप्पट जरी पगार दिलातरी आमच काही म्हणण नाही. वर्षानुवर्षे त्यांनी या शहरातील लोकांची सेवा केली, आम्ही एवढे नतभ्रष्टतर शंभर टक्के नाही. त्यांचे उपकार आम्ही विसरायला, त्यांची सेवा आम्ही खरतर टाकून दयायला यामध्ये विनायक पाटील यांच मी अभिनंदन करतोना तो बीचारा सगळ बालेवाडीच क्वॉरन्टाईन सेंटर सांभाळतो. म्हणजे कौतूकही केल पाहीजे लक्षात ठेवा. आज अनेक डॉक्टर सकाळी नऊ वाजता आल्यानंतर सुध्दा रात्री बारा वाजता जातात कौतूक करायला पाहीजे. एखादा मी आठ वाजता आलो आणि सहा वाजता माझी डयुटी संपली मी निघालो अशा पध्दतीच डॉक्टर काम करत नाहीत. माझी विनंती आहे हा विषय अत्यंत चांगला आहे आणि ज्या विषयाची तीन नंबरच्या विषयाची चर्चा आपण सात नंबर विषयावर करतो, तीन नंबरचा विषय तीनलाच संपला. त्याच्यामध्ये काही जणांना वाटतय बोलायला दिल नाही. मी त्याच्यामध्ये थोडीशी दिलगीरी व्यक्त करीन की थोडीशी गडबडही झाली असेल आणि अजीतभाऊ आम्ही कधीही आयुष्यामध्ये विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न नाही करत. विरोधकानी आमच्यावर आरोप करु दयात तुम्ही विरोधी पक्षात आहात, मी तर आयुष्य विरोधी पक्षात काढले. त्यामुळे मी तर रोज त्यावेळेस टिका करत होतो. विरोधी पक्षाच म्हणण खोडून टाकण्याची ताकद सुध्दा आमच्याकडे आहे लक्षात ठेवा. मा.महापौर साहेब, मी आपला अधिक वेळ न घेता आपल्याला विनंती करीन की या सात नंबरच्या विषयावर मा.गटनेत्यांना बोलू दयाव आणि यानंतर हा विषय मंजूर करावा एवढी आपल्याला विनंती करतो.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- वैदयकीय शाखांमध्ये डी.एन.बी.कोर्सेस सुरु करत असताना मनपा सेवेतील पात्र असलेले वैदयकीय अधिकारी (एकुण ७) यांना डी.एन.बी. कोर्स मध्ये संधी देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, आम्ही सभागृहामध्ये आल्यानंतर आमची अपेक्षा हीच आहे की सभागृह सभाशाखेच्या नियमाप्रमाणे चालाव. मी मगाशी सुध्दा बोलताना हेच बोलले की सभागृह हे सभाशाखेच्या नियमाप्रमाणे चालाव. तुम्ही ३ नंबरच्या विषयावरन आम्हाला शंखा हीच आहे की आम्ही बोलताना हेच बोलत होतो की कुणाचे दात कुठे दिसतील, कोण कुठे काय करत आम्हांला काही घेणं नाही. जे करतं ते फेडतं. ज्याच काय निघायच असेल ते निघेल. कुणाला भीती वाटते का. पीजीचा विषय आम्ही मांडलेला आहे. पीजीचा विषय हा आम्ही केलेला आहे. शिरपेचात जो तुरा आहेना त्याच्यासाठी स्पेशल अभ्यास करायला लागतो, चांगले विषय मांडायला लागतात आणि चांगले विषय करुन घ्यावे लागतात. विरोधकांनी बोललेल ऐकूण घेवून त्याच्यावर जर खुलासा करायचा असेलतर मी बोलले की परत त्याच्यावर खुलासा करायचा परत तुम्ही बोलले की त्याच्यावर खुलासा करायचा परत त्यांनी माझा खुलासा करावा हे जर असं चालवायच असेलतर, मगाशी माझ्या भगीनीनी सांगीतल की ज्यावेळेला त्या विरोधात होत्या आम्ही त्यावेळेला तासनतास त्यांचे ऐकत होतो. आम्ही त्यांना कधीही थांबवल नाही. आता जे बोलंण झाल हे आम्ही बोलल्या नंतरचा खुलासा झाला. मग तुम्हांला ऐकायची सहनशक्तीच नाही म्हणून तुम्ही परत खुलासे करत बसलात. पीजी सारख्या संस्था आणायचं किंवा आणखीन काय डेव्हलपमेंट करायची ती आम्हीतर डेव्हलपमेंट करा म्हणतो. आमच्या पक्षाकडे सुध्दा त्यावेळेला माझी मागणी होती की पीजी जस करणार आहेत तसं नर्सींग कॉलेज पण तीथ करा त्यामुळ नर्सेस सुध्दा आपल्याला मिळतील म्हणून. असं काही नाही आता कम्प्लेट झाल, आता अजून ते पीजी व्हायला खुप वेळ लागेल. आयुक्त साहेब आम्ही नेहमी सांगत असतो की जे काही विषय करणार आहेत ते तुम्ही व्यवस्थीत करा. मगाशी सुध्दा आयुक्त साहेब मी तुम्हांला असंच बोलले की सिनीअर डॉक्टर आणून त्यांचा अपमान करु नका. डॉ.पंडीत सरांचा इथे अपमान

झाला तसेच हे सुध्दा नाव मी घेतल की ज्यावेळेला सभागृहामध्ये त्यांचा अपमान झाला, तुम्ही डॉक्टर बोलवणार आणि मग त्यांचे अपमान करणार असे कुणाचेही अपमान करु नका. हे सुध्दा आम्ही मगाशी म्हणल पण याचा अर्थ असा होत नाही की एकानी कुणी सभागृहामध्ये बोलल की मग आम्ही बोलायचे आणि आम्ही सांगायच आम्ही असे नाही तसे नाही. आहो, तुम्ही असे नाही तसे नाही पत्रकार परिषद घेवून सांगाना, सभागृहात कशाला सांगता. हाच जर आयुक्तांनी पहील्यांदा खुलासा केला असतातर, माई, पुर्वी आपण अस करत नव्हतो का. विषय सुरवात झाल्यानंतर जर कुणाला काही शंका वाटत असेलतर आयुक्तांनी जे डॉकेट आहे त्याचा खुलासा करायचा ही पध्दत नव्हती का, ही पध्दत होती मग आता तुम्ही सगळ झाल्यानंतर त्याच्यात सुध्दा इथ हमरीतुमरी झाल्यानंतर तुम्ही थांबणार आयुक्त बोलणार मग तुम्ही विषय क्र.३ ला सुरवातीलाच खुलासा केला असतातर आता पर्यंत इतक्यावेळ सभागृह कशाला चालल असत. म्हणजे सभागृह चुकीच्या पध्दतीने चालणार, सगळ चुकीच्या पध्दतीने चालणार आणि मग नंतर म्हणणार की असं झाल तसं झाल, हे कोण बोलल. जे काही कुणाला क्रॉस करायच असेल त्यांनी पत्रकारपरिषद घेवून कराव. सभागृह इथ क्रॉसींगसाठी नाही. मी बोलले की परत कुणीतरी बोलणार मग परत आम्हांला बोलायला दया. ज्यांना कुणाला वाटत की सिनॅरीटी नाही असं नाही तो त्यांचा विषय आहे. कोण कुणाचा मान घ्यायला जात नाही. आणि म्हणून हा विषय असा कुठेही व्हाव नाही. आम्ही नेहमी सांगत असतो की सभाशाखेच्या नियमाप्रमाणे चालाव. आता माई तुम्ही इतक्यावेळ बोलायला दिल हेच तुम्ही पहील्यांदा बोलायला दिल असतंतर एवढी चर्चा लांबलीच नसती. तुमच्याकड एक व्हिप आला त्या व्हिपकड बघीतल कुणाला काही बोलायच नाही, कुणी काही करायच नाही. चला, झाला विषय, झाला विषय, झाला विषय. हेच जर पहील्यांदा तो विषय व्यवस्थीत केला असतातर तुम्ही चार वाजता घरी गेले असते. आणि म्हणून आमचा कधीही डॉक्टरांना विरोध नाही. आयुक्तांना मगा फक्त एका वाक्यातच सांगीतल आहे. चुकीच वागलातर शंभर टक्के सापडवणार, कुठे गेलाततरी आम्ही धरु हे सांगीतल. मग आम्हांला पण बोलता येतं. आणि म्हणून माई, सभागृह चालवताना प्रत्येक व्यक्तीला बोलता येतं आणि जर एवढी कुणाला खुमखुमी असेलना तर बाहेर जायच आणि पत्रकारपरिषद घ्यायची. जर क्रॉस करायच असेलतर आम्हांला पण इथ क्रॉस करायला दयायच. समजा आम्ही जिजामाताच नाव घेतल, भोसरीच नाव घेतल सगळी जी ही नाव घेतलीतना ही

पुर्वीची हॉस्पिटल आहेत. आम्हांला पण बोलता येतं, कुठ काय नवीन झालं. आणि म्हणून आम्हांला या भानगडीत पडायच नाही. आम्हांला माहीती आहे पिंपरी चिंचवड शहरामधल्या कोरोनासाठी जे जे नागरीक त्याच्यातून आपले सफर होतात त्यांना चांगली ट्रिटमेंट मिळाली पाहीजे, त्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहीजेत. सुविधेविषई आम्हाला फोन आला की आम्ही लगेच आयुक्तांना सांगतोत त्यांना नंबर सकट देतोत. आयुक्त साहेब बोलून घ्या आपल नाव खराब होवू नये. आम्ही त्यावेळेला हा विचार करत नाहीत की सत्ता कुठल्या पक्षाची आहे. आम्ही हा विचार करतोत की त्या पेशंटची जर तक्रार असेल आणि त्या पेशंटला जर असं वाटत असेल की आम्ही पण आयुक्तांच्या कानावर घातल पाहीजेतर आयुक्त साहेब सुध्दा बोलतात आम्ही नंबर सकट पाठवतो. आणि म्हणून मा.महापौर साहेब, सभागृहात तुम्हांला वाटत की विषयांतर करायच नाही तुम्ही मगा दोनदा म्हणलात की विषयांतर होतय मग बाकी सगळयांच विषयांतर नाही का. मी चुकत असेलतर मला शंभर टक्के बोला. बाकीचे विषय सोडून सगळे बोलतात. मग आम्ही कसं काय खपवून घेणार, नाही खपवून घेणार. आणि म्हणून माझी विनंती आहे की सभाशाखेच्या नियमा नुसार सभागृह चालवाव. आयुक्त साहेबांना मगाशी पण मी सांगीतल आयुक्त साहेब तुम्हाला जे योग्य वाटते ते तुम्ही करा त्या व्यतीरीक्त तुम्ही करु  नका. याच्या व्यतीरीक्त मी बोलले पण नाही पण मला हे माहीती आहे मला जे लगेच समजत ते मी लगेच आयुक्तांना फोन करुन सांगते की आयुक्त साहेब असं असं आहे याच्यात तुम्ही अडचणीत सुध्दा येवू शकता. त्यामुळे कुणी कुणाला क्रॉस जर करायच असेलतर मग अख्या दिवसनरात्र सभागृह चालवायच असेल तरी आमची पण तयारी आहे. पण तुम्ही म्हणायच नाही एकाला कायदा वेगळा दुस-याला कायदा वेगळा. जर विरोधकाच ऐकूण आपल्याला जर गप्पच बसता येत नसेलतर त्याच्या खुलासासाठी जर उभ रहायच असेलतर बाहेर पत्रकार परिषद घ्यायची. नाहीतर मग परत परत आम्हांला बोलायला दयायच, एवढच सांगते आणि थांबते.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मागच्याच मिटींगला आम्ही सांगीतल होतं की पीजी सारखा विषय महत्वाचा आहे. कुठल्याही पक्षाचा त्या विषयाला विरोध नाही, कुणाचाच नव्हता. गटनेत्यांची बैठक झाली त्यात काही सन्मा.नगरसेवक पण होते. ठरलेल्या दोन तीन गोष्टी होत्या त्याच साहेबांनी

क्लेरीफिकेशन दयाव] हे जर आदि केल असततर कशाला ही चर्चा झाली असती. म्हणजे कुठेतरी माई आपल्यावर महापौर म्हणून दबाव असेल, विषय मंजूर करायचा असेल तो तुमचा अधिकारच आहे. तुम्हांला विषय मंजूरच करायचा आहे पण न बोलता न काही करता पटपटपट जस काही कुणीतरी गोंधळ करणार होतं आणि तो विषय हाणून पाडणार होतं असं काहीच नव्हतं. आपल काय ठरल होत तीन चार गोष्टी करायच्या. साहेबांनी खुलासा दिला, राज्य शासनाचा नियम तुम्ही सांगीतला. ताईनी सांगीतल उदया एखादा कोर्टात गेलानांतर तो टिकला पाहीजे. आमच्या सर्वाची एकच भुमीका आहे की ते पीजी चालाव. ते पीजी बंद पडाव अशी कोणाचीही इच्छा नाही. आज त्याठिकाणी ६० ऍडमीशन झाल्या. प्रत्येक मुलगा वर्षाला ८० हजार रुपये फिस भरणार आहे. ८० हजार फिस भरत असताना हे तुम्ही जे साठ सत्तर लोक घेतले या प्रत्येकांचा पगार पाहीलातर प्रत्येकजण दिड लाखाच्या पुढचा आहे म्हणजे तो खर्च आहे म्हणजे सभागृहाला अपेक्षीत आहे आणि कुणाला वाटत असेल सभागृहात चर्चा नसावी, आयुक्तांनी उत्तर नाही दयाव. याठिकाणी एखादा प्रश्न आलातर त्या प्रश्नावर बोलनं या सभागृतल्या प्रत्येक नगरसेवकांच कर्तव्य आहे. जर प्रशासन चुकत असेलतर ती चुक प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणं हे देखील प्रत्येक नगरसेवकांच कर्तव्य आहे. हे जर तीन क्लेरीफिकेशन आयुक्त साहेबांना आदि दयायला लावले असतेना तर ही चर्चाच दोन-चार तास करायची गरज नव्हती, कशासाठी करायची होती. जे साहेबांनी मांडल होतं कटप्रॅक्टीस साहेबांनी रद्द केली. कुठल्याही डॉक्टरांना इथ विरोध नाही. आज बिर्लाची काय अवस्था झाली. हे बिर्लाच झाल साहेब. आज ग्लोबल, ज्युपिटर इथले सगळे डॉक्टर बिर्लाला कामाला होते. आज बिर्लाच्या आजुबाजूला चांगले हॉस्पिटल झाले आणि बिर्लात जायला माणुस नको म्हणतो. याच्या मागचा तुम्ही उद्देश समजून घ्या. कटप्रॅक्टीस का नको. जेणे करुन त्या डॉक्टरांनी आपली पुर्ण प्रॅक्टीस वायसीएमला दिली पाहीजे. स्वत:चा जीव त्याठिकाणी ओतला पाहीजे. त्यातन विदयार्थी घडवले पाहीजेत, पेशंट नीट केला पाहीजे ही त्याच्या मागची सरळ भूमीका आहे. आता योगेशजी म्हणाले चाळीस लाख रुपये घेतले, पन्नास लाख रुपये घेतले. त्याच्यावर ओव्हाळ म्हणाले ज्यांनी घेतले त्यांना हिस्सा मिळाला का नाही. मग मीतर म्हणेन पस्तीस कोटीचा भ्रष्टाचार आहे हे. बरी ही हेडलाईन नाही झाली. म्हणजे आम्हांला हे पीजी चालू दयायच आहे, बंद पाडायची इच्छा सभागृहात कुणाची नाही. आपण विनाकारण त्याचा बाऊ केला, त्यासाठी भांडले आणि परत म्हणायच सीबीआय

चौकशी करा हे करा ते करा, कशासाठी. म्हणजे आपण असं वागायच की आपल्यावर माणसानी डाऊट घेतला पाहीजे. साहेब, डॉक्टरांनी आंदोलन केली हे डॉक्टरच आंदोलन करतात मी तुम्हांला मागच्या जीबीलाच सांगीतल होतं की त्यांना भत्ता दया. मला दोन तीन डॉक्टरांचे एसएमएस आलेले आहेत अजून आम्हांला प्रोत्साहन भत्ता मिळाला नाही. तीन दिवस झाले बातम्या येतात ते आंदोलन करतात म्हणून, त्यांच्या ह्क्कासाठी ते भांडत असतील पण तुम्ही परमनन्ट होण्याच्या अगोदर जर अस करत असालतर मग उदया परमनन्ट झाल्यावर काय. आम्हीतर तुमच्याच बरोबर आहोतना. आपल्याला काय म्हणायच आजजर तुम्ही असे वागतात तर भविष्यात तुम्ही कसे वागताल. साहेब, नायडू हॉस्पिटलनी काय केलं, मी परवा साहेबांकड गेलो होतोतर साहेब सहया करत होते मी म्हणालो साहेब, कशाच्या सहया करतात. नाही म्हणले अजीतदादांच प्रेशर आहे की लवकर पुण्यातल एमबीबीएस कॉलेज चालू करुन घ्या त्याचा हा प्रस्ताव पाठवतो. मी म्हणल त्यासाठी काय करणार, ते म्हणाले आम्ही ट्रस्ट केली त्यात महापौर, स्थायी समिती चेअरमन, विरोधी पक्षनेते या सगळयांना घेतलं. त्यांच्या माध्यमातून ते एमबीबीएस कॉलेज चालवणार आहेत. म्हणजे साहेब, हे कुठेतरी आम्ही बोललोतर तुम्हांला कळणार आहे. तुम्ही अधिकारी म्हणल्यास तुम्हांला सगळया महाराष्ट्राच नॉलेज असेलना. म्हणजे त्याठिकाणी आपण पीजीवर मानधनावर डी.वाय.पाटील म्हणतो, अंधेरीच म्हणतो अशी राज्यशासनाची पण ८० टक्के कॉलेजेस मानधनावर आहेत. तरी साहेबांच मत आहे हे लोक कोर्टात जातील, ते बंद पडेल आज सहा डॉक्टर आहेत ते वा-यावर जातील. उदया हे बंद केलतर त्या मुलांच काय करायच त्यांच नुकसान होईल म्हणून आम्ही तुमच्या बरोबर होतो. आरोप करा, कुणाला काही मिळो न मिळो. एकनाथराव तुम्ही जी सगळया हॉस्पिटलची लीस्ट वाचलीतना ती सगळी मागच्याच काळात पुर्ण झालेली आहेत. म्हणजे हे सगळ करण्यासाठी खुप लोकांनी खस्ता खाल्ल्यात. ओव्हाळ जे म्हणलेतना मुंबईचे लोक येतात, मी तुम्हांला सांगीतलना अगोदरच की जिल्हयातले लोक ससूण ऐवजी वायसीएमला येतात. म्हणजे कुठेतरी हे जुन्या डॉक्टरांचेच कष्ट आहेत. त्याच जुन्या डॉक्टरानी हे वायसीएम नावारुपाला आणलेल आहे म्हणून ते गुडविल आहे आणि त्याच्यावर आज आपण भांडतोय. म्हणजे त्या वायसीएमच गुडविल नसतना तर परदेशी साहेबांनी पण म्हणले नसते पीजी करु. प्रत्येक पक्षाच्या अजेंडयात आहे की आपल्या शहरात केईएमच्या धरतीवर मेडीकल कॉलेज असाव. साहेब, आता आपण

येथून पुढे कशावर विचार करायला पाहीजे होता, आज आपली ८० हजार फि आहे, यांना आपल एवढ मानधन जाणार आहे. ७१ लोक आपण घेणार आहोत. या लोकांच काय करायच. कुणी काय खाल्ल ज्याच खाल्ल त्याला लकलाभ लाभो. वायसीएम सारख्याच खाल्लना त्याचे त्यालाच फेडाव लागेल. ती म्हण आहेना इथच करा आणि इथच फेडा. जो खाईल त्याला ते लागेलचना. पण हे करत असताना साहेब आमच काम तुम्हांला अलर्ट करण आहे की साहेब ही चुक झाली ती दुरुस्त करा. मा.महापौर तुम्ही आयुक्तांना आदेश दया, आख्ख्या सभागृहात दोन ते आडीच तास चर्चा करता आणि मग तुम्ही साहेबांना खुलासा करायला सांगता. गटनेत्यांच्या बैठकीत जे झाल ते सांगा आणि बंद दाराआड काही चर्चा झाली नाही, दार पण उघडी ठेवली होती कुणीही या आणि बसा. मला योगेशजीचा फोन आला मला आमंत्रण नाही मी नामदेवरावाना फोन केला, जे जे त्या विषयावर सभागृहात बोललेत त्या सगळयांना बोलवा. कुणाला काय डाऊट घ्यायचा संबंध नाही आपण असं वागाना, आपल आचारण असं ठेवाना. कशाला कुणी डाऊट घेतला पाहीजे. आहो, पीजीला तुम्ही तीन महीने थांबले, का थांबले, डाऊट घेण्यासारखेच वागलेना, सत्ता तुमचीच आहेना. का विधीला तीन तीन महीने थांबले. शंका घ्यायला जागा तुम्ही केली. आम्ही तुमच्यावर आरोप केले नाहीत, आम्ही पहील्या दिवशी विषय आल्या आल्या सांगीतल की आमचा या विषयाला विरोध नाही. मी त्या दिवशीपण माईला बोललो होतो कशाला तहकूब करता, विषय संपून टाका. परत परत यायच कोव्हीड सारखी परिस्थिती आहे तुम्ही जीबी घेता पण ज्या चुका झाल्यात कुणीही इथ ताम्रपट घेवून कुणीच येत नाही. कुणीच बोलू शकत नाही की मीच या भारतात सर्वात हुशार आहे आणि मी करीन तेच योग्य आहे. प्रत्येक माणुस हा माणुस आहे तो चुकणार चुका दाखवणे हे सभागृहाच काम आहे. इथ कोण काय बोलतय, कोण काय बोलतय हे कुणी पर्सनली घेवू नका. कुणी अफजलखान म्हणल असेल कुणी, जिजाऊ म्हणल असेल. या सभागृहात मी पण या गॅलरीत बसून इथ मारामारी पाहीलेली आहे. पण बाहेर गेल्यावर ते एकमेकांच्या गळयात हात टाकून गेलेले आहेत. माझे आणि एकनाथरावचे झालेचना. ते मुद्दे तसे होते, विषयाला धरुन भांडा. इथ काही कोण कुणाचे दुश्मन नाहीत. नगरसेवकांना माझी विनंती आहे आपण चर्चा करतोना आज बातम्या येतात त्या बीजीपीच्या येत नाही, सेनेच्या येत नाहीत, राष्ट्रवादीच्या येत नाहीत तर नगरसेवकांचा विरोध. पक्षाच सोडा काही काही विषयात बाजूला ठेवाना तुम्ही. मी नगरसेवक आहे मग मी कुठल्याही पक्षाचा असो

चांगल्याला चांगल म्हणायच, वाईट आहे त्याला वाईटच म्हणायच ही धमक तुम्ही दाखवाना ही का दाखवत नाहीत. एखादा विषय आहेना मी शिवसेनाचा आहे मला नेत्यांनी सांगीतल मला हे पटत नाही असं नाही असं करा ही धमक तुम्ही सगळे ठेवाना. आज काय चुकल त्यांच, आहे का दादांच्या गटाचा एकतरी नगरसेवक याठिकाणी, नाही. साहेब मी तुम्हांला इंद्रायणीनगरच सहा महीन्यापासून पत्र मागतो. त्याठिकाणी एका सन्मा.आमदारांच्या नात्यातल डॉक्यूमेंट आहे, सहा-सहा महीन्यापासून मला तुम्ही त्या पत्राच उत्तर देत नाहीत. मग आम्ही काय म्हणायच आम्ही ते चव्हाटयावर आणायच. आज एकनाथराव म्हणाले तुषारनी काढल तुम्ही कारवाई केली नाही. मी आज सुध्दा फोन केला होता. तीन ते चार पत्र आहेत माझी. उदया माहीतीच्या अधिकारात असेल. मी माहीती मागतो ती लोक पण तुमच्या सन्मा.आमदारांची भाचे दिसतात म्हणून तुम्ही माहीती देत नाहीत हे मी सभागृहात म्हणायच का. आपलीच पोर आहेत काम करतात कधीतरी आम्ही ही पण भावना ठेवतो. पण तुम्ही जर खुन्शी वृत्तीने वागलाततर आम्हांला पण त्या वृत्तीनेच वागाव लागेलना. नाहीतर तुम्ही आम्हांला इथे उभे करणार का. म्हणजे कुठेतरी आपण विषयाला विरोध नाही विरोध नाही म्हणायच आणि दुस-या बाजूला तुम्ही राज्यशासनाची अट शिथील करणार दुस-या बाजुला म्हणायच की दोन वर्षानी आम्ही त्यांच्यावर कारवाई करु. साहेब, दोन वर्षानी तुम्हीतरी असाल का इथ. याच्यावर बोलण्यासारख खुप आहे, साहेबांनी ज्या काही अमेन्डमेंट केल्यात त्याबद्दल साहेब आपल कौतूक आहे. कुणीतरी उपसूचना वाचली. आपल त्यादिवशी हे सुध्दा ठरल होत की जे सात डॉक्टर राहीलेत त्या सात डॉक्टरांनाही आपल्याला बरोबर घ्यायच आहे. तरी या सगळया गोष्टीची तुम्ही साहेब, अमेन्डमेंट करा. पीजी आपल्याला चांगल चालवायच आहे आणि असं चालवा म्हणजे एवढे सगळे आरोप झाले म्हणून हे म्हणाले उदघाटनाला मोदीजी आले नाहीत. म्हणजे कुठेतरी आत्मपरिक्षण प्रत्येकानी करा. आणि अस नका होवू दया की तो एक तर आपल्याला पांढरा हात्ती व्हायचा हे होवू नये म्हणून याची काळजी आपण घेतो. आज तीथ काही लोकांची मोनोपॉली जे चुकवतात ते आरोप करतात जे नाही चुकवत ते नाही आरोप करणार आणि आरोप जर करत असेलतर त्यात तथ्य असेल साहेब तर त्याच्यावर कारवाई करायच काम तुमच आहे. मी तर डॉ. सोनीनांही ओळखत नाही आणि कुणालाही ओळखत नाही. पण आपण जे एक बेंचमार्क करुना त्या बेंचमार्कवर पुढची लोक पीजी इन्स्टिटयूट चालवणार आहेत.

काय तक्रार करणार आणि कुणाची तक्रार करायची. साहेब, माझी आपल्याला एकच विनंती आहे की हा विषय तुम्ही मंजूर केलेलाच आहे आणि त्या अनुषंगानेच तुम्ही ही पुढची पण हे सगळे डीएनबी कोर्सेस करतात, हे कोर्सेस करत असताना आज आपण कोर्सेसला मान्यता घेता परत तुम्ही इथ भरती करणार आहेत. म्हणजे परत तो विषय पुढे सुरु होणार आहेतर ती भरती करताना साहेब आपण सगळया गाईडलाईन व्यवस्थित पाळा. मुंबई म्युनिसीपल कॉर्पोरेशन पदनिर्मीती झाल्यानंतर सरळसेवेतील नेमणूकीवेळेस वैदयकीय प्राध्यापकाच्या नियुक्त्या हया एमपीएससी मार्फतच केल्या जातात. मात्र सहयोगी प्राध्यापक व सहा. प्राध्यापक यांच्या नेमणुका मुंबई महापालिकामार्फत केल्या जातात. सहयोगी आणि सहा.प्राध्यापक यांचे मात्र जर प्रमोशन असेलतर तर मुंबई महापालिका करु शकते. म्हणजे जेवढे कायदे आहेत तेवढया पळवाटा आहेत. आपल एकच उदिष्ठ ठेवा की हे पीजी इन्स्टिटयूट चांगल्या प्रकारे चालाव. काय कुणी चाळीस, पन्नास, साठ-सत्तर कोटीचा भ्रष्टाचार केला असेलतर त्याच त्याला लकलाभो, त्याची चौकशी करा नाहीतर करु नका. मी तुम्हांला एकच सांगतो की श्रीकर परदेशी साहेबांनी पाया रचला होता आणि आपण त्याचा कळस केला त्या बद्दल आपल पीजी इन्स्टिटयूट शहरात केल्याबद्दल अभिनंदन आहे. फक्त ते रन करताना पुढच्याना त्रास होणार नाही ही काळजी साहेब तुम्ही आज घ्या ही माझी तुम्हांला विनंती आहे. आज एवढे आपण भांडलोत की हे डॉक्टर नाहीत चायनाच्या बॉर्डरवर गेलेत आपले सगळे डॉक्टर आणि त्यांच्यासाठी आपण सगळे इथे भांडतोय. म्हणजे हे कोवीड योध्दे नाहीत ते आता देशाच्या रक्षणाचे योध्दे झालेले आहेत हे विसरु नका. हे डॉक्टर आहेत हे सुध्दा सेवा करत असताना मानधन घेतात, म्हणजे हे काही रतन टाटा नाहीत. एवढी मोठी संस्था चालवत असताना एक ते दोन रुपये घेतात. तुम्हीच सांगीतलना साहेब, शासनापेक्षा आपल्याकड का प्रेफर करतात कारण शासनात बदल्या होतात, उदया अमरावतीला जायला लागेल, धुळयाला जायला लागेल म्हणून ते आपल्या शहराला प्रेफर करतात. का तर आपल शहर त्यायोग्य आहे. त्यांची दोन तीन लाखाची पगार सोडून ते येथे का येतात कारण इथ त्यांना स्टॅबेलीटी आहे. ही स्टॅबेलीटी देत असताना दोन वर्षानी तुम्ही नसणार. या सभागृहात कोण असेल कोण नाही पण हे शहर याठिकाणी आहे. हे लोक़, आम्ही सगळे याठिकाणी आहेत. आता परमनन्ट केल्यानंतर यांच्यात मुजोरी येवू नये ही काळजी आपण घ्या. एवढी चर्चा झाल्यानंतर मला वाटत एकनाथरावांच समाधान झाल असेल. त्यांनी जर

कदाचित तुम्हांला अगोदर उत्तर दयायला लावल असतंतर निश्चित ही चर्चाच झाली नसती आणि हे सभागृह एवढया वेळ चालल नसतं. आपल्या सर्वांनाच जायच आहे मी जास्त बोलत नाही आणि पक्षनेत्यांनाही विनंती करतो तुमचा अर्धा किल्ला एकनाथरावानी लढवला आहे आता अस जाहीर भाषण करु नका की परत कुणीतरी उठन आणि मला याच्यावर बोलायच म्हणेल, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर म्हणजे मा.महापौर साहेब, आपल्याला मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते आण्णासाहेब मगर स्टेडीअमवरील कोवीड रुग्णालयाच उदघाटन करण्यासाठी जायच आहे. परंतु आज सातत्याने गेल्या दोन तीन दिवसापासून पीजीच्या संदर्भामध्ये याठिकाणी आपल्या सन्मानीयांच्या मनामध्ये असणा-या शंकाबाबत सर्व गटनेत्यांची आपण बैठक घेतली आणि आज पुन्हा त्या विषयावरती ज्यांना ज्यांना शंका होती त्यांनी हा विषय उपस्थित केला. तरी हरकत नाही परंतु ज्या पध्दतीने या सभागृहामध्ये मगाशी उल्लेख केला गेला परंतु आम्ही नक्कीच शिवाजी महाराजांचे मावळे आहेत शिवाजी महाराजांना अपेक्षीत असलेल काम आमच्या हातून याठिकाणी होतय. अन्तोदयाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत काम करण्याची इच्छा आमच्याकडे आहे. गरीब, वंचित, पिढीतांसाठी हे पीजी इन्स्टिटयूट हा मानाचा मुजरा आपल्या शहरातमध्ये आहे. खर म्हणजे निती आयोगाच्यामध्ये सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशामधली ऐकमेव महानगरपालिका असेल, मुंबई व्यतिरीक्त की त्या महानगरपालिकेमध्ये एवढया मोठया प्रमाणामध्ये पीजी इन्स्टिटयूट होणार आहे. मला अस वाटते की जे आपले हॉस्पिटल बांधुन ठेवलेले आहेत आणि ते डॉक्टरांच्या अभावा मुळे पुर्णपणे बंद आहेत, एवढ मोठ इन्फ्रास्ट्रक्चर करुन. येणा-या काळामध्ये या डॉक्टरांच्या माध्यमातून या हॉस्पिटलमध्ये चांगला उपयोग होईल असं मला याठिकाणी वाटत. सन्मा.सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेता या सात नंबरच्या विषयाला सन्मा.एकनाथराव पवार यांनी उपसूचना दिली त्या उपसूचनेसह हा विषय मंजूर करावा.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ७ उपसूचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५६० विषय क्रमांक - ७

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
प्रशा/७/कावि/४१७/२०२० दि.०९/०७/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत ०८ रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत आहेत. त्यापैकी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे बहुविध शाखांचे व ७५० खाटांच्या क्षमतेचे सर्वात मोठे रुग्णालय कार्यरत असून, त्यामार्फत महापालिका हद्दीतील नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे महापालिका हद्दीचे नजीक असणा-या ग्रामीण भागातील रुग्ण देखील या रुग्णालयामध्ये वैद्यकिय उपचारार्थ मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात.

रुग्णालयांमार्फत नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरवित असताना महापालिकेला वेळोवेळी तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची उणीव भासत असते. महापालिकेमार्फत वेळोवेळी तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करुन देखील पुर्ण क्षमतेने अधिकारी उपलब्ध होत नाहीत. परिणामी महापालिकेमार्फत देण्यात येणा-या वैद्यकिय सेवेवर याचा विपरित परिणाम होत असून, तज्ञ वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय अधिका-यांची कमतरता नेहमीच जाणवत असते. यावर महापालिकेमार्फत मानधन स्वरुपात, मानसेवी तज्ञ वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेणेत येऊन, काही प्रमाणात वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे महापालिकेची क्षमता असुनही पुरेशा तज्ञ वैद्यकिय अधिका-यांचे अभावी रुग्णसेवा पुरविणे शक्य होत नाही.

महापालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणा-या रुग्णालयांमार्फत तज्ञ वैद्यकिय अधिका-यांचे अभावी रुग्णसेवा पुरविली न गेल्याने महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुग्णसेवेचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. यास्तव वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणा-या रुग्णालयांमध्ये वैद्यकिय अधिकारी तसेच तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची कमतरता भरुन काढणे व महापालिकेची इतर रुग्णालये सक्षम करुन रुग्णसेवा पुरविणेकरीता नजीकच्या कालावधीमध्ये नव्याने सुरु करावयाच्या ०६ रुग्णालयांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करणेबाबतचे प्रयोजन असून याकरीताचा प्रस्ताव महापालिकेच्या वैद्यकिय विभागामार्फत सादर करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | प्रस्तावित डी.एन.बी. कोर्सेस |
|---|---|---|
| १ | भोसरी रुग्णालय | अस्थिरोग/ प्लॅस्टीक सर्जरी /भूलशास्त्र / क्ष-किरण |
| २ | जिजामाता रुग्णालय | स्त्री रोग प्रसूती शास्त्र/ बालरोग/ भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ३ | थेरगाव रुग्णालय | मेडिकल व सर्जिकल ऑन्कोलॉजी / गायनाकालॉजिकल ऑन्कोलॉजी / रेडिओथेरपि / भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ४ | आकुर्डी रुग्णालय | मेडिसीन / शल्यचिकीत्सा / रिस्पेरेटरी डिसीज / भूलशास्त्र / क्ष-किरण |
| ५ | नेत्र रुग्णालय | नेत्ररोग |
| ६ | तालेरा रुग्णालय | युरोलॉजी / नेफ्रॉलॉजी / मेडीसीन |

वरील सर्व वैद्यकिय शाखांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करण्यासाठी प्रत्येक वैद्यकिय शाखेसाठी १ सिनियर कन्सल्टंट, १ ज्युनियर कन्सल्टंट, २ सिनियर रेसिडन्ट यांची आवश्यकता असते. वरीलप्रमाणे नमूद केलेले डी.एन.बी. कोर्सेस सुरु केल्यास महापालिकेकरीता मोठ्या प्रमाणात संबंधित शाखांमधील तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होऊन, परिसरातील नागरिकांना सक्षमपणे रुग्णसेवा पुरविणेसाठी त्याचा फायदा होईल. त्याचप्रमाणे विविध वैद्यकिय शाखांकरीताचे उपचार नागरिकांना महापालिकेमधील नजीकच्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध होऊन यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयावरील रुग्णसेवेचा ताण काही प्रमाणात कमी होईल.

महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत नव्याने बांधलेल्या ६ रुग्णालयांमध्ये डी.एन.बी. कोर्सेस सुरु करणेबाबत प्रस्तावित असून त्यास मा.महापालिका सभेची मान्यता मिळालेनंतर याकरीताच्या आवश्यक पदांची निर्मिती, सेवा प्रवेश नियमांची निश्चिती व इतर आवश्यक बाबींच्या पुर्ततेकरीताचा सविस्तर प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे सादर करणेत येईल तरी सदर विषयास मान्यता देणेत येत आहे. तसेच वैदयकीय शाखांमध्ये डी.एन.बी.कोर्सेस सुरु करत असताना मनपा सेवेतील पात्र असलेले वैदयकीय अधिकारी (एकुण ७) यांना डी.एन.बी. कोर्स मध्ये संधी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६१ विषय क्रमांक - ८

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दिनांक ६/३/२०२० व दिनांक २०/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ४/७/२०२० व दिनांक ८/५/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६२ विषय क्रमांक - ९

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक १३/२/२०२०, २७/२/२०२० व दिनांक १२/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २७/२/२०२० व १२/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १४/५/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६३ विषय क्रमांक - १०

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक १२/२/२०२० व दिनांक २६/२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ११/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १३/५/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६४ विषय क्रमांक - ११

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रिडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दिनांक १४/२/२०२० (दु.३.०० वा.) दिनांक २८/२/२०२० (दु.३.०० वा.) दिनांक १३/३/२०२० (दु.२.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २८/२/२०२० (दु.३.०० वा.) दि.१३/३/२०२०(दु.२.४५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ५६५ विषय क्रमांक - १२

दिनांक- २६/८/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती सभा</u>**

अ) दिनांक ५/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १९/३/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ७२ प्रतीकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/२३/२०२०
दिनांक - २७/१०/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठीरवाना.

(क्र.प्रशा/१/कावि/३७८/२०२०दि.१८/३/२०२०विषयक्र.३चेलगत) ()

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी 411 018

प्रपत्र 'अ'

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अधिष्ठाता<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 6 | 03-12-2019 | 5 | WABALE RAJENDRA NAMDEO<br>(वाबळे राजेंद्र नामदेव) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BARTAKKE GIRISHCHANDRA DNYANESHWAR<br>(बारटक्के गिरीशचंद्र ज्ञानेश्वर) | प्रतिक्षा -1 | खुला ( इतर मागास प्रवर्ग ) |
| | | | | | | GAIKWAD PRADIP RAMCHANDRA<br>(गायकवाड प्रदीप रामचंद्र) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 2 | प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सक<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 4 | 24-12-2019 | 4 | DHAIGUDE BALAJI DATTU<br>(धायगुडे बालाजी दत्तु) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | LITAKE MANJUSHA MADHUSUDAN<br>(लिटके मंजुषा मधुसुदन) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | LAMTURE YESHWANT RAMRAO<br>(लमतुरे यशवंत रामराव) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 3 | प्राध्यापक मेडीसीन<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 2 | 03-12-2019 | 2 | SONI PRAVIN NAGULAL<br>(सोनी प्रविण नागुलाल) | निवड - 1 | खुला |
| 4 | प्राध्यापक कान,नाक,घसा, शल्यचिकित्सा<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 2 | 17-12-2019 | 2 | LATHI ANIKET ASHOK<br>(लाठी अनिकेत अशोक) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | SHINDE VINOD VISHWANATH<br>(शिंदे विनोद विश्वनाथ) | प्रतिक्षा -1 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | प्राध्यापक बालरोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 6 | 05-12-2019 | 3 | AMBIKE DEEPALI ABHIJIT<br>(अंबिके दिपाली अभिजित) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | JADHAV RENUKA SHANKAR<br>(जाधव रेणका शंकर) | प्रतिक्षा -1 | खुला ( अनु.जाती ) |
| | | | | | | SURYAVANSHI AMOL RAMRAO<br>(सुर्यवंशी अमोल रामराव) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 6 | प्राध्यापक स्त्री रोग व प्रसुती शास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 5 | 19-12-2019 | 4 | ASALKAR MAHESH RAMAKANT<br>(आसलकर महेश रमाकांत) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BHANAP PRASAD LAXMIKANT<br>(भानप प्रसाद लक्ष्मीकांत) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | SALVI PANKAJ PRAKASH<br>(साळवी पंकज प्रकाश) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 7 | प्राध्यापक भुलशास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 5 | 10-12-2019 | 4 | GAVALI YOGESH VIJAYKUMAR<br>(गवळी योगेश विजयकुमार) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GAIKWAD MAROTI RAJARAM<br>(गायकवाड मारोती राजाराम) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | BAGLE APARNA ABHIJIT<br>(बागले अपर्णा अभिजित) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | प्राध्यापक अस्थिरोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 5 | 07-12-2019 | 5 | SWAMY AMIT PADMANABHA<br>(स्वामी अमित पद्मनाभ) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MATHESUL AMBARISH AVINASH<br>(माथेसूळ अंबरीश अविनाश) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | PATHAK RITESH SURESH<br>(पाठक रितेश सुरेश) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 9 | प्राध्यापक मानसोपचार शास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 2 | 17-12-2019 | 2 | SANTRE MANJEET SURESHKUMAR<br>(संत्रे मनजीत सुरेशकुमार) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BHAT ANEESH SHANKARNARAYAN<br>(भट अनीश शंकरनारायण) | प्रतिक्षा -1 | खुला |
| 10 | प्राध्यापक नेत्ररोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 3 | 26-12-2019 | 2 | MAHESHGAURI RUPALI DARPAN<br>(महेशगौरी रुपाली दर्पण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GODBOLE VEERENDRA VISHWAS<br>(गोडबोले विरेंद्र विश्वास) | प्रतिक्षा -1 | खुला |
| 11 | प्राध्यापक पॅथॉलॉजी<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 10 | 12-12-2019 | 7 | PATIL TUSHAR VITTHALRAO<br>(पाटील तुषार विठ्ठलराव) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GORE CHARUSHEELA RAJESH<br>(गोरे चारुशीला राजेश) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | HAZARI RAKESH SINGH<br>(हजारी राकेश सिंह) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | प्राध्यापक पीएसएम<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 24 | 02-01-2020 | 18 | PANDVE HARSHAL TUKARAM<br>(पांडवे हर्षल तुकाराम) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | PIMPARKAR MRUNAL MAHENDRA<br>(पिंपरकर मृणाल महेंद्र) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | KANCHI PADMAJA SUBODH<br>(कांची पद्मजा सुबोध) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| | | | | | | KULKARNI PRIYA YOGESH<br>(कुलकर्णी प्रिया योगेश) | प्रतिक्षा - 3 | खुला |
| 13 | प्राध्यापक त्वचारोग शास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 2 | 17-12-2019 | 2 | CHAUDHARI NITIN DINKAR<br>(चौधरी नितीन दिनकर) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | DEO KIRTI SHRIKANT<br>(देव किर्ती श्रीकांत) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| 14 | प्राध्यापक उरोरोग शास्त्र (पल्मोनोलॉजी)<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 2 | 26-12-2019 | 2 | GAIKWAD DEEPALI RAHUL<br>(गायकवाड दिपाली राहूल) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | SALVE VIJAY TUKARAM<br>(साळवे विजय तुकाराम) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| 15 | प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 10000 | खुला 1 | 8 | 31-12-2019 | 6 | PETKAR JAISHREE MADHUSUDAN<br>(पेटकर जयश्री मधुसुधन) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MULEY VRISHALI AVINASH<br>(मुळे वृषाली अविनाश) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | RANGARI AMIT ASHOK<br>(रंगारी अमित अशोक) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | सहयोगी प्राध्यापक, सर्वसाधारण शल्यचिकित्सा र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>एसईबीसी 1<br>खुला 1 | 12 | 24-12-2019 | 11 | THORAT SANTOSH DASHRATH (थोरात संतोष दशरथ) | निवड - 1 | अनु. जाती |
| | | | | | | LAMTURE YESHWANT RAMRAO (लमतुरे यशवंत रामराव) | प्रतिक्षा - 1 | अनु.जाती |
| | | | | | | NARWADE NANDKISHOR EKNATH (नरवाडे नंदकिशोर एकनाथ) | प्रतिक्षा - 2 | अनु .जाती |
| | | | | | | ZINGADE ANAND PRABHAKAR (झिंगाडे आनंद प्रभाकर) | निवड - 1 | इमाव |
| | | | | | | PADALE SANJAY VIJAY (पाडळे संजय विजय) | निवड - 1 | खुला (अनु.जाती) |
| | | | | | | LAMTURE YESHWANT RAMRAO (लमतुरे यशवंत रामराव) | प्रतिक्षा - 1 | खुला(अनु.जाती) |
| | | | | | | KULKARNI PRACHI SATISH (कुलकर्णी प्राची सतिश) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 17 | सहयोगी प्राध्यापक, मेडीसीन र.रु.37400 67000 अॅके.ग्रेट पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>एसईबीसी 1<br>ईडब्ल्युएस 1<br>खुला 1 | 5 | 03-12-2019 | 4 | KHILLARE KISHOR MAHADEVRAO (खिल्लारे किशोर महादेवराव) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | KALE NARENDRA CHINDHU (काळे नरेंद्र चिंधु) | निवड - 1 | इमाव |
| | | | | | | PATHAK NIRANJAN PANDURANG (पाठक निरंजन पांडुरंग) | निवड - 1 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | सहयोगी प्राध्यापक कान,नाक,घसा शल्यचिकित्सा<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 7 | 17-12-2019 | 6 | YEOLEKAR ADITYA MURAR<br>येवलेकर आदित्य मुरार | निवड - 1 | खुला |
| | | | | | | THAKUR RAHUL TEJENDRASINGH<br>(ठाकुर राहुल तेजेंद्रसिंग) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | MANE SANTOSH BALASAHEB<br>(माने संतोष बाळासाहेब) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 19 | सहयोगी प्राध्यापक बालरोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>खुला 1 | 12 | 05-12-2019 | 9 | HARIBHAKTA SANDHYA VISHAL<br>(हरीभक्त संध्या विशाल) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | SHAMKUWAR PRATIBHA BHAJANDAS<br>(शामकुवर प्रतिभा भजनदास) | प्रतिक्षा - 1 | अनु.जाती |
| | | | | | | KULKARNI RAJESH KISHANRAO<br>(कुलकर्णी राजेश किशनराव) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MUNDLOD SURYAKANT SAYANNA<br>(मुंडलोड सुर्यकांत सायन्ना) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | SURYAVANSHI AMOL RAMRAO<br>(सुर्यवंशी अमोल रामराव) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | सहयोगी प्राध्यापक स्त्री रोग प्रसुती शास्त्र र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>एसईबीसी 1<br>ईडब्ल्युएस 1<br>खुला 1 | 20 | 19-12-2019 | 17 | SHINDE KUNAAL KIRAN<br>(शिंदे कुणाल किरण) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | THAWAL YOGESH ATMARAM<br>(ठवाळ योगेश आत्माराम) | प्रतिक्षा - 1 | अनु.जाती |
| | | | | | | KATAKDHOND SHRIRAJ SHANMUKH<br>(कटकधोंड श्रीराज षण्मुख) | प्रतिक्षा - 2 | अनु.जाती |
| | | | | | | NARKHEDE HEMRAJ RAMCHANDRA<br>(नारखेडे हेमराज रामचंद्र) | निवड - 1 | इमाव |
| | | | | | | ASALKAR MAHESH RAMAKANT<br>(आसलकर महेश रमाकांत) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | THAKKARWAD SMITA MAROTIRAO<br>(ठक्करवाड स्मिता मारोतीराव) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | SALVI PANKAJ PRAKASH<br>(साळवी पंकज प्रकाश) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| | | | | | | KARALE ANAND VIJAYKUMAR<br>(करळे आनंद विजयकुमार) | निवड - 1 | सा शै मा प्र |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | सहयोगी प्राध्यापक भुलशास्त्र<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>खुला 1 | 14 | 10-12-2019 | 9 | GAJBHARE MANOJKUMAR NAMDEORAO<br>(गजभारे मनोजकुमार नामदेवराव) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | ANDURKAR UJJWALA SUMEDH<br>(अंदुरकर उज्वला सुमेध) | प्रतिक्षा - 1 | अनु.जाती |
| | | | | | | WAGHMARE JITENDRA RAGHUNATH<br>(वाघमारे जितेंद्र रघुनाथ) | निवड 1 | इमाव |
| | | | | | | GAVALI YOGESH VIJAYKUMAR<br>(गवळी योगेश विजयकुमार) | निवड - 1 | खुला (अनु.जाती) |
| | | | | | | KHEDKAR SUNITA MILIND<br>(खेडकर सुनिता मिलिंद) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | NARKHEDE HARSHA HEMRAJ<br>(नारखेडे हर्षा हेमराज) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | सहयोगी प्राध्यापक अस्थीरोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 अॅके.ग्रेड पे रु. 9000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>खुला 1 | 7 | 07-12-2019 | 7 | PATOLE VIVEK VISHWANATH<br>(पाटोळे विवेक विश्वनाथ) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | TONDE JEEVAN BHAGWAN<br>(तोंडे जीवन भगवान) | निवड - 1 | इमाव |
| | | | | | | TAMBE DEEPAK ANIL<br>(तांबे दिपक अनिल) | प्रतिक्षा - 1 | इमाव |
| | | | | | | SWAMY AMIT PADMANABHA<br>(स्वामी अमित पद्मनाभ) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | PATHAK RITESH SURESH<br>(पाठक रितेश सुरेश) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | MATHESUL AMBARISH AVINASH<br>(माथेसूळ अंबरीश अविनाश) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | सहयोगी प्राध्यापक मानसोपचार शास्त्र<br>र.रु.37400-67000 अँके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 3 | 17-12-2019 | 2 | PANSE SMITA NIKHIL<br>(पानसे स्मिता निखिल) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BHAT ANEESH SHANKARNARAYAN<br>(भट अनिश शंकरनारायण) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| 24 | सहयोगी प्राध्यापक नेत्ररोग चिकित्सा<br>र.रु.37400-67000 अँके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 10 | 26-12-2019 | 2 | MOHOD SMITA SACHIN<br>(मोहोड स्मिता सचिन) | निवड - 1 | खुला |
| 25 | सहयोगी प्राध्यापक पॅथॉलॉजी<br>र.रु.37400-67000 अँके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 10 | 12-12-2019 | 8 | SURYAWANSHI KISHOR HIRAMAN<br>(सुर्यवंशी किशोर हिरामण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BAVIKAR RUPALI RAMAKANT<br>(बाविकर रुपाली रामाकांत) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | PANCHAL MINAL GANGADHAR<br>(पांचाळ मिनल गंगाधर) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 26 | सहयोगी प्राध्यापक पीएसएम<br>र.रु.37400-67000 अँके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 29 | 02-01-2020 | 24 | BAWA MUKESH SURESH<br>(बावा मुकेश सुरेश) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | PIMPARKAR MRUNAL MAHENDRA<br>(पिंपरकर मृणाल महेंद्र) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | KULKARNI PRIYA YOGESH<br>(कुलकर्णी प्रिया योगेश) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 27 | सहयोगी प्राध्यापक त्वचारोगशास्त्र<br>र.रु.37400-67000 अँके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 2 | 17-12-2019 | 2 | PALASKAR NACHIKET MADHUKARRAO<br>(पळसकर नचिकेत मधुकरराव) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | DALAVE KALYAN TULSHIRAM<br>(दळवे कल्याण तुळशिराम) | प्रतिक्षा - 1 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28 | सहयोगी प्राध्यापक उरोरोग शास्त्र(पल्मोनोलॉजी) र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 5 | 26-12-2019 | 5 | WAGHMARE RAKESH DIGAMBAR (वाघमारे राकेश दिगंबर) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | BANSODE ASHOK SUDAM (बनसोडे अशोक सुदाम) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | DOLE SACHINKUMAR SOMA (डोळे सचिनकुमार सोमा) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 29 | सहयोगी प्राध्यापक सूक्ष्मजीवशास्त्र र.रु.37400-67000 ॲके.ग्रेड पे रु. 9000 | खुला 1 | 16 | 31-12-2019 | 15 | PETKAR JAISHREE MADHUSUDAN (पेटकर जयश्री मधुसुधन) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MUDSHINGKAR SWATI SHANKARRAO (मुडशिंगकर स्वाती शंकरराव) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | KULKARNI KETAKI VYANKATESH (कुलकर्णी केतकी व्यंकटेश) | प्रतिक्षा - 2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकीत्सा र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | अनु जाती । अनु जमाती । विजाभज । इमाव । एसईबीसी । ईडब्ल्यूएस । खुला । | 19 | 24-12-2019 | 16 | BORADE DNYANESHWAR VISHWANATH (बोराडे ज्ञानेश्वर विश्वनाथ) | निवड-1 | अनु.जाती |
| | | | | | | PATIL AMIT MANOHAR (पाटील अमित मनोहर) | प्रतिक्षा -1 | अनु.जाती |
| | | | | | | NIKAM RAHUL MADHUKAR (निकम राहुल मधुकर) | प्रतिक्षा -2 | अनु.जाती |
| | | | | | | GAWADE HARSHAD NAMDEV (गावडे हर्षद नामदेव) | निवड-1 | इमाव |
| | | | | | | PATIL DEEPAK SADASHIV (पाटील दीपक सदाशिव) | प्रतिक्षा -1 | इमाव |
| | | | | | | MHASE AKSHAY CHANGDEO (म्हसे अक्षय चांगदेव) | प्रतिक्षा -2 | इमाव |
| | | | | | | WAGH AMIT ANANT (वाघ अमित अनंत) | निवड-1 | खुला |
| | | | | | | BARASE AVISHKAR KACHESHWAR (बारसे अविष्कार कचेश्वर) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | BHADGALE RAHUL MOHANRAO (भदगले राहुल मोहनराव) | प्रतिक्षा -2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन<br>र.रु.15600-39100 अँके.ग्रेड पे रु. 6000 | अनु जाती 1<br>अनु जमाती 1<br>विजाभज 1<br>इमाव 2<br>एसईबीसी 1<br>ईडब्ल्युएस 1<br>खुला 2<br>(इमाव व खुला प्रवर्गाकरीता प्रत्येकी 1 पद समांतर आरक्षण - महिला) | 12 | 03-12-2019 | 10 | WATHORE NITIN UTTAMRAO<br>(वाठोरे नितीन उत्तमराव) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | JUDE DATTA SHESHERAO<br>(जुडे दत्ता शेषराव) | निवड - 1 | अनु.जमाती |
| | | | | | | PATIL AKHIL RAMESH<br>(पाटील आखिल रमेश) | निवड - 1 | विजा (अ) |
| | | | | | | NAHDI WALEED KHALID<br>(नहदी वलीद खालिद) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | SHEWALE AKSHAY SUNIL<br>(शेवाळे अक्षय सुनिल) | निवड - 2 | खुला |
| | | | | | | PATIL AJAYKUMAR VISHWANATH<br>(पाटील अजयकुमार विश्वनाथ) | प्रतिक्षा - 1 | खुला |
| | | | | | | WASEKAR MUKUND SUDHAKAR<br>(वासेकर मुकुंद सुधाकर) | प्रतिक्षा - 2 | खुला |
| 32 | सहाय्यक प्राध्यापक कान,नाक,घसा शल्यचिकित्सा<br>र.रु.15600-39100 अँके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 10 | 17-12-2019 | 8 | KAHANE KAUSTUBH JAYKUMAR<br>(कहाणे कौस्तुभ जयकुमार) | निवड-1 | खुला |
| | | | | | | POL SHASHIKANT ANIL<br>(पोळ शशिकांत अनिल) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | JADHAV PRIYANKA VASANT<br>(जाधव प्रियांका वसंत) | प्रतिक्षा -2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 33 | सहाय्यक प्राध्यापक बालरोगचिकित्सा<br>र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>एसईबीसी 1<br>ईडब्ल्युएस 1<br>खुला 1 | 9 | 05-12-2019 | 6 | BICHKAR VRUSHALI VILAS<br>(बिचकर वृषाली विलास) | निवड-1 | खुला |
| | | | | | | GAWADE KANCHAN GULAB<br>(गावडे कांचन गुलाब) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | BANTEWAD SUDHAKAR ASHOK<br>(बंटेवाड सुधाकर अशोक) | प्रतिक्षा -2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 34 | सहाय्यक प्राध्यापक रेडीओलॉजी<br>र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | अनु.जाती 1<br>इमाव 1<br>खुला 1 | 3 | 03-12-2019 | 2 | GHODAKE SATYAJEET SUBHASHRAO<br>(घोडके सत्यजीत सुभाषराव) | निवड-1 | खुला (इमाव) |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 35 | सहाय्यक प्राध्यापक स्त्री रोग व प्रसुती शास्त्र र.रु.15600-39100 अँके.ग्रेड पे रु. 6000 | अनु जाती 1<br>अनु जमाती 1<br>विजाभज 1<br>इमाव 2<br>एसईबीसी 1<br>ईडब्ल्युएस 1<br>खुला 2<br>(इमाव व खुला प्रवर्गाकरीता प्रत्येकी 1 पद समांतर आरक्षण - महिला) | 29 | 20-12-2019 | 18 | KHAIRNAR VAIBHAV SURESH<br>(खैरनार वैभव सुरेश) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | WANJARE NUTAN PRABHAKAR<br>(वंजारे नुतन प्रभाकर) | प्रतिक्षा -1 | अनु.जाती |
| | | | | | | SINGH RENU SATYAVIR<br>(सिंग रेणु सत्यवीर) | प्रतिक्षा -2 | अनु.जाती |
| | | | | | | SUPE MANGAL SANTOSH<br>(सुपे मंगल संतोष) | निवड - 1 | अनु.जमाती |
| | | | | | | CHAVAN RAHUL BHAGCHAND<br>(चव्हाण राहुल भागचंद) | निवड - 1 | भ ज (ब) |
| | | | | | | GHUGE PRANALI VISHWANATH<br>(घुगे प्रणाली विश्वनाथ) | प्रतिक्षा -1 | भ ज (ड) |
| | | | | | | PONDE SANJAY RAVAN<br>(पोंदे संजय रावण) | प्रतिक्षा -2 | भ ज (क) |
| | | | | | | THOSAR MAYUR ARUN<br>(ठोसर मयुर अरुण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GADE KALYANI PRASHANT<br>(गाडे कल्याणी प्रशांत) | निवड - 2 | खुला |
| | | | | | | WANJARE NUTAN PRABHAKAR<br>(वंजारे नुतन प्रभाकर) | प्रतिक्षा -1 | खुला (अनु.जाती) |
| | | | | | | MORE NANDKISHOR VITTHALRAO<br>(मोरे नंदकिशोर विठ्ठलराव) | प्रतिक्षा -2 | खुला |
| | | | | | | KOLATE DIPAK SURESH<br>(कोलते दिपक सुरेश) | प्रतिक्षा - 3 | खुला |
| | | | | | | VISHNOI POONAM SOHANLAL<br>(विष्णोई पूनम सोहनलाल) | प्रतिक्षा - 4 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 36 | सहाय्यक प्राध्यापक भुलशास्त्र र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | अनु.जाती ।<br>इमाव ।<br>एसईबीसी ।<br>ईडब्ल्युएस ।<br>खुला । | 17 | 10-12-2019 | 8 | MESHRAM SUCHETA SHRIKANT (मेश्राम सुचेता श्रीकांत) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | MOTGHARE ABHILASHA DHANRAJ (मोटघरे अभिलाषा धनराज) | प्रतिक्षा -1 | अनु.जाती |
| | | | | | | KUTTARMARE SHITAL MAHENDRA (कुत्तरमारे शितल महेंद्र) | प्रतिक्षा -2 | अनु.जाती |
| | | | | | | SAPATE MANISHA ASHWINIKUMAR (सपाटे मनिषा अश्विनीकुमार) | निवड - 1 | इमाव |
| | | | | | | NARKHEDE HARSHA HEMRAJ (नारखेडे हर्षा हेमराज) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MOTGHARE ABHILASHA DHANRAJ (मोटघरे अभिलाषा धनराज) | प्रतिक्षा -1 | खुला (अनु.जाती) |
| | | | | | | KUTTARMARE SHITAL MAHENDRA (कुत्तरमारे शितल महेंद्र) | प्रतिक्षा -2 | खुला (अनु.जाती) |
| | | | | | | KAMBLE NIKHIL UTTAMRAO (कांबळे निखिल उत्तमराव) | प्रतिक्षा - 3 | खुला |
| | | | | | | KAWADE BHAUSAHEB RAMESH (कवडे भाऊसाहेब रमेश) | निवड - 1 | सा शै मा प्र |
| 37 | सहाय्यक प्राध्यापक अस्थीरोग शल्यचिकित्सा र.रु.15600 39100 अॅके.ग्रेट पे रु. 6000 | अनु.जाती ।<br>इमाव ।<br>एसईबीसी ।<br>ईडब्ल्युएस ।<br>खुला । | 15 | 07-12-2019 | 12 | PATOLE VIVEK VISHWANATH (पाटोळे विवेक विश्वनाथ) | निवड - 1 | अनु.जाती |
| | | | | | | TONDE JEEVAN BHAGWAN (तोंडे जीवन भगवान) | निवड - 1 | खुला (इमाव) |
| | | | | | | PATEL GAZANFAR BALANSAB (पटेल गजनफर बालनसाब) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | GUPTA KETAN RAJENDRA (गुप्ता केतन राजेंद्र) | प्रतिक्षा -2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 38 | सहाय्यक प्राध्यापक मानसोपचारशास्त्र र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 7 | 17-12-2019 | 4 | WADGAONKAR GAURAV PRAVIN (वडगावकर गौरव प्रविण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GUPTA NEHA RAJESHKUMAR (गुप्ता नेहा राजेशकुमार) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | KARDE AVINASH DATTATRAY (करडे अविनाश दत्तात्रय) | प्रतिक्षा -2 | खुला |
| 39 | सहाय्यक प्राध्यापक नेत्ररोग चिकित्सा र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 9 | 26-12-2019 | 7 | THIKEKAR MAHESH DATTATRAY (ठिकेकर महेश दत्तात्रय) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | RAI RAM KRISHNA (राय राम कृष्णा) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | DHAS SACHIN DNYANESHWAR (धस सचिन ज्ञानेश्वर) | प्रतिक्षा -2 | खुला |
| 40 | सहाय्यक प्राध्यापक पॅथॉलॉजी र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 12 | 12-12-2019 | 8 | PANCHAL MINAL GANGADHAR (पांचाळ मिनल गंगाधर) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | LONDHE MANGESH MACHINDRA (लोंढे मंगेश मच्छिंद्र) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | SAWAIMUL KOMAL DEVANAND (सवाईमुल कोमल देवानंद ) | प्रतिक्षा -2 | खुला |
| 41 | सहाय्यक प्राध्यापक पीएसएम र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 33 | 03-01-2020 | 23 | BAWA MUKESH SURESH (बावा मुकेश सुरेश) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GAIKWAD BHARGAV VISHWAS (गायकवाड भार्गव विश्वास) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | DESALE ATUL VILAS (देसले अतुल विलास) | प्रतिक्षा -2 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 42 | सहाय्यक प्राध्यापक त्वचारोग शास्त्र र.रु.15600-39100 ॲके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 4 | 17-12-2019 | 2 | DALAVE KALYAN TULSHIRAM (दळवे कल्याण तुळशिराम) | निवड - 1 | खुला |
| 43 | सहाय्यक प्राध्यापक उरोरोग शास्त्र (पल्मोनोलॉजी) र.रु.15600-39100 ॲके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 5 | 26-12-2019 | 4 | DOLE SACHINKUMAR SOMA (डोळे सचिनकुमार सोमा) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | YANNAWAR ANAND NAMDEVRAO (यन्नावार आनंद नामदेवराव) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | GABHALE SANJAY DHAVALA (गभाले संजय ढवळा) | प्रतिक्षा -2 | खुला |
| 44 | सहाय्यक प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र र.रु.15600-39100 ॲके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 24 | 31-12-2019 | 20 | DEORUKHKAR SACHIN CHANDRAKANT (देवरुखकर सचिन चंद्रकांत) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | MUNDHADA SAPANA GOVINDLALJI (मुंधडा सपना गोविंदलालजी ) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | KULKARNI VISHAL LAXMIKANT (कुलकर्णी विशाल लक्ष्मीकांत) | प्रतिक्षा -2 | खुला |
| 45 | Antenatal Medical officer-cum-lecturer/ Assistant Professor र.रु.15600-39100 ॲके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 11 | 20-12-2019 | 11 | THOSAR MAYUR ARUN (ठोसर मयुर अरुण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | KHAIRNAR VAIBHAV SURESH (खैरनार वैभव सुरेश) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | WANJARE NUTAN PRABHAKAR (वंजारे नुतन प्रभाकर) | प्रतिक्षा -2 | खुला |
| | | | | | | KOLATE DIPAK SURESH (कोलते दिपक सुरेश) | प्रतिक्षा - 3 | खुला |

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | आरक्षण | प्राप्त अर्ज संख्या | मौखिक मुलाखत दिनांक | मौखिक मुलाखतीस हजर उमेदवार संख्या | उमेदवाराचे नाव | निवड व प्रतिक्षा यादीवील अनुक्रमांक | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 46 | **Maternity & Child Welfare Officer-cum-lecturer/Assistant Professor**<br>र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 11 | 20-12-2019 | 11 | THOSAR MAYUR ARUN<br>(ठोसर मयुर अरुण) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | KHAIRNAR VAIBHAV SURESH<br>(खैरनार वैभव सुरेश) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | WANJARE NUTAN PRABHAKAR<br>(वंजारे नुतन प्रभाकर) | प्रतिक्षा -2 | खुला |
| | | | | | | KOLATE DIPAK SURESH<br>(कोलते दिपक सुरेश) | प्रतिक्षा - 3 | खुला |
| 47 | **Epidemiologist-cum-Assistant Professor**<br>र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 29 | 03-01-2020 | 19 | BAWA MUKESH SURESH<br>(बावा मुकेश सुरेश ) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | GAIKWAD BHARGAV VISHWAS<br>(गायकवाड भार्गव विश्वास) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | DESALE ATUL VILAS<br>(देसले अतुल विलास) | प्रतिक्षा -2 | खुला |
| | | | | | | CHAUGULE RAJESH BALASAHEB<br>(चौगुले राजेश बाळासाहेब) | प्रतिक्षा - 3 | खुला |
| 48 | **Statistician-cum-Assistant Prof.**<br>र.रु.15600-39100 अॅके.ग्रेड पे रु. 6000 | खुला 1 | 34 | 07-01-2020 | 21 | THATKAR PANDURANG VITHAL<br>(थाटकर पांडुरंग विठ्ठल) | निवड - 1 | खुला |
| | | | | | | DASE RAJESH KESHAVRAO<br>(दासे राजेश केशवराव) | प्रतिक्षा -1 | खुला |
| | | | | | | SHINKAR SWAPNIL VASANT<br>(शिनकर स्वप्निल वसंत) | प्रतिक्षा -2 | खुला |

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018